ज्योतिर्वैभव

(डिरेक्टरी)

तमसो मा ज्योतिर्गमय

फल ज्योतिष अभ्यास मंडळ संस्था

संस्थापक - श्रीकृष्ण अनंत जकातदार
पुणे ४

संपादक :—श्रीकृष्ण अनंत जकातदार,

ज्योतिर्मार्तण्डः

मूल्य रुपये १५–००

फल ज्योतिष अभ्यास मंडळ, संस्था, पुणें

प्रकाशक :

श्री. श्री. अ. जकातदार

८८५, भांडारकर पथ,
पुणें ४.

किंमत १५ रुपये

प्रकाशन दिनांक : ३०–४–६७

मुद्रक :

द. अ. पांगारकर,

डीलक्स प्रिंटर्स,

२९०, नारायण पेठ, पुणें २.

ऋण-मुक्ति



कै. ती. अनंत सखाराम जकातदार



गं. भा. काशीताई अ. जकातदार

पूज्य माता-पित्यांच्या

पवित्र स्मृतीस

सादर समर्पण

संपादकीय

" ज्योतिर्वैभव " चा हा ग्रंथ आपल्या हाती देत असताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. निर्धाराने उचललेले एक पाऊल निश्चितपणे पुढे टाकले म्हणून संतोष वाटत आहे. कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत आहे.

संकल्प आणि सिद्धि या मध्यें परमेश्वर ईच्छा आड येते असे म्हणतात. परंतु आमच्या बाबतीत आम्हाला अनुभव फारच वेगळा आला. कारण या मध्ये आम्हाला अनेकांच्या अनेक इच्छाच आड आल्या.

वास्तविक ज्योतिषशास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास व्हावा, अधिक संशोधन व्हावे, आधुनिक ज्ञान विज्ञानाची त्याला जोड मिळावी, जनतेत त्या संबंधाने असणारे अपसमज दूर व्हावेत केवळ याच उद्देश्याने आम्ही जे खटाटोप केले त्यातील ज्योतिष मार्गदर्शिका (Directory) हा एक महत्वपूर्ण भाग होता. आणि म्हणून आम्ही महाराष्ट्रातील यच्चयावत ज्योतिषांना साद घातली होती ! विनवणी केली होती ! ! !

या कार्याचे स्वरूप नि या कार्याची आवश्यकता या संबंधी आम्ही आता विस्तारानें काही लिहावे असे मुळीच नाही खरे पाहता ते स्वयंसिद्धच आहे आजच्या या आर्थिक युगात कोणतेहि कार्य म्हटले की " अर्थ " हा आलाच तरच त्याला काहीतरी अर्थ. पण इथेच सर्व अनर्थ झाला. कारण अनेकांना आम्ही जे मूल्य परिचय पत्रकाकरिता ठेवले होते ते भरून आम्हास माहिती देणे म्हणजे कमीपणाचे वाटू लागले. मूल्य कमी जास्त असल्याची भूमिका आम्ही समजूं शकतो पण ही भूमिका मात्र आम्ही समजूं शकलो नाही. ज्योतिषाबाबत जनतेतच अपसमज आहेत. असे नव्हे तर ज्योतिष्यांच्यात स्वत: बाबतहि किती असमज आहे याचेच हे प्रत्यंतर एवढेच म्हणणे भाग आहे.

हे आम्ही इतक्या विस्ताराने लिहिण्याचे कारण ज्यावेळी हा अशा स्वरूपाचा न भूतो न भविष्यति असा सर्वांग परिपूर्ण ग्रंथराज काढण्याची आमची ही मनिषा होती तिला ज्योतिषबंधुंच्या या आडमुठ्या धोरणामुळे वा विचारामुळे मर्यादा घालणे भाग पडले. एकीकडे हा नैतिवा वैचारिक अडथळा तर दुसरीकडे वाढती महागाई, त्यामुळे मुद्रणाचे वाढलेले भाव यातून हे कार्य कितपत तडीस जाईल अशा तऱ्हेची शंका आम्हाला सतत भेडसावीत होती. पण निष्ठा, तळमळ नि इच्छा या प्रस्थान त्रयीवर आज आम्ही आमचा संकल्प पूर्णांशाने पूरा करू शकलो ही मोठ्या अभिमानाची बाब आहे.

वर नमूद केलेल्या प्रवृत्तीचे ज्याप्रमाणे लोक होते. त्याचप्रमाणे या कार्याचे महत्त्व जाणणारे, त्यातील व्याप आणि ताप समजू शकणारेही असंख्य लोक निघाले हेहि नमूद करणे अगत्याचे आहे. किंवहुना असे जर समजुतदार वा जाणकार नसते तर हा ग्रंथच निघू शकला नसता. हा ग्रंथराज लोकादरास निश्चित पात्र होईल असा आम्हास विश्वास वाटतो तो पात्र झाल्यानंतर त्यांच्या सदिच्छा वा त्यांचे आशीर्वाद या सर्वांच्या पाठीशी उभे राहतील. आम्ही केवळ निमित्त मात्र असू असा आमचा विश्वास आहे.

सर्वांचे हात लागल्याखेरीज कोणतेहि कार्य सर्वांगिण परिपूर्ण असे होत नाही त्यादृष्टीने ज्यांनी या योजनेत भाग घेतला त्याच प्रमाणें लेख, आशिर्वाद, संदेश, सदिच्छा देऊन आम्हाला उपकृत केले त्यांचे व तितकेच जाहिरातदार, वर्गणीदार आदि सर्वांचे हात या कार्याला लागले म्हणूनच आज हा ग्रंथराज या स्वरुपात आपल्या हाती पडत आहे. या सर्वांचे आम्ही सहकार्याबाबत मन:पूर्वक हार्दिक आभार मानतो.

या ग्रंथाच्या निर्मिती कार्यास श्री. सदानंद नातू व श्री. या. रं. कुळकर्णी, (नि. जज्ज) यांचे अमोल सहकार्य लाभले.

डी-लक्स प्रिंटर्सचे व्यवस्थापक श्री. दत्तात्रय अनंत पांगारकर यांचा आणि आमचा सततचा ऋणानुबंध आहे तो कायम राहावा ही इच्छा.

शेवटी,

तमसो मा ज्योतिर्गमय।

प्रार्थना करून हे निवेदन संपवितो.


अनुक्रमणिका

(एकून पृष्ठसंख्या ४१८)

० ० ०

“ शुद्धीपत्र ”

पृष्ठ क्रमांक	ओळ	चुकीचे	बरोबर
१७	३४	संतना	संतती
३१	१४	माद्यवाचार्यांचे	माधवाचार्यांचे
४१	२६	डर्के	अर्के
४२	१	सार्वधौय	सार्वभौम
४३	२३	सायन	निरयन
४३	२४	निरयन	सायन
४८	लेखक	प्रो. करमकर	प्रो. करमरकर
६७		चक्षुर्मय	चक्षुर्वैयं
१०६	लेखक	य. श्री. गोसावी	ग. श्री. गोसावी
१३२		तिति	तिथी
१४०		यंत्रशास्त्रज्ञ	मंत्रशास्त्रज्ञ



एस आर ८०/६६

सत्यमेव जयते

रेल मंत्री, भारत
MINISTER OF RAILWAYS
INDIA

नवी दिल्ली,
दिनांक: १०·१.१९६७

फल ज्योतिष अभ्यास मंडळातर्फे ज्योतिष-शास्त्र पारंगत असलेल्या विद्वानांच्या चरित्रांची एक निर्देशिका प्रकाशित होत आहे हे पाहून आनंद झाला. ज्योतिष शास्त्राच्या अभ्यासू व व्यासंगी वाचकांस हा ग्रंथ अत्यंत मननीय, माहितीपूर्ण व संग्राह्य असेल यांत शंकाच नाही. ज्योतिषशास्त्र हें जरी पुरातन असले तरी आधुनिक संशोधनांमुळें ते इतके पुढें गेले आहे की त्यावर अभ्यास करावा तेव्हढा थोडाच होईल. ज्योतिषांवर, मग ते ग्रहमानावर आधारलेले असो अथवा हस्तसामुद्रिक पद्धतीचे असो, विश्वास असो अगर नसो, तें एक शास्त्र आहे व त्याची सर्वांगीण वृद्धि झाली पाहिजे यांत वाद नाही. या दृष्टीनें फल ज्योतिष अभ्यास मंडळाने केलेला उपक्रम अभिनव आहे. ग्रंथ-प्रकाशनास माझ्या शुभेच्छा.

(स.का. पाटील)

श्रीकृष्ण अ. जकातदार
संस्थापक, फल ज्योतिष अभ्यास मंडळ,
८८५ भंडारकर इन्स्टटीयूट रोड,
पूना ४

॥ श्री शंकरो विजयते ॥

११०८ श्री श्रीसच्चिदानंद अभिनव विद्याशंकर भारती स्वामी श्री संत कल्याणसेवक महाराज

श्रीमद्‌जगद्‌गुरु श्री. शंकराचार्य

संस्थान मठ, संकेश्वर-करवीर (बेळगांव)



ज्योतिर्वैभव या ग्रंथरत्नाची माहिती ऐकून संस्थान देवता श्री सन्त कल्याण सेवक महाराज श्रीचरणांना परम संतोष झाला. इतउपर अशाच प्रकारे जनता-जनार्दन सेवा करण्याचे भाग्य व त्यासाठी उदंड आयुरारोग्य तुम्हांस लाभो. एतदर्थ श्री शारदाम्बा चंद्र-मौलीश्वरधन समयी नित्य प्रार्थना होत आहे.

संकेश्वर बेळगांव. महानुशासन वरीर्वति
वर्ष प्रतिपदा शके १८८९
सोमवार दि. १०-४-१९६७.

महाराष्ट्र विधान सभेचे सभापति
ना. बाळासाहेब भारदे



भारतांतील अनेक गुप्तविद्या योगविद्या इत्यादी पुरातन विद्यांप्रमाणे ज्योतिषशास्त्र हे शास्त्र तर आहेच परन्तु ती एक विद्या आहे. मनुष्यास भावी आयुष्यांतील घडा-मोडीचे ज्ञान करून देणारी ही ज्योतिर्विद्या खरोखरच ज्योति होय. अन्य शास्त्रांप्रमाणे या शास्त्राकडे मनुष्याचे लक्ष वेधणे जरूर आहे. या हेतूने श्री. जकातदार यांचा ज्योतिर्विदांच्या डिरेक्टरीचा हा उपक्रम सुयोग्य व उपयुक्त होय.

श्री. बाळासाहेब भारदे
(सभापति, महाराष्ट्र राज्य)

श्री. ह. रा. महाजनी

संपादक :—दैनिक लोकसत्ता.



ज्योतिषशास्त्र भारतांतच निर्माण झालेले व पूर्वापार चालत आलेले एक अधिभौतिक शास्त्र आहे. पृथ्वीपासून हजारो मैल दूर असलेल्या आकाशस्थ ग्रहांचा परिणाम मानवी जीवनावर कसा होऊ शकेल असा संदेह माझ्या मनांत अजूनहि निर्माण होतो पण तरीहि ज्योतिष शास्त्रावर माझी श्रद्धा आहे. मानवास जीवनामध्ये हे शास्त्र खचित उपयुक्त आहे व यासाठी या शास्त्राचा प्रचार होणे आवश्यक आहे. यादृष्टीने फलज्योतिष अभ्यास मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांनीं केलेली ' ज्योतिर्वैभव ' या ग्रंथाच्या प्रकाशनाची योजना खरोखर स्तुत्य आहे.

ह. रा. महाजनी.

डॉ. एच. व्ही. पाटसकर

B. A. L.L. B.

माजी राज्यपाल, मध्यप्रदेश.



'ज्योतिर्विदांची डिरेक्टरी' प्रसिद्ध करण्याची योजना फार उपयुक्त असून फलज्योतिष शास्त्रामध्ये संशोधन होऊन त्याच्या अनेक शाखांचा अभ्यास होणे जरूर आहे. सर्वज्योतिर्विदांची एकत्रित माहिती होणे आवश्यक आहे. त्यायोगे या विषयाचा शास्त्रीय अभ्यास होण्यास चालना मिळेल.

आपल्या या प्रयत्नांस सुयश लाभो ही इच्छा.

आपला

ना. हरिभाऊ पाटसकर.

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

संपादक, दैनिक मराठा.
शिवशक्ति, वरळी, मुंबई १८.



माणसाच्या जीवनांत केव्हां काय घडेल याचा कांही नेम नसतो. पण यासाठी मार्गदर्शन मिळावे म्हणून ज्योतिषशास्त्राचा उपयोग होऊं शकतो. आजच्या विज्ञान युगांत या शास्त्राचा विशुद्ध प्रचार होण्याची गरज आहे. "फलज्योतिष अभ्यास मंडळाचे संस्थापक ज्योतिर्मार्तण्ड: श्रीकृष्ण अ. जकातदार यांनी त्या दृष्टीने केलेले प्रयत्न सर्वश्रुतच आहेत.

ज्योतिर्वैभवसारखा प्रचंड ग्रंथ प्रकाशित करण्याचे धाडस त्यांनी केले आहे. त्यांत ते यशस्वी होवोत आणि त्यांचा 'ज्योतिर्वैभव' ज्योतिषशास्त्राचे वैभव ठरो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

प्रल्हाद केशव अत्रे.

के. टी. गिरमे.

उपाध्यक्ष,
महाराष्ट्र विधान सभा.
दि-२२ एप्रिल १९६७

स. न. वि. वि.

"फलज्योतिष अभ्यास मंडळ" ज्योतिर्वैभव हा ग्रंथ प्रकाशित करीत असल्याचे वाचून फार आनंद झाला. ज्योतिष शास्त्रावर सध्या उपलब्ध असलेल्या साहित्या-मध्ये या ग्रंथामुळे फार मोलाची भर पडणार आहे. ग्रंथकर्त्यांनीं या करिता अपार श्रम घेतलेले असून जनतेकडून त्याचे योग्य ते स्वागत होईल असा मला विश्वास आहे. मंडळाकडन यापुढे असेच भरीव कार्य होत राहील अशी खात्री वाटते.

ग्रंथकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

के. टी. गिरमे

"ज्योतिर्विज्ञान"

लेखक—महर्षि न्यायरत्न धुं. गो. विनोद

नवग्रह व नक्षत्रें, किंबहुना विश्वांतील सर्व तेजोगोल, त्यांच्या स्थूल—सूक्ष्म गति, यांचे ज्ञान हा ज्याचा स्वाध्याय आहे त्या ज्योतिर्विद महा-पुरुषाला दैव-ज्ञ ही संज्ञा सर्वस्वी समुचित आहे.

दैव शब्दाचा अर्थ ईश्वरी नियोजन. देव या शब्दापासून दैव शब्दाची निष्पत्ती आहे. देव शब्दाचा निरुक्तार्थ प्रकाशणारा असा आहे—(दिव्) देव जसा प्रकाश-दाता तसेंच दैवहि एक तेजोबिम्ब आहे.

दुर्दैव हा शब्द दुर्दिन शब्दाप्रमाणेच आहे. दुर्दिन म्हणजे मेघाच्छादित दिवस. तसें दुर्दैव म्हणजे एक स्वयंपूर्ण स्वयंसिद्ध वस्तू नव्हे. दुर्दैव क्षणिक आहे, आगमापायी आहे. कांहीं, अल्पकाळ टिकणारें आहे.

दैव शब्दानें सुदैव हा अर्थ व्यक्त होतो. सुदैव ही मूल-वस्तू आहे. ती कांहीं काळ शबलित झाली छायान्वित झाली, तरी तिचा स्व-भाव निश्चित-पणें प्रकट होणारच. दैव ही देवाची इच्छा आहे; म्हणून ती शेवटीं विधायक व मंगल असणार.

विश्वाचें विधान मंगल आहे. एकंदर जीवनाचें व मानवी जीवनाचें स्वरूप मांगल्यमय आहे.

विश्व हें वस्तुतः 'एकजिनसी' आहे. विश्वा-मध्यें विविध विपुलता आहे. पण त्या विविधतेंत समन्वय आहे. सु-सूत्रता आहे. जीवनाचेंहि तसेंच आहे.

जीवनांत विरोध आहेत; बहिर्विरोध आहेत.



आन्तर-विरोध आहे, परंतु त्या सर्व विरोधांचा परिहार होत असतो. हा परिहार करण्याची शक्ति त्या जीवन-तत्त्वांतच आहे.

विश्वांतले आणि जीवनांतले सर्व विरोध हे

शेवटीं विरोधाचे 'आभास' ठरतात !

आत्म-तत्त्व, त्यावर अधिष्ठित असलेले विश्व-जीवन व जीवन–विश्व ही एक मौलिक व समन्वित त्रिपुटी आहे.

या त्रिपुटींचा, या तीनहि ज्योतींचा एक समयानें अभ्यास करणारा तो ज्योतिषी.

सर्व जातमात्र परस्परसंबद्ध आहे हें ज्योतिषशास्त्राचें पहिलें गृहीत-कृत्य आहे.

कोटयवधि योजने दूर असलेल्या ग्रहांचे परिणाम मानवी जीवनावर कां होतात, या प्रश्नाचें उत्तर प्रस्तुत गृहीत-कृत्यांत आहे.

विज्ञानाच्या उच्चतम व अद्यतन दृष्टीनें पाहिलें तर ग्रह, नक्षत्र, तारे हे कितीहि दूर असले तरी मानवी जीवनावर, सृष्टीवर त्याचे परिणाम होणें अगदी क्रमप्राप्तच आहे. कसें तें पाहूं या.

ज्याला आपण अन्तर म्हणतो त्याचा अर्थ प्रथम ध्यानांत घेतला पाहिजे. अन्तर ही कल्पना स्थल, काल, वेग यांच्याशी संबद्ध आहे.

वेग या कल्पनेंत स्थल व काल यांचा अन्तर्भाव होतो हें स्वयंस्पष्ट आहे. कालाच्या परिमाणानें स्थल मोजण्याची पद्धति, विशेषतः या विसाव्या शतकांत उपयोजिली जात आहे.

अन्तर मोजतांना स्थल परिमाण सांगावयाचे असल्यास कालाचे परिमाण आज तरी सर्वसहा वापरलें जातें.

अनेक ग्रहगोलांचें पृथ्वीपासून असलेलें 'अन्तर' –Distance–प्रकाश-वर्षांच्या सहाय्यानेंच सांगता येते.

एक लक्ष त्र्याऐंशी हजार मैल म्हणजे एक सेकंद. त्या विशाल संख्येची साठपट म्हणजे एक मिनिट, साठ मिनिटांचा एक तास, चोवीस तासांचा एक दिवस व ३६५ दिवसांचें एक वर्ष. एक प्रकाशवर्ष म्हणजे केवढी मोठी अनाकलनीय संख्या होते याची कल्पनाच केलेली बरी.

या गणनापद्धतीचा अर्थ आतां, 'स्थल' नष्ट होऊन अन्तर सांगण्यासाठीं फक्त 'काल' शिल्लक आहे.

याच्याहि पुढचें एक पाऊल आईनस्टाईननें घेतलें आहे. त्यानें, 'काल' हें परिमाणहि कांहीं क्षेत्रांत नष्ट होऊं शकते हें सिद्ध करून दाखविलें आहे.

प्रकाश, उष्णता, क्ष–किरण, कॉस्मिक किरण हे सर्व प्रकार प्रक्षेपणाचे (Radiation चे) आहेत. सर्वांहून अगदी निराळी अशी एक प्रक्षेपणाची 'जाती' आज उपलब्ध झाली आहे.

'Gravitation' आकर्षण हें एक प्राकृतिक सत्य 'Natural Law' आहे. आकर्षण हें प्रक्षेपणाच्य (Radiations) च्या रूपांत व्यक्त होत असतें.

आकर्षणाच्या देखील लहरी आहेत. या आकर्षण लहरी (Gravitationnal waves) ही एक विलक्षण वस्तुस्थिति आहे. सूर्याभोंवती, स्वतःच्या कक्षेंत फिरणाऱ्या अनेकानेक ग्रहांना त्यांच्या गतींत विक्षेप उत्पन्न करून त्यांना अत्यल्प प्रमाणांत स्थानभ्रष्ट करणें, हें या आकर्षण लहरींचें प्रमुख वैशिष्टय आहे. या विषयाचें संशोधन सध्या प्रिन्स्टन (अमेरिका) येथें सुरू आहे. मी प्रिन्स्टन येथें असतांना ऑपेन हेमर यांनीं प्रस्तुत विषयाची रूपरेषा मला सांगितली होती. पृथ्वी सूर्याभोंवती भ्रमणकक्षेंत फिरतांना प्रत्यक्ष सूर्याच्या आकर्षण क्षेत्रांत–Gravitational Field Deffection देखील करूं शकते. हा विक्षेप पृथ्वीच्या आकर्षण लहरी– Gravitational waves करीत असतात.

सर्व तेजोगोलांना आकर्षण लहरींचें एक स्वतंत्र

क्षेत्र असतें.

या आकर्षण लहरी अत्यन्त विशाल असूं शकतात. पृथ्वीची एक आकर्षण लहरी ६,००, ०००, ०००, ०००. एवढे मैल दूर पोचून परिणाम करूं शकते ! त्या लहरींचें सूक्ष्मतम प्रमाण असेंच अनाकलनीय आहे.

ज्योतिषावरील या लहानशा लेखांत हें विवेचन करण्याचें कारण असें कीं, तेजोगोलांच्या या आकर्षण लहरींना अन्तर ही वस्तू नसल्यासारखीच आहे. स्थल, काल व गति यांचा पूर्ण अभाव असतांनाहि या लहरी परिणाम करूं शकतात.

याचा अर्थ असा कीं, पृथ्वीवरील मानवाला स्थल, काल, गति, अन्तर—आवश्यक आहेत. पण नवग्रहांच्या, सर्व तेजोगोलांच्या आकर्षण लहरींना पृथ्वीवर व मानवावर परिणाम करण्यास 'अन्तर' ओलांडावे लागत नाहीं. या आकर्षण लहरींना स्थल—कालांचीं मर्यादा अडथळे करूं शकत नाहीं.

हा सिद्धान्त लक्षांत घेतल्यावर दूरस्थ तेजोगोलांचे मानवावर व पृथ्वीवर कसे परिणाम होतात ही समस्याच शिल्लक रहात नाहीं.

ज्योतिष—शास्त्र हें एक अतीन्द्रिय विज्ञान आहे. तें 'प्रत्यक्ष' शास्त्र आहे हें खरें. पण त्याचें 'प्रत्यक्ष' हें सामान्य प्रत्यक्षाहून अगदीं निराळें आहे. योगदर्शनांत 'प्रतिभा' ही दैवी शक्ति सांगितली आहे. प्रतिभेची कक्षा मानवी बुद्धीच्या पलीकडील आहे. वेद वाङमय हें प्रतिभेचें प्रत्यक्ष 'प्रातिभ—प्रत्यक्ष' समजलें जातें.

ज्योतिष—शास्त्राच्या निर्मितींत व उपयोजनेंत 'स्फूर्ति किंवा देवात्मशक्ति हें प्रमुख साधन आहे. म्हणून हें शास्त्र वेदाचें अंग आहे.

प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थापत्ति, अनुपलब्धि, शाब्द ही सहाहि प्रमाणें जेथें पोचत नाहींत, तेथें वेद पोचतात व या शक्तींत वेदांची वेदता आहे. वेद हे अतीन्द्रिय ज्ञान प्राप्त करून घेण्याचें प्रमुख साधन आहे.

या संदर्भांत सायणाचार्यांनीं उद्धृत केलेला श्लोक असा आहे.

प्रत्यक्षेण अनुमित्या वा यस्तूपायो न बुध्यते ।

ज्योतिष हें वेदांग आहे हें प्रसिद्ध आहे. पण एका दृष्टीनें ते वेदांचें उपांग नसून उत्तमांग आहे. कारण श्रुतीचा तो त्रिकालज्ञ असा भालमध्यावरचा नेत्र आहे.

ज्योतिषशास्त्राची निर्मिति 'प्रातिभ' या 'अलौकिक' प्रत्यक्षांत झाली आहे. आर्ष, सिद्ध व योग-ज ही उरलेलीं तीन 'अलौकिक' प्रत्यक्षेहि ज्योतिषशास्त्राच्या आविष्कारांत संन्निविष्ट आहेत.

ज्योतिष-शास्त्राच्या प्रत्यक्ष विनियोगांत फलगणित व फल-निर्देश यांतहि ज्योतिष शास्त्रज्ञाच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा भाग असतो. प्रातिभशक्ति त्याच्या व्यक्तित्वांतून पाझरते.

भविष्यज्ञ ज्योतिषाचे वैयक्तिक जीवन अन्तर्मुख, विशुद्ध, सत्यसन्मुख नसेल तर त्यानें वर्तविलेली भविष्यें खरीं ठरणार नाहींत.

ज्योतिष—ज्ञाचें 'प्रातिभ' हें अलौकिक-प्रत्यक्ष जागे झाल्यावर, तो जे गणित करील, जीं अनुमानें बांधील, जो फलनिर्देश करील, ते सर्व यथावत्, स-प्रमाण व सयुक्तिक असतीलच.

ज्योतिष—शास्त्र ही एक भव्य उपासना आहे.

क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया ।
दुर्गं पथः तत् कवयो वदन्ति ।।

अशी ही क्षुरधारेसारखी, असिधारेसारखी, निशिता म्हणजे तीव्र व दुरत्यया म्हणजे अमोघ उपासना आहे. येथें सुदीर्घ तपस्या हवी, अव्यभिचारिणी भक्ति हवी व अढळ ज्ञान-निष्ठाहि हवी.

ज्योतिर्विद्या ही खरोखर आत्मविद्या आहे. आत्मतत्त्व हीच मूलज्योति होय. तिच्या तेजानें सूर्य, चंद्र, नक्षत्रे, तारका, सर्व-सर्व कांहीं प्रकाशित व प्रकाशक होऊं शकतें.

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं ।
न मा विद्युतो भाति कुतोऽयमग्निः ।।
तमेव भान्तं अनुभाति सर्वं ।
तस्यं भासा सर्वमिदं विभाति ।

—कठ उपनिषद २.५.१५.

वैदिक यज्ञसंस्था ही ज्योतिषाचीं गंगोत्री आहे. माझ्या मतें, खगोल ज्योतिष हें फलज्योतिषाचें एक उपांग आहे. प्रथम फलज्योतिष व त्याचें उपकरण म्हणून खगोल ज्योतिष हाच अनुक्रम समुचित आहे. यज्ञकृतींना फलदायक म्हणून खगोलविद्या जन्मली.


ज्योति या शब्दानें । न व सत्वगुण यांचाहि निर्देश होतो.

अत एव, ज्योतिषी हा ज्योतीचा उपासक म्हणजे आत्मज्ञानाचा जिज्ञासू व सत्वगुणसंपन्न असला पाहिजे.




धारवाडचे सुप्रसिद्ध वे. मू. ज्योतिषी तार्थानंद केशव दीक्षित यांनी नक्षत्र भाव चक्र निर्माण केले आहे. या चक्राचे सहाय्याने सूक्ष्म काल सांगता येतो.

नक्षत्र चरण भावचक्र



स्पष्टीकरण-- नक्षत्र चरण भावचक्र पाहिल्यावर आपणास अवघड वाटेल. पण या चक्राच्या योगाने सूक्ष्मभाव म्हणजे प्रत्येक भावात कमीजास्त असलेल्या राशी व नक्षत्र प्रत्यक्ष पहावयास मिळतात. जन्म कुंडली मांडल्यावर प्रत्येक ग्रह कोणत्या भावात हे या चक्रावरून सहज लक्षात येईल. प्रत्येक नक्षत्राचे स्वामी वेगवेगळे असतात, त्यामुळे त्याची लक्षणे त्याच स्वरुपात राहातात. उदाहरणार्थ चक्र कुंडलीत लाभस्थानात अश्विनी नक्षत्र आहे, म्हणून अश्विनी नक्षत्राची देव अश्विनी कुमार असून अश्विनीकुमाराच्या स्वभावानुसारे कार्य झाले पाहिजे असे फलित सांगावे. या पद्धतीने चक्राचा फलितास उपयोग करता येतो.



महाराष्ट्राचे दौलतरावजी व भारताचे यशवंतरावजी

फलज्योतिष अभ्यासमंडळ संस्थेचे हितचिंतक.

पंतप्रधान श्रीमती गांधी यांच्या कुंडलीचे मूल्यमापन

लेखक : गजानन श्रीधर गोसावी, बी. एस्सी.




पंतप्रधानकीचा काटेरी मुकुट इंदिराजी गांधी यांचे डोक्यावर सर्वश्रेष्ठ काँग्रेसजनांना डावलून ठेवण्यांत आला आहे. भारताचे पुढें अनेक समस्या आ वासून उभ्या आहेत. भारतास ललामभूत असलेली ही जवाहरलाल नेहरूंची सुकन्या हा राजशकट कसा सांभाळते इकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.


त्या निवडणुकीत यशस्वी होतील या बाबत कोण· त्याहि प्रकारची शंका नव्हती. परंतु या पुढील काळांत निर्माण झालेल्या नवीन परिस्थितीला त्या कशा प्रकारे तोंड देतील या वरच केवळ त्यांचेच नव्हे तर हिंदुस्थानचे भवितव्य अवलंबून आहे. त्या दृष्टिनें त्यांच्या कुंडलीचे आम्हीं मुद्दाम अधिक सूक्ष्मपणे विश्लेषण केलें आहे.

कुंडलीचे मूल्यमापन–दर्जा ठरवितांना ग्रहाचे बलाबल व लग्नांतील राशीस अनुसरून त्याचे शुभा-


जन्म–लग्न कुंडली



नवमांश कुंडली



राशी कुंडली



लग्न दशमबिंदु	र	बु	शु	चं	मं	गु(व)	श	रा	ने	ह	प्लु(व)
२०°१९'.५३	५	७	८	९	४	१	३	८	३	९	२
३२	५	१४	२२	६	१४	१६	२३	१२	१५	२८	१३
	३५	४१	३७	४७	४७	३०	२०	२४	४७	५१	५३

शुभत्व व त्यांच्या, स्थानरूप व भावेशाचे गुणधर्मावरून ठरवावयाचे असते. तसेच ग्रहांचे महत्पदास चढविणारे सांघिक योग त्या प्रमाणांत ती कुंडली श्रेष्ठ असते.

(४) इंदिराजींचा जन्म अलाहाबाद (अक्षांश २५°२८ ८१°–५४ पूर्व) येथें ता. १९–११–१९१७ रोजीं रात्रीं ११-१४ मि. झाला. दशांचे अधिपति आणि ग्रहांचे शुभाशुभत्व किती बोलके आहे तसेच कुंडलीची सुप्त-शक्ति ही त्यांतील योगावर अवलंबून असते हे या कुंडलीवरून दिसून येते.

इंदिरा गांधी यांचा जन्म कर्क लग्नावर झाला आहे. कर्केचा अधिपति चंद्र मकरेचा असल्यानें लहानपणापासूनच त्यांचा सामाजिक चळवळीकडे ओढा होता.बहु-

संख्याक ग्रह अनुदित भागांत असलेनें ही कुंडली दैववादी आहे. ह्या कुंडलींत कित्येक भाग्याचे योग आहेत हे खालीं दिलेल्या योगांवरून दिसून येईल.

ग्रहांची शुभाशुभ स्थिति—कर्क लग्नाचे कुंडलीस मं–गु–चं आणि रवि हे शुभ आहेत व शु–श–बुध हे अशुभ आहेत. मंगळ हा दशमेश व पंचमेश असल्यानें राजयोगी ग्रह झाला व दशम स्थानापासून द्वितीयांत पडल्यानें ९.५ योगांत पडून अधिक शुभ व बलवान झाला. गुरु हा बलवान त्रिकोण अशा भाग्यस्थानाचा अधिपति आहे. तसाच तो षष्ठेश आहे पण बलवान भाग्य त्रिकोणामुळें शुभ आहे. व चंद्र लग्नेश असून नवमांशांत गुरूचे राशींत पडल्यानें अधिक शुभ झाला. शनि हा सप्तम या मारक स्थानाचा अधिपति तसाच अष्टमेश झाल्यानें अशुभ झाला पण लग्नी पडल्यानें थोडा शुभ होतो. शुक्र हा चतुर्थेश व एकादशेस असल्यानें अशुभ. आणि बुध हा तृतीयेश व व्ययेश असल्यानें अशुभ पण शुक्र षष्ठांत, लग्नी शनि व बुध पंचमांत पडल्यानें कांहीं शुभ फलें द्यावीत. रवि मारकेश असला तरी आत्माकारक तसेच धनस्थानचा अधिपति असल्यानें शुभ. राहु षष्ठस्थानीं बलवान असला तरी षष्ठस्थानीं पडल्यानें अशुभ झाला.

इंदिराजींना महत्पदास चढविणारे योग

१. परिवर्तनयोग : गुरु व शुक्र या भाग्येश व लाभेश यांचा लग्नेश व सप्तमेश यांचा द्वितीयेश व पंचमेश यांचा. २. गुरु व चंद्र यांचा नवपंचम योग. चंद्र गुरूचे नवमांशीं असल्यानें अत्यंत शुभ. ३. शनीचे रवि बुधाशीं नवपंचम योग तर चंद्राचे रवि बुधाशीं लाभयोग.

४. स्त्रियांचे कुंडलींत जन्म रात्रीचा असतां व चंद्र रवि आणि लग्न सम राशींत असतां हा महाभाग्याचा आहे. भाग्य कोणत्या बाबतींत असावें–दशम या कार्यक्षेत्राचा अधिपति मंगळ राजराशी सिंह या धनस्थानी असलेल्या राशींत असून दशमेश मंगळाचे दशमांत भाग्येश गुरु आहे. मंगळ राजयोगी ग्रह तर गुरु भाग्येश. ५. भाग्यवानाचे कुंडलींत बहुसंख्याक ग्रह अनुदित भाग्यांत पडतात हे गर्भश्रीमंतीचे लक्षण आहे. शिवाय या अनुदित भागांत अत्यंत भाग्याचा योग द्वितीय या धनस्थानाचा व पंचम या दैवस्थानांचा आहे. हा परिवर्तन योग राजयोगी ग्रह मंगळ व आत्माकारक रवि यांचेमध्यें असलेनें अत्यंत श्रेष्ठ झाला. ६. श्रेष्ठ राजयोग–नवमांश लग्नी नवमांश लग्नाचा अधिपति असून जन्म–लग्न कुंडलींत त्याच नवमांश लग्नांचे राशींत लग्नेश असतां आयुष्याचे मध्य अगर अखेरी राजासारखा सन्मान अगर राजसत्ता हातीं येते. इंदिराजी याचे कुंडलींत नवमांशी लग्नाचा अधिपति शनि नवमांश लग्नी मकर राशींत आहे तर जन्म–लग्न कुंडलींत मकर राशींत चंद्र आहे. ७. जन्म–लग्न असलेल्या राशीचा अधिपति केंद्री अगर त्रिकोणी असता अधिकारप्राप्ति होते. चंद्र मकरेचा असून मकर राशीचा स्वामी शनि लग्नकेंद्रांत आहे. ८ लग्नेश व सप्तमेश यांचा परिवर्तन योग हा महायोग आहे. वरील कुंडलींत लग्नेश चंद्र व सप्तमेश शनि यांचा परिवर्तन योग आहे. ९ गुरु शुक्राचे राशींत असून चंद्र अगर जन्म–लग्न कुंडलींत पंचमस्थानीं असतां व त्यावर बुधाची दृष्टि असतां सुखभाव, राजासारखा सन्मान, वाहनांचा उपभोग घेणारा व रोगांना प्रतिकारशक्ति असलेला होतो. १० आत्माकारक रवीचे द्वितीय स्थानीं वैभवाला कारक असलेला ग्रह शुक्र असतां वेसी हा योग होतो.

इंदिराजींचे आयुष्यांतील घटना व महादशा व अंतर्दशा स्वामीचे शुभाशुभ ग्रहांशी संबंध :

१ रवि महादशा, केतु भुक्ति–

जन्म १९–११–१९१७, भोग्य १ वर्ष ४ महिने.

२ मंगळ महादशा, मंगळ अन्तर्दशा वय १२ (१९२९) गुरूचे दशमांतून भ्रमण व दशमेश मंगळावर दृष्टि.

कर्क लग्नाचा राजयोगी ग्रह मंगळ आहे. प्रथमच काँग्रेस चळवळीमध्यें प्रवेश. मकरेंत चंद्र व नवमांश मकर लग्न असून मकर राशीचा स्वामी शनि. मकर राशींत मकर राशी संघटनाकुशल व रचनाचातुर्य वानर सेनेची संघटना व तिचे नेतृत्व.

३ राहु महादशा, राहुभुक्ति वय १८।१९; २० फेब्रु. १९३६. राहूचे धनुराशींत शुक्रावरून भ्रमण.

४ राहु महादशा, गुरुभुक्ति वय २१ वर्षे. १९३८ गोचरी कुंभ गुरूचे दशमस्थानचा अधिपति, मंगळावर दृष्टि.

५. राहू महादशा शनि अंतर्दशा वय २५, दि. २३–६ १९४२ गोचरी गुरूचा (वृषभ) मकर चंद्राशी ९।५ योग, विवाह ठरला. सप्तमेश शनीचे मूळ गुरूवरून भ्रमण व गोचरी गुरूशी युति.

६. गुरु महादशा, गुरु भुक्ति, वय ३८ वर्षे, १९५५ भाग्येश गुरूचे उच्च राशी कर्केतून भ्रमण पण तुला शनीचे गोचरी भ्रमण दृष्टींत व गोचरी गुरूची भाग्यकारक ग्रह चंद्रावर दृष्टि...

७. गुरु महादशा, बुधभुक्ति वय ४२ वर्षे, १९५९ गुरूचे वृश्चिक राशीतून रवि बुधावरून भ्रमण राहूचे मूळ राहूचे दशमस्थान (तृतीय स्थानांतून) कन्या राशींतून गोचरी भ्रमण...

८. गुरु महादशा, केतु भुक्ति वय ४३ वर्षे, सप्टेंबर १९६०. शनि गुरुचे षष्ठ स्थानांतून राहू शुक्रावरून भ्रमण तर राहूचे मंगळावरून सिंह राशींतून द्वितीय वा सप्तमाचे अष्टम स्थानांतून भ्रमण...

९. गुरु महादशा, शुक्रभुक्ति वय ४७, २७ मे १९६४. शनीचे कुंभ राशींतून अष्टम स्थानांतून सिंहेच्या मंगळासमोरून भ्रमण...

१०. गुरु महादशा, चंद्र भुक्ति, वय ४८, १९ जानेवारी १९६६. भाग्येश गुरु वक्री असून त्याचे आत्माकारक रवीसमोरून भाग्यकारक चंद्राशी ९/५ योगांत भ्रमण तर दशमेश मंगळाचे उच्च अशा मकर राशींतून. भ्रमण गुरु मंगळ ९/५ योग, चंद्र–मंगळ युति.

कमला नेहरूंचा मृत्यु. मातृसुखाचा नाश. शुक्र चतुर्थ या मातृस्थानाचा अधिपति असून बलवान राहूने युक्त असा षष्ठस्थानीं शुक्राचे अष्टमांत शनि मृत्युसमयीं शनीचा आजार. कर्क राशींत शनि फुफ्फुसाचा बिघाड.

गुरु भाग्येश, राहु दशम स्थानाचे भाग्यस्थान, षष्ठस्थान यांत आहे. शनि व राहु काँग्रेस पक्षाचे सभासद पुढील भाग्याचा पाया.

इंदिराजींचा फेरोज गांधी या पार्शी तरुणाशी विवाह. सप्तमेश शनि व शुक्र राहूनें युक्त, विवाहकारक स्थान सप्तम स्थान आहे व विवाहकारक ग्रह शुक्र आहे. राहू परजातिदर्शक ग्रह आहे. प्रीतिविवाह चंद्राचे पंचमस्थानाचा अधिपति शुक्र आहे. परंतु लग्नेश व सप्तमेश यांचा समसप्तम योग-पतीपासून दूर व वैचारिक मतभेद दर्शवितो. पण परिवर्तन योग हानिकारक नाहीं.

काँग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद भाग्यवृद्धि गुरु भाग्येश आहे. इतकेंच नव्हे तर भाग्यकारक ग्रह चंद्र यासीं त्याचा ९।५ योग असून आत्माकारक रवीवर त्याची दृष्टि आहे. नवमांश कुंडलीत नवमांश लग्नाचाअधिपति शनि लग्नी असून त्यांचे दशमांत शनीची उच्च राशी तुला आहे.

काँग्रेस वर्किंग कमिटीचे अध्यक्ष, राजासारखा सन्मान, वर महत्पदास चढविणारा योग ९ पाहा–पंचमांत वृश्चिकेचे रवि बुधावर गुरुची दृष्टि राहूचे वय ४२ वर नियंत्रण आहे.

फिरोज गांधी यांचा मृत्यु. पतिसुखास पारखे, सप्तम केंद्र पतिस्थानांत मकर राशी असल्याने त्यास मारक ग्रह मंगळ, गुरु व चंद्र आहेत. केतु कुजवत आहे, नवमांश लग्नी शनी-केतु युति आहे, तर सप्तमस्थान हर्शल–चंद्र युतीने बिघडले आहे आणि शनि चंद्राचा समसप्तक योग आहे. राहु सप्तमाचे व्ययस्थानीं आहे.

जवाहरलाल यांचा मृत्यू. पित्याचे सुखास पारखे. दशमस्थान पिताकारक दशमाचे मारक (सप्तम) हे चतुर्थस्थान असून स्वामी शुक्र आहे तर दशमस्थानाचे व्ययस्थानचा अधिपति गुरु आहे, दशम स्थानचा अधिपति मंगळ आहे व कर्क लग्नाचा मारकेश शनि आहे.

चंद्र वर्गोत्तम आहे व गुरु भाग्येश आहे. इंदिराजी पंतप्रधान झाल्या. मारकेश शनीचे कुंभेतून भ्रमण व दशमेश मंगळाचे समोरून होते. पंतप्रधान होण्यास अत्यंत अडथळे झाले पण मारकेश शनि मृत्युस्थानीं असल्यामुळें विरोधकांचा पराजय.

११. गुरु महादशा, मंगळ अंतर्दशा वय ५० चालू.

भारतांतील निवडणुकांमध्यें त्या यशस्वी होऊन पुनः पंतप्रधान झाल्या. गुरु भाग्येश होता व मंगळ–अंतर्दशा अधिपति दशमेश होता तसेच गुरूचे कर्क या त्याच्या उच्च राशींतून भ्रमण असून पुढेहि सिंह या राजराशींत असलेल्या मंगळावरून गुरूचे भ्रमण चालू होते, परंतु शनीचे भाग्यांतून व राहूचे दशमांतून मेष राशींतून भ्रमण चालू असल्यानें अत्यंत विरोधी परिस्थितीस तोंड द्यावे लागले.

१२. गुरु महादशा, राहु अंतर्दशा वय ५० पूर्ण. राहु अंतर्दशा १९–११–१९६७ पासून सुरू ते मार्च १९६९ पर्यंत आहे.

गुरु षष्ठेश आहे व षष्ठस्थानचे षष्ठस्थानांत तो वृषभ या विरुद्ध गुणधर्माचे राशीत असल्यानें, राहू षष्ठांत व त्याचे भ्रमणदेखील भाग्यांतील मीन राशींतून चालू होत असल्यानें स्वकीयांचा विरोध प्रखर जाणवला. सप्तमेश शनीचे दशमस्थानांतून भ्रमण चालूं होतें व त्याच वेळीं भारताचे कुंडलींत ते व्ययस्थानांतून होतें. म्हणून प्रकृति बिघडली.

१३. शनि महादशा– शनिभुक्ति वय ५३, मार्च १९६९ ते मे १९७२ पर्यंत.


हा मारकेश शनीचा काल आहे. या कालांत इंदिरा गांधींना अत्यंत खडतर प्रसंगांतून जावे लागेल. चंद्र लग्नेश शरीरकारक असून त्यावर मारकेश शनीची दृष्टि आहे व तोच अष्टमेश आहे. त्यांचे आयुष्यमान मध्यायु आहे. त्याची मर्यादा ५० ते ६० वय ही त्यांच्या जीवनाची अखेर ठरेल. वय ५२ ते ५३ हा गंडांतर-योग दर्शवितो.


" ज्योतिष शास्त्राचे दुर्बिणींतून "

(आम्ही खाली कांहीं भूतपूर्व व विद्यमान केंद्रीय व राज्यसरकारच्या मंत्र्यांच्या कुंडल्या अभ्यासनीय कुंडल्या म्हणून दिलेल्या आहेत व त्यांचे ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने थोडक्यांत विश्लेषण केले आहे. त्याचा या शास्त्राचे जाणकार व अभ्यासूंना खचितच उपयोग होईल असे वाटते.——संपादक.)

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान

कै. जवाहरलाल नेहरू






जन्म दि.१४–११–१८८९


जन्म वेळ–११ वा. ३ मि.

जन्मस्थळ–अलाहाबाद.

फलादेश—–चंद्र स्वराशीचा असून कीर्तिदर्शक आहे. व्ययांतील उच्च राशीचा राहू परदेशांत कीर्ति जास्त वाढवितो. चतुर्थेश शुक्र चतुर्थांत त्यामुळें घरची मूळ परिस्थिति व वैभव उत्तम. रवि मंगळाच्या राशींत त्यामुळें धडाडी, कर्तृत्व हे गुण दिसून आले. धनस्थानीं शनि त्यामुळें उदार वृत्ति.

कै. लालबहादूर शास्त्री





जन्म दि. २–१०–१९०४

जन्म वेळ–

पहांटे ४ वा ८ मि.


जन्मस्थळ–रामनगर.

कै. लालबहादूर शास्त्री यांचे नांव एकदम जनतेसमोर आले. त्यांनीं आपल्या अल्पशा कारकीर्दींत अलौकिक कर्तृत्व दाखविले व साऱ्या जगाचें लक्ष वेधून घेतले. लहानपणीं अतिशय कष्ट सहन करून विद्या पूर्ण केली. गरिबींत दिवस काढले व महत् पदाला जाऊन पोंचले. त्यांच्या पत्रिकेचे विशेष ग्रहयोग–सिंहलग्नाचा राजयोगकारक ग्रह गुरु भाग्यांत म्हणजे त्रिकोणांत तसेच दुसरा भाग्येश मंगळ लग्नीं सिंह या राजराशींत. त्याच्याशी गुरुचा त्रिकोण योग लग्नीं राहू सिंहेचा. दशमाधिपति शुक्र तृतीयांत स्वराशींत व चंद्राचे शुभयोगांत त्यामुळें अतिशय वाईट परिस्थितींतून उच्च पदावर गेले.

भारताचे गृहमंत्री व मुत्सद्दी राजकारणी पुरुष.

ना. यशवंतरावजी चव्हाण





जन्म दिनांक–
१२ मार्च १९१४

जन्मवेळ–
पहाटे ४ वा. ३० मि.

जन्मस्थळ–कऱ्हाड.


यशवंतरावांचे असामान्य कर्तृत्व कोणीहि विसरूं शकणार नाहीं. त्यांनीं १९६२ मध्यें संरक्षणमंत्रीपदाची धुरा स्वीकारून आपले बुद्धिकौशल्य दाखविले. ही गोष्ट महाराष्ट्राला खरोखरच भूषणावह आहे. त्यांच्या पत्रिकेंतील शनि–गुरूचा नवपंचम योग हा मुत्सद्दीपणा दर्शवितो, नेपच्यून–शुक्राचा त्रिकोणयोग हा अनपेक्षित शुभ घटना घडवून अलौकिक कामगिरी करवितो. तसेच भावी कालांत भारताचे पंतप्रधान होण्याची शक्यता दर्शविते. परंतु षष्ठांतील मंगळ हा प्रकृतींत बिघाड ठेवतो.

ना. स्वर्णसिंग संरक्षणमंत्री



जन्म दिनांक–
१९–८–१९०७

जन्मवेळ–
सायं. ४ वा.




हे सध्यां भारताचे संरक्षणमंत्री आहेत. यांचे विशेष ग्रहयोग––वृश्चिक लग्नाचा राजयोगकारक ग्रह गुरु भाग्यांत उच्च राशींत भाग्येश चंद्र धनांत. केंद्र कोनाधिपति म्हणजे चतुर्थेश शनि व पंचमेश गुरु यांचा नवपंचम हा महत्त्वाचा शुभयोग. दशमेश रवि भाग्यांत गुरूसह त्यामुळे स्वकर्तृत्वावर पुढे येणारा हा योग आहे. यापुढील ३ वर्षें त्यांना उत्कर्षाला नेणारी जातील व त्यांचा नांवलौकिक वाढेल.

प्रणिपत्य रविं मूर्ध्ना वराहहिरात्मजेन पृथुयशसा ॥ प्रश्ने–कृताऽर्थगहना परार्थ–मुद्दिश्य सद्यशसा ॥१॥

अर्थ––ग्रंथारंभीं नम्र मस्तकानें सूर्याला नमस्कार करून, उत्तम कीर्तिमान असा जो वराहमिहिर नामक पंडिताचा पृथुयशा नांवाचा पुत्र, त्यानें लोकांवर उपकार करण्याच्या उद्देशानें, ज्यांतील अभिप्राय गूढ आहेत अशी प्रश्न पाहण्याची विद्या रचिली.

ना. मोरारजीभाई देसाई
(अर्थमंत्री)






जन्म दि.–२९।२।१८९६

जन्मवेळ–दुपारीं
१ वा. ३०

जन्मस्थळ–बलसाड


ना. मोरारजीभाईंना ओळखत नाहीं असा मनुष्य सापडणें विरळा ! एक कर्तबगार अधिकारी पुरुष म्हणून ते ओळखले जातात. शासकीय दृष्टीनें उत्तम शासकाला लागणारे गुण त्यांच्यांत विशेषत्वानें आढळून येतात. तसेच भाग्यांत कुंभेचा राहु शुभ व अधिकारदर्शक उच्चीचा मंगळ (मकरेचा) निर्भिड वृत्ति, स्वाभिमानी त्याचबरोबर करारीपणाही त्यांच्यांत दिसून येतो. महाराष्ट्राचे मुख्य मंत्री म्हणून त्यांनीं कामगिरी चोख बजावली होती. सध्या ते भारताचे दुसऱ्यांदा अर्थमंत्री झाले आहेत. विशेष ग्रहयोग–दशमेश उच्च राशींत कर्केत गुरु, भाग्येश पंचमात उच्चीचा (तूळेचा शनि) तृतीयेश भाग्यांत त्याच्याशी शनीचा शुभयोग.

ना. स. का. पाटील.
(भूतपूर्व रेल्वेमंत्री)



जन्म दिनांक–
१४–८–१९००

जन्मवेळ– पहांटे



संघटनाचातुर्य, व्यवहारदक्षता हे गुण यांच्यांत विशेष दिसून येतात. तसेंच आयुष्यांत यांना अनेकांचा विरोध, टीका सहन करावी लागूनहि ते कधी डगमगले नाहींत. यांच्या पत्रिकेचे विशेष ग्रहयोग––मिथुन लग्नाचा राजयोगकारक ग्रह (शुक्र पंचमेश) लग्नी मंगळासह; चंद्र, गुरु व रवीचा नवपंचम, भाग्येश शनि सप्तम केंद्रांत; १४ ऑगस्ट १९६७ पासून ४ मे १९७२ या काळांत यांच्या कर्तृत्वाला विशेष धार येईल. तसेच या काळांत पुनश्च अधिकारप्राप्ति होण्याचे योग. मात्र शनि–मंगळाचे प्रतिवेगामुळें प्रत्येक बाबतींत विरोधांतून जावे लागेल.

विवाहप्रश्न


गुरुरविसौम्यैर्दृष्टास्त्रिसुतमदायारिगः शशी-लग्नात् ।। भवति च विवाहकर्ता त्रिकोण-केंद्रेषु वा सौम्याः ।।२।।

अर्थ–प्रश्नलग्नापासून ३।५।७।११।६ ह्यांतल्या कोणत्याही स्थानीं चंद्र असून त्यावर गुरु, रवि, बुध ह्यांच्या दृष्टि असतील तर अथवा लग्नापासून त्रिकोणीं व केंद्रीं सर्व शुभग्रह असतील तर ते विवाहकारक होतात.

ना. वसंतराव नाईक

(महाराष्ट्राचे कर्तबगार विद्यमान मुख्य मंत्री)





जन्म दि.–१ जुलै १९१३


जन्म वेळ–
पहाटे सुमारे ५ वाजता.

ना. वसंतराव नाईक हे अतिशय सुसंपन्न परिस्थितींत जन्माला आले. ते कांहीं काळ वकिली व्यवसाय करीत असत. त्यांना लहानपणापासून समाजसेवा, सार्वजनिक कार्य यांची आवड. तसेच हजरजवाबीपणा, विरोधकांना सांभाळून घेण्याची उदार मनोवृत्ति दिसून येते. त्याचबरोबर राजकारणधुरंधरहि आहेत. त्यांचे विशेष ग्रहयोग :— लग्नी उच्च राशीचा चंद्र, तसेच भाग्येश व दशमेश एकच शनि लग्नीं हा मोठा व महत्वाचा राजयोग. व्ययेश व्ययांत व अष्टमेश अष्टमांत व त्यांचा नवपंचम शुभ. त्यामुळें अनकल्पित शुभ घटना घडतात. भावी कालाचे दृष्टीनें विचार करतां, १० ऑक्टोबर १९६७ पासून १५ जून १९७३ या कालांत त्यांचे हातून भरीव कामगिरी घडून येईल. तसेच अन्नधान्याचा प्रश्न विशेष करून सोडविला जाईल. व महाराष्ट्राची शान वाढेल. तसेच त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळांत उच्चपद मिळण्याची शक्यता आहे.

ना. बाळासाहेब देसाई

(भूतपूर्व गृहमंत्री व विद्यमान महसूलमंत्री
महाराष्ट्र राज्य)






जन्म दि.–
१० मार्च १९१०

ना. बाळासाहेब एक हुशार, कर्तबगार व्यक्ति म्हणून साऱ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. त्यांनीं आजपर्यंत अनेक अधिकारपदें भूषविली आहेत व ती योग्य रीतीनें कार्यवाहींत आणली आहेत. सध्या ते महाराष्ट्राचे महसूलमंत्री आहेत. त्यांचे विशेष ग्रहयोग––कुंभ लग्न, लग्नी चंद्र पंचमेश बुधासह त्यामुळें असामान्य बुद्धिमत्ता, सप्तमाधिपति रविलग्नीं भाग्येश शुक्र उच्चीचा चंद्राचे धनांत शुक्र दशमेश मंगळ केंद्रांत. राहु-गुरु नवपंचम शुभ त्यामुळें अकलिपत गोष्टी घडतात. या पुढील ४ वर्षे उत्कर्षाची जातील.

श्रीमती निर्मलाराजे भोसले

(भूतपूर्व समाजकल्याणमंत्री महाराष्ट्र राज्य)



जन्म दिनांक—
१—१२—१९१७


जन्मवेळ—
रात्री ४ वा. २० मि.

जन्मस्थळ— बडोदा

यांचा जन्म एका सुप्रसिद्ध राजघराण्यांत (गायकवाड) झाला. यांनीं आतापर्यंत अनेक सामाजिक कार्यांत आत्मीयतेनें भाग घेतलेला असून महाराष्ट्राच्या समाजकल्याणमंत्री म्हणून बराच काल काम केलें आहे. त्यांच्या पत्रिकेचे वैशिष्ट्यपूर्ण ग्रहयोग असे आहेत—-पंचमेश शनि दशमांत शुभ, भाग्येश बुध तृतीयांत, बुधाची भाग्यावर दृष्टि, लग्नेश शुक्र व षष्ठेश गुरु यांचा नवपंचम, सप्तमाधिपति मंगळ लाभांत राजराशींत, रवि—नेपच्यून शुभयोग.

ना. पी. के. ऊर्फ बाळासाहेब सावंत शेतकीमंत्री





जन्म दि.— ८ जून १९०८
जन्म वेळ—दुपारी १२ वा. २२ मि.

आपण बरें की आपलें काम बरें या वृत्तीनें वागणारे हे गृहस्थ आहेत. तसेच बोलण्यापेक्षां कृति करण्याकडे अधिक कल दिसून येतो. सध्या ते महाराष्ट्राचे शेतकीमंत्री आहेत व याच जागेवर त्यांनीं यापूर्वीहि काम केलें आहे. विशेष ग्रहयोग — सिंह लग्नाचा मूल त्रिकोणाधिपति गुरु व केंद्राधिपति (सप्तम) शनि यांचा नवपंचम शुभयोग. भाग्येश मंगळ लाभांत असून तो चंद्राचे दशमांत आहे. त्यामुळें स्वकर्तृत्वावर पुढे नेणारा योग, चंद्र—रवि शुभयोग कीर्तिदर्शक. यांची ज्योतिषशास्त्रावर विशेष श्रद्धा व प्रेम आहे.

ज्योतिर्विदांचे परिचय

श्री. वासुदेवराव महादेव गोखले
ज्योतिष–विशारद



यांचा जन्म ठाणें जिल्ह्यांत मुरबाड तालुक्यांत झाला. वडील तलाठी होते. वडिलांचे कृपाछत्र फार न लाभल्यानें बालपण कष्टांत गेलें. घरची मूळची परिस्थिति बेताची. १९५५मध्यें पुण्यांत विद्यार्जनासाठीं वास्तव्य. पुढें इंग्रजी चौथीपर्यंतचे शिक्षण भावेस्कूलमध्यें झालें. नंतर शाळा सोडली. लहानपणापासून त्यांना चित्रकलेची आवड. त्यामुळें गणपतीच्या मूर्ति तयार करण्याचा छंद लागला व त्यांत १९२५ पासून प्रगती होऊं लागली. ते आजतागायत गणपतीच्या मूर्ती तयार करून त्याची विक्रीहि करतात व तेहि एक चरितार्थाचे साधन बनले आहे.

१९४२ पासून ते मराठी नू. म. वि. शाळेमध्यें हस्तव्यवसाय शिक्षक म्हणून नोकरीस आहेत. त्यांना १९२८ पासून ज्योतिषशास्त्राची आवड निर्माण झाली. सुरूवातीस ते जिज्ञासू वृत्तीमुळें इतरांना विचारीत, त्यांचेशी चर्चा करीत. सुरूवातीस त्यांनी हस्तसामुद्रिकाचा अभ्यास केला, पण त्यांत बरोबर मार्गदर्शन न होऊ शकल्यानें कुंडलीशास्त्राकडे ओढा निर्माण झाला. त्यांनी प्रथम कुंडली तयार करणें, व इतर ज्ञान श्री. बेल्हेशास्त्री यांचेकडे घेतलें. नंतर ज्योतिषविषयक अनेक ग्रंथांचे वाचनहि सुरू केलें. बृहत्–पाराशरी या ग्रंथाचा अभ्यास केल्यानंतर वेगळा गुरु करण्याची किंवा वारंवार एखाद्याचे मार्गदर्शन घेण्याचीं जरूरी नाहीं असें त्यांचे स्वानुभवानें मत झालें आहे.

आज जवळजवळ ३५ ते ३८ वर्षांचा त्यांचा ज्योतिषशास्त्राचा व्यासंग आहे. त्यांचेकडे येणाऱ्या गरजूला ते मोकळेपणानें व स्पष्टपणें मार्गदर्शन करतात. टक्केवारींतच बोलायचे झाल्यास शें. ७५ ते ८० लोकांना त्यांचे भविष्याची प्रचीति आली आहे व आजहि येत आहे. त्यांचेकडे अनेक व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रहच तयार झाला आहे. त्यांत अगदी गरीबापासून श्रीमंतापर्यंत, सामान्य माणसापासून मंत्र्यापर्यंत, सरकारी अधिकारी, वकील, डॉक्टर्स, साधू–संत, लेखक, पत्रकार निरनिराळे व्यावसायिक लोक, लुच्चे, लफंगे, चोरं यांच्याहि कुंडल्या त्यांनी पाहिल्या व अभ्यासल्या आहेत. त्यामुळें त्यांना सर्वांगीण अभ्यास होण्यास मदतच झाली.

संस्थेशी त्यांचा अगदी स्थापनेपासून आजपर्यंत निकटचा संबंध आहे. संस्थेतर्फे त्यांना ज्योतिषशास्त्रांतील "ज्योतिष-विशारद" ही बहुमानाची पदवी ७।२।६४ रोजी सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. गोगटे यांचे हस्ते अर्पण करण्यांत आली. कालमान परिस्थितीप्रमाणें गेल्या २।३ वर्षापासून ते कुंडल्यांची सर्व प्रकारची कामें योग्य त्या मोबदल्यांत करीत असतात. गेलीं सुमारे ३ तपें ते गणपतीच्या मूर्ती तयार करीत असल्यानें त्या धंद्यातील अनुभव, प्रगती व प्रगतीपासून त्याची माहिती सर्वांना व्हावी या हेतूनें १९६० साली त्यांचे पुणें आकाशवाणी केंद्रावर खास भाषण ठेवण्यांत आले होते व तेहि अतिशय माहितीपूर्ण असेंच झाले.

"ज्यो. समाचार" मधून ते लेखन करीत असतात. ज्योतिष या विषयावर अत्यंत सोप्या भाषेंत व वाचकांस उपयुक्त ठरून खिशाला परवडेल अशा किंमतीत पुस्तके लिहिण्याचा त्यांचा मानस असून त्यादृष्टीनें त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांचे स्वतःचे स्वानुभवांती असे मत बनले आहे, जगांतील सर्व शास्त्रांपैकी ज्योतिष हेच एकमेव शास्त्र असे आहे की त्याचा मानवी जीवनाशी निकटचा संबंध आहे. ते एक मानवी जीवनांतील मार्गदर्शक असा दीपस्तंभच आहे. ज्योतिषी भाषणे देतात, वेगवेगळ्या नियतकालिकांतून, मासिकांतून यावर लेख लिहितात पण त्याचा या विषयाचे अभ्यासूंना उपयोग होत नाही. तरी त्यांत सुधारणा व्हावी. त्यात निश्चित अनुमानें काढूनच उदाहरणासहित हे लेख असावेत अशी त्यांची सूचना आहे.

श्री. वासुदेवराव महादेव गोखले
घ. नं. ५६३ शनवार पेठ, पुणें २.

सुरुपः सुभगो दक्षः स्थूलकायो महाधनी
अश्विनी संभवो लोके जायते जनवल्लभः ॥

अश्विनी नक्षत्रांत ज्यांचा जन्म होतो तो स्वरुपवान, भाग्यशाली, शरीरानें मोठा, धनवान तसेच सर्वांचा प्रिय असा होतो.

पं. बाळाजी उर्फ भैय्याशास्त्री गर्गे

विद्यालंकार



यांना लहानपणापासूनच विद्याव्यासंग व सामाजिक कार्य करण्याची हौस. आज त्यांचे वय ६० वर्षे आहे. त्यांनी आतापर्यंत बऱ्याच ज्योतिष परिषदांतून भाग घेतला असून नासिक ज्योतिर्विद्या संशोधन मंडळाचे प्रथमपासून सभासद आहेत. इंग्रजी शिक्षण झाले नाहीं. पूर्वीच्या धार्मिक आंदोलनांतून त्यांनी भाग घेतला. वेदशास्त्र, श्रौतस्मार्त, कर्मकांड यात निष्णात म्हणून प्रसिद्ध आहेत. यांचे शिक्षण वडील कै. रंगभट्ट गर्गे, वैदिकतिलक कै. अण्णाशास्त्री वारे व वेदमूर्ति गुरुवर्य नारायण देव यांचेजवळ झाले. वैदिकी, याज्ञिकी, ज्योतिष विषयांचे शिक्षण ते विद्यार्थ्यांना विनामूल्य देतात. त्यांना श्रीमद् जगद्गुरु शंकराचार्यांकडून 'कर्मकांड' व 'विद्यालंकार' या पदव्या मिळाल्या आहेत. यांची श्रुतिमधुर वेदपठणाविषयी फारच ख्याती आहे. तसेच यज्ञीय प्रक्रियांविषयींची विद्वत्ता वाखाणण्याजोगीं आहे.

ज्योतिर्मयुख, भृगुसंहिता, मुहूर्त मार्तंड, धर्मशास्त्र, यांचा अभ्यास व निरयन पद्धतीने फलज्योतिषाचा व्यासंग आहे.

घ. नं. १०१९ शुक्ल गल्ली
नासिक

श्री. आत्माराम विष्णुशास्त्री अळवणी

जन्म २० एप्रिल १९२७



यांनी शालेय शिक्षण घेतल्यानंतर सावंतवाडी जवळच असलेल्या वेदशाळेंत कै. शंकर शास्त्री कशाळीकर यांचेकडे वैदिक व याज्ञिक यांचे थोडेबहुत शिक्षण घेतलें. यांच्याघराण्यांतील तीन पिढ्या ज्योतिष व्यवसायांतील असल्याने ज्योतिषाचे शिक्षण घरांतच झाले. नंतर याच व्यवसायावर उपजीविका करणे अपरिहार्य वाटल्याने १९४४ ते १९५१ पर्यंत वैनतेयकार श्री. शिरोडकर यांचेकडे नोकरी केली. नंतर भिक्षुकी व ज्योतिष ह्या व्यवसायावर उपजीविका चालविणे कठीण झाल्याने वॉच रिपेअरिंगचे शिक्षण घेऊन तोहि व्यवसाय ते करीत आहेत. अधूनमधून ते लेखन व्यवसायहि करीत असतात.

१९५२ सालापासून ते हा व्यवसाय करीत आहेत. जन्म तारीख व वेळेवरून पत्रिका तयार करणे, मुहूत काढणे, प्रश्न व भविष्यविषयक इतर कामे नेहमी करीत असतात. आजपर्यंत त्यांनी जवळजवळ ५२५ पत्रिका तयार केल्या आहेत. त्यांचा या विषयाचा व्यासंग वाढत असून, त्यांच्या ज्ञानाचा अनुभव तेथील लोकांना येत आहे. तसेच या विषयाचा जास्तीत जास्त उपयोग जनतेस होण्याच्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू असतात. ईश्वर त्यांना यश देवो हीच शुभेच्छा.

भट्टवाडी (सावंतवाडी) जि. रत्नागिरी.

पंडित नरहर परशुराम महाजन.

होरारत्न, ज्योतिष–विशारद



हे मूळ पुणें जिल्ह्यांतील इंदापूर या गांवचे रहाणारे. त्यांचे वडील यांचे वयाचे ७वे वर्षीच निधन पावले. त्यामुळें त्यांचे संगोपन मामांनी केलें. मराठी ७ वी पास झाल्यावर त्यांनी शिक्षकाची नोकरी धरली. पुढें १९२४ साली ट्रेनिंगचे शिक्षणपूर्ण करून तालुका मास्तरचे हुद्यावर पेन्शन घेतलें. ज्योतिष विषयावर त्यांनी बरेच लेख लिहिले आहेत. त्यांनी लहान मुलांकरिता जवळ जवळ ३५ पुस्तकें लिहिली आहेत. पुढें त्यांनी फलज्योतिषाचा अभ्यास केला. भविष्यदीप, भविष्य–भास्कर, भविष्य–चिंतामणि, भविष्यमौंज वगैरे साप्ताहिकांत ज्योतिषविषयक बरेच लेख व रहस्यकथा तसेंच प्रश्नजातक भाग १, अचानक धनलाभ भाग २, यशस्वी जीवन वगैरे पुस्तकें लिहिली असून ती फारच लोकप्रिय झाली आहेत. ज्योतिष समाचार मासिकात अव्याहत लेखन करतात.


ते स्वतः प्रसिद्धिविन्मुख असून या शास्त्राधारे १९४१ ते १९५० या सालांत लिहिलेली थोर व्यक्तींची भविष्यें ८० ते ९० टक्के खरी ठरली. समाधान व सिनेन्यज (नागपूर), लोकशक्ती व छाया (पुणें) या साप्ताहिकांतून त्यांनी भविष्य लिखाण केले आहे. त्यांनी लिहिलेली पुस्तकें उत्कृष्ट ठरल्याने फलज्योतिष अभ्यास मंडळ व ज्यो. विद्या मंदिर (मुंबई), श्रीमद् जगद्‌गुरु शंकराचार्य यांचेकडून पदव्या मिळाल्या आहेत. त्यांनी वर्तविलेली कै. अण्णासाहेब आवटे, श्री. नरूभाऊ लिमये यांची भविष्ये खरी ठरली आहेत.

यापुढे ज्योतिषशास्त्रांतील प्रत्येक स्थान विभागावर लिहिण्याचा त्यांचा विचार आहे. सध्या ते प्रश्नजातक भाग ३, मी कोण होणार ही पुस्तकें लिहीत आहेत. 'असे होते संत तुकाराम' हे चरित्र प्रसिद्ध झाले असून सर्व संत चरित्रें ते लिहिणार आहेत. या शास्त्राची ते मोठ्या आवडीनें व कष्ट घेऊन सेवा करीत आहेत.

मु. पो. ता. इंदापूर
जिल्हा पुणें.

श्री. रमेश पुरुषोत्तम दामले, होराभूषण

(D. I. A. S.) जन्मः–२०मार्च १९३३




हे मूळचे (किवळे–पुण्याजवळ) येथील. वडील इलेक्ट्रिकल सुपरवायझर होते. १९-५२ मध्यें (S.S.C.) उत्तीर्ण झाले. नंतर आजारी पडले. सर्व अनुकूलता असताना केवळ प्रकृतीमुळें उच्च शिक्षणात व्यत्यय कां या विचाराने त्यांना ज्योतिष शास्त्राची आवड आणि जिज्ञासा निर्माण झाली. सूक्ष्म पद्धतीने अभ्यास केल्यानंतर त्याचे आधारें जीवनांतील बऱ्याच चांगल्या व वाईट गोष्टींचा अंदाज निश्चित घेता येतो याची खात्री झाली. नंतर त्यांनी 'ज्योतिष-शिक्षण–महाविद्यालयाचा' कोर्स पुरा केला व होराभूषण ही पदवी मिळविली.

आयुष्यभर या शास्त्राचा अभ्यास करून व्यासंग वाढविण्याचा त्यांचा मानस आहे. तसेच या शास्त्राधारे जनतेची सेवा करून लोकांना योग्य ते शास्त्रोक्त मार्गदर्शन करावे असा त्यांचा निश्चय आहे. आत्तापर्यंत त्यांनी शेकडो लोकांना मार्गदर्शन केले असून बऱ्याच जणांना त्याची प्रचीति मिळाली आहे. तसेच प्रतिकूल ग्रहमानाकरतां ग्रहांची रत्नें योग्य सल्ल्यानें वापरल्यास अत्यंत उत्तम गुण येतो असा त्यांचा अनुभव आहे. या शास्त्रांतील त्यांचा व्यासंग दिवसेंदिवस वाढत असून त्यांचे हातून या शास्त्राची अशीच सेवा घडो व या शास्त्राचे महत्व वाढो अशीच अपेक्षा कुणीहि व्यक्त करील.

३–७८ तुळसीदास तेजपाल चाळ
पद्माबाई ठाकूर रोड.
माहीम, मुंबई १६.

श्री. पद्माकर जोशी.

'झुंझार शनी'चे लेखक.



आजपर्यंत ज्योतिषी अन् साहित्यिक असं समीकरण झालेलं सहसा दिसून आलेलं नाही.असं घडणं ह्या एक अद्वितीय योगच म्हटला पाहिजे. पण आपल्या ह्या महाराष्ट्रांत 'झुंझार शनि','प्रणयी शुक्र' या ज्योतिष-विषयक पुस्तकांनी ज्यांचे नांव सर्वतोमुखी झाले तेच हे पद्माकर जोशी. त्यांच्या वरील पुस्तकांमुळें सर्वत्र त्यांची वाहवा तर झालीच, पण या विषयाची उत्सुकता व कुतूहल जागे करण्याचे श्रेय श्री. जोशी यांनाच द्यावे लागेल इतकी त्या पुस्तकाची भाषा सोपी, ओघवती आणि शास्त्रीय दृष्टीनें भरलेली होती. सर्व वृत्तपत्रांनी (इंग्रजीदेखील) त्यावर अभिप्राय लिहून त्यांना स्तुतिसुमनें वाहिली होती.

श्री. पद्माकर जोशी हे युद्धावर जाऊन आलेले माजी सैनिक आहेत. आजपर्यंत त्यांनी आपले जीवन या शास्त्राचे अभ्यासाकरितां व संशोधनाकरितां घालविले आहे. येईल त्या परिस्थितीला हंसतमुखाने तोंड देऊन ते अजूनहि या विषयावर अभ्यास, संशोधन, लिखाण करीत आहेत. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या प्रस्तावने-वरून त्यांच्या परिस्थितीची, दुर्दम्य आशावादाची कल्पना कोणालाहि चटकन येऊ शकेल.

आजपर्यन्त त्यांनी पुणे, मुंबई, जळगांव, इचलकरंजी नासिक, कल्याण, धुळे, अहमदनगर, मालेगांव, औरंगाबाद, भुसावळ, नागपूर, अकोला वगैरे ठिकाणी सार्वजनिक वाचनालयातून व संस्थेंतून 'झुंझार शनी' व इतर ज्योतिषविषयक भागांवर मनोरंजक पद्धतीने व्याख्याने दिली व ती लोकांना पसंत पडून ते साहित्यिक ज्योतिषी म्हणून ओळखले जाऊं लागले.

भविष्य — बोधिनी, रवीचा रागरंग, ग्रहांचे धक्के, कलावंतांच्या कुंडल्या ही त्यांनी लिहिलेली पुस्तके फारच लोकप्रिय झाली आहेत. 'झुंझार शनी' या पुस्तकाबद्दल अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिनचा अभिप्राय असा होता, "महाराष्ट्रीय मराठी जनता पद्माकर जोशी यांची ऋणी आहे. आणि तिने सदैव ऋणीच राहिले पाहिजे असंच हे 'झुंजार शनीचे' संशोधन आहे." श्री. जोशी हे पुण्याच्या ग्रहनक्षत्र फलादेश संशोधन मंडळाचे आजीव सभासद आहेत.

ज्योतिष विषयावरील पुस्तकांप्रमाणेंच ह्यांनी 'पहिल्या रात्री', 'गे वारांगने' इत्यादी कादंबऱ्या आणि 'सं. जावळीचा राणा' वगैरे अनेक प्रकारचे साहित्य लिहिले आहे. ते १९४० ते १९५५पर्यंत लष्करांत होते. रम्यकथा मासिकांतून ते मासिक व वार्षिक राशीभविष्य लिहीत असत. सर्व लिखाण अवघे पांच–सात वर्षांचे कालातील आहे हे विशेष वाटते. लष्करांतील नोकरी संपल्यावर पेन्शनचा लाभ न मिळाल्याने त्यांनी रामटेक क्षेत्रांत गेली चार वर्षे वास्तव्य केले असून या शास्त्रावर संशोधनात्मक दृष्टीनें एका मोठ्या ग्रंथाचे ते लिखाण करीत आहेत. त्याचे नांव आहे 'गाथा–ग्रहांची' हा ग्रंथ ज्योतिषशास्त्राचे अभ्यासूंच्या ज्ञानांत नवी भर तर टाकलीच, पण या शास्त्राचे जाणकारांत मोठीच खळबळ उडवून दिल्याशिवाय रहाणार नाही.

या शास्त्राचा त्यांचा अभ्यास सखोल, वृत्ती संशोधनाची, अंगी अचाट उत्साह आणि जोडीला चिकाटी त्यामुळे या शास्त्रावर ते इतके लिखाण करूं शकले. ते पैशाने श्रीमंत नाहीत, पण त्यांच्या हृदयाची श्रीमंती इतकी अफाट आहे कीं ती शब्दाने व्यक्त करणे हे केवळ अशक्य आहे. असे परिस्थितीशी टक्कर देऊन, प्रयत्न-वादावर भर देणारे सुपुत्र महाराष्ट्रांत जन्मावे हे केवळ भाग्य म्हटले पाहिजे. आज ना उद्या परमेश्वर कृपेने व सर्वांच्या सदिच्छेने ते या शास्त्रात अद्वितीय यश नि दिगंत कीर्ति मिळवून या शास्त्राची नि महाराष्ट्राची शान वाढवतील असा विश्वास वाटतो.

(रामटेक) पांडे यांचे घर,
मु. पो. रामटेक, अंबाला भाग, नागपूर.

श्री. कृष्णशास्त्री भिडे

जन्म– १४–१२–१८९६



लहाणपणीं प्राथमिक शिक्षणानंतर या शास्त्राची उपजत आवड असल्याने त्यांनी प्रथम १–१।। वर्षे कै. वामनराव पतकी महाडकर यांच्याकडून या विषयाचे प्राथमिक ज्ञान घेतले. पुढे ५ वर्षे उज्जयनीस कै. माधवशास्त्री तर्टे व कै. मार्तन्डराव गडकरी या उभयतांकडून त्यांनी अनुक्रमे गणित व फलज्योतिषयाचे शिक्षण घेतले. इंदूर येथे जवळजवळ साडेचार वर्षे ज्योतिषाचा व्यवसाय केला. पुढे ४ वष पणजी, म्हापसे, सावंतवाडी वगैरे ठिकाणी वास्तव्य करून १९२६ मध्ये ते बेळगांवी आले व तेव्हापासून त्यांचा व्यवसाय तेथेंच चालू आहे.

इच्छा कुंडलीवरून प्रश्नभविष्य पहाणे व पत्रिकेचे लाईफ रिडिंग करण्याचे काम फक्त ते करीत असतात. त्यांचा अनुभव बऱ्याच लोकांना आला आहे. यावर त्यांचा प्रपंच चालत असल्याने अन्य विषयाकडे त्यांना वळता आले नाही. हुबळी येथील "कर्मवीर" मध्ये ते साप्ताहिक भविष्य देतात.

यांचा स्वभाव मुळचा भिडस्त असून ते प्रसिद्धीपराङ्मुख आहेत. त्यांना जाहिरातीद्वारे प्रसिद्धी मिळविणे मुळीच आवडत नाही.

भविष्य कथन ऑफीस
कपिलेश्वर रोड, बेळगांव
जि. बेळगांव

श्री. वासुदेव नानाजी जोशी




हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण असून खेडलेझुंगे येथे वाडवडिलार्जित घर आहे व थोडीशी शेती असून त्यांचे शिक्षण व्ह. फा. पर्यंत झाले आहे. याज्ञिकीचे (वैदिक) शिक्षण घेत असताना त्यांचे आते भाऊ श्री. पंढरीनाथ गंगाधर कुलकर्णी, राहणार निफाड यांचेकडून ज्योतिषशास्त्र शिक्षणाची सुरुवात केली (१९५२). पुढे श्री. गणपत सखाराम कुंट यांचे मदतीने पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांचा ज्योतिषविषयक कोर्स शिकण्यास सुरुवात केली. त्यांतील चांचणी परीक्षा दिली. मात्र पदवी परीक्षा दिली नाही. पुढे पालशेत येथील जनार्दन वामन जोशी यांनी काढलेल्या ज्योतिष, सामुद्रिक, व रमल या शास्त्रांतील पुस्तकांचा अभ्यास केला.


सध्यां ज्योतिष हेच यांचे चरितार्थाचे साधन बनले आहे. कै. विष्णु नृसिंह जोग महाराज पुणें यांचे शिष्य श्री. तुकारामबाबा यांचेकडे रोज रात्री उपनिषदे, पंचदशी इत्यादी वेदान्त ग्रंथांचे अध्ययन, वाचन करतात. वर्षातील काही काळ यांचे वास्तव्य खेडलेझुंगे येथे असते व काही काळ ते फिरतीवर बाहेर गांवी असतात. यांना सभाधीटपणा नसल्यानें त्यांची फारशी प्रगती होऊं शकली नाहीं. तसेच ते प्रसिद्धीच्या फारसे मागें नाहींत.

मु. पो. खेडलेझुंगे
व्हाया विंचूर (जि. नाशिक)





श्री. वि. म. घुले B. A. B. T.



यांचा जन्म संगमनेर येथे दि. ४–६–१९०५ रोजी झाला. शिक्षण बी. ए. बी. टी. असून साहित्याची फार आवड आहे. त्यांचे "चैत्र पालवी" (मुलांसाठी कविता) हे काव्य प्रसिद्ध झालेले असून "चै त्र शो भा" हे आगामी प्रकाशन आहे. तसेच त्यांनी लहान मुलांसाठी पुष्कळ गोष्टी व हिराजी (कुमारांसाठी कादंबरी) लिहिली आहे. निरनिराळ्या मासिकांत व नियतकालिकांत लेख लिहीत असतात. १९३९ साली संगमनेर येथे अहमदनगर जिल्हा ज्योतिष मंडळाची स्थापना केली व मंडळाचे सेक्रेटरी होते.

१९६४ मध्ये नासिक येथे ज्योतिर्विद्या संशोधन मंडळ स्थापन झाले, त्याचे सदस्य असून त्यांनी मंडळात व्याख्याने दिली आहेत. मंडळाने १००० ते १२०० पुस्तकाचे ज्योतिष–ग्रंथालय केले आहे. स्वतःहि ज्योतिषविषयक पुस्तकांचा छोटासा संग्रह केला आहे. १९३३ पासून शिक्षक म्हणून नोकरी करीत आहेत. माध्य. शाळेचे मुख्याध्यापक, प्रा. ट्रे. कॉलेजचे प्राचार्य, एस. टी. सी. इन्स्टिटयूट वगैरे शिक्षण संस्थांचे प्रमुख या नात्याने त्यांचे शैक्षणिक कार्य सुपरिचित आहे.

विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांचे कामांत ते हिरिरीने भाग घेत असतात. या शास्त्रावर जास्तीत जास्त संशोधन करण्याचा त्यांचा मानस आहे.

८६९ गोरेराम गल्ली
मु. पो. नासिक

श्री. श्रीधर रघुनाथ वर्तक, B.A., L.L.B.

जन्म ता. २०–२–१८९१



यांचा जन्म नासिक येथे झाला. वयाचे १५–१६ वर्षापर्यंत मराठी प्राथमिक शाळा व इंग्रजी मॅट्रिक, नाशिक हायस्कूलमध्ये झाले. १९०३ मध्ये सावरकरांच्या अभिनव भारत या संस्थेशी संबंध आला. मुंबई येथे स्वतंत्रपणें नोकरी व धंदा करून बी. ए. एलूएल्. बी. स्वकष्टाने झाले. १९२४ पासून वकिलीस नासिक येथे सुरुवात.

१९५३ पर्यंत उत्तम तऱ्हेने व्यवसाय केला. पुढे अर्धांगाचा किंचित् झटका आल्याने वडिल मुलावर भार टाकून निवृत्त झाले. वकिली व्यवसायात असतानाच हस्तसामुद्रिक पाहण्याचा नाद. निवृत्तीनंतर त्या विषयाचे वाचन, अभ्यास केला. ज्योतिष समाचार व अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिनमध्यें लिखाण केले. तसेच नासिक येथील ज्योतिष संशोधक संस्थेत रोटरी क्लबांत व्याख्याने दिली असून ती लोकप्रिय झाली आहेत. Choice of Proffession या नांवाचे हस्तसामुद्रिकावर इंग्रजीत पुस्तक लिहिले. तसेच त्याचा मराठी अनुवाद "व्यवसाय दर्शन" या नांवाने झाला असून तेहि पुस्तक प्रसिद्धीचे वाटेवर आहे. या विषयावर त्यांचे संशोधन व अभ्यास सतत सुरूं असतो.

नाशिक येथील अभिनव भारत स्मारक मंदिराचे विश्वस्त व कार्यवाह आहेत. तसेच ज्योतिष संशोधक मंडळ, रा. स्व. से. संघ, चित्पावन संघ या सार्वजनिक संस्थांत त्यांचा कार्यकर्ते म्हणून दृढ संबंध आहे.

शिवाजी रोड, वर्तक बंगला,
मु. पो. नासिक

अरोगी सत्यवादी च सप्राणश्च दृढव्रतः।
भरण्यां जायते लोके सुखी च मतिमानपि॥

भरणी नक्षत्रावर जन्माला येणारा निरोगी, सत्यवादी, प्राणीमात्रावर प्रेम करणारा, सुखी आणि बुद्धिमान असतो.

जातकभूषण श्री. नारायण गंगाधर टिळक.

जन्म ८. ३. १९२४

सुमारें ४२ वर्षापूर्वी त्यांचे गांवी असलेल्या एका



व्यासंगी गृहस्थांबरोबर या विषयाच्या एका कुंडलीचे जातकाबद्दल त्यांनी विचारलें. त्यांनी वर्तविलेले भविष्य त्यांना तितकेसे पटेना. बराच वादविवाद झाला व ते गृहस्थ आपलें म्हणणे अगदी अचूक असल्याचा निर्वाळा देऊ लागले. पण शेवटी २ महिन्याने त्यांची चूक त्यांनाच समजून आल्यावर ज्योतिषशास्त्र हें अगदी अचूक असल्याचे सोदाहरण पटवून दिलें. व तेव्हांपासून टिळक यांना या विषयाची आवड व छंद निर्माण झाला. तेव्हांपासून ते त्या दृष्टीकोनांतून या शास्त्राकडे पहात आले असून त्यांनी अनेक पत्रिका हाताळल्या असून त्यावरील निष्कर्ष अगदी अचून ठरले आहेत.

या विषयांतील जातकभूषण ही 'सन्मान्य' पदवीहि त्यांनी मिळविली असून अजूनहि शिकण्याची, अभ्यास करण्याची त्यांना हौस आहे. या विषयावर ते स्वतंत्रपणे लिखाण करतात. अशा प्रकारचे त्यांचे लेख ज्यो. समाचार मासिकांतून नियमितपणें प्रसिद्ध झालेले असून अजूनहि लेखन करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांची हौस, त्यांचा प्रयत्न व इच्छा पहाता त्यांचे हातून या शास्त्राची मोठी सेवा घडेल व याला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होईल असें वाटतें. अशा गुणी ज्योतिष्यांची आज समाजाला, संस्थेला व देशाला फार जरूरी आहे. त्यांना त्यांचे अंगिकृत कार्यांत यश लाभो ही एकमेव इच्छा !

'कैलास' दादाभाई नवरोजी नगर,
नरसोबा पथ, अंधेरी, मुंबई नं. ५८.


कृपणाः पापकर्मा च क्षुधालुर्नित्यपीडितः ।
अकर्म कुरुते नित्यं कृतिकायां भवेन्नरः ॥

कृतिका नक्षत्रामध्ये जन्माला येणारी व्यक्ति पापकर्म करणारा, हपापलेला, कायम पिडलेला, आणि सदैव वाईट कर्म चिंतणारा असतो.

पं. नारायण श्रीधरशास्त्री वारे

ज्योतिष्यालंकार

यांचा जन्म ११ जुलै १९२७ रोजी श्रीक्षेत्र नाशिक येथे झाला



त्यांच्या सुमारे १२ पिढयांचे वास्तव्य येथेच आहे.तसेच पिढयान् पिढया सातत्याने, श्रौत-स्मार्त, कर्मकांड, कुंडमंडपशास्त्र, मीमांसा, वेदधर्मशास्त्र, न्याय, व्याकरण, साहित्य,ज्योतिष इ. शास्त्रांचे अध्ययन केलेले असून वेदपाठी, घनपाठी, ब्राम्हणपाठी असे अनेक विद्यांतील निष्णात पंडित यांचे 'वारे' घराण्यांत जन्मास आले आहेत. यांचे वडील भारतप्रसिद्ध विद्वान पंडित म. म. श्रीधरशास्त्री हे होत.

कुलपरंपरेनुसार यांचेहि अध्ययन आपले वडिलांचे जवळच वेद, शास्त्र, श्रौतस्मार्त, कर्मकांड, कुंडमंडपशास्त्र, साहित्य या विषयांचे झाले असून त्यांत ते पूर्ण निष्णात आहेत. गेल्या २० वर्षांत वडिलांबरोबर व स्वतंत्रपणे अनेक यज्ञांत भाग घेतला आहे. ते मॅट्रिक उत्तीर्ण आहेत. तसेच ज्योतिष शास्त्राचे अध्ययन त्यांनी सायन, निरयन अशा दोन्ही पद्धतीनें केले असून, गणित व फलित या दोन्ही विभागांचे संपूर्णपणे व जुन्या पद्धतीने केले आहे.

श्री गोवर्धन विद्यापीठाचे जगद्गुरु शंकराचार्य श्री ११०८ श्री. योगेश्वरानंद तीर्थस्वामी महाराज यांनी १९५६ मध्ये 'ज्योतिष्यालंकार' ही पदवी देऊन यांचा बहुमान केला. लखनौहून प्रसिद्ध होणाऱ्या 'पांचजन्य' या साप्ताहिकांत हे १९५३ मध्ये राशीभविष्य लिहित होते. तसेच १९५६ ते १९५९ ही चार वर्षे त्यांनी नाशिकच्या 'गांवकरी' मधून साप्ताहिक व दिवाळी अंकातून राशीभविष्य लिहिले आहे. तसेच नाशिकहून प्रसिद्ध झालेल्या शके १८७७ (इ. स. १९५६-५७) या सालचे नाशिक पंचांग तयार करण्यांत यांचाच प्रामुख्याने भाग होता. परंतु ग्रहलाघवीय गणितांतील स्थूलता व दृक्प्रत्ययी गणितांतील धर्म-

शास्त्रविरुद्धता यामुळे त्यांनी पंचांग गणितांतून आपले अंग काढून घेतले व पंचांग गणिताचे संशोधनकार्य स्वतंत्रपणे अद्यापहि चालविले आहे.

घ. नं. २०२२ सोमवार पेठ
मु. पो. नाशिक

पंडित बाबुभाई जगन्नाथ छायाशास्त्री



यांचे जन्मगांव जामनगर. सुरत आणि भडोचमध्यें लहानपण गेले. यांचे आजोबा या भागांत फारच प्रसिद्ध होते. ते छायेवरून अचूक भविष्य वर्तवित! त्यामुळे छायाशास्त्री म्हणून ओळखले जात. त्यांचेपासून हा व्यवसाय सुरू आहे. यांचे शालेय शिक्षण गुजराथी ५ वीपर्यन्त झाले. संस्कृत व्याकरण, मध्यमा परीक्षा, साहित्य मध्यमा व ज्योतिष मध्यमा परीक्षा ते उत्तीर्ण झाले आहेत.

वयाचे २८ वे वर्षापासून ते छायेवरून ज्योतिष वर्तविण्याचे काम करीत आहेत. माणसाची छाया घेऊन तिचे आधारे ते पत्रिका तयार करून भविष्य सांगतात. अर्थात ते त्यासाठीं सूर्यसंहितेचा आधार घेतात. तसेच ताडपत्रीवर तामीळमिश्रित मल्याळी भाषेंत जे भविष्य लिहिले आहे त्याचाहि उपयोग करतात. प्रत्येक कुंडली ३० अंशापर्यन्त ते पडताळून पहातात. सूर्यसंहितेचा हा मोठा ग्रंथ असून त्याचे जवळजवळ ४८ खंड आहेत. "कर्मकांड" ग्रंथांतून शारीरिक दोष व कर्मपरिहाराचे ज्ञान होते.

ते आज जवळजवळ २५ वर्षे हा व्यवसाय करीत आहेत. आतापर्यंत त्यांचेजवळ असलेल्या नाडीग्रंथ व तर ज्योतिषविषयक साहित्याबद्दलची माहिती, मुलाती ब्लिट्झ, टाइम्स ऑफ इंडिया, वाङ्मयशोभा व सर्व गुजराथी वृत्तपत्रांत आली आहे. त्यांच्याकडे आतापर्यंत सर्व मंत्री, सरकारी अधिकारी व इतर सर्व क्षेत्रांतील अधिकारी व्यक्ती मार्गदर्शनासाठी येऊन गेल्या आहेत. भारताचे माजी पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांचे रीडिंगहि त्यांनी केले आहे. आपल्या मुलाला या शास्त्राचे शिक्षण दिले आहे व अजूनहि देत आहेत.

ते स्वत: गणेशभक्त आहेत. तसेच रोज गायत्रीचा जप करतात. त्यांचेकडे कोणी साधुसंत, धर्मगुरु, भिक्षुक आल्यास ते त्याचेकडून कांहीहि फी घेत नाहीत. फक्त त्याला रुद्राभिषेक करायला सांगतात. सूर्यसंहितेवर लिखाण करण्याची त्यांची मनीषा आहे. तसेच होईल तेवढी जनसेवा करीन असे ते नेहमी म्हणतात.

स्वस्तिक सिनेमासमोर
लॅमिंग्टन रोड, गिरगांव
मुंबई ४.

श्री. वसंत भानुदास चंद्रात्रे (गुरुजी)

ज्योतिर्विद, काव्यतीर्थ

पश्चिम खानदेशांत हे चंद्रात्रे गुरुजी म्हणून सुविख्यात



आहेत. यांचा ज्योतिषशास्त्राचा व्यासंग, अभ्यास दांडगा आहे. प्रथमत: त्यांनी फलज्योतिषशास्त्राचा अभ्यास प्राचीन पद्धतीने संस्कृतांतून केला, परंतु प्रत्यक्ष अनुभव, ठोकताळे नीट न आल्याने या शास्त्रावरील श्रद्धा कमी होण्याची वेळ आली असतांना त्यांना साक्षात्कार झाला कीं, केवळ आकाशांतील ग्रहांची युति, गती व भ्रमण एवढाच अभ्यास करून उद्या काम होईल हे सांगणे कठीण आहे, तर त्यासाठीं या शास्त्राचा दीर्घ अनुभव आणि तीव्र इच्छाशक्ति यांची फार जरुरी आहे. नंतर त्या दृष्टीने ते प्रयत्नाला लागले.


पुढे त्यांनी सातपुड्याचे पायथ्याशी ५ वर्षे राहून वाचासिद्धीचे व्रत पार पाडले. मोठमोठ्यांचा त्यांच्याशी संबंध आला. त्यामुळें अनेक कुंडल्यांचा संग्रहहि होऊ शकला, व्यासंग वाढविण्यास मदत झाली व वेगळा दृष्टिकोनहि तयार झाला. आजपर्यंत त्यांचे ज्ञानाचा लाभ अनेकांनी घेतला आहे. अजूनहि त्यांचेकडे मार्गदर्शनासाठी रोज लोकांची रीघ लागलेली असते.

त्यांनी वर्तविलेली अनेक भाकिते अगदी अचूक ठरली आहेत. त्यामुळे त्यांचेबद्दल आदर व श्रद्धा दिवसानुगत वाढतच आहे.

ज्योतिषशास्त्र हे एक मार्गदर्शक शास्त्र आहे. सध्यांच्या धकाधकीच्या जीवनात निराश झालेल्या, अडचणीत सांपडलेल्या दुःखी माणसाला शास्त्रशुद्ध रीतीनें मार्गदर्शन करून त्यांचे मनाला थोडाफार विरंगुळा मिळेल व तो उत्साही बनेल अशा रीतीनें ज्योतिष्यांनी आपले ध्येय ठेवून वागले पाहिजे. मानसशास्त्र व तत्त्वज्ञान यांची सांगड घालून भविष्यकथन करावे असे त्यांचे मत आहे. स्वतःहि ते त्याचे अनुकरण करतात. सध्या ते धुळे येथील 'जिजामाता कन्याशाळा' येथे संस्कृत, हिंदी, मराठी या विषयाचे अध्यापन करीत असतात. व याव्यतिरिक्त या शास्त्राचा अभ्यास व मार्गदर्शन करीत असतात.

भावेस्कूलसमोर, पांचवी गल्ली
मु. पो. जि. धुळे.

श्री. साधेराज पुजदेकर होराभूषण



हे महानुभावपंथीय असून शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले आहे. तसेच "संस्कृत–विशारद" सर्वप्रथम आले. १९६५ मध्ये "होराभूषण" परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यापूर्वी ५–६ वर्षापूर्वीपासूनच त्यांना ज्योतिषशास्त्राची आवड असून त्यांचा अभ्यास सुरू आहे. ते भविष्यकथनहि करीत. तसेच त्यात अचूकपणा येत गेल्यानें आजूबाजूचे परिसरांत ते प्रसिद्धीस आले. "श्री चक्रधर विहार संघ" कविठा बु. (जि. अमरावती) या संस्थेमार्फत "पंथीय सूत्रपाठ व स्तोत्रसमुच्चय" ही दोन पुस्तके प्रकाशित केली आहेत. "साधनचतुष्टय" हे पुस्तक प्रकाशित होत आहे. व "स्मरण चतुष्टय" हे लिखाण चालूं आहे. शनि, मंगळ युतीचे परिणामावरहि लिखाण करण्याचा त्यांचा मानस आहे.


या विषयाचा त्यांचा व्यासंग वाढत असून ते अजूनहि अभ्यास वाढवीत आहेत. त्यांना त्यांच्या भावी काळांत यश मिळून त्यांचे हातून या शास्त्राची सेवा घडो ही प्रभूचरणी प्रार्थना.

मु. पो. रामा,
ता. जि. अमरावती.

श्री. महारुद्रप्पा फकीरप्पा अवलक्की.

जन्म–१९–६–१९९३

यांचे शालेय शिक्षण फारच थोडे होऊ शकले. लहानपणापासून ते शेतीचे-



काम करीत आहेत. पुढें त्यांनी प्रेसमध्यें कंपोझिंगचेहि शिक्षण घेतले. पुढे त्यांना अनेक कौटुंबिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. तसेच उद्योग धंद्यातही अस्थिरता निर्माण झाली. पुढे त्यांनी एका पंजाबी वैद्याचे सान्निध्यांत राहून वैद्यकाचे (औषधें) शिक्षण व अनुभव घेतला.

पुढे त्यांनी काही काळ कारकुनी केली व नंतर फोटोग्राफीचे शिक्षण घेतले. पुढे एका पेढीवर काम मिळून आजहि तिथेच पेन्शनरप्रमाणे पगार घेत आहेत. त्यांना मराठी, कानडी, व हिंदी अशा चार भाषा येतात. त्यांनी ज्योतिषशास्त्राचे फक्त वाचन केले. अजूनहि कोणी नवीन शिकवल्यास ते शिकण्याचीहि त्यांची तयारी आहे.

व्ही. एस. सोलापुरे
मु. पो. कुडची स्टेशन
(कुडची – बेळगांव)

धनी कृतज्ञो मेधावी नृपमान्यः प्रियंवदः ।
सत्यवादी सुरुपश्च रोहिण्यां जायते नरः ॥

रोहिणी नक्षत्रावर जन्माला येणारा धनी, कृतज्ञ, बुद्धिमान, नेहमी चांगला व सत्य बोलणारा तसेच स्वरुपवान असतो.

श्री. चिंतामण लक्ष्मण शिंत्रे

जन्म दि. २९-१-१९१९.

यांचे शिक्षण शालेय ७ वीपर्यंत झाले. प्रकृति



अस्वस्थतेमुळें इंग्रजी चौथी नंतर पुढे शिक्षण होऊ शकले नाही. स्थानिक दुकानांत सेलसमन, कॅशियर व दवाखान्यांत कंपौंडरचे काम केले. त्यांना सर्व प्रकारचे कामाचा अनुभव घ्यावा लागला. पुढें त्यांनी भिक्षुकीचा व्यवसाय केला. तसेच फावल्या वेळांत पुराण, प्रवचन करून कीर्तनें करीत. पुढे ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासास सुरुवात केली व हळूहळू कुंडल्या प्रत्यक्ष पाहून व्यासंग वाढविला.

त्यांनी माजी गृहमंत्री ना. मुरारजीभाई देसाई

चपलश्चतुरो धीरः क्रूरकर्मा ऽयकर्मकृत् ।
अहंकारी परद्वेषी मृगे भवति मानवः ।।

मृग नक्षत्रांत जन्म घेणारी व्यक्ती चंचल, चतुर, क्रूर कृत्ये करणारी अहंकारी, आणि शत्रूंशी कायम वैर करणारी व स्वैरवृत्तीची असते.

यांचेहि भविष्य वर्तविले होते. पुढे त्यांनी कल्याणजवळ मोना येथे "श्री चिंतामणी ज्योतिष कार्यालय" उघडले. तेथे येऊन अनेकांनी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला. त्यांनी अभ्यासासाठी म्हणून ना. बाळासाहेब सावंत, कै. बॅ. सावरकर, श्री. विद्याधर गोखले ना. स. का. पाटील, ना. भारदे यांना भेटून त्यांचे भविष्य वर्तविले आहे. या शास्त्राचा त्यांचा व्यासंग वाढत जाऊन त्यांना समाजजीवनाचे विविध पैलू पाहण्यास व अनुभवास मिळाले. सध्या ते फक्त कोणी फारच अडचणीत असल्यास त्यास योग्य ते मार्गदर्शन करतात.

शिंत्रे बंगला,
१० वा रस्ता, म्यु. नं. डी. १४
चेंबूर — मुंबई ७१,

श्री. दिगंबर गणेश उर्फ बापूराव ठिपसे

जन्म पूर्व खानदेश जिल्ह्यांत, कोळगांव या गांवी.



जन्म तारीख १२ डिसेंबर १९१५. वडील पी. डब्ल्यू. डी. मध्ये ओव्हरसिअर होते. घरची परिस्थिती मध्यम होती. शिक्षण इंटर आर्टस्पर्यंत झाले. (मुंबई युनिव्हर्सिटी) मुख्य इंग्रजी विषय घेऊन एम. ए. पर्यंत शिकण्याची यांची मोठी इच्छा व महत्वाकांक्षा असतांनासुद्धां, इंटरपर्यंतच शिक्षण झाले व तेथेंच ते थांबले. तेव्हां हे असे कां व कशामुळे झाले? ते नीट जाणून घेण्याकरितां अगदी साहजिकपणें यांचा ज्योतिष या शास्त्राकडे कल व ओढा वळला आणि तेथूनच खरी या शास्त्राच्या अभ्यासास सुरुवात झाली. नंतर पुढे अभ्यासाने यांचे मनांत या शास्त्राबद्दल अतिशय गोडी व आवड निर्माण झाली.

माणसाच्या जीवनामध्यें प्रयत्नाला दैवाची जोड असणे अत्यंत आवश्यक आहे असे एक ना दोन अनेक अनुभवांनी यांचे ठाम मत व विचार झाले आहेत.

प्रथम सुरुवातीला अगदी थोडी वर्षे हस्तसामुद्रिक या शास्त्राचा (Palmistry) चा जगप्रसिद्ध हस्त-सामुद्रिक श्री. चिरो (Cheiro) यांच्या पुस्तकांवरून अभ्यास केला. परंतु हस्तरेषांवरून कुंडलीप्रमाणे माणसाच्या आयुष्यांतील चांगल्या व वाईट गोष्टींचे अगर घटनांचे अगदी अचूक व बरोबर अशी वेळ किंवा कालमान घेतां येईना म्हणून त्या शास्त्राचा अभ्यास सोडून दिला, आणि त्यांनी ज्योतिषशास्त्राकडे संपूर्ण लक्ष केंद्रित केले. प्रथम स्वतःच्या कुंडलीचा आणि त्यानंतर कांही अगदी नातेवाईकांच्या व मित्रमंडळींच्या कुंडल्यांचा त्यांच्या आयुष्यांतील कांही महत्वाच्या व चांगल्या आणि वाईट घटनांचे कालमानासह टिपणें करून त्यावरून अभ्यास केला.

त्यानंतर नोकरीच्या निमित्तानें व इतर कांही कामाच्या निमित्तानें त्यांचे निरनिराळया गांवी जाणे-येणें झाले. त्यावेळीं त्या त्या ठिकाणी असलेल्या कांही लहान व मोठ्या अशा बऱ्याच ज्योतिषांकडे ते गेले. सुरुवातीलाच त्यांच्या ठराविक फीपेक्षां थोडी जास्तच फी देऊन त्यांनी कांही महत्वाच्या प्रश्नांबाबत फल-ज्योतिषदृष्ट्या त्यांना विचारले, परंतु पुढें दुर्दैवाने त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची कामें कांही झाली नाहीत. तरी देखील आजमितीपर्यंत त्या सर्वांना समक्ष अथवा पत्रद्वारे कधीं शब्दानेहि दुखविले नाही. यांच्या अपेक्षेप्रमाणे आणि ज्योतिष्यांनी सांगितल्या-प्रमाणे जर त्या गोष्टी घडल्या असत्या तर यांचे हातून ज्योतिषशास्त्राचा आजपर्यंत जो कांही थोडाफार अभ्यास झाला आहे, तो कदाचित् किंवा फारसा झाला नसता. तेव्हां हासुद्धां एक योगच म्हणायचा. वरील प्रसंगाने ज्योतिषशास्त्राबद्दलची त्यांची आवड व ओढ कमी न होता ती वाढतच गेली.

ज्योतिषशास्त्राचा मानवी जीवनाशीं अगदी निकटचा संबंध असल्यामुळे माणसाने या शास्त्राचा वेळींच शक्य तेवढा सदुपयोग करून घेणे, हे केव्हांहि इष्ट व श्रेयस्कर आहे असे ते नेहमी म्हणतात.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीच्यावेळी खडकी व देहूरोड या ठिकाणी थोडी वर्षे सुपरवायझर म्हणून, आणि त्यानंतर रेशनिंग डिपार्टमेंटमध्ये बरीच वष ऑफिस सुपरिंटेंडेंट आणि गोडाऊन मॅनेजर म्हणून चांगल्या अधिकाराच्या जागेवर त्यांनी प्रामाणिकपणे काम केले. परंतु पुढे रेशनिंग बंद झाल्यावर ते नोकरीतून मुक्त झाले. त्यानंतर दुसरी नोकरी मिळण्याबाबत योग्य ते प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने त्यामध्ये त्यांना यश शमिळाले नाही. तेव्हा ईश्वरी उपासनेकडे आणि ज्योति-ास्त्राकडे त्यांचे लक्ष जास्त केंद्रित झाले, आणि त्याष दृष्टीने ते योग्य तो अभ्यास व विचार करीत असत.

नेमके त्या वेळी योगायोगाने त्यांच्या एका चांगल्या मित्राचे सांगण्यावरून ते श्री. रा. रा. वासुदेवराव महादेव उर्फ अप्पासाहेब गोखले गुरूजी यांच्याकडे गेले. एकंदरीत त्यांची या शास्त्राबद्दलची अतिशय आवड व तळमळ पाहून आणि त्यांचेबद्दलचा आदरभाव पाहून आणि या शास्त्राबाबतची सर्व-साधारणपणे तयारी पाहून त्यांनीं ज्योतिषशास्त्रा-बाबत जरूर योग्य ते मार्गदर्शन करीन म्हणून सांगितले. तसेच त्यावेळी त्यांनी यांची कुंडली पाहून, तुम्ही पुढे चांगले ज्योतिषी व्हाल म्हणून ह्यांना स्पष्ट सांगितले होते, आणि त्याप्रमाणे बरोबर झाले. सुमारे १५ वर्षां-पूर्वी त्यांनी यांचे बाबतीत वर्तविलेले भविष्य तंतोतंत

खरे झाले आहे, हे सांगण्यात यांना अभिमान व समाधान वाटते.

त्यानंतर गोखल्यांनीं विशेषत: फलज्योतिषशास्त्राच्या दृष्टीने निरनिराळ्या प्रकारच्या शेकडो कुंडल्यांवरून वेळोवेळी अत्यंत आवश्यक व उपयुक्त अशी माहिती मोठ्या व मोकळ्या मनाने दिली आणि त्यांतील खाचाखोचा सांगितल्या. त्यानंतर अंकगणितांतील उदाहरणाप्रमाणे त्यांनी यांच्याकडून कांही विशेष अशा कुंडल्या मुद्दाम सोडवून घेतल्या, आणि त्या सोडवीत असताना जर त्यामध्ये काही चुकले अथवा राहिले तर त्यांनी मोठ्या मनानें नीट समजावून सांगितले. त्यावेळी विशेषत: फलज्योतिषाच्या कामाकरितां त्यांच्याकडे शेकडो लोक येत– जात असत. (आणि अजूनहि येत असतात,) त्यांतील काही लोकांच्या निवडक अशा कुंडल्या मुद्दाम यांच्यापुढे ठेवीत असत, परंतु थोड्या वेळांत यांनी त्या कुंडल्यांचे विचारलेल्या प्रश्नांच्या दृष्टीने शास्त्रशुद्ध पद्धतीने विवेचन करून, फलिते बरोबर सांगत असत. हे पाहून त्यांनी वेळोवेळी समाधान व्यक्त करून, यांना तसे उत्तेजनहि दिले.

त्याप्रमाणे त्यांच्याकडे येणाऱ्या लोकांना ते स्वतः कशी काय फलिते सांगतात वगैरे गोष्टींचे बारकाईने निरीक्षण केले आणि त्यांतील कांही महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेवल्या आणि ज्या गोष्टी नीट समजल्या नाहीत किंवा त्यामध्ये जर काही शंका असल्यास, चिकित्सक बुद्धीने ते त्यांना त्या विचारीत, परंतु कधी न रागावता अगर चिडता त्यांनी त्या तितक्याच आपुलकीने नीट समजावून सांगितल्या आहेत. तसेच कधीकधी लहरीत आल्यानंतर त्यांनीहून त्यांना या शास्त्रांतील काही विशेष असे योग उदाहरणासहित सांगितले आहेत. एकंदरीत अल्पकालांत यांची विशेषत: फलज्योतिष-शास्त्राच्या बाबतीतील बरीच चांगली तयारी पाहून त्यांनीच त्यावेळी हा व्यवसाय करण्यास सांगितले.

त्याप्रमाणे गेली सुमारे १४–१५ वर्षे हे प्रामाणिक-पणाने व चिकाटीने हा व्यवसाय करीत आहेत आणि त्यामध्ये (अजूनहि) जर कधी काही अडचण आली तर वेळोवेळी श्री. गोखले यांनी उत्तम रीतीने मार्गदर्शन केले आहे व करीत असल्यामुळे, निरनिराळ्या प्रकारच्या व निरनिराळ्या क्षेत्रांतील हजारो कुंडल्या यांच्या हातून गेल्या आहेत, त्यामुळे साहजिकपणे या शास्त्राचे बरेचसे ज्ञान व अनुभव यांना अनायसेच मिळाला आहे. तरीपण या शास्त्राबाबत यांची अजूनहि अभ्यासू-वृत्ती व दृष्टिकोन आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ज्योतिषशास्त्र हे फार मोठे गूढ व अगाध असे आहे आणि त्यामानाने मानवी जीवन मात्र फार अपुरे व कमी आहे.

श्री. रा. रा. वा. म. उर्फ अप्पासाहेब गोखले हे यांचे एक चांगले मित्र आहेत आणि ज्योतिषाच्या क्षेत्रामध्ये ते यांचे गुरु आहेत आणि त्यामध्ये त्यांनी यांना जसे चांगल्या प्रकारे उत्तेजन देऊन मार्गदर्शन केले आहे त्याचप्रमाणे यांना कै. ती. आईनेहि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने चांगल्या प्रकारे उत्तेजन देऊन मदत केली आहे. त्यामुळे हा व्यवसाय करीत असताना,

अधून मधून ज्या काही अडचणी आल्या त्या सर्वांना ते व्यवस्थितपणे तोंड देऊन, गेली सुमारे १४–१५ वर्षे मी नेकीने व चिकाटीने हा व्यवसाय करीत आहेत.

या ज्योतिषशास्त्राचा अभ्यास व व्यवसाय करीत असताना वेळप्रसंगी त्यांना मित्रवर्य श्री. रा. रा. गजाभाऊ करमरकर आणि वसंतराव करमरकर यांचाही फार उपयोग झाला आहे, तरी त्याबद्दल ते त्यांचे फार आभारी व ऋणी आहेत. हे दोघेही ज्योतिषशास्त्र चांगले जाणणारे आहेत परंतु ते प्रसिद्धिपराङ्मुख आहेत.

इतर कोणत्याही शास्त्रापेक्षा ज्योतिषशास्त्राचा मानवी जीवनाशी अगदी निकटचा संबंध आहे. म्हणूनच हे शास्त्र मानवी जीवनामध्ये उत्तम प्रकारे मार्गदर्शन करू शकते आणि तसे ते करीत आले आहे. तेव्हा त्या-दृष्टीने लोकांनी या शास्त्राकडे मोठ्या आस्थेने पाहून, त्याचा शक्य तेवढा आपल्या जीवनामध्ये वेळीच सदुपयोग करून घ्यावा, असे यांचे प्रामाणिक मत आणि विचार आहे.

८५ बुधवार पेठ
पुणे २

श्री. विष्णू दामोदर उपासनी

जन्म ता. ९।८।१९१५.

यांचा कळवण येथे पौरोहित्याचा व्यवसाय आहे.



सध्या त्यांचे वय सुमारे ५१ वर्षांचे असून त्यांचा वेदाध्ययन याज्ञिक कृत्ये, प्रश्नज्योतिष, मुहूर्त-ज्योतिष यांचाही गाढ व्यासंग आहे. त्यांचे शिक्षण नाशिक येथे झाले. वे. शा, सं. त्रिंबकशास्त्री आण्णाजी जोशी यांचे कडून यांनी ज्योतिषशास्त्राचे धडे घेतले. कळवण हा मागासलेला भाग, या शास्त्रास प्रोत्साहन देणारे कमी, तरीही प्रतिकूल परिस्थितीत ते ज्योतिषाचे काम दयार्द्र बुद्धीने करतात. त्यांचा ज्योतिषविषयक सल्ला, मार्ग-दर्शन अचूक असते.


या शास्त्राबद्दल त्यांना अतिशय प्रेम व आस्था आहे अत्यंत थोडच्या ग्रंथसंपत्तीचे आधारे व निरलसपणे त्यांनी काम चालविले आहे. कोणीही अडचणीत आलेल्या मनुष्यास ते मार्गदर्शन करतात, व यापुढेही करण्याची त्याची मनीषा आहे. ज्योतिषापेक्षा अध्यात्मीक विषया-वर त्यांचा जास्त भर आहे. गोविंद भिकाजी पगार ऊर्फ सिद्धनाथ महाराज, श्रीमान महादेव पुरुषोत्तम गोरे M. A. यांच्या सारख्या विद्वानांशी ते नेहमी चर्चा करीत असतात. एकंदरीत त्यांचे आजपर्यंत या शास्त्रा-तील प्रगती व कार्य पाहता ते जास्तीत जास्त लोकाना आपल्या ज्ञानाचा अमूल्य ठेवा देऊन उपकृत करतील व शास्त्राचे महत्त्व वाढवतील, अशी आमची दृढ श्रद्धा आहे व ती अनाठायी ठरणार नाही असे वाटते.

रा. ता. कळवण, जि. नाशिक.

शंकर विनायक पाठक

जन्म ता. ११।७।१९०७.

मांढे येथे ११–७–१९०७ रोजी जन्म झाला. यांचे



मूळचे घराणे वडशिवणे येथील भिक्षुकांचे. यांचे पंजोबा श्री. सिताराम पाठक हे ढवळज गावी असलेल्या देवीचे साक्षात्काराने तत्कालीन लोकांत मोठी प्रसिद्धी पावलेले ज्योतिषी होऊन गेले.

लहानपणीच मातोश्री निर्वतल्यामुळे सोलापूर येथे आत्याचे घरी विद्याभ्यास केला. मॅट्रीकचे वर्गात असताना ते श्री क्षेत्र काशीस निघून गेले, त्यांनी तेथे संन्यासाश्रमधारी गुरुजींजवळ संन्यासाश्रमाची दीक्षा मागितली. पण त्यांनी शास्त्रीबुवांचे कुंडलीवरून वयाचे ३८ ते ४० चे सुमारास गृहस्थाश्रमी होण्याचा योग असल्याने संन्यासदीक्षा दिली नाही.

पुढे त्यांनी बराच काळ आपले आयुष्य गायत्री पुरश्चरणादी धार्मिक अनुष्ठानात घालविणे व रझाकारांचा उपद्रव सुरू झाल्याने मायभूमीचे ठिकाणी परतले, व गृहस्थाश्रमी झाले.

करमाळे येथे ज्योतिषशास्त्राचा व्यासंग बराच वाढला व भविष्याची प्रचिती येऊ लागल्याने दूरदूरचे लोकांशी संबंध येऊ लागला. करमाळे येथील प्रमुख पुढाऱ्यांच्या आश्रयाने शास्त्रीबुवांनी "नवलक्ष होमात्मक नवकुंडी नवग्रह महायज्ञ" १९५९ मध्ये केला. त्याच्या पूर्णाहुति-प्रसंगी संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण जातीने हजर होते. त्याच प्रसंगी तेथील विद्वान मंडळींनी त्यांना आधुनिक भास्कराचार्य ही पदवी देऊन एक मानपत्रही दिले. "भविष्य व मार्गदर्शन" या नावाचे लहानसे पुस्तक लिहिले असून, हस्तसामुद्रिक, प्रश्नज्योतिष यांवर लिखाण चालू आहे.

जगदंबा ज्योतिष कार्यालय
मु. पो. करमाळा, जि. सोलापूर.

श्री. जयराम विश्वनाथ नाईक

होरारत्न.
जन्म ता. ९।१०।१९१०.



१९३८ सालापासून आतापर्यंत ज्योतिष ग्रहलाघव, फलित सामुद्रिक संख्याशास्त्र, भूगर्भशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. त्यांनी अहमदनगर, पुणे व वार्शी, नाशिक, गोवा, सिकंदराबाद या परिसरांत प्रत्यक्ष हिंडून या शास्त्राची माहिती पटवून दिली आहे व्यापारी अधिकारी, शेतकी अधिकारी यांनादेखील ही गोष्ट पटवून दिली. तसेच त्यांचेकडून बक्षिसेही मिळविली आहेत.

या शास्त्रातील पौर्वात्य व पाश्चिमात्य विद्वानांचे वाङ्मय वाचून मानसशास्त्रावरील बरेचसे धार्मिक ग्रंथ अभ्यासून त्यांनी आपला व्यासंग बराच वाढविला. या भागांत होरारत्न नाईक या नावाने ओळखले जातात. त्यांनी या शास्त्राचे अभ्यासाबरोबर भूजल संशोधन कार्यही केले आहे.

सध्या ते जीवन शिक्षण मंदिर कोल्हार, बु.।। ता. श्रीरामपूर येथे मुख्याध्यापक म्हणून काम करतात.

पो. कोल्हार, जि. अहमदनगर.
ता. श्रीरामपूर.

श्री निलकंठ गोडबोले

हस्तरेषा तज्ञ



यांचा हस्तसामुद्रिकाचा छंद सुमारे १५ वर्षांपासूनचा असून केवळ हौस व अभ्यासूवृत्ती यांच्या साहाय्याने त्यांनी त्यात मोलाची भर घातली आहे. या शास्त्राचे बाळकडू त्यांना त्यांच्या आजीने फार लहानपणीच पाजले. या शास्त्राची त्यांनी अभ्यासूवृत्तीने जोपासना केली. तसेच अनुभव व चिकित्सा यांचे जोरावर त्यांनी कित्येकांची भविष्ये अगदी तंतोतंत वर्तविली आहेत. या विषयावर ते नेहमी या विषयांचे व्यावसायिकांशी प्रसंगी विरोधाला तोंड देऊनही चर्चा करीत असतात. त्यांची शांत व खिलाडू वृत्ती व विनोदी स्वभाव यांचे योगे ते विरोधकांना जिंकतात.

श्री. गोडबोले यांना कै. श्री. कृ. वा. परांजपे (पापडी) यांचे योग्य ते मार्गदर्शन लाभले असून त्यांनी आपल्या ज्योतिषाचा व्यासंग अव्याहतपणे चालू ठेवला असल्याने त्यांचे कीर्तीत भरच पडत आहे. आज त्यांचे डोंबिवली येथील निवासस्थानी दूरदूरच्या ठिकाणचे लोक स्वतःचे भविष्य समजून घेण्यासाठी येत असतात. मात्र श्री. गोडबोले हे प्रसिद्धी पराङ्मुख असे आहेत. या सामुद्रिक शास्त्रावर एक विद्वत्ता-पूर्ण ग्रंथ लिहिण्याची त्यांची तीव्र मनीषा आहे. तसेच त्यांनी होतकरू हस्तसामुद्रिकांना योग्य ते मार्गदर्शन सेवानिवृत्तीचे काळात करण्याचे निश्चित केले आहे. त्यांचा व्यासंग, त्यांची हौस व खिलाडू वृत्ती व घराण्यांतील परंपरा पाहता ते या शास्त्रात नवनवीन ज्ञानाची भर घालून ग्रंथलेखन करतील व जिज्ञासूना मार्गदर्शन करतील अशी अपेक्षा बाळगण्यास व ती पूर्ण होण्यास अडचण पडणार नाही; व अयोग्यही ठरणार नाही असे वाटते.

रमा निवास, सुभाष रोड
विष्णुनगर, डोंबिवली (पश्चिम)
जिल्हा–ठाणे

सायनाचार्य रामचंद्र तुकाराम हंबर्डे

जन्म विदर्भात मूर्तिजापूर येथे ३०–११–१८८७ रोजी. रजिस्ट्रेशन-खात्यात नोकरी केली असून १९४५ मध्ये सबरजिस्टार म्हणून निवृत्त झाले. ज्योतिष शास्त्राची आवड १९३५ नंतर तीव्र प्रमाणात निर्माण झाली. नागपूर येथे सायनाचार्य श्री. नीलकंठ हनुमंत कुकडे वकील यांचेकडे एक वर्षभर अभ्यास केला. स्वतःची सायन



पद्धतीने पत्रिका बनवून त्यातील ठोकताळे अनुभवास आल्याने या विषयाचा व्यासंग वाढविला. गणक भास्कर कै. नवाथे, होराभूषण कै. दीक्षित (पुणे) यांचे या विषयावरील विविध लेख वाचले आहेत. तसेच ज्योतिर्विद य. के. प्रधान (दादर) यांची पुस्तके वाचून अभ्यास वाढविला. तदनंतर १९४० पासून सायन पद्धतीने कुंडल्या तयार केल्या. तसेच त्यावरून वर्तविलेले फलादेश श. ५० टक्के अनुभवास आले.

१९४७ पासून "गणेश ज्योतिष कार्यालय" स्थापन केले असून, घरी आलेली ज्योतिषविषयक सर्व कामे करीत असतात. भोपाळचे ज्युडि. कमिशनर, मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री श्री. भगवंतराव मंडलोई यांना सांगितलेले भविष्य खरे ठरून त्यांची सर्टिफिकेटस् मिळाली आहेत. सध्या यांचे वय ७९ वर्षांचे आहे. तरी अंगात उत्साह पूर्ण असून कामाचा कंटाळा नाही. प्रकृती उत्तम निरोगी आहे. व्रते, जप, अनुष्ठान यांचे साहाय्याने संयमन चालू आहे.

दी. सब रजिस्टार, जठार पेठ,
C/O एम्. आर. हंबर्डे
मु. पो. अकोला (वि. महाराष्ट्र)

पं. नरेंद्रनाथ हरिश्चंद्र धर्माधिकारीशास्त्री

आयुर्वेदाचार्य

यांनी आपल्या बालपणी क्रमिक अभ्यासाबरोबरच आपल्या वडिलांपासून कर्मकांड व ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला. तसेच श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे गुरुगृही राहून संस्कृताचे अध्ययन केले. पुढे १९३९ मध्ये



कलकत्त्याची 'काव्यतीर्थ,' १९४० साली 'ज्योतिषतीर्थ' व 'ज्योतिषभूषण' या परीक्षा उत्तीर्ण झाले. तसेच बडोदा येथील 'साहित्यमध्यमा' 'पुराणमध्यमा' याही परीक्षा दिल्या. त्याचबरोबर त्यांनी पारितोषिकेही मिळविली. १९५४ मध्ये त्यांनी 'आयुर्वेदाचार्य' ही पदवी मिळविली. १९४५ पासून मुंबई येथे पंचांग काढण्याचे काम सुरू केले. १९५० पासून इंदूर येथील 'नई दुनिया दैनिक' वृत्तपत्राचे संपादक व संचालक यांच्या इच्छेवरून त्यांनी 'नई दुनिया' नामक हिंदी पंचाग सुरू केले.

१९४५ मध्ये राजाज्ञेने त्यांची इंदूर येथील संस्कृत महाविद्यालयात संस्कृतचे अध्यापक म्हणून नियुक्ती झाली. पुढे १९४९ पासून राजाज्ञेने बडवाह येथे गीता पाठशाला चालवून ते जनतेस वेदांताचे ज्ञानामृत पाजण्याचे कार्य करीत आहेत. तसेच या भागात व आसपासचे ठिकाणी ते ज्योतिषी, पंचांगकर्ते व प्रवचनकार म्हणून ख्यातमान झाले आहेत. निःस्वार्थ बुद्धीने विद्यादान करणे व औषध योजना करणे हे त्यांचे विशेष गुण दिसून येतात.

१४ जवाहर,
बडवाह, जि. पश्चिम नेमाड
(मध्यप्रदेश)

श्री. जिनदत्त जंबू उपाध्ये

जन्म ता. २-३-१९१७ (निपाणी)

यांचे घरी ज्योतिष विषयाची परंपरागत रूढी असून




जिज्ञासू वृत्तीमुळे या विषयाकडे वळले. वयाचे १७-१८ वर्षांपासून या शास्त्राशी संबंध आला. आजपर्यंत जवळ जवळ ५०-६० ग्रंथ संग्रही असून त्यांतील निवडक ग्रंथांचा त्यांनी अभ्यास केलेला आहे.

सध्या ते होराभूषण पदवी परीक्षेचा अभ्यास करीत आहेत. यांचा पुरोहिताचा व्यवसाय असून प्रथमतः फावल्या वेळात छंद म्हणून अभ्यास करण्याकडे कल होता. परंतु पुढे त्याबद्दल गोडी निर्माण झाल्याने तिकडेच अधिक लक्ष पुरविले. ज्योतिषविषयक सर्व कामे करून देताना तसेच तेथील ग्रामस्थांना यांच्या सल्ल्याचा उपयोग होत असल्याने लोकसंग्रह वाढला आहे. रोज सुमारे १०-१५ लोकांशी या निमित्ताने संबंध येत असतो. या शास्त्राची मूळची आवड व परंपरा यामुळे या विषयांत ते अधिकाधिक यश मिळवतील असे वाटते.

मु. पो. मांगूर, जिल्हा बेळगांव.
व्हाया निपाणी

वेदमूर्ती तीर्थानंद केशव दीक्षित

हे मूळचे बागलकोटचे "रोट्टी" घराण्यातले देशस्थ वैदिक ब्राम्हण. भिक्षुकीचा व्यवसाय. यांचे आजोबा



आग्निहोत्री होते, म्हणून "दीक्षित" असे आडनाव पडलेले आहे. त्यांचे वडील दशग्रंथी ब्राम्हण असून ज्योतिषशास्त्रात आपले नाव कमाविले आहे. त्यांचे शिक्षण कानडी ७ वी पास व हिंदी राष्ट्रभाषेचे ज्ञान. वयाच्या २८ वर्षापर्यंत म्हणावी तशी प्रगती नाही. धारवाडातील लक्ष्मीनारायणाची सेवा करतात. ज्योतिषशास्त्राचा व्यासंग २।३ वर्षांपासून आहे. त्यांनी ज्योतिषशास्त्रात एक नवी भर टाकली आहे. ती म्हणजे "नक्षत्र चरण भावचक्र" या क्रमाचे साहाय्याने सूक्ष्म फल सांगता येते. या चक्राचा उपयोग सर्वांना व्हावा अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. संस्कृत भाषेचे ज्ञान नसतानाही त्यांना पुराणाची आवड आहे. ते किर्तनकाराबरोबर मृदुंग, तबला, पेटीची साथ करतात. त्यांना शास्त्रीय संगीताची भारी आवड आहे. ते संगीत कार्यक्रमांत उत्साहाने भाग घेतात. व निष्पाप बुद्धीने काम करतात. जास्त ओढा पारमार्थिक मार्गाकडे आहे.

धारवाड शहरात ज्योतिषशास्त्राचा जास्तीतजास्त प्रचार करावा असे त्यांना मनोमन वाटते. पण तो भाग कानाडी पडल्याने भाषेची अडचण उभी राहते. या शास्त्राला सरकारी मान्यता मिळणे जरूर आहे, असे त्यांचे मत असून अगदी प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयातील शिक्षणांत या विषयाचा शिक्षणक्रम ठेवला जावा असे त्यांना वाटते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ते शास्त्राचा अभ्यास करीत असून व्यासंग वाढवीत आहेत. नवनवीन सुधारणा, शोध लावण्याचा प्रयत्न करून या विषयाच्या अभ्यासूंच्या ज्ञानात भर घालीत आहेत, हे खरोखरीच अभिनंदनीय आहे.

लक्ष्मी नारायण मंदिर
मु. पो. धारवाड.

श्री. केसरीनाथ सीताराम मोडक

पॉमिस्ट ॲन्ड अस्ट्रॉलॉजर.
जन्म–५।१०।१९०९

यांचे वडील नामांकित किर्तनकार. यांचे शिक्षण मॅट्रीक (जुने) पर्यन्त झाले.



वडिलांचा ज्योतिषाचा व्यवसाय होता. त्यांनी अकौंटस्‌चे व स्टेनोग्राफीचेही शिक्षण घेतले. पुढे त्यांनी इंग्रजी व जर्मन पुस्तकांवरून ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला. तसेच त्यांनी हस्तसामुद्रिकाचा ही ाभ्यास केला व प्रत्यक्ष अनेक हात पाहून हा व्यासंग ाढविला. तसेच त्यासाठी ते लोकांच्या जन्मकुंडल्या ानामूल्य तयार करीत. १९४४ मध्ये त्यांनी नोकरी ोडली व ज्योतिषाचा अभ्यास वाढावा म्हणून त्ली, श्रीक्षेत्र गाणगापूर, म्हैसूर, नाशिक या ठिकाणी ाद्वान पंडितांच्या सहवासात काळ घालविला. पुढे त्यांनी ातंत्रपणे ज्योतिषाचा व पुरोहिताचा व्यवसाय सुरू ला व तो आजतागायत व्यवस्थितपणे सुरू असून उत्ता- ेत्तर त्यात प्रगती व यशही लाभत आहे.


१९५२ पासून दहिवली येथेच कार्यालय स्थापिले आहे. सेच रविवार व सुट्टीचे दिवशी ते लोकांच्या बोल- ण्यावरून त्यांच्या आग्रहाखातर बाहेरगावीही जातात. ांचा या शास्त्रातील अचूकपणा व हुशारीपणा यावरून ोकांनी प्रशस्तिपत्रे देऊन त्यांची वाहवा केली आहे. ीरामनवमी, नवरात्र, व इतर सणांचे दिवशी ते ानामूल्य किर्तने करतात. त्यांचा अध्यात्मकाकडेही ाल आहे, तसेच ते श्रीगजानन, श्रीरामाची उपासना रतात, गायत्री जपही करीत असल्याने त्यांना ाध्यात्मिक व दैवी शक्तीची जोड मिळाली आहे व त्यांचे ीरावर ते या शास्त्रात निपूण बनत चालले असून या ास्त्राची प्रतिष्ठा वाढण्याचे दृष्टीने ते खरोखर भरीव ार्य करीत आहेत.

दहिवली (कर्जत) जि. कुलाबा.

आर. जी. सप्रे

होरारत्न, बी. एस्‌सी., बी. पी. एस्. वाय्.

गेली जवळ जवळ चाळीस बेचाळीस वर्षे अध्यात्म व ज्योतिष, संख्याशास्त्र, हस्तसामद्रिक फलज्योतिष, मंत्रशास्त्र, वेदांत इत्यादींचा अभ्यास व संशोधन केले आहे. इंग्रजी व मराठीतून बारा ग्रंथ आणि सुमारे पंधराशे लेख भारत व जागतिक नियतकालिकातून प्रसिद्ध झाले आहेत. तसेच जागतिक प्रकाशनाचे व इंग्लंडच्या पॅथॉगॉरियन प्रकाशनाचे परीक्षण विभाग लेखक व ज्योतिष, शिक्षण महाविद्यालय, पुणे या संस्थेचे परीक्षक म्हणून त्यांनी काम केले आहे. पुणे, मद्रास, मुंबई, बंगलोर, नागपूर, दिल्ली, कटक, कलकत्ता, सिलोन, इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका येथील विविध नियतकालिकांतून त्यांनी लेखन केले आहे. तसेच भारतीय व विदेशीय संस्थांचे ते सन्माननीय सभासद असून विविध संस्थांकडून गौरव व सन्मान प्राप्त झाला आहे.



त्यांचा या शास्त्रात हातखंडा असून त्यातील संशोधन व दिग्दर्शनाबद्दल त्यांना अनेक प्रशस्तिपत्रके मिळाली आहेत. तसेच बी, एस्. ए. मुंबई या संस्थेकडून मेरिट सर्टिफिकेटही मिळाले आहे. त्यांनी अनेक पुस्तके व ज्योतिषग्रंथ प्रसिद्ध केले असून त्यास नामवंत वृत्तपत्रांचे उत्कृष्ट अभिप्राय मिळाले आहेत. राष्ट्रपति श्री. शंकराचार्य आणि इंग्लंड, फान्स व जर्मनी येथील शास्त्रज्ञांनी त्याची विशेष प्रशंसा केली आहे.


या भागात ते फारच प्रसिद्ध असून दूरदूरहून त्यांचेकडे लोक सल्ला घेण्यासाठी येत असतात. तसेच बरेचजणांना त्यांच्या ज्ञानाची प्रचिती आली असून या विषयात जास्त संशोधन करण्याचा त्यांचा मानस आहे.

पो. राहुरी
जि. अहमदनगर (महाराष्ट्र)

हरिश्चंद्र विनायक धर्माधिकारी

संस्कृत भूषण.

जन्म ता. १–५–१८९५.



ह्यांचा तारापूर पालघर व दादर मुंबई येथे ज्योतिष्याचा व्यवसाय आहे. १९३८ मध्ये त्यांची ' मधुपर्क पूजा प्रयोग ' नामक ग्रंथरचना प्रसिद्ध झाली. १९५८ साली त्यांनी कै. नारायण विठ्ठल पुरंदरे यांचे चरित्र लिहिले. सन १९५८ साली "संस्कृत भूषण" हे प्रतिष्ठा-पत्र जगद्गुरू शंकराचार्यांकडून देण्यात आले आहे. ज्योतिष व कर्मकांड या विषयात निष्णांत म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचे जवळ या विषयातील मोठा ग्रंथसंग्रह असून त्यांचे वाचनही फार आहे. " सुबोध कुंड भास्कर " या नावाचा ग्रंथ ते लिहीत आहेत.

त्यांचे चिरंजीव नरेंद्रनाथ हरिश्चंद्र धर्माधिकारी यांनी कलकत्ता येथील ज्योतिषशास्त्राच्या परीक्षा दिल्या आहेत. तेही त्यांच्याप्रमाणे विद्वान व जाणकार म्हणून प्रसिद्ध आहेत.

मु. उनभाट, ता. पालघर पो. तारापूर,
जि. ठाणे. (अणुकेंद्र पश्चिम रेल्वे)

श्री. हणमंत विनायक जोशी

जन्म–२६–१–१९१२



यांचा जन्म बेळगावजवळ अनगोळ या गावी झाला वाडवडिलार्जित जमीन जुमल्याचा फारसा उपयोग झाला नाही. कुटुंब मोठे, प्राथमिक शिक्षकाची नोकरी करण्यासाठी यांनी बेळगांवहून १९३७ मध्ये स्थलांतर केले. हल्ली तेरदळ येथे ते नोकरी करतात.

बऱ्याच वर्षापासून त्यांना या शास्त्राबद्दल आस्था होती. आकाशातील ग्रह व नक्षत्रे वरचेवर पाहण्याचा त्यांना शोक आहे. पण पंचांगावरून कुंडली करण्याइतकेच प्राथमिक ज्ञान होते, भविष्य मात्र वर्तविता येत नव्हते. पुढे अनुकूलता लाभल्यावर त्यांनी पुण्याचे पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्याच पुस्तकावरून या शास्त्राचा अभ्यास केला.

त्यांच्या विद्यालयाची प्रारंभिक परीक्षा ते पास झाले. गेल्या ३ वर्षांपासून त्यांनी विशेष अभ्यास सुरू ठेवला आहे. याचवेळी फलज्योतिष अभ्यास मंडळाचा ज्यो. समाचार मासिकाच्या वाचनाने त्यांची बरीच

प्रगती होऊन ज्ञानात वाढ झाली. सध्या ते स्वतःस अभ्यासू म्हणवतात. जन्मटिपणे, कुंडल्या करणे, प्रश्न कुंडली करून उत्तरे सांगणे व भविष्य वर्तविणे ही कामे ते सध्या करीत असतात. त्यांची अभ्यासू वृती व व्यासंग पाहता उत्तरोत्तर त्यांची प्रगती होईल अशी आम्हांस उमेद आहे.

मुख्याध्यापक मराठी शाळा
तेरदळ जि. विजापूर

श्री विश्वनाथ गोविंद दशपुत्रे

ज्योतिषभूषण
बी. कॉम. जी. आय्. आर. टी.

मुंबई येथे २ डिसेंबर १९२६ रोजी जन्म झाला.



शिक्षण बी. कॉम, व जी, आय्. आर. टी. झाले आहेत. सध्या ते बी. ई. एस्. टी. कंपनीत (मुंबई) नोकरीला आहेत. मुंबई येथील ज्योर्तिविद्या मंडळीतर्फे घेतलेल्या "होराशास्त्र" व सामुद्रिक शास्त्र विषयांचे अंतीम परीक्षेंत उत्तम श्रेणीत उत्तीर्ण होऊन त्यांनी ज्योतिषभूषण ही सन्मान्य पदवी मिळविली आहे.

ज्योर्तिविद्या मंडळ, मुंबई या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर यांची १९५५–५६ या काळात निवड झाली होती. हातावरील भाग्यरेषा या विषयावर मंडळाचे जागेत जाहीर व्याख्यान दिले. वरील मंडळातर्फे दादर शाखेत सुरू केलेल्या सामुद्रिक शिक्षणशाखेत पहिला शिक्षक म्हणून काम केले. भारतीय आणि परदेशी पुस्तकांवरून "फलज्योतिष शास्त्र" व हस्त सामुद्रिक शास्त्र" यांचा अभ्यास सतत करीत असतात. या विषयाचे व्यासंगामुळे पद्मनाथशास्त्री पालये, सोमशास्त्री व्ही. के. रेगे यांच्यासारख्या विद्वज्जनांचा सहवास त्यांना लाभला आहे.

टोपीवाला लेन, भीमा चाळ
स्टेशन रोड, गोरेगाव पश्चिम
रू. नं. १. मुंबई ६२.

श्री एम्. सत्यनारायण

साहित्यभूषण, होराभूषण. डी. आय्. ए. एस्.
जन्म १८–२–१९२४

यांना १९३९ पासून या शास्त्राची आवड आहे. तसेच १९३८ पासून



त्यांना काव्याची आवड असून ते तेलगू भाषेतील कवी आहेत. त्यांनी ३ काव्यसंग्रह प्रसिद्ध केले आहेत. १९४० ते १९५२ या कालात त्यांनी संस्कृत भाषेचा प्रदीर्घ अभ्यास करून "इंडियन फिलॉसॉफी ऑफ गीता भाश्यम्" आणि "योगशास्त्र" या ग्रंथांचे परिशीलन केले. इ. स. १९५२ मध्ये त्यांनी "साहित्य–भूषण" ही पदवी मिळविली. तसेच इ. स. १९६१ मध्यें त्यांनी "होराभूषण" ही ज्योतिषशास्त्रांतील पदवी संपादन केली.

१९६४ सालापर्यंत त्यांनी आंध्र व महाराष्ट्र प्रांतांत ज्योतिष; वाङ्मय, तत्वज्ञान व योगशास्त्र या विषयांवर इंग्रजी, तेलगू, हिंदी, मराठी आणि संस्कृत या पाच भाषांतून व्याख्याने दिली. आजपर्यंत त्यांनी जवळजवळ ४ हजार पत्रिकांचे परिक्षण केले असून पाचही भाषांमधून भविष्य कथन केले आहे. १९४२ पासून ते प्रत्येक रविवारी नियमितपणें मौनव्रत अचरतात. मेडिकल अॅस्ट्रॉलॉजी व स्पिरीच्युअल अॅस्ट्रॉलॉजी या विषयांत त्यांनी वैशिष्टय संपादन केले आहे. व त्याचप्रमाणे प्रश्नशास्त्र, साहित्य, वेदांत, ज्योतिष-वैद्यक यांचाही त्यांनी सखोल अभ्यास केला आहे.

लिपिशास्त्र व भाषाशास्त्र यांचाही त्यांचा व्यासंग दांडगा आहे. १९३९ पासून ते निबंधलेखन करीत आहेत. आजपर्यंत त्यांनी वरील ५ भाषांतून लेखन केले असून ते मद्रास, मुंबई व पुणे या शहरांतून निघणाऱ्या विविध साप्ताहिके, मासिकें, व पक्षिके यांमधून प्रसिद्ध झाले आहे.

घर नं २-१-१४६. पहिला मजला
नलकुंटे मुशीराबाद पोस्ट,
हैद्राबाद –२०

पं. दत्तात्रय शंकर केळकर

ज्योतिषाचार्य

ज्योतिषशास्त्र जाणणारे अभ्यासू पुष्कळ असतात. पण तेच ज्योतिषशास्त्र आहे तरी काय हे इतरांना कळावे, त्यांनाही या शास्त्राचा अभ्यास करावासा वाटून या शास्त्राची प्रतिष्ठा वाढावी म्हणून कळकळीने व निष्ठेने प्रयत्न करण्यांपैकी श्री. केळकर यांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल.



पूज्यनीय मसूरकर महाराज, सिद्धरूदस्वामी व हिमालयातील एक साधू यांचे आशीर्वादाने व कृपेने त्यांना या शास्त्रात यश मिळाले. ह्यांनी या विषयावरील जवळजवळ २० पुस्तके लिहिली असून ती अतिशय सोप्या भाषेत व चटकन समजेल अशा पद्धतीने लिहिली असल्याने ती फारच लोकप्रिय झाली आहेत. अजूनही ग्रंथरचना करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांनी हस्तसामुद्रिक, जन्मकुंडली व जन्मतारीख अशा विविध विषयांवरही पुस्तके लिहिली आहेत. तसेच नेहमी उपयुक्त ठरू शकणारी 'तुमचे ९५ प्रश्न आणि त्यांची उत्तरे,' 'तुमचे ग्रह व रोजचे प्रश्न,' व 'प्रश्नज्योतिष' अशीही पुस्तके लिहीली आहेत. वृत्तपत्रविषयावर एक टेलिव्हिजवर एक लहान मुलांसाठी चार कादंबऱ्या व एक, नाटक व सभाशास्त्र यांवरील पुस्तके प्रसिद्धीच्या मार्गावर आहेत.

ज्योतिषविषयाखेरीज त्यांनी इतर लिखाणही बरेच केले आहे. विशेषत: 'अध्यात्म सुखाची वाटचाल' हा 'अमृतानुभव' या ज्ञानेश्वरांच्या अध्यात्म ग्रंथावर टीका लिहिली आहे. त्यांचे ज्ञानाचा लाभ आतापर्यंत सर्व क्षेत्रांतील लोकांनी घेतला आहे. विशेषत: चित्रपट, नाट्य, राजकारण, व्यापार व अध्यात्म अशा विविध क्षेत्रांतील अधिकारी व्यक्तींना त्यांनी आपल्या ज्योतिषशास्त्राचे मार्गदर्शन केले आहे. तसेत ईश्वरकृपेने त्यात त्यांना यशही मिळाले आहे.

त्यांना मंत्र व तंत्रशास्त्र अवगत आहे. व शान्तादुर्गा ही त्यांची उपास्यदेवता आहे. आंतरराष्ट्रीय ज्योतिर्विद मंडळाचे ते सदस्य आहेत. तसेच त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांत, सहकारी क्षेत्रात, शैक्षणिक आणि वृत्तपत्र क्षेत्रात भरीव काम केले आहे.

ज्योतिष हे शास्त्र असण्याबद्दलची कबुली अनेक डॉक्टर, सर्जन, शास्त्रज्ञ यांनी त्यांना दिली आहे. त्यांना वैद्यकशास्त्रही चांगले येते. ज्योतिषाला अचूक भविष्य निदानासाठीं अंत:स्फूर्तीचीही गरज असून एखाद्या दैवी उपासनेची जोड असावी लागते, असेही मत ते नेहमी प्रतिपादन करीत असतात.

आज ते मानसन्मान, यश, पैसा, प्रतिष्ठा व लौकिक या दृष्टीनें खरोखर सुखी अन् समाधानी असून या विषयावर अधिक लिखाण व संशोधनपूर्वक अभ्यास करीत आहेत. परमेश्वर त्यांना या शास्त्रात अधिकाधिक यश व कीर्ती देवो व या शास्त्राचे व त्यांचे स्वत:चे नाव अजरामर होवो हीच प्रभुचरणी सदिच्छा आम्ही व्यक्त करतो.


मु. पो. सावंतवाडी.
जि. रत्नागिरी.

पं. हरिकृष्ण रेवाशंकर याज्ञिक

ज्योतिर्विज्ञान संपादक

जन्म १-१-१९१२

हे मुळचे सांबारकाठा जिल्ह्यातले. लहानपणीच माता-पितांच्या कृपाछत्रास मुकले. यांचे घराण्यातील सर्व लोक या शास्त्रांत पारंगत होते. त्यांनी प्रारंभी पुण्यातील ख्यातनाम ज्योतिषी व वडीलबंधू 'गौरीशंकर याज्ञिक' यांच्याजवळ ज्योतिष विद्येचे व म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांचेजवळ संस्कृतचे अध्ययन केले. पुढे ते पुण्यातच स्थायिक झाले. पुण्यातील ज्योतिर्विद्या परिसंस्थेमध्ये ते कार्यकारी मंडळात होते. त्यांचा ग्रहनक्षत्र फलादेश मंडळाच्या स्थापनेस मोलाचा हातभार लाभला. पुढे १९४७ मध्ये



त्यांनीं स्वत:चे संपादकत्वाखाली ' ज्योतिर्विज्ञान ' नावाचे मासिक काढले. व ते आजतागायत उत्तम प्रकारे निघत आहे. पुढे त्यांनीं आपले ज्योतिष मासिकाचें कार्यालय मुंबईस हलविले. व तेथें उत्तरोत्तर त्यांची प्रगतीच होत गेली. त्या मासिकाला श्री. मोरारजी देसाई, श्री. अरविंदभाई मफतलाल, कै. न. वि. गाडगीळ, स्व. तात्यासाहेब केळकर, कै. केशवराव जेधे वगैरे थोर लोकांचे आशीर्वाद लाभले आहेत.

त्यांनीं आपल्या मासिकांतून प्रे. केनडी, प्रे. ट्रुमेन, कृष्णमेनन, तारासिंगाचे उपोषण, ईजिप्त युद्धांत प्रे. नासरचा विजय, यांबद्दल वर्तविलेली भाकीतें अगदीं अचूक ठरली. आज ३५ वर्षे या शास्त्राची सेवा ते मनोभावें व निरलसपणे करीत आहेत. भारतांतच काय पण परदेशांतहि त्यांचे मासिक फारच लोकप्रिय झालें. आहे. ' ज्योतिविलीन संशोधन केंद्र ' या नांवाची एक संस्था त्यांनीं स्थापन केली असून तिचेद्वारे या शास्त्रावर संशोधन सुरू आहे. त्यांनीं विशिष्ट योगावर संशोधन केलें आहे. त्यांचा शिष्यवर्ग फार मोठा आहे. त्यांचा मनमोकळा स्वभाव, त्यागी वृति व ज्योतिष शास्त्रावरील निस्सीम प्रेम यामुळें उत्तरोत्तर प्रगतिपदावर वाटचाल करीत आहेत.

जयहिंद स्टेट नं. तीन बी.
पाछन, भुलेश्वर, मुंबई नं. दोन

पं. वासुदेवराव नारायण लोणकर

श्रीक्षेत्र जेजुरी हे यांचे मूळ जन्मगाव. लहाणपणींच



पित्याचें छत्र नष्ट झाले. तसेच त्याच सुमारास कुटुंबातील आठ माणसे प्लेगनें मृत्युमुखी पडल्यानें त्यांना मोठाच मानसिक आघात सहन करावा लागला. पुढें त्यांनी मोठ्या हिंमतीनें मराठी सातवी (व्हृ. फा.) उत्तीर्ण होऊन प्रा. शिक्षकाची नोकरी धरली. त्यांना त्यांच्या आईचे उत्तम प्रकारें मार्गदर्शन लाभलें. यांचा स्वभाव काटकसरी, लोकांत मिळून मिसळून वागण्याची वृत्ति, परमेश्वरावर दृढ श्रद्धा व पूजन, चिंतन, मनन यांची आवड. वरील गोष्टींमुळें त्यांचा लोकसंग्रह वाढला. पुढे त्यांनी ज्योतिष शिक्षण कोर्स घेतला व व्यासंग वाढविला.

आपला शिक्षकाचा व्यवसाय सांभाळून ते या शास्त्राचें मार्गदर्शन करीत असतात. त्यांना दूरदूरचे ठिकाणांहून लोकांचें बोलावणे येतें. सध्या यांना फारसे जमत नाहीं, मुले–मुली चांगली सुशिक्षित असून मुलगे चांगल्या नोकरीत व मोठ्या जागेवर आहेत. अशा प्रकारे मोठ्या कठीण परिस्थितितून पुढें येऊन ते आज सुस्थितींत जीवन व्यतीत करीत असून या भागांत फारच लोकप्रिय झाले आहेत. लोणकर गुरुजी या नावाने ते सर्वांचे परिचित आहेत.

श्रीक्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर,
जि. पुणें.

प्रो. र. वि. वैद्य.

एम्. ए. बी. टी.
जन्म–१३–१०–१८९९

यांचे वास्तव्य डोंबिवली येथें आहे. त्यांनी बरीच वर्षं कॉलेज मध्यें अध्यापनाचें काम केलें. यांचें वैशिष्टच म्हणजे भारतीय वेदांगाचा संशोधनात्मक अभ्यास केला असून त्यावर अनेक ग्रंथांद्वारें लिखाण केलें आहे. त्यांचे भारतीय युद्धकाल निर्णय, आमचे वैदिक वाङ्मय, आमची नक्षत्रें, वेदकालीन कालगणना व यज्ञ संस्था, कांहीं ज्योतिषग्रंथ व त्यांचें ज्योतिषविषयक कार्य, धर्मकृत्यें व व्रतें यांतील वैदिक परंपरा इत्यादि ग्रंथ निर्माण करून साहित्याची बहुमोल सेवा केली. आर्थिक परिस्थितीची तमा न बाळगता अनेक ज्ञानाचा जिद्दीनें, निष्ठेनें भारतीय

देवधर्म धनैर्युक्तो बुद्धियुक्तो विचक्षणः !
पुष्ये च जायते लोके शान्तात्मा सुभगः सुखी ।।

पुष्य नक्षत्रावर जन्माला येणारे दैवगुणी, धर्मप्रवृत्ती, संपत्तीवान, असतात. बुद्धिवान, निपुण, शांत स्वभाव, भाग्यवान आणि सुखी असतात.

अमूल्य ठेवा करून ठेवला आहे. पंचागवाद व त्यांतील तफावत या विषयीं आव्हानानें अनेक पंडितांना सिद्ध करून देण्यास तयार आहेत. त्याविषयीं अनेक ठिकाणी विषय लेखाचे रूपानें प्रगट केला आहे.

बागडे बिल्डिंग, श्रद्धानंद रोड,
डोंबिवली पूर्व. जि. ठाणे.

द्वारकानाथ गणेश चित्रे

जी. सी. डी.

जन्म–२८ नोव्हेंबर १९२२

यांचे बालपण व शिक्षण मॅट्रिकपर्यंत नाशिक येथें झालें. १९४२ मध्यें ते मॅट्रिक झाले. व पुढें १९४७ मध्यें जी. सी. डी. चें शिक्षण पूर्ण केलें. पुढें ते इनकम्‌टॅक्स खात्यांत नोकरीस लागले व पुढें बदली होऊन सध्या ते मुंबईत स्थायिक आहेत. त्यांचे वडील प्रख्यात हस्तसामुद्रिक,



जवळजवळ ४०।४५ वर्षांचा त्यांचा व्यासंग होता. त्यांच्यापासून त्यांना या शास्त्रांयच शिक्षणाची स्फूर्ती मिळाली. ह्यांना लहान पणापासून गणित संशोधन, काव्यव मानसशास्त्र या विषयांची आवड, त्यामुळें त्यांनीं १९५० नंतर ज्योतिगणित, कुंडलीज्ञान, रंगचिकीत्सा, भूगभशास्त्र, नक्षत्र, फलादेश, योगतान्यांची सूक्ष्म मीमांसा इ. विषयांचें अध्ययन केलें.


नोकरी संभाळून ते लोकांना या शास्त्राचें योग्य मार्गदर्शन करीत असतात. तसेच विशेषत: शारीरिक व्याधी, मेंदूची दुखणी यांवर योग्य सल्लाहि देतात. तसेच या शास्त्राचे योग्य उपाय सुचवतात. या शास्त्राचा त्यांचा व्यासंग दिवसेंदिवस वाढत असून त्याना यशहि मिळत आहे. या शास्त्रावर त्यांनी बरीच टिपणें केलीं आहेत. व ती प्रसिद्ध करण्याचा त्यांचा मानस आहे.

गोकुळदास देवजीवाडी.
टिटोरिअल हायस्कूल मागें,
केनडी ब्रीज कॉर्नर
गांवदेवी मुंबई ७,

श्री. श्रीकृष्ण गंगाधर खानझोडे, दैवज्ञरत्न B.A.

जन्म ४ सप्टेंबर १९३१

यांचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुबांत झाला. वडील स्वकर्तृत्वावर शिक्षण क्षेत्रांत बरेच पुढे आले. व त्यांनीं एका मिडल-स्कूलची स्थापनाहि केली. तेच शाळेचे संस्थापक व पहिले मुख्याध्यापक होते. त्यांनाहि ज्यो ति ष शास्त्राची आवड होती. स्वभाव अ ति श य धार्मिक त्यामुळें धार्मिक



संस्कार यांचेवर चांगले झाले. मॅट्रीक पास झाल्यावर ते घरची जबाबदारी पडल्यानें शिक्षक म्हणून नोकरीस लागले व आज जवळजवळ १५ वर्षे ते वडिलांचे शाळेंतच काम करीत आहेत. नोकरी सांभाळून बी. ए. पर्यंतचा अभ्यास केला.

यांनी वडिलांपासूनच ज्यो. शास्त्राचें प्राथमिक ज्ञान घेतलें. पुढे हस्तरेषा मुद्राज्योतिष, कुंडली विज्ञान, संख्याशास्त्र, भारतीय पद्धति व पाश्चात्य पद्धति यांवरील प्रसिद्ध ग्रंथाचें वाचन करून अभ्यास वाढविला. त्यांनी या शास्त्रातील 'दैवज्ञरत्न' ही बहुमानाची पदवीहि मिळविली आहे. त्यांना १९६४ मध्यें श्रीसमर्थ योगाभ्यानंद व्यंकटनाथ महाराजांच्याकडून अनुग्रह मिळाला. पुढे त्यांच्याच प्रेरणेनें त्यांनीं श्रीनाथ ज्योतिष कार्यालयाची स्थापना केली. अमरावती येथील सर्वांत जुने वृत्तपत्र 'उदय' मध्यें ते राशीभविष्य लिहीत असतात. तसेच त्यांचे साप्रदायिक मासिक 'पूजा' यामधूनहि ते जाने. १९६७ पासून भविष्यलेखन करणार आहेत. त्यांचा ज्योतिषशास्त्राचा व्यासंग दिवसेंदिवस वाढतच आहे. अनेकांना त्यांचे ज्ञानाची प्रचीति आली आहे. विदर्भ विभागात फल ज्योतिष अभ्यास मंडळाची शाखा स्थापन करावी व ज्यो. शास्त्राबद्दल जनतेंमधील उदासीनता घालवावी या हेतूने ते या शास्त्राचा अभ्यास व व्यासंग वाढवीत आहेत.

या शास्त्राचे पाठीशी एखाद्या देवतेची उपासना वा सत्पुरुषाचा आशीर्वाद असल्याशिवाय अचूक भविष्य कथन करतां येत नाहि असे त्यांचे स्वानुभविक मत आहे.

"श्रीनाथ ज्योतिष कार्यालय"
बडनेरा (रेल्वे).

श्री. वामन पद्माकर पटवर्धन

ज्योतिर्विद-



हायस्कूलमध्यें असतांना त्यांचे वडील श्री. पद्माकर गणेश पटवर्धन हे हुबळी येथें नोकरीला होते. हुबळी येथे श्री. गणपत गोपाळ गोखले हे प्रख्यात ज्योतिषि म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचेच घरांत पटवर्धनांचें बि ऱ्हा ड असल्यानें रोज घरी असल्यावर अमुक ग्रह उच्चस्वगृह, नीचग्रह, महर्दशा, अंतर्दशा इत्यादि गोष्टीं कानावर पडत. तेव्हांपासून शास्त्र जाणून घेण्याची जिज्ञासा त्यांना झाली.

त्यांची आई लहानपणींच निवर्तल्यामुळें कॉलेजशिक्षण न घेतां पोटाचें उद्योगाकडे लक्ष वेधलें. १९२३ पासून ते रिटायर होईपर्यंत म्हणजे १९५७ अखेरपर्यन्त महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटीव्ह बँक लिमि. मध्यें होते. निवृत्त झाल्यावर ज्योतिष विषयाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. ज्योतिषशास्त्रांत लागणारी अशी आवश्यक माहिती म्हणजे उच्चस्वगृह, नीचग्रह इत्यादींचे कोष्टक वगैरे गोष्टींचा जाणकार व्यक्तींकडून अभ्यासाचे दृष्टीने ज्ञानाची अधिक वाढ करून घेतली.

त्यांनी मोठमोठ्या लोकांची ह्या विषयांवरील पुस्तके वाचली आणि ज्याचा इतिहास माहीत आहे अशा उदा. लो. टिळक, केळकर, कै. सावरकर, इ. मोठ्या हुद्द्यांवर असलेले लोक, वेगवेगळ्या क्षेत्रांतील लोक ह्यांच्या कुंडल्यांचा अभ्यास केला. अमुक गोष्ट घडल्यास कोणती गोष्ट कारणीभूत झाली याचा मनाशी विचार केला व जिद्द ठेवून इतरांचे मार्गदर्शन घेऊन भविष्यकथन करण्याचा विचार चालू ठेवला· त्यांचा ४० वर्षे ह्या शास्त्राचा व्यासंग आहे. मोठमोठ्या जाणकारांच्या गाठीभेटी पडून त्यांचें भविष्य सांगण्याचा दृष्टिकोन धरून आजपर्यंत अनुभव प्राप्त केला. अर्थात् मनाची एकाग्रता व शुद्ध आचरण असणें आगत्याचे आहे असे त्यांचे ठाम मत आहे.


७२।२ ब. नवी पेठ, विकास नगर,
पुणें. ९.

श्री. मदन वामन महाजन

ज्योतिविद.

जन्म–२४–६–१९१४

यांचे शिक्षण बेताचं झालं. गेले दोन पिढ्यांपासून धार्मिक क्षेत्रांत यांचे घराण्यांचा नावलौकिक. लहानपणींच त्यांचेवर उत्तम संस्कार झालें. तसेच औषधीदान ही अविरत त्यांचे घराण्याला मिळालेली नैसर्गिक देणगीच म्हटली पाहिजे प्राथमिक शिक्षण सुरू असतांनाच ज्यो. शास्त्राचा श्रीगणेशा पूज्यनीय श्री. चैतन्यप्रप्रसाद हजारी जांभोरकर यांच्याकडून घेतला. त्यांना वाचण्याची दांडगी हौस त्यामुळें या विषयाचें ज्ञानांत नवी भर पडूं शकली.



खामगांवीं असतांना श्री. संत पाचलेगांवकर महाराज व पू. गुरुवर्य एम्. डी. सगणे (डी. सी.) यांचे मार्गदर्शनानें या शास्त्राचा त्यांनी सखोल अभ्यास केला. (१९३३ ते १९४०) त्यानंतर अनेक ग्रथाचें अध्ययन, टीका व त्यांतून स्वानुभव घेतले. त्यामुळें त्यांचा व्यासंग वाढला. ते आपल्या ज्ञानाचा इतरांना उपयोग करून देत असतात. या शास्त्राबद्दल वाटणारा जिव्हाळा व धडपड करण्याची वृत्ति पाहून ते या शास्त्रांत निश्चितच यश मिळवतील असा विश्वास वाटतों.

जीवन ज्योतिष कार्यालय,
मु. पो. डोणगांवकर. (जि. बुलढाणा.)
ता. मेहकर.
जि. बुलढाणा.

कृतज्ञो गर्वितो हीनो नरः पापरतः शठः।
आर्द्रानक्ष सम्भूतो धनधान्य विवर्जितः ॥

आर्द्रा नक्षत्रावर जन्माला येणारे कृतज्ञ, अभिमानी, हीन वृत्तीचे पापी, मूर्ख, आणि धन–धान्यहीन होतात.

मधुकर महादेव औटी

ज्योतिर्भूषण

हे एक गरीब ब्राम्हण असून भिक्षुकी करीत. यांचे वडिलहि भिक्षुकीचा व्यवसाय करीत सध्यां ते मुळा धरणावर टायपिस्ट म्हणून काम करतात. प्रापंचिक, जबाबदारी वाढल्यानें जोड म्हणून भिक्षुकी व ज्योतिषाचा धंदा सांभाळतात. येवले आरवाडा, जोगेश्वरी गोटुंबे, धाकटी राहुरी, तांदुळवाडी वगैरे सुमारे ६--७ ठिकाणीं भिक्षुकी करतात. त्यांनी राजंदेकर, रूईकरशास्त्री यांचीं पुस्तकें व पंचांग यांचा अभ्यास केला असून अजूनहि या विषयाचें शिक्षण घेण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांचें ज्योतिषाचे ज्ञान जरी थोडें असलें तरी तेथील लोकांना त्याचा थोडाबहुत अनुभव येत असतो व त्यामुळें अडचणींत असलेल्यांना मार्गदर्शन होऊन दिलासा देण्याचें काम ते आपुलकीनें करीत असतात.



घरची अत्यंत प्रतिकूल परिस्थिति असूनहि केवळ या विषयाची आवड म्हणून ते सतत प्रयत्नशील असून या विषयांत प्रविण्य मिळविण्यांत यशस्वी होतील असें वाटते. संस्था त्यांना त्यांच्या ज्योतिषशिक्षणास साहाय्य व सहकार्य करण्यास केव्हांहि तयार असून त्याचा उपयोग ते करून घेतील असें वाटते.

औटी आणि कंपनी,
मु. पो. राहुरी.
जि. अहमदनगर

शान्तः सुखी च भोगी च सुभागो जनवल्लभः ।
पुत्रमित्रादिमर्युक्तो जायते च पुनर्वसौ ॥

पुनर्वसु नक्षत्रावर जन्माला येणारी व्यक्ती शांत, सुखी, भाग्यवान आणि प्रिय अशी असते.

जनार्दन दत्तात्रय टिळक

ज्योतिर्वैद्य

जन्म– १५–१०–१९१३

यांचे शालेय शिक्षण दहावे वर्षी संपलें. त्यांचे आजपर्यंत अनेक व्यवसाय झालें, पण पहिल्यापेक्षां दुसरा आर्थिकदृष्टचा फायद्याचा म्हणून बदलत गेला. परंतु धंदा न चालल्यानें त्यांना तो बंद करावा लागला. त्यांना आयुष्यांत अनेकांचा गुप्त विरोध सहन करावा लागला. त्यांनीं वयाचे पंचवीसावे वर्षी वतनी हक्क आणि वडिलार्जित इस्टेट स्वखुषीनें सोडली. त्यांचे दोन विवाह झाले आहेत. त्यांनी मोठमोठ्या कौटुंबिक अडचणी, संकटे, आजार यांना तोंड देऊन या शास्त्राचा व्यासंग चालू ठेवला आहे. आजहि त्यांची तब्येत रोज चौदा तास काम करण्याइतपत चांगली आहे.



ते एकोणीसशे एकूणतीसपासून भिक्षुकीचा व्यवसाय करतात. त्यांनीं वे. शा. सं. गणेश सुंदरशास्त्री क्षीरसागर यांचेकडे आन्हीक, ब्रम्हकर्म, महिम्न, रुद्रपठण, षोडश, संस्कार, अंत्येष्टी प्रयोगासहित सर्व शिक्षण घेतलें. त्यांना १९४१ मध्यें वैद्यकीय रजिस्ट्रेशन मिळालें. आयुर्वेदिक, ॲलोपाथी, होमिओपाथी आणि बायोकेमिकल पद्धतीनें ते चिकित्सा करून औषध देतात. श्रीदत्तात्रयाची उपासना करतात व मंगळवार व गुरुवार ज्योतिषविषयक कामे करतात. साधारणपणें दरवारी ७५ त २०० लोक त्यांचेकडे येतात. त्यांना या विषयांतील अनेक विद्वानांचा सहवास घडल्यानें त्यांचे ज्ञान प्रगल्भ झालें.

त्यांचेकडे दूरदूरचे ठिकाणांहून लोक ज्योतिषविषयक सल्ल्यासाठीं येतात. अनेकांना त्यांच्या ज्ञानाचा लाभ झाला असून अनुभवहि आला आहे. त्यांनी ज्योतिषविषयांवर तीन ग्रंथ लिहिण्याचे ठरविलें असून १९६८ सालीं प्रसिद्ध करण्याचा त्यांचा मनोदय आहे.

मु. पो. ता. पेण,
जि. कुलाबा.

श्री. पुरूषोत्तम द्वारकानाथ राजे

को. ऑ. आ. रजिस्ट्रार

महाराष्ट्रातील महान् ज्योतिषी व अनेक ज्योतिष-विषयक ग्रंथाचे लेखक व्यासंगी विद्वान् कै. द्वा. ना. राजे यांचे हे चिरंजीव.



सध्यां हे सरकारी नोकरीत आहेत. फल ज्योतिष शास्त्राचा अभ्यास व फलिते वर्तविणें हा यांचा आवडीचा छंद. कै. ज्योतिषाचार्य राजे यांचे सतत सान्निध्याने व मार्गदर्शननाचा लाभ मिळाल्याने त्यांच्या व्यासंगास मूर्त व भरीव स्वरूप येऊ शकलें व त्यांना त्यांत चांगली गतीहि येऊ लागली. त्यामुळे वयाचे २८ पासून त्यांनी या शास्त्राचे काम केले आहे. गेली २५ वर्षांचा त्याचा या शास्त्राचा अभ्यास आहे.

ते सायन पद्धतीने फले वर्तवितात. त्याशिवाय ते या शास्त्रावर लेखनकार्य देखील करतात. तसेंच त्यांचे कांहीं लेख संस्थेच्या (फल ज्योतीष अभ्यास मंडळ) 'ज्योतीष समाचार' या मासिकांत प्रसिद्ध झाले आहेत. ते खरोखर अभ्यासनीय व जिज्ञासूंना उपयुक्त ठरणारे असेच आहेत. ते आपल्या वडिलांच्या पश्चात् या शास्त्राचे सर्व प्रकारचे काम आजहि नोकरी सांभाळून मोठ्या आस्थेने करीत आहेत. तेहि आपल्या पित्याप्रमाणेच या शास्त्रात प्रगती करून नांव मिळवतील असा विश्वास वाटतो.

ज्योतिषाचार्य द्वा. राजे कार्यालय
६५४ शुक्रवार पेठ,
पुणें २.

सर्वभक्षः कृतान्तश्च कृतन्घो वञ्चकः खलः।
कृतन्घश्च कुकर्मी च श्लेषायां जायते नरः॥

आश्लेषा नक्षत्रावर जन्माला येणारी व्यक्ती घातकी स्वभावाची, दुसऱ्याला पिडणारी दुष्ट आणि वाईट कृत्य करणारी असतात.

बापू भाऊ गोसावी

होराभूषण

जन्म– १३ ऑगस्ट १९२३.

यांना लहानपणापासून ज्योतिषशास्त्राची आवड आहे. त्यामुळं त्यांचा अभ्यास सतत चालू आहे. या शास्त्राचा व्यासंग वाढविण्याची त्यांची मनीषा आहे. त्यादृष्टीने ते ज्योतिष 'समाचार मासिकाचे' सहाय्य घेत असतात. सध्या ते प्राथमिक शिक्षक असून ते जि. परिषदेचे काम करीत आहेत. १९६३ साली त्यांनी या शास्त्राची होराभूषण ही पदवी प्राप्त केली असून अवघ्या चोवीस वर्षाच्या वयांत त्यांनी ज्योतिष शास्त्राचा बराच अभ्यास केला आहे व या शास्त्रांत प्रगति करण्याचा ते कळकळीने प्रयत्न करीत आहेत.



मु. पो. टाकळी (ढोलेश्वर)
जि. अ. नगर. ता. पारनेर

मधुकर गोविंद अत्रे
B. A. (D. I. A. S.)
–होराभूषण– जन्म–१४–६–१९२४

बालपण व मॅट्रीकपर्यंत शिक्षण इंदूर येथें झालें.



लहानपणापासून त्या या मा ची भारी हौस १९३८ व १९३९ मध्यें सेंट्रल इंडिया स्कूल्स अॅथलेटिक असोशिएशनकडून मल्लखांबाचें १ लें बक्षीस मिळालें. चित्रकला व हस्तव्यवसायाचीहि मूळची आवड. त्यांनी मोठमोठीं चित्रें व स्कॅचेस काढली आहेत. लहानपणी मुंज झाल्यावर गुरूकडून वेदाध्ययन झालें. तसेंच त्यांचे वाचनांत स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ यांचे वाङ्मय आल्यानें त्यांची आध्यात्मिक बैठक तयार झाली. १९४२ मध्यें मॅट्रिक उत्तीर्ण, पुढें पुणें येथे येऊन नोकरी सुरू केली. व त्याच वेळेपासून आजपर्यन्त अनेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा संबंध आला. त्यांनीं चित्रकलेच्यांहि परीक्षा दिल्यानें सृष्टि चमत्कार पाहण्याची व संशोधनाची दृष्टि आली.

पुढे नाशिक येथे आल्यावर कै. काकासाहेब बुरकुले यांचे मार्गदर्शनाखाली ज्योतिषाचा अभ्यास सुरू केला. त्यांच्याकडून ते सायन ज्योतिष शिकले. तसेच येथील सुप्रसिद्ध ज्योतिषि कै. बाळासाहेब पंचाक्षरी यांचेहि मार्गदर्शन व सहवास लाभला. सायन व निरयन अशा दोन्ही पद्धतींचा त्यांनी अभ्यास सुरू केला, त्यामुळें त्यांची प्रगति फार लौकर होऊ शकली. त्यांनीं अनेक ज्योतिष विषयक पुस्तकांचा संग्रह केला आहे. त्यांना संशोधनाची आवड असल्यानें प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याची त्याची दृष्टि तीच होती-त्या दृष्टीनें त्यांनीं लिहिलेले व शनिग्रहाचे न्यायालयातील अस्तीत्व हे लेख ज्योतिष-समाचार मासिकांतून प्रसिद्ध झाले होते. ते फारच वाचनीय ठरले. त्यांचेकडे इंग्रजीं,मराठी,संस्कृत भाषेतील पुष्कळ ग्रंथसंग्रह आहेत.ते'भालचंद्र' मासिकांतून गेली ३–४ वर्षे वर्षभविष्य लिहीत असतात.


१९६४ मध्यें फलज्योतिष अभ्यास मंडळातर्फे घेतलेल्या निबंधस्पर्धेत त्यांनीं प्रथम क्रमांक पटकविला. सदर निबंध पं. जवाहरलाल नेहरू यांचे कुंडलीसंबंधी असून तो भालचंद्र मासिकांतून प्रसिद्ध झाला आहे. व तो दिल्ली येथें त्रिमूर्ति भवनांत ठेवण्यांत आला आहे. १९६४ मध्यें नाशिक येथें ज्योतिर्विद्या संशोधन मंडळाची स्थापना झाली. त्यांतहि त्यांनीं उत्साहानें भाग घेतला होता.

१९६६ मध्यें त्यांची संस्थेचे कार्यवाहक म्हणून निवड झाली. १९४८ पासुन ते S. T. मध्यें नोकरीला आहेत. सध्यां ते नाशिक येथे सेंट्रल बस स्टेशनचे स्टॅन्ड प्रमुख आहेत. या सर्व व्यापांतून ते १९६१ सालीं 'होराभूषण' ही पदवी परीक्षा प्रथम श्रेणींत उत्तीण झालें. तसेच ते बी. ए. झाले आहेत. १९५१ पासून या शास्त्राचा व्यासंग वाढला असून अनेकांनी त्यांचा लाभ घेतला आहे. त्यांचे वडील वकिलीचा व्यवसाय करत असून दोन्ही बंधू साहित्यक्षेत्रांत बरेच चमकत आहेत. या शास्त्रावर अधिकाधिक अभ्यास करून संशोधनात्मक लिखाण करण्याचा त्यांचा विचार आहे. त्यांनीं वर्तविलेली अनेक भाकितें खरी ठरलीं आहेत. त्यामुळें या शास्त्राची महति वाढण्यास खरोखर मोठा हातभार आहे. ही गोष्ट श्री. अत्रे यांना व संस्थेला भूषणावह आहे, असें म्हटल्यास वावगें ठरणार नाहीं.

श्रीराम भुवन, वकील वाडी
मु. पो. नाशिक

सय्यद कुतुबुद्दीन ऊर्फ एस्. के. पंडित
जन्म– २५–२–१९१९.

यांचा जन्म नारायण महाराज बेट केडगांव येथें झाला. शिक्षण व्ह. फा. पर्यन्त. नंतर कंत्राटीं कामें केली. वयाचे १७–१८ वर्षांपासून ज्योतिषशास्त्राकडे ओढ निर्माण झाली. श्री. महाडकर व तारदाळकरशास्त्री यांचें बहुमोल मार्गदर्शनामुळें शास्त्राचें ज्ञान वाढलें. वयाचे २३ वर्षापासून ज्योतिष व्यवसाय सुरू केला. आतापर्यन्त त्यांचेकडे



बडेबडे सरकारी अधिकारी. काँट्रक्टर्स येऊन गेले व त्यांचे ज्योतिषज्ञानाची प्रचिती त्यांना मिळाली.

त्यांचेकडे येणाऱ्या गरजूंना ते मोठ्या तळमळीनें मिळेल तो मोबदला घेऊन मार्गदर्शन करीत असतात. या शास्त्राचें ज्ञान अधिक मिळावे म्हणून ते आजहि प्रयत्नशील आहेत. तसेच स्वत:चे मुलासहि त्यांनी या शास्त्राचें शिक्षण दिलें असून त्यांत त्याला पारंगत करण्याचा त्यांचा विचार आहे. या शास्त्राचा कितीहि अभ्यास केला तरी तो अपुराच पडेल, असे त्यांचे म्हणणें आहे. त्या दृष्टीनें फलज्योतिष अभ्यास मंडळाचा उपक्रम स्तुत्य आहे.

११/१ शिवाजी नगर,
पुणें ५.

श्री. गजानन श्रीधर गोसावी

बी. एस.सी.
जन्म ३०–६–१९१५

हे मूळचे साताऱ्याचे. यांचे वडील बडोदे संस्थानात नोकरीस होते. यांचे कॉलेजचे शिक्षण बडोदे येथें झाले असून ते B.sc. आहेत. १९४० साली भारताचे संरक्षण खात्यात नोकरी निमित्याने प्रवेश केला. व सर्व भारतभर व ब्रह्मदेशात प्रवास झाला.




सुप्रसिद्ध पाश्चात विद्वान चिरो यांचे पामिस्ट्रीवरील पुस्तक १९४८ साली हाती आले. व हस्तसामुद्रिकाकडे आकर्षित झाले. परंतु त्या ज्ञानाविषयी म्हणावा तसा विश्वास वाटेना. पुढे ज्योतिषाचार्य दीक्षित यांचे महाराष्ट्र मासिकांतील लेख वाचनांत आले व ज्योतिष विषयाची आवड निर्माण होऊन त्यांनी या विषयांवरील सर्व ग्रंथ वाचून व्यासंग वाढविला. ज्याना जन्मतारीख व वेळ माहीत नाही अशांचे बाबतीत पत्रिका तयार करणे कठीण व अशक्य असल्याने हातावरून कुंडली कशी काढावी या दृष्टीने त्यानी ज्योतिष समाचाराचे (ऑक्टो. १९६५) अंकांत माहीतीपूर्ण लेख लिहीला असून त्यावर अधिक संशोधन होणे जरूर आहे असेंही त्यांचे मत आहे. त्यांचे विषय शास्त्रीय दृष्टीकोनातून लिहीलेले असल्याने ते खरोखरच जाणकारांना उपयुक्तच ठरतात.

३३ सोमवार पेठ, काळेवाडा
रविकिरण पुणे २

व्यंकटेश महादेवहरि परळीकर

B. Com

यांचे घराणें मूळ वैदिकाचे. यांचे वडील प्रख्यात वैदिक असून चारी वेद व अठरा पुराणांचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. त्यामुळें परंपरेनुसार त्यांना वडिलांकडून शिक्षण मिळालें व त्यांनी ऋग्वेदाचा अभ्यास केला. त्यांचे शिक्षण बी. कॉम पर्यन्त झाले असून लहाणपणापासूनच त्यांनाज्योतिषशास्त्रा बद्दल ओढ होती. त्यामुळे त्यांनी अनेक कुंडल्या अभ्यासासाठी म्हणून जमविल्या. त्यांचे गांवी ज्योतिषशास्त्र शिकण्याची सोय नव्हती. पुढें ते नोकरींत बदली करून घेऊन पुण्यास आलें.



त्यांनी 'ग्रहनक्षत्र फलादेश संशोधन संस्था' येथें जाऊन तेथे श्री.केळकरयांचे मार्गदर्शनाखाली या शास्त्राचा अभ्यास सर्व प्रपंच्याचा व्याप सांभाळून केला. तसेंच त्यांनी संशोधनात्मक दृष्टीने अंधत्व कां येते यावर विशेष अशा पत्रिकांचा अभ्यास केला. त्याचप्रमाणें परदेशागमन या योगावरहि अभ्यास केला. सध्यां ते ज्योतिषविषयक सर्व कामें करतात. त्यांनी आत्तापर्यंत सुमारे २००० कुंडल्या तयार करून त्यांचे भविष्य वर्तविले आहे. या शास्त्राची त्यांना हौस असल्यामुळें ते सर्व काम विनामूल्य करतात.

– किन्स गार्डन,
पुणें.

पु. ना. ओक

एम्. ए. एल्. एल्. बी.
जन्म—२ मार्च १९१७

मध्यमवर्गीय कुटुंबांत इंदूर येथें यांचा जन्म १९१७ साली झाला. तेथेंच त्यांचे बी. ए. पर्यंत शिक्षण झालें.



पुण्यांत एम्. ए. (इंग्रजी) व एल्. एल्. बी झाले अशा रीतीने वयाच्या २३ व्या वर्षापयत विद्यालयीन शिक्षण संपवून लष्करांत शिरले. ते इ. स. १९४१ ते १९४२ पर्यन्त ब्रिटीशप्रणीत सेनेंत गेले.

जून १९४५ पर्यत ते आझाद हिंद सेनेचे संघटक मंडळाचे सभासद होते. त्यांनीं इ. स. १९४३ जुलै ते १९४५ अखेर नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांचे निकट सहकारी म्हणून अनेक लष्करी, राजकीय व सांस्कृतिक कामगिऱ्या पार पाडल्या. आझाद हिंद सेनेंत लेफ्टनंट, ए. डी. सी., प्रायव्हेट सेक्रेटरी ह्या हुद्यावर होते. त्यांचा सिंगापूर ते कलकत्ता प्रवास झाला.


त्यांनीं "हिंदुस्थानाचे स्वातंत्र्ययुद्ध" व "नेताजींचे सहवासांत" ही दोन लोकप्रिय पुस्तके लिहिली. त्यांनी प्रसिद्ध इंग्रजी दैनिकाचे संपादकीय विभागात काम केलें. नभोवाणी खात्यांत पहिल्या श्रेणीचे गॅझेटेड ऑफिसर होते. विशेषः इतिहाससंशोधन करीत आहेत. हे त्यांचे महत्वाचें कायक्षेत्र आहे. ताजमहाल हा राजपुत राजवाडा होता हे १०० पृष्ठांचे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध केलें आहे. त्यांचा ज्योतिषशास्त्रांचा अभ्यासहि बराच आहे. ते त्या भागांत महान् ज्योतिषि म्हणून प्रसिद्ध आहेत.

नं. १२८ ग्रेटर कैलास
नवी दिल्ली १४.

जगन्नाथ दत्तात्रय कळमणकर.

होराभूषण

यांना लहानपणापासून ज्योतिषशास्त्राची आवड आहे. त्यामुळें या शास्त्रांत पारंगत होण्याच्या तळमळीनें त्यांनीं या शास्त्राचें खूपच अध्ययन केलें आहे आणि अध्ययन व अनुभव यांचा त्यांना फार उपयोग झाला आहे. सध्या ते डी. एस्. पी. ऑफिसांत (सोलापूर) नोकरी करीत आहेत. त्यांनीं प्रश्नकुंडलीवरून अचूक भविष्य वर्तविण्यांत विशेष यश मिळविलें आहे. व त्याबद्दल त्यांना अनेक प्रशस्तिपत्रकेंहि मिळालीं आहेत. त्यांनीं वर्तविलेले नामांकित कुस्तीचें भविष्य तंतोतंत खरे ठरल्यानें पुण्यांचे सुप्रसिद्ध ज्योतिषि वि. धो. जोरेशास्त्री यांचेकडून त्यांचा गौरव झाला.



अनेक सरकारी उच्च श्रेणीतील अधिकाऱ्यांना त्यांच्या ज्ञानाचा अनुभव आला आहे. त्यांनीहि यांना या शास्त्रांतील प्राविण्याबद्दल प्रशस्तिपत्रें दिलीं आहेत. भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे निवडणूकीचें भाकितहि त्यांनीं त्यांना तारेनें आधी कळविलें होते व ते खरे ठरल्याने स्वत: श्रीमती गांधी यांनीं त्यांचे पत्र पाठवून अभिनंदन व गौरवहि केला आहे.


सोलापूरचे प्रमुख "दैनिक संचार" यांतून भविष्य वर्तविण्याचे काम ते करीत असतात. इ. स. १९६३ मध्ये "होराभूषण" ही परीक्षा ते द्वितीय श्रेणींत उत्तीर्ण झाले. या शास्त्रावर जास्तीतजास्त संशोधनात्मक अभ्यास करून प्रबंध लिण्याचाहि त्यांचा मानस असून त्या दृष्टीनें त्यांचें प्रयत्नहि चालू आहेत.

५६५, द. कसबा,
लेले वाडा सोलापूर.
मु. पो. सोलापूर.

मनोहर परांजपे

अस्ट्रॉलॉजर अ‍ॅन्ड पॉमिस्ट

या शास्त्राचा यांचा व्यासंग फार दांडगा आहे. ते सायन व निरयन दोन्हीं पद्धतीनें भविष्य पाहतात, तसेच ते हस्त सामुद्रिकाद्वारें देखील मार्गदर्शन करतात. त्यांना या शास्त्राच्या बरोबरच अध्यात्माची आवड असल्यानें त्या बळावर ते अचूक मार्गदर्शन करतात. तसेच "राम-ज्योतिषालय" नावाचें त्यांचें कार्यालय असून तेथें ज्योतिषविषयक सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. त्यांनीं वर्तविलेली अनेक भाकितें खरी ठरली असून या शास्त्राचा त्यांचा अभ्यास व संशोधन अजूनहि चालू आहे. या भागांत ते फारच प्रसिद्ध आहेत.




बापूराव जोशी वाडा
पो. कुळगांव
बदलापूर (ठाणे) सें. रेल्वे

अविनाश पुरुषोत्तम सातभाई

जन्म– २६ एप्रिल १९४३

यांचे घराणें मूळ भिक्षुकाचें. या शास्त्रावर यांचे घराण्यांत पूर्वीं बराच अभ्यास झाला होता. १९५७ सालापासून त्यांना या शास्त्राचा छंद लागून त्यांनी त्या दृष्टीनें अभ्यास सुरू केला. या शास्त्रांतील मोठमोठ्या विद्वानांचें त्यांना साहाय्य झाले आहे. त्यांचे या शास्त्राचें अध्ययन झाल्यानें त्यांना आता यश व प्रसिद्धीहि मिळू लागली आहे. व आता तर



त्याचे रूपांतर व्यवसायांत झाले आहे. त्यांनीं ७०० ते ८०० लग्नकुंडल्यांचा संग्रह केला असून त्याचे अभ्यासानें त्यांनीं स्वतःचे असे काही ठोकताळे बसविले आहेत व त्याचा अनुभव अनेकांना आला आहे.

या शास्त्रांतील अनेक पुस्तके त्यांनी वाचली असून अजूनही इतरांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करतात. या शास्त्रांत अधिकाधिक संशोधन करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांची या शास्त्रावरील नितांत श्रद्धा व नवे शिकण्याची हौस व धडपड पाहतां ते आपले इच्छीत ध्येय निश्चितपणें साध्य करतील असा भरंवसा वाटतो. परमेश्वर त्यांना यश देवो हीच प्रार्थना !

ज्योतिष अभ्यासमंडळ व संशोधन
मु. पो. ता. राहुरी,
जि. अहमदनगर.

चंद्रभान यशवंत उरूडे

होराभूषण
जन्म– १२–१२–१९२३

हे पूर्वाश्रमीचें प्रा. शिक्षक सध्या छत्रपति श्री. शिवाजी महाराज हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून आहेत. यांना श्री. रघुनाथ हरि तथा दादासाहेब आफळे यांचें मार्गदर्शन मिळालें, व त्यांच्याकडूनच ज्योतिष शास्त्राची प्रेरणा मिळाली. या शास्त्राला योग्य ती प्रतिष्ठा मिळावी व त्याचे महत्त्व वाढावें या दृष्टीनें त्यांनीं विशेष अशा सुशिक्षित लोकांच्या पत्रिका जमवून त्यांचा अभ्यास सुरू ठेवला. बहुजन समाजांतील नेम ग्रमें वेळच्यावेळीं व्हावेत या हेतूनें ते प्रयत्न करतात. तसेच ज्योतिषविषयक सर्व कामें करतात.



त्यांना सामाजिक कार्यांची भारी हौस असून गांवातील शिक्षणमंडळें, शिक्षणसंस्था, धार्मिक ट्रस्ट बोर्डिंग व सोसायटया यांचें कार्यांत ते मोठ्या हिरिरीनें भाग घेतात. ते या शास्त्रांतून वेगवेगळ्या पदांवर राहून काम करीत आहेत. ज्योतिषशास्त्रांतील "होराभूषण" ही पदवी त्यांनीं मिळविली आहे. तसेंच या शास्त्राचा व्यासंग ते वाढवीत आहेत व त्यादृष्टीने त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

श्री. रघुनाथ ज्योतिष
मु. पो. मिरी, ता. पाथर्डी
जि. अहमदनगर.

भानुमति श्रीधर ठाकूर

होराभूषण बी. ए.

यांना लहापणापासून या शास्त्राबद्दल आस्था व उत्सुकता व त्यापोटीं निर्माण होणाऱ्या इच्छेमुळें त्यांनीं १९५८ पासून ज्योतिषशास्त्राचे अभ्यासाला सुरुवात केली. यांचें घराणें सुविध आहे. त्यांनीं मोठ्या जिद्दीनें व कष्टानें या शास्त्राचा अभ्यास करून ज्योतिष महाविद्यालयाची 'होराभूपण' ही पदवी मिळवली. तसेंच १९६२ मध्यें ज्योतिर्विद्या मंडळ मुंबई या संस्थेचा हस्तसामुद्रिकाचा अभ्यासक्रम पूर्ण करून 'ज्योतिषभूषण' झाल्या. फलज्योतिष अभ्यास मंडळातर्फे १९६१ मध्यें झालेल्या निबंधस्पर्धेत त्यांनी मोठ्या उत्साहानें भाग घेतला होता. व त्यात त्यांच्या "व्ययस्थानांतील पापग्रहाचे परिणाम" या निबंधास ३ रे बक्षीस मिळालें. तर १९६४ मध्यें घेण्यांत आलेल्या निबंधस्पर्धेत "कुंडली वरून धंदा कसा ठरवावा व धंद्याची निश्चिति" या निबंधास २रे बक्षीस मिळालें. ही गोष्ट त्यांना व संस्थेस खरोखरच कौतुकास्पद आहे.



त्यांना सामाजिक कार्यांची आवड असून त्या सन्मित्र साप्ताहिकाच्या दिवाळी अंकांत भविष्यलेखन करतात. तसेंच त्यांचेकडे येणाऱ्या इच्छुकांना योग्य मार्गदर्शन करून सल्लाहि देतात. व त्याचा अनेकांना उपयोग होऊन

अनुभवहि आला असल्याने त्या फारच लोकप्रिय झाल्या आहेत. या शास्त्रावरील त्यांचे वाचन व मनन सतत सुरू असते. त्यांचें शिक्षण बी. ए. पर्यंत झालें असून चित्रकला व भरतकामाची पण त्यांना आवड आहे. सध्यां त्या शाळेंत चित्रकला शिक्षिका म्हणून काम करतात. या शास्त्रावर अजूनहि अभ्यास करून व्यासंग वाढविण्याचा त्यांचा विचार व प्रयत्न सुरू आहे. या भागातील महिला मंडळांतून त्यांची या विषयावर मार्गदर्शनपर अशी व्याख्यानें अधूनमधून होत असतात.

अरुण–दर्शन,
कोपरी रस्ता,
–नौपाडा–ठाणें.

ज्योतिषि विश्वासराव के. रेळे

जन्म २१ जून १९०३.

यांचें घराणें पिढीजात श्रीमंत. यांचे वाडवडील शास्त्रांचे अभ्यासू व भोक्तें होतें. त्याचप्रमाणें या



शास्त्राचें आश्रयदाते होतें. यांचे शिक्षणाच्या बाबतींत एका राज ज्योतिषानें वर्तविलेले भविष्य खोटें ठरल्यानें ते कां खोटे ठरले याचें कारण शोधण्याचे दृष्टीनें त्यांना या शास्त्राबद्दल उत्सुकता निर्माण होऊन त्याचा अभ्यास सुरूं केला. हस्तसामुद्रिकाचा त्यांना विशेष छंद. त्यांनीं या शास्त्राचा संशोधनात्मक अभ्यास बराच केला. गेल्या ४४ वर्षांत त्यांनीं सुमारें ३० हजार पत्रिकांचें निरीक्षण केले आहे. तसेच अनेक आडाखें व सिद्धांत बसविले आहेत.

त्यांच्या ज्ञानाचा अनेकांनीं फायदा करून घेतला आहे. त्यांनीं फ्रेंच भाषेचें उच्च शिक्षण घेतले आहे. व त्याचबरोबर ज्योतिषशास्त्राचे परिपूर्णतेसाठीं संस्कृत भाषेचा गाढ अभ्यास केला आहे. त्यांचीं वृत्ती मूळची धार्मिक, त्यामुळे त्यांनीं मंत्रमंत्र विद्येचाहि आस्थेनें अभ्यास केला. ते रोज सप्तशतीचा पाठ करतात. 'क्षत्रिय संजिवनी' या मासिकांत ते बरीच वर्षे भविष्यलेखन करीत आले आहेत. तसेच "शृंगार" साप्ताहिकांत साप्ताहिक राशीभविष्य देत असतात. गेले चार वर्षांपासून त्यांनीं या शास्त्राचा प्रगत संशोधत्मक अभ्यास चालविला असून गरजूंना योग्य सल्ला देत असतात. व्यवसायाचें निमित्तानें व या शास्त्राचे छंदामुळें त्यांचा संपूर्ण भारतांत व परदेशी–इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड, स्वित्झर्लंड, इटली, जर्मनी, कोलंबो, सिंगापूर, हाँगकाँग व जपान या देशांतून प्रवास झाला आहे. त्यामुळें त्यांना अनेक प्रकारचे अनुभव मिळून त्यांचें ज्ञानांत मोलाची भर पडली आहे. त्यांनीं त्यांचे वडिलांप्रमाणें शिक्षणफंड स्थापन केला असून त्यांचे ज्ञातीमधील होतकरू मुलांच्या शिक्षणाची सोय केली आहे. अशा प्रकारें ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनाची पायाशुद्ध सोय करण्याचाहि त्यांचा मानस आहे. त्यांनीं या शास्त्रांत प्राविण्यें संपादलीं असून हजारों प्रशस्तिपत्रेंहि मिळविली आहेत.


कृष्ण–कुंज
राहावजी रोड,–गवालिया टँक
मुंबई–२६.

राधाकृष्ण दामोदर प्रभु

सामुद्रिक तज्ज्ञ

जन्म– १९ ऑगस्ट १९१५.

गोमंतकांत यांनी १७ वर्षे शिक्षकाची नोकरी केली.



बौद्धिक व्यवसाय त्यामुळें साहित्याची आवड. काव्यगायन हा त्यांचा विशेष आवडीचा व्यवसाय आहे. ग्रहगणित आणि सामुद्रिक यांच्या आधारें निश्चित स्वरूपाची पत्रिका तयार करून त्या आधारें फलादेश काढून देतात. ज्योतिषविषयाचें प्राथमिक शिक्षण त्यांनीं कै. श्री. घन:श्याम जोशी (माजाळी–कारवार) यांचेकडे घेतले. नंतर कै. बाबल हरि खोत (मालवण) यांचेकडे घेतले.

त्यानंतर त्यांनीं स्वतःच अभ्यासपूर्वक व्यासंग वाढविला. त्यांनी आतापर्यंत बऱ्याच पत्रिका पाहिल्या असून त्यांचे मार्गदर्शन लोकांना उपयुक्त ठरले आहे. मात्र ज्योतिषविषयक कोणतेंहि काम तें पत्रद्वारे करीत नाहींत. या विषयांतील त्यांचा व्यासंग पाहिल्यावर ते यांत अधिक यश मिळवतील अशी खात्री वाटते.

मु. पो. माप– चिपळूण
जि. रत्नागिरी

प्रभाकर यशवंत काकडे

–होराभूषण–

जन्म–२२–८–१९२८

हे मूळचे साताऱ्याचे. यांना अजूनहि आई–वडिलांचें कृपाछत्र आहे. यांचे स्वतःचे घर व जमीन आहे. तसेच यांचे वडिलांना ज्योतिषाचा नाद असल्यानें त्यांना वडिलांचे साहाय्य व मार्गदर्शनाचा लाभ झाला. या शास्त्राचा अजूनहि ते अभ्यास करीत असून तेथील परिसरांतील लोकांना या शास्त्राधारें योग्य ते मार्गदर्शन करून सल्लाहि देत असतात. या शास्त्राचें जास्तीतजास्त संशोधन करण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे. त्यांनी या शास्त्रांतील "होराभूषण" ही परीक्षा दिली आहे. यांचे शालेय शिक्षण S. S. C. पास, ड्रॉइंग व हिंदीच्या परीक्षाहि त्यांनी दिल्या आहेत. त्यांनीं वालचंदनगर येथे या शास्त्राचा अभ्यास व संशोधन केलें.



ज्योतिषशास्त्राचे महत्त्व वाढावें म्हणून त्यांचे सहकारी श्री. अलाटे व श्री. पटवर्धन यांचे सहकार्यानें त्यांनीं "फलज्योतिष अभ्यास मंडळाची" स्थापना केली असून या संस्थेतर्फे गेलया वर्षीं ४ विद्यार्थी बसले होते. मंडळातर्फे प्रश्नजातकाद्वारे कार्य सुरू आहे. त्यांनी नानाप्रकारच्या व निरनिराळ्या क्षेत्रांत कुंडल्या अभ्यासल्या आहेत. त्यांना या शास्त्रांत भरपूर यश मिळून यां शास्त्राचे महत्त्व वाढो ही एकमेव सदिच्छा! अशा कार्याला श्रीगजाननाचें साह्य व पाठिंबा मिळो ही प्रार्थना.

व्ही. ९ खो. नं. ३.
वालचंदनगर (जि. पुणे.)

श्री. ह. भ. प. डॉ. शंकरराव गोपाळ पुरंदरे

जन्म –२८–६–१९१५

यांचा जन्म आगाशी या गांवीं झाला. त्यांनीं नुकतेच ५१ वे वर्षांत पदार्पण केलें आहे. यांचें घराणें खानदानी व सुप्रसिद्ध आहे. यांचे आजोबा नामांकित वैद्य व ज्योतिषि. पुढें ह्यांचे वडिलांनीं तोच व्यवसाय केला. त्यांचीच परंपरा व अनुभव घेऊन तेहि या शास्त्राकडे वळले. इंग्रजी शिक्षणानंतर त्यांनीं वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. तसेंच वडिलोपार्जित भिक्षुकी सांभाळून कोळी समाजाचे पौरोहित्यहि ते आजपर्यंत यशस्वी करीत आहेत.



१९३९ सालीं त्यांनीं हस्तसामुद्रिक व फलज्योतिषाचा अभ्यास केला आहे. या अभ्यासासाठी "भविष्य चिंतामणी" या ग्रंथाचें त्यांना फार साहाय्य झाल्याचे ते म्हणतात. यांचे ज्ञानाबद्दल ठाण्याचे सुप्रसिद्ध ज्योतिषि श्री. बाबा पंडित यांनीहि प्रशंसा केली आहे. गरीब व अडचणींत असलेल्या गरजू लोकांना अत्यल्प मोबदल्यांत या शास्त्राचे मागदर्शन करण्याचा प्रमुख उद्देश त्यांनीं डोळ्यापुढें ठेवला आहे. तसेंच यांचे घराण्यांत परंपरागत अशी एक दैवी देणगी त्यांना लाभली आहे व ती म्हणजे सर्प व विंचूदंशावर मंत्रोपचार. तसेच काविळीवरहि ते मंत्रोपचाराचे साहाय्याने इलाज करतात.

त्यांनी आजपर्यंत अनेकांना व्याधिमुक्त केले आहे. तसेंच ते सणाचें दिवशी कीतनहि करतात. याची प्रेरणा त्यांना श्रीमान् बाळासाहेब औंधकर यांचेकडून मिळाल्याचें ते नेहमी सांगतात. औंधकरांना ते गुरुस्थानीं मानतात. त्यांना आपल्या व्यवसायांत यश वाढो व कीर्ति मिळो ही सदिच्छा.

पुरंदरे लेन, आगाशी.
स्टेट विहार, इंग्रजी शाळेजवळ
जि. ठाणें.

श्री. एन्. आर. साळवी

जन्म– ८–७–१९२६



हे विद्यार्थिदशेंत असतांना त्यांचा "ते स्वतः पुढें ज्योतिषि होतील" यावर मुळीच विश्वास नव्हता. पण त्यांच्या आयुष्यांत वयाचे २२ चे सुमारास एक अशी अनपेक्षीत घटना घडल्यानें त्यांच्या जीवनास एक वेगळी कलाटणी मिळाली. त्या वेळीं ते आपल्या मित्राबरोबर मोटरसायकलवरून मुंबई–पुणें रस्त्यानें फिरावयास म्हणून निघाले होते. नवी गाडी असल्यानें ती जोराने चालविण्यांत मजा वाटत होती. परंतु वाटेत चौकनजीक नागमोडी वळणाचा रस्ता असल्याने व गाडी जोरांत असल्यानें ती रस्ता सोडून बाजूला गेली व एका प्रचंड उभ्या शिळेवर आदळली व त्यांना जबर दुखापत झाली. त्यांचा डावा पाय मांडीत मोडला व डोके रक्तबंबाळ झालें. त्यामुळें मुंबईस के. ई. एम्. हॉस्पिटलांत ६ महिने खितपत पडावे लागले.

या सहा महिन्यांचें काळांत त्यांच्यांतील 'ज्योतिषा'ची प्रतिभा जागृत झाली. तेव्हांपासून त्यांनी वेगवेगळया ग्रंथांचे वाचन व अभ्यास केला. आज ते कोणत्याहि कुंडलीवर शास्त्रशुद्ध बोलूं शकतात. तसेच या शास्त्रांतील विद्वानांबरोबरच चर्चा, वादविवाद करण्याची त्यांची तयारी असते. गेलीं १२ वर्षे स्वतंत्रपणें ते ज्योतिषाचा व्यवसाय करीत आहेत.

जन्मजात असलेल्या प्रतिभेचा योग्य काळीं उपयोग झाल्याशिवाय राहात नाहीं, असें त्यांचें मत आहे. "poets are born and made" असं कवीबद्दल म्हणतात. मग ज्योतिषाबद्दल अथवा इतर कोणाहि कलावंताबद्दल कां म्हणूं नये असे ते नेहमी प्रतिपादीत असतात.

टिळक रोड,
मु. पो. पनवेल (कुलाबा)
जि. कुलाबा

पं. रामकृष्ण नारायण केळकर

डी. एफ्. अॅस्ट्रॉल एस् (लंडन)



कोरेगांव (पेडणे) येथें यांचे 'केळकर' घराणें फार जुनें असून घराण्यांतील बाबजीपंत दादा केळकर हे कागवाड संस्थानांत महिपालगड नांवाचे किल्ल्यावर सरसुभेदार होते. ते फारच प्रसिद्ध होतें. अशा या इतिहासप्रसिद्ध व वैदिक परंपरेच्या घराण्यांत यांचा जन्म २३ मार्च १९०८ रोजीं झाला. बालपणीं 'वेदांग चतुष्टच,' ऋग्वेद संहितेचा कांहीं भाग, ज्योतिष, याज्ञिक व संस्कृतचें अध्ययन, हे शिक्षण पूर्वपरंपरेनुसार घरीच घेतलें. नंतर ते मॅट्रिकपर्यंत इंग्रजी शिकले. नंतर त्यांनीं शिक्षण संस्थेतून पत्रद्वारें इंग्रजी व व संस्कृतचे शिक्षण घेतले. कॉरेस्पॉन्डन्स् कॉलेज ऑफ केंब्रिज या सस्थेचा कोर्सहि त्यांनी पूर्ण केला आहे. त्याशिवाय त्यांनी इंग्लंडच्या रिजंट इन्स्टिटयूटचा वाङमयीन कोर्स पूर्ण केला आहे.

इस्लामपूरचे कै. पंडित वासुदेवराव मुंडळे यांच्याकडे ते ज्योतिष शिकले. नंतर त्यांनी फॅकल्टी ऑफ अॅस्ट्रॉलॉजिकल स्टडीज (लंडन) या संस्थेचा अभ्यासक्रम पूर्ण केला व त्या संस्थेची डी. एफ्. अॅस्ट्रॉल एस्. (लंडन) ही सन्माननीय पदवी व डिप्लोमा मिळविला तसेच त्या संस्थेचे ते सभासदहि आहेत.

ज्योतिषाशिवाय त्यांना इतिहाससंशोधनाची आवड आहे. त्यासाठीं त्यांनीं जुनीं ऐतिहासिक कागदपत्रें जमा केली आहेत. तसेच इतिहासावर बरेच लेख लिहिले आहेत.


सध्यां ते 'प्रेरणा' नांवाचे साप्ताहिक चालवितात. अनेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा निकटचा संबंध आहे. मांद्रे येथील सरकारी शाळा बांधण्यांत त्यांचाच पुढाकार होता. 'श्रीराम मोफत वाचनालय', 'द्रविड ब्राह्म समाज', 'ग्राम सुधारणा मंडळ' (आसगांव), 'श्री समर्थ विद्यालय' (पार्से) या संस्था काढण्यांत तेच प्रमुख आहेत. सध्यां ते आंसगांवीं (बार्देश) राहात असून

ज्योतिषाचा व्यवसाय व फावल्या वेळांत वृत्तपत्रांतून लिखाण करीत असतात.

डी. एफ्. अॅस्ट्रॉल एस् (लंडन)
मु. पो. माद्रे गोवा
आंसगांव (गोवा)

श्री. गोपाळकृष्ण विश्वनाथ कुलकर्णी

जन्म २०–१०–१९२४



या विषयाचा अभ्यास त्यांनीं श्री. सखाराम महाजन संस्थात लोणी या पवित्र व शांत ठिकाणी केला. त्यांची बुद्धिमत्ता लहानपणापासून च प्रखर, ज्योतिष-शास्त्राची आवड व वेदाध्ययनाची जिज्ञासा दांडगी. त्यामुळें त्यांची या विषयांत हळूहळू प्रगति होत गेली. साधुसंतांच्या कृपेने ते आज या भागांत फारच लोकप्रिय झाले आहेत. फलज्योतिष व गणित हे त्यांचें अभ्यासाचे विषय होते. त्यांनीं वर्तविलेली अनेक भविष्यें अगदी तंतोतंत खरी ठरली. विशेषत: त्याचा अनुभव टाटा कंपनीतील एक अधिकारी तसेंच एक डॉक्टर यांना विशेषकरून आला.

सध्यां ते बुलढाणा जि. सें. को. ऑ. बँकेच्या शेगांव शाखेंत सीनियर एजंट असून कोणतीहि अपेक्षा न बाळगतां या विषयाच्या ज्ञानाचा लाभ इतरांना करून देत आहेत. या विषयांत यश लाभण्यासाठी एखाद्या उपासनेची जोड असावी लागते असे त्यांचे मत आहे. स्पष्टवक्तेपणा, शुद्ध आचरण व परमेश्वरावरील दृढ श्रद्धा या तिन्हीं गोष्टींचा सुरेख संगम त्यांचें ठायीं दिसून येतो. त्यामुळें ते या शास्त्रांत अधिकाधिक यश मिळवून या विषयाला महत्पदीं नेतील असे वाटतें.

एजंट को. ऑपरेटिव्ह
सेंट्रल बँक लि.
मु. पो. शेगांव

डॉ. रमेशशास्त्री र. कर्णिक

होराभूषण



यांचे शिक्षण एम्. एस्सी. (ब्लॉचेम अँड होमिओ) असून त्यांना या शास्त्राची आवड लहानपणापासून होती. त्यांचा व्यवसाय डॉक्टरीचा असला तरी फलज्योतिषावरून रोगाचे निदान करणें सोपे जाते हे त्यांना माहीत होते, व पटलेहि. त्यांनीं वयाचे १३ वे वर्षापासून या शास्त्राचा अभ्यास सुरू केला. सध्यां ते सायन हॉस्पिटलमध्यें सुपरिटेन्डन्ट ऑफ फार्मसी या जागेवर काम करतात. त्यांनीं अनेक ज्योतिर्विद्यांपैकीं ज्योतिषाचार्य पुरंदरे, रामचंद्रशास्त्री जोशी, सोमणशास्त्री, पटवर्धन, य. के. प्रधान यांची अनेक पुस्तकें, ग्रंथ यांचे अध्ययन केले आहे. त्यांनीं या शास्त्रांत अनेक पदव्या मिळविल्या आहेत. त्यांतील प्रामुख्याने होरारत्न (मुंबई), होराभूषण (सुवर्ण पदक) पुणें. तसेंच सध्यां ते फलज्योतिष अभ्यासमंडळाच्या ज्यो.विशारद या पदवी परीक्षेचा अभ्यास करीत आहेत.

कुंडलीवरून रोगांचे विशिष्ट निदान कसें करावें या हेतूने त्यांनीं आत्तापर्यंत हजारो पत्रिकांचा अभ्यास व निरीक्षण केले आहे. त्यावरून त्यांनी स्वत:चे असें ठोकताळे बसविले आहेत. त्यांच्याजवळ अशा सुमारे १००० कुंडल्यांचा संग्रह आहे. १९६० सालीं वर्षा ज्योतिष संशोधनकेंद्राची त्यांनीं स्थापना केली. तसेंच आरोग्य ज्योतिष विषयावर ते अभ्यासनीयदृष्टया असा एक मौलनिक ग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या विचारांत आहेत. ते मनानें मोकळे व उदारमतवादी असून त्यांचेकडे येणाऱ्या प्रत्येकाची शंका निवारण करून त्यांना मार्गदर्शन करतात. अनेकांना त्यांचा पडताळा आलेला आहे.

वर्षा ज्योतिष संशोधक, माहिमकर
३९, सदाशिव क्रॉस लेन,
महेंद्र बिल्डिंग, दुसरा मजला
गिरगांव मुंबई ४.

म. म. ज्योतिषाचार्य रामचंद्रराव सर्वदे

जन्म—२५ आक्टोबर १८८५



यांचे मूळ जन्मगांव धारवाड जिल्हयांतील बंकापूर. यांची घरची गरीबी होती. लहानपणीं त्यांनीं अनेक कष्ट सोसून, नोकरी करून शिक्षण केलें. १९०२ चे सप्टेंबरमध्यें ते मुलकी परीक्षा पास झाले. पुढे इंग्रजी फायनल झाले. व ड्रॉइंगकडे ग्रेड पास झाले. १९०८ पासून कोणाचीहि मदत न घेता, त्यांनीं घरीच ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला. पुढें त्यांना कांही काळ सरकारी नोकरीचा चान्स आला. पण तो न घेता त्यांनीं स्टेशनरी दुकान घेतले व त्यांत त्यांना बराच लाभ झाला. त्यांनीं जातक तत्त्व, जातक शिरोमणि, जातक परिजात, सर्वार्थ चिंतामणी यांचे वाचन केलें आहे. त्यांनी सुप्रसिद्ध विद्वान् ज्योतिर्विद कै. नवाथे व घाटे यांना त्यांचे गांवीं हुबळीस बोलावून घेतले होते व त्यांचा यथोचित सन्मान केला.

पुढे हे स्वतंत्र होऊन उद्योगधंद्यासाठी हैद्राबादेस गेले. तसेच प्रसिद्ध जैन मुनी १०८ श्री जयसागरजी यांच्या हस्ते त्यांना ज्योतिषाचार्य महामहोपाध्याय ही पदवी मिळाली. ज्योतिषशास्त्रांत यांना चांगली गति मिळाली. त्यांनीं वर्तविलेली अनेक भाकितें अगदी तंतोतंत खरी ठरली आहेत. कांहीं तर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली आहेत. कोल्हापूरचे बालछत्रपति, डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या बद्दल वर्तविलेली भाकिते अगदी खरी ठरली. पुढे वयाचे ५० वे वर्षी त्यांचा कोल्हापुरांत जाहीर वाढदिवस साजरा करण्यांत आला. ते या शास्त्रावर अगदी अधिकारवाणीने बोलतात. या भागांत ते फारच लोकप्रिय असून हजारोंनीं त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेतला आहे. आज ते वयाचे ७० चे पुढे असले तरी अजूनही त्यांचा उत्साह कायम आहे. व बुद्धी तरतरीत आहे. परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो हीच सदिच्छा !

सरवदे ऑफ हैद्राबाद
मु. पो. हुबळी

श्री. सुरेशचंद्र गजानन देशपांडे.

ज्योतिष विशारद.

यांचे घराणें मूळ सुस्थितींतील. लहानपणीं वयाचें ८ वे वर्षीच पोलीओचा अटॅक आल्यानें डावा हातपाय



अधू बनले. त्यामुळें त्यांना फारच मानसिक त्रास झाला. अर्थात् घरची स्थिति चांगली व आई–वडिलांचे प्रोत्साहन याचे बळावर त्यांनीं आपलें प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. तसेच हे अपंगत्व कां आले असा विचार मनांत येऊन भविष्याबद्दल जिज्ञासा निर्माण झाली. व त्यामुळें या विषयाचा अभ्यास करण्यांचे त्यांनीं ठरविल. व त्यांनीं ह्या दृष्टीनें मुंबई येथील ज्योतिर्विद्या मंडळाच्या वर्गात जाऊन त्याचा अभ्यासक्रम पूर्ण केला. व ज्योतिष भूषण व सामुद्रीय भूषण या पदव्या मिळविल्या. तसेंच पुणे येथील ज्योतिष महाविद्यालयाची होराभूषण व ग्रहनक्षत्र फलादेश संशोधन मंडळाची ज्योतिष विशारद व प्राज्ञ परीक्षाही ते उत्तीर्ण झालें.

पुढें त्यांनीं ज्योतिष हेच आपल्या उपजीविकेचे साधन बनविलें. त्या दृष्टीनें ते 'झुंजार' या सायंदैनिकांत साप्ताहिक राशिभविष्य लिहीत. हे सदर फारच लोकप्रिय झालें होते. त्यांच्या शारीरिक अवस्थेमुळें त्यांना अनेक बंधनें पाळणें भाग पडते. या शास्त्रांतील अधिकारी व्यक्तींचा परिचय करून घेऊन त्यांचेकडून कांहीं नवीन शिकण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे. या शास्त्राधारें ते गरजूंना मार्गदर्शन करतात. या शास्त्राचे वर्ग सुरू करण्याची त्यांची मनीषा आहे. तसेच या शास्त्रावर लिखाण करण्याचाहि त्यांचा मानस आहे. तसेच या

शास्त्रावर संशोधनाचे दृष्टीनें एखादे अभ्यास मंडळ स्थापन करावे व या शास्त्राचे महत्त्व वाढून जनतेंत या शास्त्राबद्दल प्रेम व गोडी निर्माण करावी अशी उमेद ते बाळगून आहेत. परमेश्वर त्यांना संपूर्ण साहाय्य करो हीच सदिच्छा !

सी. के. पी. बँक बिल्डिग
तुलसी पाईप रोड, दादर
–मुंबई नं. २८.

श्री. क. वि. सवाई

ज्योतिषरत्न

यांचा जन्म इंदूर येथे झाला. शिल्पकलेचा डिप्लोमा घेऊन त्यांनीं १९६० पासून सरकारी नोकरींत प्रवेश केला. सध्यां ते धार जिल्हयामध्यें बदनावर तेहसीलमध्यें वृतसंयोजक म्हणून काम करीत आहेत. त्यांना या विषयाचा १९६० पासून व्यासंग असून हस्तसामुद्रिकांत बरेच यश संपादिले आहे.



त्यांनीं १९६१ मध्यें "ज्योतिषरत्न" ही पदवी मिळविलीं. नंतर त्यांनीं शाजापूर येथे 'टिळक ज्योतिष कार्यालय' स्थापन करून तेथील महाराष्ट्रीयनांची व इतरजनांचीं विनामोबदला सेवा केली. हे काम त्यांनीं १९६५ पर्यंत चालविलें. व त्या काळांत त्यांनीं अनेक कुंडल्या पाहिल्या व अनेक प्रशंसापत्रें मिळवलीं. त्यांचे या विषयावर अनेक लेख प्रसिद्ध झालें आहेत. सन १९६३ मध्यें त्यांनी 'होराभूषण' पदवी परीक्षेचा अभ्यास केला आहे. संख्याशास्त्र, फुलशास्त्र व हस्तरेषा यांचा अभ्यास व व्यासंग दांडगा असून त्यांनीं त्यांत पुष्कळच यश मिळविलें. अजूनहि या विषयाचे ज्ञान मिळविण्याची त्यांची मनीषा असून, त्या दृष्टीनें ते प्रयत्नशील आहेत.

४ भीमगीर गल्ली, (आलापुरा)
इंदूर २ (म. प्रदेश)

श्री. बळवंत विठ्ठल देवधर (दीक्षित)

जन्म– २७।११।१९२२

पुण्यांतील प्रसिद्ध ज्योतिषि होराभूषण ग. प्र. दीक्षित हे यांचे चुलते. त्यांनीच ह्यांचे शिक्षण केले. त्यांचेकडेच यांना या शास्त्राची गोडी निर्माण झाली. त्यांचे मार्गदर्शनाखालीं या शास्त्राचा अभ्यास केला. तसेच अनेक प्रसिद्ध ज्योतिषांचा त्यांनीं प्रत्यक्ष फी देऊन अनुभव घेतला. तसेच कांहीं विद्वानांचा त्यांना सहवास लाभला. त्यामुळें ज्ञानांत नवी भर पडू शकली. त्यांनीं अनेक गांवीं प्रवास करून या शास्त्रामधील तज्ज्ञांच्या गांठीभेटी व अनुभव घेतला आहे.



त्यांनीं या विषयांतील कोणतीहि परीक्षा जरी दिलेली नसली तरी त्यांचे वाचन व अनुभव भरपूर आहेत. नुसती पदवी मिळवूनच ज्ञान मिळते व मनुष्य ज्ञानी होतो असे नाहीं, असे ते म्हणतात. अनुभव हीच परीक्षा असे त्यांचे मत आहे. त्या दृष्टीनें ते एक चिकीत्सक या दृष्टिकोनांतून या शास्त्राकडे पाहतात. यांची नोकरी कष्टाची, दगदगीची त्यामुळें अभ्यासास फारसा वेळ व स्वस्थता लाभू शकत नाही. या शास्त्रांतील ज्योतिषांनीं आपले म्हणणें, मत स्पष्ट बोलावे असेहि ते नेहमीं प्रतिपादन करतात.

गावडेवाडी–पश्चिम
रामरतन त्रिवेदी रोड
मुलुंड, मुंबई ८०

श्री. प्रभाकर म. जोशी

ज्योतिर्विद

यांनीं माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यावर थोडाफार वेदाभ्यास केला. त्यानंतर सांगली संस्थानाधिपतींचे आश्रयाखालीं ज्योतिषशास्त्र विद्यालयांत ज्योतिष शा. सं. श्री. केशव विठ्ठलशास्त्री जोशी अष्टेकर यांचेकडे ज्योति-

याचें शिक्षण घेतलें. तसेंच अनेक ग्रंथांचा तेथें अभ्यास केला. नंतर ज्यो. शा. सं. गुरुवर्य कृष्णाचार्य बाळाचार्य अष्टपुत्रे यांचेजवळ कांहीं ज्योतिष शिक्षण घेतलें. पुढें वडिलांच्या अकस्मिक निधनामुळें जास्त शिक्षण घेण्याची इच्छा असूनहि ते घेता आलें नाहीं. तरीहि खचून न जाता मोठ्या उमेदीनें ते या शास्त्राचा त्यांचे खेडेगांवीं उपयोग करीत आहेत. अनेकांना त्याची प्रचीति आली असून या शास्त्राचा प्रसार होण्यास मदत होत आहे.

मु. कोनशी, पो. असणिये
ता. सावंतवाडी
जि. रत्नागिरी.

श्री. विनायक पुरुषोत्तम कलंत्री

जन्म ३०–१–१९३०

लोणंद शेजारी भादें येथें यांचा जन्म झाला. लहानपण मात्र बारामतीत गेलें, शिक्षण मॅट्रिक उत्तीर्ण. घरच्या अडचणीचे परिस्थितीमुळें पुढें जास्त शिक्षण घेता आलें नाहीं. उलट ते ज्योतिषविषयाकडे ओढले गेले. त्यांनी पं. रघुनाथ शास्त्री पटवर्धन यांचे पुस्तकावरून या विषयाचा अभ्यास केला.



सुमारे १५वर्षें त्यांनीं या शास्त्राचे अध्ययन केलें. केवळ अभ्यासाचे दृष्टिकोनांतून त्यांनीं स्वतःचे ज्योतिष पाहण्यासाठीं बराच पैसा खर्च केला. त्यांचा विशेष अभ्यास म्हणजे प्रश्न-कुंडली पाहणें. 'ग्रहांची शांति केल्यास ते अनुकूल होतात.' यावर त्यांचा प्रथम विश्वास नव्हता पण पुढें त्यांनी स्वतः त्याचा अनुभव घेतला.

त्यांनीं या शास्त्रावरील सुमारें ५० पुस्तकें वाचली आहेत. 'घरचा ज्योतिषी' टोकेकर या पुस्तकाचा त्यांना विशेष उपयोग झाला. ज्योतिषशास्त्राचे मार्गदर्शनामुळें आत्महत्तेच्या विचारापासून ते स्वतः परावृत्त झालें, हे या शास्त्राचे उपकारच आहेत असे ते म्हणतात.

सध्यां घरची थोडी शेती सांभाळून ते ज्योतिषाचा व्यवसाय करतात. ज्योतिषशास्त्राचा विशेषतः प्रश्नकुंडलीचा अभ्यास वाढावा व त्यांत अधिक संशोधन व्हावें असे त्यांचें मत आहे.

बारामती
जि. पुणें

श्री. विश्वनाथ केशव फडके

B. A.

श्री. फडके यांचा जन्म १०–९–१९३२ सालीं भुसावळ येथें झाला. त्यांचे बी. ए. पर्यंत शिक्षण झालें असून सरकारी नोकरी करीत आहेत. श्री. फडके यांना साहित्याची, त्याच बरोबर ज्योतिष शास्त्राची आवड आहे. ज्योतिषशास्त्राला साहित्याची जोड असणें अत्यंत आवश्यक आहे व ती कला त्यांच्यांत आहे.



आजपर्यंत त्यांनीं सोळा पुस्तकें प्रकाशित केली असून कांहीं प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. त्यांना अध्यात्मक विषय आणि वाङ्मय या लेखनाची अत्यंत आवड आहे. अध्यात्मावर त्यांनी लेख लिहिले आहेत.

ज्योतिषशास्त्राच्या पदवी परीक्षेचा ते अभ्यास करीत आहेत. विविध कुंडल्यांचा व ज्योतिषविषयक ग्रंथाचा संग्रह करणें, तसेंच निरनिराळ्या विषयांवर लेखन करणें हें त्यांचे दोन अत्यंत आवडते छंद आहेत.

३३३ नारायण पेठ
'विश्वास'
पुणें २.

श्री लक्ष्मण नारायण बनसोडे

जन्म ता.– १८–९–१९३२

यांचा जन्म पुसद (यवतमाळ) येथें झाला. लहानपण पुसद येथेंच गेलें. वयाचें १६ वर्षांपर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सत्याग्रहांत भाग घेतल्यामुळें शालेय शिक्षणांत खंड पडला. शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें.



पुढें त्यांची अनेक विद्वान लोकांची व ज्ञानी पुरुषांची योगायोगानें ओळख झाली. त्यापैकींच एक सद्पुरूष म्हणजे श्री. गुरुनाथ रामलिंग स्वामी हे होत. त्यांचेपाशीं त्यांनीं रमल ज्योतिष आणि हस्तसामुद्रिकाचे जवळजवळ १० वर्ष शिक्षण घेतलें. वयाचे २१ पासून ते ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. त्यामुळें त्यांना या शास्त्राच्या सत्यतेबद्दल बराच अनुभवहि मिळाला. आजपर्यंत ते ज्योतिषाचा व्यवसाय करीत आले असून अजूनहि सुरू आहे.

त्यांचेजवळ ज्योतिषविषयक जवळजवळ २०० ग्रंथसंपत्ति आहे. त्यांनीं आजपर्यंतच्या अनुभवावर कांहीं निष्कर्ष काढून सिद्धांत बसविले आहेत. या शास्त्रावर ते सध्यां लिखाण करीत आहेत व लवकरच ते प्रकाशित करण्याचा त्यांचा मानस आहे.

त्यांना रमल शास्त्राचा अनुभव जास्त आला असून ईश्वरी उपासनेची ज्योतिषाला जोड मिळाल्यास निश्चित यश मिळतें असें त्यांचें मत आहे. या शास्त्राच्या संशोधनाची त्यांना आवड आहे. तसेच रोज अनेकांना ते सल्ला—मार्गदर्शन करतात. त्यांच्या भविष्याचा पडताळा या भागांत अनेकांना आला आहे.

बारामती.
जि. पुणे

श्री. विष्णु गोपाळ नातू

जातकभूषण

यांचे शिक्षण S.S.C. पर्यंत झाले असून प्राथमिक ट्रेनिंग कोर्स २ वर्षे झाला आहे. त्यांनीं या शास्त्राचे शिक्षण त्यांच्या वडिलांपासून घेतलें. तसेच या शास्त्रांतील होराभूषण, जातक भूषण, या पदवी परीक्षा ते उच्च श्रेणींत उत्तीर्ण झालें असून वैदिक शिक्षणहि घेतले आहे. लहानपणापासून धार्मिक गोष्टींच्याकडे लक्ष. त्यामुळें त्यांनीं अनेक संतपुरुषांचीं चरित्रें, पोथ्या व धार्मिक ग्रंथ यांचें वाचन व अध्ययन केलें आहे.



त्यांनीं श्रीगीतार्थ प्रकाश, श्री दत्तस्तोत्र, श्रीदत्तरक्षास्तोत्रें, श्रीदत्तरहस्य, श्रीदत्तचरित्र सार, इत्यादि अनेक स्तोत्रें, अंशवर्णन, ताराप्रभाव, पंचांगरहस्य 'भारतीय युद्धकाळ निर्णय बाबतींचे संशोधन' इ. लिखाण केलें आहे. ते व्यवसायानें प्रा. शिक्षक असून आता सेवानिवृत्त झाले आहेत. केवळ द्रव्य मिळविण्याकरता ज्योतिषाचा व्यवसाय न करता एक अभ्यासू म्हणून ते या शास्त्राचें काम करीत असतात.

नक्षत्रपद्धतीवर त्यांचा विशेष भर आहे, व अभ्यासहि आहे. या शास्त्राचे मार्गदर्शन ते गरजूंना मनापासून करतात. व योग्य सल्ला देतात. प्रारब्ध भोग हा कोणालाहि चुकत नसला तरी परमेश्वराच्या उपासनेच्या बळावर मानवाला समाधान आणि शांति याचा लाभ होऊं शकतो असें त्यांचें मत आहे. त्या दृष्टीनें ते स्वतःहि प्रयत्नपूर्वक वागत असतात.

मु. पो. आजगाव
ता. (सावंतवाडी)
जि. रत्नागिरी

दत्तात्रय विश्वनाथ पंडित

ज्योतिषतीर्थ



हे मूळचे राहणारे यावलचे. यांचा ज्योतिषशास्त्राचा अभ्यास इंदोर येथें संस्कृत महाविद्यालय रावेर व बऱ्हाणपूर येथें झाला आहे. त्यांनीं १९४१ मध्यें 'ज्योतिषतीर्थ' ही पदवी मिळवली व तेव्हांपासून ते हा व्यवसाय (ज्योतिषाचा) करीत आहेत. हा धंदा ते अनुभवास धरून व शास्त्रदृष्टचा करीत आहेत. या शास्त्राकडे ते संशोधनाच्या दृष्टिकोनांतूनहि पाहात असतात. तसेच स्वत:स ते अजूनहि या शास्त्राचे विद्यार्थी म्हणवितात. जुन्या ग्रंथांचें वाचन करून कांहीं लेखनहि करण्याचा त्यांचा मानस आहे. त्या दृष्टीनें ते नेहमी प्रयत्नशील असतात.

बाणी गल्ली, यावल
जि. बेळगांव

श्री. श्रीधर दामोदर भालेराव

होरा–विशारद

जन्म– ता. १५–६–१९०२



बालपण व शिक्षण राहुरी, जि. अहमदनगर येथें झालें. १९१८ ते १९२० पर्यंत राहुरी येथील प्रा. शाळेत नोकरी. एक वर्ष मुंबईस टाईम्स ऑफ इंडियांत काम केलें, व पुण्यांत केसरींत २ वर्षे कंपोझिटरचें काम केलें. पुढें पोस्टांत नोकरी केली.

यांना ज्योतिषशास्त्राची मूळचीच आवड. पुण्यांतील भारतीय ज्योतिष संस्थेंत या विषयाचें शिक्षण घेतले. १९६१ सालीं, 'रोग विचार' या विषयावर प्रबंध लिहून उपरोक्त संस्थेची 'होरा विशारद' ही पदवी मिळविली.

१९५८ सालीं सरकारी नोकरींतून निवृत्त झाल्यावर पानोली येथें वडिलार्जित शेतीची व्यवस्था पाहण्याकरितां वास्तव्य. शेतीचे व्यवसायाबरोबरच ज्योतिषाचाहि व्यवसाय करतात.

'ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगझीन' बंगलोर, व 'ॲस्ट्रॉलॉजी अँड अदृष्ट,' मद्रास या मासिकांचे वाचन केलें. ४५ इंग्रजी, २२ हिंदी व १३ मराठी भाषांतील ज्योतिषशास्त्रावरील ग्रंथांचा संग्रह केला असून त्यांचेहि वाचन केलें आहे.

निरयन पद्धतीचा विशेष अभ्यास केला असून त्यांचेहि विशोन्तरी महादशा हेच फलादशाचे प्रमुख अंग आहे, असे त्यांचें मत आहे. विशोत्तरी दशेचा विचार करतांना ग्रहांची मूळची नक्षत्रस्थिति प्रामुख्यानें विचारांत घेतली गेल्यास फलादेश बराच जमतो असा त्यांचा अनुभव आहे

मु. पानोली, ता. पारनेर
जि. अहमदनगर.

व्यंकटेश हरिशास्त्री काळे B.A.

जन्म ता. ६–७–१९०६



यांचे शिक्षण बी. ए. पर्यंत झाले आहे. त्यांचे वडील हयात असेपर्यंत जमखिंडी संस्थानांत पंचांग प्रसिद्ध करीत होते. ४० वर्षे त्यांनीं हें काम केले. पुढें संस्थान विलीन झाल्यानें सरकारी आश्रय बंद झाला, व १९४७ पासून पंचांग प्रसिद्धीचें काम बंद झाले. यांचे वडील उत्तम वैद्य विषयक जाणकार होते. वडीलांनीं त्यांना लहानपणींच संस्कृत शिकविलें व पंचांगांतील गणिताचे ज्ञान दिले. पुढें त्यांनीं ज्योतिषशास्त्राची सर्व माहिती करून घेतली. सध्यां ते पत्रिका तयार करणें, वर्ष फल, मुहूर्त, प्रश्न वगैरे सर्व प्रकारची कामे करीत असतात. बी. ए. ला ऐच्छिक विषय त्यांनीं

संस्कृतच घेतला होता. त्यांनीं पाश्चात्त्य ज्योतिषाचेंहि ज्ञान मिळविलें असून ते त्याचे जोरावर याचा व्यासंग वाढवीत आहेत.

हल्ली जमखंडी येथे ज्योतिषासंबंधीं सर्व कामें करतात. तसेच पत्रिकेतील काल वेळा व्यवस्थित जमल्यास ७५ टक्के भविष्य खरे ठरते असा त्यांचा अनुभव आहे. हे शास्त्र खरे आहे, पण राजाश्रयाखेरीज चांगलीं माणसें या शास्त्रांत प्रगति करून पुढें येऊं शकणार नाहींत असे त्यांचें मत आहे. त्यांचा व्यासंग उत्तरोत्तर वाढत आहे व यशही मिळत आहे. असेच कार्य त्यांचे हातून होवो. जनताजनार्दनाची सेवा घडून या शास्त्राचें महत्त्व वृद्धिगत होवो अशी प्रभुचरणीं इच्छा व्यक्त करतो.

काँग्रेस विहीरीजवळ,
मु. पो. जमखंडी, जि. विजापूर.

काशिनाथ जनार्दन जोशी (शिऊरकर)

ज्योतिर्विद



यांचे शालेय शिक्षण त्यांचे स्वतःचे गांवींच झालें. वयाचे १६ वे वर्षी वेदाध्ययनासाठीं चाळीसगांव येथें वेदशाळेंत येऊन वे. शा. सं. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचेंकडे ३ वर्षे कर्मकांडाचें अध्ययन झालें. पुढें नाशिक येथें वैदिकतिलक अण्णाशास्त्री वारे यांचेकडे राहून याज्ञिक कर्माची माहिती व वेदाध्ययन केले. पुढे वयाचे २४ वे वर्षापासून चाळीसगांव येथे फलज्योतिष कार्यालय काढले.

यांचा स्वभाव सात्विक, सदाचारसंपन्न, ईश्वरनिष्ठ आहे. त्यांचे गांवचे श्रीमान नगरशेट कै. ना. बं. यांनीं त्यांच्या सल्ल्याप्रमाणें श्री. लक्ष्मण नारायण मंदीराचा सुवर्णउत्सव केला. त्यांनीं त्याच वेळीं २१ दिवसांचा धार्मिक विधि व श्री महाविष्णुयाग यज्ञ केला. त्या वेळी आलेल्या मोठमोठ्या विद्वान पंडितांनीं शिऊरकरांची मुक्त कंठानें स्तुति केली.


त्यांनी वर्तविलेलीं अनेक भविष्यें अगदीं तंतोतंत खरी ठरली आहेत. मध्यप्रदेशचे माजी राज्यपाल दादासाहेब पाटसकर यांना त्यांचा वेळोवेळीं अनुभव आल्यानें त्यांनीं भोपाळ येथें बोलावून त्यांचा सत्कार केला. हल्लीचे रेल्वेमंत्री स. का. पाटील, कै. भाऊसाहेब हिरे, मुंबई येथील इंजिनीअर नानासाहेब मोडक यांनाहि त्यांच्या ज्ञानाचा प्रत्यय आला असून मोठमोठ्या व्यक्तींची प्रशस्तीपत्रें मिळविली आहेत. कलकत्ता, बंगाल येथील बरेच व्यापारी व्यवसायाचे दृष्टीनें त्यांचा सल्ला पत्रव्यवहाराद्वारें घेत असतात.

शु. य. मा. म. ब्राम्हण मंडळ, चाळीसगांव शाखेचे ५ वर्षे पावेतों अध्यक्ष म्हणून त्यांनीं काम केलें. त्यांचा शांत, निगर्वी स्वभाव, शुद्ध आचारविचार तसेच प्रेमळ वागणूक आणि या शास्त्रांतील विद्वत्ता यामुळें त्यांची ख्याति वाढत आहे.

फलज्योतिष कार्यालय.
मु. पो. चाळीसगांव.
जि. जळगांव

श्री बाळकृष्ण वासुदेवराव पाथरीकर

होराभूषण डी. आय्.ए. एस्.



यांनीं या शास्त्रांमधील 'होराभूषण' ही पदवी प्राप्त केली असून या विषयाचा त्यांचा व्यासंग बराच आहे. या शास्त्रावरील अनेक ग्रंथांचा त्यांनीं अभ्यास व मनन केले असल्यानें या शास्त्राकडे बघण्याची त्यांची दृष्टि खोलवर दिसून येते. हे शास्त्र म्हणजे मानवाला त्याचे जीवनांत मार्गदर्शन ठरणारा एक दीपस्तंभ असून या शास्त्राचा अभ्यास व संशोधन वाढलें पाहिजें

असे त्यांचे मत आहे. तसेच या शास्त्राचे अभ्यासूने कोणती तरी एखादी उपासना ही जरूर ठेवावी असेंहि ते प्रतिपादन करतात.

ज्योतिष कार्यालय दत्त मंदिर
मु. पो. मेहेकर.
जि. बुल्ढाणा.

कृष्ण हरिभट्ट रेगे

वेदमूर्ति.
जन्म- २१-७-१९०५.



यांचे घराण्यांत पौरोहित्य चालत आले असून, त्यांना लहानपणापासून ज्योतिशास्त्राची आवड आहे. कपिलेश्वरी येथे यांनी वेदाध्ययन केले. शिक्षण मराठी माध्यमिक झाले आहे. त्यानंतर त्यांचे शाळेत प्राचीन संस्कृतचे अध्ययन झाले. कवळे येथे कै. वे. पांडुरंगशास्त्री जोशी यांजकडून ज्योतिषविषयक पाठ घेतले, तसेच मोठमोठ्या विद्वानांचे मार्गदर्शन लाभल्यानें या विषयाचा अभ्यास वाढण्यांस मदत झाली. तसेच वयाच्या १८ वे वर्षी कैवल्यमहाधीश ब्रम्हीभूत, श्रीमत् पूर्णानंद सरस्वतीस्वामी गौडपादाचार्य मठ कवळे यांनींहि आपल्या स्वानुभवान्नें ठोकताळे समजावून दिले.

यांचा प्रमुख व्यवसाय श्री. शांतादुर्गा देवस्थान येथील पुजारीपणाचा असून काव्य, कीर्तन, ज्योतिष हे आवडीचे साहाय्यक व्यवसाय असल्यानें ज्योतिषशास्त्रांत भरीव अशी कामगिरी होऊ शकली नाहीं. तरीहि "लोकमित्र" (बेळगांव) "भारतमित्र" (खिणगोवा) यांत मासिक व संगम साप्ताहिकांत साप्ताहिक भविष्य देत आले आहेत व त्याचा वाचकवर्गास सत्य अनुभव येत आहे.

या शास्त्रांतील त्यांना लाभलेले मार्गदर्शन, त्यांचा अभ्यासाचा व्यासंग व लिखाण करण्याची आवड व प्रयत्न पाहतां ते या शास्त्रांत निश्चितपणें प्रगति करून यशस्वी होतील व या शास्त्राचे महत्त्व वाढविण्यांस हातभार लावतील असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे ठरणार नाहीं, असे आम्हांस वाटतें. परमेश्वर त्यांना त्यांचे अंगिकृत कार्यांत यश देवो हीच सदिच्छा.

श्री. शांतादुर्गा संस्था.
मु. कवळे, पो. फोंडा
(गोवा)

पारसनाथ गंगाराम जैन

पॉमिस्ट



यांचे मूळ गांव हिसामाबाद. तेथे त्यांची जमीन व राहण्याचें घर होते पण १९४८ मध्यें झालेल्या दंगलींत (रझाकार) त्यांच्या घराची लूटमार होऊन ते निराश्रीत झाले. पुढे त्यांचेवर कोर्टकचेरी करण्याची वेळ आली. त्यांत त्यांना बरीच दगदग व त्रास सहन करावा लागला. तरी न डगमगतां त्यांनीं आपले कार्य चालूं ठेवले. व शेवटीं त्यांना यश लाभलें.

या सर्व धकाधकीचे व अडचणींचे काळांतहि त्यांनीं या विषयाच्या आवडीमुळें ज्योतिषविषयक शिक्षण घेण्याचा उपक्रम सुरू केला. आज त्यांनीं बरीच प्रगति केली आहे. व अजूनही शिक्षण घेण्याची त्यांना उमेद आहे. त्यांची या विषयाची आवड, कष्ट करण्याची तयारी, पाहिल्यावर ते प्रतिकूल परिस्थिति असूनहि धडपडण्याची वृत्ति असल्यानें, या विषयांत अधिकाधिक प्राविण्य व यश मिळवतील असे म्हटल्यास मुळीच वावगे ठरणार नाहीं. परमेश्वर त्यांना त्यांचे कार्यांत साहाय्यभूत ठरो हिच शुभकामना !

रेल्वे स्टेशन, हुंडेकर राममंदिर
(लातूर) उस्मानाबाद

दिनानाथशास्त्री जोशी

होराभूषण
जन्म– २२–४–१९१४.



जन्मानंतर तिसरेच दिवशीं आईचें छत्र नाहींसे झाले. घरची अत्यंत गरीबी होती. वडील भिक्षुकीचा व्यवसाय करीत. ते पण ९ वे वर्षी निवर्तले. पुढें चुलत्यानें पालनपोषण केलें. ४ वर्षे याज्ञिकेचे शिक्षण घेतले. नंतर नाशिक येथे संस्कृत शिक्षणाकरितां राहिले. इंदूर येथे संस्कृत पाठशाळेंत संस्कृत व ज्योतिषतीर्थ नीलकंठ मंगलजी जोशी यांचेकडे ज्योतिषतीर्थ परीक्षेचा अभ्यास केला. मुहूर्त चिंतामणी, ताजिक नीलकंठी मुहूर्तमार्तंड, जातकालंकार हे ग्रंथ अभ्यासिले. आज यांचे संग्रहीं १५० ग्रंथ आहेत. पचांगवाद, सायन, निरयनवाद, चित्रापक्ष, झिटापक्ष यांचाहि अभ्यास केला. शके १८७१ मध्ये पुण्याचे होराभूषण परीक्षेस बसून ती उपाधी प्राप्त केली. त्यांना संशोधनाची फार आवड आहे. त्यांनीं अष्टोत्तरीची, विदशा कोष्टकें तयार केलीं आहेत. तसेच मुहूर्त, प्रश्न यांवर टाचणें केलीं असून त्यावर पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा त्यांचा मानस आहे.

त्यांनीं आत्तापर्यंत बरीच बक्षिसेहि मिळविली आहेत. शके १८७८ मध्ये जळगांव ज्यो. परिषदेला गेले होते. १९४७ मध्ये धुळें येथील प्रताप साप्ताहिकांत ते भविष्य लिहीत असत. सध्यां ते समाजमित्र दैनिकांत भविष्य देतात. त्यांचे मित्र-मंडळींच्या आग्रहावरून आधुनिक राजयोग यावर लिखाण करण्याचा त्यांचा विचार आहे. त्यांचा एकंदर अभ्यास, व्यासंग वाढविण्याची इच्छा व त्यानुरूप प्रयत्न पाहतां त्यांचे हातून या शास्त्राची जास्तीतजास्त सेवा घडेल अशी आम्हांस उमेद आहे.

लक्ष्मी नारायण ज्योतिष कार्यालय
मु. पिंपळनेर (धुळें)

अनंतराव हरिकिसनदास मेहता

(गुजराथी)
जन्म– २६–४–१८९६



सध्या यांचे वय ७१ वर्षांचे आहे. त्यांनी आत्तापर्यंत सहकारी बँकेत नोकरी केली. १९२० पासून ते ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. ते बहुतकरून पत्रिकेवर सारा भर देतात. कुंडली पाहून चर्चा व विवेचन करीत असल्यानें ते जिज्ञासूंना फारच उपयुक्त ठरते. त्यांनीं या शास्त्रांतील अनेक विद्वानांशीं या विषयावर चर्चा, विवेचन केले आहे. त्यांनी या शास्त्राचा अभ्यास श्री. नवाथे यांची पुस्तकें व इतर ज्योतिषविषयक ग्रंथ वाचून केला असून ॲलन लिओ व रॅफेलची पुस्तकेहि अभ्यासिलीं आहेत. अजूनहि ते अभ्यास व संशोधनांत मग्न असून त्यांचा व्यासंग वाढत आहे.

नगरपट्टी, धुळें.

अरविंद गो. पंचाक्षरी

दै. गांवकरी साप्ताहिक भविष्य लेखक

यांच्या घराण्यात शास्त्राच्या अभ्यासाची व नैपुण्याची परंपरा दिसून येते. यांच्या वडिलांचा व्यवसाय ज्योतिषाचाच होता. या क्षेत्रांत वडिलांचे कर्तृत्वाचे यश मोठे होते. ते तारीख व वेळ अगदी अचूक सागत असत, त्यामुळें व्यासंग मोठा अन् लोकसंग्रहहि मोठा. ते आत्मविश्वासान भविष्य वर्तवित असत. त्यांना स्वतःचे मृत्युचे भविष्य आधी दहा वर्षे माहीत होतें. व ते त्यांनी बरेचजणांना सांगून ठेवले होते. वडिलांनी यांना बाल्यावस्थेत असतानाच हाताशीं धरले आणि वडिलांचे मार्गदर्शनाखालीं यांच्यावर ज्योतिष विद्येचे संस्कार झालें.

यांनी सायन व निरयन अशा दोन्हीं पद्धतींचा अभ्यास केला आहे परंतु यांना आकर्षण आहे सायन पद्धतीचें.

१९५६ मध्यें वडिलांच्या मृत्युमुळें त्यांचेवर सारी कौटुंबिक जबाबदारी पडली. पण त्यामूळें खचून न जाता न डगमगतां त्यांनी मोठ्यां धैर्यानें हा व्यवसाय सुरू केला. सतत ५ वर्षे झगडले तरी सुरुवातीस यश पदरीं पडले नाहीं. पण आज मात्र ते सुप्रसिद्ध ज्योतिषि म्हणून ओळखले जातात. आज त्यांचें वय सुमारे २५-२६ वर्षांचे आहे. पण वडिलांच्या आशिर्वादानें त्यांनी पुष्कळच प्रगति केली व लोकसंग्रह केला आहे. ते गरीबांच्या कडून फीची अपेक्षा कधीच करीत नाहींत, यापूर्वीहि केलेली नाही व पुढेहि न करण्याचा त्यांचा मानस आहे.

सर्वसामान्य माणसे ही शास्त्राचा आधारस्तंभ आहेत असें त्यांचें मत आहे. दोन-तीन वृत्तपत्रांमधून ते लिहीत असतात. विचारांची झेप मोठी असल्यानें त्यांना या शास्त्रांत यश मिळत असले तरी मनाचे समाधान होत नाहीं, असें ते म्हणतात. हे शास्त्र अगाध, अनंत आहे. अजन बरेच आपणांस शिकायचे आहे असे त्यांना वाटते वडिलांप्रमाणें भव्य कार्य करण्याची त्यांची जिद्द आहे. त्यांच्या घराण्याच्या परंपरेवरून, त्यांच्या आत्मविश्वासावरून ते या क्षेत्रांत अशीच प्रगतीची वाटचाल करतील असें वाटतें.

घ. नं. २०० विश्राम बाग
म. गांधी मार्ग, नाशिक शहर.

अनंत पुरुषोत्तम जोशी

– होराभूषण –

सांगली येथे श्री. जोशी यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिक पर्यंत झाले आहे. जोशी घराण्यांत लहानपणापासून ज्योतिषाची आवड व तोच गुण यांच्याहि अंगी उतरला. मुळांतच त्यांना ज्योतिशाची आवड, त्यामुळें त्याचा अभ्यास करण्याकडे त्यांचा कल झुकला. वयाच्या २५ व्या वर्षी ते बॉम्बे पोर्टट्रस्ट रेल्वेंत १९४२ सालीं नोकरीस



लागले व आता ते असिस्टंट कंट्रोलर म्हणून काम करीत आहेत.

ह्या सर्व कालावधीत त्यांनीं ज्योतिष शिक्षणाची जिद्द सोडली नाहीं. ज्योतिष शिक्षण कोर्स घेऊन त्यांनीं १९६० सालीं होराभूषण ही मानाची पदवी प्राप्त केली. त्यांचा विविध ज्योतिष संस्थांशी सतत संबंध येतो. हा संबंध वाढविण्याचा त्यांचा उद्देश, ज्योतिष शिक्षणाचा अभ्यास करून त्यांत संशोधन करण्याचा त्यांचा विचार आहे.

५ व ६ डिसेंबर १९६१ मध्यें दादर सार्वजनिक वाचनालयातर्फे झालेल्या अष्टग्रही व्याख्यानांत ते अध्यक्ष होते. व त्यांच्या प्रकाशनांत यांचे कांहीं लेख प्रकाशित झालें. नोकरींतून सेवानिवृत्त झाल्यावर ज्योतिष शिक्षण ही संस्था स्थापण करण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांच्या ह्या स्थापनेला यश प्राप्त होवो अशी सदिच्छा.

सीता भुवन
आक्शीकर स्ट्रीट
दादर मुंबई नं. २८.

दत्तात्रय दामोदर पैठणकर

जन्म २१-१-१९०० बी. ए. एल्. एल्. बी.

यांचे मूळ गांव अकोला होय. त्यांचें शिक्षण अकोला, अमरावती व यवतमाळ येथें झाले. कॉलेजशिक्षण जबलपूर व पुणें येथें झाले. पुण्याम फर्ग्युसन कॉलेजांत १९२३ ते २७ पावेतो जीवनशास्त्र व प्राणीशास्त्राचे डेमॉस्ट्रेटर, लेक्चरर म्हणून काम केलें. याच गांवीं जोशी नांवाचे जुन्या पद्धतीचे सद्गृहस्थांच्या मैत्रीमुळें व सहवासांत ज्योतिष शास्त्राचा नाद लागला.



यवतमाळ येथें वकिलीचा व्यवसाय सुरू केला, व फिरतीवर आलेल्या ज्योतिषांशी चर्चा, विचारविनिमय करून त्यांनी आपला हा व्यासंग वाढविला. यांचेजवळ ज्योतिषविषयक बराच ग्रंथसंग्रह आहे. हे ज्योतिषाचा

ब्यासंग केवळ छंद म्हणून करतात, धंदा म्हणून नाहीं. यांचेकडे कोणीहि मनुष्य ज्योतिषविषयक सल्ल्यासाठी गेल्यास ते त्याला मोठ्या आवडीनें मार्गदर्शन करतात. त्यामुळें ते या भागांत (वऱ्हाड) फारच प्रसिद्ध आहेत.


ज्योतिषशास्त्रांतील अंगोपांगाचा त्यांचा अभ्यास फारच सखोल व दांडगा आहे. या विषयांतील सर्व कामे करण्यांत त्यांचा हातखंडा असून त्यांचीं भविष्यें अचूक ठरल्याचा अनेकांना पडताळा आला आहे. त्यामुळें त्यांचेकडे दूरदूरचे लोक मुद्दाम त्यासाठीं येतात. त्यांत डॉक्टर, वकील, न्यायाधीश, प्राध्यापक वगैरे सर्व व्यवसायांतील लोक असतात. या विषयांतील त्यांचे ज्ञानामुळें व व्यासंगामुळें त्यांना उमरावतीस भरलेल्या अखिल भारतीय ज्योतिष परिषदेत 'होराचूडामणी' ही पदवी देण्यांत येऊन त्यांचा जाहीर सत्कारहि करण्यांत आला. ते स्वभावानें दिलदार व मनानें मोकळे असल्यानें लोक चटकन् त्यांच्याकडे आकर्षित होतात. वृत्तीनें ते धार्मिक आहेत. त्यांचा वकिलीचा व्यवसाय असूनहि ते त्यांतहि सचोटीनें वागतात. यवतमाळ जिल्हा असोसिएशनचे ते अध्यक्ष होते. वकिलीचा पेशा सांभाळून ते या विषयाचा व्यासंग वाढवीत आहेत हे खरोखरीच अभिनंदनीय म्हटले पाहीजे.

जांबरस्ता, टिळक वाडी.
यवतमाळ, वऱ्हाड.

सखाराम दिवाकर बांदेकर

जन्म– ७–३–१८९४

यांचे शालेय शिक्षण जरी फारसे झालेले नसले तरी



त्यांनीं वडिलांकडे सुमारे ५ वर्षे वेदाध्ययन केलें. ऋक्संहिता, पदें, पत्रिका वगैरेंचे पठण केले. त्यांची घरची एकूण परिस्थिति व वेदाभ्यासाची आवड पाहून एका युरोपियन साहेबानें त्यांना पुण्याहून ३० रु. किंमतीच्या पोथ्या भेट म्हणून पाठवल्या. त्यांचा त्यांना फारच उपयोग झाला. पुढें त्या सद्गृहस्थांनीं स्वखर्चानें ह्यांना ११४ मराठी लाईफ इंन्फन्ट्रीमध्यें कलकत्ता येथें धर्मोपदेशकाची नोकरी मिळवून दिली. त्यांनीं सुमारे १५ वर्षे ही नोकरी केली.

पुढें वासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराज यांनीं पंचपाक्षिक नांवाच्या नवीन ज्योतिष मार्गानें फलादेश जाणण्याची माहिती श्री दत्तलिलामृत पुस्तकांतून वाचण्यांत आली व त्यामुळे त्यांना या शास्त्राबद्दल जिज्ञासा उत्पन्न होऊन आवड निर्माण झाली. तेव्हांपासून ते या शास्त्राचा अभ्यास करूं लागले. ज्योतिर्मयुखामुळे बरीच प्रगति होऊं शकली असे ते प्रतिपादतात. केलेली पत्रिका मनन करणें, फलादेश वर्तविणें हीं कामे ते करीत असतात. त्यांनीं स्वत: केलेल्या पत्रिका पुणें, मुंबई या ठिकाणीं गेल्या आहेत. त्यांचा मुख्य व्यवसाय उच्च दर्जाची धार्मिक कामे करणें. फावल्या वेळांत ते ज्योतिष व्यवसाय करतात. अजूनहि त्यांना नवीन ज्ञान व माहिती मिळण्याची इच्छा असून ते स्वत:स या शास्त्राचे एक विद्यार्थी म्हणवतात.

सबनीस वाडा.
मु. पो. सावंतवाडी.
जि. रत्नागिरी

श्री. अरविंद दत्तात्रय बर्वे

बी. एस्. सी.
होराभूषण, सुवर्णपदक विजेते

यांचे शिक्षण बी. एस्. सी. पर्यंत झालें. १९५९ पासून ज्योतिष अभ्यासास सुरुवात केली. १९६२ सालीं होराभूषण ही पदवीपरीक्षा दिली व आजपर्यंतच्या गुणांचा उच्चांक त्या परीक्षेंत प्रस्थापून लोकमान्य टिळक सुवर्णपदक मिळविलें. त्यांचे आतांपर्यंत ज्योतिषशास्त्राचा चिकित्सक व संशोधनपर अभ्यास करून लिहिलेले अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन यांच्या संस्थेच्या सुवर्णग्रंथ "ज्योतिष कौस्तुभ" प्रकाशनास श्री बर्वे यांचे बरेच साहाय्य झालें. त्यांनीं संस्थेच्या ज्योतिष शिक्षणाचे पाठ तयार करण्यासहि मदत केली. तसेच संस्थेच्या ज्योतिष परीक्षेवर परीक्षक म्हणून गेलीं ३ वर्षे काम पाहात आहेत.

श्री. बर्वे यांची निरयन पद्धति सांप्रत अयनांश २३°–२३' नुसार भविष्य कथन करण्याची पद्धत आहे. त्यांनीं विवाह भविष्यावर विशेष परिश्रम संशोधन १९६१ पासून सुरू केलें आहे. त्यांचा मुख्य व्यवसाय सर परशुरामभाऊ कॉलेज पुणें २, येथें शिक्षकाचा असून ' ज्योतिष ' हा एक उपव्यवसाय आहे.

ॐ ज्योतिष कार्यालय
१७४६ सदाशिव पेठ,
नारद मंदिर रस्ता
भिकारदास मारुती मार्ग, पुणें २.

श्री. शंकर यज्ञेश्वर देवळालीकर

यांचे मूळ घराणे महाराष्ट्रांतील नाशिक जवळील देवळाली गांवचे. पुढे यांचे आजोबांना धार संस्थानांत पाच कुंडाचे अग्निहोत्राचा आश्रय मिळाला. यांचे आजोबा वेदाध्ययनी व ज्योतिषि होते. त्यांनीं अव्याहत साठ वर्षे अग्निहोत्र केले. त्याचा उपयोग यांना झाला. आजोबांच्या सानिध्यांत राहून वेदाध्ययन झाले. हे शिक्षण अमरकोष, रघुवंश व ज्योतिषाचें शिक्षण शीघ्रबोध, ज्योतिषसार, ग्रहलाघव इ. ग्रंथाचे आधारें झाले. मॅट्रिक झाल्यावर यांनीं संस्कृत काव्याच्या परीक्षा दिल्या.

पुढे इंदूर येथे त्यांना कांहीं विद्वानांचा सहवास लाभला. तेथेंच ज्योतिष शास्त्राबद्दलची आवड वाढली. त्यामुळे बृहत्पाराशरी बृहत्जातक, सर्वार्थ चिंतामणी या ग्रंथांचा त्यांनीं अभ्यास केला. पण पत्रिका पाहून अचूक भविष्य सागणें न जमल्याने वडिलांचे सूचनेवरून ज्योतिषातील पुराणग्रंथांचा सखोल अभ्यास केला. यांचे वडील हेहि ह्या शास्त्रांत एक अधिकारी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना वडिलांकडून पुष्कळच ज्ञानप्राप्ति झाली. पुढे त्यांनीं ज्योतिषशास्त्रावरील इंग्रजी ग्रंथांचें (लि ओ) वाचन केले. त्यामुळें त्यांना यापुढें या शास्त्रांत हळूहळू प्रगति होऊन यश लाभूं लागले.

वेळप्रसंगीं स्वतः झिजून ते आज उतारवयांतदेखील त्यांचेकडे येणाऱ्या गरीब व श्रीमंत माणसाला मार्गदर्शन करून सल्ला देत असतात. व तोहि निर्लोभ वृत्तीने. या शास्त्राचे नियम ते कसोशीने पाळतात. त्यांनीं वर्तविलेली अनेक भविष्यें विशेषतः दुसऱ्या महायुद्धाचे भविष्य खरे ठरले आहे. हे सर्व कथित असतांना त्यांना कांहीं ग्रहांच्या फलांचे बरेच शोध लागले असे ते म्हणतात. हें शास्त्र मानवाला अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यांचा अभ्यास एकाग्र चित्तानें केला पाहिजें तरच यश मिळते असे त्यांचे मत आहे.

पानदरीबा उज्जैन एम्. बी.

ज्योतिर्भूषण काशिनाथ नरसिंह केळकर.

जन्म – २५ फेब्रुवारी १९००

साहित्य सम्राट कै. न. चिं. केळकर यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव. जन्म २५ फेब्रुवारी १९००, पुणें येथें. टिळक विद्यापीठाची बी. ए. (वाङ्मय विशारद) पदवी १९२२ सालीं घेतल्यावर १९२६ सालीं त्यांनीं ॲडव्होकेटची परीक्षा दिली व पुण्यांत सात वर्षे वकिली केली. उत्तम वृत्तपत्रलेखक व ग्रंथकार असा त्यांचा लौकिक असून 'हिंदु व्यवहार धर्मशास्त्र' या त्यांच्या १९३२ सालीं लिहिलेल्या ग्रंथानें आजच्या हिंदुकोडचा पाया घातला आहे. १८५७ सालचे बंडावर ' शमीपूजन ' व ' शंभर वर्षांपूर्वी ' ही त्यांची दोन पुस्तकें आहेत. नेपोलियन वाङ्मयाचा त्यांचा अर्धशतकाचा अभ्यास असून " वाळवंटातील पाऊलें " हे त्यांचें आत्मचरित्र ही एक अपूर्व कलाकृति गणली जाईल.

दुर्दैवानें १९३२ साली बहिरेपण येऊन त्यांनीं वकिलीचा धंदा सोडला, पण त्यांतूनच स्फूर्तीनें त्यांच्या ज्योतिषविद्येच्या अभ्यासाचा उगम झाला. १९३३ सालीं "दैवाचा चमत्कार " हा ज्योतिषविषयक लेख त्यांनीं मौजेच्या दिवाळी अंकासाठी लिहिला. तेथपासून आज ३३ वर्षेपर्यंत या शास्त्राचा त्यांचा अखंड व्यासंग असून जवळजवळ आठ हजार कुंडल्या त्यांचे नजरेखालून गेल्या. ते स्वतः इतिहाससंशोधक असल्यामुळें इतिहासातील कांहीं उल्लेखांवरून झांशीवाली राणी लक्ष्मीबाई हिची जन्मतारीख व कुंडली त्यांनीं १९३८ साली सह्याद्रींत प्रसिद्ध केली.

१२९ या वर्षसंख्येच्या परिवर्तनानें संख्याशास्त्रानें १९४४ सालीं हिटलरचा पराभव होण्याची वेळ जवळ आली आहे असे भविष्यविषयक अनुमान त्यांनीं वाङ्मयशोभा, १९४३, जुलैच्या अंकांत प्रसिद्ध केलें. पण याहिपेक्षां आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे हिटलरचे छप्पन्नावें वर्ष पूर्ण होण्यापूर्वी तो आत्महत्या करील,

नेपोलियनचा बंदीवास त्यांचे नशिबी येणार नाहीं, असें ठाम अनुमान जाहीर रीतीने हिटलरच्या मृत्युपूर्वी ६ महिने त्यांनीं डिसेम्बर १९४४ च्या वाङ्मयशोभा मासिकांत प्रसिद्ध केलें. आणि त्या वेळीं ता. ३० एप्रिल १९४५ रोजीं हिटलरनें खरोखरच आत्महत्या केली. श्री. काशिनाथपंत केळकर यांनीं केलेले भविष्य आश्चर्यकारक रीतीनें अक्षरशः खरें ठरल्याचें प्रत्ययास आलें ! !


विलायतेंत रॅफेलनेंदेखील हिटलरबाबत इतके कांटेकोर भविष्य प्रसिद्ध केले नव्हते, तो मान एका प्रसिद्धपराङ्मुख भारतीय ज्योतिषास मिळाला हा या भविष्याचा विशेष होय. सार्वजनिक आयुष्यांमधून श्री. केळकर हे अलीकडे निवृत्त झालेले असून त्यांनीं आजवर अनेक वर्षे निस्वार्थी शास्त्रसेवा व ज्योतिषशास्त्राचा दीर्घ व्यासंग केला. या करितां ' भारतीय ज्योतिषशास्त्र संशोधन ' संस्थेतर्फे श्री. भारदे यांचे हस्तें "ज्योतिर्भूषण" ही पदवी देऊन १९६३ सालीं त्यांचा सन्मान करण्यांत आला.

३३-२५ प्रभात रोड, गल्ली ४
डेक्कन जिमखाना, पुणें ४.

रामचंद्र नारायण गर्गे शास्त्री

ज्योतिषरत्न.

यांनी फलज्योतिषविषयक शिक्षण घरींच घेतले. निरनिराळ्या ग्रंथांचा शास्त्रोक्त अभ्यास व वाचनाची आवड. लीलावती व क्षेत्रमिती ताजिक नीलकंठी याचे अध्ययन इंदोर येथें केलें. याखेरीज जैमिनी सूत्राचे अध्ययन, काव्यनाटक, चम्पू संख्याशास्त्र, व्याकरण मीमांसा, वेदांत इ. चे अध्ययन पुणें येथें केलें व वेदांताची पदवी मिळवली. पुढें गणेश मंडळ पुणें याचे चालक पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांचेकडून 'प्रवचन केसरी' ही पदवी प्राप्त केली. नू. म. वि. त ग्रहनक्षत्र फलादेश मंडळांत ज्योतिषविषयक व्याख्यानें दिलीं. १९३० पासून १९५७ पर्यंत अध्ययन व प्रवास केला. बडोदा, पुणे, मुंबई, संगमनेर, धुळे, जळगांव येथे प्रवास केला आहे नभोवाणीवरून प्रवचने झाली आहेत. ज्योतिषाचा व्यासंग बराच आहे. रोज ४।६ लोक येतात. ' प्राचीन ग्रंथाधारे उच्च ग्रह फल देत नाहीत, नीच ग्रहमान खूप जोरदार प्रगति करतात. या वर संशोधन केले आहे.




ज्योतिषशास्त्रांतील ग्रंथांचा बराच संग्रह केला आहे. विशेषतः पुराण, धर्मशास्त्र व व्याकरण यांवरील सुमारे ४००० ग्रंथांचा संग्रह आहे. लोकाग्रहास्तव पिंपळनेर येथील हायस्कूलमध्ये ८ ते ११ पर्यंत संस्कृत शिकवण्यांचे काम करतात. इतरत्र नोकरी केलेली नाही. व जरुरीहि भासली नाही. ज्योतिषशास्त्राचा यांचा व्यासंग बराच असून त्यासच त्यांनीं वाहून घेतले आहे. व त्याचा फादा त्या भागांतील जनतेस मिळत आहे.

(दिघावेकर) पिंपळनेर, साक्री
जि. धुळे. मु. पो. दिघावे.

ज्योतिषरत्न डॉ. सूर्यकांत बाळकृष्ण पंडित

यांचे घराण्यांत 'ज्योतिष' हा पिढीजात व्यवसाय आहे. त्याचे चुलत काका व बंधु या शास्त्राची चांगल्या प्रकारे सेवा सध्यांहि करीत आहेत. ज्योतिर्विद्या मंडळांतून "ज्योतिषभूषण" ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले आहेत. या शास्त्राचे अध्ययन त्यांनीं ज्योतिर्विद कृ. वि सोमण, होरारत्न ह. ज. पाटील, कै. बेडेकर, व गोपाळशास्त्री जोशी यांचे मार्गदर्शनाखालीं केले. या शास्त्राची मूळची आवड त्यामुळें त्यांनीं अनेक ग्रंथांचा अभ्यास–वाचन केलें आहे. त्यांना या शास्त्राच्या सेवेबद्दल 'ज्योतिषरत्न' ही सन्मान्य पदवीहि मिळाली आहे.



सध्यां ते सर्वोदय हॉस्पिटल, घाटकोपर येथे नोकरी करतात व फावल्या वेळांत आरोग्य ज्योतिषाचा अभ्यास व मार्गदर्शनहि करतात. या शास्त्रांत ते अधिकाधिक

संशोधन करीत आहेत. तसेच त्यादृष्टीनें त्यांनीं निर-निराळ्या प्रकारच्या रोग्यांच्या कुंडल्या जमा केल्या असून कोणत्या ग्रहांमुळें कशाप्रकारे फलादेश मिळतो, याचीहि टिपणे ते करीत असतात. त्याचप्रमाणें ते गरजू लोकांना या शास्त्राचें मनोभावे मार्गदर्शन करून योग्य सल्ला देत असतात. अशाप्रकारे ते या शास्त्राची सेवा करीत असून त्यामुळें त्यांचा व्यासंग व त्याबरोबर लौकिकहि वाढत आहे. त्यांना असेच यश व कीर्ति लाभो असेच कुणीहि म्हणेल.

ज्योतिष विद्या मंडळ
कमळाबाई हायस्कूल, नवरोजी स्ट्रीट
नाना शंकरशेट रोड
ठाकूरद्वार, मुंबई २–

डॉ. सौ. रेचलभाई नाथान वरघरकर

एम्. डी. एच्. एम्. एस्. सी. (होमिओ)

या मुंबईच्या रहिवासी असून गेलीं ३० वर्षे त्या मुंबई म्युनिसिपलशाळेंत नोकरीस आहेत.१९६१ पासून मुख्याध्यापिका म्हणून काम करतात. त्यांनीं शिवणकला, चित्रकला, हिंदी, शा. शिक्षण (गाईड) यांचेहि शिक्षण घेतलें आहे.



त्या धर्मानें ज्यू आहेत. तरीहि हिंदूंची पवित्र तीर्थक्षेत्रें पाहण्यास त्या श्रद्धेनें जातात. त्यांनीं उत्तरेस बद्रीनारायणापासून दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत प्रवास केला आहे. त्यांनी अनेक धार्मिक ग्रंथांचे वाचन केले असून काव्यरचना व गोष्टी लिहिण्याचीहि त्यांना आवड आहे. सन१९६१ मध्ये त्यांच्यांत एकदम बदल होऊन त्या अध्यात्मिक मार्गाकडे वळल्या आणि त्याच-वेळी ज्योतिषशास्त्र शिकण्याची इच्छा त्यांच्या मनांत निर्माण झाली. त्यांनीं या विषयाचीं पुस्तकें वाचून ज्योतिष शिक्षण विद्यालयाच्या परीक्षेचा अभ्यासहि केला. तसेच या शास्त्राची स्त्रियांचे मनांत आवड निर्माण व्हावी म्हणून खूप प्रयत्नहि केले.

त्यांचे ठिकाणीं कार्यतत्परता, आदरातिथ्य, समानता, उदार वृत्ति व परोपकारीपणा आदि गुणांचा प्रकर्षाने आढळ आहे. १९४४ सालीं मुंबईत गोदीत झालेल्या स्फोटाचे वेळी निराधार झालेल्या लोकांना मदतीसाठी म्हणून डोंगरी म्यु. मराठी अ. प्रा. शाळेच्या इमारतींत रिलीफ सेन्टर उघडले. तेथेहि त्यांनीं उत्साहानें काम केलें.

कोणतीहि गोष्ट त्या परोपकाराच्या भावनेने व निरीच्छ बुद्धीनें करीत असतात. तसेच परमेश्वरावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. त्या सत्यप्रिय आहेत. अशा निरलस, उदार अंत:करणाच्या विद्यार्थिनी हे संस्थेचे भूषणच म्हटले पाहिजे.

शरीफ मॅन्शन, ३ रा मजला,
रू. नं ५२, डोंगरी, मुंबई नं.९

गंगाधर बापुदेव जोशी ऊर्फ

गंगाधर शास्त्री खेडकर.


यांचे मूळ जन्म गांव खेड (जि. नगर) हे होय. यांचे घरी ज्योतिषाचा व भिक्षुकीचा व्यवसाय होता. यांचे लहानपण मात्र पुण्यांत गेले. यांचे शालेय शिक्षण कांही अडचणीमुळें फक्त इंग्रजी ३ री पर्यंत झाले. पण वडिलांचे मार्गदर्शनाखालीं त्यांनीं वैदिक व ज्योतिष शास्त्राचें शिक्षण घेतले. हे शिक्षण शुक्ल यजुर्वेद पाठ-शाळेंत पूर्ण केलें.

ज्योतिषशास्त्राचा यांचा जवळजवळ ३० वर्षांचा व्यासंग आहे. सध्यां ते हाच व्यवसाय करतात. त्यांचे जवळ थोडासा ग्रंथसंग्रह आहे. ते या शास्त्राचें मार्गदर्शन यांचेकडे येणाऱ्याला मोठ्या मोकळ्या मनानें देतात व परिस्थितीनुरूप मोबला घेतात. कोणालाहि पैशासाठी अडवत नाहींत. त्यांचे ज्ञानाचा लाभ अनेकांनीं घेतला असून अनेकांचे भविष्य तंतोतंत खरे ठरले आहे.

ज्योतिषशास्त्राला वेदांचा आधार असल्यानें ते खरे आहे, असे त्यांचे मत आहे. या शास्त्राची होईल तेवढी सेवा करण्याची त्यांची इच्छा आहे. भिक्षुकी सांभाळून ते ज्योतिषाचा व्यवसाय करतात.

ज्योतिर्विद्यारत्न पं. कृष्णचंद्रशास्त्री शर्मा पंचांगकर्ते

पं. शर्मा यांचा जन्म पुणें येथे दि. १५-६-१९१० रोजीं झाला. त्यांचे वडील ज्योतिषाचार्य पं फाऊलाल ऊर्फ भाऊ महाराज विरेश्वर शर्मा हे पुणें येथे १९२३ साली स्वर्गवासी झाले. ज्योतिषशास्त्राचे प्राथमिक शिक्षण वडिलांचे हयातींत त्यांनीं वडिलांकडेच केले होते. व संस्कृत वैदिक पाठशाळेंत त्यांचे संस्कृत व वैदिक शिक्षण झाले. पुण्यात कोठेच शास्त्रोक्त शिक्षण देण्याची व्यवस्था नसल्यामुळे ते जोधपूरला ज्योतिषाचार्य पं. अमृतलालजी ओझा यांचेकडे १९२४ साली उच्च शिक्षणाकरता गेले. तेथें क्रमश: त्रिस्कंध पूर्ण करून १९२८ साली त्याहीपुढे वेधादि (यांत्रिक) शिक्षणाकरितां ते जयपूरला गेले. जयपूरला वेधशाळेचे प्रमुख व राज्यज्योतिषी सिद्धांतपंचानन पंडित केदारनाथजी शर्मा व वेधशाळेचे नायब (अध्यक्ष) भास्कर पं. कन्हैयालालजी द्विवेदी आणि ज्योतिषाचार्य पं. बद्रीनारायणजी यांचेकडे पुढचे शिक्षण घेत असताना प्राचीन सिद्धान्त करणग्रंथ यांचे गणित प्रत्यक्ष वेधाशी जमत नाहीं हे दिसून आल्यावर गुरुवर्यांकडून त्यांना कै. के. बा. केलकरकृत ज्योतिर्गणित केतकी वगैरे ग्रंथ अभ्यासक्रमांत देण्यांत आले.



केतकी चित्रापक्षीय चित्रशाळा पंचांग पुणे व संचालित केतकी पंचांग मुंबई या पंचांगाचे गणित ते शके १८५८ पासून देऊं लागले. तसेच गोसेवक पंचांग बेळगांव, वैजयंती पंचांग विजापूर, हर्ष पंचांग नागपूर, सत्यविजय पंचांग हटा (म. प्र.) या पंचांगांचे गणित करून ते देत असत. शिवाय स्वातंत्र्यापूर्वीपासून लाहोरला विश्वमार्तण्ड पंचांग, मेहर आलममंत्री गुरुमुखी पंचांग हे ते करून देत असत, तसेच विश्वविजय पंचांग त्यानंतर दिल्लीच्या गणिताचे करून दिल्लीलां प्रकाशित केले. सन १४६६ सालीं अलोले येथे बृहन्महाराष्ट्र पंचांग परिषद झाली तेथेहि हे चित्रापक्षाचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. तेथील त्यांची विद्वत्ता पाहून जगन्नाथपुरीचे शंकराचार्य योगेश्वरानंदतीर्थ यांनीं त्यांना गणकचूडामणि पदवी देऊन गौरव केला.

अहिताग्नि राजवाडे यांचे ज्ञानसत्रांत चित्रा पक्षाचे समर्थन १६ दिवस त्यांनी केले. त्यांत रैवत पक्ष कसा अशास्त्रीय आहे व चित्रापक्ष परंपरागत कसे शास्त्रशुद्ध आहे हे त्यांनीं सप्रमाण सिद्ध केले. या सत्रांत सर्व पक्षाच्या विद्वानांची भाषणें झाली. या ज्ञानसत्राचे अध्यक्ष अहिताग्नि राजवाडे यांनी १६ दिवस समारोपाचे भाषण करून वैदिक परंपरेपासून चित्रापक्ष हाच शास्त्रशुद्ध आहे यांची खात्री श्रोत्यांना व पंचांना करून दिली.

पंचांगसुधारणेचे सरकारीं प्रयत्न

अखिल भारतवर्षात दृक्प्रत्ययी अशी एकमुखी पंचांगे निघावीत याकरिता सरकारने एक समिती नेमली होती. त्यांत भारतातले सर्व प्रांतांतील विद्वानांचा समावेश केला होता. समितीच्या सभेत विचारविनीमय होऊन नित्यस्थिर अयनांश घ्यावे असा ठराव झाला. या ठरावाप्रमाणे सरकारनें ५ वर्षाचे पंचांग प्रसिद्ध केले. म्हणून स्थिर अयनांशाचा विरोध करण्याकरितां पं. शर्मा यांनीं गुणव संप्रदाचे धर्मगुरु दीक्षितजी महाराज मुंबई यांचे अध्यक्षतेंत सन १९५३ साली पुण्यांत बृहन्महाराष्ट्रीय व गुजरात पंचांगपरिषद् बोलाविली होती. या परिषदेत स्थिर अयनाशांचा विरोध करण्याचा ठराव करण्यात आला व तो सरकारला पाठविला गेला. त्यामुळे सरकारनें शास्त्रशुद्ध चित्रापक्षीय चल अयनांश घेऊन पंचांग काढण्यास सुरुवात केली.

गेल्या महायुद्धाचे १२ महिनें आधीं भविष्य

पं. शर्मा यांनीं गेल्या महायुद्धाचें भविष्य पुस्तक रूपानें प्रसिद्ध करून सप्टेंबर १९३९ मध्यें जागतिक महायुद्धाला प्रारंभ होईल असे प्रसिद्ध केले होतें. त्यानें तर युद्धांत हिटलरचे पतन, भारताचे स्वातंत्र्य, महात्मा गांधी वध, वल्लभभाई पटेल यांचा मृत्यु, अशीं व इतर राजकीय, मेदिनीय, औद्योगिक, भूकंप, जलप्लावन वगैरेचे भविष्यें खरे ठरत आली आहेत. पुण्याचा महापूर त्याच दरम्यान इतरत्र महापुराचा तडाखा याचा उल्लेख पं. शर्मा यांचे पंचांगांत होता. गेल्या अष्टग्रहीचे प्रसंगी अष्टग्रहीचे कालकूट हा ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केला. त्यांत पं. नेहरू व राष्ट्राध्यक्ष राजेन्द्रप्रसाद यांना पुढील २ वर्षे अशुभ असून त्यांच्या आयुरारोग्या करिता जनतेने धार्मिक उपाय करावेत असे स्पष्ट सुचविले होते.

पुण्याच्या आक्षांश प्रमाणे संपूर्ण माहितीचे मोठे बृहन्महाराष्ट्रीय पंचाग शके १८७२ पासून ते प्रसिद्ध करीत आहेत. पं. शर्मा यांचा शिष्यवर्ग देखील मोठा आहे.

० ० ०

श्री. वसंत लाडोबा म्हापणकर

मालवण.



हे मूळचे रत्नागिरीचे. यांची घरची परिस्थिति अतिशय हलाखीची होती. त्यामुळें यांचें शालेय शिक्षण फार होऊ शकले नाही. ज्योतिष शास्त्राबद्दल त्यांना लहानपणापासून आदर व प्रेम होतें. त्यामुळें त्यांनीं फार प्रयत्नानें याशास्त्राचा अभ्यास केला. ते स्वतः हनुमानभक्त आहेत. साप्ताहिक 'धनुर्धारी' मधून ते गेली बरीच वर्षे भविष्य लिहीत आहेत. वृत्तपत्रांतून भविष्य लेखन करणारे ते पहिलेच ज्योतिषी होत. त्यांचे भविष्य आबालवृद्धांना फारच मार्गदर्शक ठरत असते. त्यांच्या भविष्यलिखाणांत भविष्याला अध्यात्मिक आणि सात्विक विचारांची बैठक असल्यानें त्यांचे भविष्य मोठ्या आवडीनें वाचलें जातें. या शास्त्रांत त्यांचा चांगलाच हातखंडा असून त्यांनीं सांगितलेलीं अनेक भाकितें खरीं ठरली आहेत. त्यांचेकडे रोज अनेक इच्छुक या शास्त्राचे मार्गदर्शन घेण्यासाठी येत असतात. ते गोरगरीब, भिक्षुक यांचेकडून कसलीही अपेक्षा करीत नाहीत. व त्यांना मोठ्या आस्थेनें सल्ला देत असतात. त्यांनीं या शास्त्रांतील 'ज्योतिषालंकार' ही पदवी मिळविली आहेच पण जगद्गुरू शंकराचार्य यांचेकडूनहि त्यांनीं बहुमान प्राप्त केला आहे. फ. अ. मंडळाचे ते एक हितचिंतक असून मंडळाच्या प्रत्येक कार्यास त्यांचा नेहमीच पाठींबा मिळत असतो.

श्री. बाळकृष्ण हरी खाडीलकर पुणें

जन्म दि.– २०–१२–१९१४



यांचें मूळ जन्मगांव सांगली. वडिलांचे सारें वास्तव्य कुरुंदवाड येथें असे. वडिलांचा मुख्य व्यवसाय शेतीचा होता व त्यांना भविष्याचें जुजबी ज्ञान होते. त्यामुळें त्या भागातील अनेक लोक त्यांचेकडे सल्ला, मार्गदर्शन घेण्यासाठीं येत त्यामुळें ह्यांचेवर वडिलांकडून चांगले धार्मिक संस्कार होत गेले. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे यांनीं दत्तोपासना जवळजवळ ३ वर्षे केली. यांचे माध्यमिक शिक्षण कुरुंदवाड येथें झालें व पुढें त्यांनीं पुण्यास येऊन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून डी. सी. ई. ही पदवी प्राप्त केली. नोकरी निमित्तानें त्यांनीं पी. डब्ल्यू. डी. खात्यांत बेळगांव येथें सुरुवात केली. त्यामुळें त्यांना बेळगांव, कारवार, रत्नागिरी सांगली येथें इरिगेशनची कामें करण्याची संधि लाभली. सांगलीहून पुण्यास बदली झाल्यानंतर त्यांना ज्यो. शास्त्राचें संपूर्ण ज्ञान मिळवावे असें वाटूं लागलें व त्यादृष्टीनें त्यांनी प्रयत्न केले. पुढें त्यांनीं पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांचे मार्गदर्शनाखाली ज्यो. शास्त्राचा अभ्यास केला व 'होराभूषण' ही पदवी मिळविली (१९६१). त्यांना या शास्त्राचे अभ्यासासाठीं 'भविष्य सिद्धांत' 'जातकालंकार' या पुस्तकांचा फार उपयोग झाला.

ज्योतिषी हा समाजाची सेवा करूं शकतो हे त्यांनीं स्वतचे उदाहरणानें दाखवून दिलें आहे. मुलींचे विवाहकाल निश्चितपणें काढण्याचें बाबतींत त्यांचा हातखंडा असून त्यांनीं त्यासंबंधी वर्तविलेलीं ९० टक्के भविष्यें खरीं ठरली आहेत. परिक्षेतील यश, बढती, विवाहकाल इ. बाबतींत अधिकाधिक संशोधन करण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच या शास्त्राच्या उच्च अशा परिक्षा देण्याचीहि त्यांची मनीषा आहे. त्यांचेकडे येणाऱ्या इच्छुकाला ते केवळ सेवाधर्मानें व निरपेक्षबुद्धीनें मार्गदर्शन करीत असतात. "भविष्य हा कांहीं मार्ग नव्हे तर अंधारांत चांचपडणाऱ्या मानव जातीला तो एक मार्गदर्शक होणारा तेवत असलेला दिवा होय असें यांचें मत आहे."

श्री. नारायण माधव ऊर्फ नानासाहेब वाळके.

(माजी उपमहापौर, पुणें म. म. पा)
जन्मस्थळ–पुणें. जन्म दि. १४।२।१९२०

यांचे मूळ जन्मगांव पुणें. यांची घरची परिस्थिती अतिशय बिकट होती, वडील खाजगी नोकरीत होते. त्यामुळें त्यांनी प्राथमिक शिक्षण पूर्ण करून शाळेस रामराम ठोकला व स्वतःचे पायावर उभे राहण्याचे दृष्टीनें वाटचाल करण्यास सुरुवात केली यांनालहानपणापासूनच खेळ, व्यायाम व समाजिक कार्य यांची भारी आवड. मंगळवार पेठेतील हनुमान व्यायाम मंडळांत श्री. वर्डे मास्तर यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनीं शारिरीक शिक्षण घेतलें. वेगवेगळया सामाजिक कार्यक्रमांत ते मोठ्या आवडीनें भाग घेत असत. वयाचे १६ वें वर्षापासून त्यांनीं नोकरीस सुरुवात केली. पुढे नोकरी सोडून त्यांनी हॉटेलचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केला व त्या धंद्यात चांगला नांव लौकीक व यश संपादन करून आजतागायत ते त्यांतच स्थिर राहिले. ज्योतिष शास्त्राकडे ते केवळ एक छंद व औत्सुक्य म्हणून वळले. श्री. जयरूप रत्नाजी श्रीमाळी ब्राम्हण (राजस्थान) यांचे मार्गदर्शनाखालीं त्यांनी हस्तसामुद्रिक, कुंडली शास्त्र यांचे शिक्षण घेतलें. त्यांनीं या शास्त्रावरील अमूल्य असा पुष्कळ ग्रंथ संग्रह केलेला आहे त्याचीहि त्यांना फारच हौस. जुन्या ज्यो. ग्रंथावरून त्यांनीं अभ्यास केला. इंग्रजी मुळीच येत नसतांना त्यांनी एक शिक्षक नेमून त्यांचेकडून मोठमोठ्या ज्यो. ग्रंथांचे(चिरो, बेनहॅम)भाषांतर करून घेऊन त्याचे आधारें या विषयाचें ज्ञान संपादन केलें. तसेंच कै. राजे, श्री. प्रधान यांची पुस्तकें फारच उपयुक्त ठरली असे ते म्हणतात. त्यांनी संपूर्ण भारतभर व परदेशांतहि भरपूर प्रवास केला आहे. त्यामळें त्यांना



निरनिराळे अनुभव मिळून त्यांचे ज्ञानांत नवी भरच पडत गेली.

ज्यो. शास्त्राबरोबरच त्यांचें आणखी एक आवडते कार्यक्षेत्र म्हणजे राजकारण. त्यांनही त्यांनीं अनेक प्रकारे काम केलें. व त्याचे सुफल म्हणजे १९ डिसेंबर १९६१ रोजीं ते पुण्याचे उपमहापौर म्हणून निवडून आले. त्यांचें कौटुंबिक जीवन सुखाचें आहे. ते सर्व गोष्टी निरपेक्षबुद्धीने व परोपकारी वृत्तीनें करीत आले असून अजूनहि त्यांचे तेंच ब्रीद कायम आहे.

ज्योतिषशास्त्रांतील भूत–पिशाच्च-विद्येचा त्यांना विशेष अभ्यास असून त्या संबंधीच्या शंका–कुशंकांचे निरसन ते कोणालाही विनामूल्य करीत असतात, गब्बा (पुणें) चित्रलेखा (कोल्हापूर) यामधून त्यांनीं वरेच भविष्यलेखन केलेले आहे. फलज्योतिष मंडळाशीं त्यांचे अतिशय स्नेहाचे संबंध आहेत. मंडळाच्या कोणत्याहि उपक्रमास त्यांचा नेहमीच पाठिंबा व सहकार्य मिळत असते. 'ज्योतिष विशारद' ही बहुमानाची पदवीही त्यांनीं मिळवली आहेच. या शास्त्रामध्यें खरें यश

मिळायला हवें असेल तर कोणातरी सिद्ध पुरुषाची कृपा असली पाहिजे किंवा उपासनेने आत्मिक बल वाढविणे जरूर आहे असे त्यांचे स्वानुभवांनी मत झालें आहे. ते स्वत: प्रसिद्धीपराङ्मुख आहेत. या शास्त्राचे अभ्यासाने त्यांनीं स्वत:चे कांही आडाखे बसविले असून त्यांनीं वर्तविलेली अनेक भविष्यें खरीं ठरली आहेत. त्यांचेकडे येणाऱ्या पृच्छकाला ते मोठ्या मनाने व निरपेक्ष बुद्धीनें या शास्त्राचे मार्गदर्शन करीत असतात.

पं रघुनाथशास्त्री पटवर्धन पुणें २

फलज्योतिष अ. मंडळाचे माजी अध्यक्ष व आमचे गुरुवर्य पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन यांचे नांव माहीत नाही असा माणूस सांपडणें विरळाच. त्यांनीं या शास्त्राचे वाढीसाठी आपलें सारें आयुष्य वेचलें. त्यांची तुलना पुरातन ऋषीमुनींशीं केल्यास ते वावगे ठरूं नये. या शास्त्राची त्यांनीं सुमारे ५० वर्षे अखंडपणें सेवा केली आहे. या शास्त्रावर सुमारे २५० ते ३०० ग्रंथ लिहिले असून ते या विषयाचे अभ्यासूंना फारच उपयुक्त ठरत आहेत. त्यांनीं या शास्त्राचे अधिक संशोधन व्हावे व त्याचा प्रसार व्हावा या हेतूनें ज्यो. शि. महाविद्यालयाची स्थापना करून त्याचेद्वारे सुमारे ५००० विद्यार्थ्यांना या शास्त्राचें ज्ञान दिलें आहे. याजबरोबर ते टिळक पंचांग आजतागायत मोठ्या प्रयत्नपूर्वक प्रसिद्ध करत आले असून त्यांतील ग्रह–गणिते किती अचूक असतात ते पटवून देण्याची त्यांची केव्हाही तयारी असते. ते गणेशभक्त असून त्याची उपासना वाढावी या सद्हेतूने त्यांनीं फारच प्रयत्न केले आहेत. त्यांच्या ज्योतिष कार्याला थोरामोठ्यांचा हातभार व आशिर्वाद लाभलेला आहे. मंडळाचे ते सुरुवातीपासून अध्यक्ष होते व त्यांचे आशिर्वादानेंच फ. अ. मंडळाची प्रगति होत गेली आहे. त्यांना दीर्घायुरारोग्य लाभून त्यांचे हातून ज्यो. शास्त्राची अधिक सेवा घडो हीच गणेशचरणीं प्रार्थना !

चंद्रभान आप्पाजी धनवटे

जन्म तारीख १-१-१९१४

हे व्यवसायानें शिक्षक असून या शास्त्राकडे ते स्वानु-



भवानें आकर्षित झाले आहेत. प्रथम ह्यांचा या शास्त्रावर बिलकूल विश्वास नव्हता पण पुढें कांहीं परिस्थितीमुळ त्यांनीं या शास्त्राचें मार्गदर्शन घेतले व अनुभवांनी स्वतःच त्याचा अभ्यास करण्यास प्रवृत्त झालें.

यांचे शिक्षण ट्रेंड २रे वर्ष, हिंदी शिक्षक कोर्स पूर्ण केला आहे. तसेच ज्योतिष शास्त्रांतील (१) ज्योतिष प्रमाणपत्र परीक्षा (२) ज्योतिष प्रवीण (३) ज्योतिष प्राज्ञ व (४) होराभूषण या सर्व परीक्षा ते उत्तीर्ण झाले आहेत. आणखीहि परीक्षा देण्याचीहि त्यांची उमेद आहे.

त्यांना अध्यात्माची आवड असून आरोग्य, वैद्यक, शिक्षणशास्त्र, यांचीहि आवड व व्यासंग आहे. तसेच त्यांचेजवळ वरील विषयांवरील पुस्तकें आहेत. फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या ज्योतिष प्रवीण, ज्योतिष प्राज्ञ परीक्षा देऊन पदवी प्राप्त केली.

परमेश्वरानें ठेवले असेल त्यांतच सुख यानून मनुष्यानें राहावे अशी यांची विचारधारणा आहे. हे सत्याचे उपासक आहेत. व समाजसेवेचीहि त्यांना भारी हौस व इच्छा आहे. एकंदरीत पाहतां हरहुन्नरी स्वभावाचे आहेत.

मु. पो. गणेशनगर,
ता कोपरगांव,
जि. अहमदनगर.

सावळाराम नारायण इनामदार

जन्मतारीख १-८-१९२७. बी. ई. (सिव्हील)



यांचा जन्म खटाव (जि. सातारा) येथें झाला. सन १९४४ मध्यें ते एस्. एस्. सी. पास झाले. त्यांत त्यांना हायर सेकंड क्लास मिळून उत्तीर्ण झाले. त्यांनीं ड्रॉईंगच्या दोन परीक्षा व हिंदीच्या राष्ट्रभाषा प्रवीण व कोवीदहि ते चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाले आहेत. सन १९५० मध्यें ते पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधून सिव्हील इंजिनिअरिंगचा डिप्लोमा कोर्स दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले आहेत.

त्यांना लहानपणापासूनच या शास्त्राची आवड. शाळेंत असताना या शास्त्रावरील पुस्तकें वाचण्याचा त्यांना छंद होता. पुढें त्यांनीं या विषयावरील वाचन व मनन सतत चालूं ठेवलें. पुढें फलितें वर्तविण्याचा प्रयत्न सुरू केला. नंतर शास्त्रीय दृष्टीनें या शास्त्राचा अभ्यास व्हावा या हेतूनें त्यांनीं फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या (१९६४) ज्योतिष प्रवीण व (१९६५) ज्योतिष प्राज्ञ या परीक्षेचा अभ्यास करून ते दोन्ही परीक्षेंत उत्तम यशाचे भागीदार ठरले. येईल ती पत्रिका शास्त्रीय व संशोधनात्मक दृष्टीनें पाहण्याकडे त्यांचा कल असून ते आपला व्यासंग वाढवीत आहेत. येणारे अनुभव त्यांना उपयुक्त ठरत असून या विषयातील अधिक ज्ञानसंपदा मिळविण्याची त्यांची जिद्द आहे. त्या दृष्टीनें ते जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असून लवकरच ते या विषयात पारंगत होऊन या शास्त्राचा प्रसार जनतेंत करतील असा विश्वास वाटतो.

मु. पो. रोहा,
जि. कुलाबा.

रामचंद्र बापूराव अलाटे


ज्योतिष शास्त्राकडे यांचें मन वळण्यास त्यांचा मुलगाच कारणीभूत झाला. त्यांचे जन्मटिपण त्यांनीं एका फिरत्या ज्योतिषाकडून करून घेतले होते. त्यांच्या वडिलांच्या मताप्रमाणें ते चुकीचें ठरले. तेव्हां ते का चुकलें असावें अशी साहजिकच जिज्ञासा उत्पन्न होऊन तेव्हांपासून या शास्त्राबद्दल उत्सुकता वाटू लागली. पुढे वडिलांनीं ते टिपण कसे चूक आहे ते शास्त्राधारें दाखविले व वडिलांचे मार्गदर्शनाखाली त्यांनीं ज्योतिषशास्त्राचा अभ्यास सुरू केला. भावचलित व षड्वर्ग कुंडल्या यांची माहिती घेऊन त्यांतहि ते तरबेज झाले. परंतु एवढ्यावरच संतुष्ट न राहता पुढें त्यांनीं फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या ज्योतिष प्रवीण व प्राज्ञ या परीक्षा देऊन ते त्यांत उत्तम तऱ्हेनें उत्तीर्णहि झाले. पुढें त्यांनीं या विषयांतील तज्ज्ञ व्यक्तींना एकत्र आणून कार्य करावे या हेतूनें प्रेरित होऊन वालचंदनगर येथें फलज्योतिष अभ्यास मंडळाची एक उपशाखा स्थापन केली. तेव्हांपासून ते तेथें कार्यवाह आहेत. प्रत्येक ज्योतिषास स्पष्ट ग्रह काढण्यास जो त्रास होतो व वेळ जातो तो वाचावा व ते काम सोपें व्हावें या दृष्टीने त्यांनीं एक पुस्तिका तयार करण्यास घेतली असून ती लवकरच प्रसिद्ध करण्याचा त्यांचा मानस आहे. हें काम सध्याचे परिस्थितींत जरी बिकट असलें तरी तें करून या शास्त्राचे अभ्यासूंना त्याचा उपयोग होऊन या शास्त्राची सेवा घडावी या उदात्त हेतूनें त्यांनीं हें कार्य हातीं घेतलें आहे. परमेश्वर त्यांना यश देवो असे कोणीहि म्हणेल.



डी-१२।४ पोस्ट कॉलनी.
मु. पो. वालचंदनगर,
जि. पुणें

बन्सीलाल बिसनदास पितळे
B. Sc.

अहमदनगर जिल्ह्यांतील सुरेगांवी यांचा जन्म झाला. यांचे शिक्षण B. Sc. पर्यंत झाले आहे. कॉलेजचें शिक्षण पुणें येथील फर्ग्युसन कॉलेजमध्यें झालें. यांना पहिल्यापासून व्यायामाची व खेळाची आवड. त्यांची कॉलेजमध्यें असतांना रेसलिंग, हुतूतू, व हॉलीबॉल टीममध्यें निवड झाली होती.



पुढें त्यांनीं पोलीस खात्यांत नोकरी धरली व स्वकर्तृत्वावर ते फौजदार झाले. मुंबई येथें चार वर्षे फौजदार म्हणून नोकरी केली. त्यामुळें नोकरी करीत असतांना साहजिकच गुन्हेगारांशीं संबंध येई. तेथें चोरी खून, फसवाफसवी असे गुन्हें करणाऱ्या हातांच्या रेषा स्ट्रक्चर त्यांच्या पाहाण्यांत आल्या. पुढें कांही ठराविक चिन्हें ठराविक गुन्ह्यांच्या बाबतीच्या दिसून आली तेव्हा ज्योतिषशास्त्राशीं कांहीं संबंध येतो कां या जिज्ञासेनें त्यांनीं चिरो व बेनहॅमची हस्तसामुद्रिकावरची पुस्तकें वाचली. व तेव्हांपासून त्यांना या शास्त्राचा छंद जडला.

या शास्त्राची उपयुक्तता पटल्यानें त्यांनीं अभ्यास वाढविला. पण मूळची व्यापारीवृत्ति त्यामुळें नोकरींत जमेना म्हणून नोकरी सोडून बेलवंडी गांवी तें आले. तेथें कापड दुकान सुरू केलें. ते आजतागायत उत्तम प्रकारें सुरू असून या शास्त्राचा अभ्यासहि त्यांनीं चालू ठेवला आहे. मंडळाची ज्यो. प्रवीण ही परीक्षा ते उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण झालें आहेत. या शास्त्राचा अभ्यास वाढवून त्याचा व्यावहारिक जीवनांत जास्तीत जास्त उपयोग कसा करता येईल या दृष्टीनें त्यांचा प्रयत्न सुरू आहे.

मु. पो. बेलवंडी,
ता. श्रीगोंदे,
जि. अहमदनगर.

बृहभृत्यो धनी भोगी पितृभक्तो महोद्यमी।
चमूनायो राजसेवी मघायां जायते नरः

मघा नक्षत्रांत जन्माला येणारे संपत्ती व नोकरवर्गांनी सुखी असतात. वडील भक्त, सेनापति आणि राजा यांची सेवा करणारे असतात.

श्री. कृष्णाजी वामन जोशी


जन्म दिनांक १९ जून १९२०



यांचा जन्म एका भिक्षुक घराण्यांत झाला. परंतु घरच्या प्रेमळ लोकांच्या सान्निध्यांत बालपणीचा काळ मजेंत गेला. पुढें वयाचें अकरा वर्षांनंतर त्यांचेवर कुटुंबांतील एकेक व्यक्तींचा आधार नाहीसा होत गेला. मराठी शिक्षण जन्मगावीं झालें पण इंग्रजी शिक्षण हलाखीचे स्थितीमुळें होऊं शकलें नाही. सन १९४० चे सुमारास काही राजकीय कार्यकर्त्यांचा सहवास लाभला त्यामुळें राजकीय व सामाजिक कार्याची आवड निर्माण होऊन कार्यास सुरुवात झाली. सन १९४२ पर्यंत खादी विद्यालयांत खादी शिक्षण घेतलें. पुढें त्यांनीं सुप्रसिद्ध अशा महाड मोर्चात सन १९४२ मध्यें भाग घेतला होता व त्याबद्दल त्यांचेवर खटला होऊन त्यांना ३ वर्षे कारावास सोसावा लागला. पुनश्च त्यांनीं काँग्रेसचे कार्यास जोमाने सुरवात केली. पुढें सन १९४८ मध्ये विवाहबद्ध झाल्यानें प्रापंचिक जबाबदारी पडली त्यामुळें कांहींतरी व्यवसाय करणे भागच होते. परंतु आर्थिक साहाय्य व बळ नसल्यानें कोणताहि व्यवसाय स्वतंत्रपणे जमेना. पुढे एका शिक्षण संस्थेचे काम अंगावर घेतलें. या साऱ्या धकाधकीच्या व अस्थिर परिस्थितीमुळें ज्योतिषशास्त्राकडे त्यांचें मन वेधलें व त्याची आवडहि उत्पन्न होऊन सन १९६२ साली अभ्यासास सुरवात केली. नंतर त्यांनीं संस्थेच्या प्रवीण व प्राज्ञ या परीक्षा दिल्या व त्यात उत्तम तऱ्हेनें यशस्वी झाले. यापुढें संस्थेच्या ज्यो. विशारद परीक्षेस बसण्याचा त्यांनीं विचार केला आहे यापुढील आयुष्यांत या शास्त्राचा अभ्यास वाढवून त्याची सेवा करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरूं आहे.

चवदारतळे,
मु.पो. महाड,
जि. कुलाबा.

एम्. आर. कुलकर्णी




यांचे वडील लहानपणींच निवर्तलें. त्यामुळे स्वावलंबनानें व फार कष्टानें शिक्षण घ्यावें लागलें. त्यांनीं सन १९४८ ते १९५६ या काळांत अनाथालयांत राहून तेथील संस्थेची कामें करून, टेक्निकल कोर्स घेतला व मॅट्रिकपर्यंत शिक्षण केलें.

यांनीं स्वतःबद्दल येणारा कांहीं अनुभव कां येतो ? हे पडताळण्याचें दृष्टीनें या शास्त्राचा अभ्यास सुरू केला. त्यांचेजवळ सन १९१४ पासूनच्या पंचांगांचा संग्रह आहे. हस्तरेषा व शरीर लक्षणावरूनहि ते थोडेफार भविष्य वर्तवितात. या शास्त्राचा सल्ला व मार्गदर्शन अत्यल्प फीत जिज्ञासूंना देऊन या शास्त्राची सेवा करीत आहेत.

८५१ भागवत वाडा,
कापड पेठ, मु. पो. जि. नाशिक

देवगिरिकर महादेवकर गोसावी



यांचें शालेय शिक्षण मराठी सातवीपर्यंत झाले. त्यांचा या शास्त्राकडे लहानपणापासूनच ओढा होता. त्यांनीं मशिनचें काम सांभाळून या विषयाचा अभ्यास केला व या शास्त्रातील दोन परिक्षा ते उत्तीर्ण झाले आहेत. या विषयाचा अधिक अभ्यास करण्याचा त्यांचा मानस आहे. त्या दृष्टीनें ते प्रयत्न करीत आहेत. आजुबाजूचे भागांतील लोकांना त्यांच्या ज्ञानाचा उपयोग खचितच होईल असें वाटतें.

मु. पो. मौजे वनकुटे,
ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

शांताराम गजानन मिरजकर

M. A., S. T. C.

जन्म १३ एप्रिल १९३४.

यांचे मूळ गांव बेळगांव. हे या संस्थेचे एक सभासद व या शास्त्राचे एक विद्यार्थीहि आहेत. त्यांना या शास्त्राची लहानपणापासूनच आवड. त्यांनीं या विषयावरील अनेक पुस्तकें वाचलीं आहेत. त्यांचें शिक्षण चालूं असतांना इयत्ता आठवीमध्यें त्यांनीं शाळा सोडली. त्यानंतर आपणहि मॅट्रिक व्हावे असें त्यांना वाटूं



लागले. पण आजूबाजूचे लोक व प्रत्यक्ष शिक्षक 'तू काय मॅट्रिक होणार? कधीच होणार नाही' असे म्हणून त्यांना हिणवू लागलें. त्यामुळें ते मनानें निराश होऊन खचले. व त्यांनीं या शास्त्राचा आधार घेण्याचे ठरवून त्यांनीं एका ज्योतिषाला सल्ला विचारला. त्यानें पत्रिका पाहून 'पदवीधर व्हाल' म्हणून सांगितलें. पण त्या वेळीं त्यांना ते खरे वाटलें नाहीं पुढें ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेच. पण जिद्द व प्रबळ इच्छेच्या जोरावर ते अर्थशास्त्र घेऊन बी. ए. देखील उत्तीर्ण झाले. नंतर त्यांना विरोध करून हिणवणाऱ्यांची तोंडे आपोआप बंद होऊन एक प्रकारची प्रतिष्ठा त्यांना लाभली. हे सर्व करीत असतांना त्यांनीं संगीताचाहि अभ्यास सुरू ठेवला होता. कारण संगीताचें त्यांना लहानपणापासून जबर आकर्षण! ते गंधर्व महाविद्यालयाच्या सर्व परीक्षा उत्तीर्ण असून 'संगीत विशारद' ही हार्मोनियम वादनांतील पदवीहि त्यांनीं प्राप्त केली. त्यांना लहानपणापासूनच वाचनाची फार हौस. त्यांनीं मराठींतील अग्रगण्य साहित्यिकांचे साहित्य वाचले आहे. त्यांचा परिणाम म्हणूनच की काय अनेक मासिकांमधून त्यांनीं लिखाणहि केलें आहे. वसुधा, धनुर्धारी (साप्ताहिक) मधून कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. हिंदुस्थान व चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधारित 'सौभाग्य अलंकार' ही कथा साहित्य रस स्पर्धेनें स्वीकारून 'साभार पोंच' या कथासंग्रहांत प्रसिद्ध केली आहे. अजूनहि शिकण्याची त्यांची उमेद असून या विषयावरहि त्यांचा अभ्यास सुरू आहे.

१५७ सलईवाडा,
मु. पो. सावंतवाडी,
जि. रत्नागिरी.

सौ. मनोरमा दत्तात्रेय चिपळूणकर

या मॅट्रिक उत्तीर्ण झाल्या असून मूळ स्वभाव मनमोकळा, नवीन शिकण्याची दांडगी हौस, तसेच अनेक विषयांचें वाचन अभ्यास अन् त्याचे जोडीला यजमानांचा सक्रिय पाठिंबा त्यामुळें त्या ज्योतिषशास्त्राकडे आकृष्ट झाल्या. संस्थेच्या ज्योतिष प्रवीण, ज्योतिष प्राज्ञ या परीक्षा अतिशय



परिश्रमानें व अभ्यासू वृत्तीनें चांगल्या गुणांनीं उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांनीं स्वतः अनेक कुंडल्यांचा संग्रह केला असून त्यांत महिलांच्या पत्रिका विशेष आहेत. तसेच या ज्योतिष विषयावरील अनेक ग्रंथांचें वाचन करीत असतात. व त्यांनीं ग्रंथसंग्रहही केला आहे. त्या या विषयाचा अधिक सखोल अभ्यास करावा व त्यांत संशोधनाची दृष्टि असावी असा त्यांचा मानस असून त्या दृष्टीनें त्या नेहमीं प्रयत्न करीत असतात. ज्योतिष विशारद होण्याची त्यांची महत्वाकांक्षा असून त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न सुरू आहेत.

६९१, बुधवार पेठ,
पुणें. २

सर्पायाः प्रथमे भद्रं द्वितीये च धनक्षयाः ।
मातुः पीडा तृतीये चः चतुर्थे चरणे पितुः।।

आश्लेषा नक्षत्राच्या पहिल्या चरणात उत्पन्न होणारे बालक कल्याण करणारे, दुसऱ्यात धनाचा नाश करणारा, तिसऱ्यांत मातेला पिडीत, आणि चवथ्या चरणांत पित्याला पिडीत असतो.

विनायकराव राजाराम जोशी.


यांना शास्त्राची आवड लहानपणापासूनच. त्या दृष्टीनें त्यांनीं निरनिराळी पुस्तकें वाचून अभ्यास सुरू केला. तसेच फल-ज्योतिष अभ्यास-मंडळाची 'प्रवीण' परीक्षा १९६४ मध्ये ते उत्तीर्ण झालें आहेत. त्यांचें धार्मिक ग्रंथांचे वाचन व अध्ययन आहे. त्यांना सप्तशती फार उत्तम तऱ्हेनें वाचता येते. ज्योतिष पाहणें हा त्यांचा वंशपरंपरागत व्यवसायच आहे. त्यांचे वडील व आजोबा घरीच पंचांग तयार करीत असत. यांची घरची परि-स्थिती बेताचीच, पण शिकण्याची हौस दांडगी. या विषयाचा अभ्यास वाढवून नांव मिळविण्याची त्यांची जिद्द असून ते तसा प्रयत्न करीत आहेत.



मु. पो. लासूर,,
ता. चोपडे.
जि. जळगांव

देवीदास व्यंकटेश श्रीकांत


यांचा जन्म जहागिरदार यांचे सुप्रतिष्ठीत कुळांत झाला. ज्योतिषशास्त्राची यांना लहानपणापासून आवड. पुढें त्यांनीं या विषयांतील ग्रंथ, पुस्तकें वाचून अभ्यास सुरू केला. वेळ प्रसंगीं अनुभवी व्यक्तींचें मार्गदर्शन घेतलें घरच्या घरीं अभ्यास करून संस्थेच्या ज्योतिष प्रवीण व ज्योतिषप्राज्ञ या परी-क्षांत ते उत्तीर्ण झाले आहेत.स्पष्ट ग्रहासहित कुंडली तयार करणें तसेच कुंडलीवरून अचूक भविष्य सांगणें ह्री कामें ते करतात.या भागांत ते प्रख्यात आहेत. कोणत्याहि कार्यासाठी मूहूर्त काढण्यांत त्यांचा हातखंडा आहे. त्यांनीं या भागांतील बऱ्याच लोकांच्या जन्मकुंडल्या तयार केल्या आहेत. तसेंच या विषयाचा अधिक अभ्यास करण्याचा त्यांचा विचार असून त्या दृष्टीनें ते प्रयत्नशील आहेत.



मु. पो. कन्नड,
व्हाया–चाळीसगांव,
जि. औरंगाबाद.

रामराव सदाशिव पाठक

यांचे घराणे आध्यात्मिक आणि धार्मिक कामकाज करणारे. वडील क्षेत्र उपाध्याय होते. त्यांनीं जवळ जवळ ७०–७१ वर्षे श्री जगत् जननीची सेवा केली. यांचे स्वतःचे शिक्षण १० वी पर्यंत झालें. नंतर त्यांचा एक वर्षाचा काळ राजकीय चळवळीत गेला. नंतर त्यांनीं पोलिसखात्यांत वेगवेगळ्या जागेवर काम केलें. पुढें १९६० नंतर त्यांनीं वडिलांकडून या विषयाचे थोडेफार शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यामुळें या विषयाची जिज्ञासा वाढत गेली. पुढें वडिलांचे छत्र नष्ट झाल्यामुळे यांची कौटुंबिक जबाबदारी वाढली तरीही व्यवसाय सांभाळून त्यांनीं ज्योतिषशास्त्राचा अभ्यास सतत चालू ठेवला. आणि या विषयाची परीक्षा दिली. पण इतर घरगुती अडचणींमुळें अधिक परीक्षा देणे शक्य झाले नाहीं. पुढे त्यांनीं या विषयावरील वाचन चालूच ठेवले व मंडळातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'ज्यो. समाचार' मधील लेख वाचून अभ्यास वाढविला. त्यांनीं वर्तविलेली भाकितें ७० ते ८० टक्के खरी ठरली आहेत या विषयाचा अभ्यास वाढवून ते अधिक प्राविण्य मिळवतील असा विश्वास वाटतो.



क्षेत्र उपाध्ये,
मु. पो. अंबेजोगाई,
जि. बीड

सौ. कुमुदिनी पेडणेकर ऊर्फ कोठारी.



यांच्यासारख्या सुप्रसिद्ध संगीतज्ञ विद्यार्थिनी संस्थेला लाभल्या हें खरोखरच भाग्यच म्हटले पाहिजें. यांचे नांव सुगम संगीतामुळें महाराष्ट्रांतील लहान थोरांना माहीत आहेच. त्या आपल्या संगीतामुळें लोकांची अंत:करणें जिंकून घेतातच; परंतु त्याचबरोबर लोकांचे मनांत व भवितव्यांत काय आहे हे त्या आपल्या ज्योतिष शास्त्राच्या आधारें जाणतात.

कविवर्य श्री. पद्माकर जोशी व त्यांचे ज्येष्ठ बंधू श्री. विश्वनाथ पेडणेकर यांच्यामुळें त्यांना प्रथम ज्योतिषाविषयीं आवड निर्माण झाली. श्री. शरद रेगे व कै. राजे यांनींहि त्यांना बहुमोल मार्गदर्शन केलें. त्यामुळें त्यांचा व्यासंग वाढला. अर्थात् हा अभ्यास केवळ कला म्हणूनच होता. त्याला गणितशास्त्राची बैठक व शास्त्र म्हणून अभ्यास करावयाला लावण्याचे श्रेय "फल ज्योतिष अभ्यास मंडळाला" असल्याचें त्या प्राजंळपणे कबूल करतात. मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांचा परिचय झाल्यापासून त्यांचें मार्गदर्शन लाभल्यानें अभ्यास वाढण्यास मदत झाली. पुढें त्या संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या.

त्यांच्याजवळ बराच कुंडलीसंग्रह व ग्रंथसंग्रह आहे. त्यांच्या व्यासंगामुळें अनेक लोक त्यांच्यांकडे सल्ल्यासाठी नेहमी येत असतात. त्यांचा अभ्यास अजूनहि चालूंच आहे. नवनवीन सिद्धांताची भर त्या आपल्या ज्ञानांत नेहमीं घालतात. रेडिओस्टार म्हणून जशी त्यांनीं मानमान्यता मिळविली आहे, त्याचप्रमाणें ज्योतिष वर्तवण्यांतहि त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. अर्थात् एवढें असूनहि त्यांची आपल्या आजोबांइतकी प्रगति व्हावी अशी इच्छा आहे. त्यांचे आजोबा सांखळी (गोवा) येथें अत्यंत प्रसिद्ध होते. भाडळी हस्तलिखीतावर ते अतिशय अचूक भविष्य सांगत. व तेहि एक पैहि न घेता. हीच परंपरा यांनींहि चालविली आहे. सांखळी येथील त्यांच्या घराण्यांतील जुनी हस्तलिखितें वाहून गेल्यामुळें त्यांना अत्यंत खेद होतो.

११७ अ. एरंडवणा
प्रभात रोड, पुणें ४.

विनायक विष्णु अभ्यंकर

ज्योतिषविशारद
जन्म–२३–१२–१८९७



यांचा जन्म अभ्यंकर–दीक्षीत या कर्मठ घराण्यांत रत्नागिरी जिल्ह्यांतील कुर्धे गांवीं झाला. यांचे घरांत अग्निहोत्री चाले. तसेच घरी भिक्षुकी असे. त्यामुळें त्यांनी वयाचे ८ वे वर्षीच ज्योतिषशास्त्राचा ओनामा घेतला. पुढें त्यांनीं ॲलन-लिओच्या ज्योतिष ग्रंथाचा अभ्यास केला. १९१७–१८ मध्यें त्यांचा पुण्यांतील एका ज्योतिष महाविद्यालयाशी संबंध आला. व विद्वान ज्योतिषांचे लिखाण वाचण्यांत येऊन त्यांचेहि लक्ष याकडे अधिक वेधले. व त्यांचेमध्यें संशोधनाची दृष्टि निर्माण झाली.

त्यांनी आतापर्यंत सुमारे १ लाख पत्रिका अभ्यासल्या आहेत. ते पहिल्यापासून जपसाधना करतात व त्यांना विजापूर येथ एका महापुरुषानें जगदंबेच्या जपाची दीक्षा दिली व तो नामजप अजून चालू असून ७ कोटीपर्यंत झाला आहे. १९६३ मध्यें संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांचे प्रोत्साहनामुळें ते वयाचे ६६ वे वर्षी ज्योतिष विशारद उत्तीर्ण झाले. ज्योतिषाला या शास्त्राचे अभ्यासा बरोबर उपासनेची जोड असणें आवश्यक आहे असें त्यांचें स्वानुभवानें मत बनलें आहे.

पेंडसे नगर,
मु. पो. डोंबिवली,
जि. ठाणें

रघुनाथ विष्णु सोवनी

बी. ए.

जन्मतारीख ७ एप्रिल १९१४




यांची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची. लहानपणापासून गणित व संस्कृत हे विषय चांगले. तयार होते. हिंदुधर्म व संस्कृति यांचा त्यांना अभिमान. त्यांनी घरीच अभ्यास करून हिंदीच्या कोविदपर्यंतच्या परीक्षा दिल्या. त्या सर्व ते प्रथम श्रेणींत उत्तीण झाले. हे प्रथमपासून शिस्तीचे व संघटनेचें भोक्ते व त्यामुळें रा. स्व. संघाचे द्वारा ३ वर्षे शारीरिक व संघटनविषयक शिक्षण घेतलें. त्यामुळें अनेक लोकांचा परिचय व स्नेह लाभला. इचलकरंजी येथें विणकाम धंद्यातील लोकांची एक छोटीशी संघटना स्थापन केली. परंतु माणसाच्या मनाचे विविध पैलू हे केवळ परिचयाचे व अनुभवाचे वळावर होत नसून ज्योतिष हेच एकमेव असे साधन आहे अशी खात्री वाटल्यावरून त्यांना या शास्त्राबद्दल आस्था व गोडी निर्माण झाली. त्या दृष्टीने त्यांनीं प्रयत्नपूर्वक अभ्यासास सुरुवात करून फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या ज्योतिष प्रवीण व ज्योतिष प्राज्ञ या परिक्षा घरच्या घरी अभ्यास करून दिल्या. व त्यात ते उत्तीर्ण झाले. त्यांनीं पं रघुनाथशास्त्री पटवर्धन यांचें मराठी ग्रंथ, पं. भगवानदास मिसळ यांचे हिंदी ग्रंथ तसेच ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिन वगैरेचे आधारें वाचन व अभ्यास केला आहे. त्यांचे परिचितांच्या कुंडल्याचा ते संशोधनात्मक दृष्टीनें तौलनिक अभ्यास करीत असून तशांत कुंडली संग्रहहि करीत असतात. या शास्त्राधारें गरजूंना योग्य मार्गदर्शन करावे, अशी त्यांची प्रबळ इच्छा असून त्या दृष्टीनें ते आपल्या ज्ञानाचा लाभ इतरांना करून देतात. या शास्त्रांत अधिक संशोधनाचें दृष्टीनें लेखन करण्याचा तसेच पंचांगोपयोगी ग्रहगणित तयार करण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे. परमेश्वराचा त्यांच्यावर वरदहस्त राहो हीच उत्कट इच्छा.

मु. पो. इचलकरंजी.
जि. सांगली.

प्रभाकर पांडुरंग बोडस

जन्म ता. १७ जानेवारी १९३६.



यांचे मूळ घराणे कोकणपट्टीकडील. यांचे वाडवडील परिस्थितीने गरीबच. त्यांचे एक पूर्वज पेशव्यांचे काळीं देशग्रंथी ब्राह्मण म्हणून प्रसिद्धीस येऊन गेले. त्यांना पेशव्यांकडून तनखा मिळून त्यांचा यथोचित मान सन्मानहि होई आईचे घराणेहि तसेंच सुसंस्कृत. तसें त्यांचे घराण्यातहि कांहीं सुप्रसिद्ध ज्योतिषी होऊन गेल्यानें या विषयाकडे त्यांची ओढ स्वभाविकच होती.

लहानपणीं कांहीं ज्योतिर्विदांनीं वर्तविलेलें अंदाज प्रत्यक्षांत खरे ठरल्यानें या विषयाचे आकर्षण वाढले. व त्यांनीं त्याचा अभ्यास सुरू केला. यांचा मूळचा व्यवसाय तांत्रिक म्हणजे डिझाईनरचा. मात्र छंद ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्याचा. कोणतीतरी सुप्त शक्ति या गूढ शास्त्राबद्दलची ओढ निर्माण करते असें ते म्हणतात. या विषयाचे अधिकाधिक ज्ञान संपादन करण्याच्या दृष्टीनें व सेवा घडावी या हेतूनें इतर शास्त्रांप्रमाणें सिद्धांतरुपी नियमांचे चौकटींत अत्यंत सहजतेनें बसविण्याचा त्यांचा विचार आहे. वेळांत वेळ काढून तें या विषयाचा अभ्यास करीत आहेत. आर्थिक स्थिरता असून परमेश्वराचे अस्तित्व व त्याची उपासना यावर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे.

महाजन वाडी
रामनगर,
मु. पो. डोंबिवली,
जि. ठाणे.


विद्यागोधनसंयुक्तो गम्भीरः प्रमदाप्रियाः।
पूर्वा फाल्गुनिकाजातः सुखी पंडितपूजितः॥

पूर्वा फाल्गुनि नक्षत्रात जन्माला येणारी व्यक्ती विद्या आणि वाङ्मयीन बौद्धिक विकासक असते. तसेच स्त्री-प्रिय, सुखी असते.

श्री. सदानंद विठ्ठल पारखी

जन्म दिनांक २ फेब्रुवारी १९४४


सध्या हे ए. एम्. आय. (केमि) चा अभ्यास करीत आहेत. यांना लहानपणापासून या शास्त्राबद्दल उत्सुकता होती. त्यांनीं शालेय शिक्षण चालू असतांनाच या विषयावरील पुस्तकें वाचून ज्योतिषशास्त्राचे शिक्षण चालू ठेवलें. या विषयाची ज्योतिष प्राज्ञ ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले, असून त्यांनीं टायपिंगचेंहि शिक्षण घेतले आहे. अजूनहि या विषयाचा अभ्यास वाढवून या विषयांत प्राविण्य मिळविण्याची त्यांची जिद्द आहे. असे विद्यार्थि म्हणजे संस्थेचे एक भूषणच म्हटले पाहिजे. अंगीकृत कार्यांत आम्ही त्यांना सुयश चिंतितो.



२३ डर्बी मेन्शन,
एल्. जे. रोड,
माहीम, मुंबई १६

यशवंत गजानन जोशी

या विषयाची यांना लहानपणापासून आवड. या विषयांतील ज्योतिषप्राज्ञ ही पदवीपरीक्षा ते उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण झाले आहेत. ज्योतिषशास्त्रातील गणितस्कंध व फलितस्कंध यांचा त्यांचा चांगला गाढा अभ्यास आहे. तसेंच त्यांची फलित सांगण्याची हातोटी खरोखर आकर्षक आहे, ते आज पनवेल येथें ज्योतिषाचा व्यवसाय करीत आहेत. तो त्यांचा कांहीं मुख्य व्यवसाय नसल्यानें व त्यांचे इतर व्यवसाय चांगले चालत असल्याने 'पोट-भरणे' एवढेच त्यांचे ध्येय नाही. त्यामुळे ते निर्भिडपणें भविष्य कथन करीत असतात. त्यामुळे या भागातील अनेक जिज्ञासूंना त्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी होत आहे. अनेकांना त्यांची प्रचीति आली आहे. त्यांचे या विषयावरील लेख नवशक्ति, (मुंबई) ज्यो. समाचार-मधून प्रसिद्ध झालें आहे. या विषयाचा अधिक अभ्यास करून या शास्त्राचें महत्व वाढविण्याचा त्यांचा संकल्प आहे. आम्ही त्यांना सुयश चिंतीतो.




चंद्रविलास बिल्डिंग,
टपाल नाका,
मु. पो. पनवेल,
जि. कुलाबा.

प्रभाकर विनायक अत्रे.

जन्मतारीख १५ ऑक्टोबर १९३६.

यांचे घराणे पिढीजात ज्योतिषाचे. यांचे आजोबा कै. वे. शा. सं. खंडेराव गणेशशास्त्री जोशी (कोल्हाडकर अत्रे) हे नामवंत ज्योतिषी व पंचांगणिति होते. त्यामळे या शास्त्राची परंपरा त्यांच्या घराण्याला लाभली आहे. यांचे शालेय शिक्षण मराठी सातवीपर्यंत झाले. घराच्या अडचणींच्या परिस्थितीमुळे १९५० पासून शिक्षणास रामराम ठोकून त्यांनी भिक्षुकीचे व्यवसायास सुरवात केली. पुढे त्यांनाही ज्योतिष शास्त्राची गोडी निर्माण झाली. व त्या विषयाचा अभ्यास त्यांनी सुरू केला. व १९४५ मध्ये ज्योतिष प्रवीण ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले. अजूनही या शास्त्राचा अभ्यास वाढविण्याचा त्यांचा विचार असून त्या दृष्टीने त्यांनी बरीच पुस्तकें जमा केली आहेत. या विषयावर लिखाण करण्याचीही त्यांची इच्छा आहे.




या विषयाचा अभ्यास चालू असतांनाच कुंडलीवरून भविष्य वर्तविणे, जन्मकुंडली तयार करून देणे ही कामेही

ते करीत असतात. त्यांना या विषयांत भरपूर यश मिळत असून त्यामुळें त्यांचा उत्साहहि द्विगुणीत होत आहे. या विषयांत अधिक प्रावीण्य मिळवून ते या शास्त्राची प्रतिष्ठा वाढवतील असा विश्वास वाटतो.

गंगावाडी, नदीकिनारी,
मु. पो. कर्जत,
जि. कुलाबा.

महादेव गोपाळ गोडबोले

जन्म दिनांक १८ सप्टेंबर १९०३




यांची घरची परिस्थिती लहानपणीं बेताचीच होती. लहानपणीच म्हणजे वयाच्या १४ व्या वर्षी आईचा वियोग झाला. पुढें स्वतःच्या पायावर अनेक कष्ट सहन करून त्यांनीं शुगर टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. या शास्त्राबद्दल त्यांना लहानपणापासून आवड. त्यांनीं अनेक ग्रंथ, पुस्तकें, वेळप्रसंगीं स्वतः विकत घेऊन या शास्त्राचा अभ्यास सुरूं ठेवला. पुढें त्यांनीं संस्थेच्या ज्योतिष प्रवीण ज्योतिष प्राज्ञ या परीक्षा दिल्या. व त्यात ते चांगल्या गुणांनीं उत्तीर्ण झालें. सध्यां ते समस्तीपूर शुगर कंपनींत मोठ्या हुद्याचे जागेवर काम करीत असून अजूनहि या विषयाचा व्यासंग वाढविण्याची त्यांची इच्छा आहे. तसेच संस्थेची 'ज्योतिष विशारद' ही पदवी मिळविण्याची त्यांची जिद्द व प्रयत्न सुरूच आहेत. त्यांचा स्वभाव करारी व वृत्ति स्वावलंबी असल्याने एकदा हातीं घेतलेलें कार्य सहसा ते अर्धवट सोडीत नाहींत.

सध्यां त्यांच्या घरीं सुस्थिती असून पत्नीचे व इतर जनांचे उत्तम सहकार्य लाभत आहे. तसेच त्यांचे एक जामात कोपरकर हे आर्किटेक्ट असून त्यांचे वास्तव्य पुणें येथे असते. अशा एकंदर समाधानकारक वातावरणामुळे त्यांचा उत्साह रोज वाढत असून या विषयावर जास्तीत जास्त अभ्यास करून इतरांना मार्गदर्शन करण्याचा त्यांचा विचार आहे. परिस्थितीशी झगडून उद्योग व्यवसाय सांभाळून या विषयाचा मनापासून अभ्यास करणारे व त्याची सेवा घडावी म्हणून तळमळणारे असे सुविद्य विरळेच !

समस्तीपूर सें. शुगर कंपनी लि.
समस्तीपूर फॅक्टरी ब्रँच,
मु. पो. समस्तीपूर
जि. दरभंगा.

पद्माकर जे. बिराजदार

ज्योतिष प्रवीण



श्री. बिराजदार हे भावंडांत सर्वांत लहान त्यामुळे आई-वडिलांचे आवडते चिरंजीव. लहान म्हणून त्यांना परिस्थितीची बिलकूल जाणीव नव्हती त्यांच्या गांवीं शिक्षणाची सोय नसल्यानें त्यांच्या थोरल्या भावानें त्यांना आपल्या गांवीं नेऊन शिक्षण दिलें. व तेथेच त्यांना जबाबदारी कळली.

त्यांच्या वडिलांना ज्योतिषाची आवड. अर्थात तीच आवड श्री. बिराजदार ह्यांच्यांत उतरली. ज्योतिष शास्त्राची आवड व तळमळ ह्या दुहेरी संगमाच्या ओढीनेच त्यांचा "फल ज्योतिष अभ्यास मंडळ" ह्या संस्थेशीं परिचय झाला. व श्री. जकातदार ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं त्यांनीं संस्थेची ज्यो. प्रवीण ही परीक्षा दिली व त्यांत उत्तीर्ण होऊन ज्योतिष शास्त्राची प्रथम पदवी संपादन केली. ज्योतिष शास्त्राचें ज्ञान वाढविण्यास त्यांना संस्था नेहमीच आनंदाने मार्गदर्शन करील.

अजय इंजिनीअरींग कं.
अदालत रोड,
मु. पो. जि. औरंगाबाद.

दाता शूरो मृदुर्वक्ता धनुर्वेदार्थ पंडितः ।
उत्तराफाल्गुनी जातो महायोधा जनप्रियः ।।

उत्तरा—फाल्गुनी नक्षत्रावर जन्माला येणारा मनुष्य दानी, वीर, वक्ता, पराक्रमी आणि सर्वांचा प्रिय असा असतो.

रामचंद्र लक्ष्मण नाईक

ज्योतिष प्राज्ञ.
जन्म दिनांक ५-९-१९०१



यांचे जन्मगांव पूर्व खानदेश जिल्ह्यांतील वरणगांव हे आहे. हे एक वर्षाचें असतांना यांच्या वडिलांचे प्लेगने निधन झाल्यानें त्यांचा आधार तुटला. यांचे नाईक घराणें मोठे घरंदाज म्हणून या भागांत ओळखले जातें. यांचे वडिलांचा थोडासा सावकारीचा व्यवसाय होता. वडिलांचा आधार नाहीसा झाल्यानंतर यांचे जीवन थोडेसे कष्टांत व हालांत गेले. यांचे प्रा. शिक्षण पांचवीपर्यंत वरणगांव येथेच झाले. पुढें वडिलबंधूंच्याकडे ते आले. उमरावतीला त्यांनीं माध्यमिक शाळेंतील शिक्षण पूर्ण केले. १९२१ मध्ये ते मॅट्रीक झाले. इच्छा असून घरच्या अडचणीमुळें कॉलेज शिक्षणांत अडथळा आला.

पुढें त्यांनीं सरकारी हायस्कूलमध्यें नोकरी धरली. १९२४ मध्ये ते स्पेन्स ट्रेनिंग कॉलेजमध्यें २ वर्षे ट्रेनिंग साठीं गेले. व त्या परीक्षेत प्रथम श्रेणींत आले. पुढें त्यांनीं १७ वर्षे साहाय्यक शिक्षक म्हणून सरकारी शाळेंत नोकरी केली. नंतर त्यांनीं मोठमोठ्या हुद्यांच्या जागांवर काम केले. कटोळ येथे असतांना तेथील प्रसिद्ध ज्योतिषी श्री. नरहर सिताराम खोलकुटे यांचा परिचय झाला.

१९५७ मध्यें नोकरीमधून निवृत्त झाल्यावर ज्यो. शास्त्रावरील मिळतील ती पुस्तकें त्यांनीं वाचली. पण तेवढ्यानें त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही. तेव्हां या विषयाचा सखोल पद्धतशीर अभ्यास व्हावा म्हणून त्यांनीं संस्थेचा पोस्टल टयूशन कोर्स घेतला. व ज्यो. प्रवीण परीक्षा दिली. नंतर ते ज्योतिष प्राज्ञमध्यें प्रथम श्रेणींत २ ऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. यापुढें ज्यो. विशारद या परीक्षेला बसण्याची त्यांची इच्छा आहे. सध्यां ते पत्रिका तयार करणे व प्रश्न पाहणें ही कामे करतात. तसेच या विषयावरील वाचनही चालूच असतें. त्यांना पेंटींगचीहि आवड आहे. सध्या त्यांचे कौटुंबिक जीवन उत्तम असून दोन्ही मुलगे गॅझेटेड ऑफीसर्स आहेत. या साऱ्यांचे श्रेय ते त्यांच्या पत्नीला देत असतात.

एन. डी. ४, रामपूर कॉलनी,
जबलपूर. (म. प्र.)

प्रभाकर शंकर पालशेतकर



यांच्या एका मित्राने सन १९५६ सालीं यांचेबद्दल वर्तविलेलें कांहीं भविष्य अगदीं खरे ठरल्याने ते या शास्त्राकडे आकर्षित झाले. त्यांची या विषयाच्या अभ्यासाची सुरुवात वाङ्मयशोभेतील श्री. ना. बा. केळकर यांच्या 'तुम्हीच ज्योतिषी व्हा' ही लेखमाला वाचून झाली. पुढे त्यांनीं राजे, पटवर्धन, प्रधान, नवाथे, किरो यांची पुस्तके वाचली. पण समाधान होईना. पुढे त्यांनीं त्यांच्या एका स्नेह्याजवळ कुंडलीचें थोडे फार ज्ञान घेतलें. या विषयावर जे जे उपलब्ध होईल ते ते वाचून त्यांनीं आपला अभ्यास चालूं ठेवला. पुढे १९६५ मध्यें फलज्योतिष अभ्यास मंडळाची ज्योतिष प्रवीण ही परिक्षा ते उत्तीर्ण झाले. या परिक्षेचा अभ्यास चालू असतांना श्री. जकातदार यांचे फारच मार्गदर्शन झाले असे ते मोठ्या अभिमानाने सांगतात. त्यांचा मूळ व्यवसाय सराफी व जव्हेऱ्याचा आहे. त्यामुळे त्यांचेकडे येणाऱ्या गिऱ्हाईकांनाहि त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन होते. पुष्कळांना त्यांच्या मार्गदर्शनाचा उपयोग झाला आहे. या विषयांत यश मिळविण्यासाठीं अध्यात्मिक बैठकीची ज्योतिषाला फार जरुरी आहे असे ते म्हणतात. त्या दृष्टीने त्यांनीं गुरुवर्य जी. डी उर्फ दादासाहेब देवळेकर, गुरुवर्य रा. म. बारभाई यांचेकडून मार्गदर्शन घेतलें आहे. हा विषय अथांग असल्याने त्याचा करावा तेवढा अभ्यास अपुराच आहे असे ते म्हणतात. ह्या विषयासाठीं व्यवसामुळे नीट अभ्यासास वेळ मिळत नाहीं. त्यांची या शास्त्रांत उत्तरोत्तर प्रगति होऊन त्यांना उत्कर्ष लाभो ! हीच शुभेच्छा.

आशा कुंज,
गोवंडी रोड,
चेंबूर, मुंबई ७१.

नारायण बळवंत पवार

B. A. B. Com.

जन्म तारीख ९ जानेवारी १९३१.



हे मूळचे रत्नागिरी जिल्हयांतील संगमेश्वर येथील. यांचे वाड-वडील धार संस्थानांत स्थायिक होते. पुढे ते प्लेगच्या साथी-मुळे धार सोडून यांच्या लहानपणींच मुंबईस आले. यांचे ४ थी पर्यंतचे शालेय शिक्षण मुंबईसच झाले, नंतर पुढील शिक्षण नासिक येथे झाले. व मुंबई येथे सन १९४८ मध्ये ते मॅट्रि-कची परीक्षा उत्तीर्ण झाले. गणित, शास्त्र व इंग्रजी या विषयांवर त्यांचे प्रभुत्व होते. नंतर त्यांनीं जिल्हा स्कूल बोर्डांत नोकरी धरली. ही नोकरी सांभाळून ते १९६२ सालीं पुणे विद्यापीठाची बी. कॉम. परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यात वयाच्या २० व्या वर्षापासून ज्योतिष शास्त्राबाबत आवड निर्माण झाली. त्यामुळे त्यांनीं लिओ, राफेल, रामन, राजे, नवाथे, कारवे व सोमण इ. सुप्रसिद्ध ज्योतिष कर्त्यांच्या ग्रंथांचे वाचन केले. मूळचा गणित विषय चांगला असल्याने ज्योतिष शास्त्रांतील ग्रहगणित त्यांना केव्हांच अवगत होऊ शकले. पुढे त्यांनीं संस्थेच्या ज्योतिष प्रवीण व ज्योतिष प्राज्ञ या परीक्षा दिल्या. व त्यांत ते १ ल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. ज्योतिष विशारद या परीक्षेचा त्यांचा अभ्यास सुरू असून त्यांनीं शके १८४८ पासूनची दाते पंचांगे संग्रहीत केली आहेत. तसेच त्यांनीं या विषयाचे अनेक ग्रंथ जमविले आहेत. तसेच भृगुसंहिता, बृहत् पाराशरी या ग्रंथांचे त्यांनी सूक्ष्म वाचन केले असून चालू पंचांगनिर्मितीबाबत त्यांचे शास्त्रशुद्ध संशोधन सुरू आहे. त्यांना सामाजिक व सांस्कृतिक कार्याची आवड असून नासिक येथील सामाजिक संस्थांशीं त्यांचा त्या दृष्टीने संपर्क येतो. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग अनेक गरजू लोकांनी करून घेतला आहे.

६३५ रविवार पेठ,
मु. पो. जि. नाशिक.

एकनाथराव नारायण खुस्तले.

जन्म दि. १ जानेवारी १९३८.



यांचे जन्मगांव पैठण हे होय. १९४८ पर्यंत यांचे प्राथमिक शिक्षण पुणे येथे झाले. पुढे स्वातंत्र्योत्तर कालांत त्यांचे माध्यमिक शिक्षण प्रशाला पैठण येथे झाले. १९५६ सालीं ते एस. एस. सी. (मॅट्रिक) द्वितीय श्रेणींत उत्तीर्ण झाले. त्यांचा आवडता विषय जरी गणित होता तरी त्यांनीं ' संस्कृत भाषेचा ' अभ्यास करून संस्कृत विशारद ही पदवी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन मिळविली. विद्यार्थी दशे-पासून त्यांना वाचनाचा छंद असून चित्रकला, फोटोग्राफी बागकाम यांची फार आवड आहे. तसेच ज्योतिष शास्त्राबद्दल आस्था लहानपणापासूनच. त्यामुळेच त्याचाहि त्यांना पुढे छंद जडला. सध्यां ते सरकारी नोकरीत (शिक्षण खात्यांत) आहेत. १९५६-१९५७ या काळांत त्यांनीं एस. टी. सी चा अभ्यास केला. शिक्षणाबद्दल त्यांना फार प्रेम असून त्यासाठीं कितीही कष्ट सोसावे लागले तरी त्रास सहन करण्याची त्यांची नेहमी तयारी असते. ज्योतिष या विषयाचा अधिकाधिक अभ्यास करून त्यात नांव मिळवून या शास्त्राचा उपयोग गरजूंना करून देण्याची त्यांची जिद्द आहे. नुकतेच ते संस्थेची ज्योतिष प्रवीण ह्या पदवी परिक्षेत उत्तीर्ण झाले आहेत संस्थेच्या इतर पदवी परीक्षा देण्याचाही त्यांचा मानस असून त्या दृष्टीने त्यांचा अभ्यास व प्रयत्न सुरू आहेत. या विषयाचे असे उत्साही विद्यार्थी लाभत आहेत, ही खरोखरीच आनंदाची व संस्थेला भूषणावह गोष्ट आहे.

C/o गव्हर्मेंट हायस्कूल,
मु. पो. पैठण,
जि. औरंगाबाद.

असत्यवचनो धृष्टः सुरापो बन्धुवर्जितः ।
हस्ते जातो नरश्चौरो जायते परदारकः ।।

हस्त नक्षत्रात जन्माला येणारा मनुष्य दुष्ट, व्यसनी भावंडांपासून दूर रहाणारे आणि चोर असतात.

अशोक विष्णुपंत पुराणिक

जन्म दि. ९ सप्टेंबर १९४४




यांचे मॅट्रिकपर्यंतचे सर्व शिक्षण जळगांव येथे झाले. त्यानंतर त्यांनीं जळगांव येथे मुळजी जेठा आर्टस अँड सायन्स कॉलेजांत शिक्षणास सुरवात केली. पुढे पुण्यास येऊन सेंट्रल टेलिग्राफ ऑफीसमध्यें नोकरी करून एफ्. वाय्. बी. ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. परंतु नोकरींतील दगदगीमुळे शिक्षणास अर्धविराम मिळाला. यांचे वडील उत्तम ज्योतिषी. त्यामुळे त्यांनाहि या विषयाची आवड निर्माण झाली. या विषयाचे मार्गदर्शन त्यांना घरींच वेळोवेळीं मिळाले. पुढे त्यांनीं श्री. जकातदार व त्यांचे कांहीं स्नेही यांच्या सांगण्यावरून ज्योतिष प्रवीण ही परीक्षा दिली. व त्यात ते उत्तीर्ण झाले. त्यांचे आतापर्यंतचे सर्व आयुष्य आनंदांत गेले आहे. त्यांना कोणत्याहि गोष्टींत थोडचा परिश्रमाने यश मिळते असे त्यांचें मत आहे. असेंच त्यांना या शास्त्रांत यश मिळो व त्यांचा उपयोग गरजू लोकांना होऊन या शास्त्राची प्रतिष्ठा वाढण्यांत त्यांचा हातभार लागो हीच प्रभूचरणीं प्रार्थना.

सेंट्रल टेलिग्राफ ऑफीस,
पुणें. १.

वामन रामचंद्र पंडीत

बी. ए. (ज्योतिष विशारद)
जन्मतारीख २८ नोव्हेंबर १९३६.



यांचे घराणे मूळचे वैद्यकीचे. तोच व्यवसाय पुढे चालू करावा अशी त्यांची स्वतःची फार मनीषा होती. पण त्याला फारशी अनुकूलता लाभली नाही. पुढे त्यांनीं त्यांचे आतेभाऊ डॉ. सुंदरकांत मोरेश्वर पुरंदरे यांचेकडून ज्योतिष शास्त्राचे प्राथमिक शिक्षण घेतले व १९५४ मध्ये एस. एस. सी उत्तीर्ण होऊन १९५८ मध्ये ते मुंबई विद्यापीठाचे बी. ए. झाले. त्यांचा आयुर्वेदाचा अभ्यास अजूनही सुरुच आहे. १९६१ साली त्यांनीं ज्योतिष शिक्षण विद्यालयाची होराभूषण ही पदवी मिळविली व १९६५ च्या एप्रिलमध्ये सिंहलग्नावर निबंध लिहून फलज्योतिष अभ्यास मंडळाची 'ज्योतिष विशारद' ही सन्मान्य पदवी प्राप्त केली. सध्या ते रेल्वेंत नोकरी करतात. त्यांचा मित्रपरिवार फार मोठा असून आपल्या ज्ञानाचा उपयोग ते गरजूंना, जिज्ञासूंना करून देतात. ते प्रकृतीने किरकोळ असले तरी स्वभावाने शांत, निगर्वी, आणि सत्यप्रिय व तत्वनिष्ठ आहेत. त्यांच्याकडे येणाऱ्या कोणासही ते कधी नाही म्हणून दुखवीत नाहीत. त्यामुळे त्यांनीं या वयांतही

त्या भागांत फार लोकप्रियता संपादन केली आहे. या शास्त्राचे ते निस्पृहपणे मार्गदर्शन करीत असतात. त्यांच्या हातून या शास्त्राची सेवा अशीच घडत राहण्यासाठीं परमेश्वर त्यांना दीर्घायुरारोग्य देवो हीच इच्छा.

श्रेयस् कॉलनी,
आरे रोड,
गोरेगांव (पूर्व),
मुंबई ६२.

दिगंबर सावळाराम तागडे

जन्म तारीख १५ जून १९२९.



ह्यांना लहानपणापासून या शास्त्राची आवड. वडिलांनाही या शास्त्राचे ज्ञान चांगले होते. विद्यार्थीदशेत भाषा, खगोलशास्त्र, गणित हे विषय आवडीचे होते. पुढे शाळा खात्यांत प्राथमिक शिक्षकाची नोकरी धरली. कारण वडील वारल्याने प्रपंचाची जबाबदारी यांच्यावर येऊन पडली. त्यांनी संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा दिली. व त्यांत ते उत्तीर्ण झाले. या विषयावरील अनेक पुस्तके व ग्रंथ यांच्याजवळ असून त्याचा अभ्यास त्यांनीं केला आहे. तसेच १९४७ पासून आज तागायतची सर्व पंचांगे त्यांच्याजवळ आहेत. त्यांनी सांगितलेली अनेक भाकितें खरी ठरल्याने त्या भागांत ते फार प्रसिद्ध आहेत. त्यांचे गांवी ब्राम्हण नसल्याने ज्योतिषविषयक सर्व कामे तेच करतात.

त्यांना सामाजिक कार्याची आवड आहे. त्याचबरोबर भजन, नृत्य, लोकनाटच, शाहीरी वाङमय यांची आवड. त्यांचे फड जमवून हे कार्यक्रम करतात. १९६० साली जिल्हा स्कूल बोर्ड पुणे तर्फे त्यांची महाराष्ट्र राज्याचे नाटचशिबिरांत निवड झाली होती. त्यांनी आतापर्यंत १५ ते २० सामाजिक व ऐतिहासिक नाटकांत भूमिका केल्या आहेत. स्त्री भूमिका करण्यांत त्यांचा विशेष हातखंडा असून त्याबद्दल समाज विकास गट पुरंदरतर्फे त्यांना वैयक्तिक चांदीचे पदक बक्षिस मिळाले आहे. त्यांनी ग्रामगौरवाचा अहवाल काव्यमय भाषेंत रचून दाखविला होता. अशा प्रकारचे हे रसिक विद्यार्थी ज्योतिष शास्त्राचा अभ्यास वाढवित आहेत.

मु. पो. नायगाव, (सिद्धेश्वर)
ता. पुरंदर, व्हा. राजेवाडी.
जि. पुणे.

वसंत रघुनाथ रिसबुड

बी. एस्. सी. टेक्

जन्म तारीख २९ मे १९१३



हे मूळचे पुण्याचे रहिवासी होत. यांचे वडिल रेव्हेन्यू खात्यांत होते. सन १९३० मध्ये ते डिस्ट्रीक्ट डेप्युटी कलेक्टर या हुद्यावरून 'रावबहाद्दूर' या किताबानें भूषित होऊन निवृत्त झाले. यांचे महाविद्यालयीन उच्च शिक्षण पुणें व मुंबई येथें झालें. ते १९३७ साली मुंबई येथें बी. एस्. सी. (टेक्) झालें. पुढें त्यांनीं बेंगलोर येथें मिनर्व्हा मिल्समध्यें नोकरीस सुरुवात केली व अनेक महत्वाच्या जागांवर काम केले. सध्याहि ते मोठ्या हुद्द्यावर आहेत. त्यांना या शास्त्राबद्दल लहानपणापासूनच आवड होती. पण योग्य अशी संधि लाभू शकली नाहीं. पण योगायोगानें त्यांनीं फलज्योतिष अभ्यास मंडळातर्फे ज्योतिष शिक्षण कोर्स घरच्या घरीं घेता येतो ही जाहिरात केसरीमध्यें वाचली. त्यामुळें या विषयाची त्यांची अपुरी भूक भागविण्यास तें उपयुक्त ठरले. नोकरी व सर्व व्याप सांभाळून त्यांनीं ज्योतिष प्रवीण ही परीक्षा तर दिलीच पण ज्योतिष प्राज्ञ या परीक्षेंत त्यांनीं विशेष प्रावीण्य संपादन केलें. ही गोष्ट त्यांना खरोखरीच भूषणावह आहे. तीव्र इच्छा असली म्हणजे माणसाला मार्ग सापडतो याचेंच हें एक उदाहरण आहे. त्यांना तीन मुलगे असून मोठा मुलगा 'वल्लभ विद्यानगर' या युनिर्व्हसिटीत लेक्चरर म्हणून काम करीत आहे. या शास्त्राचा त्यांचा अजूनहि अभ्यास चालूं असून त्यांत अधिक खोलवर शिरून संशोधन करण्याचा व प्राविण्य संपादण्याचा त्यांचा मानस आहे.

मिनर्व्हा मिल्स क्वार्टर्स,
मु. पो. बेंगलोर-२३.


दत्तात्रेय बाळाजी देशपांडे



यांचे मूळ गांव मराठवाड्यातील पोहनेर. थोडीफार वडिलार्जित शेती हेच उपजीविकेचें मुख्य साधन. १९५३ सालीं मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यावर आर्थिक अडचणींमुळें पुढील उच्च शिक्षण होऊं शकले नाही. पुढे प्रपंच वाढल्याने नोकरीसाठीं प्रयत्न केला. पण तीही न मिळाल्यानें वैद्यकीय आयुर्वेदिक पद्धतीचा अभ्यास केला. तो करीत असतांनाच ज्योतिषशास्त्राचा नाद लागला. पुढे त्यांनीं घरीं अभ्यास करून संस्थेच्या ज्योतिष प्रवीण व ज्योतिष प्राज्ञ या परीक्षा दिल्या व त्यांत ते उत्तीर्ण झाले. आयुर्वेदाची परीक्षा मात्र ते आर्थिक अडचणीमुळे देऊं शकले नाहीत. त्यांना शिक्षणाची खूप हौस आहे. पण घरची सर्व जबाबदारी यांच्यावर पडल्याने त्यांना इच्छेला थोडीफार मुरड घालावी लागत आहे.तरी देखील ज्योतिषशास्त्राचा अधिक अभ्यास करून त्यात प्राविण्य संपादन करण्याचा त्यांचा मानस आहे. इच्छेच्या जोरावर माणूस कोणतेही अवघड काम देखील पूर्णत्वास नेतो हा सिद्धांत असल्यानें हें देखील या विषयांत नांवलौकिक मिळवून या शास्त्राची प्रतिष्ठा वाढवतील यांत संदेह वाटत नाही.

मु. पो. पोहनेर, व्हा. पार्थी,
जि. परभणी,
(मराठवाडा).


विनायक हेरंब गोन्हे



यांचे घराणे मुळचे तळेगाव दाभाडे येथील होय. यांचे आजोबा चिंचवडच्या मोरयाचे पुजारी होते. ते भिक्षुकीचा व्यवसाय करीत व ज्योतिष सांगत असत. पुढे त्यांच्या पश्चात् त्यांचे वडील पुण्यास येऊन स्थायिक झाले. ह्यांचे इंटरपर्यंत सर्व शिक्षण पुण्यास झाले. सध्यां हे जी. पी. ओ. मध्ये नोकरी करतात, व फावल्या वेळांत केवळ या विषयाची आवड म्हणून ज्योतिष शास्त्राचा अभ्यास करतात. या शास्त्रातील संस्थेच्या ज्योतिष प्रवीण व ज्योतिष प्राज्ञ या परीक्षा ते उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले असून ज्योतिष विशारद ही बहुमानाची पदवी मिळविण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. त्यांचे श्वशूर श्री. न. प महाजन हे तर या विषयांत फारच प्रसिद्ध आहेत. त्यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभल्याचा ते बऱ्याच वेळा उल्लेख करतात. या विषयाचा व्यासंग असाच वाढवून या विषयाचा उपयोग जनतेस करून देण्याची त्यांची इच्छा आहे. त्यांच्या या सदिच्छेस निश्चितपणे चांगली फळें येतील यांत आम्हाला तरी शंका वाटत नाही.

२९९ सी. शिवाजीनगर,
रोकडोबाचे देवळाजवळ, पुणें ५.

दत्तात्रय परशुराम पोळ



हे मूळचे महाराष्ट्रीयन आहेत, परंतु बऱ्याच वर्षांपासून गोव्यातील विकास योजनेंत काम करीत होते. आतां घारगांव येथें ग्रामसेवक म्हणून काम करीत असतात. ज्योतिष शास्त्रांतील स्नेही मंडळींच्यामुळें त्यांनाहि या शास्त्राची आवड निर्माण झाली.

या शास्त्राच्या अभ्यासामुळें मानवी जीवनांतील विविध कूट प्रश्नांची सोडवणूक करता येते. तसेंच एखाद्या बाबतींत निश्चित निर्णय घेण्यास या शास्त्राइतके दुसरे कांहीहि साधन नाही. या शास्त्राची परंपरा फार प्राचीन असल्यानें व या शास्त्रावर अमोल अशी ग्रंथसंपदा निर्माण झाली असून त्याची उपयुक्तता वाढत आहे हें त्यांना पटल्यानें ते या शास्त्राचे अभ्यासाकडे वळले. सरकारनें या शास्त्रास विद्यापीठांतून स्थान देऊन या शास्त्राबद्दल जनतेत पसरलेलें गैरसमज दूर केले पाहिजेत असें यांचे स्वतःचे मत आहे. त्यामुळें या शास्त्राची महती वाढून त्याची उपयुक्तताहि वाढेल असे त्यांना वाटतें. त्या दृष्टीनें ही संस्था प्रयत्नशील असून त्याचा उपयोग होईल असे वाटते. श्री. पोळ यांच्यासारखे ज्योतिषप्रेमी, अभ्यासू लोक लाभल्यास या विषयाचा अभ्यास व महत्त्व वाढण्यास खरोखर एक मोठा आधार मिळेल असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

मु. घारगांव, ता. श्रीगोंदे,
जि. अहमदनगर.

पुत्रदार युतस्तुष्टोधनधान्य समन्वियः ।
देवब्राह्मणभक्तश्च चित्रायां जायते नरः ।।

चित्रा नक्षत्रावर जन्माला येणारा पुरूष प्रसंन्न धन-धान्याने युक्त आणि देवाब्राह्मणांना पूज्य मानणारा असतो.

विदग्धो धार्मिकोऽल्पार्थः कृपणः प्रियवल्लभः ।
सुखी स्वदेवभक्तश्च स्वाती जातो भवेन्नरः ।।

स्वाती नक्षत्रावर जन्माला येणारा मनुष्य धर्म जाणणारा, थोडी द्रव्यप्राप्ती असणारा, कृपण, स्त्रीप्रिय, सुखी आणि आपल्या देवतेचा भक्त असतो.

भगवानबुवा विश्वनाथ रामदासी

ज्योतिष प्रवीण

यांचा जन्म २६ जुलै १९४० साली मंगरुळ येथे कै. नारायण महाराज यांचे पवित्र कुलांत झाला. पवित्र गोदावरी तीर्थ श्रीराम संस्थान व सज्जनांचा संग त्यामुळें महाराज यांचे पासून देवभक्ती, अध्यात्मिक ग्रंथां चे वाचन व मंत्रविद्या यांचे शिक्षण मंगरुळ येथे झाले. परंतु देवभक्ती व अध्यात्मिक विषयाकडे जास्त ओढा असल्यानें शिक्षण सोडून संस्थान येथेच संस्कृत वैदीक यांचा अभ्यास सुरूं केला.




त्यांना वयाच्या १६ व्या वर्षापासून ज्योतिष शास्त्राची ओढ लागली. त्यांचेकडे ज्योतिष शास्त्राची आवड वडिलोपार्जीत आहे. त्यामुळें अर्थातच ही आवड त्यांच्या अंगी उतरली. अभ्यास मंडळाची ज्यो. प्रवीण ही पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले. ज्योतिष शास्त्राची जिद्द न सोडता ज्यो. प्राज्ञ ह्या परीक्षेचा अभ्यास क्रम सुरूं केला आहे. श्रीराम संस्थान देवभक्ती, पूजन, अशा प्रकारे त्यांचा वेळ ईश्वर चिंतनांत जातो. मंगरुळ तसेच जवळ पासच्या गांवातील लोकांना त्यांच्या भविष्य कथनाचे बरेच चांगले पडताळे आले आहेत.

मंगरुळ खरात,
पो. बिबाजी बुवाची रामपुरी,
ता. गेवराई.

पंडित ब. रा भार्गव

ज्योतिष विशारद.

यांचे वडिलांपासून यांचे घरीं ज्योतिष शास्त्राचा व्यासंग असून त्यांचे वडील या शास्त्रांत पारंगत होते. १९६१ चे जानेवारी महिन्यांत 'होराभूषण' परीक्षेंत प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले. १९६५ मध्यें सामुद्रिक भूषण ही पदवी परीक्षा ते द्वितीय श्रेणींत उत्तीर्ण झाले त्याबद्दल त्यांना श्री जगद्गुरु शंकराचार्य (जेरेस्वामी) करवीर पीठ यांचे हस्ते प्रशस्ती पत्रक मिळाले आहे. या शास्त्रांतील "ज्योतिष विशारद" ही परीक्षा ते नुकतेच उत्तीर्ण झाले. त्यासाठीं त्यांनीं सुखस्थान व अष्टमस्थान हा निबंध लिहीला होता.



जळगांव व धुळे जिल्ह्यांत या शास्त्रांत त्यांनीं अनुभव सिद्ध प्रसिद्धी मिळविली असून मोठमोठ्या अधिकारी व्यक्तींकडून प्रशस्तीपत्रें मिळाली आहेत. या शास्त्रांत त्यांचा हातखंडा असल्याने त्यांचेकडे लोकांची रोज गर्दी असते. या शास्त्राचा त्यांचा अभ्यास अजूनहि चालू आहे. या शास्त्रावर स्वतंत्रपणें ग्रंथ निर्मिती करण्याचा त्यांचा मानस असून त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्नहि सुरूं आहेत. आजपर्यंत त्यांचा व्यासंग, उत्साह व प्रयत्न पाहतां ते आपले इच्छित ध्येय साध्य करतील यांत मुळीच संदेह वाटत नाही.

भृग ज्योतिष कार्यालय,
स्टेशन रोड, मु. पो. अंमळनेर,
जि. जळगांव.

वसंत ग. गोखले बी. ए.

ज्योतिर्विद



बडोदा संस्थानांत यांचें वडील पी. डब्लू. डी. चे इंजिनीअर होते. त्यांचे शिक्षण बी. ए. पर्यंत झाले आहे. लहानपणापासून त्यांना खेळाची फार आवड. क्रिकेट, बॅडमिंटन, कॅरम या खेळांत त्यांनीं बरीच बक्षिसें मिळविली आहेत.

यांना प्रथम हस्त-सामुद्रीकाचा नाद लागला. त्यानंतर वाचन, प्रत्यक्ष व्यासंग यामुळें त्यांचें आडाखे व अंदाज खरे ठरूं लागले. या विषयांत यश मिळत गेल्यानें त्यांना लोकांकडून प्रोत्साहन मिळूं लागले. त्यामुळें त्यांची उमेद वाढली. व नंतर त्यांनीं मोठ्या उत्साहानें कुंडली व फलज्योतिषाचा अभ्यास सुरूं केला. त्यांनी या विषयावरील अनेक मराठी, इंग्रजी व गुजराथी पुस्तकें वाचली. बडोदे येथील श्री. रामचद्र जोशी यांच्याकडून त्यांनी 'केशवी गणित' या विषयाचें ज्ञान मिळवून त्यात नैपुण्य संपादन केलें पुढें त्यांनीं बॉंबे अॅस्टॉलॉजिकल सोसायटीच्या दोन लेखी परीक्षा दिल्या व त्यांत द्वितीय श्रेणींत उत्तीर्ण होऊन ते 'ज्योतिर्विद' झालें.

अजूनहि नवीन नवीन शिकण्याची त्यांना हौस आहे. प्रयत्नांत ते कधीच कसूर करीत नाहींत. या शास्त्रांतील नवीन ठोकताळे बसविण्याचे व संशोधन करून त्याचा इतरांना जास्तीत जास्त उपयोग करून देण्याची त्यांची जिद्द व महत्त्वाकांक्षा आहे. त्यांच्या पत्नीलाही त्यांनी या विषयाचे ज्ञान करुन दिलें. त्यांची हौस, त्यांचे प्रयत्न, त्यांची जिद्द पाहिल्यावर असे तरुण लाभल्यास या विषयाचें महत्त्व वाढून जनतेस त्याचा निश्चित उपयोग होईल असें आमचे ठाम मत आहे. संस्थेची ज्योतिषप्राज्ञ ही पदवी त्यांनीं संपादन केली आहे.

शांताराम सदन ब्लॉक ४.
रामरतन त्रिवेदी रोड,
मुलुंड, वेस्टमुंबई ८०.

सौ प्रतिभा पुरुषोत्तम घांगरेकर.

ज्योतिष प्रवीण.




यांचे शालेय शिक्षण एस्. एस्. सी. पर्यंत झाले आहे. त्यांना या शास्त्राबद्दल लहानपणापासून औत्सुक्य होते. त्यामुळे मिळतील ती पुस्तकें, टिपणे वाचून त्यांनी घरची सारी प्रापंचिक जबाबदारी सांभाळून या विषयाचा अभ्यास केला व संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा त्या उत्तीर्ण झाल्या. अजूनही या शास्त्राचे अधिक शिक्षण घेण्याची त्यांची मनीषा आहे. त्यांचे यजमानांचे या बाबत त्यांना पूर्ण सहकार्य व साहृच होत असते.

काळे वाडा, गांधी चौक'
मु. पो. कल्याण,
जि. ठाणे.

हरी अनंता कुंभार

ज्योतीष प्रवीण



यांचा जन्म शिखर शिंगणापूर येथे झाला. यांचे शिक्षण मराठी सहावी पर्यंत झाले असून सध्यां ते महाराष्ट्र राज्य कृषि निगम खात्यांत नोकरीस आहेत. गेल्या २ वर्षापासून त्यांना ज्योतिष शास्त्राचा छंद लागला. व त्याला त्यांचे एक स्नेही श्री. भा. म. जोशी हेहि कारणीभूत ठरले. नंतर त्यांनी "ज्यो. प्रवीण" ही परीक्षा दिली. त्याकामीहि त्यांना श्री. जोशी यांचे साह्य झाले. अजूनहि नवे शिकण्याची व या विषयांतील उच्च पदवी देण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे व तसा प्रयत्न ते करीत आहेत. आम्ही त्यांना सुयश चिंतीतों.

मु. रत्नपुरी, पो. वालचंदनगर,
ता. इंदापूर, जि. पुणे.

सौ. कमल दामोदर लोटलीकर

एम. एस. सी, ज्यो. प्राज्ञ.
जन्मतारीख १७ ऑगस्ट १९२२.

या मूळ गोव्यातील रहिवासी. यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत झाले. नंतर त्यांनीं कांहीं वर्षे सरकारी नोकरी केली. यांचे पति येथील स्थानिक कॉलेजमध्ये प्राध्यापकाचे जागेवर आहेत. यांना ज्योतिषशास्त्राबद्दल लहानपणापासून औत्सुक्य असल्यानें त्यांनीं या विषयाचा अभ्यास केला. त्यात त्यांचा जम बसू लागला, या संस्थेतर्फे होणाऱ्या ज्यो. प्रवीण व ज्योतिषप्राज्ञ या परीक्षा त्या उत्तीर्ण झाल्या आहेत. या विषयाचा अभ्यास वाढविण्याचा त्यांचा विचार असून घरची सर्व जबाबदारी सांभाळून त्या वरील परीक्षा उत्तीर्ण झाल्या हे विशेष उल्लेखनीय म्हटले पाहिजे. या विषयावरील अनेक पुस्तकें, संदर्भ ग्रंथ त्यांनीं जमविले असून अजूनहि आपल्या ज्ञानात नवी भर पडावी यासाठी त्या सतत प्रयत्न करतात. त्यांची उत्तरोत्तर प्रगति होवो ही शुभेच्छा.

बी १३ सारस्वत कॉलनी,
शितळादेवी टेंपल रोड,
माहीम, मुंबई १६.

श्री. वसंतराव विष्णुपंत कुलकर्णी

(देवडीकर) ज्योतिष प्रवीण,

हे मूळचे पंढरपूरचे होते. वयाच्या शंभराव्या वर्षी व डि लां चे नि ध न झाल्यानंतर आपल्या चुलत्याकडे पुण्यास आले. शालेय शिक्षण मधेच बंद पडल्याने पुढे स्वतःचे पायावर उभे राहाण्याचे दृष्टीने त्यांनी रेशनिंगखात्यामध्ये नोकरी धरली. पुढें आपणांस जीवनांत नेहमी उपयुक्त ठरणारी अशी एखादी कला यावी ह्या विचाराने प्रेरीत होऊन त्यांनी इलेक्ट्रीकची उपकरणे तयार करणाऱ्या एका कारखान्यांत शिकाऊ म्हणून सहा महिने काम केले व कांही वर्षे तिथें नोकरी केल्यानंतर कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनियरींग दापोडी येथे गेली १३ वर्षे ते इलेक्ट्रीक इन्स्ट्रूमेंट मेकॅनिक म्हणून काम करीत आहेत. तसेच केवळ हौस म्हणून ते सर्व तऱ्हेची घड्याळे दुरुस्त करण्यास शिकले व तेही काम ते करीत असतात.



नंतर त्यांना " ज्योतिष " हे शास्त्र आहे तरी काय ही जिज्ञासा उत्पन्न होऊन ते या विषयाकडे वळले व त्यावरील पुस्तके मिळवून त्यांनी घरी अभ्यास सुरू केला. व संस्थेची "ज्यो. प्रवीण" ही परीक्षा देऊन त्यांत ते उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. या शास्त्राचा अधिक अभ्यास वाढविण्याचा त्यांचा मानस आहे. त्या दृष्टीनें ते प्रयत्नशील आहेत. त्यांचे कौटुंबिक जीवन सुखी, समाधानकारक आहे. या शास्त्राचा उपयोग अडचणीत असलेल्या माणसाला मार्गदर्शक म्हणून करून देण्याची त्यांची इच्छा आहे. संस्थेच्या प्रत्येक उपक्रमांत ते मोठ्या आत्मीयतेने सहभागी होत असतात.

घर नं. ५९२।३ बुधवार पेठ,
जिजामता बागेसमोर, पुणें २.

शिवाजी सावळाराम बावळे

यांचे वडिलांना ज्योतिष शास्त्राची आवड, त्यामुळे लहानपणापासून त्यांना या शास्त्राबद्दल कुतुहल व आवड उत्पन्न झाली. वडिलांकडे येणाऱ्या लोकांशी जी चर्चा होई त्यामुळे त्याना तर ज्ञानप्राप्ति होई पण दिवसेंदिवस या शास्त्राबद्दलची जिज्ञासा वाढे. त्यांनीं वडिलांजवळ असलेली पुस्तकें वाचून काढली पुढें या शास्त्राचे शास्त्रीय दृष्टीकोनांतून अभ्यास करावा या हेतूनें ते संस्थेचे सभासद झालें.



यांचे शिक्षण सध्या सुरू आहे. ते बी. ए. (मराठी स्पेशल घेऊन) चे वर्गांत असून पुढे एम्. ए. पर्यंत शिक्षण घेऊन मराठीचे प्राध्यापक होण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे. त्यांना कविता करण्याचा व कथा

लेखनाचा फार छंद असून त्यांनीं आतांपर्यंत अनेक लघुकथा स्पर्धेत भाग घेतला आहे. तसेच त्यांच्या कथा व कविताहि प्रसिद्ध झाल्या आहेत. लौकरच 'वाकळ' या नावाचा ग्रामीण लघुकथा संग्रह प्रकाशित करण्याचा यांचा संकल्प आहे.


सध्यां अभ्यास व इतर व्याप सांभाळून ते ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. या शास्त्राचा व्यासंग वाढविण्यासाठीं या विषयातील सर्व परीक्षा देण्याचाहि त्यांचा मानस असून त्या दृष्टीनें ते प्रयत्न करीत आहेत. ते या विषयांत लौकरच प्रगति करून दाखवतील असा त्यांना आत्मविश्वास वाटतो. आम्ही त्यांना सुयश चिंतीतो.

दयानंद कॉलेज,
मेन हॉटेल, खो. नं. ७७
मु. पो. जि. सोलापूर.

नागेश अनंत वरटीकर

ज्यो. विशारद

सरकारी नोकरींत पेन्शन घेतल्या नंतर केवळ वेळ



जाण्याकरतां म्हणून श्री. वरटीकर ज्योतिष शास्त्राची पुस्तकें आणून वाचीत असत. पुढें दैवयोगाने त्यांची कांही ज्योतिषांकडून मार्गदर्शनाचे बाबतीत फसगत झाल्यानें ते या विषयाकडे जास्त लक्ष देऊं लागलें. व त्यांत रस घेऊ लागलें.


एप्रिल १९६५ मध्ये त्यांनी फलज्योतिष अभ्यास मंडळाकडून माहितीपत्रक मागविले व त्यांनी मोठ्या जिद्दीने परिश्रम घेवून संस्थेची "ज्यो. प्राज्ञ" ही परीक्षा दिली व त्यांत ते प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. फारच अल्पकाळांत ही परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणे हे विशेष होय. पण ही गोष्ट संस्थेचे चालक श्री. बाळासाहेब जकातदार यांचे प्रोत्साहनाने व मार्गदर्शनाने होऊं शकली असे ते मोठ्या अभिमानानें सांगतात.

पुढे लगेच त्यांनी "ज्योतिष विशारद" चा अभ्यास केला. व 'सुखी विवाह अथवा सुखी संसार" या विषयावर निबंध सादर करून तीही पदवी मिळविली. यावेळीही त्यांना त्यांच्या मुलीचे व श्री. जकातदारांचे बहुमोल साह्य लाभले असे ते म्हणतात. या विषयावर अधिकाधिक संशोधन करण्याचा त्यांचा विचार आहे. व त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. मूळचा गणित हा विषय चांगला असल्यान ज्योतिष शास्त्रांतील गणित विषयक मार्गदर्शन ते कोणालाहि विनामूल्य व आनंदाने देत असतात. या विषयावरील बरीच ग्रंथसंपदा त्यांनी जमविली आहे. उतारवयांतील त्यांचा या विषयाचा व्यासंग व उत्साह कोणाहि तरूणाला लाजवील असाच आहे.

४२३, रविवार पेठ,
पुणें२.

तानाजी शिवाजी नाईक

यांचे नेऊर गांवी स्थावर जमीन होती. त्यांचे.



स्वतःचे मालकीचे घर असून ते गांवचे हक्कदार आहेत. यांचे शालेय शिक्षण मराठी ४ थी पर्यंत झालें. पुढें वडिलांचे निधन झाल्यानें त्यांचा मोठा आधार तुटला व ते मुंबईला नोकरीसाठीं आलें. त्यांनीं आतापर्यंत अनेक हालअपेष्टा सहन केल्या आहेत.

त्यांना ज्योतिषशास्त्राची लहानपणापासून भारी आवड. परंतु घरच्या बिकट परिस्थितीमुळें फारसे शिक्षण घेता आले नाहीं. पुढें १९६६ मध्यें त्यांनीं मोठ्या हिंमतीनें व प्रयत्नानें फलज्योतिष अभ्यास मंडळाचा कोर्स घेऊन घरच्या घरीं अभ्यास सुरू केला. त्यातहि अनंत अडचणी आल्या. तरीहि त्यांनीं धीर न सोडता ही परीक्षा देऊन त्यांत ते उत्तीर्ण झालें. या शास्त्राचा अधिक अभ्यास करण्याची त्यांची मनीषा आहे. आज त्यांची पन्नाशी होत आली तरी या विषयाबद्दल आस्था व शिकण्याची आवड कायम आहे. त्यांची देवावर फार श्रद्धा आहे.

मु. पो. माजिवडा,
छत्रपति शिवाजी रोड,
घ. नं. १४३, जि. ठाणें.

डॉ. विनायक कागजी रेगे

M. D. H.

अ‍ॅस्ट्रोज्युवेलर. ज्यो. विशारद.

यांचा जन्म सावंतवाडी संस्थानांतील आरोदा या गांवी झाला. घरची स्थिती मध्यम पण घराणें खानदानी.



लहानपणापासून देवभक्ति, मंत्र, तंत्र व ज्योतिष यांचा नाद असून वयाचे १५ वे वर्षांपासून शालेय शिक्षण व ज्योतिष शास्त्राचे शिक्षणास सुरुवात झाली. घोलपशास्त्री कै. वि. मो. नवाथे यांचे ग्रंथ, बृहार जातकादी संस्कृत जुने ग्रंथ यांचा अभ्यास केला. १९३४ सालापासून मुंबईतील " भविष्यदीप " व ' भविष्य भास्कर" या मासिकांत केमद्रुमयोग, मलेरिया, क्षयरोग वगैरे लिखाण केलें.

१९३७ साली अनुभवीक प्रश्नपद्धति या नांवाची प्रश्नपुस्तीका प्रसिद्ध केली. १९३२ मध्यें सावंतवाडी हायस्कूलमध्यें मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झालें. १९४३ मध्यें मुबईत नोकरी धंद्यानिमित्त येऊन किंगजॉर्ज हायस्कूलमध्यें नोकरी केली. पण ज्योतिष धंद्याची आवड असल्याने १९४६ मध्यें नोकरी सोडून ज्योतिष व्यवसाय सुरुं केला. सर्व–सामान्यांपासून श्रीमंतापर्यंत सर्वांवर येणाऱ्या संकटातून त्यांची मुक्तता होणेंसाठीं ग्रहांची रत्नें (खडे) वापरण्यास दिलीं. तसेच ग्रहजप, देवतापूजा या मार्गांनी मार्गदर्शन केलें. व त्यांची शास्त्रीय सत्यता पटवून दिली.

१९४९ व १९५० साली वर्षभविष्य पुस्तकें प्रसिद्ध केली. त्यातील राष्ट्रीय भविष्य, करांचा बोजा, गिरणी-संप व बेकारी या बाबतची भविष्यें तंतोतंत खरी ठरली. त्याचे बद्दल विद्वानांचे व नियतकालीकांचे अभिप्राय मिळाले आहेत. सध्यां जन्मपत्रिका, ग्रहरत्नांच्या आंगठ्या या संबंधी कार्य करीत असून प्राचीन ऋषीमुनींच्या शास्त्रीय लेखनावर संशोधन अनुभव घेत असतात. तसेच त्यांनी संस्थेची ज्योतिष विशारद पदवी प्राप्त केली आहे.

विजय कॉटेज खोली नं २.

पू. मोगरा, पार्शी पंचायत रोड,

अंधेरी–मुंबई ६९.

अरूण शांताराम कर्नाटकी

ज्यो. प्रवीण

श्री. कर्नाटकी ह्यांचे आजोबांना व वडिलांना ह्या



शास्त्राची आवड होती त्यांच्या भागांत त्यांचे आजोबा वेदाभ्यासांत प्रसिद्ध होते. वडिलांची ज्योतिष शास्त्राची आवड ह्यांच्याही अंगी उतरली

एखाद्या व्यक्तीचे भविष्य काय आहे त्यात शुभ अशुभ काय आहे ह्याचा पूर्ण अभ्यास करूनच श्री. कर्नाटकी भविष्य कथन करतात. जे सत्य आहे तेच सांगावे ह्या वृत्तीचे ते आहेत.

संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा ते १९६६ मध्यें उत्तम प्रकारे उत्तीर्ण झालें. जिद्द न सोडता ज्योतिष प्राज्ञ ह्या दुसऱ्या परिक्षेचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. बेळगांव येथें त्यांनी ज्योतिष कार्यालय काढले असून तेथील भागांतील लोकांना त्यांचे उत्तम मार्गदर्शन लाभले आहे. इतक्या अल्पदिवसांत मोठ्या हिंमतीने हे कार्य सुरूं केले हे खरोखर कौतुकास्पद आहे. संस्था त्यांना ह्या कामी नेहमी मार्गदर्शन करील. त्यांना त्यांच्या कार्यांत यश लाभो हीच सदीच्छा.

१९७९ सराफ गल्ली,

शहापूर–बेळगांव.

श्रीमती वेणूताई म्हसकर

यांचे गेली ४० वर्षे पूर्व आफ्रिकेत टांगानिका येथें वास्तव्य आहे. यजमान डॉक्टर असून सरकारीनोकरींत टांगानिकात होते. यांच्या घरची विचारसरणी जुन्या वळणाचीं त्यामुळे विवाहापूर्वी शिक्षण होऊ शकले नाहीं. मात्र लग्नानंतर पुनःश्च भारतात येऊन त्यांनी नर्सिंगचा कोर्स पूर्ण केला. व काही काळ खेडेगावी राहून जनसेवाहि केली. यजमानांबरोबर त्यांनी आयर्लन्ड, डब्लीनमध्ये जाऊन प्रसूति, स्त्रियांचे रोग व लहान मुलांचे रोग या विषयाचा पोस्ट ग्रॅज्युएट कोस पूर्ण केला. पुढें त्यांचे पतीला शारीरिक व्याधीमुळे सरकारने पेन्शन दिलें. व त्यामुळें त्यांनी दक्षिण भागांत लिन्डी गांवी खाजगी प्रॅक्टीस सुरू केली.



या व्यवसायाबरोबर त्यांनी त्या भागांत एक प्रिंटींग प्रेसहि सुरू केला. व स्वतःचे देखरेखीखाली आफ्रिकन माणसांना प्रिंटींगचे काम शिकवून तयार केले. लहानपणापासून यांना ईश्वर भक्तिची आवड. पुढें सव प्रकारच्या सुखदुःखाचे अनुभव आल्यानें अध्यात्माकडे मनाची धांव वाढली. व कोणाचेहि मार्गदर्शन वा मदत नसतांना श्रीहरि सत्संग मंडळ ही संस्था १९५६ साली सुरू केली व १९६० साली ती रजिस्टर करून तिला मूर्त स्वरूप आणलें. भगिनी वर्गात प्रचार कार्यही बरेंच केलें. तसेंच पुढें त्यांनी गुजराथी भाषेचे शिक्षण घेतले व गुजराथीत अध्यात्म मार्ग, अध्यात्म विचार वगैरे साहित्यहि लिहीलें तसेंच त्यांचे तिथल्या 'आफ्रिका समाचार' साप्ताहिकाच्या 'मानवधर्म' सदरात अनेक लेख गुजराथीत प्रसिद्ध होत असतात.

१९५८ साली पतिनिधनानंतर त्यांनी प्रिंटींग प्रेसचा भार लहानबंधूचेवर सोपवून १९६४ साली त्या कायम वास्तव्यासाठी म्हणून भारतात परतल्या पुढें त्यांनी कांहीं तिर्थयात्रा केल्या.नंतर परत पुण्यास आल्यावर त्यांची संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांच्याशी योगायोगाने गांठ पडली. व त्यांनी आफ्रिकेत परत जाण्याचा योग आहे काय अशी विचारणा केली. श्री जकातदारांनी त्यांना दिलेल्या काळांतच पुनःश्च अफ्रिकेस जाण्याचा योग येऊन भविष्य शास्त्राची प्रचीति आल्यानें त्यांचे या शास्त्राकडे अधिक लक्ष वेधले व विश्वासहि बसला. पुढें त्यांनी श्री. जकातदारांच्या आग्रहावरून व प्रेरणेनें त्यांनी आफ्रिकेत राहून पोस्टल टयूशन कोर्स घेतला. व त्या ज्योतिषप्रवीण उत्तीर्ण झाल्या.

त्यांच्या अध्यात्म मार्गास आतां ज्योतिष शास्त्राची जोड लाभली आहे. वैद्यकीय, अध्यात्म व ज्योतिष या तिन्ही विद्यात केवळ परमेश्वर कृपेमुळें यश मिळालें अशी त्यांची दृढ श्रद्धा व विश्वास आहे. अजूनहि त्या ज्योतिशास्त्राचा अभ्यास वाढवित आहेत.

विठ्ठल पुजाजी वाकोडे

होराभूषण

जन्म १४–९–१९३४

लहानपणींच यांना आई-वडिलांचे कृपाछत्रास मुकावे लागले बहीण भाऊ यापैकी कोणाचा आधार नव्हता. त्यामुळें एकाकी जीवन लहानपणींच यांचे वाटयास आलें. तरी पण खचून न जाता दीर्घ प्रयत्नानें ते १९५१ मध्यें मॅट्रीक पास झाले १९५४ पर्यंत त्यांचे शिक्षण सुरूं होते. यांची स्थावर इस्टेट फार थोडी, शेती होती पण ती परिस्थितीनें विकली गेली.



१९६१ मध्यें ते टाईपींगची परीक्षा पास झालें. पुढें १९६३ मध्यें त्यांनीं " होराभूषण " ही पदवी प्राप्त केली. या शास्त्राची त्यांना लहानपणापासून आवड. पुढें त्यांनीं हिंदी 'कोविद' ही परीक्षा दिली. व त्यांतहि त्यांना चांगले यश वाटयांस आलें. पुढें संस्थेची ज्यो. विशारद ही बहुमानाची पदवीहि त्यांनी मिळविली.

त्यांचा मुख्य व्यवसाय शेती, व टायपिंग हा जोडधंदा आहे. फुरसतीचे वेळी कांहीं ना कांहीं वाचन करण्याचा त्यांचा छंद आहे. त्यांना सर्व प्रकारचे वाङ्मय वाचण्यास आवडतें. त्यांचे वैवाहिक जीवन चांगले आहे. यापुढें अधिक अभ्यास करून या विषयांत प्रावीण्य मिळविण्याची त्यांची जिद्द आहे. त्याचबरोबर बी. ए. एल्. एल्. बी. होऊन वकीली करण्याची त्यांची

महत्वाकांक्षा आहे तसेंच आपल्या हातून कांहीं लेखन व्हावें असे त्यांना वाटतें. तसेंच मुख्य म्हणजे सुप्रसिद्ध ज्योतिषी होण्याचे त्यांचे स्वप्न आहे. त्यांत त्यांना यश लाभो.

मु. पो. बाभळी,
ता. दर्यापूर, जि. अमरावती.

विष्णूपंत काशीनाथ पुराणीक

ज्योतिष विशारद.
जन्म – १७ एप्रिल १९०८



यांचा जन्म श्री क्षेत्र नाशिक येथें झाला. १९२३ मध्यें व्हे. फा. उत्तीर्ण झाल्यावर घरच्या आर्थिक अडचणींचे परिस्थितीमुळें पुढें जास्त शिकता आलें नाहीं. पुढें घर प्रपंचास मदत व्हावी या हेतूनें जळगांवी वडिलांच्याकडे आलें. वडील तेथें याज्ञिकी करीत. तसेंच त्यांचे संस्कृत, याज्ञिकी, इंग्रजी यावर उत्तम प्रकारचे प्रभुत्व होतें. वडिलांचे मार्गदर्शनाखाली त्यांनीं इंग्रजी, संस्कृत व याज्ञिकी विषयांचा अभ्यास केला. तसेंच कामापुरते वेदपठणही झालें. पुढें १९२५ मध्यें जळगांव म्यु. स्कूल बोर्डात प्रा. शिक्षकाची नोकरी धरली.

पुढें एका ज्योतिषानें त्यांचे पत्रिकेवरून भविष्य कथन केले, तेव्हांपासून त्यांना या शास्त्राबद्दल औत्सुक्य निर्माण होऊन आपणही हे शास्त्र शिकले पाहिजे असे त्यांना वाटूं लागले. आरंभी त्यांनी वडिलांचे या कामी मार्गदर्शन घेतलें. पुढें अधिक माहिती मिळून ज्ञानांत भर पडावी म्हणून या विषयावरील मिळतील ती पुस्तकें वाचून मनन चालविलें. तसेंच सतत व्यासगाने प्रयत्नपूर्वक अनेक पत्रिका पाहून त्यांचे विश्लेषण करणे सुरू केले. अशा रीतीनें त्यांचे ज्ञान वाढून त्यांची प्रगति होत गेली.

नंतर त्यांनी या विषयाचे अभ्यासूंना उपयुक्त ठरेल असे "सुबोध ज्योतिष" नांवाचे पुस्तक प्रकाशित केलें. (१९३५) या ग्रंथाबद्दल मद्रास, मध्यप्रदेश, महाराष्ट्र या राज्यातील अनेक विद्वानांनी गौरवोद्गार काढले आहेत. ही गोष्ट खरोखर भूषणावह आहे. भविष्यदीप, भविष्यभास्कर या ज्योतिष मासिकांतून ते लिखाणहि करतात. त्यांनी या शास्त्रावर अनेक व्याख्यानें देऊन या विषयाचे अभ्यासूंना मार्गदर्शन केले आहे. पुढें त्यांनीं "फल ज्योतिष अभ्यास मंडळा" कडून "दशमस्थान" या विषयावर लिहिलेल्या प्रबंधास मान्यता मिळून त्यांनी "ज्योतिष विशारद" ही बहुमानाची पदवी १९६५ मध्यें प्राप्त केलीं. १९४७ सालीं त्यांची मुख्याध्यापक म्हणून म्यु. शाळा नं. २५ येथे नेमणूक झाली व तेव्हापासून परवापर्यंत (म्हणजे सेवानिवृत्त होईपर्यंत) ते तेच काम करीत होते.

ते स्वभावानें निगर्वी, वृत्तीने गंभीर, मनाचे मोकळें, लोकसंग्रहाची आवड व दीर्घोद्योगी त्यामुळें त्या भागांत फारच लोकप्रिय असून अनेकजण त्यांचेकडे मार्गदर्शनासाठीं येतात. स्पष्टवक्तेपणा, सचोटी व सहकारी माणसाबरोबर प्रेमाची वागणूक याचे बळावर त्यांनी आतापर्यंत भरपूर यश व मानसन्मान मिळविला आहे. एप्रिल १९६६ मध्यें ते नोकरीतून निवृत्त झालें. यापुढेंही या शास्त्राची जनतेला योग्य मार्गदर्शन करून सेवा करण्याची त्यांची मनीषा आहे.

ईश्वरावर त्यांची दृढ श्रद्धा आहे. अनिष्ट ग्रह स्थितीवर जप करणें, दान करणें या उपायांनी मात करता येते असे ते म्हणतात व त्याप्रमाणें मार्गदर्शन करून त्यांनी अनेकांना अरिष्टातून सोडविले आहे. अशा प्रकारें शिक्षणासारख्या सरस्वतीचे मंदिरात कार्य करून या शास्त्राची सेवा करणारे फारच थोडे दिसून येतात. त्यांचे हातून उर्वरित काळांत अशीच या शास्त्राधारे जनसेवा घडून या शास्त्राचे महत्त्व वाढो व त्याचा जास्तीत जास्त प्रसार होण्याचे दृष्टीनें त्यांचा हातभार लाभो हीच उत्कट इच्छा आम्हीं व्यक्त करतों.

बळीराम पेठ, घ. नं. १८,
निशाणदार चाळ,
मु. पो. जि. जळगांव.

अति लुब्धोऽतिमानी च निष्ठुरः कलहप्रियः।
विशाखायां नरो जातो वेश्याजनरतो भवेत्॥

विशाखा नक्षत्रांत जन्मलेल्या व्यक्ती अति लोभी, अभिमानी निष्ठुर, कलह करणारा आणि वेश्यांच्यात रमणारी अशी व्यक्ती असते.

दत्तात्रय कृष्णाजी सरमळकर

यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांतील एका खेडेगांवी झाला. घरची परिस्थिती



साधारणच गांवहि शैक्षणीक दृष्टचा मागासलेले त्यामुळें शिकण्याची आवड असूनहि शिक्षण घेता आले नाहीं तरीहि त्यांनी मोठ्या चिकाटीने शेजारचे गांवी शाळेत जाऊन मराठी ५ वी पर्यंत शिक्षण घेतले. पुढें ते मुंबईस आले. व तेथे हायस्कूलांत नांव घातले. पण कांहीं अपरिहार्य कारणामुळें त्यांना शाळा सोडून नोकरी करणे भाग पडले. पुढें त्यांचे नोकरीत अनेक बदल होत गेले त्या काळांत त्यांनी अतिशय कष्ट हाल सोसून बरेवाईट अनुभव पदरी घेतले.

त्यांना ज्यो. शास्त्राची लहानपणापासून आवड. त्यामुळें त्यांनी बिकट परिस्थितीतहि नोकरी सांभाळून ज्यो. शास्त्राचा घरच्या घरी अभ्यास केला. व ते ज्योतिष प्रवीण उत्तीर्ण झाले. व यापुढील परिक्षा देण्याची त्यांची इच्छा असून त्यादृष्टीनें प्रयत्न करीत आहेत.

C/O सी. व्ही. सरमळकर
ऐअर पोर्ट, स्वॉटिंग ऑफिस
मुंबई नं. २९.

रघुनाथ विष्णूपंत आठल्ये

ज्यो. प्रवीण

यांचा जन्म १८–१०–१९०७ रोजी शिपोशी येथें झाला. ह्यांचे आठल्ये घराणे कोकणांत रत्ना-गिरी जिल्ह्यांत प्रसिद्ध आहे. ह्यांच्या पुर्वजानी शिपोशी हे गांव इनाम मिळवीले. त्यामुळे त्यांचे वडिलांनी व त न वा डी सांभाळूनहि देशसेवा केली. श्री. आठल्ये यांचे बालपण शिपोशी येथे



गेले. मराठी ३ इयत्ता शिपोशी येथे झाल्यावर मॅट्रिक पर्यंत शिक्षण रत्नागिरी येथे चुलत्याकडे झाले.

१९२३ साली मॅट्रिकनंतर ठाणे जिल्ह्यांतील जांभूळ-गांवी शेती शिक्षण घेण्यासाठी गेले. परंतु नशिबाने फटकारा देऊन मलेरियासारख्या मोठ्या आजाराने आंथरूण धरावे लागले. शेती व खोती गावच्या वहिवाटी करीत होतें. परंतु पुढे वतने खालसा झाल्यावर व्यवसायाला वेगळे स्वरूप आले. भाताची व पिठाची गिरणी चालविली. सहकारी सोसायटी, ग्रामपंचायत ब्रँचपोस्ट यातून काम करीत आहेत.

त्यांचे चालू वय साठावे असून त्यांच्या वयाच्या मानाने अद्यापि शेती करीत असून सहकारी संस्थांतून कामे करीत आहे, हे खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांचे वडिल ज्योतिषी होते. तीच कला ह्यांच्या अंगी उतरली. त्यानी संस्थेची ज्यो प्रवीण ही प्रथम परीक्षा दिली. आता ह्या वयातसुद्धा " ज्यो. प्राज्ञ "चा अभ्यास करीत आहेत. हे खरोखर वाखाणण्यासारखे आहे. ' मनुष्य कायम विद्यार्थीच असतो " ही म्हण ह्यांच्या ठिकाणी प्रत्ययास येते.

मु. पो. शिपोशी
जि. रत्नागिरी

श्री. भास्कर महादेव जोशी

जन्म २१–६–१९२९

यांचा जन्म नेर्ली या खेडेगांवी झाला. यांचे वडील ज्योतिषी होते. घरची परिस्थिती गरीबीची व खेडेगांवी शिक्षणाची सोय नसल्याने यांचे शालेय शिक्षण फक्त व्ह. फा. पर्यंत झाले. पुढे शिकण्याची फार इच्छा होती पण ती पूर्ण होऊ शकली नाही त्यांचे विवाह समयी कोणा ज्योतिषाने त्यांची पत्रिका मंगळाची आहे असे सांगितले व तेव्हांपासून त्यांना



या शास्त्राची आवड उत्पन्न झाली व तेव्हांपासून त्यांनी या विषयाचा अभ्यास सुरू केला. १९६५ साली ते फल ज्योतिष अभ्यास मंडळाच्या ज्यो. प्रवीण व ज्यो. प्राज्ञ या परीक्षा दुसऱ्या श्रेणींत उत्तीर्ण झाले. सध्या ते प्रश्न कुंडली व संख्या शास्त्राधारे स्थूल मानाने भविष्य वर्तवितात व ते तंतोतंत बरोबर येते. सध्या ते महाराष्ट्र


राज्य कृषी निगम मर्यादित कॉर्पोरेशनमध्ये नोकरीस आहेत. अजूनही या शास्त्राचा अभ्यास वाढविण्याचा त्यांचा विचार व प्रयत्न चालू आहे.

मु. पो. रत्नपुरी,
वालचंदनगर, जि. पुणे

गोविंद बापूजी राजकोंडावार

बी. एस्सी. बी. एड्.
होराभूषण.

यांचे शिक्षण बी. एस्सी. बी. एड्. पर्यंत झाले आहे.



त्यांना या शास्त्राची लहानपणापासून आवड. त्यामुळे या शास्त्राचा शास्त्रशुद्ध अभ्यास व्हावा या हेतूने त्यांनी कोणाचीहि मदत न घेता या विषयावरील पुस्तके विकत घेऊन घरच्याघरी अभ्यास केला व संस्थेची ज्योतिषप्रवीण ही परीक्षा प्रथम श्रेणीत ते उत्तीर्ण झाले.

त्यांनीं हस्तसामुद्रिकाचाही अभ्यास केला असून कुंडली तयार करणें, स्पष्ट ग्रह काढणें फलज्योतिष व प्रश्नकुंडलीवरून फलिते सांगणें ही कामेही ते करतात. त्यांचे जवळ या विषयातील सुमारे १२५ पुस्तकांचा संग्रह आहे. ते आपल्या मित्रांना या विषयाचे विनामूल्य शिक्षण देतात. अशा प्रकारे ते या शास्त्राचा प्रसार करीत असून त्याचे महत्त्वही वाढवीत आहेत.

ते सरकारी ज्युबिनि उच्च माध्यमिक शाळेत विज्ञानाचे अध्यापक आहेत. श्री. राजकोंडावार हे नुकतेच म्हणजे जानेवारी १९६७ मार्च मध्यें "होराभूषण" झालें. शिक्षकाचा व्यवसाय सांभाळून त्यांनीं ह्या शास्त्रात इतकी प्रगति केली हे खरोखर कौतुकास्पद आहे.

मु. पो. वणी,
जि. यवतमाळ.

श्री. जानकीराम सिताराम मेटकर

बी. ए. बी. एड्.
जन्म तारीख २६ एप्रिल १९३३

यांचा जन्म बेटावद येथे २६ एप्रिल १९३३ रोजी



झाला. सन १९५७ मध्ये बी. ए (स्पेशल) उत्तीर्ण झाले. सन १९६० मध्ये डिप्लोमा इन् एज्युकेशन व १९६५ मध्ये एम. ए. (पार्ट १) उत्तीर्ण झाले. सध्या ते जळगांव येथील प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन येथे प्राध्यापक आहेत. त्यांनी "अहिराती लोकवाङ्मय" यावर लेखन केले. ते अमृत, संजय, उन्नती मासिकातून प्रकाशित झाले आहेत.

ज्योतिषशास्त्रातील नवाथे, राजे, पटवर्धन यांची महत्वाची पुस्तके ग्रंथ यांचे त्यांनी वाचन व अभ्यास केला आहे. तसेच सुप्रसिद्ध पाश्चात्य ज्योतिषी विद्वान चिरो, बेन हॅम यांच्या हस्तसामुद्रिकावरील ग्रंथांचे वाचनही केले आहे. हस्तसामुद्रिक व कुंडली यांची प्रात्यक्षिक माहिती पडताळून पाहिली आहे. ते याच वर्षी "ज्योतिष प्रवीण" ही परीक्षा १९६६ साली उत्तीर्ण झाले आहेत.

२५७ बळीराम पेठ,
कुलकर्णी बंगला,
मु. पो. जि. जळगांव,
(पूर्व खानदेश)

नोकरी केव्हा लागेल ते निश्चीतपण पाहता येते असे त्यांचे मत आहे. या विषयात ते प्राविण्य तर मिळवतीलच पण ते या शास्त्राचे नाव अजरामर करतील असे वाटते.

मु. पो. पुणतांबे
जि. अहमदनगर

वासुदेव विश्वनाथ वैद्य

जन्मतारीख ६ जानेवारी १९०६.



यांना घरच्या परिस्थितीमुळे लहानपणींच अर्धवट शिक्षण सोडून देणे भाग पडले. कोणाचाहि फारसा आधार नाही. पोटासाठी उद्योग करणे अपरिहार्यच होऊन बसले. त्यांनीं कांहीं काळ एका नाटक कंपनीत नोकरी केली. त्यानंतर त्यांनीं अनेक प्रकारची कामे करीत परिस्थितीला तोंड दिले. पुढे थोडेफार टेक्निकलचे शिक्षण घेतले. नंतर एका खाजगी कॉंट्रॅक्टरकडे नोकरी केली. सन १९३३ चे सुमारास ललिताभिनय संगीत मंडळी या नावाची संस्था स्थापण्यात पुढाकार घेतला. काही काळ त्यांनीं कथा, कीर्तने, पुराणे यांचा आधार घेतला. पुढे बिकट परि-स्थितीस तोंड देता देता येणाऱ्या लोकांकडून ज्योतिष व वैद्यक शास्त्राची माहिती घेतली. तसेच त्याचा उपयोग खेडयापाडयातून सुरू केला. अशा कठीण परिस्थितीत १९६० साली त्यांनी सहकारी सोसायटीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. नंतर १९६५ मध्ये संस्थेची प्रवीण परीक्षा ते उत्तीर्ण झाले. ६६ साली ते प्राज्ञ परीक्षाही उत्तीर्ण झाले. अनुवंशीक ज्ञानाचे बळावर वैद्यकीय सल्ला देण्याचे कामहि ते करीत आहेत. इतके दिवस ज्योतिषशास्त्राचें शास्त्रोक्त व परिपूर्ण ज्ञान नव्हते ते मिळावे या उद्देशानें त्यांनीं या शास्त्राचा व्यासंग वाढवून वरील परीक्षा देण्याचे ठरविले. अजूनहि अभ्यास वाढविण्याचा त्यांचा विचार असून ते सतत प्रयत्न करीत असतात.

मु. पो. रिहे, ता. मुळशी,
व्हा. डेक्कन जिमखाना,
जि. पुणें.

श्री. ज्ञानेश्वर तुकाराम लोखंडे

जन्मतारीख १२ सप्टेंबर १९३३



यांचे शालेय शिक्षण एस. एस. सी. पर्यंत झाल्यावर ते नोकरीसाठी मुंबईस आले. घरची परिस्थिती बिकट असल्याने त्यांना स्वतः उद्योग व्यवसाय करणे जरूर होते. मुंबईत अनेक उद्योग व्यवसाय केल्यावर पुनः आपल्या गावीं आले. तेथेही अनेक प्रकारची कामे केली पण कोठेच जम बसेना. त्यांनी काही काळ नंतर शेतीही केली. अशा अनेक अडचणी, त्रास व अपयश आल्याने शेवटी त्यांचे मन ज्योतिषशास्त्राकडे वळले. त्यांनी अनेक पुस्तकें वाचून व इतरांकडून माहिती घेऊन आपला अभ्यास सुरू केला. मनातील प्रश्न, चोरी, यशापयश, कोणतेही कार्य का होत नाही त्यावर उपाय सांगण्यांत त्यांचा हातखंडा असून अनेकांना त्याचा प्रत्ययही आलेला आहे. ग्रहांचे त्यांच्या गुणधर्माप्रमाणे निर्णय, युतीचे परिणाम हे त्यांच्या आवडीचे खास विषय म्हणता येतील. प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन केवळ प्रबळ इच्छा व प्रयत्नाचे बळावर ते या शास्त्राचा अभ्यास वाढवीत असून या शास्त्राचा उपयोग गरजूंना करून देऊन त्याचे महत्व वाढविण्याचा त्यांचा विचार आहे. परमेश्वर त्यांना सहाय्यभूत होवो हीच सदिच्छा आम्ही व्यक्त करतो.

मु. पो. बुर्ली,
ता. तासगांव,
जि. सांगली.

स्थिरभोगी च मानी च धनवांश्च सुखी भवेत् ।

तृतीयपादे तुर्ये च मूलाद्येऽर्धे परित्यजेत्

अभिमानी, धनी आणि सुखी असतो तीसऱ्यात किंवा चौथ्या आणि मूळ नक्षत्राच्या पहिल्या चरणाच्या आधी त्याचा परित्याग होतो.

श्री बजरंग गणपतराव महाकाळ

यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झालेला आहे. शिक्षण



मॅट्रीक पर्यंत झालें. शिक्षणानंतर एक दोन वर्षे शेती केली. पुढें शेती करणें जमेना म्हणून नोकरी धरली वालचंदनगर तेथें फिटर म्हणून गेली ८ वर्षे नोकरी करीत आहेत. नोकरी करीत असतानाच घरगुती वैद्यकीय उपचाराला सुरूवात केली. व ती आजहि चालू आहे.

आयुर्वेदाला ज्योतिष शास्त्राची जोड आवश्यक असल्यानें त्याकडे लक्ष वेधले व त्याचा अभ्यास त्यांनी सुरू केला. घरच्या घरी अभ्यास करून त्यांनी संस्थेची ज्यो. प्रवीण ही परीक्षा दिली व त्यांत ते उत्तीर्ण झाले. या शास्त्राचा अभ्यास वाढवून त्याचा व वैद्यकाचा कांहीतरी समाजांत उपयोग करावा अन् त्याचे समाधान लाभावे अशी त्यांना उमेद व इच्छा आहे. त्या दृष्टीनें ते प्रयत्नशील असून संस्था त्यांना शक्य तितके सहकार्य व साहच करण्यास केव्हांही आनंदच मानील.

डी. १२/५ पोस्ट कॉलनी,
वालचंदनगर,
जि. पुणें.

पद्माकर गणेश शूर.

जन्म तारींख ११ डिसेंबर १९२४.

यांचे शालेय शिक्षण मराठी इयत्ता ७ वी व इंग्रजी




इयत्ता ४ थी पर्यंत झाले. पुढें त्यांनीं सहकारी खात्यात ग्रुप सेक्रेटरी म्हणून नोकरीस सुरुवात केली. त्यांना लहानपणापासून ज्योतिषशास्त्राची आवड. तसेच शेतीचीहि आवड फार. पण ती करणे केवळ पैशाचे काम, व घरची सांपत्तिक स्थिती बेताचीच असल्याने ते जमले नाही. त्यांनीं ज्योतिष शास्त्रावरील काही पुस्तकें, टिपणे जमा केलीं आहेत. त्यांनी ज्योतिषसार या पुस्तकावरून रोगी, प्रवासाचा प्रश्न, नष्टवस्तू व इतर प्रश्न पाहिले. त्याचा त्यांना ९० टक्के खरा अनुभव आल्याने या शास्त्राबद्दलची आस्था अधिकच वाढली या शास्त्राचा अधिक अभ्यास व्हावा म्हणून त्यांनी संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परिक्षा दिली व त्यात ते उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण झाले. या शास्त्राचा याहून अधिक अभ्यास करण्याची त्यांची जिद्द आहे त्यादृष्टीने ते सतत उद्योग व्यवसाय सांभाळून प्रयत्नशील असतात.

मु. पो. जामदा;
ता. चाळीसगांव,
जि. जळगांव.

डॉ. सोमशेखर गिरमल्लप्पा बाबानगरे

जन्मतारीख २० एप्रिल १९१४

यांचे पूर्वज विजापूर जिल्ह्यातील इतिहास प्रसिद्ध



'बाबानगरे' या गांवचे रहिवासी. यांचे आजोबांना ज्योतिषशास्त्राची खूपच माहिती होती. त्यांचा सूत रंगविणे हा मूळ व्यवसाय. पुढे ते सोलापूर येथे येऊन राहिले. व त्या व्यवसायात नशिबाने हात दिल्याने त्यांतच त्यांना उर्जितावस्था प्राप्त झालीं. यांचे वयाचे २६ पर्यंत परिस्थिती उत्तम होती. पुढे परिस्थिती खालावत चालली त्यामुळे त्यांचे वडिलांनी ज्योतिषशास्त्राचा सल्ला घेतला. तो पूर्ण अनुभवास आल्यानें त्यांना या शास्त्राची आवड निर्माण झाली. पुढे यांचे शालेय शिक्षण मॅट्रीकपर्यंत झाले. नंतर त्यांनीं ज्योतिषशास्त्राचे सल्ल्यानुसार वैद्यकीय व्यवसायात लक्ष घातले. १९४६ साली त्यांनी वैद्य विशारद ही पदवी मिळविली.

वैद्यक व ज्योतिषशास्त्राचा निकटचा संबंध असल्याने त्यांनीं या विषयाचा अभ्यास चालू ठेवला असून या शास्त्राची प्रचीती त्यांना अनेकदा आली आहे. त्यांनीं संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा दिली असून पुढील प्राज्ञ पदवी परीक्षाही ते उत्तीर्ण झाले आहेत.


ते मिळेल त्या ग्रंथाचे वाचन करीत असतात. त्यांना या शास्त्राची उपयुक्तता व महत्त्व पटल्याने त्यांनी

आपल्या वैद्यक व्यवसायात त्याचा उपयोग करून घेण्याचे ठरविले आहे, त्यांची अशीच प्रगती होत जावो व या शास्त्राची भरीव सेवा त्यांचे हातून घडो हीच एकमेव इच्छा !

मु. पो. गुणदाळ,
जि. विजापूर.

लहानू कोंडाजी सुडके (पाटील)

जन्म— ११-८-१९१८



यांचा जन्म नगर येथे झाला. घरची परिस्थिती बेताचीच. वडील पोलीस-पाटील होते. त्यांचे प्रमाणेच हे स्वतःही पोलीस पाटील म्हणून काम करीत होते. पण मध्यंतरी सरकारने वतने काढून घेतल्यानें ते आता शेतीचा व्यवसाय करतात. वयाचें १८–१९ पासून त्यांना ज्योतिष शास्त्राची आवड आहे. त्यांनी अनेक पुस्तकांचे वाचन केले आहे. वृत्त-पत्रांतील संस्थेची जाहिरात वाचून त्यांनी पोस्टल टयूशन कोर्स घेतला व श्री. जकातदारांचे मार्गदर्शना-खाली अभ्यास करून ज्योतिष प्रवीण ही परीक्षा उत्तीर्ण झाले. व ज्यो. प्राज्ञ परीक्षेचा अभ्यास ते करीत आहेत.

त्यांना सामाजिक कार्याची भारी आवड. त्यांचेवर धार्मिक संस्कार उत्तम झाले असून त्याचे पालनही ते कसोशीनें करतात. तसेंच आपल्या ज्यो. शास्त्राच्या ज्ञानाचा उपयोग ते शेतकरी समाजाला मार्गदर्शन म्हणून करतात. त्यांना व्यायामाची आवड लहानपणापासून आहे. त्या-मुळे १९४२ मध्ये त्यांनी महाराष्ट्रांत शारीरिक शिक्षणात पहिला क्रमांक पटकावला होता. ते आपला शेतीचा व्यवसाय सांभाळून ज्यो. शास्त्राचा अभ्यास करीत आहेत. तसेच अधिकाधिक अभ्यास करून त्याचा उपयोग इतरांना करून देण्याची त्यांची जिद्द आहे.

घ. नं. ५५१४
नेप्ती गेट, बोरूडेगल्ली,
मु. पो. जि.—अहमदनगर.

श्रीमती लीलाताई परांजपे

जन्मतारीख २० जुलै १९१३.



यांचा जन्म सांगली येथे झाला. पुढे त्यांचे शालेय शिक्षण पुण्यास हुजूरपागेत झाले. यांना लहानपणापासून शिक्षणाची भारी आवड. वयाच्या १६ व्या वर्षी त्या विवाहबद्ध झाल्या. यांचे घरी वाठारकर नावाचे ज्योतिषी नेहमी राहात असत त्यामुळे फुरसतीचे वेळात त्यांचेजवळ त्यांनीं ज्योतिष-शास्त्राचा श्रीगणेशा सुरू केला. व दिवसेंदिवस त्यांना या शास्त्राची आवड वाटू लागली. प्रत्येक भगिनीला उपयुक्त असे हे शास्त्र असल्यानें आपणहि त्याचा अभ्यास वाढवावा असे वाटल्यावरून त्यांनीं या विषयावरील मिळतील ती पुस्तके वाचली, कांहीं माहिती जाणकारांजवळून घेतली व संस्थेची ज्योतिषप्रवीण व ज्योतिषप्राज्ञ ह्या परीक्षा देऊन त्यात त्या चांगल्या गुणांनीं उत्तीर्ण झाल्या. त्यांनीं निरनिराळी महिला मंडळे, भगिनी समाज यामधून ज्योतिषशास्त्र म्हणजे काय ? त्याची ओळख करून देणारी व्याख्यानें दिली व त्याचे महत्त्व नि उपयुक्तता पटवून दिली.

ज्योतिष हे अमार्याद असे शास्त्र असल्यानें त्याचा करावा तेवढा अभ्यास अपुराच आहे असे त्या मानतात व शेवटपर्यंत विद्यार्थी दशेतच रहावें असे त्या म्हणतात. प्रत्येक महिलेनें आपल्या मुलांचे भवितव्य काय आहे, त्याला कोणते मार्गदर्शन हवे याचे ज्ञान ती या शास्त्राचे अभ्यासाने मिळवू शकते. या शास्त्राबद्दल त्यांना फार प्रेम व आस्था असून संस्थेच्या ज्योतिषविषयक सर्व कार्यक्रमात त्या उत्साहाने भाग घेत असतात.

२७६ गणेश भुवन, तेलंग रोड,
माटुंगा, मुंबई १९.

**आद्यपादे पितुः पीडा मूले मातुर्द्वितीयके ।
तृतीये धनहानिश्च चतुर्थे सुखसम्पदः ॥**

मूळ नक्षत्राच्या पहिल्या चरणात उत्पन्न होणारा बालक पित्याला पीडीत, दुसऱ्या चरणांत आईला पीडीत तीसऱ्या चरणात संपत्तीची हानी करणारे आणि चवथ्या चरणांत सुख संपदा देणारा असते.

गजानन दिगंबर येवलेकर

जन्मतारीख २० फेब्रुवारी १९३१.

यांचे शालेय शिक्षण एस. एस. सी. पर्यंत झाले आहे.



नंतर त्यांनी मेकॅनिकल लाईनमध्ये प्रवेश केला. व सुमारे १५ वर्षे ते त्याच क्षेत्रात काम करीत आहेत. ज्योतिष शास्त्राची आवड नि उत्सुकता, यामुळे त्यांनी या विषयाची ज्योतिष प्रवीण व ज्योतिष प्राज्ञ परीक्षा दिली. व त्यात ते उत्तीर्ण झाले. या विषयाचा जास्तीत जास्त अभ्यास करून व्यासंग वाढविण्याचा त्यांचा निर्धार आहे. तसेच ज्योतिष विशारदही होण्याचा त्यांचा मानस आहे.

डी २५/३ पोस्ट कॉलनी,
मु. पो. वालचंदनगर,
जि. पुणे.

सुधीर महादेव मुणगेकर

आय. आय. टी (पवई)

जन्म १–४–१९४३.



यांचा जन्म देवगड (जि. रत्नागिरी) येथे झाला. तेथेंच त्यांचे मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण झालें सध्या ते आर्किटेक्चरचा कोर्स घेत असून ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर (मुंबई) या इन्सिटयूट मध्यें शिक्षण घेत आहेत. यांना लहान पणापासून ज्योतिष, चित्रकला, फोटोग्राफी, जादूचे खेळ, पोहणे, यांची आवड आहे. त्यांचे वडिलांनाहि त्यांच्या लहान पणापासून ज्योतिष शास्त्राची आवड असल्याने यांनाही या शास्त्राची आवड निर्माण झाली.

"फल ज्योतिष अभ्यास मंडळाची" "ज्योतिष प्रवीण' ही परीक्ष ते प्रथम श्रेणीत उतीर्ण झालें आहेत. ते सध्या आय. आय. टी. (पवई) येथें डिपार्टमेंट ऑफ केमिकल इंजिनियरींग मध्ये नोकरी करीत असून फावल्या वेळांत ज्योतिष विषयाचा अभ्यास करीत आहेत. त्यांना मंडळाची ज्योतिषाचे शिक्षण देण्याची पध्दत (पोस्टल टच्यूशन कोर्स) फारच आवडते. या विषयाचा अधिक अभ्यास करून त्यांत प्रावीण्य संपादण्याचा त्यांचा विचार असून यादृष्टीनें ते सतत प्रयत्नशील आहेत.

C/O वा. म. मुणगेकर,
टाईप H–2 खोली नं ४१,
आय. आय. टी
पवई, मुंबई ७६.

संभाजी एकनाथ कोष्टी

कोष्टी ज्ञातीतील एका कुटुंबात यांचा जन्म झाला



यांचे शालेय शिक्षण इयत्ता ५ वी पर्यंत झालें. पुढे ते व्यवसायात पडले. सध्याहि ते स्वतंत्र व्यवसाय (किराणा भुसार) करीत आहेत. हा व्यवसाय करीत असतांनाच त्यांना या शास्त्राबद्दल गोडी निर्माण झाली. त्याचा अभ्यास करावा असे वाटू लागले. त्यादृष्टीनें त्यांनी प्रयत्नशील राहून फल ज्योतिष अभ्यास मंडळाची 'ज्योतिष प्रवीण' ही परीक्षा १९६६ मध्यें उत्तीर्ण झाले. तसेच १९६७ साली दुसरी परिक्षा देऊन "ज्यो. प्राज्ञ" ही पदवी संपादन केली. ते संस्थेचे एक सभासदही आहेत. अजूनही या शास्त्रातील उच्च पदवी परीक्षा देऊन आपले ज्ञानात भर टाकण्याची त्यांची मनीषा आहे. त्यांना वाटणारी या शास्त्राबद्दलची आस्था व त्याला प्रयत्नांची जोड पाहता ते निश्चितपणें यशस्वी होतील असा विश्वास वाटतो. आजूबाजूचें भागांतील लोकांना या शास्त्राधारें मार्गदर्शनहि ते करीत असतात.

मु. पो. ता. परांडा, किराणा दुकान,
जि. उस्मानाबाद.

वैद्य आ. रा. जाधव

हे १९२७ मध्यें साताऱ्याला शिक्षकाचे नोकरीसाठी हजर झाले. पुढें १९२८ मध्ये तेथील श्री. बाळकृष्णबुवा



यांचे घरीं राहण्यासाठीं जागा मिळाली. हे बाळकृष्णबुवा ज्योतिष शास्त्राचे मोठे व्यासंगी होते. ते तेथील लोकांना आपल्या ज्ञानाचें योग्य मार्गदर्शन करीत तेव्हां त्यांनीं एकदा त्यांची परीक्षा घेण्याच्या दृष्टीने एक प्रश्न विचारला. त्याचे व त्यांनीं ज्योतिषशास्त्राधारें दिलेले उत्तर अगदीं प्रत्यक्षात खरे ठरले. त्यामुळे त्यांना या शास्त्राची आवड निर्माण झाली. त्यांनीं या शास्त्राचा अभ्यास सुरू केला. सुरुवातीस त्यांनीं ज्योतिषसार व ज्योतिषरत्न या पुस्तकांचे अध्ययन केले. नंतर त्यांनीं काही काळ रमल ज्योतिषाचा अभ्यास केला. पुढें त्यांनी एका ज्ञानी सद्‌गृहस्थांचे सल्ल्यानुसार रमल ज्योतिष पाहणे बंद केलें. सध्यां ते ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करीत असून तोच त्यांचा व्यवसायहि बनला आहे. या व्यवसायाने आपणांस चांगलीच मदत केली असे ते आनंदाने सांगतात. १९२८ पासून त्यांनीं अनेक पुस्तकांचा संग्रह करीत आणला आहे. सध्यां त्यांचेजवळ ज्योतिषविषयक अशी लहान-मोठी ६३ पुस्तके आहेत. त्यांनीं संस्थेची ज्यो. प्रवीण ही परीक्षा दिली आहे. अजूनहि यापुढील संस्थेच्या परीक्षा देण्याचा त्यांचा इरादा आहे.

मु. पो. पेठ,
जि. सांगली.

श्रीधर विष्णु पुराणिक

यांचे घराणे वैदिक आचार, धार्मिक परंपरा राख-



णारे. यांचें शिक्षण जळगांव येथे एस. एस. सी. पर्यंत झाले. पुढें नोकरी सांभाळून केवळ वडिलांच्या आग्रहाखातर कॉलेज शिक्षण सुरू ठेवले होते. सध्यां ते इरिगेशन खात्यांत नोकरी करतात.

या शास्त्रावर त्यांचे वडिलांनीं 'सुबोध ज्योतिष' हा ग्रंथ लिहीला आहे. त्यामुळे या शास्त्राबद्दल त्यांना उत्सुकता निर्माण झाली व त्या दृष्टीने त्यांनी आपले वाचन व प्रयत्न सुरु ठेवले. नंतर त्यांनीं 'फल ज्योतिष अभ्यास मंडळा,तर्फे पोस्टल ट्यूशनव्दारे घेण्यांत येणारी 'ज्योतिष प्रवीण' ही परीक्षा देऊन त्यांतहि १९६६ चे एप्रिलमध्ये उत्तीर्ण झाले.

या शास्त्राची परंपरा त्यांना लाभली व त्यामुळे गेलीं बरीच वर्षे त्यांना त्याची आवड व छंद आहे. या शास्त्राचा अधिक अभ्यास करून नावलौकिक मिळविण्याचा व या शास्त्राचे महत्त्व वाढवून जनतेला त्याचा योग्य तो उपयोग करून देण्याचा त्यांचा मानस आहे. त्या दृष्टीने ते प्रयत्नशील असून प्रभुकृपेने त्यांना यश लाभेल यात मुळीच संदेह वाटत नाही.

केअर ऑफ गिरणा कालवा,
उपविभाग मु. पो. कासोदे,
ता. एरंडोल,
जि. जळगांव.

पुरुषार्थी प्रवासी च बन्धुकार्यें सदोद्यमी ।
अनुराधाभवो लोकः सदा हृष्टश्च जायते ।।

अनुराधा नक्षत्रावर जन्माला येणारा पुरुष पुरुषार्थी प्रवासी, भावंडांच्या बद्दल नेहमी उत्साही त्यांचे करण्यास कायम प्रसन्न असतो.

बहुमित्रः प्रधानश्च कविदीनो विचक्षणः ।
जेष्ठा जातो धर्मरतो जायते शूद्रपूजितः ।।

जेष्ठा नक्षत्रावर जन्मास येणारा पुरुष पुष्कळ मित्र-परिवार असलेला प्रधान, कवि, दानी, निपुण, धर्म त्यांत रमणारा आणि शूद्रांना पूज्य मानणारा.

श्री. यशवंत काशीनाथ थळी

जन्म दिनांक ९ एप्रिल १९२१

सध्यां यांचे वास्तव्य गोव्यांत आहे. ते फॉरेस्ट खात्यांत नोकरी करतात. लहानपणापासून त्यांचा या शास्त्राकडे ओढा होता. सन १९५१ पासून त्यांनीं या विषयाचा अभ्यास सुरू केला श्री. नवाथे, प्रधान, सोमण राजे वगैरे प्रसिद्ध ज्योतिर्विदांच्या ग्रंथांचें त्यांनीं अध्ययन केले आहे. संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा ते उत्तीर्ण झालें आहेत. आतापर्यंत त्यांनी जवळजवळ १०० चे वर पत्रिका सूक्ष्म लग्न-साधन, स्पष्ट ग्रहसाधन करून दिल्या आहेत. त्याबद्दल कोणतीही अपेक्षा ठेवली नाहीं. या शास्त्राचें अभ्यासासाठी त्यांनी पुष्कळ वेळ व पैसा खर्च केला पण एकहि पैसा मात्र घेतला नाहीं. ते अधूनमधून स्थानिक नियत-कालिकांतून ज्योतिष विषयावर लेखन करीत असतात. अजूनहि या शास्त्राचा अभ्यास वाढविण्याचा त्यांचा विचार आहे.



मु. पो. रायबंदर,
गोवा

शामकांत हनुमंतराव मोरे

जन्म—२३-१०-१९३८

यांचे गांव सोलापुर, परंतु नोकरीनिमित्तानें वडील तळेगांवीं राहिल्यामुळें वयाचे ५ वे वर्षापासून तळेगांवातच वास्तव्य. एस्. एस्. सी. पर्यंतचे सर्व शिक्षण तेथेंच झाले. घरची परिस्थिती बिकट असल्यामुळें इच्छा असूनहि पुढील शिक्षण घेता आले नाहीं. पुढें कांहीं काळ त्यांनीं पोस्टांत नोकरी केलीं. त्यांत मन न लागल्यानें १९५८ सालीं आय्. टी. आय्. (औंध कँप) येथें इलेक्ट्रिशियनचा कोर्स घेतला. त्यांत ते प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले. नतर ३ वर्षे पेनिसिलीन फॅक्टरींत नोकरी केली.



दोन वर्षांपूर्वी त्यांना या शास्त्राचा गंधदेखील नव्हता. पुढें एके दिवशीं फल ज्योतिष अभ्यास मंडळाची वृत्तपत्रांतील जाहिरात (पोस्टल कोर्स) वाचनांत आली. व त्यानंतर त्यांनी तो कोर्स सुरु केला. श्री. जकातदार यांचें अचूक व योग्य मार्गदर्शन लाभल्यामुळें सप्टेंबर १९६५ मध्यें 'ज्यो. प्रवीण' परीक्षेंत प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले. तेव्हांपासून त्यांनीं या शास्त्राचा अभ्यास वाढविण्यास सुरुवात केली. तसेंच या शास्त्रातील 'ज्यो–प्राज्ञ' ही परीक्षा देण्याचा त्यांचा विचार आहे. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्राचा अधिकाधिक संशोधनात्मक अभ्यास करून या शास्त्राचें महत्त्व जननेंत वाढावे या दृष्टीनें प्रयत्न करण्याचा त्यांचा मानस आहे.

डॉ. पोतदार यांचे बंगल्याशेजारी,
बुधवार पेठ,
मु. पो. तळेगांव दाभाडे,

डॉ. वसंत पांडुरंग परांजपे

जन्म—२३ मे १९३३

यांचा जन्म इरिंगा या गांवीं आफ्रिकेंत झाला. वयाचे ६ व्या वर्षी ते भारतात परत आले. त्यांचे सर्व शिक्षण येथेंच झालें. वयाचे १७ व्या वर्षी ते मॅट्रिक उत्तीर्ण झाले व २३ व्या वर्षी डॉक्टर (जी. एफ्. ए. एम्) झाले वयाच्या २४ व्या वर्षापासून डॉक्टरचा व्यवसाय ते करीत आहेत. त्यांना लहानपणापासून या शास्त्राबद्दल आवड आहे, तसेंच मिश्रवैद्यक, संगीत, योग, शेअर्सचा व्यवहार यांचीहि आवड आहे. त्यांनीं नुकत्याच संस्थेच्या ज्यो. प्रवीण व प्राज्ञ या दोन्ही परीक्षा दिल्या आहेत. त्यांचा स्वभाव उत्साही असून त्यांना संशोधनाची आवड आहे. या पुढील ज्यो. विशारद पदवी परीक्षेसाठी त्यांनीं 'दमा' या विषयावर एक प्रबंध लिहिण्याची तयारी केली आहे. तसेच या शास्त्राचा डॉक्टरी व्यवसायाकडे उपयोग करून घेण्याकडे त्यांचा कल असून त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. या विषयांत अधिकाधिक यश व कीर्ति मिळवून त्यांचे व्यवसायाला पूरक असा या



शास्त्राचा उपयोग होईल, यात आम्हांला मुळीच संदेह वाटत नाहीं. त्यांची धडपडी वृत्तिवया शास्त्राबद्दलची आस्था व कळकळ पाहता ते आपलें ध्येय निश्चितपणें गाठूं शकतील असे आम्हांला खात्रीपूर्वक वाटते.

सरस्वती महाल
रानडे रोड,
दादर, मुंबई २८.

वैद्यभूषण डॉ. आर. एस्. अत्रे B. Sc.

जन्म—१—४—१९२३




यांचे वडिलांचा ज्योतिष व वैद्यकाचा व्यवसाय होता त्या मुळें बालपणापासूनच यांचे मनावर या विषयाचें चांगले संस्कार झाले त्यामुळे स्वाभाविकच या शास्त्राबद्दल गोडी निर्माण होऊन एक प्रकारची घडण तयार झाली. शिक्षण बी. एस्. सी. पर्यंत, राष्ट्रभाषा प्रबोधची हिंदी परीक्षा उत्तीर्ण. वैद्यभूषण, अयुर्वेद विशारद या परीक्षा दिल्या आहेत.

वडिलांचें कृपाछत्र फारच अल्प लाभलें. तसेंच मातृसुखासहि पारखें व्हावे लागून त्याच परिस्थितींत अनेक ठिकाणीं प्रवास केला. साधूसंतांचा सहवास लाभून ज्ञान लाभलें. १९४२ च्या देशव्यापी स्वातंत्र्य चळवळींत भाग घेतला. त्यानंतर खेडयांतील अज्ञानी जनतेची सेवा करण्याचा उपक्रम सुरूं केला व त्या दृष्टीनें आयुर्वेदीक औषधें तयार करणें, भस्में, मात्रा तयार करून लोकसेवेचें व्रत अंगिकारलें आहे.

१९५१ मध्यें माननीय ज्योतिषतज्ज्ञ भिकीलाल सारस्वत (बहिरेबाबा) यांचेकडून ज्योतिषाचे ज्ञान मिळविलें. त्यानंतर हळूहळू पत्रिका तयार करणें, ज्योतिष वर्तविणें सुरूं केले असून फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या "ज्योतिष प्रवीण" या परीक्षेचा अभ्यास करून पदवी प्राप्त केली.

सेवाश्रम कार्यालय भांडार
पिंपळगांव (जि. नाशिक)

विनायक दिगांबर जोशी



यांचे मूळ गांव बलवडी. यांचे घराणे मूळचे भिक्षुकांचे. त्यांचें घरांत वडिलोपार्जित ज्योतिष व उपाध्यायाचा व्यवसाय. त्यामुळें लहानपणींच त्यांनीं वडिलांकडून पंचागाचीं नक्षत्रें तिथी यांची माहिती घेतली. ज्योतिषशास्त्राचे शास्त्रीय ज्ञान मिळविण्याची त्यांना उत्कट इच्छा होती. पण ती बरेच दिवस पूर्ण होऊ शकली नाहीं. पुढे १९६० पासून त्यांची या शास्त्राकडे बघण्याची दृष्टि बदलली. नंतर त्यांनीं या विषयाचा अभ्यास वाढविला व संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा उत्तीर्ण झाले. अजूनहि अभ्यास करून त्यांत प्रावीण्य मिळविण्याची त्यांची उमेद आहे. त्यांची हौस, प्रयत्न पाहतां ते प्रगतिपथावर निश्चितपणे मार्गक्रमण करतील असे वाटते. ते या भागातील गरजूंना आपल्या ज्ञानाचा उपयोग करून देतात. अनेकांना त्याचा पडताळ आला आहे. त्यामुळें ते अधिकच उत्साही होतात. त्यांना असेच यश लाभो व त्यांचे हातून या शास्त्राची सेवा घडो.

डि. २७ खो. नं. ७.
पोस्ट कॉलनी, मु. पो. वालचंदनगर,
जि. पुणें.

हेमंतकुमार सोपानराव डाके

जन्मतारीख १२ जुलै १९३८



यांच्या शालेय शिक्षणांत घरच्या कांहीं अडचणींमुळें आणि निजामाविरुद्ध झालेल्या पोलीसकारवाईमुळें खंड पडला तरी त्यांनी न डगमगतां आपले मॅट्रिकचे शिक्षण बार्शी येथें पूर्णत्वास नेलें. शाळेत शिकत असतांनाच त्यांना या शास्त्राची आवड निर्माण झाली व त्याचा अभ्यास करावा असे वाटूं लागलें. पण कांहीं काळ घरची गरिबी आड आल्याने ती इच्छा फलद्रूप होऊं शकली नाहीं. पुढे त्यांनीं त्यांचे व्यवसायास त्यांचे गांवींच सुरुवात

केली. पुढे व्यवसायामुळें ते सोलापूर व पुणे येथें राहिले. तेथे व्यवसाय जमेना. म्हणून पुनश्च आपल्या मूळ गांवीं येऊन व्यवसाय करण्यास सुरुवात केली व तो करता करता या विषयाचा अभ्यास करून संस्थेची ज्योतिष प्रवीण ही परीक्षा ते प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले अजूनहि ह्या विषयाच्या परीक्षा देण्याची त्यांची मनीषा आहे. व्यवसाय कोणताहि असो, माणसाचे ठायीं जिद्द, प्रबळ इच्छा व योग्य प्रयत्न झाले तर तो कोणतेहि एका विषयात प्रावीण्य संपादन करूं शकतो हेच यावरून दिसून येतें. यांच्यासारख्या अभ्यासू, हौशी, ज्योतिषप्रेमी विद्यार्थ्यांची संस्थेला फार जरुरी आहे. त्यामुळें ते आपल्याबरोबर या शास्त्राचे महत्त्व वाढवीत आहेत ही गोष्ट निर्विवाद. त्यांना यापुढील भावी जीवनांत यश लाभो व या विषयांतही त्यांची पावलें प्रगतिपथावर पडोत हीच शुभेच्छा !

डाके हेअर कटिंग सलून,
मु. पो. परांडा, नेहरू चौक,
जि. उस्मानाबाद.

प्रकाश अनंत शिधये

यांचें घराणे मूळचें दापोली तालुक्यांतील उंबरले गांवचे. यांचा जन्म मुंबई येथें झाला. पण बालपण मात्र इंदूर येथें गेलें त्यांच्या घराण्यांत जमीनदारी होती. पुढे संस्थाने खालसा झाल्यानें त्याला उतरती कळा लागली. त्यामुळें वयाचे ८ वे वर्षापासून ते शिक्षणासाठीं



आजोळी आलें. सातवीपर्यंत शिक्षण घेतल्यावर ते पुढें आपल्या थोरल्या मामांकडे ठाण्यास आले. व मॅट्रिक पर्यंत शिक्षण तेथेंच झाले. पुढें कांहीं घरगुती अडचणींमुळें त्यांनीं एका औषधी कंपनीत नोकरी धरली.

त्यांच्या मामांच्याकडे येणाऱ्या एका मित्रानें मामांचे परदेशागमनाचे भविष्य वर्तविलें. व तें अगदीं खरे ठरलें. त्यामुळें त्यांना या शास्त्राबद्दल प्रेम व विश्वास उत्पन्न झाला व आपणहि या शास्त्राचा अभ्यास करावा असे वाटूं लागलें. पुढें फलज्योतिष शिक्षण मंडळाची ज्योतिष शिक्षण कोर्सची जाहिरात वाचण्यांत आली. त्यामुळें त्यांनीं घरीच अभ्यास करून ज्यो. प्रवीण ही परिक्षा ते उत्तीर्ण झालें. ते या शास्त्राचा अधिक सखोल अभ्यास करण्याकडे आपले लक्ष केंद्रित करणार आहेत.

मानवी जीवनास अचूक मार्गदर्शन करणारें असें ज्योतिष हें एकमेव शास्त्र असून तो एक अमोल ठेवा आहे. मात्र त्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास झाला पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत आहे.

जीवन हॉटेल, मोती चौक,
मु. पो. जि. सातारा,
सातारा सिटी.

काशीनाथ दामोदर चितळकर

जन्मतारीख २६ डिसेंबर १९२६

यांचे मूळ गाव पुणतांबे जि (अहमदनगर) होय. यांचे घराणे मध्यमवर्गीय ब्राह्मणाचे. वडिल शेती व भिक्षुकी असे दोन्ही व्यवसाय करीत. १९४१ मध्ये ते मराठी सातवी उत्तीर्ण झाले. पुढे त्यांचे वडिलांचे इच्छेनुसार इंग्रजी शिक्षण न घेता त्यांनी शु. य. मां. शाखेचे (यजुर्वेदी) वैदीक व



भिक्षुकीचे शिक्षण त्यांचे मामेभाऊ श्री. वे. शा. सं. विश्वनाथ शंकर सांब यांचेकडे घेतले. हे शिक्षण चालू असताना त्यांनी श्री भगवान बुवा चांगदेव मरुद्गण या विद्वान ज्योतिषाजवळ या शास्त्राचे प्राथमिक शिक्षण घेतले. त्यांचेकडे त्यांनी कुंडली कशी करावी, त्याचेही शिक्षण घेतले. नंतर त्यांनी ज्योतिषाचा व्यासंग वाढविला व ते प्रश्नज्योतिष पाहू लागले. अनेकांना त्याचे ठोकताळे येऊ लागले त्यामुळे त्यांचा उत्साह वाढला. ते जन्मपत्रिका देखील तयार करू लागले. पुढे त्यांनी संस्थेच्या ज्यो. प्रवीण व ज्योतिष प्राज्ञ या परीक्षा दिल्या व ते त्यात उत्तीर्ण झाले. अजूनही त्यांचा अभ्यास सुरूच आहे. ते विवाह, आरोग्य, शारिरिक आजार संतती, शिक्षण व निवडणूक प्रश्न अचूक पाहतात. तसेच

डॉ. नवनीतलाल जीवनलाल भाटीया, चौधरी

जन्म–१९–९–१९३३.



यांचा जन्म धरणगांव येथें एका गर्भश्रीमंत कुटुंबात झाला. लहानपण फार सुरुखांत गेले वडिलोपार्जित व्यवसाय किराणा दुकानाचा. १९५२ साली मॅट्रीक उत्तीर्ण झालें. व दुकानावर काम करूं लागलें. घरगुती अडचणीने अधिक शिकता आले नाही. फेब्रुवारी १९६० पासून त्यांनीं ब्रुक बाँड इं. प्रा. लि. या कंपनीत नोकरी धरली व निरनिराळ्या ठिकाणी कंपनीचे कामासाठी प्रवास केला. त्यामुळें अनेक अनुभव आले.

यांचे आजोबा खानदेशांत प्रसिद्ध वैद्य होते. यांनी आयुर्वेदाचे बरेच ज्ञान संपादन केले व आपले गांवी आयुर्वेद वस्तु भांडार सुरूं केले. त्यांनीं आयुर्वेदातील अनेक ग्रंथांचे वाचन केले आहे. १९६४ मध्यें त्यांनीं बायोकेमिकल ट्रे. कॉलेजची पदवी मिळविली. गरीब रोग्यांसाठी सोनगी येथें दवाखाना स्थापन केला. वैद्यकाचा व ज्योतिष शास्त्राचा निकटचा संबंध म्हणून ज्यो. शास्त्रातील ज्यो. सार, ज्योतिषरत्न व बेहेरे यांची पुस्तकें त्यांनीं वाचून अभ्यास वाढविला.

ज्यो. शास्त्राबद्दल आवड वाढून त्यांनीं संस्थेची ज्यो॰ प्रवीण ही परिक्षा दिली. व त्यातहि ते उत्तीर्ण झाले. ते कोणत्याहि रोग्याला अल्प मोबदल्यांत औषधोपचार करतात. व त्याचा गुणहि चांगला येतो त्यांचे कुटुंब बरेच मोठे असून शेतीचा व्यवसाय चालतो. सामाजिक कार्याची फार आवड तसेंच निष्काम बुद्धीने ते काम करीत असतात. दुसऱ्या कडून मिळेल ते ज्ञान घेत असतात. आपल्या हातून कांहीतरी भरीव काम व्हावे अशी त्यांची दृढ मनीषा आहे.

ब्रुक बाँड सोनगीर
मु. पो. जि. धुळें.

पं. वि. म. जोशी



पं. वि. म. जोशी यांचा जन्म १३–२–१८९९ रोजी करंजगाव येथे झाला. हे जातीने ब्राह्मण व कौटुंबीक. कुटुंबाची आर्थिक स्थिति मध्यम प्रतीचीच होती. यांचे वडील शेतीची देखरेख करीत, ते छोटेसे इनामदार होते. १९०८ साली श्री. जोशी आपल्या मातुश्रीसह पुण्यास आले. त्यांनी मॅट्रिकची परीक्षा दिली व नंतर एस. पी. कॉलेज मध्ये नांवही घातले परन्तु कांही अडचणींमुळे त्यांना कॉलेज शिक्षण घेता आले नाहीं कारण घरची व्यवस्था पाहणे भाग पडले.

१९२३ साली त्यांचा श्री मेरुशास्त्री गोडबोले यांच्याशी परिचय झाला. व त्यांना ज्योतिषशास्त्राचा नाद लागला तेव्हापासून त्यांनी अक्षर पद्धतीचा अभ्यास सुरू केला. या विषयावर मुलगा पाहिजे की, मुलगी ? या मथळयाखाली मुंबईच्या 'संदेश' दैनिकांत त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत. अगदी अलिकडे पुण्याच्या विशाल सह्याद्रीतून प्रे. जॉन्सनच्या निवडणूकी बद्दल त्यांनी एक महिना आधी भविष्य वर्तविले होते. तसेच कार्ले गुरुजींच्या मेयर पदाचे भविष्यही त्यांनी पूर्वीच वर्तविले होते.

'Theory of Phonetiecs' हे ज्योतिष शास्त्रावरील पुस्तक त्यांनी नुकतेच प्रसिद्ध केले आहे. यांचा प्रमुख व्यवसाय खाजगी क्लासेस चालविण्याचा असून त्यांचे बंधू श्री. गो. म. जोशी यांनी बंधूच्या सहकार्याने १९२५ पासून १९६३ पर्यंत कँपमध्ये क्लासेस चालविले आहेत.

गोखले नगर,
पुण ५.

इष्टमात्रोपकारी च भाग्यवांश्च जनप्रियः।
पूर्वाषाढे नरो जातः सकलार्थविचक्षणः॥

पूर्वाषाढामध्ये जन्माला येणारे दुसऱ्यावर उपकार करणारा भाग्यवान, सज्जनांचा प्रिय आणि सर्व कार्यात निपुण असा असतो.

सौ. अनुराधा मधुकर पाठक

ज्योतिषप्राज्ञ.



लहानपणापासून यांना शिक्षणाची भारी हौस. मग ते शिक्षण कुठल्याका विषयाचे असेना. यांचे वडील सरकारी नोकरींत होतें त्यामुळें त्यांच्या शालेय शिक्षणाची फारच हेळसांड झालीं. त्यातहि त्यांनीं एस्. एस्. सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलें व वडिलांच्या वारंवार बदलीच्या नोकरीमुळें त्यांना इच्छा असूनहि शिकता आलें नाहीं त्यातहि त्यांनीं मोठ्या प्रयत्नानें टेलरिंग, टायपिंग, हँडीक्रेफ्टच्या कोर्सचे शिक्षण सुरू ठेवले आहे.

पुढें त्यांना शिक्षण घेण्याऐवजी नोकरी करणें भाग पडलें. त्यामुळें महत्वाकांक्षेला मुरडच घालावी लागली. पुढें त्यांनीं हिंदीची प्रवीण परीक्षा दिली. सार्वजनिक उत्सवांत एकदा त्यांचेवर नाइलाजानें कीर्तन करण्याचा प्रसंग आला व त्यामुळें त्यांना या शास्त्राचे अभ्यासास वाव मिळाला. कीर्तन संपल्यावर एका वयोवृद्ध गृहस्थांनी त्यांची आस्थेवाईकपणें चौकशी केली. तेंव्हां त्यांनी त्यांचेजवळ ज्योतिषशास्त्राचा विषय काढला तेंव्हां त्या गृहस्थांनीं या शास्त्राचे शिक्षण देण्याचे कबूल केलें. ते सद्‌गृहस्थ म्हणजेच ग. वि. ढवळेशास्त्री होत.

त्यांनीं पुढें दर शनिवार रविवार जाऊन या शास्त्राचे ज्ञान घेतलें. पुढें त्यांनीं संस्थेची "ज्यो. प्रवीण" ही परीक्षा दिलीं व त्यात त्या उत्तीर्ण झाल्या. १९६७ च्या प्राज्ञ परीक्षेतहि त्या चांगल्याप्रकारे उत्तीर्ण झाल्या अजूनहि शिकण्याची त्यांची मनीषा आहे. "मनुष्य हा जन्मभर विद्यार्थीच असतो" असे त्या म्हणतात. सध्या त्यांचेवर संसाराची जबाबदारी पडली असली तरी त्यांची या विषयाबद्दलची आवड, धडपड, व चिकाटी नि परीश्रम पाहून त्या या शास्त्रांत अधिक प्रगती करून नांव मिळवतील असा विश्वास वाटतो. संस्था त्यांना नेहमीच साहय करील.

भगवान म्हात्रे चाळ,
जयहिंद कॉलनी, विष्णुनगर,
मु. पो. डोंबिवली, जि. ठाणें.

भिकचंद पुनमचंद कटारिया

जन्म दिनांक ११ एप्रिल १९२६



यांचे जन्मगाव कुर्डुवाडीपासून दोन मैलांवर असलेले बारलोणी हे खेडेगाव होय. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची. त्यामुळे त्यांचे शालेय शिक्षण बार्शी येथे फायनल पर्यंतच झाले. पुढे पाथर्डी येथील बोर्डिंगमध्ये राहून इंग्रजी चौथीपर्यंत शिक्षण घेतले. नंतर घरच्या काही अडचणीमुळे बार्शीला यावे लागले व तेथेच नोकरी करण्यास सुरवात केली. त्यामुळे शिक्षणात खंड पडला. पुढे १९४८ मध्ये ते बार्शी सोडून पुण्यास आले. व व्यापारी पेठेत नोकरी धरली. याच कालात त्यांचा अनेक विद्वान साधूंशी परिचय होऊन संबंध वाढले. तेव्हांपासून त्यांना जैन तत्वज्ञानाच्या अभ्यासाची गोडी लागली. पुढे १९५९ मध्ये ते पुणे सोडून बार्शीला आले व तेथील एक जैन समाजाच्या ट्रस्टमध्ये मॅनेजर व बोर्डिंग सुपरिंटेंडेंट म्हणून नोकरी धरली. तेथे त्यांच्या समाजातील विद्वान जैन आचार्यांशी परिचय झाला. तेव्हांपासून त्यांना मंत्रशास्त्र व ज्योतिष या विषयाची गोडी वाटू लागली पुढे एका जैन साधूंनी ज्योतिष शिकण्यास सहकार्य केले. पुढे त्यांनी तेथील एक ज्योतिर्विज्ञान पंडित श्री. मार्तंड बुवा व श्री प्रभाकरपंत शद्रीकर यांचे मार्गदर्शनाने व सहकार्याने या शास्त्राचा अभ्यास वाढविला व संस्थेची 'ज्योतिष प्रवीण' ही परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या शास्त्राचा अभ्यास वाढवून त्याचा जनतेला उपयोग करून देणे ही त्यांची मनीषा आहे. त्या दृष्टीने ते अभ्यास वाढवीत आहेत. त्यांना सामाजिक कार्याची विशेष आवड आहे. अखिल भारतीय मारवाडी संमेलनाच्या बार्शी शाखेचे ते सदस्य आहेत. परमेश्वर त्यांना भरपूर यश देवो ही शुभेच्छा !

४१०७ खानापूर रोड,
बार्शी टाऊन,
जि. सोलापूर

यादवराव रंगनाथ कुलकर्णी

(सिव्हील जज्ज)

बी. ए. एल्. एल्, एम्.

एम्. जे. एस्.


यांना लहानपणीचे वयाचें ९ व्या वर्षी शिक्षणासाठी बाहेर गांवी जावे लागले. पुढें पंढरपूर, नगर, पुणें येथें राहून त्यांनी आपले कॉलेजचे पदवी परीक्षेचे शिक्षण पूर्ण केले. ते १९५७ मध्यें एलएल. एम्.झाले.त्या भागांत तेएक निष्णात वकील म्हणून प्रसिद्धीस आले पुढें ते सिव्हील जज्ज झाले व त्यांची ज्यु. मॅ. वर्ग १ म्हणून निरनिराळचा गांवी नेमणूक झाली.



नोव्हेंबर १९६३ मध्यें पुत्राचें दुःखद निधनांत ज्यो. शास्त्राचा अभ्यास सुरू केला. मनाला विरंगुळा लाभावा म्हणून ते या शास्त्राकडे आकर्षित झालें. ज्यो. प्राज्ञ प्रथम श्रेणींत द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. अजूनहि या शास्त्राचे खूप शिक्षण घेण्याची त्यांची इच्छा असून त्यानुसार ते या विषयाचा अभ्यास, वाचन सतत करीत असतात.

त्यांनी पत्रिकेवरून वर्तविलेली बरीच भाकीते खरी ठरली आहेत. ते आपला व्यवसाय सांभाळून या शास्त्राचा जो अभ्यास करीत आहेत ही खरोखर अभिनंदनीय गोष्ट म्हटली पाहिजे. त्यांना त्यांचे क्षेत्रांत व या विषयांत भरपूर यश व मानसन्मान लाभो असेच कुणीही म्हणेल.

मु. पो. बारामती,
स्टेशन जवळ,
जि. पुणें



श्री. यादवराव कुळकर्णी (सि. जज्ज) जि. प. अध्यक्ष शंकरराव उरसळ यांच्या हस्ते प्रमाणपत्र घेत आहेत. संस्थापक श्री. अ जकातदार उभे आहेत.

विजयकुमार भालचंद्र मुळे.

यांचे एस. एस. सी पर्यंतचे शिक्षण सारडा विद्यालय सिन्नर येथे झाले. १९६१ साली ते एस. एस. सी. व १९५९ मध्यें राष्ट्रभाषा प्रबोध परीक्षा उत्तीर्ण झाले. तसेच त्यांनीं १९६४ मध्यें वायरमनच्या परीक्षेत यश मिळविले १९६७ मध्यें इलेक्ट्रीक सुपरवायझरचे परीक्षेस बसण्याचा त्यांचा



वचार आहे. यांना ज्योतिषशास्त्राची फार आवड आहे तसेच हस्तसामुद्रिक शास्त्राकडेही यांचा फार ओढा. त्यामुळे त्यांनी घरीच पुस्तकें वाचून व संस्थेचा पोस्टल टयूशन कोर्स घेऊन 'ज्यो. प्रवीण' परीक्षा पास झाले. या बाबतीत संस्थेचे अध्यक्ष श्री. जकातदार यांचे मार्गदर्शनाचा फार उपयोग झाला असे ते म्हणतात. अजूनही या विषयाचा अभ्यास करण्याचा त्यांचा संकल्प आहे.

९३६ मुळे वाडा, मु. पो. सिन्नर,
जि. नाशिक, लोंढे लेन.

अनंत गणेश उपासनी

यांनी ज्योतिष–प्रवीण व प्राज्ञ ह्या पदवी परीक्षेचा अभ्यास संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार ह्यांच्या मार्गदर्शनाखाली केला व त्यात ते उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले. हस्तसामुद्रिक, अंकशास्त्र या विषयांचा अभ्यास त्यांनी पुस्तकांचे साह्यानें केला. त्यांचा या विषयाचा अभ्यास बराच आहे. ते षोडशवर्ग कुंडली तयार करणे, प्रश्न पहाणें, विवाह कुंडल्या तपासणें, फल ज्योतिष यांचा मेळ बसवून अनुकूलता काढणे अशी सर्व कामे ते करीत असतात.

त्यांचे फल ज्योतिष शास्त्र, अंकशास्त्र व हस्तसामुद्रिक या नव्या सिद्धांत सर्वांचा मेळ एकमेकांशी कसा बसतो व ते एकमेकांना कसे पूरक आहेत हे ठरवण्याचे कार्य चालू आहे. त्याचप्रमाणें अधिक धान्य पिकवा, फळझाडांची लागवड, पाणी पुरवठा, घर बांधणी, वगैरेसाठी ठरावीक नक्षत्रावर ज्योतिषशास्त्र दृष्टचा जर हे काम केले तर कसे उपकारक ठरेल ह्या विषयी संशोधनात्मक अभ्यास चालू आहे. फळबागा, वृक्षसंपदा वाढविणे हे ज्योतिषशास्त्र दृटचा दिलेल्या नक्षत्रावर केल्यास त्याचे तंतोतंत फळ मिळते असे त्यांच्या अनुभवास आले आहे.

त्यांनी आतापर्यंत ज्योतिर्विद सोमण, मोघे, नवाथे भट, केळकर, जोशी, सप्रे अशा विद्वान ज्योतिषांचे ग्रंथ तसेच "ज्यो. समाचार" व अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगझीन बंगलोर ही मासिके अभ्यासली आहेत. त्यांच्या जवळ ज्योतिषशास्त्र, अंकशास्त्र हस्तसामुद्रिक, ह्या विषयावरील लेखांचा बराच संग्रह आहे. सतत धडपड व कष्ट करून ते या शास्त्राचा अभ्यास वाढवित आहेत त्याबद्दल संस्था त्यांना नेहमी सहकार्य करील.

४०१५ ग. नं. १ देवपूर–धुळे.

अनंत रामजीराव मोरे

जन्मतारीख १० मे १९४२

यांचे शालेय शिक्षण मॅट्रीकपर्यंत झाले. व महाविद्यालयीन शिक्षण काही अपरिहार्य कारणांमुळें अर्धवट सोडून द्यावे लागले. १९६१ मध्ये त्यांनीं आर्मीमध्ये प्रवेश केला. पुढे त्यांना १९६३ मध्ये नॉन-कमिशन ऑफिसर म्हणून प्रमोशन मिळाले. ते हिंदी प्रवीण परीक्षा पास आहेत. या शास्त्राकडे ते



केवळ योगायोगाने आकर्षित झाले. एका ज्योतिषी गृहस्थांशी त्यांची सहज ओळख झाली. पुढे त्यांच्याजवळ असलेली या विषयावरील पुस्तके वाचून ते त्यातील काही महत्त्वाची माहिती टिपून घेऊ लागले. पुढे आर्मीत गेल्यावर तेथेही या विषयाच्या एका अभ्यासूशी त्यांची गाठ पडली. त्यांच्याशी हे चर्चा करू लागले. त्यांच्या ज्ञानांत दिवसेंदिवस नवी भरच पडू लागली. पुढें या शास्त्राची गोडी वाटल्याने त्यांनीं पोस्टल टयूशनद्वारे ज्योतिष शिक्षण अभ्यासक्रम घेऊन त्याचा पद्धतशीर अभ्यास केला. संस्थेची ज्यो. प्रवीण व ज्योतिष प्राज्ञ परीक्षा ते उत्तीर्ण झाले आहेत. ज्योतिष शास्त्रा-


वरील मराठी, इंग्रजी व हिंदी या भाषातील अनेक पुस्तकें त्यांच्या वाचनात आली आहेत.

मनुष्य प्रयत्नवादी असावा ही गोष्ट खरी असली तरी त्याचे प्रयत्न यशस्वी होण्यास त्याला दैवाची–नशिबाची जोड असावी लागते हे विसरून चालणार नाही. असे ते आग्रहाने प्रतिपादन करीत असतात. या विषयांचा अधिक सखोल अभ्यास करून यांत काही नवे संशोधन करता आल्यास ते करण्याचा त्यांचा विचार आहे.

हेड क्वॉर्टर्स रिक्रूटिंग एरिया,
राजेंद्रसिंहजी रोड,
पुणें १.

दिगंबर दामोदर कुलकर्णी

यांचा जन्म २२ जून १९०८ रोजी कऱ्हाड तालुक्यातील वडगाव हवेली येथे झाला.



यांचे बालपण अत्यंत श्रीमंतीत व सुखोपभोगांत गेले. शिक्षण कऱ्हाड येथील टिळक हायस्कूलमध्ये व औंधच्या यमाई श्रीनिवास हायस्कूलमध्ये झाले. औंधला असताना पं. सातवळेकर यांच्या स्वाध्याय मंडळांत संस्कृत, महाभारत वगैरे ग्रंथाचे अभ्यासाची संधि मिळून पंडितजींच्या मार्गदर्शनाखाली साधी रहाणी धर्मावर श्रद्धा व आत्मज्ञान मिळविण्याची ओढ लागली. त्याचवेळी बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांनी चालविलेल्या सूर्यनमस्कार व सात्त्विक प्रगतिकरता निवडलेल्या विद्यार्थ्यांत निवड होऊन वरील गोष्टींची प्रगति होऊन चारित्र्य बनण्यास उपयोग झाला. सन १९१८ मध्ये इन्फ्लुएन्झाचे साथींत अचानक संकट परंपरा सुरू झाली व जगांतील वाईट भागही भोगावा लागला, संकटाचे वेळी वरील थोर मंडळी व श्री. धोंडो वि. कुलकर्णी, एम. ए. बी टी. यांच्या प्रत्यक्ष छत्रामुळे श्री. कुलकर्णी यांना दैव, प्रयत्नवाद यांचा विचार करता ज्योतिषशास्त्रीची आवड निर्माण झाली व जसजसे बरे वाईट अनुभव येत गेले तसतशी यांची या शास्त्रावरील श्रद्धा दृढ झाली,

सन १९२६ मध्यें यांनी नोकरी क्षेत्रात प्रवेश केला सन १९३० मध्यें यांचा विवाह होऊन सहचारिणीही सात्विक धार्मिक आचरणाची लाभल्यानें व नोकरीतही स्वतःच्या विचारसरणीस बाध न आल्याने संसारात श्रद्धा बळावली. गोचरीचे ग्रहाप्रमाणे व मूळ कुंडलीप्रमाणे उच्च पदावर जाऊनसुद्धा नोकरीत बरे-वाईट अनुभव आले.

यांनी फलज्योतिष अभ्यास मंडळाची प्रवीण परीक्षा पास केली असून यांचें ज्योतिष शास्त्रातील संशोधनाचे कार्य चालू आहे. यांची अद्वैत वेदान्तावर श्रद्धा असून आत्मानुभावाकरिता (Self Realisation) प्रयत्न चालू आहेत.

वसंत गणेश दाबके

ज्योतिषविषारद श्री. वसंत गणेश दाबके हे ठाण्याचे निवासी असून यांचे शिक्षण बीएस्सी (ऑ) बी. एस्सी. (टेक) येथपर्यंत झालेले आहे. त्यांनीं 'कालनिर्णय' ह्या विषयावर निबंध लिहून फल. ज्यो. अभ्यास मंडळातर्फे ज्योतिष विषारद ही पदवी प्राप्त केली आहे. यांना ज्योतिषशास्त्राची लहानपणापासून आवड असून कालनिर्णयाच्या विविध पद्धतीचा त्यांनीं तौलनिक अभ्यास केलेला आहे. कालनिर्णयाच्या कोणत्याहि पद्धतीकरतां गोचरीच्या ग्रहाची जोड द्यावीच लागते या दृष्टीने त्यांनीं अंशात्मक अष्टकवर्गचक्र तयार केले असून त्यामुळे फलकाल सूक्ष्मरित्या साधता येतो, विशेषत: त्याची रचना सापेक्ष अंतर तत्त्वानुसार असल्यामुळे ते सर्वोतोपयोगी ठरले आहे. नक्षत्रचरणचक्र (गोचरग्रह बल व ग्रहांची दृष्टी पाहण्याकरता) फलकालनिर्णयात निश्चितता आणू शकते. तसेच वर्षफलपद्धतीच्या सूत्रांचा तौलनिक अभ्यास करून संकलित वर्ष कुंडली तयार करता येते असे यांचे मत आहे. ज्योतिषशास्त्रातील गृहित तत्त्वे अत्याधुनिक विज्ञानातील सूत्रानुसार कशी करता येतील यावर ते सध्यां संशोधन करीत आहेत.



यांना स्वतंत्र उद्योगाची आवड असून त्यादृष्टीने यांचा प्रयत्न चालू आहे.

त्यांच्या प्रयत्नांत त्यांना सुयश मिळो हीच सदिच्छा.

३०८।E खारकर आळी,
मु. पो. ठाणें.

भास्कर नरहर टोणगांवकर

ज्यो. प्रवीण.



यांचे मूळ जन्मगांव भडगांव (पू. खा.) होय. वयाचे १८ नंतर त्यांनी घर सोडले व स्वत:चे पायावर उभे राहण्यासाठी म्हणून पुण्यास आले. १९५२ पर्यंत त्यांनी सिनेक्षेत्रांतहि काम केले. तसेच दापोडी वर्कशॉप, टाटा, एअर क्रॅफ्ट मध्ये व शुगर फॅक्टरीत नोकरी केली. सध्या ते पुणे म्युनसिपल कॉर्पोरेशन मध्ये नोकरीस आहेत.

१९५२ पर्यंत त्यांच्या जीवनात फारच अस्थिरता होती. व ती का म्हणून ते जाणून घेण्याचे दृष्ठीने ते ज्योतिष शास्त्राकडे वळले. कांहीं वयोवृद्ध जाणकार लोकांचा त्यांनी ज्योतिषाबाबत सल्ला घेतला व हळहळू ज्योतिषशास्त्राचे ज्ञान संपादिले.


पुढे त्यांनी त्यांचे स्नेही श्री बाळासाहेब जकातदार यांचे साहाय्यानें पुण्यांत फलज्योतिष अभ्यास मंडळ स्थापन केले. त्यामुळे त्यांचा ज्योतिष शास्त्राचा व्यासंग वाढण्यास मदत झाली. संस्थेची ज्यो. प्रवीण परीक्षा ते उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण झाले आहेत. व अजूनही त्यांचा अभ्यास सुरू आहेच.

त्यांना लहानपणापासून आणखी एका गोष्टीची आवड आहे ती म्हणजे पेंटिंग. या विषयात त्यांनी बराच हातखंडा मिळविला आहे. त्यांच्या अनेक कलाकृतींना बक्षिसे मिळाली असून त्यांच्या कलेचे कौतुक समारंभपूर्वक झाले आहे. त्यांचा कुंडलीवरून अध्यात्माकडे कल झुकला व त्यामुळे त्यांना दैवी साक्षात्कारही अनेकदा झाला. त्यामुळे त्यांची स्वत:ची कामे तर झालीच पण त्याचबरोबर इतरांनाहि त्यांचा उपयोग होत गेला. त्यांचे ज्ञानाचा लाभ अनेकांना मिळाला. तसेच ज्यो. समाचार मध्ये भविष्य लिहिण्यास घेतले आहे. ते त्यांचेकडे येणाऱ्याला निरपेक्षतेने मार्गदर्शन करीत असतात.

१४२, सोमवार पेठ
पुणे २.

वामन शिवराम मराठे

जन्मतारीख २२ एप्रिल १९३०.



यांचा जन्म नरसोबावाडी येथे झाला. यांचे वडील बुधगांव येथील संस्थानात नोकरीस होते. यांचे शालेय शिक्षण बुधगांव येथेच १९४८ पर्यंत झाले. मॅट्रीक उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी पोस्ट खात्यात नोकरी धरली. लहानपणापासून त्यांना ज्योतिष शास्त्राबद्दल आस्था व आवड होती. त्यामुळे १९५६ पासून त्यांनी प्रत्यक्ष या शास्त्राचा अभ्यास केला. मिळतील ती पुस्तकें, ग्रंथ यांचे वाचन व मनन करण्यास सुरुवात केली. त्यांना या शास्त्राचा जास्त सखोल अभ्यास करावा असे वाटू लागले. पुढे फलज्योतिष अभ्यास मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. बाळासाहेब जकातदार यांचे साहाय्याने प्रोत्साहनाने त्यांनी ज्योतिष प्रवीण ही परीक्षा दिली व त्यात उत्तीर्ण झाले. ते ज्यो. प्राज्ञ ही, परीक्षा नुकतेच उत्तीर्ण झाले आहेत यापुढे देखील या विषयाच्या सर्व परीक्षा देण्याचा त्यांचा इरादा आहे. हल्ली ते कोल्हापूर येथे सिटी पोस्टात आहेत. त्यांची धडपड त्यांची हौशी वृत्ती व जिद्द पाहून ते या शास्त्रात खरोखर उत्तम तऱ्हेने प्रगती करतील. असा आम्हाला विश्वास वाटतो.

मु. पो. २२०८ A वॉर्ड,
बाबूजमाल पोस्टाजवळ,
मु. पो. जि. कोल्हापूर

विद्याधर शंकर गोडसे

ज्यो. प्रवीण

यांचे घराणें मुळचे कोल्हापूरचें, पण ह्यांचा जन्म सातारा येथें झाला. त्यांचे एस्. एस्. सी. पर्यंतचे शिक्षण न्यू. स्कूल सातारा येथेंच झालें. सध्या त्यांचे कॉलेज शिक्षण नोकरी सांभाळून सुरू आहेच. ते देना बँकेत नोकरीस आहेत.



त्यांचे वडिलांना ज्योतिषशास्त्राची भारी आवड नि व्यासंग होता. त्यामुळें त्यांनाहि लहानपणा पासून ज्योतिषशास्त्राची आवड निर्माण झाली. त्यांनी वडिलांजवळ असलेल्या अनेक संस्कृत ग्रंथांचे वाचन केले. त्यांना हस्तसामुद्रिक शास्त्राचीहि आवड असून, त्याचाहि अभ्यास ते करीत आहेत. कोल्हापूर येथें त्यांची शेती-वाडी–जमीन आहे. त्यांचे वडील मुद्रण व्यवसाय करतात.

त्यांनी ज्योतिष शास्त्रातील ज्योतिष प्रवीण ही सर्व परीक्षा दिली असून त्यांत ते उत्तम गुणांनी पास झाले आहेत. पुढील भावी काळांत मुद्रण व्यवसायाची वाढ करून ज्योतिष शास्त्रातील ग्रंथांचे प्रकाशन स्वत:चे प्रेसमध्यें करण्याची त्यांची जिद्द आहे. तसेच या शास्त्राचा अभ्यास अधिक वाढवून या शास्त्रा-वरील एखादा प्रबंध वा संशोधनात्मक लेख लिहून तो जर्मनीत प्रसिद्ध करण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे. या शास्त्रांतील आत्तांपर्यंतच्या अभ्यासानें त्यांनी स्वत:चे असे कांहीं ठोकताळे बसविले आहेत. तेहि एकत्रित करून प्रसिद्ध करण्याची त्यांची तीव्र मनीषा आहे.

७७९ ब्लॉक नं. बिल्डींग नं. २५,
शास्त्री नगर, गोरेगांव,
मुंबई ६२.

मंत्ररत्न प्रा. आर. डी. करमरकर

हे पुण्यातील प्रसिद्ध प्राध्यापक, मानसशास्त्रज्ञ व तसेच हस्तसामुद्रिक व ज्योतिषतज्ज्ञ असून सुमारे पन्नास वर्षे ते हे कार्य करीत आहेत.

यांचे शिक्षण बी. अे. पर्यन्त झाले असून (१९१२) ते एस. टी. सी. डी., एफ. टी. सी. व ड्राईंग, क्राफ्ट-वर्क्सच्या तीन परिक्षाही उत्तीर्ण झाले आहेत.

बी. ए. झाल्यानन्तर डिसें. १९१२ ते डिसें. १९१३ ते नू. म. वि. हायस्कूलमध्ये शिक्षक होते. त्यानंतर १९३८ सालापर्यन्त म्हणजे सेवानिवृत्त होईपर्यन्त सुमारे पंचवीस वर्षे त्यांनी कराचीस एन. जे. हायस्कूलमध्यें शिक्षकाचे काम केलें. तसेच १९३८ साली ते हस्तसामु-द्रिक व ज्योतिष याचे प्राध्यापक झाले व ते काम त्यांनी ४१ सालापर्यंत केले. तसेच ४१ सालापासून रजिस्टर मेडिकल प्रॅक्टिशनर म्हणूनही ते काम करीत आहेत. या कार्यप्रमाणेच भाषणांद्वारा मंत्रशास्त्र, योग-विद्या, हस्तसामुद्रिक व ज्योतिष इत्यादि विषयावरही त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

प्रा. करमरकरांनी काही उपयुक्त पुस्तकांचे लेखनही केले आहे. १९२८ सालापासून आजपर्यन्त 'सिक्रेट ऑफ हॅण्डरायडिंग,' 'मंत्राज अॅण्ड देअर पॉवर' 'लकी नम्बर', हूम टू मॅरी इ. इंग्रजी व मराठीमधून त्यांनी चौदा पुस्तकें लिहिली आहेत.

ज्योतिष व मानसशास्त्र याप्रमाणेच क्रिकेट, हॉकी, फुटबॉल इ. खेळाची यांना आवड असून त्यांनी त्यावर पंचवीस वर्षे मार्गदर्शनही केले आहे. या प्रमाणेच संगीत नाट्य इ. विषयांचीही त्यांना आवड आहे.

आपल्या बुधवार पेठ, पुणे येथील निवासामध्ये अजूनहि ते वैद्यकीय सल्ला तसेच मानसोपचाराचे कार्य करीत आहेत. त्यांनी संपूर्ण भारतभर प्रवास केलेला आहे.

५१ बुधवार पेठ, पुणें २,

बहुमित्रो महाकायो धार्मिको विनयी सुखी
उत्तराषाढा सम्भूतः शूरश्च विजयो रणे ।।

उत्तराषाढा मध्ये जन्माला येणारे पुष्कळ मित्रपरिवार असणारे, मोठ्या देहाचे, धर्मवान, विनयशील, सुखी व पराक्रमी असतात.

रामचन्द्र केशव जोशी

ज्योतिषशास्त्र म्हटले म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक मनुष्यास आपले जीवनाचे सुखदु:खाचें विचारकरण्याची प्रवृत्ती होते. त्यातीलच हे एक. यांना लहानपणापासून या शास्त्राबद्दल आस्था व ओढ होती. पण योग्य मार्ग-दर्शन व अभ्यासाची संधी मिळू शकली नाहीं. पुढें पोस्टल टयूशन द्वारे सुरु केलेला अभ्यासक्रम त्यांनीं घेतला व ज्योतिष प्रवीण ही परीक्षा ते उत्तीर्ण झाले. हे एकूण गूढ शास्त्र असून त्याचे अभ्यासाने अनेक अज्ञात गोष्टींचा ठाव मानवास लागू शकतो असे मत ते प्रतिपादत करीत असतात. अजूनहि या शास्त्राचा त्यांचा अभ्यास चालूंच आहे. ते नुकतेच ज्योतिष प्राज्ञ या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.



मु. पो. माणगांव,
जि. कोल्हापूर.

शरद रामचंद्र रेगे

(ज्योतिष पंडित)
पुणें २.

फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या स्थापनेपासून यांचा संस्थेशी संबंध आलेला आहे. यांचे शालेय शिक्षण मॅट्रीकपर्यंत झाल्यावर त्यांनीं १९४८ पासून ज्योतिष शास्त्राचा अभ्यास सुरू केला. पुढें १९६० मध्यें त्यांनीं " पौर्वात्य व पाश्चिमात्य विचार मंथनातून निष्पन्न होणारी मेदिनीय ज्योतिषतत्वे " या विषयावर निबंध लिहून ग्र. फ. सं. मंडळाची " ज्यो. पंडित " पदवी संपादन केली व त्याबद्दल त्यांना म. म. द. वा. पोतदार यांचे हस्तें प्रशस्तिपत्र व बहुमानदर्शक रौप्यपदक देण्यांत आले. त्यांचे स्वत:चे असे पहिले प्रकाशन म्हणजे "अष्टग्रही परिणाम व उपाय (१९६१)" हे होय ते पुस्तक फारच लोकप्रिय झाले. त्यामुळें त्यांनीं लोकाग्रहास्तव १९६२ चें वर्ष भविष्य लिहीले त्यांचा या शास्त्राचा व्यासंग बराच असून त्यांनीं वर्तविलेली अनेक भाकीते खरी ठरली आहेत. ते त्यांचेकडे येणाऱ्या पृच्छकाला निर्भीडपणे मार्ग-दर्शन करून सल्ला देतात. तसेंच येथील दै. विशाल सह्याद्रिमध्यें साप्ताहिक राशी भविष्य लिहीत असतात ते स्वभावाने मोकळे, मोठ्या मनाचे असून त्यांची दुसऱ्याला या विषयाचे ज्ञान शिकविण्याची नेहमी तयारी असते. ते सध्यां ज्यो. विषयाला वाहिलेले " ज्यो. दर्शन " नावाचे मासिक प्रकाशित करण्याच्या विचारांत आहेत. संस्थेच्या सर्व कार्यक्रमात ते मोठचा आत्मीयतेनें सहभागी होऊन सहकार्य देत असतात.



फुलचंद मुरलीधर बजाज

बी. कॉम. ज्यो. प्रवीण.

यांचे मॅट्रीक पर्यंतचे शिक्षण पूना इंग्लीश स्कूल, पुणें येथे झाले व पुढील पदवीपर्यंतचे शिक्षण बृहन महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजात झाले. ज्योतिष शास्त्राची तशी त्यांना लहानपणापासून आवड पण केवळ जिज्ञासेपोटी ते या शास्त्राकडे आकर्षित झाले. या शास्त्रावरील अनेक पुस्तके त्यांनीं वाचली असून त्यांचा अभ्यास सुरूंच आहे सध्यां ते पैठण येथे स्वतंत्र व्यवयास करीत असतात.



ज्यो. प्रवीण ही परीक्षा ते उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाले आहेत तसेच ते अजूनही अभ्यास वाढवित आहेत. या पुढील परीक्षा देऊन संशोधनात्मक कार्य करण्याचा त्यांचा विचार आहे.

पैठण,
औरंगाबाद.

कै. ज्योतिषाचार्य, पंडितरत्न द्वारकानाथ नारायण राजे पुणें

ज्योतिषाचार्यांचा जन्म साई, तालुका पनवेल, जि कुलाबा येथें ३१ जुलै १८८३ मध्यें झाला. त्यांचे शिक्षण पनवेल व कोल्हापूर येथें झालें. १९०३साली राजाराम हायस्कूल कोल्हापूर येथून मॅट्रिक झाल्यावर त्यांनीं नाशिक येथें पोस्ट खात्यांत नोकरी धरली. पोस्टांतील कष्टाची नोकरी सांभाळून १९०८ साली त्यांनीं ज्योतिष विषयाचे अभ्यासास सुरुवात केली. अनेक प्राचीन ग्रंथांचे अध्ययन करणे हा त्यांचा ऑफिसचे कामानंतर महत्वाचा व्यासंग बनला. संस्कृत, मराठी, इंग्लिश भाषेतील ग्रंथांचे वाचनाने त्यांना फलज्योतिष उत्तम येऊं लागले व वयाचे अवघ्या ३१ वे वर्षी म्हणजे १९१४ साली त्यांनी जातकनिधि हा ग्रंथ प्रसिद्ध केला.. हा ग्रंथ अपेक्षेपेक्षा अधिक लोकप्रिय झाला. व मराठी वाचकांस सायन पद्धतीने ज्योतिषाचा अभ्यास करण्याची आवड उत्पन्न केली. यानंतर १९२२ साली त्यांनीं जातक रहस्य ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथातील भाग्योदय प्रश्न कुंडली व अनुभविक ठोकताळे इत्यादि विषयामुळे या ग्रंथास अद्यापपर्यंत मागणी आहे. त्याचप्रमाणे १९३८ साली त्यांचा जातकनिदान ग्रंथ प्रसिद्ध झाला. हे तिन्ही ग्रंथ लोकादरास पात्र झाले व नोकरीमध्यें असतांनाच या ग्रंथाच्या दोन-तीन आवृत्त्या काढाव्या लागल्या. १९४४ मध्यें जळगांव येथें हेडपोस्टमास्तर म्हणून सेवानिवृत्त झाले. ज्योतिषाचार्य राजे यांनी ज्योतिष विषयावर ज्या काळीं छपाईच्या अडचणी, वाचकवर्ग फारच कमी व आर्थिक सहाय्याचा अभाव अशा काळीं केवळ ज्ञान-लालसेनें व धैर्यानें ग्रंथ निर्मिती केली व ज्योतिष विषयाची गोडी वाचकांत निर्माण केली.



सेवानिवृत्ती नंतर ज्योतिष शास्त्राचे संशोधनावर व प्रगतिवर आपले सर्व लक्ष केंद्रित केले. सेवानिवृत्तीनंतर त्यांनीं "जातकदीप", "गृहिणी जातक", "व्यवसाय जातक" व "आरोग्य जातक" हे प्रसिद्ध केलेले ग्रंथ म्हणजे तपश्चर्येचे अखंड व्यासंगाचे विद्वत्तेचे व विपुल अनुभवाचे प्रतिकच आहेत. "व्यवसाय जातक" या ग्रंथाबद्दल कै. श्री. ज. स. करंदीकर संपादक केसरी यांनीं केसरी मध्यें लिहिले होते की, "या पुस्तकातील प्रमेयांना शास्त्रप्रतिती आणि आत्मप्रतिती असा दुहेरी निकष आहे."

ज्योतिष शास्त्राच्या महासेवेबद्दल श्री. जगद्गुरु श्री. शंकराचार्य गोवर्धनपीठ यांनीं त्यांना "ज्योतिषाचार्य" 'पंडितरत्न" पदव्या देऊन भूषविले. पुणें येथील ग्रह-नक्षत्र फलादेश संशोधन मंडळाचे १९६३ पर्यंत ते अध्यक्ष होते. त्यांच्या ग्रंथांना डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स-लेशन सोसायटीनें "दक्षिणा बक्षिसे" दिली. तसेंच भारतीय विद्याभवननें १९५५ सालीं पदवीदान समारंभाचेवेळीं त्यावेळचे मुंबई राज्याचे गव्हर्नर श्री. हरेकृष्ण मेहेताब यांचे हस्ते "सर्टिफिकेट ऑफ मेरीट" दिले. त्यांचा शिष्यवर्ग व चाहते सर्वत्र पसरले आहेत.

फलज्योतिष शास्त्र अनुभवजन्य शास्त्र असून त्याला तर्कशास्त्राचा आधार आहे असे ते मानीत. त्यामुळें ज्योतिषांतील अशास्त्रीय कल्पनांचा त्यांनीं मुलाहिजा ठेवला नाही.

निधनापूर्वी त्यांचा "जातक रत्नाकर" हा ग्रंथ लिहून झाला परंतु ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वी त्यांना ११ मार्च १९६६ रोजी काळाने हिरावून नेले. ज्योतिषाचार्य राजे ज्योतिषशास्त्रांचे गाढे अभ्यासक, विद्वान व ख्यातनाम लेखक होते. विसाव्या शतकांतील ते ज्योतिष महर्षीच होत. त्यांचे ग्रंथांचे अभ्यासानें अनेक ज्योतिषी तयार झाले आहेत. ज्योतिषशास्त्रावर, व्यवसाय, आरोग्य, स्त्री विषयक अशा निरनिराळ्या विषयांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिले. हे ज्योतिषाचार्य राजे यांचे वैशिष्ठ्य होते. अशा या मौलिक ग्रंथ निर्मितीबद्दल सर्व ज्योतिषवर्ग त्यांचा सदैव ऋणी राहील.

कृतज्ञः विनयो दाता सर्वदारोग्य संयुतः
लक्ष्मीवान्तल संयुक्त श्रवणे जायते नर

उत्तराषाढा मध्यें जन्माला येणारे पुष्कळ परिवार असणारे, मोठ्या देहाचे, धर्मवान, विनयशील, सुखी व पराक्रमी असतात.

अनंत रघुनाथ कुलकर्णी

होराभूषण.

श्री. कुलकर्णी यांचा जन्म पन्हाळी महालात बोर-



पाडले येथे झाला. परिस्थितीमुळे त्यांना फारसे शिक्षण घेता आले नाहीं परंतु त्याच्या अंगी असलेल्या ध्येयनिष्ठा, चिकाटी व आवड ह्या गुणांमुळें त्यांनी लहानपणापासून चित्रकला, रांगोळी व ज्योतिषशास्त्र याचा अभ्यास मोठ्या जिद्दीनें करून अनेकांना मार्गदर्शन केले. लहानपणापासून आई-वडिलांचेकडून सु-संस्कृतीचे धडे मिळाले. म्हणूनच ते आज त्यांच्या कलेत पुढें आलें.

त्यांनीं वारणानगर येथें केदार ज्योतिष कार्यालय सुरू करून बऱ्याच लोकांना विनामूल्य मार्गदर्शन केले आहे. त्यांचेजवळ बऱ्याच कुंडल्यांचा संग्रह आहे. घरच्या घरी त्यांचा या शास्त्राचा बराच अभ्यास झाला आहे. परंतु ह्या जगांत पदवीशिवाय शिक्षणाला कांहीं अर्थच उरला नाहीं त्यासाठी त्यांनीं संस्थेच्या ज्यो. प्रवीण ह्या पदवीपरीक्षेत यश मिळविले आहे. गेली पांच वर्षे त्यांनीं रमल शास्त्राचा अभ्यास करून 'तुमचे फासे तुमचे दैव" या नावाचे सुलभ असे पुस्तक लिहिले आहे.

श्री. कुलकर्णी हे उत्कृष्ट चित्रकार, रांगोळीकार असून एक तज्ञ ट्रेसर म्हणून ते प्रसिद्ध आहेत. ते एक चांगले ज्योतिषकार असून चांगले वक्तेहि आहेत. या शास्त्रावर त्यांनी अनेक व्याख्याने कामगारांना दिली आहेत. संकटाचे समयी मार्गदर्शन व गरीबांना आधार हे मोठ्या उत्साहाने करतात. त्यांनीं नुकतीच होराभूषण पदवीहि प्राप्त केली आहे.

मु. पो. वारणानगर,
महाल– पन्हाळा,
जि. कोल्हापूर.

धुंडिराज हरी जोशी

ज्योतिष विशारद



यांचा जन्म नरसोबाची वाडी येथें झाला. लहानपण सांगली येथेंच गेले. व इंग्रजी ६ वी पर्यंतचे शिक्षण तेथेंच झालें यांची घरची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. त्यामुळें त्यांना शिक्षण मध्येच सोडावे लागले. वडिलांचे कृपाछत्र अगदी ल्हानपणीच तुटले. त्यामुळें अतिशय कष्टाने त्याना शिक्षण घ्यावे लागले, पुढे उदरनिर्वाहासाठी त्यांनी एक खाजगी नोकरी केली. व पुढे ते सरकारी नोकरीत शिरले व आजतागायत तेथेंच आहेत.

ज्योतिषशास्त्राबद्दल प्रथम त्यांना असे वाटे की हे शास्त्र खोटे आहें. त्यांत कांहीं अर्थ नाहीं. पण पुढें त्यांना कांहीं बाबतीत अनुभव आल्याने त्यांची या शास्त्रावर श्रद्धा बसून तें जास्तच याकडे आकर्षित झाले. या शास्त्रावरील पुष्कळशा ग्रंथांचा घरच्या घरी त्यांनी अभ्यास केला व मंडळाकडून "ज्यो. विशारद" ही बहुमानाची पदवी प्राप्त करून घेतली.

ज्योतिष शास्त्राचे अभ्यासासाठीं त्यांना कै. राजे, श्री. प्रधान यांच्या ग्रंथांचा फारच उपयोग झाला असे ते म्हणतात. त्यांचा या शास्त्राचा व्यासंग १५ वर्षाचा आहे. त्यांनी या शास्त्राचे अनुभवानें स्वतःचे असे कांहीं आडाखे व सिद्धांत बसविले आहेत व त्याचा प्रत्यय अनेकदा त्यांना मिळाला आहे, त्यांचा आणखी एक आवडीचा छंद म्हणजे नाटच ! त्यांनी आतापर्यंत मोठी मेहनत घेऊन ५–६ नाटकें बसविली आहेत.

या शास्त्रावर जमल्यास थोडेफार लेखन करण्याचा त्यांचा विचार आहे. ज्योतिष हे एक अचूक असे शास्त्र आहे परंतु ते हाताळणारे विविध लोक असल्याकारणानें खरे अभ्यासू वृत्तीचे लोक कमी भेटतात. तसेच यांत्रिक युगासंबधाने पूर्वीच्या ग्रंथांत तसा कांहीं खास उल्लेख नसल्याकारणाने बुद्धिचातुर्यावर निरनिराळे आडाखे बसवावे लागतात. उदा. वैमानिक––असे त्यांचे प्रांजल मत आहे.

६८ ब. नवी पेठ,
पुणे ९.

श्रीमती पुष्पावती त्र्यंबक दुनाखे

जन्म—१-७-१९२२
वेळ सायंकाळीं ६ वा.

जन्मलग्न कुंडली





यांचा जन्म भडगांव येथे झाला. आईचे कृपाछत्र लहानपणीच तुटले त्यामुळे लहानपण मावशीकडे गेले. घरचे लोक जुन्या वळणाचे त्यामुळे इच्छा असूनहि शालेय शिक्षण घेता आले नाही. परंतु वयाचे १६ वे वर्षीच त्या विवाहबद्ध झाल्या. लहानपणापासून स्वभाव महत्वाकांक्षी. पुढें दुर्दैवाने १० मार्च १९६१ ला पतीचे निधन झाले. पण त्यामुळे मुळीच डगमगून न जाता त्यांनी स्वतःचे कष्टानें, प्रयत्नानें जानेवारी ६२ मध्यें तेलाच्या कारखान्याची स्थापना केली. सुरवातीस त्याच सर्व काम करीत. विशेष म्हणजे मसाला कुटण्यापासून ते मालाची विक्री व बिले वसूल करण्यापर्यंतची सर्व कामें त्या करीत.

पुढें २७ फेब्रुवारी १९६५ ला दैवाची त्यांच्यावर अवकृपा झाली असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही कारण त्या दिवशी त्यांच्या कारखान्याला आग लागली. व त्यांत पंचेचाळीस हजाराचे नुकसान झाले. त्यांनी विमा उतरविला नसल्याने नुकसानभरपाई मिळू शकली नाही. तरीहि त्यातून मार्ग काढून त्यांनी अवघे ५०० रु. भांडवलावर पुनश्च कारखाना सुरू केला. व हळू हळू त्यांचे तेलास सर्व महाराष्ट्रातून व बाहेरूनहि मागणी वाढूं लागली. आज हजारो रुपयांची उलाढाल चालूं आहे.


त्यांचे अंगी निगर्वी वृत्ती, परमेश्वरावर दृढ श्रद्धा, वाटेल तेवढे कष्ट करण्याची तयारी या तीन गुणांचा समसमा संयोग झाला असल्याने त्या आज एक मान्यवर व्यक्ती म्हणून ओळखल्या जातात. तसेच ते सारे यश त्यांना स्वप्रयत्नाने मिळाले आहे. ज्योतिष शास्त्रावर त्यांचा विश्वास असून त्या संस्थेच्या एक हितचिंतक आहेत. कार्य वाढल्यामुळे त्यांना इतर कोणत्याहि सामाजिक कार्यात सहभागी होता येत नाही. त्यांचे शकुंतला हेअर ऑईल या तेलाचा शोध म्हणून सर्व जगभर प्रसार व्हावा हे ध्येय त्यांचे समोर आहे. त्यांना तीन मुली व दोन मुलगे आहेत. मुलगेहि त्यांना त्यांच्या कामात मदत करतात.

सुभाष मोरेश्वर पाठारे

(ज्योतिष प्रवीण)

जन्म ६ जून १९३८.

यांचे शिक्षण इंटर आर्टस्पर्यंत झाले आहे. यांना वयाच्या १९ वर्षापासून ज्योतिष शास्त्र शिकण्याचा छंद लागला. कारण या शास्त्राच्या आधारे माणसाच्या जीवनांत घडणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टींचा अंदाज घेऊन योग्य ते मार्गदर्शन वेळीच प्राप्त करून घेता येईल अशी यांची मनोधारणा झाली.



पुढे या शास्त्राची आवड व तळमळ ह्यामुळें अधिक वाचन व अनुभव घेऊन त्यांनी या शास्त्रात त्वरित प्रगति केली. जनतेस आपल्या ज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग व्हावा यासाठी शास्त्रोक्त रितीने अचूक मार्गदर्शन करण्याचा यांचा निश्चय आहे.

हे "ज्योतिष प्रवीण" परीक्षा उत्तीर्ण झाले असून त्यांच्याकडे येणारास ते निरपेक्षतेने मार्गदर्शन करीत असल्यामुळे प्रत्येकजण समाधान व्यक्त करतो. सध्या ते केंद्र सरकारच्या खात्यात सिनीअर क्लार्क म्हणून नोकरी करीत आहेत. त्यांच्या मित्रपरिवाराच्या उत्तेजनामुळे सध्या त्यांनीं ह्या शास्त्रातील संशोधनाचे कार्य हाती घेतले आहे.


४६ सी. पाठारे हाऊस,
गांवदेवी रोड,
मुंबई ७.

बाबूराव दत्ताराम बागवे

जन्मगांव साळगांव

जन्म २६।८।१९०४ वेळ दुपारी १२ वा.

जन्मलग्न कुंडली



सावंतवाडी संस्थानातील साळगांव येथें यांचा जन्म झाला. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे १० दिवसाचे असताना पाळण्यांस आग लागून तोंडावर उजव्या बाजूस भाजले होते. पण जीवावरचे निभावले. लहानपण वेंगुर्ल्यांत गेले व तेथेच मराठी ४ थीपर्यंत शिक्षण झाले. नंतर ते मुंबईला आले. मुंबईला त्यांचे चुलते, श्री. विठ्ठलराव बागवे हे वृत्तपत्र विक्रीचा व्यवसाय करीत. त्यांचे हाताखाली काम करूं लागले. पुढे १९३३ मध्ये त्यांनी चुलत्याकडील नोकरी सोडली व स्वतंत्रपणे व्यवसाय सुरूं केला.

१९४० पर्यंत त्यांना फारच त्रास, कष्ट, हाल सहन करावे लागले. त्या काळांत साडेसाती सुरूं होती असे त्यांना त्यांचे टिपणावरून समजले. व चांगल्या परिस्थितीतून वाईट स्थिती येण्यास हे कारण असल्याने त्यांचे ज्योतिषशास्त्राकडे लक्ष वेधले. व त्याच काळांत त्यांना धंद्यांत अपयश येऊन ते कर्जबाजारी झाले. मात्र त्याहि स्थितीत त्यांनी धीर सोडला नाही. तेव्हापासून त्यांचा या शास्त्रावर विश्वास आहे.

पुढे त्यांनी मोठ्या नेटाने परमेश्वरावर श्रद्धा ठेवून हळूहळू आपल्या धंद्याची विस्कटलेली घडी नीट बसविली व नंतर जमहि बसला. त्यांना १ भाऊ असून वडिलांचे सुख १९४४ पर्यंत मिळाले. तसेच मातोश्री १९५० पर्यंत होत्या. त्यांना २ मुलगे व १ मुलगी आहे. सध्यां ते वृत्तपत्र विक्रीच्या व्यवसायांत फारच नांवाजलेले असून या धंद्यात फारच नांवलौकिक लाभला आहे. सर्व प्रकारची दैनिकें, साप्ताहिकें व मासिके यांची एजन्सी त्यांचेकडे आहे. अर्थात ती सर्व मराठीतीलच आहेत.


त्यांना अध्यात्माची आवड आहे, पण धंद्याचा वाढता व्याप अन् कामाचा पसारा असल्याने त्यांना देवधर्माकडे फारसे लक्ष देणे जमत नाही. त्यांची मुलेहि त्यांना व्यवसायांत हातभार लावतात.

ज्योतिर्मार्तंड श्रीकृष्ण अनंत जकातदार

लेखक : श्री. वसंत दाबके
बी. एस्.सी. (टेक.)

जन्म तारीख– १५–१०–१९१९
जन्म वेळ– रात्रौ ०–४५

जन्मलग्न कुंडली





र.	चं.	मं.	बु.	गु.	शु.	श.	रा.	के.	ल.	हृ.
५	३	४	६	३	४	४	७	१	३	१०
२८	४	११	११	२१	२०	१४	३	३	७	५

संख्याशास्त्र :–

१ ६ १ ० १ ९ १ ९=२८=१०=१

रविचे प्राबल्य दिसून येते. ९ हा मंगळाचा आकडा आहे. ६ शुक्र.

विशोत्तरीप्रमाणे :–

	१६–१०–१९१९	
	७ – ०– १७	शनि
	२३– १०–१९३६	
	१७	बुध
	२३–१०–१९५३	
	७	केतू
	२३–१०–१९६०	
	२०	शुक्र
	२३–१०–१९८०	
	६	रवी
	२३–१०–१९८६	
	१०	चंद्र
	२३–१०–१९९६	

ग्रहमहत्वमापन–△, चं. गु. △२ मंगळ △ ३ — △४ बु. हृ. योगकारक.
□—□२ शनी, राहू. केतू. □३ काटकोनातील नीचीचे ग्रह अनिष्ट.

कर्क लग्न कुंडली अनुकूल ग्रह चंद्र, गुरु, नेपच्यून योगकारक मंगळ (परिभ्रमणास)

भिन्नाष्टक वर्ग

राशी	गुरु	शनी
१	४–	२–
२	६–	५–
३	४–	५–
४	५–	५–
५	५–	१–
६	४–	४–
७	५–	४–
८	५–	१–
९	४–	६–
१०	६–	३–
११	३–	०–
१२	५–	२

भावबल :—(सर्वाष्टक) प्रबलभाव–२–६–१०–११ १२ निर्बल स्पष्टग्रह ४–७–८.

सर्वसाधारण परिचय:—

ज्योतिर्मार्तंड म्हणून यांची महाराष्ट्रांत बरीच प्रसिद्धी आहे. ते जन्माने ज्योतिषी असून त्यांचा या विषयाचा अभ्यास दांडगा आहे. त्यांचा विशेष हातखंडा गणितापेक्षा फलितावर आहे. त्यांची या विषयांत पारंगतता वैशिष्ठ्यपूर्ण असून आधुनिकतेची जोड देतात व फलादेश शास्त्राच्या दृष्टीकोनातून पडताळूनच मर्यादित स्वरूपाची जबाबदारीने विधाने करतात. ते फलज्योतिष अभ्यास मंडळाचे संस्थापक व चालक असून ज्योतिषशास्त्राचे प्रसाराचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून चिकाटीने प्रयत्न करीत आहेत. त्यांचा संशोधनावर विशेष भर आहे.

गतकाल.—

प्रथमतः त्यांना शनिची महादशा असल्याने व तो व्दितीयात असल्यानें त्यांची परिस्थिती बेताचीच होती. चं. गु. ने. युती प्रथम भावात असल्याने ते जन्मानेच ज्योतिषी आहेत. चंद्र गुरू हे तर योगकारक ग्रह आहेत. यामुळे त्यांना ह्या विषयांत लागणारी विशिष्ट बुद्धि

आहे. त्यातून हर्षल कुंभेचा असल्याने ते संशोधक प्रवृत्तीरी आहेत. शनी–मंगळ ही युती धनस्थानांत वाईटच त्यामुळे त्यांना बराच काळ आर्थिक त्रास झाला असावा. पंचमात राहु हा शिक्षणाचे दृष्टीने खराब त्यामुळे शिक्षण अर्धवट राहावे हे उघडच आहे. परंतु त्यांचा गुरु पंचमाचे त्रिकोणांत असल्याने खऱ्या अर्थाची विद्या प्राप्त झाली. पंचमात राहू, पंचमेश मंगळ शनीचे युतीत त्यामुळे व १७ व्या वर्षी शनीची महादशा म्हणून शिक्षण झाले नाही. पुढे बुधाची दशा जरी बरी गेली तरी तो व्ययेश असल्याने न्यूनत्व प्राप्त होतेच. बुध, हर्षल हा योग व बुध शनी हा योग चांगला आहे त्यामुळे ज्योतिषशास्त्राचा नाद लागला. बुध चतुर्थात शुक्राचे राशीत, तोच शुक्र धनांत त्यामुळे पत्नीपासून द्रव्यलाभ घडून मदत झाली. कर्क लग्न असले म्हणजे ५–७–९–१२ हे भाव बिघडतात. तेथे ७ वा भाव बिघडलेला आहे. परंतु गुरूची येथें दृष्टी आहे. त्यामुळे वैवाहिक जीवन समाधानाचे आहे. त्यानंतर शुक्र महादशा मात्र आर्थिक दृष्टया फारच हात देणाचे आहे. लाभेश व चतुर्थेशहि शुक्रच आहे. त्यामुळे आर्थिक घडी चांगलीच सुधारत आहे. केतूच्या महादशेत गूढ शास्त्राची परीक्षा पास झाले. (१९५९–६०) ३३ते ३६ पर्यंत आर्थिकदृष्टया काळ खराब गेला. केतूमुळे त्यांची कीर्ति होत आहे. सुखस्थानातील बुध खऱ्या अर्थाने त्यांना सुखी करील. कारण ते पैशापेक्षा ज्ञानमहत्व देणारे आहेत.

भावीकाल:—

शुक्राची महादशा १९८० पर्यंत असून आर्थिकदृष्टया ती फार चांगली जाईल. शुक्र लाभेश व चतुर्थेश आहे तो रवीच्या राशीत आहे व रवी तृतीयांत आहे. त्यामुळे ज्योतिषशास्त्रांत ते महान् कार्य करतील व केतूमुळे ते कीर्तिवान होतील. रवीची महादशाहि चांगलीच जाईल. अशा तऱ्हेने प्रथमत: खडतर काळ काढलेला असला तरी पुढील जीवन उज्ज्वल आहे.

कै. ऋतुपर्ण धोंडो तथा राजाभाऊ वैद्य



जन्मलग्न कुंडली
जन्म १७ फेब्रुवारी १९०३
वेळ सकाळी ७ वा. ४७ मि.
मृत्यू २४ जुलै १९६४



कै. राजाभाऊ वैद्य यांना जाऊन आज ३ वर्षे पूर्ण झाली. सर्व क्षेत्रांत विजयश्री आपणाकडे सहजतेने ओढून घेणाऱ्या या महान व्यक्तीला काळापुढे पराभव पत्करावा लागला. अवघ्या वयाच्या ६२ व्या वर्षी राजाभाऊ आपल्या चाहत्यांना सोडून कायमचे निघून गेले.

विविध क्षेत्रांत सर्वांगीण कार्य केल्यामुळे राजाभाऊ माहित नाही अशी व्यक्ति विरळाच ! नू. म. वि. मधील गणिताचे शिक्षक म्हणून त्यांची लोकप्रियता सर्वांना ज्ञान होती. पुष्कळांना डोकेदुखीसारखा वाटणारा गणीत विषय त्यांचा अत्यंत आवडीचा विषय. विद्यार्थ्यांमध्ये अवीट गोडी निर्माण करून अभ्यासाची एक विशिष्ट शिस्त ते लावीत.

विशेष ध्यानात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे केवळ यांच विषयांत दडी मारून ते राहिले नाहीत तर मनुष्याचे जीवन समृद्ध करण्यासाठीं त्यांनी नानाविध विषय हाताळले व्यायाम व देशी–विदेशी खेळांची त्यांना लहानपणापासून आवड. १९३२ सालीं शाळेत शिक्षक म्हणून आल्यावर लगेच शाळेचे क्रीडा खाते त्यांनीं हाती घेतले. व पुण्यांतील आंतरशालेय उस्तादपद. प्रयत्नानी मिळविले. तसेंच आटयाआटया, खो खो,हुतूतू वगैरे जवळजवळ सर्व खेळांची मानचिन्हें शाळेंत आणली देशी खेळाप्रमाणेच विदेशी खेळांतहि तशीच नेत्रदिपक प्रगति त्यांनी करून दाखविली. क्रिकेट, फुटबॉल वगैरे संघात त्यांचा शाळेच्या अगर महाविद्यालयाच्या संघांत समावेश असावयाचा. स्काऊटमध्यें "वुडबॅच" हे मानाचे पदक महाराष्ट्रांत फक्त दोघांना मिळाले त्यात राजाभाऊ हे एक आहेत.

करमणुकीशिवाय जीवन कसले ? अनेक व्याप सांभाळून त्यांनी नाट्यक्षेत्रांत आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविला. त्यांच्या आग्र्याहून सूटकेत ओंकाराची, खडाष्टकांत वक्रतुंडाची, एकचप्याल्यात तळीरामाची ह्या


भूमिका लक्षांत राहण्यासारख्या आहेत महाराष्ट्र कलोपासक ह्या संस्थेच्या "रसिक कुल" विभागाचे ते पहिले कार्यवाह होते. त्यांच्या वयाला ६१ वर्षे पूर्ण झाली त्यावेळी जो समारंभ झाला त्यावेळी म. म. द. वा. पोतदारांनी त्यांना हारगुच्छ अर्पण केला.

राजाभाऊ सर्व भाग्याचे वाटेकरी झाले परंतु त्यांच्या चाहत्यांचे, मित्रमंडळीचे व आप्तेष्टांचे दुर्भाग्य म्हणजे एकसष्टीच्या या अपूर्व सोहळ्यानंतर अवघ्या वर्षांत सर्वांना दुःखी करून राजाभाऊ आपला जीवन–प्रवास संपवून गेले. आयुष्यात कधीहि निराश न झालेल्या, हार न गेलेल्या ह्या थोर व्यक्तीला त्रिवार प्रणिपात !

त्यांच्या आत्म्याला चिरंतन शांति लाभो.

महात्मा ज्योतिराव फुले





जन्म दिनांक– ११ एप्रिल १८२७

गुरुवार सांयकाळी ७ वाजता

मृत्यू– दि. २७–११–१८९० रात्रौ २ वा. २० मि.

श्री शालिवाहन शके १७४९ चैत्र शुक्ल पक्ष पौर्णिमा चित्रा नक्षत्र प्रथम चरण. सुर्योदयात इष्ट घटी ३१ पळे. ५३. जन्म झाला. जन्म कन्या राशी बुध स्वामी. वैश्य वर्ण. राक्षसगण व्याघ्र योनि. मध्य नाडी.

स्पष्ट रवि ११-३०, रवि ३–१, जन्म ३१–५३ लग्न ३४–५४

जन्म. लग्न कुंडली तुला ५०

स्पष्टग्रहा :—

र. ११–२९, चं. ५–२५, मं. १–२७, बु. ११–२३ गु. ५–२१, शु. १०–१६, श. २-१२, के. ०–२५ रा. ६–२५, लग्न ६–५.

ग्रहफल: तूळ लग्नाचा राजयोगकारक शनि भाग्यस्थानात आहे. लग्नांत राहू, रवि–शनिचा केंद्रयोग, सप्तमेश स्वराशीत मंगळ, लग्नांत राहू चमत्कृतिजन्य गोष्टी करतो. त्या कारणाने यांना समाजांत नवी क्रांति निर्माण करण्याची बुद्धि झाली. मंगळामुळे विरोधास मोठ्या प्रमाणांत तोंड द्यावे लागले. रवि–शनि केंद्र योग व चंद्र–शनि केंद्रयोग मातापित्यापासून होणारा विरोध दर्शविते. विशेषत्वाने ही कुंडली स्वतःच्या कौटुंबिक जीवनापेक्षा सार्वजनिक जीवनास–अधिक मूल्य देणारी प्रवृत्ति दाखविते. तसेच चंद्र–गुरुची युति ही कीर्तिदर्शक असल्याने यांचा गौरव होऊन त्यांचे कार्याचे महत्व लोकांना पटले.

महात्मा ज्योतीराव फुले यांचे नांव महाराष्ट्रांतीलच नव्हे तर भारतांतील आबालवृद्धास सुपरिचित आहे- फुले यांचे महान कार्य प्रत्येक मानवास खचित स्फूर्तिदायक असून त्यांच्याविषयीच्या आदराने नतमस्तक होण्यास लावणारे आहे.

त्यांनी जातिभेदाविरुद्ध केलेली चळवळ आणि स्त्री शिक्षणासाठी घेतलेले अपार परिश्रम यामुळे त्यांच्या धडाडीची, मानव समाजकल्याणाच्या तळमळीची आणि हरिजन आणि स्त्री जातीबद्दल वाटणाऱ्या कळकळीची येथे सहज कल्पना येते.

म. फुले यांचा जन्म एका सामान्य माळी कुटुंबात झाला. वडिलांचा विरोध असूनहि त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले. फुले कांही काळ क्रांतीवादी होते परन्तु स्वातंत्र्याच्या मार्गातील जातिभेद, अज्ञान आणि विषमतेसारखे अडथळे प्रथम दूर करणे आवश्यक असल्याचे आढळून आल्यावर त्यांनी शस्त्रक्रांतीचा नाद सोडला व समाजांत धर्माज्ञा म्हणून दृढमूल झालेल्या अनिष्ट गोष्टी काढून टाकण्यासाठीं धर्मांचा तौलनिक अभ्यास सुरू केला.

समाजाच्या मूळापासून-स्त्रियांपासून अज्ञानाचे उच्चाटन करण्यासाठी त्यांनी १८५१ मध्ये पुण्यास पहिली मुलींची शाळा काढली. त्यानंतर महारमांगासाठीहि शाळा काढली. नंतर दुष्काळाच्या काळी त्यांनी शेतकरी चळवळ हाती घेतली.

म. फुले हे निर्भय वृत्तीचे समाजसुधारक होते. ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्यासमोर हिंदुस्थानांतील जनतेचे प्रतिनिधी म्हणून ते लंगोटी नि मुंडासे अशा पोशाखांत गेले होते. मुंबईतील त्यांचे कार्य ओळखणाऱ्या लोखंडे, संतुराम लाड इ. मंडळींनी प्रचंड सभा भरवून त्यांना ‘महात्मा’ ही पदवी दिली.

ते कांही काल पुणे नगरपालिकेचे सभासदहि होते. यांची कामगिरी महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारत देशाला मार्गदर्शक ठरणारी आहे.


कॅल्शीयम युक्त
बिटको
ग्राइप
नेहमीं दिल्याने लहान मुलें
सशक्त, बांदेसुद व
गुटगुटित होतात.
BYTCO-GRIPE
BYTCO CHEMICAL
बिटको
काळी
टूथ पावडर
नेहमीं वापरल्यानें दांत
मोत्या सारखे स्वच्छ होतात.
Bytco
TOOTH POWDER
बिटको केमिकल इन्डस्ट्रीज़
नासिक-रोड.

पद्मभूषण श्री. दत्तो वामन पोतदार यांचे मार्गदर्शन

ज्योतिर्वैभवचा हा अशा स्वरूपाचा अंक काढण्याचे ठरल्यानंतर त्याला पुण्याची मान्यता मिळावी, पुण्याचा आशिर्वाद लाभावा अशी तीव्र इच्छा मनांत होती. आणि त्याचमुळे पुण्याचे वैभव पुण्याची कीर्ति किंबहुना पुण्याचे प्रतिक याच भूमिकेतून महामहोपाध्याय, साहित्य वाचास्पति, पद्मभूषण श्री. दत्तो वामन पोतदार यांचा मार्गदर्शनपर आशीर्वाद मिळावा म्हणून आम्ही प्रयत्न केले. परंतु दुर्दैवाने त्यांच्या कार्यव्यापामळे त्यांची व आमची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही तेव्हा दुधाची तहान ताकाने भागवावी या नुसार ज्योतिषशास्त्रासंबंधी आजच्या ज्या प्रमख शंका कुशंका घेतल्या जातात त्या बाबतच त्यांनी आपला दृष्टीकोन विशद करावा य हेतूने त्या शंका त्यांना कळविल्या त्यांचे त्यांनी केलेले हे निरसन---

काही लोक ज्योतिषशास्त्राला शास्त्रच मानायला तयार नाहीत तेव्हाज्योतिष शास्त्र आहे काय या बाबता त्यांना विचारता ते म्हणतात, "ज्योतिष हे शास्त्र म्हणावे लागेल."

पण त्याचे स्वरूप भौतिक शास्त्राप्रमाणे मात्र असणार नाही. मानसशास्त्र, इतिहासशास्त्र वा अर्थशास्त्र अशा सारख्या प्रायोगिकशास्त्रात त्याची गणना होईल.

आजचे हे विज्ञानयुग असल्याचे जो तो का कुणास ठाऊक पण सांगत सुटतो तेव्हा अशा या विज्ञान युगात ज्योतिषाची आवश्यकता आहे काय यावर त्यांनी एकाच वाक्यात अत्यंत मार्मिकपणे खलासा केला की कोणत्याही युगात ज्योतिष आवश्यक नसले तरी उपयक्त ठरेल.

ज्योतिषामळे माणूस दैववादी बनतो असा एक आरोप ज्योतिष शास्त्रावर केला जातो. त्याचे निराकरण करताना ते लिहितात, 'दैववादी बनणे हे पिंड प्रकृतिवर अधिक अवलंबून आहे सूचक किंवा मार्गदर्शक अशा मर्यादेने ज्योतिषाकडे पाहिल्यास मनष्य दैववादी होणार नाही. आणि त्याला तसा बनवणे हे ज्योतिषशास्त्राचे प्रयोजनही नाही.'

प्रा. पोतदारांच्यासारख्या अधिकारी व्यक्तिने ज्योतिषशास्त्रासंबंधाने आपले अनुभव वा आपला दृष्टीकोण स्पष्ट करावा अशी आमची इच्छा होती. यास अनुलक्षन ते म्हणतात. आपण प्रयत्नवादी असावे, ज्योतिषाचाहि कानोसा घेत जावा. पारखलेले अनुभव विविध प्रकारे सिद्ध करावे अशी अपेक्षा आहे. माझ्या पाहण्यात अमेरिकेन 'इंटर नॅशनल झोडियॅक' किंवा

डेपल्स बुक अमेरिका' यांची छोटी प्रकाशने आली, आहेत. त्यात जन्म तारखे वरून भविष्ये साधारण स्वभाव आणि मग तपशील असतो ते मी पडताळून पाहातो. आपले इकडील मराठी फलकथनात प्रत्यक्ष काय घडेल याचे कथन दोन ओळी असते तर ग्रहांच्या परिस्थितीचे विवेचन दहा ओळी आढळतेत सामान्य लोकांना ग्रहांच्या गुंतागुंतीच्या विवेचनाची गरज नाही. विस्तारून सांगितलेल्याफल कथाची जिज्ञासा असते या दृष्टीने मी वर उल्लेखिली अमेरिकन प्रकाशने फार सरस मानतो. अमेरिकन मांडणीप्रमाणे माझी सायन सिंह येने राशि निरयना प्रमाणे मी न येते अमेरिकन पुस्तकातील कथन मला फार प्रत्ययोत्कारक वाटले आणि म्हणून ज्योतिष हे थोतांड आहे, हे मत मला ग्राह्य करवत नाही. हे मत उदाहरण देऊन स्पष्ट करताना ते लिहितात,

'यंदाच्या डेल्पर्सच्या जानेवारी महिन्याच्या पानात २६ जानेवारी (पौर्णिमा)ला काही विशेष घडेल (ट्रिकी ड्रिकी नॉट) अशी सूचना आहे. आणि २६ जानेवारीलाच मला पद्मभूषण मिळाल्याचे प्रकट झाले.' धास्ते पंडित यांनी सहज कुंडली पाहून काही भविष्ये लिहून दिली. ते वर्ष १९५५ होते. ६०-६१ पर्यंतचे ४-५ ठळक योग दिले होते. त्यात दर्शविलेल्या महिन्यात 'कुलगरू' व्हाल असे लिहिले होते, तसे प्रत्यक्ष घडून आले. असे माझे व काही दुसऱ्याचे अनुभव पाहून मी आपला दृष्टिकोन आणि मते निश्चित केली आहेत. ती स्थूलमानाने वर दिली आहेत. माझ्या जन्मवेळेला अनुसरून लिहिलेली वाक्ये तर आश्चर्य उत्पन्न करण्याइतकी जुळणारी आहेत या अनुभवावरून डेल्पर्स बुकावर माझी श्रद्धा बसली.

प्रा. श्री. के. क्षीरसागर यांची मुलाखत

संस्कृति, संस्कार नि सौंदर्य याचे प्रभावी समर्थक म्हणून मराठी साहित्यांत आज काल जर कोणाकडे बोट दाखवायचे असेल किंबहुना या त्रयींचा एकत्र विचार करताच चटकन डोळयापुढे ; श्री के क्षी ' ही अक्षरें तरळून जातात. या विरूद्ध जर कोठे काही हालचाल वा अन्य कांहीं दिसू लागले तर प्रा क्षीरसारांच्या लेखणीला कमालिची धार चढतें. तरीहि त्याच्या 'टीकेत विवेक' असतो. सहज संवाद, करित असतानाहि त्यांची ही प्रवृति चटकन डोळयांत भरते अशा या मराठी साहित्यातील अग्रगण्य टीकाकाराची आमचे मित्र श्री भालचन्द्र लेम्भे यांनी ज्योतिष शास्त्रासंबधी घेतलेली मुलाखत.

कां कुणास ठाऊक पण प्रा. क्षीरसागरांच्या बाबत काहीवेळा जवळीक वाटते तर काही वेळ दूरपणा आणि म्हणूनच त्याची मुलाखत घेण्याचे जेव्हां मला सांगण्यात आले तेव्हा मन दोलायमान झाले. प्रत्यक्ष मुलाखत घेत असताना या दोन्ही भावना लूप्त झाल्या होत्या. कारण प्रा. क्षीरसागर आपल्या भूतकाळांतील घटनाचे सिंहावलोकन करित असल्याचे एकीकडे दिसत होते तर दुसरीकडे भविष्यावर नजर होती आणि त्यांच्यातील टीकाकार माझ्याशी बोलत होता.

ज्योतिषाला आपण शास्त्र मानता का म्हणून त्यांना विचारताच ते म्हणाले.

'या प्रश्नाचे उत्तर देताना शास्त्राची व्याख्या गृहित धरलेली आहे. ती व्याख्या कोणती ते मला माहित नाही. एकाद्या क्षेत्रातील संपूर्ण कार्यकारण भाव जे सांगू शकेल तेच शास्त्र अशी विचारसरणी पत्करून ज्योतिष हे शास्त्र नाही असे काही लोक म्हणतात. उदा. शनि किंवा मंगळ विशिष्ट स्थानी आल्यावर एकाद्या व्यक्तिला त्रास होईल असे ज्योतिष शास्त्र सांगते. पण आकाशातील ग्रहांचा व्यक्तिच्या जीवनाशी संबंध कसा पोहोचतो ते मात्र सांगू शकत नाहीत. म्हणजे कार्यकारण सबंध प्रस्थापित न करता ज्योतिषशास्त काही गोष्टी सांगते. व म्हणून काही लोक त्या शास्त्राचा पाया तर्कशुद्ध नाही असे मानतात. माझ्या दृष्टिने ज्योतिष हे शास्त्र आहे. अवलोकित घटना वरून मानवी आयूष्यातील घटना संबंधांचे त्या घटना व कुंडलीतील ग्रहांच्या संबंधाविषयीचे निश्चित नियम बांधणे हे शास्त्राचेच लक्षण होय.—फार तर त्याला Impirial Science म्हणता येईल. ग्रहांच्या परिणामांचे कार्यकारण संबंध अद्याप पूर्णपणे समजलेले नाही. या दृष्टिने हे शास्त्र अपूर्णावस्थेत आहे. पण ज्या गोष्टींचा कार्यकारण संबंध समजला नाही त्या गोष्टीचा संबंधच नाकारणे हे त्याहूनहि अशास्त्रीय Arbictory दडपेपणाचे होय. ज्योतिष हे शास्त्र नाही असे मानणारे लोक ज्योतिषांला शास्त्र मानणाऱ्या लोकाहूनही अधिक अशास्त्रीय आणि Arbictory आहेत असे म्हणावे लागले.'

विज्ञान युगात ज्योतिषशास्त्राची आवश्यकता आहे काय म्हणून विचारताचते म्हणाले,

'विज्ञान युगामळे ज्योतिषशास्त्राची आवश्यकता

कमी कशी होते ते मला तरी समजू शकत नाही. भावी काळात काय होईल ते जाणण्याची जिज्ञासा विज्ञान युगात नष्ट झाली आहे असे दिसते नाही. प्रत्यक्ष विज्ञानाच्या अनेक शाखा देखील अनेक भविष्य वर्तवित असतात आणि ती भविष्ये ज्योतिषातील भविष्याइतकीच खरी वा खोटी ठरत असतात. डॉक्टर लोक पेशन्टस् संबंधी भविष्य सांगत असतात, हवामान शास्त्रातील तज्ज्ञ ऊन्हासंबंधी, पावसासंबंधी भविष्य वर्तवित असतात, अर्थशास्त्रातील तज्ज्ञ अवमूल्यनासंबंधी भविष्य वर्तवित असतात. विज्ञान युगात या सर्व भविष्यांचा भाव उतरलेला नसतो ज्योतिषशास्त्रातील भविष्यांचाच भाव तेवढा उतरेल हे मला संभाव्य वाटत नाही. व वृत्तपत्रांत भविष्यांना जी वाढती जागा मिळत आहे. तिच्य.वरून माझ्या म्हणण्याला दुजोराच येतो. मुख्य प्रश्न ज्योतिषातील भविष्य खरी ठरतात की नाही हा आहे. ती जर सर्रास खोटी ठरत असती तर 'विज्ञान' युगातच काय पण 'अज्ञान' हि ज्योतिषांना कोणी दारातहि उभे राहू दिले नसते. डॉक्टर लोक अर्थशास्त्रज्ञ किंवा मुत्सुद्दी यांनी वर्तविलेल्या भविष्याइतकींच ज्योतिषांची भविष्य खरी ठरतात म्हणून तर विज्ञान युगातही ज्योतिषांच्या दारात पूर्वी इतकीच गर्दी आहे.'

ज्योतिषामुळे माणूस दैववादी बनतो असा एक आरोप ज्योतिष शास्त्रावर केला जातो तो कितपत योग्य आहे? माझ्या तिसरा प्रश्न–

या आरोपात बरेच तथ्य आहे असे माझे मत आहे. परंतू तो दोष शास्त्राचा नसून त्या शास्त्राचा आधार घेणाऱ्या मनुष्याच्या मनोरचनेचा आहे. ज्योतिषस्त्राच्या अवलंबनामुळे दुर्बल अधिक दुर्बल बनण्यांचा संभव असतो ऐवढाच याचा अर्थ आहे. पण दूर्बल मनुष्य औषधांच्याबाबतहि फाजील परावलंबी बनण्याचा धोका असतो. पण हा दोष वैद्यक शास्त्राचा नसून त्या मनुषाच्या स्वभावाचा आहे. तरीहि ज्योतिष शास्त्राच्या बाबतीतील हा धोका प्रत्येक मनुष्यानें लक्षांत घेणे मात्र आवश्यक आहे. आहे. माझ्या दृष्टिनें हवामान शास्त्रा प्रमाणेच ज्योतिषशास्त्र तुमच्या वाटयाला येणाऱ्या बाह्य परिस्थिती संबंधीचा व घटना संबंधीचा अंदाज देत असते त्या परिस्थितीत तुम्ही कसे वागाल या संबंधीचा अंदाज ज्योतिष शास्त्र देत नाही निदान तो अंदाज तितकासा ठाव नसून लवचिक किंवा परिवर्तनीय असतो. हे लक्षांत घेतल्यास वर्तविलेल्या भविष्या मुळें मनुष्य बद्ध किंवा हतबल होण्या ऐवजी केवळ सावध वा उत्सुक होईल अर्थात या प्रश्नाचा संबंध–मानवी ईच्छेच्या वा कर्तृत्वाच्या स्वातंत्र्याशी आहे. व मानवी इच्छेचे स्वातंत्र्य वा पारतंत्र्य हा तत्वज्ञानाच्या क्षेत्रातील सुप्रसिद्ध विषय आहे.

आपला ज्योतिषा बाबतचा दृष्टीकोन व अपेक्षा काय आहेत विचारताच ते म्हणले,

' वरील दोन तीन उत्तरात या प्रश्नाचे उत्तर संपूर्णपणे आले आहे असे मला वाटते.'

या संबंधात आपले काही उल्लेखनीय अनुभव सांगण्याची विनंति करताच भूतकाळाचा ठाव घेत ते सांगू लागले,

' ज्योतिषशास्त्रावरच्या माझ्या आजवरच्या अनुभवाने माझा ज्योतिषावरचा विश्वास नष्टहि झाला नाही कि अंध होण्या इतका पुष्टहि झाला नाही. माझे त्या शास्त्रा संबंधीचे व जीवनासंबंधीचे कुतुहल मात्र वाढले आहे ग्रहांच्या द्वारे येणारे उत्तर पुष्कळदा दुहेरी वा दुधारी असते

ही गोष्ट भारत व ग्रीस यांच्या प्राचीन कथावरून लक्षात येण्याजोगती आहे. जेव्हां एखादा ज्योतिषी "तुमच्या पत्नीची प्रकृती वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत सुधारणार नाही" असे सांगतो तेव्हा त्यानंतर सुधारणा होईल वा त्या व्यक्तींच्या आयुष्याच्या अंत होईल हे दोन्हीही संभव त्याच्या डोळ्यापुढे असतात व त्यातील नेमके कोणते घडेल हे तोहि कधी कधी सांगू शकत नसतो असा माझा अनूभव आहे. भविष्य कथनाच्या द्विधा स्वरूपासंबंधी माझा आणखीहि एक अनुभव सांगण्यासारखा आहे एकदोन वेळा जाहिरपणे तो मी सांगितलेलाहि आहे ज्या वर्षी मी साहित्य संम्मेलनाचा अध्यक्ष झालो त्या वर्षी एका प्रसिद्ध ज्योतिषाने मला पुढीलप्रमाणे भविष्य सांगिनले होते. "तुम्ही अध्यक्ष निवडले गेला नाहीतर दैव तुमच्या बाजूला आहे असे समजा कारण ग्रहमान असे आहे की तुम्ही निवडूनआल्यास संम्मेलनांच्या तारखांच्या वेळी तुम्ही हॉस्टिलमधे असाल." संम्मेलनासारख्या बाबतील वस्तूत: ज्योतिषाकडे पण जाण्याचे कारणच नव्हते. परंतू त्यावेळी मला इतर कार्य इतकी होती की प्रथम निवडणूकीचा ताण जाहीरसत्कारांचा ताण व त्यानंतर प्रत्यक्ष संमेलनातील कामाचा ताण असा तिहेरी ताण (माझी त्यावेळची प्रकृती लक्षांत घेता) पत्करणे मलाहि धोक्याचे वाटत होते. व म्हणूनच मी ज्योतिषाचा सल्ला घेतला होता. पण केवळ धोक्याचा संभव पाहूनच एकाद्या महत्त्वाच्या घटनेपासून वा सन्माना पासून दूर पळणे हेहि मला व माझ्या मित्राना हास्यास्पद वाटू लागले. अर्थात मी निवडणुकीतून नांव मागे घेण्याचा विचार रहित केला व त्यानंतरचा दोन तीन महिन्याचा दगदगीचा कार्यक्रम कोणताहि घोटाळा न होता पार पडला. येथे ज्योतिषाने दिलेल्या सुचनेमूळे मी अत्यंतिक ताणाच्या या तीन महिन्यात फार संयमाने वागलो व म्हणून प्रकृती संबंधीते भविष्य खरे ठरले नाही. असा ही अर्थ करता येईल. पण ज्योतिषाने सांगीतल्या प्रमाणे घडणे पुष्कळ संभवनीय होते हेही लक्षात घेण्यासारखे आहे. कित्येक चांगल्या वा वाईट गोष्टी ज्योतिषानी वर्तविल्याप्रमाणे माझ्या आयुष्यात घडलेल्या आहेत. ज्योतिषशास्त्र थोतांड नाही. हे सिद्ध करण्यास पुरेसा पुरावा प्रत्येकाच्याच आयुष्यात असतो असे मला वाटते. पण प्रत्येक भविष्य ज्योतिषाने सांगितलेल्या स्वरूपातच खरे ठरेल असे मानण्या इतका पुरावा मात्र मला आढळलेला नाही. अखेर A wise man Rules the stars a fools obeys them ही म्हणच उपयुक्त टरते. पण त्याबरोबरच a wise man consults an Austrologrs & a fool redicules him.

ज्योतिष शास्त्राविषयीचे माझे अनुभव

लेखक : ज. पां. देशमुख

पत्रकार भूतकाल अगर भविष्यकालाविषयी विचार करण्यापेक्षा वर्तमान कालाकडेच प्रामुख्याने पहात असतो. त्याचे भविष्यकालाविषयीचे अंदाज वर्तमानकालाविषयी त्याला प्रत्यक्ष मिळालेल्या पुराव्यावर आधारलेले असतात. त्यामुळे ग्रहाचे भ्रमणानुसार आयुष्यावर होणाऱ्या परिणामाचा क्वचितच विचार करतो, ही गोष्ट खरी आहे. विज्ञान व प्रत्यक्ष येणारे शास्त्रावर आधारलेले निकाल मानण्याकडेच त्याचा कल असल्यामुळे जिवनाविषयी सांगण्यात येणारे भविष्यकथन त्याला फारसे उपयोगी पडते असे मला वाटत नाही. यामुळे माझ्यासारख्या पत्रकारांचा भविष्यावर विश्वास प्रथमपासूनच कमी आहे ही गोष्ट सुरवातीलाच मोकळेपणाने सांगितली पाहिजे.

याचा अर्थ असा नव्हे की ज्योतिषशास्त्र अजिबात मी मानत नाही. हे एक अभ्यासपूर्वक विचार करण्यासारखे प्रगतशास्त्र आहे पण आपल्याकडे त्याचा व्हावा तसा अभ्यास होत नसल्यामळे त्याला लाभणारी शास्त्रीय बैठक या विषयाला फारशी लाभलेली नाही असे सर्वसाधारण नागरिकाला वाटते. पण सर्व साधारण लिहता वाचता येणारे नागरिक आपला दिवस कसा जाणार महिना कसा जाणार वर्षलाभ कोणता होणार याचा विचार येवढा करीत असतो की कोणत्याही लहान मोठ्या वृत्तपत्राला भविष्य छापून आपल्या वाचकांची एक आवडती गरज भागविणे भाग पडते. यावरून या विषयी साक्षरातच नव्हे तर सुशिक्षितातही किती उत्सुकता आहे याची कल्पना येते. भविष्याचा वाचकांच्या व वृत्तपत्रांचा विवक्षित आवडीमळे किती निकटचा संबंध आहे. याची कल्पना यावरून येईल माझे एक निकटवर्ती मित्र ज्योतिषशास्त्राचे चांगचे अभ्यासू होते. पत्रिका हस्तसामुद्रिक या दोन्ही विषयांचा त्यांचा अभ्यास फार चांगला होता.

माझ्या विषयी अनेक प्रकारची भविष्य त्यानी पत्रिका व हात पाहून वर्तविली होती. पण त्याचा गंभीरपणे विचार करण्याचा प्रसंग माझेवर कधिच आला नाही. एक प्रसंग मला पूर्णपणे आठवतो. सदा माझी कुंडली पाहणारे हे गृहस्थ एक दिवशी माझे समोर बुधवार चौकांत सायकलवरून उतरले व गंभीरपणे म्हणाले, तुम्ही आमच्या भविष्याची कितीही चेष्टा करा पण मी एक सांगतो की पुढील आठ दिवसात तुम्हाला परदेशी जाण्याचा योग आहे. मला त्याचे हे भविष्य ऐकून भरपूर हंसू आले व या युद्धकालांत मला परदेशी कोण जाऊ देणार ही कल्पनाच अशक्य झाली असे मी त्यांना सांगितले पण ते गृहस्थ ऐकावयास तयार होईनात. व मला एक प्रकारचे आव्हान देऊनच ते निघून गेले. मी तसाच कचेरीत आलो आणि नवलाची गोष्ट म्हणजे माझे टेबलावर हिंदसरकारकडून आलेली तार मला पहावयास मिळाली, मध्यपूर्व व इटलीकडे

दौऱ्यावर जाणाऱ्या अ. भा. संपादकीय शिष्टमंडळांत माझी मराठ्यातर्फे निवड करण्यांत आल्याची बातमी होती. यासाठी मी कधी प्रयत्नही केला नव्हता व स्वप्नांत नसलेली संधी मला मिळाली होती. ८ दिवसांत इतर संपादकासमवेत मी परदेशी जावयास निघालो. यावेळी माझे भविष्यप्रेमी मित्राचे अभिनंदन करावयास मात्र मी विसरलो नाही.

हा भविष्याविषयी सद्भावना निर्माण होण्याचा माझा पहिला प्रसंग. या भविष्यप्रेमी माणसाने माझे हे परदेशी प्रयाण नेमके कसे हुडकून काढले याचा थांगपत्ता मला त्यानी अजूनही दिलेला नाही. पण कुंडलीतील ग्रहांची सदोदीत टेहळणी करणारी ही व्यक्ती यावेळी तरी अचूक भविष्य बनवू शकली हे खरे आहे.

याबरोबर आणखीही काही गंभीर भविष्ये मी अनुभविली आहे. वृत्तपत्र व्यवसायात बातमी लवकर व इत्यभूत मिळविण्यासाठी धडपडणारी आम्ही माणसे महत्वाचे घडामोडीचे प्रसंगी किती काळजीत असतो याची कल्पना या व्यवसायात असणारांना येण्यासारखी आहे. तो प्रसंग मला पूर्ण आठवतो. पं. नेहरू प्रतापगडावर शिवप्रभूचे पुतळ्याचे उद्घाटनासाठी येणार होते.व त्यांचेपुढे संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे सत्याग्रही निरोधन करण्यासाठी जमणार होते महाराष्ट्रातील गोवा गावातून सत्याग्रही येत होते. पुण्याजवळचा हा महत्वाचा म्हणून खास बातमीदार पाठवून बातमी मिळविण्याची व्यवस्था केली होती व आदल्या दिवशी कचेरीत पाऊल टाकतो ना टाकतो तोच महाराष्ट्रांतील एक ख्यातनाम ज्योतिषी माझे भेटीस आले. या व्यक्तीचे नाव ज्योतिष पारंगत म्हणून चांगले गाजलेले आहे. सदर गृहस्थ गंभीर चेहरा करून मला म्हणाले. पं. नेहरूंचा उद्याचा प्रतापगडावरील समारंभ कसा पार पडेल याची मला शंका वाटते. पंतप्रधानाना ही वेळ चांगली नाही, तुम्ही बातमीची नीट व्यवस्था करा"

या ज्योतिषाचार्यांनी दिलेला हा इषारा ऐकून मला धक्का बसला व बातमीसाठी आणखी एक बातमीदार मी प्रतापगडाकडे पाठविला, अशुभ भविष्य नेहमीच खरे ठरते, ही भावना मनाला सारखी डाचत होती. मी कचेरीत कोणाशीच याविषयी काही बोललो नाही. पण या समारंभाची संपूर्ण बातमी येईपर्यंत माझे जिवांत जीव नव्हता! प्रत्येक खणखणणारा टेलिफोन मला हादरे देत होता. समारंभ शांतपणे पार पडला. नेहरू सुरक्षितपणे दिल्लीला रवाना झाले आणि ज्योतिषाचार्यांची भविष्यवाणी खोटी ठरली...मी त्याना काहीच बोललो नाही. पण माझे मनाला या भविष्याने दिलेला हादरा मोठा होता. या भविष्याविषयी विचार करू लागलो. माझें डोळ्यापुढे हे असेच आयुष्यातले दोन मोठे प्रसंग उभे राहतात.

ज्योतिषशास्त्र हे ग्रहाचे गतीवर कसे अवलंबून आहे. हस्त रेषाशास्त्रावर अभ्यासू वृतीने लिहिणारा चिरो ज्या दृष्टीकोनातून या शास्त्राकडे पाहतो त्या दृष्टीकोनाचा विचार आमच्या ज्योतिषशास्त्राकडे पाहणारांनी कसा केला पाहिजें. सर्वसाधारण माणसाला पटेल अशी बैठक या शास्त्रज्ञांनी निर्माण करणे असे आवश्यक आहे हे आता नीट पाहीले पाहिजे. म्हणजे अभ्यासूची दृष्टी वळू शकेल व आज कधीकाळी येणारे हे कडू गोड अनुभव अभ्यासपूर्वक मांडलेले आडाखे आहेत. असे मानता येईल.

० ० ०

ज्योतिषविषयक लेख

नवांश संस्कार — एक दिव्य दृष्टि

लेखक : साधनाचार्य श्री. गो. जोशी,
ज्योतिषालंकार, नाशिक.

सुमारे दीडदोन हजार वर्षांपूर्वी वराहमिहिरानें होराशास्त्राचें फार मोठें आलोचन केलें — संकलन केलें आणि त्याला शास्त्रीय बैठक देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अनेक शास्त्रज्ञांनीं त्यांत भर घातली आणि तें अधिक प्रचीतिपूर्ण बनवण्यास हातभार लावला. आरंभीं आरंभीं तर राशी-क्रान्तिवृत्ताचा बारावा भाग-यावरच फलज्योतिष शास्त्रीय तत्त्वांची उभारणी करण्यांत आली, तेवढ्या ढोबळ मानानें भागेना म्हणून नक्षत्रविभाग (अं. १३ क. २०) हा होराशास्त्राचा मानदंड समजण्यांत येऊं लागला. पण चिकित्सक दृष्टीला तेहि अपुरें वाटूं लागलें म्हणून नक्षत्र चरण विभागाकडे (अं. ३ क. २०)— म्हणजेच नवांश विभागाकड शास्त्रज्ञांची दृष्टि वळली. याच्याहि पुढें जाऊन कांहीं प्रज्ञावंतांनीं हौराद्रेष्काणादि दशवर्ग साधनाची उपपत्ति शोधून काढली. होराशास्त्राच्या प्रगतीचा गतिमान् इतिहास हा असा आहे.

नवांश संस्काराचें व्यक्तिमत्त्व : एवढ्या साऱ्या खटाटोपांतून नवांश पद्धतीनें प्रत्यक्ष प्रचीतीचें एक आगळेच स्थान निर्माण केल्यानें इतर वर्गबलांकडे थोडा-फार कानाडोळा करून नवांश साधन हीच एक अधिकाधिक प्रचीतिपूर्ण अवस्था आहे असा सहस्त्रावधि प्रत्यक्ष प्रयोगानंतर दक्षिण भारतीय ज्योतिर्विदांनीं डांगोरा पिटला. आजहि नवांशावरील अढळ निष्ठेनेंच फलज्योतिषशास्त्राच्या क्षेत्रांत दक्षिण भारतीय ज्योतिर्विदच आघाडीवर असल्याचें पाहावयास मिळतें. एवढा गाजा-वाजा होऊनहि महाराष्ट्रांत या प्रचीतिपूर्ण नवांश संस्करणाला फारसें आदराचें स्थान मिळालें नाहीं. पुन्हां तिला उत्थान मिळावें, ती दुर्लक्षित स्थिति विचार करण्यासारखी खासच आहे, याची अल्पशी तरी जाणीव करून द्यावी म्हणून या नवांश पद्धतीबद्दल चार शब्द लिहिण्यास मी प्रवृत्त झालों.

दिव्य दृष्टि : नवांश हा एक संस्कार आहे. आणि तो क्रान्तिवृत्तीय दृक्प्रत्ययी ग्रहस्थितीवर केला जातो. संस्कारामुळें वस्तु पावन बनते, सामर्थ्यसंपन्न बनते, मूळ स्वरूपापेक्षां कितीतरी पटीनें अधिक परिणामकारक ठरते हें वैज्ञानिक प्रयोगांवरून सिद्ध झालें आहे. नवांश स्थिति म्हणजे जन्मकालीन ग्रहस्थितीचा ९ पट विस्तार सूक्ष्म वस्तु विशाल दृष्टीच्या दुर्बिणींतून पाहिल्यानें तिचे वास्तव दर्शन घडतें, तिचे हृद्‌गत कळतें, तिच्या अंतर्मनांतील विचारतरंग स्पष्टपणें कळतात, पोलादी पडद्याआड चाललेलीं त्यांचीं गुप्त कारस्थानेंहि उघडी पडतात.

एखाद्या प्रत्यक्ष उदाहरणानें या तत्त्वावर अधिक प्रकाश टाकतां येईल. एका व्यक्तीच्या जन्मकालीं सूर्य वृषभ ३ अंश, गुरु तूळ १३ अंश आणि लग्नबिंदु वृषभ १६ अं. २० क. अशी स्थिति आहे. प्रतिष्ठा, यश देणाऱ्या या ३ अवस्थांचा विचार केला तर त्या सर्वांचा परस्परांशी अनिष्ट योगच असल्यानें त्या व्यक्तीची स्थिति फारशी समाधानकारक असावी असें कोणासहि वाटूं शकणार नाहीं. पण याच ग्रहस्थितीकडे नवांश संस्कारित दृष्टीनें पाहिल्यानंतर.

रा अं. क. रा. अं.
लग्न १–१६–२० × ९ = १३–२७ = नवांश वृषभ २७°

रा. अं. क.
सूर्य १–३–० × ९ = ९–२७ नवांश मकर २७°

रा. अं. क.
गुरु ६–१३–० × ९ = ५७–२७ नवांश मकर २७°

सूर्य-गुरु या विशाल तेजोगोलाची अंशपूर्ण युति आणि तीहि भाग्यस्थानीं — असें दृश्य दिसल्यानंतर त्या व्यक्तीचें व्यक्तिमत्त्व आकर्षक असावें; प्रतिष्ठा, यश सारें सारें लाभलेलें असावें, अशी मनाची ठाम ठाम भूमिका होते; आणि आज तशी सत्यस्थिति आहेहि. मूळ जन्मकुंडली ही व्यक्तिजीवनाचें अस्पष्ट रेखाचित्र दर्शवितें, तर नवांश कुंडली पूर्ण, स्पष्ट व मनोहर चित्र निर्माण करतें. कांहीं क्लिष्ट कुंडल्यांत तर विचारांची जडण घडणच जमूं शकत नाहीं. पण नवांश कुंडलींत मात्र बुद्धीची कसरत करावी लागत नाहीं, कल्पनेच्या कोलांट्या उड्या मारण्याची गरज भासत

नाहीं, ठाम विधान करतांना मन कचरत नाहीं. फलादेशाच्या सर्वमान्य सिद्धांन्तांची 'उधळण करीत, न अडखळतां, निर्भयपणें भूतभविष्याचें दर्शन घडवितां येतें. असें आहे नवांश संस्करणाचे सामर्थ्य–अनन्यसाधारण !

प्रात्यक्षिक : नवांश साधन सोपें, साधें आहे; आणि बहुतेक साऱ्यांच अभ्यासू ज्योतिर्विदांना तें ज्ञातहि असतें. सध्यां प्रचारांत असलेले नवांश साधन म्हणजे अंश व स्पष्टभावविरहित एक साधी आंकडे कुंडली आणि "नवांशेऽपि कलत्र सौख्यम्" एवढचा पुरताच तिच्याकडे पाहण्याचा संकुचित दृष्टिकोन, यामुळें फक्त देखाव्याव्यतिरिक्त तिचा उपयोग फारसा होतच नाहीं. या ठिकाणीं मला अभिप्रेत आहे ती सायन अंशात्मकभावचलित अशी नवांश कुंडली, आणि त्याच्याहि पुढें जाऊन नवांशाचाहि प्रतिनवांश (मूळ ग्रहस्थितीची ८१ पट) केल्यानें त्यांमधून प्रकटणारें अखिल विश्वाचें सम्यक् दर्शन. एका महाराष्ट्रीय महापुरुषाच्या जन्मकालीन सायन ग्रहस्थितीवरून हे विवेचन अधिक स्पष्ट करूं इच्छितों:–

जन्म लग्न कुंभ १२।३२ यांचें अंशात्मक नवांश साधन–

कुंभेचा नवांश तूळपासून सुरू होतो–१० अंशापर्यंत धनु नवांश. त्यापुढील २ अंश ३२ कलांस ९ ने गुणन येणारे अंश २२–४८ कला हे मकर राशीचे. नवांश लग्न मकर २२।४८ पूर्वीच्याच पद्धतीनें गणित केल्यानें त्याचा प्रतिनवांश कर्क २५।१२ इतका येईल. त्याच पद्धतीनें

जन्मसूर्य–मीन २०।३१–नवांश मकर ४।३९, प्रति नवांश कुंभ ११।५१.

जन्मचंद्र–कन्या १७।३१-नवांश मिथुन ७।३९ प्र. नवांश धनु ८।५१

याचप्रमाणें सर्व ग्रह स्पष्ट नवांश करून जन्मस्थलाच्या अक्षांशावरून राफेलच्या अथवा नवांश्याच्या भावसाधन कोष्टकावरून द्वादश भाव स्पष्ट मांडले कीं अंशात्मक भावचलित नवांश कुंडली (तयार करतां येते. क्षणभर आपली मूळ जन्मकुंडली) विसरून ही नवांश कुंडलीच आपली जन्मलग्न कुंडली समजून विचार करायला लागल्यानंतर त्या व्यक्तीच्या जीवनाचें स्पष्ट चित्र दिसायला लागेल. स्वभाव, आचारविचार, जीवनांतील बरीवाईट स्थित्यंतरें, सुखदु:खाचें प्रसंग, सारें सारें कांहीं प्रत्ययाला यायला लागेल. आजवर न सुटलेलें कोडें एकदम सुटल्यासारखें वाटूं लागेल, अनेक दुवे उलगडले जाऊं लागतील, ग्रहस्थितीच्या प्रत्ययाचें हरवलेले समाधान गवसेल, मूळ कुंडलीवरून ज्या घटनांचीं समाधानकारक उत्तरें मिळूं शकत नव्हती–आणि त्यामुळें फलज्योतिषशास्त्राबद्दल आपल्या मनांत संभ्रम निर्माण झाला होता–पण नवांशाचें दर्शन घडतांच अवाक् बनाल, संभ्रम दूर होईल, शास्त्र प्रचीतीचा साक्षात्कार पदोपदीं घडूं लागेल.

आंध्र, केरळ, सिलोनचे ज्योतिर्विद नवांशाची शतकानुशतकें प्रचीति घेत आहेत – जगाला देत आहेत. एक प्रत्यक्ष प्रचीतीचे उदाहरण देणे अस्थानीं ठरूं नये.

त्रिचनापल्लीस एका विद्वान् ज्योतिर्विदाला माझी कुंडली दाखवण्याचा सुयोग आला. जन्मकालिन ग्रहस्थितीचें अंशात्मक नवांश संस्करण केल्यानंतर इष्ट व अनिष्ट २१४ गोष्टी त्यानें ठामपणानें वर्तवल्या. " आपण बालपणीं पूर्ण मुके होता ? आपले पिताजी हॉस्पिटलमध्यें ऑपरेशन अयशस्वी झाल्यानें वारले ? माताजींना भयंकर दम्याची व्याधि होती ? तुमचें घराणें ५।१० पिढयांपासून ज्योतिर्विदाचें आहे ?" या सर्वांची उत्तरें 'होय' या एकाच शब्दानें मला द्यावी लागली. त्यानंतर विशेष महत्त्वाची-पण त्या काळीं अगदींच असंभवनीय वाटणारी एक भविष्यकालीन गोष्टहि त्यानें मला सुनवली.–" आज आपण शिक्षक आहांत–या धंद्यांत राहण्याचें तुमचें निश्चित ठरलेलेंहि आहे. पण दीड–दोन वर्षांनीं आपण परंपरागत ज्योतिष क्षेत्रांत प्रवेश कराल आणि त्यांतच सारी हयात घालवाल." या गोष्टीची प्रचीति २ वर्षांनीच आली; आणि गेलीं ३० वर्षे या परंपरागत विद्येशी मी एकनिष्ठ आहेहि.

या प्रत्यक्ष प्रचीतीमुळेंच या नवांश पद्धतीकडे मी आकर्षिलों गेलों. दक्षिण भारतीय ज्योतिर्विदांच्या भेटीगांठी घेतल्या, त्यांचे शिष्यत्व पतकरलें आणि नवांशाचें गूढ उकलून घेण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला, आणि गेल्या दोन अडीच तपांच्या कालावधींत सहस्त्रावधि कुंडल्यांवर या नवांश संस्काराचा प्रयोगहि करून पाहिला.

मागें उदाहरणादाखल स्वीकारलेल्या अंशात्मक भावस्पष्ट नवांश कुंडलीचा भूत–भविष्य वाचनासाठीं विचार करतांना–कालनिर्णयासाठीं विचार करतांना कालनिर्णयासाठीं या नवांश ग्रहस्थितीशींच गोचर ग्रहस्थिति व दिनवर्षपद्धतीची चलित ग्रहस्थिति उपयोगांत आणावी. गोचर व दिनवर्षग्रहस्थितीचे नवांश संस्करण करण्याचें कारण नाहीं. गोचर ग्रहांचे या नवांश कुंडलीतील ग्रहांशीं व स्थानांशीं होणारे शुभाशुभ

योग इष्टानिष्ट भूत–भविष्यकालीन घटनांचें निश्चित स्वरूप प्रकट करतात. त्या व्यक्तीच्या नवांश ग्रहस्थिती-कडे पाहिल्यानंतर मकर २३ वा अंश लग्नीं असलेली ही व्यक्ति मकर राशीच्या भारताशीं घनिष्ठसंबंधीं आहे हें उघड दिसते. १९६१ सालीं गोचर गुरुशनीचें भ्रमण मकर २३ वरून होत असतांना भारतीय राज्य-शासन क्षेत्रांतील फार मोठी प्रतिष्ठेची जबाबदारीची जागा त्यांना लाभली. तत्पूर्वी १९५७ सालींहि गोचर गुरु भाग्यस्थानांतून संचारत असतांना त्यांच्या चारि-त्र्याला उत्थान मिळालें होतें.

अमृत मंथन : नवांश संस्काराचें महत्त्व याहिपेक्षां एका वेगळ्याच दृष्टीनें जगाच्या प्रत्ययाला आलें. नवांश संस्करणाच्या मंथनांतून एक प्रभावी – अत्यंत कार्यक्षम असें ' अमृत ' शोधून काढण्यांत दाक्षिणात्य यशस्वी झाल्याचें दिसून आलें. नवांश लग्न, सूर्य, चंद्र या तीन कार्यकारी बिंदूंच्या बेरजेमधून या परिणामकारक बिंदूचा उद्‌भव झाला. वानगीदाखल पूर्वीचेंच उदाहरण घेऊं.

	रा. अं. क.	
नवांश लग्न	९ – २२ – ४८	
,, सूर्य	९ – ४ – ३९	यांची बेरीज.
,, चंद्र	२ – ७ – ३९	

अं. क.

९ – ५ – ६ = मकर ५ – ६

कुंडलींतील या सामर्थ्यवान् बिंदूशीच जीवनांतील इष्टानिष्ट घटनांचा संबंध पोंचतो. या एका विशिष्ट नवांश अवस्थेंतून त्या त्या व्यक्तीच्या चारित्र्याचा बराचसा भाग उजेडांत येऊं शकतो, असें प्रत्यक्ष प्रयोगांती शेंकडा ९०–९२ टक्के प्रत्ययास आलें.

आपण ज्या एका महान् व्यक्तीच्या (जीवनाचा विचार करीत आहोत–या व्यक्तीच्या) या मकर ५ अंश ६ कला कार्यकारी बिंदूशीं गो. हर्शल कन्या ५ अंशांत येतांक्षणींच त्रिकोण झाल्यामुळें, एक आकस्मिक, क्रांतिकारक, नाटयपूर्ण चांगली घटना घडून आली. १९६२ नोव्हेंबर १९–२० तारखेला त्या व्यक्तीला भारताच्या केंद्रीय मंत्रीमंडळींत फार मोठी जबाबदारीची जागा देण्यांत आली, आणि त्या गोष्टीमुळेंच साऱ्या जगाच्या नजरा त्या व्यक्तीवर खिळून राहिल्या. प्रत्यक्ष प्रयोग केल्यानंतर अनेकांच्या जीवनांत ही ग्रहस्थिति विलक्षण क्रान्ति घडवून आणते असें अनुभवण्यांस मिळेल.

अशा प्रकारचा परिणामकारक बिंदुशोधनाचा प्रयत्न हा कांहीं नवा नाहीं. कित्येक शतकांपासून पौर्वात्य, पाश्चिमात्य ज्योतिर्विदांच्या प्रयोगशाळेंत असें प्रयोग सुरूच आहेत. जेमिनीची अंशपद्धति, यवनाचार्यांची ताजिक पद्धति, बृहत्पाराशरीकारांची इंद्र–वज्र–धूमादि बिंदू, आरु लग्न व सहम बिंदूंची उपपत्ति, लिली या पाश्चात्त्य ज्योतिर्विदाचा प्रश्नशास्त्रासाठीं विशेष उपयोगीं असें नाविन्यपूर्ण अंशसंशोधन, मॉरिस वेमिसचे विकारसंशोधनावरील कालखंड, इत्यादि ज्ञात–अज्ञात ज्योतिर्विदांनीं असंख्य संशोधनाची ज्योतिषशास्त्रांत भर घातलेलीच आहे. इंदूरचे घाटपांडे, नाशिकचे प्रभुणे यांची असंख्य संशोधनें त्यांच्याबरोबरच विलीन झाली. नवांश सूक्ष्म कुंडली व तिच्यापासून निर्मिलेला परिणामकारक बिंदु हे एक प्रभावी संशोधन आहे, हें निश्चित गुण देणारे (रसायन आहे, असा दाक्षिणात्यांचा दावा आहे–जगाला) आवाहन आहे.

जन्मकालाचें व कुंडलीचें शुद्धीकरण : अशा स्वरूपाचें महत्त्वपूर्ण बिंदु प्रत्यक्ष हस्तगत करतांना सुरुवातीला अनेक अडीअडचणींशीं तोंड द्यावे लागतें. सहजासहजी हें नवनीत हस्तगत होत नाहीं. मुख्य अडचण जन्मकालाची. जन्मकाल अनिश्चित असेल तर मूळ लग्नांशांत बदल–त्याच्या ९ पट नवांशांत बदल आणि त्याहिपेक्षां अधिक फरक पडेल त्या परिणामकारण बिंदूमध्यें. साधारणपणें ४ मिनिटांनीं लग्नबिंदु १ अंशानें मागेपुढें जात असतो, पण नवांशांत ९अंशांचा फरक घडतो. नवांश कुंडलींतील १ अंशाची चूक म्हणजे जन्मकालांत २६।२७ सेकंदांचा फरक आणि अशा स्वरूपाचा प्रभावी अंश शोधून काढायचा म्हटले तर नवांशांत १ अंशाची (म्हणजेच जन्मकालांत २७ सेकंदाचीहि) चूक क्षम्य ठरत नाहीं. आणि प्रत्यक्ष व्यवहारांत तर सेकंदापर्यंत जन्मकाल निश्चित असण्याची शक्यता फारच कमी. अशा वेळीं जीवनांतील महत्त्वपूर्ण गतघटनांचा आधार घेऊन नवांश लग्नबिंदु निश्चित ठरवावा लागतो. नवांश लग्नबिंदूच्या शुद्धीकरणासाठीं गोचर गुरु, शनि, हर्शल नेप्च्यून, राहु या मंदगतिक ग्रहांचीं भ्रमणें व दिन-वर्ष पद्धतीचा रवि-चंद्र यांचा उपयोग करावा. स्वतः अगर तज्ज्ञांची मदत घेऊन थोडयाशा परिश्रमानंतर नवांश लग्नबिंदु निश्चित करतां येतो. आणि असें झालें म्हणजे जन्मकालहि सेकंदापर्यंत शुद्ध होऊं शकतो. थोडयाशा खटाटोपांतून निश्चित नवांश लग्नबिंदु हातीं आला कीं, जीवनांतील साऱ्या अज्ञात घटनांचें कोडें सुटलेंच म्हणून समजावें, भूत, भविष्यकालीन सुखदुःखाचें, अतीव आनंदाचें क्षण निश्चितपणें टिपतां येतील. याशिवाय कुंडलीच्या शुद्धीकरणासाठीं ज्या अनेक उपायांचा

उपयोग केला जातो त्या सर्वांत सेकंदापर्यंत जन्मकाल शुद्ध करण्यास हाच एक निश्चित उपाय असल्यामुळें शुद्धीकरणाचा एक नवीन नियम सांपडल्याचें समाधान लाभेल.

साडेसातीचें कोडें: साडेसातीचें कोडें अजूनपर्यंत तरी कुणाला समाधानकारकपणें सुटल्याचें ऐकण्यांत नाहीं. वाचनांतहि नाहीं. अगदीं प्रांजलपणें कबुली-जबाब द्यायचा झाला तर 'हें कोडें कोडेंच राहिलें आहे' असाच द्यावा लागेल. रौप्य, ताम्रपादादि फॉर्म्युलें वापरून पाहिलें, शनिचंद्राच्या उच्चनीच अवस्थांचा घोळ घालून पाहिला, दशाअंतर्दशांचीं कोष्टकें पाठ करून पाहिली, याशिवाय अनेक बुद्धीच्या कोलांट्या मारून मारून बघितल्या पण शनीच्या इष्टानिष्टतेची चावी कुणाच्या हातांत आलेली दिसत नाहीं. थोडेंफार यश आल्यासारखें वाटतें तें या नवांश संस्करणाच्या कृपेनेंच. साडेसाती कांहींना साफ झाडून काढते तर कांहींना भाग्याच्या शिखरावर चढवते. येथील माझ्या एका दरिद्री मित्राला साडेसाती लागली आणि तो सुस्थितीकडे वाटचाल करूं लागला. साडेसात वर्षांत तो लक्षाधीश झाला; आणि साडेसाती संपल्या-वर पुन्हा पूर्वपदावर आला. या व अशाच प्रकारच्या शनीच्या लहरी स्वभावाला कांहीं नियमांचें बंधन आहे कां ? नवांश संस्करण म्हणते, "आहे." कांहीं प्रमाणांत तरी निश्चितच नियमांचे त्याला बंधन आहे.

माझ्या वरील मित्राची राशि कर्क पण नवांश राशि तूळ आणि नवांश लग्नहि तूळच. मिथुनेंत शनि आला. पण नवांशांत भाग्यस्थानीं होता, पुढे कर्क सिंहेंत शनि दशम-एकादशांत होता—नवांश लग्नाला व चंद्राला (मूळ चंद्राला अनिष्ट दिसत असला तरी हा गोचर शनि आत्यंतिक शुभयोगांत असल्यामुळें त्याची या तथाकथित साडेसातींत प्रगतीच झाली.) आणि कन्येच्या शनीनें साडेसाती सुटल्याचें वाटलें खरें पण नवांश चंद्र लग्नाला तो बारावा आला आणि त्या वेळीं त्याच्या प्रतिष्ठेवर संपत्तीवर आघात झाले. तात्पर्य नवांश लग्नचंद्राशी या शनींचे नातें जोडून पाहिल्यानें त्याच्या इष्टानिष्टतेचें चाळे निश्चित लक्षांत येतील.

शनीला प्रिय असलेल्या राशि—मिथुन, तूळ, कुंभ नवांशांत शनीला लाभल्या आणि नवांश चंद्र लग्नाला तो शुभ संबंधित असला तर हा मणिकांचन योगच ठरेल.

हर्शल नेपच्युनची जादू:— हर्शल नेपच्यून हे विश्व-विख्यात जादूगार आहेत. त्यांनीं छाः छूः केलें की फकीर अमीर बनतो, सर्वसाधारण मनुष्य मंत्रीपदावर चढतो, अत्युच्च आसनावरूनहि कोणी गडगडतो. ही किमया, ही जादुगिरी फक्त हर्शल नेपच्यूननांच साधलेली आहे.

हर्शलचे १२ राशींतून संपूर्ण एक भ्रमण (८४ वर्षें) माणसाला फक्त एकदांच अनुभवण्यास मिळते. नेप्च्यूनच्या तर अर्ध्याच भ्रमणाचा अनुभव घेता येतो. आणि अंशपूर्ण भावचलित नवांश कुंडलीवरूनच त्यांची जादुगिरी प्रत्ययाला येते. आपल्या भारताचे नेते—पंडितजी यांचें नवांश लग्न तूळ २५ अंशांत गो. हर्शल मिथुन २५ येतांच (१९४७ ऑगस्ट) स्वतंत्र भारताचे प्रधानमंत्रि-पद त्यांना लाभलें. तो हर्शल भाग्य-दशम-एकादशांतून संचारत असल्यामुळेच (गेल्या १५ वर्षांत) साऱ्या जगाच्या नजरा त्यांच्यावर खिळल्या होत्या. पंडितजीच फक्त जगाच्या आंतरराष्ट्रीय समस्यांवर तोडगे काढतील असा जगांतील साऱ्या नेत्यांना दिलासा वाटत होता. जगभर सत्कार झाले. कोट्यावधि लोकांनीं त्यांच्यावर फुलें उधळलीं, भारताचा कायापालट घडवून आणला. एवढी प्रतिष्ठा, एवढा लौकिक, एवढे उज्ज्वल चारित्र्य जगांत अन्य कोणत्याहि नेत्याला लाभलें नसेल. ही जादु हर्शलचीच. उलट तूळ २५ वर गोचर नेप्च्यून आला (१९५४—५५) आणि चीनचें डावपेच सुरू झाले. आणि १९६२ आक्टोबरला तर त्यांच्या परिणामकारक नवांश (ल + चं + २) बिंदूला नेप्च्यूनचा अंशात्मक प्रतियोग सुरू होता. तेव्हां या हर्शल नेप्च्यूनच्या जादूचे खेळ नवांशांच्या दालनातच फक्त आपणांस पाहावयास मिळ-तील. एकदा त्या दालनांत जाऊन तर पाहा !

अतर्ज्ञान: प्रतिनवांश (नवांशाचा नवांश—मूळ जन्म-स्थितीची ८१ पट) म्हणजे तर साक्षात् अंतर्ज्ञानच— विश्वाची ओळखच ! "पिंडीं तें ब्रम्हांडीं" या तत्त्वा-नुसार केवळ आपल्याच विशिष्ट संस्कारित गृहस्थिती-वरून ज्या व्यक्तीचा आपल्याशी संबंध येईल त्या व्यक्तीचे भूत-भविष्यज्ञान कळूं शकते. संकुचित ज्ञानाचा मानवावर ज्योतिषशास्त्रानें मिळवलेला हा विजयच होय ! आपल्याकडे आकर्षिलेल्या व्यक्तीचा आपल्याशी कांहीं ऋणानुबंध असल्याशिवाय, आंतरिक प्रेरणा किंवा ईश्वरी आदेश असल्याशिवाय दैवज्ञानाच्या पवित्र हेतूनें ती व्यक्ती आपल्याकडे येईलच कशी ?

ईश्वरी संकेत—कर्मयोग हे एकदा मान्य केल्यानंतर कोणत्या प्रकारची व्यक्ति आपणांस भेटणार आहे त्याचा दैवलेख आपल्याच कुंडलीत लिहिलेला असणें असंभवनीय मुळींच नाहीं.

आपल्या प्रतिनवांशित मास कुंडलीवर—व्यक्ति

आगमनकालीन गोचर चंद्राचा नवांश बिंदु ठेवला आणि आपल्या विचारांची त्याला गति दिली कीं त्या व्यक्तीचे अज्ञात चारित्र्य ग्रामोफोनप्रमाणें बोलूं लागतें. मर्यादित लेखनांत या विषयाचा अधिक विस्तारानें उल्लेख करतां येणें शक्य नाहीं.

कांहीं शंका आणि त्यांचें निरसन : हें सर्व वाचत असतांना कांहीं वाचकांच्या मनांत विकल्पांचें–शंका-कुशंकांचें वादळ उठलेलें असेलच. तें वादळ शमविल्याशिवाय या प्रचीतिपूर्ण पध्दतीचें महत्त्व निरपवादपणें पटल्याचें समाधान त्यांच्या मनाला लाभूं शकणार नाही.

'जन्मकालीन दृक्प्रत्ययीं ग्रहस्थितीशीं या काल्पनिक नवांश ग्रहस्थितीचा मेळ घालणें हें अशास्त्रीय तत्त्व कां म्हणून मान्य करायचे ?' असा आरोप या नवांशपद्धतीवर अनेकांकडून केला जातो. त्या आरोपाचें खंडण करण्यापूर्वी मला असें सांगायचें आहे कीं नवांशस्थिति हीमुळीं काल्पनिक आहे असे म्हणणेंच अज्ञानमूलक. मूळ सत्य ग्रहस्थितीची ९ पट केल्यानें ती असत्य कशी ठरेल ? सूक्ष्मदर्शक यंत्रांतून जेव्हां अगदीं लहान रत्नाचें संशोधन केलें जातें तेव्हां मूळचा लहान कण नारळाएवढा मोठा दिसूं लागतो, तेव्हां तें रत्न असत्य समजलें जाईल ? तत्त्वाला अनुसरून ग्रहस्थितीची स्पष्ट कल्पना यावी म्हणून–तिच्यांत दडलेले इष्टनिष्ट प्रकार आकलन व्हावे म्हणून पूर्वाचार्यांनीं ही चातुर्यपूर्ण गणितशास्त्रीय प्रक्रिया शोधून काढली. तिलाच आपण नवांश-पद्धति म्हणतो.

ऐतिहासिक आधार : या नवांशाची खरी दखल घेतली मुहुर्तग्रंथकारांनीं. या परिणामकारक अज्ञात बिंदूचा पहिला साक्षात्कार झाला त्यांनाच आणि त्यांनी अधिकारवाणीनें जगाला बजावलें कीं विवाहादि मंगलकार्याकरितां शुद्ध व पवित्र मूहूर्त ठरवितांना त्या मुहूर्ताचा लग्नाश असा घ्या कीं 'एखाद्या उग्र व क्रूर ग्रहानें तो युक्त असतां कामा नये. एवढेच नव्हे तर शनिमंगळादि ग्रह ज्या राशींतून संचारत असतात, त्या राशींशीं मंगलकार्यकालीन लग्नाचा नवांशहि संलग्न असतां कामा नये. असा ठाम आदेश देण्यांत द्रष्ट्या मुहूर्तग्रंथकारांना असा अनेक वेळा प्रत्यय आला असला पाहिजे कीं मुहूर्तकालीन लग्ननवांश दुष्ट व उग्र ग्रह सान्निध्यानें विपरीत परिणाम करतो.

मुहूर्तप्रकरणीं या तत्त्वाचे जर काटेकोरपणें पालन केलें जातें तर तत्संल्लग्न ज्योतिषशास्त्रानें त्याचें अनुकरण केलें तर त्यात काय बिघडलें ?

सुमारे १ हजार वर्षांपूर्वीचा महान् क्रांतिकारक ज्योतिर्विद वैद्यनाथ–जातक परिजातकार यानें त्याच्या ग्रंथांत असें एक स्पष्ट विधान केलेलें आहे कीं, "जन्मकालीन गुलिक मांदीवरून नवांशस्थ शनीचें भ्रमण घडत असतांना त्या व्यक्तीला भयंकर क्लेश होतात." इ. त्याचप्रमाणें जैमिनी, कल्याणवर्मा, इ. अनेक ग्रंथकारांनीं नवांश ग्रहस्थितीचा अनेक ठिकाणीं उपयोग करून फलज्योतिषशास्त्राला पूर्णत्व आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तात्पर्य, अशा रीतीनें फलशोधन करण्याचा भारतीय वारसा फार प्राचीन कालापासून चालूं आहे.

आपण नेहमीं उपयोगांत आणीत तें असतो अवकहडाचक्र तर संपूर्णपणें नवांशमयच आहे. नक्षत्रचरण म्हणजेच नवांश आणि नक्षत्रचरणावरच तें आधारलेलें आहे.

जन्मास आलेल्या मानवाला पहिला जो नामसंस्कार केला जातो तोच मुळी नवांशामुळे–नक्षत्रचरणदर्शक अक्षरामुळें. एखाद्या नवजात बालकाची पीडाकारक परिस्थितीहि दर्शविली जाते. नक्षत्रचरणपरत्वें पीडादायक दिवसांनीं एवढेच काय, मानव इहलोक सोडून जातो त्यावेळच्या द्विपाद त्रिपाद नक्षत्राची जाणीव करून दिली जाते नवांशामुळेच एवंच जन्मापासून अंतापर्यंत क्षणाक्षणाला उपयोगी पडणारी ही नवांशस्थिति काल्पनिक, अशास्त्रीय, निरुपयोगी आहे असें म्हणणें हेंच मुळीं अनभ्यसनीय अज्ञानमूलक ठरेल.

प्रतिनवांश हा तर आत्मसाक्षात्कार आहे; आणि आत्मसाक्षात्कार हा अनिर्वचनीय असतो--अलेख्य असतो. असतो प्रचीतीच्या आत्मानंदात जो रंगून जाईल त्यालाच फक्त त्याची गोडी चाखता येईल.

शेवटी महाराष्ट्रीय ज्योतिर्विदांना व त्या शास्त्राच्या अभ्यासकांना मला नम्रपणें आवाहन करावेसें वाटतें कीं या नाविन्यपूर्ण तत्त्वप्रणालीचा आपण पाठपुरावा केलात, ती पूर्णत्वानें आत्मसात केलीत आणि तिच्या प्रचीतीचा प्रत्यय जगाला देत राहिलात तर ग्रहग्रोचरी फारशी प्रत्ययाला येत नाही असें म्हणणाऱ्यांची तोंडें तुम्हांला क्षणांत बद करता येतील; आणि आवाज उठवता येईल कीं आजच्या गतिमान मानवाच्या वाढत्या आशाआकांक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल करण्याचें सामर्थ्य या फलज्योतिषशास्त्रांत आहेच आहे.

" शुभंभवतु "

रोगोत्पति व त्याचा परिहार

लेखक : श्रीकृष्ण अ. जकातदार

उदररोग

तथाष्टावृदराणिच ।। वातात्पित्तात्कफात्रीणि त्रिदोषेभ्यो जलादपि ।। प्लीव्हः क्षताब्दद्धगुदादष्टमं परिकीर्तितं ।।

अर्थ : उदररोग आठ प्रकारचा आहे. वातोदर, पितोदर, कफोदर, त्रिदोषोदर, जलोदर, प्लीहोदर, क्षतोदर व त्यांची लक्षणें खाली वेगवेगळी देतो.

कर्मविपाक–जन्मसमयीं सिंहलग्नस्थ चंद्र असतां अथवा रविग्रही चंद्र असतां उदररोग, स्त्रीव्देष, तृषा आणि क्षुधा इत्यादिकांनीं पीडित होतो अथवा चंद्र षष्ठमस्थानीं, रवि शुक्रस्थानीं असेल तर जलोदर, नेत्ररोग, नाना तऱ्हेचे क्लेश व बंधनें इत्यादिक प्राप्त होतात.

परिहार–सूर्य, चंद्र यांचीं दानें, जप, होम इत्यादि करावीं.

उदावर्त

वातविण्मूत्रजृंभास्त्रक्षवोग्दाखमींद्रियै : ।
क्षुत्तृष्णो च्छसनिद्राणां घृत्योदावर्तसंभव : ।

अर्थ–वायु, विष्टा, मूत्र, जांभई, नेत्राश्रु, शिंका, ढेकर, वांति शुक्र, क्षुधा, तृषा, उच्छ्वास आणि निद्रा ह्या तेरा शारीरिक धर्मांच्या वेगधारणेनें उदावर्त रोग उत्पन्न होतो. सर्व उदावर्तामध्यें मुख्य कारण वायुच आहे.

कर्मविपाक–जन्मकाळीं पापग्रहाच्या मध्यगत चंद्र अथवा सप्तमस्थानीं शनि असतां उदावर्त, श्वास, विद्रधि, गुल्म, कवलू, आध्यान इत्यादि रोग होतात.

उन्मादरोग (उन्मत्तवायु)

मदयंत्युद्गता दोषा यस्मादुन्मार्गमाश्रिता : ।
मानसोऽयमतो व्याधिरुन्माद इति कीर्त्यते ।।

अर्थम : नुष्याच्या शरीरांतील वाढलेले वातादि दोष आपला नित्याचा मार्ग सोडूनमनोमय नाडयांत जातात व मनाचे ठायीं भ्रम उत्पन्न करतात. या रीतीनें जो मानसिक रोग उत्पन्न होतो त्यास उन्माद अथवा उन्मत्तवायु असें म्हणतात. उन्माद––या रोगाचे मुख्य पांच प्रकार, आहेत. ते असें–वातोन्माद, पित्तोन्माद, कफोन्माद, सान्निपातोन्माद व मानसिक दुःखामुळें होणारा दुःखोन्माद शिवाय विषाच्या सेवनानें एक सहावा उन्माद मनुष्याला जडतो. त्याला विषाच्या दोषानुरूप औषध योजना करावी.हा फार वाढण्यापूर्वी यास मद असे म्हणतात.

कर्मविपाक–जन्मसमयीं बुधस्थानीं सूर्य असून त्याजवर गुरूची दृष्टि असेल तर शस्त्रप्रहरांनीं शरीर विदीर्ण होणें, द्यूत कर्म करणें, प्रवास, सुरुपता यांनी युक्त होते. शुक्र कर्कलग्नीं असता किंवा चंद्र कर्कलग्नस्थ, वृषभीचा अथवा लग्नगत असता अशा समयीं जन्म झाल्यानें उन्मादरोगी, नीच, बधीर, हातापायांनी पंगु व मुका असा होतो. जन्मादरोगयुक्त व अत्यंत दीन असा पुरुष होतो.

परिहार––जे जे ग्रह असतील त्यांचीं दानें, जप, हवन इत्यादि करावीं म्हणजे शम होतो.

उपदंश (गरमी)

हस्ताभिघातान्नखदंतपातादधावनाद्रतिसेवनाद्वा ।।
योनिप्रदोषाच्च भवन्तीशिश्ने पंचोपदंशा विविधापचारैः।।

वात, पित्त, कफ, संनिपात व रक्त या भेदानें पांच अर्थ : प्रकारचा उपदंश रोग होतो. त्याचे कारण खाली दिले आहे.

कर्मविपाक–शुक्राच्या महादशेंत चंद्राची अंतर्दशा प्राप्त झाली असता नखरोग, दर्शनरोग (नेत्ररोग) शिश्नरोग (गरमी) व कामला हे रोग प्राप्त होतात.

परिहार–चंद्राची दानें, जप, होम इत्यादि करावीं.

कर्णरोग

कर्णरोगाः समाख्याता अष्टादशमिता बुधैः।।
वातात्पित्तात्कफाद्रक्तात्सन्निपाताच्च विद्रधिः।।
शोथोऽर्वुदं पूतिकर्णः कर्णार्शः कर्णहल्लिका।।
बाधिर्यं तंत्रिका कंडूःशष्कुलिः कृमिकर्णकः।।
कर्णनादः प्रतीनाह इत्यष्टादशकर्णजाः।।

शारंगधराचार्यांनीं व इतरांनी आपले ग्रंथांत कर्णरोगाचे अठरा प्रकार सांगितले आहेत. (चरकानें मात्र कर्णरोगाचे मुख्य वात, पित्त, कफ व सन्निपात असें चारच प्रकार सांगितले आहेत) तथापि आम्ही सर्व प्रकार सांगतों.

वात, पित्त, कफ, रक्त, सन्निपात, विद्रधि, शोथ, अर्बुद पूतिकर्ण, कर्णार्श, कर्णहल्लिका, बाधिर्य, तंत्रिका, कंडू, शष्कुलि कृमिकर्णक, कर्णनाद व प्रतिनाह अशा १८ प्रकारांनीं कर्णरोग होतो.

कर्मविपाक–द्वितीयस्थानीं, द्वादशस्थानीं शुक्र किंवा मंगळ असतां अथवा कर्क, वृषभ मेष व जन्मलग्न यांतून कोणत्याहि लग्नी चंद्र असतां कर्णरोग, पंगुपणा, बधिरत्व इत्यादिक प्राप्त होतात.

परिहार–त्या त्या ग्रहाचीं दानें, जप, हवन, इत्यादि करावें.

कामला (कावीळ) कुंभकामला व हलीमक रोग

स्यात्कुंभकामला चैका तथैव च हलीमकं॥

अर्थ–कामला हा रोग फक्त एक प्रकारचाचआहे. त्याला प्राकृतांत कावीळ अगर कामीण असे म्हणतात. हा रोग पांडुरोगाची उपेक्षा केली असता होतो किंवा स्वतंत्रहि होतो. काविळाचे दोन भेद मानले आहेत, एक कुंभकामला व दुसरा हलीमक.

कर्मविपाक–चंद्र शुक्राच्या दशेमध्यें मध्यगत झाला असतां अनेक प्रकारची दुःखें, मस्तकरोग, कामलारोग वायुजनितरोग व अनेक संकटें इत्यादि होतात.

परिहार–चंद्रपीडानिरसनार्थ चंद्राचा जप, होम व दानें करावींत.

पूर्वकर्मविपाक–पूर्वजन्मीं अन्नाची चोरी करितो त्याला कामलारोग होतो.

परिहार–गरुडाची सुवर्णाची मूर्ति(वीरसिंहावलोकन ग्रंथांत सांगितली आहे तशी) करून तिची पूजा करून होमादिक विधि करावा. नंतर तिचें दान करावें, इत्यादि दैविक प्रतिकार करावा.

कास (खोकला) रोग

कासा : पंच समुद्दिष्टास्ते भयस्तु त्रिभिर्मलैः।
उरःक्षतायचतुर्थ स्यात् क्षयाध्दातोश्च पंचमः॥

अर्थ–कास रोगाचें प्रकार पांच आहेत ते वातकास, पित्तकास, कफकास, उरःक्षतकास व धातुक्षयकास याप्रमाणें समजावेत.

कर्मविपाक–कर्क राशिस्थित सूर्य असून बुधाची दृष्टि असेल तर कासरोग, कफवातरोग, नेत्रयोग आणि विपरीतमति होतो.

परिहार–बुधाची दृष्टि व सूर्याची पीडानाशनार्थ सूर्यमंत्राचा जप, दानें, होम इत्यादि पूर्वोक्त करावें.

कुष्ठरोग (कोड)

कुष्ठान्यष्टादशोक्तानि वातात्कापालिकं भवेत्।
पित्तेनौदुंबरं प्रोक्तं कफान्मंडलचर्चिके॥
मरूत्पित्तात्ऋष्यजिव्हं श्लेष्मवाताद्विपादिका।
तथा सिध्मैककुष्ठंच किटिभं चालसं तथा॥
कफापित्तात्पुनर्दद्रुःपामा विस्फोटकं तथा।
महाकुष्ठं चर्मदलं पुंडरीकं क्षतारूकं॥
त्रिदौषैः काकणं ज्ञेयं तथान्यत् श्वित्रसंज्ञितं।
तथा वातेन पित्तेन श्लेष्मणा च त्रिधा भवेत्॥१॥

अर्थ : कुष्ठरोग अठरा प्रकारचे सांगितले आहेत. त्यांची नांवें–वायूपासून कापालिका, पित्तापासून औदुंबरा कफापासून मंडळ आणि चर्चिका, वातपित्तापासून ऋष्यजिव्ह कफवायूपासून विपादिका, सिध्म एककुष्ठ, किटिम व अलसकः कफपित्तापासून दद्रुः पामा, विस्फोटक, महाकुष्ठ, चर्मदल, पुंडरीक आणि शतारूकः त्रिदोषापासून कांकण व त्याचप्रमाणें श्वित्रकुष्ट (पांढरे कोड) तीन प्रकारचे सांगितलें आहे. ते वातिक पैत्तिक व श्लैष्मिक.

कर्मविपाक–सप्तमस्थानीं राहू, सूर्य, मंगळ, अथवा मेष, वृश्चिक ह्या लग्नी रवि असून त्याजवर शुक्रदृष्टि किंवा अष्टमस्थानीं शनि, सिंहीं रवि असून त्याजवर शुक्राची दृष्टि व नीचस्थ रवीची दशा इत्यादि योगांनीं कुष्ठरोग उत्पन्न होतो.

परिहार–जो ग्रह अनिष्ट असेल त्यांची दाने आणि जप इत्यादि करावा.

कृमि–जंत

कृमयस्तु द्विधा प्रोक्ता बाह्याभ्यंतरभेदतः।
बहिर्मलकफासृग्विट् जन्मभेदाच्चतुर्विधाः॥
नामतो विंशति विधा॥

अर्थ–बाह्य आणि अभ्यंतर या भेदानें कृमि दोन प्रकारचे. आश्रयभेदानें (स्वेद वगैरे) बहिर्मलजन्य कृमि, रक्तजन्य कृमि, कफजन्य कृमि आणि विष्टाजन्य कृमि असे चार मिळवून कृमीचे मुख्य प्रकार सहा आहेत. इतर ग्रंथकारांनीं वीस प्रकारचे कृमि सांगितलें आहेत.

कर्मविपाक–जन्मसमयीं क्षीण असा अष्टस्थानापन्न चंद्र असेल तर विफल कृमियोग किंवा शत्रुग्रहींचा सूर्य असेल तर त्याचे दशेमध्यें नेत्ररोग, पांगळेपणा व कृमि रोग इत्यादि होतात.

परिहार–इंद्रमंत्राचा जप व तद्दानें, सूर्यमंत्राचा व जप तद्दानें इत्यादि पूर्वोक्त करावींत.

गलगंड

निबद्धः श्वयथुर्यस्य मुष्कवल्लंबते गले।
महान्वा यदिवा ऱ्हस्वो गलगंड तमादिशेत्॥

अर्थ–ज्याच्या गळचाला फार दिवस राहणारी अशी लहान अगर मोठी सूज येते तिला गलगंड असें म्हणतात.

कर्मविपाक–शुक्रदशेमध्यें अंतर्गत रवि अथवा सूर्यदशेमध्यें अंतर्गत शुक्र किंवा बुधाच्या दशेमध्यें अंतर्गत मंगळ असेल तर कलंगड, अपची, शिरोरोग, कुष्ठरोग, ज्वर, शूळ, अतिसार नेत्ररोग, उदररोग, राजापासून बंधन इत्यादि प्राप्त होतात.

परिहार–जो ग्रह अनिष्ट असेल त्याची दानें, जप, हवन इत्यादिक करावीं.

गुल्म (गोळा)

दुष्टा वातादयोत्यर्थं मिथ्याहार विहारत: ।
कुर्वंतिपंचधा गुल्मं कोष्टांतर्ग्रंथिरूपिणम् ।

अर्थ–अव्यवस्थित आहारविहारानें अति दुष्ट झालेले वातादिक दोष. कोष्ठांत पांच प्रकारचा ग्रंथिरूप गुल्म उत्पन्न करितात.

कर्मविपाक–जन्मसमयीं मध्यगत चंद्र अथवा सप्तमस्थानीं शनि असेल तर श्वास, क्षय, विद्राधि, गुल्मपीडा, इत्यादि रोग होतात.

परिहार–चंद्र व शनि यांचीं दानें, जप होम इत्यादि करावींत.

गंडमाळा

कर्कंधुकोलामलकप्रमाणै : कक्षांसमन्याग-लवंक्षणेषु ।
फाद : कमेभ्यां चिरमंदपाकै : स्याद्गंडमाला बहुभिस्तु गंडै : ।।

अर्थ–मेद आणि कफ यांपासून कांख, खांदे, मान, गळा आणि आडसंधी इतक्या ठिकाणी लहान बोराएवढ्या, मोठ्या बोराएवढ्या, आंवळ्याएवढ्या अशा अनेक गांठी येतात व त्या फार दिवसांनीं हळूंहळू पिकतात; त्या गांठींच्या ओळीला गंडमाळा असें म्हणतात.

कर्मविपाक–शुक्रदशेमध्यें अंतर्गत रवि अथवा सूर्यदशेमध्यें अंतर्गत शुक्र किंवा बुधाच्या दशेमध्यें अंतर्गत मंगळ असेल तर ग्रंथिरोग, गंडमाळा इत्यादि प्राप्त होतात.

परिहार–जो ग्रह अनिष्ट असेल त्यांची दानें, जप व हवन इत्यादि करावीं.

पूर्वकर्मविपाक–गुरुद्वेषी, दुसऱ्याचें मन विनाकारण दुखविणारा, प्रतारणापूर्वक विद्या शिकणारा किंवा शिकविणारा हे गंडमाळा व ग्रंथिरोग यांनीं युक्त होतात.

परिहार–चांद्रायण, पुरुषसूक्त जप, प्रायश्चित इत्यादि करावीं

अरोचक (अरुचि.)

प्रक्षिप्तं यन्मुखे नान्नं जंतोर्नस्वद्हते मुहु : ।
अरोचक : स विज्ञेयो भक्तद्वैषमत: शृणु ।।१।।

अर्थ–रोग्यानें तोंडात घातलेल्या अन्नाची रुचि त्यास न लागणें या रोगास अरोचक रोग म्हणावे.

कर्मविपाक–जन्मकाळीं तृतीय स्थानीं गुरु असतां मनुष्य लोकनिंदित, कृपण, बांधवयुक्त, स्त्रैण (जारकर्म करणारा) पापकर्म करणारा व अरोचक रोगानें पीडित असा होतो.

परिहार–बृहस्पतीचा जप, होम व दान करावें.

अश्मरी (मुतखडा.)

वातपित्तकफैस्तिस्त्राश्चतुर्थी शुक्रजा ऽ परा ।।
प्राय: श्लेष्माश्रय: सर्वा अश्मर्य: स्युर्यमो पमा: ।।

अर्थ– वात, पित्त, कफ व शुक्र या चारांपासून अश्मरी रोग(मुतखडा) होतो हा अश्मरी रोग बहुतकरून कफाश्रित असतो. " यमोपमा " म्हणजे यांची चांगली चिकित्सा न झाली तर हा अवश्य प्राण घेतो.

कर्मविपाक–जन्मकाळीं गुरुस्थानीं बुध असून त्याजवर रवीची दृष्टि असेल तर पुढें या प्राण्यास प्रमेह व अश्मरी रोग होतात.

परिहार–बुधाचीं दानें, जप व हवन इत्यादि करावीं.

वृषणवृद्धी व (अंतर्गल)

वृद्धय : सप्तगदिता वातात्पित्तात्कफेन च ।।
रक्तेन मेदसा मूत्रांदत्रवृद्धिश्च सप्तम: ।।

वृद्धिरोग–(वृषणवृद्धि) याचे प्रकार सात सांगितले आहेत. ते वातवृद्धि, पित्तवृद्धि, कफवृद्धि. रक्तवृद्धि, मेदोवृद्धि, मुत्रवृद्धि आणि सातवा अंत्रवृद्धि (अंतर्गल) या प्रमाणें होत.

कर्मविपाक–मीनलग्नीं रवि असून त्याजवर मंगळाची दृष्टि अथवा शुक्रयुक्त वृश्चिक लग्न अशा समयीं जन्म होईल, तर वृषणरोग, गुह्यरोग, स्त्री जारिणी, दरिद्री इत्यादि होतात.

परिहार–रवि व शुक्र, यांचीं दानें, जप होम इत्यादि करावीं.

आमवात (आमवायु.)

पित्तात्सदाहरागंच सशूलं पवनानुगम् ।
स्तौमित्यं गुरूकंडूं च कपदुष्टं तमादिशेत् ।।

अर्थ–आमवाताचे तीन प्रकार आहेत. पहिला पित्ताच्या प्रकोपानें होतो. त्यांत शरीराचा वर्ण तांबडा व दाह ही लक्षणें होतात. वायूच्या योगानें होणाऱ्या दुसऱ्या प्रकारांत शूल असतो व तिसरा कफप्रकोपानें होऊन त्यांत ओलसरपणा, जडत्व व कंडू ही लक्षणें असतात.

कर्मविपाक–जन्म लग्नापासून अष्टमस्थानीं गुरु असेल तर आमवात रोग होतो.

परिहार–बृहस्पतीचीं दानें, जप व हवन इत्यादि करावीं.

मुखरोग

दंतष्वष्टा ओष्ठयोश्च मूलेषु दश पंच च।
नव तालुनि जिव्हायां पंचसप्त दशामया :॥
कंठे त्रयः सर्वसरा एकषष्टि चतुः परे ॥ १ ॥

अर्थ– (मा. नि.) मनुष्याला तोंडासंबंधी होणारे एकंदर रोग, ६५ आहेत, ते असे :–– ८ दंतरोग, ८ औठरोग, १५ दंतमूलरोग, ९ तालूचे रोग, ५ जिभेसंबंधीं रोग, १७ कंठरोग व सर्व तोंडभर पसरणारे इ. मिळून पासष्ट रोग होतात.

कर्मविपाक– शुक्राच्या दशेंत, अंतर्गत सूर्य असतां मुखरोग होतो.

परिहार–सूर्याची दानें, जप व हवन इत्यादि करावीं.

मूत्रकृच्छ्ररोग (उन्हाळी)

व्यायामतीक्ष्णौषधरुक्षमहा प्रसंगनित्य द्रुतपृष्ठयानात्।
अनुपमत्साध्यशनादजीर्णात्स्युमुत्रकृच्छ्राणि नृण-
मिदाष्यै ॥

अर्थ–(मा. नि.) दररोज मध पिणें, आनुप (पुष्कळ पाणी व झाडी असलेल्या) देशांतील मृगपक्ष्यांचें मांस व मासे खाणें, रुक्ष, कच्चे पदार्थ भक्षण करणें, जेवणावर जेवळा, निरंतर शीध्र गतीच्या (घोडा वगैरे) यानांच्या पाठीवर बसून प्रवास करणें, अथवा व्यायाम किंवा तीक्ष्ण पदार्थांचे भक्षण या कारणामुळें मूत्रकृच्छरोग उत्पन्न होतो. याचे तिन्हीं दोषांपासून पृथक् होणारे तीन व सर्वदोष मिळून होणारा एक हे चार आणि शल्य, मल, शुक्र व अश्मरी या चार कारणांपासून स्वतंत्रपणें चार असें ८ प्रकार आहेत.

कर्मविपाक– जन्मसमयीं सप्तमस्थानीं शनि असून राहुची दृष्टि असेल तर मूत्रकृच्छ्र व मूत्राघात हे रोग होतात.

परिहार–शनीची दानें, जप व होम इत्यादि करावीं.

मूत्राघात

जावतकुशितैर्दोषैमूत्राघातास्त्रयोदश।
प्रायोमुत्रविघाताद्यैर्वात कुंडलिकादयः ।

अर्थ–(मा. नि.) मूत्रादिकांच्या (मल, मूत्र व शुक्र यांच्या) वेगाचा रोध केल्यामुळें वातादिक दोष कुपित होऊन पुढें सांगितलेलें तेरा प्रकारचे मूत्राघात होतात. त्यांचीं लक्षणें क्रमवार खालीं सांगितली आहेत.

कर्मविपाक–मूत्रकृच्छ्ररोगांत सांगितला आहे, व परिहारही त्याचप्रमाणें जाणावा.

मूळव्याध (अर्श)

दोषास्त्वङ् मांसमेदांसि संदूष्यविविधाकृतीन्।
मांसांकुरान पानादौ कुर्वत्यर्शांसि तान् जगुः॥

वातादि दोषांमुळे त्वचा, मांस, मेद व रक्त दूषित होऊन गुदद्वाराच्या जागी नाना प्रकारच्या आकृतींचे जें मोड उत्पन्न होतात त्यांस अर्श असे म्हणतात. अशा प्रकारचें मोड कधीं कधीं नाकांत व शिश्नावरहि उत्पन्न होतात. वात, पित्त व कफ यांमुळें तीन, तिन्हीं मिळून होणारा एक, रक्तजन्य एक आणि जन्मतःच असणारा एक मिळून एकंदर अर्श (मूळव्याध) रोगाचे सहा प्रकार सांगितलें आहेत. हे गुदद्वाराच्या तिन्ही वळयांवर उत्पन्न होतात.

कर्मविपाक–कर्कलग्नीं स्थित सूर्य असून त्याजवर शनीची दृष्टि अशा समयीं जन्म झाला असतां अर्शोरोगी, निर्दय, कुष्ठि व निर्लज्ज असा होतो.

परिहार–सूर्यमंत्रजप, तिलार्कसमिधा यांनीं हवन, गोप्रदान इत्यादि करावें.

मेदोरोग

अव्यायामदिवास्वप्नश्लेष्मलाहारसेविनः।
मधुरोन्नरसः प्रायः स्नेहान्मेदो विवर्धते ॥
मेदसावृतमार्गत्वात्पुष्यंत्यन्येन धातवः।
मेदस्तु चीयते यस्मादशक्तः सर्वकर्मसु ॥१॥
(मा. नि.)

अर्थ--व्यायाम न करणें, दिवसा झोप घेणें, कफकारक पदार्थ सेवन करणें वगैरे कारणांनीं मनुष्याच्या शरीरांतील मधुर अन्नरसापासून उत्पन्न झालेला स्निग्ध पदार्थ बहुतकरून मेद वाढवितो. मग त्या मेदामुळें दुसऱ्या सर्व धातूंचा मार्ग बंद होऊन त्या पुष्ट होत नाहींत व नुसता मेदच सांचून राहतो. असा रोग झालेला मनुष्य कोणतेहि काम करण्यास असमर्थ होतो.

कर्मविपाक–जन्मलग्नापासून द्वादशभुवनीं शुक्र असेल तर, आळस, शरीरांत मेदोवृद्धि, सुख, भ्रष्टपणा, मिष्टान्नभोजन, स्त्री परतंत्रपणा इत्यादि प्राप्त होतात.

परिहार–शुक्राची दानें, जप, हवन इत्यादि करावीं.

रक्तपित्त

रक्तपित्त त्रिधा प्रोक्तमूर्ध्वगं कफसंगतम् ।
अधोगं मारुताज्ज्ञेयं तद्व्ययेन द्विमार्गगम ॥

अर्थ– रक्तपित्त तीन प्रकारचें. एक ऊर्ध्वगामी व एक अधोगामी आणि एक दोहो मार्गांनी पडतें. त्यांत जे ऊर्ध्वगामीं मुखादिकांवाटें पडतें तें, कफसंबधानें अधोमार्गांनीं म्हणजे गुदादिकांवाटें पडतें तें, वातसंबंधानें आणि

दोहों मार्गांनीं पडतें तें व कफवायूच्या संबंधानें पडतें तें असें तीन प्रकारचें रक्तपित्त जाणावें.

कर्मविपाक– जो मनुष्य मद्यपान करितो त्याला रक्तपित्तरोग होतो.

परिहार– तुपाची घागर भरून त्याजबरोबर मधाचा अर्धा घट भरून हिरण्यदान द्यावें.

प्रकार २ रा–जन्मकाळीं चंद्राचे, क्षेत्रीं भौम असतो, तो रक्तपित्त व अर्श अशा व्याधि उत्पन्न करितो. अथवा चंद्रामध्यें भौम आला असतां रक्तपित्त, ज्वर, दाह व वायु यांचा उपद्रव होतो.

परिहार–मंगळाचा जप करावाआणि लाल बैलाचे दान करावें

तृष्णा (तहान शोष)

सोतस्वपांवाहिषु दूषितेषु दोषैश्व तृष्णा भवतीह जंतोः तिस्त्र स्मृतास्ता क्षतजा चतुर्थी क्षयात्तथाघ्याम समुद्भवाचं ॥१॥
भक्तोभ्दवा सप्तामिकेति तासांनिबोधलिंगान्यनुपूर्वराश्च।

अर्थ–तृष्णारोगाचे प्रकार सात सांगितले आहेत. वात, पित्त व कफ याचा तिन्हीं दोषांच्या प्रकोपापासून निरनिराळे होणारे तीन व क्षत, क्षय, आम व अन्न या प्रत्येकापासून होणारा एकेक असे चार मिळून सात प्रकार जाणावें. या सर्वांचीं लक्षणें व उपाय खालीं दिले आहेत.

कर्मविपाक– चंद्र सिंहस्थ असून त्या लग्नी जन्म झाला असतां दंतरोग, भस्मरोग व शोषरोग इत्यादि प्राप्त होतात.

परिहार– चंद्रपीडानिरसनार्थ चंद्राचा जप, होम दानादि विधान करावें

दाह

रक्तपित्तातथा रक्तातृष्णाया : पित्ततस्तथा ।
धातुक्षयान्मर्म–घाताद्रक्तपूर्णोदरादिपि ॥

अर्थ– देहाची आग होते त्याला दाह असें म्हणतात. तो रोग सात प्रकारचा आहे त्यांचीं लक्षणें व उपाय खालीं दिलें आहेत.

कर्मविपाक– जन्मकाळीं तनुस्थानीं मंगळ व चतुर्थस्थानीं रवि असतां दाहरोग होतो.

परहिार–रवि आणि मंगळ यांची दानें, होम, जप इ. करावीं.

पूर्वकर्मविपाक–अग्नीवर थुंकले असतां ज्वर, शूल, दाह, नेत्र पीतवर्ण इत्यादि रोग होतात.

परिहार–कपिल नामक ग्रहाच्या उद्देशानें **बलिदान करावें.**

नासारोग

अर्थ–नासारोग म्हणजे नाकांतले रोग अठरा प्रकारचें आहेत.

कर्मविपाक–शनि, मंगळ व रवि हें अनिष्टस्थानापन्न असून एक राशिस्थ असतां नासिकरोग, नाना व्याधि, शत्रुभीति इत्यादि होतात.

परिहार–त्या त्या ग्रहांची दानें, जप, होम इत्यादि करावीं.

पूर्वकर्मविपाक–विद्येनें दोषांचे संगोपन करणें, दुसऱ्याचे दोष काढणें, अनुष्ठानकालीं कुक्कुट, गर्दभ इत्यादिकांचें मैथुन पाहणें. इत्यादि कारणांनीं नासारोग उत्पन्न होतो.

परिहार–सुवर्णदान, कृच्छ्रप्रायश्चित्त, श्रीसूक्तजप इ. करावें.

नेत्ररोग

शिरानुसारिभिर्दोषै विगुणैरुर्ध्वमाश्रितै: ।
जायन्ते नेत्रभागेषु रोगा: परमदारूणः ॥

अर्थ–कुपित झालेले वातादिदोष डोळयांच्या शिरांत शिरून डोळयांचा भाग व्याप्त करितात. व त्यामुळें नेत्रांना भयंकर रोग होतात. हें नेत्ररोग वात, पित्त, कफ, रक्त, सन्निपात आणि आगांतुक यांपासून होणारे असें ७६ आहेत.

कर्मविपाक–रवि लग्नस्थ, मेषस्थ किंवा स्वगृहींचा अथवा चंद्रगृहींचा किंवा बारावा बुध, गुरु व रवि हें एक राशिस्थ असतां रातांधळे, काणत्व आणि दुसरे अनेक प्रकारचें नेत्ररोग होतात.

परिहार–त्या त्या ग्रहांची दानें, जप व होम इत्यादि करावींत.

पांडुरोग

पांडुरोगाश्च पंच स्युर्वातपित्त कफैस्त्रिधा।
त्रिदोषैमृत्तिकामिश्च तथैका कामला स्मृता ॥१॥

अर्थ–वात, पित्त व कफ या तीन दोषांच्या प्रकोपामुळें होणारे तीन (वातपांडु, पित्तपांडु व कफपांडु) तिन्ही दोष मिळून पांच प्रकारानें पांडुरोग होतो. पांडुरोगामध्यें कामला (कावीळ) नांवाचा एक रोग होतो. तो एक प्रकार आहे. त्याला कावीळ असें म्हणतात.

कर्मविपाक–अष्टमस्थानाप्रत शनि अथवा सिंहराशिस्थ चंद्र असेल तर तो बहिष्कृत, घातक, दुःखी, क्षयरोगी व पांडुरोगी असा होतो.

परिहार– शनि मंगळाचा जप, होमादिक दान करावें. चंद्रपीडा परिहारार्थ चंद्राचा जप, दान, हवन, इत्यादिक करावीं.

भगंदररोग

गुदस्य व्संगुले क्षेत्र पार्श्वतः पिडिकातिकृत् ।

भिन्न भगंदरो जयः सच पंचविधो गतः ।।

अर्थ–गुदद्वारापासून दोन बोटांवरच्या बाजूच्या जागेंत एक पुळी उत्पन्न होतें, तिला अतिशय ठणका असतो. तीच पुळी फुटून त्या ठिकाणीं जें छिद्र पडतें त्याला भगंदर असें म्हणतात. ह्याच तिन्ही दोषांमुळें पृथक् होणारे तीन, तिन्ही दोष मिळून होणारा एक व क्षतजन्य एक असें पांच प्रकार आहेत.

कर्मविपाक–अष्टमस्थानीं शनि व कर्कलग्नीं रवि असून त्यांजवर मंगळाची दृष्टि इत्यादि योग असतां बंधुविरोध, कपट, दुष्टपणा, भगंदर, कुष्ठ, कडू, क्षय, गजादि वाहनापासून भय इत्यादि प्राप्त होतात.

परिहार– जो ग्रह अनिष्ट असेल त्याचीं दानें, जप व होम करावीं.

मस्तकशूल (शिरोरोग)

शिरोरोगास्तु जायन्ते वातपित्तकफैस्तिभिः ।
सन्निपातेन रक्तेन क्षयेण कृमिभिस्तथा ।।
सूर्यावर्तानंततातार्धाव भेदकशंखकैः (मा. नि.)

अर्थ–शिरोरोग अथवा मस्तकशूल याचे प्रकार ११ आहेत. त्यांचीं नांवें व लक्षणें खाली दिलीं आहेत.

कर्मविपाक– सूर्याचें दशेंत शुक्र किंवा शुक्राचे दशेमध्यें चद्र अथवा चंद्राचे दशेमध्यें शुक्र किंवा बुधाच्या दशेंत मंगळाची अंतर्दशा असतां मस्तकरोग, कुष्ठरोग, गदरोग, शूलरोग इ. प्राप्त होतात.

परिहार–त्या त्या ग्रहांची दानें, जप, होम इत्यादि करावें.

शूलरोग (पोटशूळ)

शूलान्यष्टौ बुधा जगु :।।
पृथक्दोषौस्त्रिधा द्वंद्वभेदेन त्रिविधान्यपि ।।
आमेन सप्तमं प्राप्तं सन्निपातेन चाष्टमं ।।१।।

अर्थ–शलरोगाचे आठ प्रकार आहेत. त्या सर्वांत बहुत- करून वायूचेंच प्राधान्य असतें.

कर्मविपाक –जन्मलग्नापासून अष्टमस्थानीं चंद्र असून त्यावर मंगळाची दृष्टि पूर्ण आहे. अशा वेळेस अथवा सूर्यदशेमध्ये शुक्राची अंतर्दशा असल्यास जन्म झाला असतां पंगु, निर्मल प्रिय, दक्ष, शिरोरोगी, बाल-रोगी, कुष्ठरोगी, ज्वरयुक्त व शूलरोगी असा होतो.

परिहार–चंद्र व मंगळ, यांचीं दानें व जप इत्यादि करावीं.

श्वास (दमा)

श्वासाश्च पंच विज्ञेयाः क्षुद्रः स्थात्तमक स्तथा।
ऊर्ध्वश्वासो महाश्वासच्छिन्नश्वासश्च पंचमः ।।

श्वास रोग हा भयंकर आहे. ह्यांचे प्रकार पांच सांगितले आहेत. त्यांची लक्षणें खालीं सांगितली आहेत.

कर्मविपाक—कर्कराशिस्थ सूर्य असून बुधाची दृष्टि असेल तर नेत्ररोगी, कफवातरोगी आणि परद्रव्यापहारी विपरीतमति असा होतो.

परिहार–बुधदृष्ट सूर्य पीडा निरसनार्थ सूर्यमंत्राचा जप, दानें होम इ. पूर्वोक्त करावें.

श्लीपद (वारुळ)

श्लीपंदच त्रिधा प्रोक्तं वातात्पित्तात्कफादपि ।।

अर्थ–शाङ्गधराचार्यांनीं वातज, पित्तज, व कफज असे श्लीपद रोगाचे तीन प्रकार सांगितले आहेत. माधवांनीं मात्र सान्निपातिक म्हणून आणखी एक प्रकार सांगितला आहे.

कर्मविपाक–मंगळ, बुध व शुक्र हे तीन ग्रह एक राशिस्थ असून अनिष्ट असतां पंगुपणा, चंचलत्व, धीटपणा, मुखरोग, श्लीपदरोग इत्यादि करावीं.

शोथरोग (सूज)

शो रोगा नव स्मृताः ।
दोषैः पृथक् द्वयैः सर्वैरभिघाताद्विषादपि ।।

अर्थ–कारण– विशेषाने रूपभेदामुळें होणारे तीन, द्वंद्वज (दोन दोषांच्या योगानें) होणारे तीन, व सन्निपातजन्य एक मिळून सात व जखमेमुळें व विषामुळें होणारे दोन मिळून नऊ प्रकार जाणावेत.

कर्मविपाक-- (मा. नि.) नीचीचा गुरु असून त्याची दशा प्राप्त झाली असतां सूजरोग व कर्णरोग, हे प्राप्त होतात.

परिहार--बृहस्पतीचीं दानें, जप, होम इत्यादि करावीं.

संग्रहणी

ग्रहणी प्रंचधा मता ।
पृथक्दोषै : सन्निपातात्तथा चामेन पंचमी

अर्थ–संग्रहणीरोग पांच प्रकारची सांगितला आहे. ग्रहणी म्हणजे पित्तधरा (जठराग्नला धारण करणारी) सहावी कला होय. ती दुष्ट होऊन जो रोग होतो त्याला संग्रहणी म्हणतात. संग्रहणी व अतिसार ह्यांतील भेद असा = अन्न जीर्ण झाल्यावर आंवेनें युक्त किंवा आंवसहित असा मल पडतो तो आतिसार आणि अन्न अजीर्ण झाले असता आंव व अन्न यांनी युक्त असे ढाळ होतात अथवा पक्व मलाचे ढाळ होतात किंवा होत नाहींत व त्यांतील मळ एकाएकीं बद्ध होतो आणि शरीरांतील दोष जमून आठ पंधरा दिवसांनी ढाळ होऊ लागतात त्यांस संग्रहणी रोग म्हणतात.

कर्मविपाक–जन्मकाळीं सूर्य सप्तमस्थानीं आणि चंद्र अष्टमथास्नी किंवा क्षीण असा असेल तर शत्रू, आतुर, अग्निमांद्य रोगी, संग्रहणी रोगी, असा मनुष्य होतो.

परिहार–चंद्रमंत्राचा जप, तिल, आज्य (तूप) पलाश व समिधा यांचे हवन, शंखदान इत्यादि करावींत.

स्वरभेद

स्वरभेदा : षडेवस्युर्वातपित्तकफैस्नय : ।
मेदसा सन्निपातेन क्षयात्षष्ठ : प्रकीर्तित : ।।

स्वरभेदाचे प्रकार ६ आहेत, त्यांची लक्षणें खाली सांगितली आहेत.

कर्मविपाक–जन्मसमयीं वृश्चिक लग्नस्थ क्षीण चंद्र असेल तर कंठस्वरभंग रोज होतो.

परिहार–चंद्राचा जप, होम, दानें इत्यादि करावीं.

उरोग्रह व हृद्रोग

उरोग्रहस्तथा चेको हृद्रोगा : पंच कीर्तित : ।
वातादिभिल्यय : प्रोक्ताश्वतुर्थ : सन्निपातत : ।।
पंचम : कृमिसजाता

अर्थ– उराग्रेह–(ऊर ओढून घेतल्यासारखे होणें) हा एक प्रकारचा रोग आहे. हा हृद्रोगाचा भेद आहे. हृद्रोग पांच प्रकारचे आहेंत असें सांगितलें आहे.

कर्मविपाक–जन्मकाळीं चतुर्थस्थानीं शनि अथवा रवि असेल तर हृद्रोग, बंधुसौख्य, अर्थबुध्दि, बाल्यावस्थेंत व्याधि, पुत्रसुख, द्वेष, क्रोध, परस्त्रीसुख, कर्मठपणा इत्यादि प्राप्त होतात.

परिहार–शनि व रवि यांची दानें, जप, हवन इत्यादि करावीं.

राजयक्ष्मा अथवा क्षयरोग.

क्षया: पंचैव: विज्ञेयास्त्रिभिर्दोषैरअयश्व ते ।
चतुर्थ: सन्निपातेन पंचम: स्यादुर:क्षतात ।।

अर्थ–क्षयरोगाचे पांच प्रकार सांगितले आहेत. आर्यवैद्यक ग्रंथकारांपैकीं बहुतेकांनीं या रोगांस सर्व रोगांचा राजा असें मानलें आहे व म्हणूनच वाग्भटांनी याला राजयक्ष्मा असें नांव दिलें आहे.

कर्मविपाक– जन्मकाळीं दशमस्थानीं शनि, अथवा चंद्रक्षेणीं किंवा शुक्रक्षेणीं बुध असेल तर कुष्ठ, क्षयरोग, गजदिकांपासून भय व अनेक प्रकारचीं दु:खें इत्यादि होतात.

परिहार– बुधपीडा निरसनार्थ जप, होम, दानें इत्यादि करावीं.

वातरक्त–रक्तपिती–महारोग.

वाताधिक्येन पित्ताच्च कफाद्दोषत्रयेणच ।
रक्ताधिक्येन दोषाणा व्दंव्देनत्रिविध: स्मृत: ।।
वातरक्त तथाष्टध ।।

अर्थ–वातरक्त आठ प्रकारचें–वाताधिक, पित्ताधिक, कफाधिक, त्रिदोषाधिक, रक्ताचे आधिक्येंकरून होतें तें, रक्ताधिक व दोन्ही दोषांपासून होतें तें व्दंद्वज तीन प्रकारचें, मिळून आठ प्रकारचें वातरक्त सांगितलें आहे.

कर्मविपाक– जन्मकाळीं दशमस्थानीं मंगळ असून त्यावर शनीची दृष्टि असली तर तो **पुरुष** वातरक्त-रोगी होतो.

परिहार– शनिचीं व मंगळाचीं दानें व जप करावा.

वातरोग

अशीतिर्वातज्ञा रोगा: कथ्यते मुनिभाषिता: ।।
वातरोगाचे ऋषींनीं ८० प्रकार सांगितले आहेत; त्यांची लक्षणें व प्रकार खाली दिली आहेत.

कर्मविपाक– जन्मकाळीं, कर्कलग्नीं रवि व त्यावर शनीची दृष्टि अथवा शनीच्या अंतर्गत रवि किंवा शनि-वर मंगळाची दृष्टि असा योग असतां वातरोगीं, प्रवासी दुसऱ्याचें द्रव्य हरण करणारा व विपरीत कर्म करणारा असा होतो.

वांतिरोग (छर्दि)

छर्दय: सप्तधा मता: । त्रिभिर्दोषै: पृथक्तिरअ: कृतिभि सन्नितात: ।
घृणयाच तथा स्त्रीणां गर्भाधानाच्च जायते ।।
छर्दि अथवा वांति या रोगाचे प्रकार सात सांगितले आहेत. वात, पित्त, कफ या दोषांमुळें होणारे तीन, तिन्ही दोषांपासून होणारा एक, पोटांत कृत्री होऊन होणारा एक, चिकस येणारे पदार्थ पाहाणें व त्यांचा दुर्गंध घेणें, यांपासून होणारा एक आणि गरोदर स्त्रियांना डोहाळे लागून होणारा एक मिळून सात प्रकार आहेत. त्यांची लक्षणें खालीं दिलीं आहेत.

कर्मविपाक– जन्मसमयीं षष्ठमस्थानीं शुक्र किंवा बुध, शुक्र दक्षिणचंद्रानें दृष्ट असतां वांतिरोग होतो.

परिहार– बुध व शुक्रमंगाच, जप, दानें, होम, अश्व-दान, शैप्यधारण, इत्यादि करावें.

इतिहासांत ज्योतिषविद्येचें स्थान

लेखक : पु. ना. ओक

एम्. ए. एल्, एल्, बी.

(प्रसिद्ध इतिहास संशोधक व ज्योतिषि श्री. पु. ना. ओक, एम्. ए. एस् एल्. बी. यांनीं ताजमहल ही इस्लामी कबर नसून राजपूत राजवाडा होतां हें संशोधनपर पुस्तक लिहून इतिहास–संशोधनांत मोठीच क्रांति घडवून आणली आहे. यांचें दुसरें पुस्तक Some Blunders of Indian Hi torical Research म्हणावे. भारतीय इतिहास–संशोधनांतील कांहीं घोडचुका हें लवकरच प्रसिद्ध होत आहे. कुतुबमिनार हा सम्राट विक्रमादित्यानें बांधलेला ज्योतिषीय वेधस्तंभ कसा आहे व ज्या इस्लामी सुलतान-बादशहांचे नांवें ज्या मध्ययुगीन इमारती उभ्या आहेत त्या त्या इमारतींचें ते ते राजकर्ते निर्माते नसून विध्वंसक होत ही दोन मौलिक सत्यें प्रतिपादित करणारा श्री. ओकांचा लेख वाचकांस खचित मोलाचा वाटेल ––संपादक)

स्वतःच्या शौर्यानें किंवा क्रौर्यानें जगांत उलथापालथ घडवून आणणाऱ्या व्यक्ति कर्तृत्वान असाव्यात असा वरवर पहाणाऱ्यांस भास होतो. एवढेंच नव्हे तर स्वतः त्या त्या व्यक्ति अहमन्य कर्तृत्वामुळें ज्योतिषविद्येवर व भवितव्यतेवर विश्वास ठेंवणाऱ्या नसाव्यात असा बहुसंख्य लोकांचा समज असतो.

तसेंच मुसलमान व्यक्तींचा सुबत्तेमुळे ऐहिक धार्मिक बरकतीमुळे व पाश्चात्त्य व्यक्तींचा त्यांच्या नशीबावर विश्वास नसेल असें बरेंच जणांस वाटतें.

परंतु हे समज निराधार होत. भारतावर वारंवार हल्ले करून निर्घृण अत्याचार व कत्तली घडवून आणणाऱ्या यच्चयावत् सर्व इस्लामी हल्लेखोरांचा ज्योतिषांवर विश्वास होता एवढेंच नव्हे तर प्रत्येक महत्त्वाचे प्रसंगीं ते मुहूर्त व ग्रहपरिस्थिति पाहूनच पुढच्या उद्योगाला लागत ह्याबद्दल फारशी, अरबी, तुर्की व उर्दू भाषांत लिहिलेल्या सर्व इस्लामी बखरींत वारंवार उल्लेख आहेत.

तसेंच अमेरिका, इंग्लंड आदि बहुतेक पाश्चात्त्य देशांत ज्योतिषविषयक अनेक नियतकालिकें, भरपूर साहित्य व विविध ज्योतिषपद्धति अस्तित्वात आहेत.

भारतानेच जगभर अनेकवेळां दिग्विजय गाजवून धर्म-संस्कृति व विद्याप्रसारांतर्गत ज्योतिषविद्येचाहि प्रसार केला. ह्याचें एक ढळढळीत उदाहरण म्हणजे अरबस्तानांतील सध्या इस्लामियांचे म्हणून समजलें जाणारें परंतु पूर्वी वैदिक हिंदूचें प्रसिद्ध तीर्थयात्रास्थान मक्का गांवातील कांबा नामक मंदिर.

महमद पैगंबराचे १६५ वर्षें अगोदर झालेल्या जिह्म बिन्तोई नामक अरबी कवीने विक्रमादित्याने अरबस्तानवर उत्तमप्रकारे राज्य केल्याबद्दल त्या राजाची प्रशस्ति लिहिली आहे. त्यावरून काव्यांतील हल्लीं अस्तित्वांत असलेलें शिवलिंग स्थापून त्यावर काव्याचें मंदिर महाकालांस कुलदैवत मानणाऱ्या विक्रमादित्यानें बांधलें हें सिद्ध होतें.

त्या मंदिरांत असणाऱ्या ३६० मूर्तींत एक चंद्राची व एक शनीची होती. असे इस्लामी ज्ञानकोषांत नमूद आहे. ह्यावरून तेव्हां नवग्रह पूजा होत असें हा साहजिकच निष्कर्ष निघतो. 'अल्ला' म्हणजे 'देवी' म्हणून तो शब्दहि संस्कृत होय. एवढेंच नव्हे तर 'या अल्ला' हा शब्दप्रयोगहि संस्कृत होय हें 'या कुंदेंदुतुषार हार धवला' याउक्ती वरून पटेल. विक्रमादित्याचा प्रसिद्ध ज्योतिषि 'मिहिर' हा ही अबरस्तानांत गेला असावा कारण अरबी भाषेंत 'मिहिर' हा शब्द रूढ आहे. त्यावरूनच 'मिहिरून्नीसा' हा शब्द तयार झालेला आहे.

आपल्या प्राचीन वाङ्मयांत बाल्हिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या देशाचेंच प्रचलित नांव 'बल्ख' हें होय.

बल्ख–अरेबिया ह्या पूर्वापार भारतीय–विद्या–संस्कृतीच्या आगरांतूनच पुढे भारतीय अंमलाची सुव्यवस्था नष्ट झाल्यावर अंदाधुंदी माजून बाणासूर–भस्मासुरासमान अनेक कर्दनकाळांची मालिकाच्या मालिका बाहेर पडून त्यांनी हजार–बाराशे वर्षे भारतांत अत्याचारांचा व लुटालुटीचा हैदोस माजवला. इराक इराण–अफगाणिस्तान आदि देशांत असलेली भारतीय

राज्यें नष्ट होऊन भारताच्या सत्तेची व संस्कृतीची पीछेहाट होऊं लागली.

अशा अंदाधुंदीच्या १०००--१२०० वर्षांच्या दीर्घ-काळांतहि भारतीय ज्योतिषपरंपरेचा पगडा ह्या कर्दन-काळांचे मनावर पूर्णतया होता ह्याची साक्ष मध्ययुगीन मुस्लीम बखरींत पदोपदीं नोंदलेली आहे.

दिल्ली येथेंहि विक्रमाच्या वेळेपासून एक महान् ज्योतिषीय संशोधन केंद्र होतें. त्या वेधशाळेच्या केंद्रीय वेधस्तंभालाच सध्या ' कुतुबमीनार ' हे दिशाभूली नांव पडलें आहे. त्या स्तंभाच्या आवारास लागून असलेल्या वस्तीस आजतागायत चालू असलेलें ' मेहरोली ' हें नांव आहे. मेहरोली हा ' मिहिर+आवली ' ह्या शब्दाचा अपभ्रंश होय.

ह्या नांवावरून हें सिद्ध होतें की विक्रमादित्याचा प्रख्यात ज्योतिषि ' मिहिर ' हा तेथें राहात असें. त्याच्या वरूनच त्या वस्तीस तें नांव पडलें व तेथील घरांच्या आवलींत (म्हणजे ओळींत) त्याच्या इतर सहकाऱ्यांचीं घरें असली पाहिजेत हें 'आवली' या शब्दा·वरून स्पष्ट होतें.

आतां कुतुबमीनार' हा विक्रमाचा वेधस्तंभ कसा ? हा प्रश्न उभ्दवतो. त्याला अनेक प्रमाणें आहेत. अरबी भाषेंत 'कुतुब' म्हणजे 'उत्तरध्रुव' अन् 'मनार' म्हणजे 'स्तंभ' तेव्हांउत्तरध्रुवाचा (mogneleepole) वेध घेणार स्तंभ हा त्याचा अर्थ आहे. म्हणून या स्तंभाचें प्रवेशद्वारहि उत्तराभिमुख आहे.

कुतुबुद्दीन ऐबक सुलतानानें जेव्हां दिल्लीची त्या स्तंभाच्या भोवतीची तटबंदी भंग करून तो भाग जिंकला तेव्हां तेथील २७ नक्षत्रांचीं मंदिरें भग्न केल्याचें त्याने एका शिलालेखांत तेचथें एका कमानीवर नमूद केलें आहे. या २७ नक्षत्रांच्या मधोमध हा स्तंभ आहे. त्याचे-भोवती तळें असें व त्या तळ्यांतील पाण्यांत पडलेल्या ग्रहणाच्या आदि प्रतिबिंबावरून वेध घेण्याची एक पद्धत प्रचलित होती.

वर्तुळाकार (विक्रम) स्तंभास त्रिकोण आणि कोर अशा एकूण २७ घड्या आहेत. तसेंच पहिल्या मजल्याच्या छतापाशी प्रत्येक घडीवर एक या हिशेबानें २७ छिद्रें आहेत. या सर्वांवरून २७ या आकड्याचा या स्तंभाशीं घनिष्ट संबंध आहे हें स्पष्ट दिसतें. तसेंच सात ग्रहांचे (राहु-केतु ग्रह नसल्याने ते वगळून) सात मजले या स्तंभास सुरुवातीस असावेत असें दिसतें. कुतुबद्दीनने, कळसाचे एकदोन मजले छाटले. तेव्हां या स्तंभाचा निर्माता कुतुबुद्दीन समजला जाण्याऐवजी तो त्याचा विध्वसंक होता, हा माझा इतर मध्ययुगीन भवनांसंबंधीचा ऐतिहासिक शोध सिद्धांत येथेही तंतोतंत लागू होतो.

विध्वंस करून दमल्यावर 'हा स्तंभ कसला' म्हणून विचारतां 'हा कुतुब—मनार' म्हणजे उत्तरध्रुवाचा वेध घेण्याचा स्तंभ असें अरबी भाषेंत त्यास समजावून सांग-ण्यांत आले. तेव्हांपासून पुढें ६०० वर्षांच्या इस्लामी राज्यांत 'ज्योतिषीयस्तंभ=कुतुब मनार' असा त्याचा उल्लेख होऊं लागला. परंतु इतिहासकारांनी 'कुतुबुद्दीन' व कुतुब—मनार या शब्दांचे नकळत लग्न लावून 'कुतुबुद्दीनने उभारला तो कुतुबमीनार' असा त्याचा विनासायास समास केला ही भारतीय इतिहास- संशोध-नांतील एक घोडचूक होय.

विक्रमशक ख्रिस्तापूर्वीं ५८ वर्षे सुरू झाला. व विक्रमानेच प्रथम भारतीय संस्कृति, धर्म व विद्या अरब-स्तानांत सुरू केलें असें जिह्म् बिनतोई म्हणतो. त्या-वरून आजपासून २०२४ वर्षांपूर्वी अरबस्तानांत ज्योतिष-विद्येचा प्रसार विक्रमादित्याच्या अंमलाखाली मिहिराने करवला हें सिद्ध होतें. ह्या विद्येचा पगडा पुढेही एवढा होता कीं महंमद कासीम गझनी-घोरी-तैमूरलंग-हुमायून आदि सर्व कर्दनकाळ इस्लामी धर्माचे अनुयायी असून-सुद्धां ज्योतिषावर व भवितव्यावर अटळ विश्वास ठेव-णारे होते.

येथें ओघानेच हें सांगावेसें वाटतें कीं चुकूनमाकून भारतांत आलेल्या अरबी प्रवाशांनीं येथें भारतीय विद्यांचा अभ्यास करून त्या विद्या अरबस्तानांत पसर-वल्या हा समज भ्रममूलक आहे. प्रावश्यास गूढ वा खोल विद्या हस्तगत करण्यास लागणारा वेळ, बुध्दि, पैसा, स्वाथ्य हें कांहीं नसतें. शिवाय विद्या शिकून परत गेल्यावर आपल्या देशांत पसरवण्यास लागणारे अधिकार व सुखसोयीहि उपलब्ध नसतात. म्हणून अरबी प्रवाशांनी भारतीय विद्या स्वदेशांत पसरवल्या हें म्हणणें चूक आहे.

विक्रमादित्यासारख्या भारतीय सम्राटांचें राज्य अनेक शतकें अरबस्तानापर्यंतच्या सर्व प्रदेशावर अखंड व एक-छत्री राहिल्यानें व आपले प्राचीन राजे विद्येचे भोक्ते, निःपक्षपाती व प्रजाहितदक्ष असल्यानें त्यांनीच भारतीय विद्या अफगाणिस्तान, बलुचीस्तान, शिवस्तान, कुर्डिस्तान, तुरगस्तान (तुर्कस्थान), वाल्हिक (बल्ख), इरणम् (इराण), इराक व अरबस्तान आदि भागांत पसरवल्या.

त्या विद्यांत ज्योतिषशास्त्राचा प्रामुख्याने अंतर्भाव होता म्हणूनच त्या प्रदेशांतील सर्व व्यक्तींचा ह्या शास्त्रावर अटळ विश्वास आहे एवढेंच नव्हे तर ' ताजिक ' पध्दति 'अॅरेबियन न्यमरॉलाजी' (संख्या—ज्योतिष) आदि कांहीं प्राचीन भारतीय ज्योतिषप्रथा तेथें अजून मूळ धरून आहेत.

कुंडलीचें संशोधनात्मक-विवेचन

ज्योतिष विशारद, होरारत्न, न. प. महाजन-इंदापूर जि. पुणें

विषय मोठा पण जागेचें बंधन म्हणून शक्यतों थोडक्यांत अनुभवसिद्ध विवेचन देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

कुंडलींत बारा स्थानें आहेत. त्यांना दिलेल्या नांवांवरून प्रत्येक स्थानीं काय पहावयाचे तें स्पष्ट होतें. पण आजचे व्यवहार अनेकविध स्वरूपाचे झाले आहेत. ते कोणत्या स्थानावरून पाहावयाचें त्याचीहि माहिती अनेक पुस्तकांत दिली आहे. ती पुन्हां या छोटया लेखांत देऊन जागा आडवीत नाहीं. तिचा निर्णय खालीं दिलेल्या पद्धतीनें पाहिल्यास उत्तरें बिनचूक सांपडतील.

कुंडलीचें पहिलें स्थान–तनु शरीरबांधा कसा असेल, प्रकृति कशी राहील, स्वभाव कसा ? हे तर त्या स्थानावरून ठरवावयाचेच पण जीवन यशस्वी होईल किंवा नाहीं हेही या स्थानावरून ठरवलें पाहिजे. तसें ठरवितां येते. लग्नस्थान व लग्नेश शुभ संबंधींत शुभ योगांत असतील तर त्या कुंडलीचें जीवन यशस्वी होते. अनुभव पाहा. त्यांतील शुभाशुभ स्थितीवर यशस्वी जीवनाचा दर्जा अवलंबून राहील. असा लग्नेश व लग्नस्थान प्रत्येक स्थान अगर स्थानेश याच्याशीं जसे योग करील तशी त्या स्थानांचीं फळें मिळतील. उदा. नामदार बाळासाहेब देसाई यांचें कुंडलींत लग्नीं शुक्र असून भाग्यांत गुरु आहे. लग्नेश शनि पराक्रमांत गुरु ग्रहीं. या गुरूची लग्नावर पराक्रमांतील शनिवार व पंचमस्त लाभेश मंगळावर दृष्टि आहे. म्हणून त्यांचे जीवन यशस्वी झाले आहे. अगर कीर्तिचे वाटेकरी या योगामुळेंच ते झाले आहेत. पुढेंहि कर्तृत्वानें त्यांचा दर्जा वाढेल. शनि हा जसा लग्नेश तसा धनेशही आहे. तेव्हां आर्थिक बाबतीत त्यांची स्थिति चांगलीच राहील. ती टिकणारी आहे.

लग्नेश- लग्नस्थान, धनेश व धनस्थान निदान दोहो पैकीं एक म्हणजे स्थान व स्वामी शुभ स्थिति असून त्यांच्यांत शुभ योग होत असेल तर त्या कुंडलीची आर्थिक स्थिति चांगलीच व्हावयास पाहिजें. केव्हां सुधारेल वगैरे बाबी. ग्रहांचा वयदर्शक उदय काल, महादशा. परिभ्रमण पद्धतीने त्या स्थानाचे किंवा स्वामी ज्या रसलीं आहे व तद्दर्शक वर्षावरून ठरवितां येते. कुटुंब-सुखाचे हेंच स्थानदर्शक आहे. त्यावरून इतर संबंधीत ग्रह योगावरून त्याचे फळ वर्तविणें सोपे जाईल.

तिसरें स्थान–पराक्रम प्रसिद्ध–दर्जा–प्रवास भावंडे याचें द्योतक स्थान होय व तिसरें स्थानाचा अधिपति व ते स्थान शुभसंबंधींत असून त्याचा लग्नेशाशीं शुभ योग होईल तरी ती कुंडली पराक्रमी असून प्रसिद्धि पावणारी व आपणास लौकिक, दर्जा मिळविणारी आहे. असें निःसंशय समजावें. कै. नामदार, पंतप्रधान, भारतरत्न, लालबहादूर शास्त्री यांचे कुंडलींत तृतियेश तृतियस्थानांत स्वगृहीचा असून गुरुदृष्ट आहे. लग्नेश व लग्नस्तानाशी शुभसंबंधींत असल्याने त्यांना पराक्रमानें असामान्य दर्जा प्राप्त होऊन भारतातील प्रथम पुरुष बनविलें. जगांतहि महत्त्वाचें स्थान प्राप्त करून दिले. अद्वितीय तेजस्वीता गुरुदृष्ट शुक्रानें यांना प्राप्त करून दिली. लग्न स्थान व तृतियेश यांच्या शुभ संबंधाचे हें फळ होय.

चतुर्थस्तान--सुख–स्थावर–वाहनसौख्य अंतीमयश याचें द्योतक स्थान आहे. वर दर्शित केलेल्या नियमाप्रमाणें म्हणजे चतुर्थेश व चतुर्तस्थान शुभसंबंधीत असून त्याचा शुभस्थितींतील लग्नेशाशीं अगर लग्नस्थानाशी शुभ-संबंध येईल तर त्या कुंडलीस स्थावर प्राप्ति, वाहन सौख्य भेटून तिचा शेवटचा काळ यशाचा सुखाचा जाईल हे निःसंशय समजावे. माझे एक स्नेही श्रीमान् शिवलाल शेट लेंगरेकर--बारामती यांचे लग्न-कन्या असून तेथेंच चतुर्थेश गुरु आहे. त्यामुळें वरील सर्व गोष्टींचा सुखाचा लाभ यांना मिळाला असून अंतीम सुख भेटणार हे निश्चित् आहे. लग्न व लग्नेश शुभ स्तितींत असल्यानें स्वःताच्या कर्तृत्वानें घसरलेला जीवनाचा डाव त्यांनीं यशस्वी केला आहे.

पंचमस्थान--संतति विद्या--अचानक--धन लाभ याचें हे द्योतक स्थान आहे. ते स्थापन व पंचमेश शुभ संबंधींत असून त्याचा शुभसंबंधीत लग्नेशाशी किंवा लग्न स्थानाशी शुभसंबंध होत असेल तर त्यास संतना

प्राप्ति--विद्याप्राप्ति अचानक धनलाभही त्या कुंडलीस व्हावयास पाहिजे. हा धनलाभ लॉटरी--कोडें कॉंट्रक्टमधें झालेला दिसून येईल. त्याचा दर्जा कुंडलीतील इतर ग्रह स्थितीवर अवलंबून राहील. माझे स्नेही श्रीमान् नेमचंद हिराचंद--दौंड यांचें कुंडलींत--लग्नेश भाग्यांत गुरुदृष्ट लग्नावर गुरुदृष्टि पंचमांत गुरु व पंचमेश लाभात गुरुदृष्ट म्हणणे पंचमेश व लग्नेश-- व पंचसस्थान शुभसंबंधींत या ग्रहांत शुभयोग झालेला आहे त्यामुळें स्वतांच्या सराफी विद्येतील धंद्यांत ते निष्णात आहेत त्या बलावर त्यांनीं धंद्यांत हजारों रुपये कमविलें. संतति भरपूर वसद्वर्तनी आहे. यांना लॅाटरी अगर तत्सम बाबींत अनेकदां लाभ झाले आहेत.

षष्ठस्थान--रोग व शत्रुस्थान, षष्ठेश व षष्ठस्थान व लग्नेश व लग्नस्थान या पैकीं एकाशीं शुभस्थिती असून शुभयोग होईल तर ती कुंडली निरोगी राहील व तिला शत्रूचा उपद्रव फारसा होणार नाहीं. नोकर चाकर चांगले भेटतील. याचे उलट स्थिती असेल तर त्या-सारखी दुर्दैवी कुंडली दुसरी नाहीं असे समजावे. माझे बंधु रिटायर्ड फौजदार यांचे लग्न-वृश्चिकलग्नेश व षष्ठेष, मंगळ चतुर्थांत तेथेच कुंभेचा शनि. या विरुद्ध गुणधर्मांच्या ग्रहाची युति सुखांत यामुळें वयाचें ४२ वें वर्ष उगवताच फिट विकारानें आजारी झाले. आज अठरा-वर्षें झाली नशिबाचे ओषध एक दिवस चुकलें नाहीं. आतां ब्लडप्रेशरमुळे हार्टचे झटके सुरू आहेत. शरीर आस्थि-पंजर, मात्र उच्च गुरुची लग्नावर दृष्टि यामुळें तशाही रोगास तोंड देत जीवन चालू. या युतीनें सर्वस्वास पारखें केलें. हा प्रभाव या कुयोगाचा होय.

सप्तथान--विवाह-कोर्टदरबार--भागीदारी दुय्यम व्यापाराचे द्योतक स्थान होय. सप्तमेश व सप्तस्थान शुभ-संबंधींत असून त्याच्या लग्नेश व लग्नास्थानाशीं शुभ-संबंधींत असतांना शुभ योग होईल. त्याचे वैवाहिक जीवन अत्यंत सुखाचे होईल. पत्नी मनासारखी असून संसारदक्ष असेल, मिळवती पत्नी त्यास भेटेल. कोर्ट-दरबार, भागीदारी व दुय्यम धंद्यांत त्यांना यश, लाभ होईल. माझे जामांत भ. न. कुलकर्णी यांचें कुंडलींत लग्नीं तुळेचा शुक्र शनिसह उच्चीचा आहे. सप्तमेश लाभांत मंगळ, तो धनेच्या गुरूनें तृतियांतून दृष्ट आहे. लग्नेश सप्तमेश शुभयोगांत कुंडली चांगली पण सामान्य स्थितींतील. कुंडलींतील आरोह अवरोह पद्धतीमुळें प्रभाव कमी पडला. पण शनीने ३६वें वर्षीच विशेषत्व दाखवून पत्नीस कार्यक्षम केलें. नोकरी भेटून संसार सामान्य स्थितीत सुखाचा झाला आहे. पुढेंही दर्जा वाढत जाणार आहे.

अष्टमस्थान-- मृत्यु व अचानक धनाचें स्थान नियमाप्रमाणें अष्टमेश व अष्टमस्थान शुभसंबंधींत असून त्याचा लग्नेशाशीं अगर शुभस्थितींत असलेल्या लग्नस्थानाशीं होईल. तर त्या कुंडलींस भरपूर आयुष्य भेटून शरीरसुखाचा लाभ चांगला व्हावा. आयुष्यांत पत्नीकडून अगर वारसाहक्कानें धन-लाभ निश्चित् पदरी पडेल. माझ्या स्वतःच्या कुंडलींत लग्नेश बुध अष्टमांत असून तेथेंच शनि बुधाच्या अंश-तुल्य युतींत मकरेचा आहे. ही युति शेवटल्या अंशांत आहे. लग्नस्थाशी मात्र गुरु, चंद्र, रवि शुभयोग करतात. ही बुध-शनि युति मारक न होता तारक ठरली माझे वय ६१ वर्षांचे आहे. एकच मोठा आजार वयाचे १८ वें वर्षी घडला. तेथून आजारीपण नाहीं. कार्यक्षमतां चांगली. आष्टमांतील शनि हा दीर्घायुष्य देतो हें खरें. पत्नीकडून अचानक धनलाभ झाला आहे. पण यशस्वी जीवन कुंडलीनें दिलें नाहीं. हा पंचमांतून या युतीस पाहतो. केंद्रयोग करतो त्याचा प्रभाव आहे.

नवमस्थान--दैव--भाग्य--तीर्थयात्रा व धर्म यांचें स्थान. चिंता व अडिअडचणी या स्थानाचे प्रभावें दूर होतात. संचिताचा ठेवा हे स्थान होय. या स्थानांचा अधिपति व हें स्थान शुभसंबंधींत असून त्याचा लग्नेश व लग्नस्थान यांच्याशीं शुभयोग शुभसंबंध होईल, ती कुंडली भाग्यवानाची समजावी. इच्छील ते त्यांस भेटावें. मनोगत कल्पवृक्षाची फळें भेटविणारा हा योग समजावा. त्याचें इच्छित मनोरथ पूर्ण व्हावयास पाहिजेत.

महाराष्ट्र कवि यशवंत यांचे कुडलींत भाग्येश पराक्रमांत आहे. लग्नेश लाभांत असून त्याच्याशीं शुभत्रिकोण होत आहे मकर लग्नांत चंद्र, शुक्र हे दोन शुभग्रह आहेत. व त्याचा भाग्येश बुध व लग्नेश शनिशीं शुभयोग झाला आहे. अर्थात ही भाग्यवानाची कुंडली आहे. म्हणून महाराष्ट्रांत प्रथम श्रेष्ठ कवीचा मान मिळाला इतकेच नाहीं तर द्रव्य चिंता वाढताच त्यांना महराष्ट्र सरकारकडून चारशें रुपये व गुजरात सरकारकडून शंभर असें पांचशें रुपये पेन्शन मिळाले. आणि हा लाभ तृतीय स्थानाच्या द्योतक वर्ष ६३ या वर्षी बुध तेथें अकल्पित भेटला. मनोगत कल्पवृक्षानें त्याचें हें मनोरथ पूर्ण केलें.

दशमस्थान--उद्योग मानसन्मान--अधिकार यांचें दर्शक-स्थान. या स्थानास कर्म हें नांव योग्य शोभते. जीव-नाचा केंद्रबिंदुदर्शक हें स्थान होय, हें स्थान शुभदृष्ट शुभसंबंधींत असून दशमेश तसा असेल आणि त्यांचा लग्नेश किंवा लग्नस्थान शुभसंबंधींत असून शुभसंबंध,

शुभयोग असेल तर त्या कुंडलीत व्यवसाय मग तो व्यापार शेती अगर नोकरी कोणताहि असला तरी त्यांत उन्नत्ति यश लाभून त्यांना मानसन्मान भेटेल. इतर ग्रहस्थितीवर त्याचा दर्जा अवलंबून राहील विशेष उच्चपदावर नेणारे हे स्थान आहे. सर्व कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रिये यांना कामास गुंतविणारें हें स्थान आहें. म्हणून जशी शरीर गांवगाडयाचीं यंत्रे फिरतील तसा अधिकार मानसन्मान कुंडलीत भेटतो. नामदार यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्रि यांना सामन्यातून असामान्य या स्थानानें बनविलें आहे. त्यांचे कुंडलीचें लग्न सिंह लग्नेश सप्तमांत आहे. दशमेश भाग्यांत चंद्र युत आहे. लग्नावर व भाग्यावर दशमेशावर पंचमांतील स्वगृहीच्या गुरुची दृष्टि आहे. त्या चौकटींत शुभयोग झाले आहेत. दशमांत शनि मित्रगृहीं असून स्वनवांशांत आहे. शनि ज्या स्थानी असेल त्याची वृद्धि करतो. शनीने पोषक घटना घडविल्या. म्हणून या कुंडलीस असामान्यत्व प्राप्त होऊन खूप मानसन्मान अधिकार दिला. जनतेचा कारक चंद्र दशमेश युत शुभसंबंधींत व दृष्टीत म्हणून जनसेवेच्या उद्योगांत हे यशस्वी झाले. आज भारताच्या मुगुटांत तेजस्वी हिऱ्याप्रमाणें चमकत आहेत. पुढेहि त्यांच्या यशाची चढती कमान सुरू राहील.

अकरावें स्थान सर्वप्रकारचे लाभ, वैभव, कीर्ति याचें द्योतक स्थान. लाभ स्थान व लाभेश यांची शुभ स्थिति असून त्याचा लग्नेश व लग्नस्थानाशीं शुभसंबंध होईल तर त्या कुंडलीचें पदरांत इच्छित लाभ पडून तिला वैभव प्राप्त होऊन चांगली कीर्ति, नांव अजरामर होईल असा नांवलौकिक भेटला पाहिजे.

माझे स्नेही कै. अण्णासाहेब आवटे यांचें कुंडलींत लग्नांत शुभग्रह, लग्नावर लाभेश गुरूची दृष्टि लाभांत भाग्येश शुक्र म्हणजे लाभस्थान शुभयुत लग्नेश शनि गुरूगृहीं अशा या चौकडीच्या शुभस्थितीमुळें या कुंडलीस विशेष लाभ पदरी पडून वैभव भेटले कीर्ति मिळाली. आज मरणोतर त्यांचे नांवें मंचर येथे कॉलेज सुरू झाले आहे. यावरून या ग्रहस्थितीची कल्पना कशी करावयाची हें ध्यानीं येईल.

बारावें स्थान व्यय म्हणजे खर्च, देहदंड मोक्ष वगैरेचे द्योतक स्थान. व्ययस्थान व व्ययेश शुभसंबंधीत शुभ योगात असून त्याचा लग्न स्थान व लग्नेश यांच्याशीं शुभसंबंध शुभयोग होईल तर त्यांचे हातून परोपकारांत द्रव्यखर्च कीर्तिसाठी देहदंड, पारमार्थिक कार्यात आपला बराच वेळ खर्च करतील व त्यामार्गे त्यास समाधान भेटेल. इंदापूरचे नगरशेट नारायणदास रामदास यांचे लग्न वृश्चिक. लग्नेश मंगळ अष्टमांत स्वगृहींच्या धनस्थानांतील गुरूनें दृष्ट आहे. व्ययेश शुक्र दशमांत गुरू दृष्ट आहे. शुक्र मंगळांत शुभयोग झाला आहे. यामुळें यांचे हातून परोपकारांत धनखर्च होऊन नांवलौकीक व्हावा हे ठिकाण होते. म्हणून देहदंड कीर्तिसाठी झाला. हे वारकरी असून ती पथ्यें काटेकोर पाळतात. म्हणून परमार्थाचे मार्गास या ग्रहस्थितीने लाविले. त्यांच्या परोपकाराचें दर्शन नारायणदास रामदास हायस्कूल इंदापुरांत आहे.

फलादेश कसा करावा ?

लेखक : **बाळकृष्ण ग. जोशी, पुणें**

कोणतीहि सामान्य व्यक्ति ज्यावेळीं एखाद्या ज्योतिषाकडे जाते तेव्हां तिची एकच अपेक्षा असते ती म्हणजे आपले भविष्य काय आहे ? किंबहुना ज्या अडचणी आहेत त्यातून मार्ग कसा काढायचा ? किंवा कांही अडचणी येणार आहेत काय ? ज्योतिषाकडून याबाबत त्या व्यक्तीला अचूक मार्गदर्शन हवें असते.

ज्योतिषी गणिताच्या साहाय्याने ग्रहांची स्थिती काढून त्याबाबत मार्गदर्शन करूहि शकतो. परंतु प्रत्येक वेळी तो गणिताचाच आधार घेतो असे मुळीच नाही. अशावेळी किंबहुना गणिताचा आधार घेण्यापूर्वी ज्योतिष्याला इतरहि शास्त्राची ओळख असणे अगत्याचे आहे. तरच त्याचे भविष्य जास्तीत जास्त बरोबर ठरेल.

एखादी पत्रिका हातांत घेतल्यानंतर ती व्यक्ति कोणत्या प्रदेशात जन्माला आली यावरून त्या व्यक्तीचा रंग, बांधा आदिबाबत माहिती सांगता येईल. विषुववृत्तापासून दूर जन्मलेली व्यक्ति ही गोरी असणार. प्रकृतीवरहि परिणाम होत असल्याने भूगोलाची माहिती ज्योतिष्याला असणे अगत्याचे आहे.

दक्षिण हिंदुस्थानांतील लोक शामल वर्णी असतात. याचा अर्थ असा नव्हे की त्या प्रत्येकांच्या कुंडलीत लग्नस्थानी मंगळ, रवि किंवा शुक्र असलाच पाहिजे किंवा मध्य भारतांतील निमगोऱ्या लोकांच्या वा उत्तर भारतांतील गौरवर्णी लोकांच्या पत्रिकेंत लग्नी गुरु, चंद्र किंवा शनि वा बुध असतीलच असे नव्हे.

जी गोष्ट भूगोलाची तीच इतिहासाची. ज्याची पत्रिका हातांत आहे ती व्यक्ति कोणत्या परंपरेत वाढली हे पाहणे आवश्यक आहे. मराठ्यांचा, रजपुतांचा, पंजाब्यांचा इतिहास शौर्य, मुत्सद्दीपणा, धाडस यांनी युक्त आहे. साहजिकच या भागांतील व्यक्तीचे भवितव्य त्यांच्या इतिहासाशी सुसंगतच घडणार. गुजराथमधल्या वा मारवाडांतील सर्व व्यक्तींच्या पत्रिकेत व्यापाऱ्याला पोषक असेच ग्रह असतील असे मुळीच नाही. तरी त्या व्यक्ती बहुतांशी व्यापारांतच पडताना आढळतात.

या परंपरेला अनुसरूनच संस्कृति निर्माण होते. म्हणजे गुजराथमधील एखाद्या व्यक्तीची पत्रिका हाती घेतली तर व्यापारांतील उलाढालीच्या अनुरोधानेच त्याचे जीवनमान विशद केले पाहिजे. हिंदुस्थानांतील एकाद्या व्यक्तीची कुंडली हाती घेतली तर त्यांचे विश्लेषण त्या अनुरोधानेच होणे अगत्याचे आहे. मग कुंडलीतील ग्रह त्या त्या ठिकाणी असोत. हिंदुस्थानातील व्यक्ति धर्मसहिष्णु असेल तर इंग्लंडमधील सनातनी, शिस्तप्रिय व मुत्सद्दी असेल. जर्मनीतील संशोधक वृत्तीची, उद्योगप्रिय असेल तर जपानमधील अत्यंत धार्मिक, अगत्यशील, कष्टाळू, निरोपयोगी वस्तूतून जीवनोपयोगी वस्तु निर्माण करण्याकडे कल असलेल्या असतील.

याच संस्कृतीतून न्यायशास्त्राचा जन्म होतो. कूळकायदा, द्विभार्या प्रतिबंधक निर्बंध, सुवर्ण नियंत्रण ही त्याची चालतीबोलतीं उदाहरणे आहेत. चतुर्थात मंगळ असला तर त्याला पूर्वीच्या निर्बंधानुसार जमीन जुमला असला पाहिजे, पण आजच्या परिस्थितीत ते कसे शक्य आहे ? पूर्वी बहुपत्नी निर्बंध होता तेव्हां अनेक स्त्रियांशी विवाह संबंध होऊं शकत होता. पण आज सप्तमात शुक्र, चंद्र, मंगळ असूनहि तो एकपत्नीच राहणार !

या निर्बंधानुसार समाजाचे परिवर्तन होवू लागते. पूर्वी कितीहि मुले झाली तरी त्याबाबत काहीं निर्बंध नव्हते. पण आता कुटुंबनियोजनामुळें त्याला आळा बसून समाजात अल्पसंततीकडेच लोकांचा कल वळू लागला. अशा स्थितीत पंचमांत असलेला शुक्र, चंद्र पुष्कळ संतती देईल हे विधान करणे धाष्टर्याचे ठरेल. लग्नाकरिता वयाची अट, पुनर्विवाह, घटस्फोट या निर्बंधांमुळें पत्रिकेचे विश्लेषण सावधपणे केले पाहिज.

समाजाच्या दृष्टिकोनानुसार प्रचलित राजकारणहि बदलत असतें. त्याचाहि पत्रिका पाहताना विचार होणे अगत्याचे आहे. कारण एखाद्याच्या पत्रिकेत बुध, गुरु वा रवि उच्चीचे आहेत म्हणून तो बुद्धिवादाच्या जोरावर आपली छाप पाडू शकेल असे मुळीच नाही. दशमेश बुध षष्ठस्थानी रविने युक्त, नि सप्तमात केंद्री मिथुनेचा गुरु असूनहि वीर सावरकरांच्या ज्ञानाचा उपयोग देशानें काय करून घेतला ? आणि त्यामुळे ते उपेक्षित ठरले. डॉ. चिंतामणराव देशमुख, धनंजयराव गाडगीळ आदि कितीतरी उदाहरणे देता येतील.

राजकारणाच्या घडामोडीवरच अर्थशास्त्र अवलंबून असते. नि अर्थशास्त्रावरच व्यक्तीचे जीवन अवलंबून असते. हिंदुस्थानांत काही दिवसापूर्वी उद्योगधंद्याच्या विकासाकडें अधिक लक्ष दिले जात होते. त्यामुळे संरक्षण व शेतकीकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे दुधांत व अन्न आघाडीत पराभव पत्करावा लागला. पण नंतर 'जय जवान जय किसान'ची घोषणा होऊन अर्थशास्त्रातहि उलथापालथ झाली. या पार्श्वभूमीवर जर एखाद्याला नवीन उद्योगधंदा सुरू करायचा असेल तर त्याच्या पत्रिकेत दशमांत कितीहि प्रभावी ग्रह असले तरी उद्योगधंद्यांत त्याला यश येईल असें म्हणता येणार नाही.

हे अर्थशास्त्राचे धोरण व्यापारालाहि तारक मारक ठरते. आणि म्हणून दशमांत रवि, गुरु असूनसुद्धां व्यापार तेजीत चालणार नाही. तोच दशमात शनि, मंगळ, राहू असणाऱ्या लोकांना हा काळ उत्कर्षाचा जाईल.

या अर्थशास्त्रावरून आपण संख्याशास्त्राप्रमाणे विचार केला तर देशांतील काही भागांत प्रगति तर काही बाबतीत अधोगति झाल्याचे दिसेल. अर्थात याचा परिणाम व्यक्तीच्या जीवनावर घडणे अपरिहार्यच आहे. म्हणून एखाद्याच्या पत्रिकेत शनि, गुरु, मंगळ, रवि प्रभावी असूनहि त्या व्यक्ति आर्थिक कुंचबण्याच्या खाईत होरपळून असल्याचे दिसून येईल.

या सर्व घडामोडीचा शिक्षणावर परिणाम होतोच. म्हणून पंचमात शनि, मंगळ, शुक्र; बुध हे असूनहि संपादित केलेली विद्या फलद्रुप होईल असे म्हणता येणार नाही. या शिक्षणाचा जीवनाला कितपत उपयोग होईल यावरच पुढे त्याच्या जीवनाचे ध्येय ठरत असते. म्हणजेच त्याचे स्वतःचे तत्त्वज्ञान बनते.

जीवनांत येणाऱ्या निराशेमुळे माणसाचा ओढा अध्यात्माकडे वळतो ! शिक्षण घेऊनहि उपयोग नाही. त्यापेक्षा काळाबाजार केला तर काय वाईट ? लांचलुचपत, बनवाबनवी केली तर कुठे बिघडले अशी साहजिकच भावना निर्माण होते. मग त्याच्या पत्रिकेत शुक्र, शनि, राहू दशमांत असले पाहिजेतच असे नव्हे.

पण या परिस्थितीचे आव्हान न स्वीकारता सद्प्रवृत्ती असलेला माणूस आपोआपच अध्यात्माकडे खेचला जातो. याचा अर्थ असा नव्हे की त्याच्या पत्रिकेत व्ययस्थानी रवि, गुरु, केतु किंवा चंद्र आहे.

थोडक्यांत अशा या परिस्थितीत वाढलेली एखादी व्यक्ति प्रयत्नवादी बनते किंवा दैववादी बनते. याचाच अर्थ ती आपल्या जीवनाची सोडवणूक कशी करता येईल याचा विचार करू लागते. त्याकरिता ती आपल्या मार्गासंबंधाने काही आराखडे मनांत काढूं लागतें. यालाच तर्कशास्त्र म्हणता येईल. जो मार्ग तो चोखाळूं इच्छितो त्यावरच त्याचे आरोग्य अवलंबून असते.

रवि नियमितपणा, सचोटी दर्शवितो तर मंगळ सामर्थ्य, जीवनशक्ति यांना पूरक ठरतो. शुक्र कुटिलता निर्माण करील तर शनि सत्तेचा समतोलपणा ठेवील; मग ते ग्रह स्थानबली असोत वा राशिबली असोत किंबहुना नसले तरी ती व्यक्ति उच्चपदीं जाऊ शकते.

देशाच्या काय किंवा व्यक्तीच्या काय परिस्थितीवरच त्या देशाची वा व्यक्तीची वैज्ञानिक दृष्टि अवलंबून राहील. मग पंचमांत बुध, शुक्र, मंगळ, राहू असलेच पाहिजेत असे नव्हे.

या विज्ञानाचा कलेवर व साहित्याबर परिणाम होऊन ते अधिक प्रगत वा विकसित होतें. म्हणजे व्यक्तीचे जीवन विकसित होऊं लागतें. त्याचा परिणाम व्यक्तीच्या नित्यनैमित्तिक व्यवहारावर अपरिहार्यपणे होतोच.

या सर्व गोष्टींचे थोडक्यांत विवेचन करण्याचे कारण इतकेच कीं, अनेक ज्योतिषी एकादी कुंडली हातांत घेतली की कुंडलीतील ग्रह पाहून ताडताड् ब्रह्मदेवाचा आव आणून ज्याची कुंडली असेल त्या व्यक्तीची माहिती वा पूर्वपीठिका बनवित असतात आणि बऱ्याच वेळां केवळ त्या ग्रहांच्या स्थानावरून केलेल्या विवेचनात नि प्रत्यक्ष परिस्थितीत खूपच अंतर असल्याचे दिसून येते. यामुळेच हा हास्याचा वा टवाळीचा विषय होतो. म्हणूनच कालमान परिस्थिती पाहून भविष्य वर्तवावें असे जे आपले शास्त्र सांगते ते याकरितांच. केवळ एकादी व्यक्ति ज्योतिषांत गणिततज्ज्ञ आहे फार काय ज्योतिषशास्त्राचा सखोल अभ्यास केला आहे एवढ्यावरून त्या व्यक्तीला अचूक फलनिर्णय सांगता येईल असे मानता येणार नाहीं. अनेक ज्योतिषतज्ज्ञ व्यक्ति फला देशांत अयशस्वी असल्याचे दिसून येईल, तर ज्योतिषाचे सामान्य ज्ञान असूनहि ती व्यक्ति फलादेश अचूक करीत असल्याचेहि दिसतें.

आजकाल लोकांना तुमच्या शास्त्रीय ज्ञानापेक्षा फलादेशाची आवश्यकता जास्त वाटतें आणि म्हणूनच प्रत्येक ज्योतिष्यानें आपला ज्योतिषशास्त्राचा पाया पक्का करून वर अुल्लेखिलेल्या गोष्टींच्या अनुरोधानें भविष्यकथन केल्यास ते कदापि चुकणे शक्य नाहीं असा विश्वास आहे. केवळ शास्त्राधारे केलेले भविष्य पोपटपंची ठरेल तर शास्त्र सोडून वर अुल्लेखिलेल्या गोष्टींच्या अनुरोधानें केलेले भविष्य योगायोग ठरेल. आणि दोन्हीं बाबतीत अचूक सत्यभविष्याचा भाग मात्र नगण्य असणार.

दशमस्थान व उद्योगक्षेत्र

लेखक : न. प. महाजन,
ज्योतिष-विशारद

शनिसारखा दाता नाहीं शनिसारखा हंता नाहीं असे म्हटलें जाते तें शास्त्रदृष्टया अगदीं खरें आहे. त्याचें प्रत्यंतर पदोपदी पहावयास मिळते. नैसर्गिकदृष्टया विचार केला तर शनि दशमस्थान व अकरावे स्थानचा स्वामी आहे. या दोन कुंडलीतील महत्वाच्या स्थानाचा कारक शनि आहे. कर्म म्हणजे उद्योग आणि लाभ पदरी पाडून देणे हे शनिमहाराजांचे काम आहे. अर्थात कुंडलींतील शनीच्या स्थितीवर उद्योग आणि निरोद्योग, लाभ आणि हानी यांची स्थिती अवलंबून राहवयास पाहिजे. या दोन्हीहि बाबी कुंडलींत प्रतिकूल असतील तर ह्या कुंडलीचें जीवन निरर्थक होय.

अर्थात धंद्याचा विचार करिता लग्नकुंडलींतील शनीची स्थिती विचारांत प्रथम घ्यावयास पाहिजे.


नंतर नैसर्गिकरित्या लग्नस्थानचा कारक मंगळ आहे. तो शनिच्या शुभयोगांत शुभसंबधींत हवा तशी स्थिति कुंडलींत असेल तर त्याचा धंदा–रोजगार चांगला चालला पाहिजे. नंतरच चालू लग्नकुंडलीतील स्थिति व त्याचे शनि मंगळाशी झालेले योग लक्षांत घेऊन वर्तविलेले धंद्याबाबतचे भविष्य अचूक ठरेल.

अगदी गरीबींतून कोटयाधीश झालेली कुंडली खाली देत आहे. त्याचे विवेचनावरून माझे हे म्हणणें आगदी बरोबर आहे हे तुमचे ध्यानीं येईल. ही कुंडली थोर महाभाग दानशूर कारखानदार कै. अनंत शिवाजी देसाई टोपीवालें मुंबई यांची आहे.

रावबहादूर कै. अ. शि. देसाई हे अत्यंत गरीब स्थितींत वयाचे १२ वे वर्षी वडील वारल्यानें मुंबईस आले. प्रथम ६-७ वर्षे नोकरी करून तुटपुंज्या भांडवलावर टोपीविक्र्याचा धंदा सुरू केला व पुढें अनेक धंदे

जन्म – तारीख १७–१०–१८५३ दिवसा ३ वाजून २० मिनिटें.

लग्न–कुंडली



करून अल्युमिनियमचे कारखानदार बनून कोटयाधीश झाले. अनेक ठिकाणीं लाखानीं धर्मादाय केला. अनेक घरें, वाडया मालकीच्या केल्या. सरकार दरबारी मान मिळवून रावबहादूर झाले. अशी ही असामान्य कुंडली आहे. धंद्यांत नेहमीच यश मिळत गेले. दानशूर म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे. तेव्हां व्यापारधंद्यांत त्यांना एवढें यश, श्रेष्ठत्व कां मिळाले त्याचे विवेचन असे.

नैसर्गिकदृष्टया उद्योगधंद्याचा कारक शनि हा चतुर्थस्थानीं वृषभेंत असून नवमांशांत बलि आहे. कुंभ नवांशांत आहे. लग्नहि कुंभ नवांशांत आहे. हा एकच योग धंद्यांत यांना श्रेष्ठत्व मिळणार हें दर्शित करतो. शनीची दशमावर दृष्टि म्हणून कांहीं दिवस नोकरी म्हणजे सेवावृत्ति स्वीकारावीच लागली.

नैसर्गिकदृष्टया लग्नाचा कारक मंगळ ह्राच दशमेश मूळ कुंडलींतील असून तो षष्ठांत उपचय स्थानांत स्वनवांशांत बलवान असून शनि व दशमस्थानाशी शुभ

योग करतो. नैसर्गिक व लग्नकुंडलीशी या कारक स्वामीची अन्योन्य संबंध स्थिति या कुंडलीस व्यापारात श्रेष्ठत्व व यश मिळवून देण्यास कारण झाली आहे. शिवाय दशमांत गुरु, शुक्र हे ग्रह स्वनवांशांत बलीं असून त्यांची दृष्टि शनिवर आहे, गुरुची मंगळावर दृष्टि त्यांत शुभ असा त्रिकोण योग गुरु धन व लाभस्थानचा स्वामी. शुक्र भाग्य व चतुर्थ केंद्राचा स्वामी यामुळें उद्योगांत कल्पनेबाहेर यश मिळून लाखोपति झाले. हा या योगाचा प्रभाव आहे. न भुतो न भविष्यति अशी स्थिति कुंडलीस प्राप्त झाली. रवि–बुधाशिवाय सर्वच ग्रह नवांशांत बलवान् आहेत. रवि हा त्याच दिवशी बदलत असल्याने त्याच नवांशांत आहे हे ध्यानीं घ्यावें.

नवांश कुंडली व्यापार, भागीदार, पत्नी, कोर्टदरबार याची द्योतक असते. लग्न कुंडलीइतकेच त्या कुंडलीस प्राधान्य या शास्त्रांत दिले जाते. लग्न कुंडलीस महत्त्व नवमांश कुंडलीमुळे प्राप्त होते. म्हणून या कुंडलीचा दर्जा सर्वोच्च ठरतो. यामुळेच जन्मतः सामान्य असणाऱ्या कुंडलीस उत्तरोत्तर अलौकिकत्व प्राप्त झाले.

जन्मकुंडलींत राहू, केतु चतुर्थ व दशमस्थानांत आहेत. त्यांनी दशमस्थान व लग्नेश बिघडला आहे. म्हणून बाल्यावस्थेचा काळ दारिद्र्यांत गेला. हे ग्रह शुभसंबंधींत व शुभदृष्ट असतां पुढें शुभफळे देतात. त्यामुळेच त्यांना धंद्यांत श्रेष्ठत्व प्राप्त झाले. असा केतु ज्या स्थानीं असेल त्या स्थानाच्या फळाची अद्भुतता प्राप्त करून देतो असा अनुभव आहे. दोन्ही प्रकारची चांगली आणि वाईट पराकोटीस नेलेली पहावयास मिळतात.

या कुंडलीत चंद्र हा पराक्रमांत वृषभ नवांशांत आहे तेथेच हर्षल. या योगानें स्वतःच्या कर्तबगारीवर अचानक सारखी भरभराट होत जाऊन उच्च दर्जा व प्रसिद्धि त्यांना भेटली व नांव अजरामर झाले. नेपच्यून अंतः स्फूर्ति देतो. तेव्हां स्वतःचे कल्याण करणारे विचार त्यांना या नेपच्यूनने दिले. 'करीन ती पूर्व' अशी स्थिति लग्नीं असणाऱ्या नेपच्यूनने प्राप्त करून दिली.

तेव्हां सर्व ग्रहांचा साकल्यानें विचार करून धंद्याच प्रश्न सोडविणें इष्ट ठरते. तसा विचार करून उत्तर दिल्यास भविष्य चूक ठरणार नाही असें मला वाटते.

याशिवाय या कुंडलींत फार महत्त्वाचा योग झाला आहे तो विषद करून सांगणे उचित वाटते. 'चमत्कार चिंतामणी' या नांवाचा पूर्वाचार्यांनीं लिहिलेला एक ग्रंथ आहे. त्यांत सुखी आणि श्रीमंत कोण होतो त्याचें दिग्दर्शन २ श्लोकांत केले आहे. त्यापैकी एका श्लोकांतील स्थिति या कुंडलीत आहे. सुख आणि श्रीमंती क्वचितच एके ठिकाणीं नांदत असलेली पहावयास मिळते. म्हणून हा श्लोक मी येथे देत आहे. या योगाची निश्चितता ज्योतिर्विदांना सांगतां येईल हा मुख्य उद्देश आहे. तो श्लोक असा––

सूर्याद्वितीयं शुभ खेटयुक्तं
लग्नालयं स्याच्च निजांश युक्तम् ।
केंद्रे भवेत् सद्विहगान्वितं च
जातस्तदा स्याध्दनवान् सुखीच ॥६९॥

अर्थ – सूर्यापासून दुसऱ्या स्थानी शुभ ग्रह व लग्न

आपल्या नवांशांत आले असून केंद्रीं शुभ ग्रह आले असतां मनुष्य सुखी व श्रीमंत होतो. ।।६९।।

कै. देसाई यांचे कुंडलींत गुरु, शुक्र, बुध सूर्याच्या द्वितीय स्थानांत आहेत. गुरु, शुक्र हे ग्रह दशम केंद्रांत आहेत. लग्न-कुंभ असून ते स्वनवांशांत आहे. म्हणून त्यांना या श्लोकदर्शीत केल्याप्रमाणे सुख व श्रीमंती भेटली आहे. कोणत्याहि कुंडलींत हा योग आढळला तर त्याचे हे फलित निश्चित सांगता येईल.

उद्योगधंद्यांत बरकत देण्यास या योगाचे सहाय्य कुंडलीस मिळाले आहे. धंद्याबाबत असाहि विचार करणें इष्ट म्हणून त्याचे विवेचन येथे दिलें आहे. विषयास धरूनच हा योग येथे निर्देशीत केला आहे.

कै. देसाई यांनी सर्वच धंदे शुभ्र वस्तूंचे केले. कापड-धंद्याचा कारक शुक्रच आहे. त्यांचे कुंडलींत शुक्र हा भाग्य व चतुर्थ या केंद्र.कोणाचा अधिपति असून दश-मांत आहे. शुक्र हा शुभ्र वस्तूचा कारक म्हणून यांनीं अंतस्फूर्तीनें सर्व धंदे शुक्राच्या कारक वस्तूचे केलें. शुक्र हा ग्रह या कुंडलीस विशेषत्व धंद्यांत व मानसन्मान देणारा ग्रह आहे. म्हणून त्या धंद्यांत यश व श्रेष्ठत्व देणारा आहे. त्याने सर्वश्रेष्ठ मानसन्मान प्राप्त करून दिला एवढेंच शेवटीं सांगणें


धंदा कोणता करावा हे दशमांतील संबंधींत ग्रहाच्या कारकत्वावरून ठरवावें. विस्तारभयास्तव त्याचे वर्णन देत नाही. सर्व सामान्य निरुपणत्व या छोटचा लेखांत केले आहे. त्याचे मार्गदर्शनास हा लेख उपयोगी पडावा एवढाच हेतु आहे.

उलट स्थिति असणाऱ्या कुंडलींत क्रूर विभागांत शनि-मंगळ युति, शनि मंगळ प्रतियोग, शनि, मंगळ केंद्रयोग झालेले पहावयास मिळतात.कुंडलीत चांगला धनयोग असूनहि त्या कुंडलीस मोठे नुकसान होते. धनचिंता निर्माण होऊन हाय हाय करण्याची पाळी येते.

माझ्या एका व्यापारी स्नेह्याच्या कुंडलींत दशमांत स्वगृहीचा शनि व चतुर्थांत कर्केचा लग्नेश मंगळ ही प्रतियुति-स्वतःच्या कर्तृत्वानें हजार रुपये दरमहा मिळविणारा व्यापार तो कमिशन स्वरुपाचा असतांहि कफल्लक होण्याची पाळी आली. शेवटी नोकरी करून जीवन जगावें लागलें त्यातच अंत झाला. केवढेंहि मोठे वैभव ही प्रतियुति रसातळास नेते. नैसर्गिक व जन्म-कुंडलींचा लग्नेश मंगळ व दशमेश शनीच आहे. शेवटी हानीच होते. ही अशीच एक कुंडली पहा –

जन्म – तारीख २७–१२–१९७० इ. घ. १७–५ मुंबई

लग्न – कुंडली



या कुंडलींत भाग्येश धनांत व धनेश भाग्यांत हा चांगला धनयोग झालेला आहे. म्हणून मूळ स्थिती श्रीमंती ! भाग्यांतच दशमेश लाभेश शनि, पंचमेश रविही तेथेच हे ग्रह चंद्राच्या लाभांत म्हणून कुंडलीचा दर्जाहि चांगला होता. पण रवि शनि युति हा कुयोग दुर्बुद्धि देतां झाला. आणि या ग्रहाशी षष्ठांतून मंगळाचा केंद्र योग, तशांत मंगळाची शनीवर दृष्टि व शनीची मंगळावर दृष्टि या दोन कुयोगाने श्रीमंती रसातळास मिळविली. रवि–शनि युतिने सट्टयाचे व्यवहार करण्यास प्रवृत्त केले. कारण पंचमेश रवि सट्टयाचे धंदाचा कारक आहे. आणि शनि दशमेश. त्यांत भाग घेतला. सुरवातीस हे योग लाभ देतात. व पुढें मंगळाचे केंद्र संबंधाने कुयोगांत भर पडून कांहीं लाख रुपये सट्टयांत घालविले. कर्जबाजारीपणा प्राप्त होऊन कफल्लक स्थिति झाली. धंदा बंद झाला. दिवाळे निघाले. हानीदर्शक कुंडलीचे विवेचन आपणापुढें ठेविले आहे. ते मार्गदर्शक समजा. प्रत्येक धंद्याचे सांगो-पांग विवेचन मी माझ्या प्रश्नजातक-भाग ३ रा या पुस्तकांत देणार आहे. पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल. एवढे दर्शीत करून विस्तारभयास्तव हा लेख येथेंच संपवितो. " शु भं भ व तु "

वधुवरांच्या पत्रिकेंतील मंगळाचे अकांड-तांडव

लखक : सायनाचार्य अ. गो. पंचाक्षरी, नाशिक

वधूवरांच्या कुंडलीतील मंगळ विषय लहान आहे असे स्पष्टपणे दिसते पण त्याचा विस्तार व्यवहारांत फार मोठा आहे. मंगळामुळे निष्कारण धायकुतीला आलेल्या अनेक व्यक्ती मीं पाहिल्या आहेत. मुलीचे पालक तर माझ्याकडे कित्येक वेळा अगदी लहान तोंड करून काळजीने चूर होऊन समस्या मांडत असतात खरोखर फार दया येते त्या महाभागांची. वस्तुस्थितीचा हा विपर्यास आहे. शास्त्र हे शुद्ध मार्गदर्शनी असले पाहिजे. त्याचा गाभा तसा नसेल तर व्यवहारांत उपयोग न करणें फारच बरे असे वाटते. ज्योतिष शास्त्र हे पारंपारिक आहे. हे खरे असले तरी पुस्तकी तत्त्वज्ञान वस्तुस्थितीला संपूर्णपणे आधारित असतेच असे नाही. नवीन शास्त्रशुद्ध विचारांनी अनुभवांनी जर जुन्या सिद्धांतांना शह देता येत असेल तर तसा प्रयत्न अभ्यासू ज्योतिर्विदांनी अवश्य करावा. श्री. काटवे यांचे उदाहरण कसेहि असले तरी आदर्शनिय आहे हे नमूद करावेसे वाटते.

मंगळाबद्दल माझे विचार संभाव्यपणे सर्वांना पटतीलच असे नाही. पण मला जे वाटते आणि याहून काही चांगला मार्ग सांपडेल असे विचार पटले म्हणून मी याविषयी हा लेख देत आहे.


मंगळ असतो म्हणजे १।४।७।८।१२ या स्थानी मंगळाचे वास्तव्य असणें म्हणजे वधूला किंवा वराला मंगळ आहे असे समजण्याचा प्रघात आहे. आणि हा मंगळ कोणत्या आधारावर उभा केला याचे विवेचन मात्र माझ्या वाचनात नाही. वस्तुतः मंगळचे विवाहाशी जे संबंध जोडण्यात आले आहेत ते पण कशा पद्धतीने ते समजायला हवं ते कांही असलें तरी पण मंगळाची शास्त्रांत अवास्तव वाढ झालेली आहे. मंगळाबद्दल विचार करणे अगत्याचे आहे हे खरे असले तरी त्याला वेगळे महत्त्व नको असे वाटते.

वस्तुतः १।४।७।८।१२ या स्थानांबद्दल आपण विचार केला तर आपणास ४।८।१२ या स्थानाशी विवाहाचा कोणता संबंध जोडला हे समजणे फार महत्त्वाचे आहे आणि तेथील मंगळ तर एक हास्यास्पद घटना वाटते. या ठिकाणी मंगळाबद्दल त्याच्या दृष्टीयोगाचा विचार केला असेल असे वाटते. कारण मंगळाला ४।७।८ या पूर्ण दृष्टि आहेत असे ग्रहित धरले, तर ४।८।१२ या स्थानात मंगळ असताना त्याची दृष्टी (४।१२ या स्थानात) सप्तमावर पडते, हे आपण नाईलाजाने ग्राह्य धरले तर शनिलासुद्धा एक वेगळा दर्जा द्यावा लागेल. कारण तो पण पापग्रहच आहे. १।१० आणि ५ या स्थानांतील शनीची दृष्टि सप्तमावर येते. ४।१२ मंगळ ग्राह्य ठरवले तर आठव्या मंगळाला महत्त्व कोणते ? त्याची दृष्टि लग्नावर किंवा सप्तमावर पण येत नाही तर ती केवळ धनस्थानावर येते आणि तसे धरले तर मंगळाला आणखी एक स्थान वाढवावे लागेल ते म्हणजे ११ वे. कारण त्या मंगळाची दृष्टि पण धनस्थानावर येते. असे अनेक मुद्दे आहेत की ते मंगळाचें नसतें स्थानमहात्म्य खोडून काढू शकतात. त्यात हे मुद्दे उपस्थित केले आहेत.


शनि राहूचा जाब
अगदी चुकीचा मुद्दा

मंगळ असलेल्या कुंडलीला शनि राहूचा जाब हा एक हास्यास्पद प्रकार प्रचलित आहे. वस्तुस्थिति शनि मंगळाचे, पिढ्यांपिढ्या वैर. आणि तो शनि म्हणे


क्र. १




क्र. २



क्र. ३




क्र. ४



मंगळाला रोखू शकेल. हा युक्तिवाद अगदी मुर्खपणाचा ठरतो.

राहू–शनिचा मानण्याचे प्रकार.


जाब स्थान



या स्थानांतच शनि–राहू असले तर असे खुशाल समजावें की मंगळाचे दोष राहात नाहीत वस्तुस्थिति कशी चुकीची आहे त्यासाठी ४ कुंडल्या दिल्या आहेत. त्याप्रमाणे शनि, राहू, मंगळाची अवस्था असेल तर तो वैधव्य योगच आहे असे म्हणावें लागेल. असे स्पष्टपणे दिसत असताना आपण आंधळेपणाने तो मंगळाला जाब सांगतो. वरील ग्रहयोगांच्या पत्रिका मी जेव्हा पाहिल्या तेव्हा त्यांना जीवनांत सांसारीक सुख केव्हाहि मिळालेले नाही असे त्यांचें जीवन आहे. आणि त्याचे कारण मंगळाचे मूर्खपणानें केले जाणारे दिग्दर्शन. वस्तुस्थिती दोघांच्या पत्रिकेत फार तर मंगळाचें शुभयोग पहावेंत. पण असला घाणेरडा परंपरेनें चुकीचा निर्माण झालेला युक्तीवाद नष्ट करण्यासाठी शास्त्रज्ञांनी पुढाकार घ्यायला हवा. वस्तुस्थिती मंगळ, शनि, राहू हे ग्रह कुंडलीत कसे असावें त्यांना एक महत्त्व आहे. पण लग्नासाठी त्यांचा असा वापर करू नये. या व्यतिरिक्त असें अनेक मुद्दे आहेत तें चंद्राचें आहेत. गुणमेलनाचें आहेत. हे बहुधा शास्त्रज्ञाला माहीत आहे पण त्याचा सखोल अभ्यास केला तर तें पण अशाच चुकीच्या कल्पनेवर आधारलेलें वाटतात. मंगळाची नक्षत्रपरत्वें अवस्था तर अगदी मूर्खपणाची आहे असे माझें नम्र मत झालेले आहे. दुसरें असे की, मंगळ, लग्नाला, राशीला, रविला कोणाला धरावयाचा लग्न, चंद्र, रवि, मंगळ, शुक्र, गुरु हे सर्व महत्त्वाचें आहेत. यांना असेंच मंगळाचें खूळ जोडावें का ? निश्चित हा मंगळ कोणाच्या मागे लावावा. हे विश्वासार्ह वाटत नाही. आणि म्हणून मंगळाचें हे अवास्तव स्तोम माजलेले आहेच, उगाच आंकाडतांडव चाललेला आहे तो संपवायला हवा.

माझे स्पष्ट मत असे आहे की या मंगळामुळे अनावश्यक परिस्थिति निर्माण होतें आणि विवाहात अडचणी निर्माण होतात. समाज या अंधारांत चांचपडत असतो त्याला शास्त्रज्ञांनी योग्य मार्गदर्शनच केले पाहिजे,

मंगळाचें स्थानपरत्वे आणि ग्रहांचा जातपरत्वे विचार करतात तें जसें चुकीचें आहे तशाच अनेक घटना आहेत. एकाला मंगळ असताना. दुसऱ्या व्यक्तीला पण मंगळ असावा असें ग्राह्य ठरवलें तर वराच्या पत्रिकेंत व्ययस्थानी मंगळ आहे आणि वधूच्या कुंडलीत अष्टमस्थानी मंगळ असता हे मंगळ चांगलें की वाईट ८।१२ ही स्थानें वाईट की चांगली. दोघाचें मंगळ येथें बिघडलें आहेत स्थानपरत्वे विवाह करावा. असें विवाह फलद्रुप होतील का ? असा माझा प्रश्न आहे. या ठिकाणी मंगळाबद्दल विचारांची गरजच नाही. अगदी स्पष्ट आहे असा विवाह न जमविणें चांगलें असेंच मानावें लागेल त्याचप्रमाणें राशीगत मंगळाचें स्वरूप बघा.



या राशीत मंगळ असताना. तो अपवादच ठेवला आहे. वस्तुस्थिति मेष वृश्चिक मकर या राशीचा मंगळ मी मान्य करतो. पण तो त्याच स्थानांत कां ? मकरेचा मंगळ लग्नांत अपवाद कां नको ? धनु राशीला महत्व कां ? ती गुरूची राशी म्हटली तर तेथें मीन राशीला प्राधान्य कां नको ? आग्नि राशी म्हटली तर सिंह राशी कां नको ? असे मुद्दे उपस्थित होतात. मेष, वृश्चिक, मकर यांना १।४।७ या स्थानांतच कां अपवाद ठेवले हा मुद्दा पुन्हा गहनच आहे.

त्यांत कर्क मंगळ अष्टमांत अपवाद अष्टमस्थान हें वाईट कर्क रास ही मंगळाची नीच रास. हा मंगळ काय अपवाद मानायचा ? कशावरून हा मंगळ कुंटूंबाची धूळ-धाण उडविणार नाही ? असे किती तरी प्रश्न आहेत केवढया तरी समस्या आहेत यांचा विचार करावाच लागल. "मंगळ" असणे हा विभाग शास्त्रशुद्ध आणि तर्कशुद्ध आहे असे वाटतें कां ? मला तरी स्वच्छपणें वाटतें की यांत कांहींतरी गोंधळ आहे. त्याचा सखोल विचार व्हायला हवा. मी जें हे मुद्दे उपस्थित केले आहेत त्या पेक्षाहि अधिक मुद्दे माझेजवळ आहेत पण एवढयावरून आपणास मंगळाचें स्वरूप लक्षांत घेता येईल, त्याचा विचार करता येईल असे मला वाटतें.

मी वैयक्तिक अनुभव घेऊन थोडयाशा धाडसानें एकाला मंगळ आहें आणि दुसऱ्याला नाही अशा पत्रिका जुळविल्या आहेत. (आता सर्रास जुळवितों) त्यांचें जीवन सुखी झाले आहें असे अनुभव आहेंत या-संबधीची दखल संशोधनात्मक दृष्टीनें ज्योतिर्विदांनी विचारांत घ्यावी असें मला वाटतें. हा विभाग लहान आहे, मंगळ ही बाब क्षुल्लक आहे असे समजून तो उपेक्षिला जाऊ नये त्यांत समाजाचा आत्मा घोटाळतो आहें म्हणून तरी यावर एकवार शास्त्रज्ञांनी विचार करून मंगळाचें हें आकांड – तांडव थांबवावें असें मी आवाहन करतों –

मंगळाशिवाय दुसऱ्या विषयावरच मी लिहिणार होतो. पण विचारांती असें वाटलें की हा ग्रंथ ज्योतिर्विदांचा आहे तेव्हा वादविवादापेक्षा किंवा अन्य विषयापेक्षा हा विषय पुढे ठेवावा आणि समाजाच्या व्यथित अंतःकरणाला दिलासा देता आला तर पाहावा आणि या विभागांत अनेक तज्ञांना विचार करता आला तर हा पारंपारिक मतप्रवाह खोडून निघाला तर फारच बरें त्यातूनच फारच चांगल्या गोष्टी पुढें येतील. मंगळाला 'महाराष्ट्रात' महत्व आहे तसे इतर ठिकाणी पण आहे, पण प्रत्येक प्रांतांत त्याचें स्तोम निरनिराळ्या पद्धतीनें मांडले असले तरी त्याचा अन्वयार्थ एकच आहें. पाश्चिमात्त्य शास्त्रकार यापासून अलिप्त आहेत त्यांना मात्र धन्यवादच द्यावे लागतील एवढे सांगून माझा लेख पूर्ण करतों.

" अक्षर पद्धति "

लेखक : **पं. विश्वनाथ महादेव जोशी**, १७० गोखलेनगर, पूना नं. १६

" Theory of Phonetics " अक्षरांचे शास्त्र हे मानवी आवाजांचे शास्त्र आहे. त्याचे कमीत कमी ध्येय वाचाशुद्धि राहणे हे आहे " ऋषीणां पुनराद्यानांवाचूमर्योनुधावति " ऋषी लोक जसे बोलत तसेच घडत असे. सर्व, तत्वचिन्तकांनी याचा सखोल विचार केलेला होता. बुद्धांनी मानवी आवाजांत पशूचा आवाज मिसळून त्या मिश्रणाने सत्यज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला होता. त्यांत त्याने सेलिंग असलेल्या काळचा मुंग्यांचा आधार घेतलेला होता. मानवी आवाजाच्या उच्चारांचे एक 'सारेगमपधनि' असे सप्तक आहे. त्याच्या उच्चारणा बरोबर फुफुसें व काळजातील कप्यांच्या मदतीने जाणकार मनाचा उद्रेक होतो. अक्षरापैकी व्यंजन व स्वर यांच्या विशिष्ट भागाप्रमाणे उच्चारांची वाटणी केलेली आहे. अ,आ, कवर्ग ह् आणि विसर्ग यांचे कंठस्थान अशा प्रकारे तालुस्थान वगैरे स्थानांची ही वाटणी प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान याला धरून केलेली आहे.

अक्षरांना अवकाशांत विशिष्ट आकार आहेत. ते हवेच्या आवाजाच्या दाबांनी घडतात. वेदाची अक्षरे द्रष्टचा ऋषीनी प्रत्यक्ष पाहिली. आवाज पाहणे हे आवाज ऐकण्यापेक्षा फारच आश्चर्यकारक आहे. या पवित्र कल्पनेने आणि कल्पनेच्या पावित्र्याने एक प्रकारचे विशिष्ट वातावरण निर्माण झाले आहे. या चार वेदातील सामवेद हे Phonetics चे प्रतीक आहे. तोंडातून ससूत्र पंचमहाभूतांचे एकत्रीकरण व प्रत्यक्षीकरण म्हणजेच सामवेद. या आश्चर्यकारक पद्धतीने दिसतो त्यालाच 'प्रणव' असे म्हणतात. रसेलच्या म्हणण्याप्रमाणे पृथ्वीच्या सुरवातीपासून निघत आलेल्या व प्रसूत झालेल्या व होत असलेल्या आवाजांनीच ही पोकळी (आकाश) भरून गेलेली आहे. न्यायशास्त्रांत 'शब्दगुणं आकाशं असे म्हटले आहे. हीच गोष्ट सही सही आपली अक्षरे व रेडिऑलॉजीनी सिद्ध केली आहे. गीताशास्त्र अक्षरंब्रम्ह परमं अक्षराणां अकारोस्मि अशा तऱ्हेने वर्णन करून आवाजाला जीवनाचे सहावे तत्त्व मानले आहे. मीमांसा शास्त्रांत प्रत्येक व्यंजनाला आणि स्वराला निश्चित किंमत दिलेली आहे हीच विश्वाची लिहिलेली constitution आहे. शद्ब आणि अर्थ यांचा दृढ संबंध आहे. तो संबंध म्हणजेच मानवी भाषा आहे. " वागर्थाविव संप्रक्तौ वागर्थं प्रतिपत्तये । जगतः पितरौ वन्दे पार्वती परमेश्वरौ । एकच उच्चार वर अगर शाप होऊ शकतो अशी त्यात शक्ति आहे. सप्तस्वराने इच्छा अगर अनिच्छा दाखविली जाते. यावरून ऑइन्स्टीनची

रिलेटिव्हिटी पद्धत तयार झालेली आहे. जेरिकोच्या भिंती तुतारीच्या नुसत्या आवाजाने कोसळल्याचे इतिहास साक्ष देत आहे. राजा विक्रमाच्या दीपरागाने दिवे लागल्याची नोंद आहे. याच तत्त्वांचे स्पष्टीकरण करणारी अलिकडील उदाहरणे बैजूबावरा, तानसेन यांची गायनकला आहे. उत्क्रांतीच्या तत्वाप्रमाणे प्रथम जलचर व दोन्ही जागी राहणारे प्राणी निर्माण झाले. " मानिषाद प्रतिष्ठात्वं । आगमः शाश्वतिसमः । यत् क्रौंच मिथुनात अेकं अवधिः काममोहितम् । हे शब्द एकदम निर्माण झाले. पानदेवाच्या लव्हाळ्यातून निघालेल्या सप्तसुराप्रमाणेच ते आहेत. मनु शब्दांची शक्ति सांगताना हेच सांगतो की दूताच्या शब्दावरच युद्ध किंवा शांतता अवलबून आहे. लंकापतेः संकुचितं यशोंयत् । यत् प्रीतीपात्रं रघुराज पुत्राः । ससर्व अेवा दिकवे प्रभावात । शब्दब्रम्हमिदंकवेः परिणतम अशा तऱ्हेची अनेक वचने शब्दाचे सामर्थ्य दर्शविणारी आहेत. याच शब्दाच्या गुणावर संशोधन करून Theony of Phonetics लिहिली आहे. त्याला परंपरा आहे.

पुराणांतून या अक्षरांच्या शक्तीची उदाहरणे सापडतात. भारतीय युद्धाला अनेक कारणे झाली. त्यांत शब्दांचा प्रभाव हे एक कारण आहे. एकदा राजा दुर्योधनाने द्रौपदीला विचारले. " काय वहिनी, आज कोणच्या पतिची पाळी ? " त्यावर द्रौपदीनें उत्तर दिले, " हसून बोले पांचाळी शेषाची आज पाळी " हा घाव दुर्योधनाच्या वर्मी लागला. त्याचप्रमाणे एकदा धर्मराजाला विचारले की, कोणाच्या बापाचे श्राद्ध करता आहा. त्यावर धर्मराजाने उत्तर दिले, 'बोकडाचे' याचेमागे इतिहास आहे. गांधारी विषकन्या होती. तिचा विवाहा झाल्याबरोबर पति मरण्याचा योग होता. त्यावर उपाय म्हणून तिचा प्रथम बोकडाशी विवाहसंस्कार केला होता व त्याला उद्देशून धर्मराजाने उत्तर दिले होते. त्याचप्रमाणे दुर्योधनाच्या पत्नीने पति वश होण्याकरता आणलेले मंतरलेले तेल सांडल्यामुळें खाली शेषाच्या डोक्यावर पडले व तो वर येऊन दुर्योधनाच्या पत्नीच. उपभोग घेत असे त्याला उद्देशून द्रौपदीचे उत्तर आहे इतिहासात अनेक उदाहरणे आहेत. ज्यावरून हे शब्द सामर्थ्य सिद्ध करता येईल. सर्व जगातील तत्त्वज्ञान शब्दसामर्थ्यांतच साठविलेले आहे. या आधारावरच हिंदूंच्या चालीरीतींत कांही वेळा कांही अभद्र शब्द उच्चारू नयेत असा दंडक आहे. मौनाला याचमुळे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. प्रत्यक्ष पाहिलें तरी मोठी मोठी माणसे हे शब्दशक्ति भांडारच मागे ठेवून जातात. Persons die but the principles survive मनुष्ये नाश पावतात पण तत्त्वे अमर आहेत. आणि ही तत्त्वे शब्दांत ग्रथित केलेली असतात.

ज्योतिष शास्त्रात राशींची विभागणी करून त्या ग्रहांना वाटून दिल्या आहेत. प्रत्येक राशींची अक्षरे ठरविलेली आहेत सर्व राशींचे मिळून होणाऱ्या अक्षरांचे Theory of phonetcis या पुस्तकांत चार गट पाडलेले आहेत. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या कुंडलीप्रमाणे कांही गट मित्र असतात व कांहीं शत्रू असतात. त्याला सबंध आयुष्यांत फक्त मित्राक्षरातील गटांतील सुरुवातीस ती नावे असलेल्या संस्था, व्यक्ती, स्थळ वगैरे गोष्टींकडून फक्त फायदा होतो. शत्रू गटांतील अक्षरांनी सुरुवात असलेली प्रत्येक गोष्ट नुकसान करते. यावरून मित्र, भागीदार, स्थळ, शर्यतीचे घोडे इत्यादि सर्व गोष्टी ठरविता येतात. आता याच अक्षरांचे तीन गट बनविले आहेत. त्यांत काही अक्षरे पुरुष अक्षरे आहेत. कांही स्त्री आहेत व फार थोडी द्विलिंगी आहेत. या गटांचा उपयोग बर्थ कंट्रोल (संतति नियमन) करण्याकरता होतो. पुरुष-पुरुष अगर स्त्री-स्त्री अक्षरांचा विवाह झाला तर एक तर अजिबात संतती होत नाही किंवा फक्त पुरुष अगर स्त्री संतती होते. ती नको असल्यास पतीच्या अक्षराप्रमाणे दोन व पत्नीच्या अक्षराप्रमाणे दोन महिने अशी एकूण चार महिन्यांत गर्भधारणा होते. त्यातहि ठरलेले आठवड्यांतील वार व ठरलेले चंद्र इतके पथ्य पाळले तर संतती होत नाही. या सर्व गोष्टीचा खुलासा आमच्या पहिल्या पुस्तकांत दिलेला आहे. परमेश्वरानी मदत दिली व वाचकांनी अनुभव घेऊन उमेद दिली तर आम्ही हिंदूंच्या जुन्या चाली-रीतीचे अंधश्रद्धेने पालन केल्यास सर्व राजकीय आर्थिक, व सामाजिक प्रश्न सुलभतेने सोडवले जातील असे आश्वासन देतो. शेवटी " यदायदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मान सृजाम्यह ।।१।। या भगवंताच्या वचनावर विश्वास ठेवून माझा लेख पुरा करतो.

श्रीशंकराचार्यांची जन्मकाल व जन्मपत्रिका

लेखक : दत्तु गोरे

सुप्रसिद्ध हिंदुधर्माचे आद्यप्रणेते आणि अद्वैतवादाचे एक श्रेष्ठ प्रणेते श्रीमद् शंकराचार्य हे एक अवतारी पुरुष होते. त्यांच्या अवतार कालासंबंधाने अनेक तर्क आहेत. काहींचे मते त्यांचा अवतार १४ व्या शतकात झाल्याचे स्पष्ट आहे. काहींचे मते श्रीशंकराचार्य कालिवर्षानंतर ३८८९ मधील आहेत. काहींची मते आणखी भिन्न आहेत. दक्षिण भारतात मलबार प्रदेशात याबाबतीत भिन्न मतांची गर्दी दिसून येते. भिन्न भिन्न तर्कांचा व मतांची एकून गोळाबेरीज सारांश-हिशेबाने पहाता सर्वांचे मतात अखेर एकरूप दृष्टीचाच अर्थ दिसून येतो. म्हणजे असा—

१) शंकराचार्यांचा जन्म त्रावणकोर राज्यातील कालाडी गावी झाला. (२) ते पूर्ण आत्मज्ञानी होते. लोक त्याना ईश्वराचा अवतार मानीत असत. (३) त्यांनी मलबार मध्येच नव्हेतर सर्व भारतभर अद्‌भूत कर्तबगारीची पताका फडवत ठेवली आहे. (४) त्यांनी विशेष करून केरळ आदि इतर देशवासीयांस सामाजिक धार्मिक नीति—उपदेशांची स्पष्ट कल्पना जाणीवपूर्वक देऊन त्यांचा प्रसारही केला. (५) आजतागायत त्यांचे विचार नीति-तत्त्वाचा उपदेश मताचा आणि व्यवहार शिक्षणाचा सर्वत्र प्रभाव टिकून आहे. त्यांची अलौकिक अवतार शक्ति आज विसाव्या शतकातही लोकादरातून कमी झालेली नाही. तिचे मान्यत्व अमर असेच आहे. शंकराचार्यांची महति आजही, आजच्या घडीला पूज्य दृष्टीने ओळखली जाते.

असा हा जगत् श्रेष्ठ अवतारी पुरुष कोणत्या अद्‌भुत अशा वेळी जन्मला. त्याने आपल्या जन्मकालापासून आजच्या क्षणाला उभ्या विश्वाला आपलेकडे आकर्षित करून ठेवले. आपल्या प्रभावाने मानवी धर्मवृत्तीला प्रभावित करून ठेवले ते जरा सखोलपणे येथे पहाणे योग्य होईल.

शंकराचार्यांचे संबंधाने मलबारमध्ये आणि इतरही ठिकाणी अनेक कथा - उपकथा प्रचलित आहेत. त्यांच्यामागे माधवाचार्यकृत शंक - विचय ग्रंथाची सोबत आहे. माधवाचार्यांनी जगद्‌गुरुंच्या जन्म-काल तिथीचे संबंधाने ग्रहस्थितीचे बर्णन लिहिले आहे. ते माधवाचार्यकृत भाष्य शुभफलदायक आणि फलित सिधान्तानुसार योग्य असल्याचे मानले जाते. माधवाचार्य हे प्रसिद्ध विजयानगरचे राजे हरिहरबुक्क यांचे काळी एक मंत्री होते. त्यांना विद्यारण्यस्वामी असेही नावाचे संबोधनाने ओळखले जाते. वेद-वेदांत उपनिषिदे यावरील माधवाचार्यांचे टीका लेखन प्रसिद्ध आहे. काही काळ ते श्रृंगेरी मठाचें अधिपती होते. तेव्हा पासून ते विद्यारण्यस्वामी म्हणून परिचयाचे झाले.

विद्यारण्यस्वामींसारख्या पंडिताने जगद्‌गुरु-आचार्यांचे संबंधाने 'शंकर-विजय' ग्रंथात जे काही निवेदन करून पुढे ठेवले आहे ते अनुचित अगर अमान्य आहे असे कसे समजायचें? 'शंका विजय' ग्रंथात आचार्यांबद्दलच्या ज्या ज्या गोष्टी मांडल्या आहेत त्यावर पूर्णतः विश्वास राखूनच आपले मत—विचार मांडणे युक्त होईल व अभिप्राय व्यक्त करणे इष्ट ठरेल.

श्रीशंकराचार्यांनी शिक्षणोत्तर संन्यासदीक्षा ग्रहण केली. नंतर त्यानी आपल्या मताच्या प्रचाराची

सुरवात केली. ह्या गोष्टी सर्वश्रृत आहेत. काहींच्या अभिप्रायातून असे म्हटले आहे की शंकराचार्यांनी दक्षिणेतील कोल्या (कुइलन) नावाच्या ठिकाणापासून चैत्र (चिनगम चैत्राचे केरळीय भाषेतील नाव) महिन्याचे प्रथम तिथीपासून (गुढीपाडवा) आपल्या अद्वैतपादाचा हिंदुधर्म विचाराच्या मताचा प्रचार सुरू केला. तेथून ते पश्चिमवाहिनी भारतनदीच्या दक्षिण किनाऱ्याकडे गेले. आश्विनाच्या पहिल्या दिवसा-(तिथी) पासून त्यांच्या प्रातांचा प्रभाव केरळांत भारत नदीच्या उत्तर किनाऱ्यापर्यंत वाढत राहिला. ही एक लोक कथा आहे. केरळमध्ये या काल तिथिचे महत्व मानण्यात येत असते. केरळातील चैत्रारंभ शकाचा प्रभाव आजही असल्याचे दिसते. भारत नदीच्या उत्तर किनाऱ्या-कडे नवीन वर्षारंभ, चैत्राच्या प्रतिपदेपासून (गुढी-पाडवा) मानला जातो व दक्षिणेकडे अश्विनाच्या प्रति-पदेपासून मानला जातो. तेव्हापासून कोलम येथून आचार्यांचे मत प्रसृत झाले. त्या काल दिवसापासून 'कोलम-

अंदू' नावाचा शक सुरू झाला. हा कोलमशक कलिच्या ३९२७ वर्षापासून (अगर नंतर) सुरू झाला. यावरून केरळात श्रीशंकराचार्यांचे मत–प्रचाराचे कार्य १०८५-वर्षापासून सुरू झाले असावे यात शंका येण्याचे कारण नसावें. अभ्यासू जगात याचा अधिक विचार करणे निदान अवघड वाटू नये.

काही हस्तलिखितातील नोंदलेल्या टिपणावरून स्पष्ट झालेल्या दिनचर्या आणि इतर कार्यक्रमात व केरळांतील प्रसिद्ध पुरुषांचे संदर्भात ज्योतिषसंम्बधिनी नावाची एक कालगणना उपलब्ध होते. त्या कालगणनेमध्ये प्रसिद्ध उपदेशांचा प्रारंभ, आचारांचा मुहूर्त, देवमंदिराची प्रतिष्ठापना इ०चा प्रामुख्याने उल्लेख केलेला आढळतो. त्याची तिथि आदि सर्व संयम-पळे नमूद केलेली आहेत. अशा तऱ्हेच्या एका ग्रंथाचे नाव 'आचार्यवाग्भेद' असल्याचे सांगितले आहे हा 'आचार्यवाग्भेद' ग्रंथात लिहिले गेले आहे की, मलबारमध्ये श्री शंकराचार्यांचे मत अधिकृतरीत्या १४,३४,१६० सौर दिवसाला प्रसृत होण्यास प्रारंभ झाला. या दिनमानाप्रमाणे कलिवर्ष ३९२७ एवढे होते. या आधारानुसार शंकराचार्यांचा काल १०८५ हा होतो. 'शंकरविजय' ग्रथांत माधवा-चार्यांवर (विद्यारण्यस्वामींनी) लिहिले आहे की, शंकराचार्य ३२ वर्षाचे असतानाच त्यांनी देहत्याग करून ते इहलोकातून मुक्त झाले. यानुसार कलिच्या ३९२७ वर्षाच्या काही अगोदर आचार्य जन्मास आले होते. माधवाचार्यांनी आचार्यांचे जन्मकालाचे ग्रहस्थिती-नुषंगाने एका श्लोकात म्हटले आहे.

लग्ने शुभे शुभयुते सुषुवे कुमारं
श्रीपार्वतीव सुखिनी शुभभिक्षिताच
जाया सती शिव गुरोर्निजतुं गसंस्थे
सूर्ये कुजे रविसुते व गुरौच केन्द्रे

अर्थांत त्यावेळी शुभग्रहासहित शुभ लग्न तिथी होती, बृहस्पति केन्द्रस्थानी होता, मेष राशीचा सूर्य, मकरातील मंगळ, तूळेतील शनि आपल्या उच्च स्थानातील राशीत गणल्या जातात. लग्नाचा चौथा, सातवा आणि दहावा ही स्थाने कुंडलीत केन्द्रे मानली जातात. ज्या वर्षी आणि ज्या दिवशी अशी ग्रहस्थिति येथे होत्ती तो काल, तो दिवस शंकराचार्यांचा जन्म-काल दिवस होय. श्रृंगेरी मठात आणि अन्यत्र ही

शंकराचार्यांची जन्मोत्सव-तिथी वैशाख शुक्ल मानली जाते, जेव्हा त्या वेळी चंद्र आर्द्रा नक्षत्रावर असतो (असे मानले जाते.) यावरून अनुमानाने असे म्हणता येईल की, वैशाख शु. जन्मदिन होता. सूर्य येथे उच्च स्थानी मानला गेला आहे. तोसुद्धा वैशाख महिन्यात मेष राशीत उच्च स्थानी असतो. जन्मपत्रिकाकर्त्यांनी पत्रिकेचे गणित भारतातील विविध प्रांतातील प्रचलित रीति – अनुमानावरून करता, मलबारमध्ये प्रचलित असलेल्या पराहित नावाच्या गणना विशेषावरून क्रमाने केले आहे. यातील कालगणला कलिच्या ३७८५ च्या नंतरच्या कालातील आहे अर्थात् ही आचार्यांच्या कानडी या जन्मग्राम ठिकाणी त्या अगोदर २२५ वर्षापूर्वीची अवस्था आहे. या सर्वांचा विचार करता आणि माधवाचार्यांच्या ग्रंथातील लिहिलेल्या ग्रहस्थितीनुसार तसेच दक्षिणेकडील सुविख्यात असलेल्या लोककथा इत्यादी वरून पराहित–विधीच्या अनुषंगाने शंकराचार्यांचे जन्म-कुंडलीचे कालमान पुढीलप्रमाणे असल्याचे दिसून येईल.


विक्रम वसंत ८६३, शक ७२८, कलिवर्ष–३९०७ खिस्ताद्ब ८०५, वैशाख शु. ५ सोमवार घटि १७, फळे १८, आर्द्रा नक्षत्र घटि ०, पळे १९, कर्क लग्न, राशि ३, अंश २९, कला १७, ' कलिपासून सौराहर्गण १४,२६,७१५ घटि १७ व पळे २५.

यामधील स्पष्ट ग्रहस्थिति येणे प्रमाणे:–

	रा०	अं०	क०
सूर्य	०	१६	३६
चंद्र	२	६	४५
मंगळ	९	२९	५०
बुध	१	१	५८
गुरु	३	१९	४१
शुक्र	१	२९	२७
शनि	६	१३	२७
राहू	६	७	४४
केतु	०	८	४४

वरील शंकराचार्यांच्या जन्मटिपणावरून पहाता त्यात कर्क राशी लग्नात बृहस्पति आपल्या उच्च राशीत

जन्मग्रह



असल्याचे दिसून येते. त्याचे समोर बुध–शुक्रही असल्याचे स्पष्ट आहे. हा एक उत्तम मोठा योग आहे हे सांगावयास नको. सूर्य, शनि व मंगळही उच्य राशीत आहेत. फलित सिद्धान्ताचे अनुसार ही जन्म-कुंडली अत्यंत यशस्वी विद्वान किंवा एकाद्या राजाचे सारखी असल्याचे सिद्ध होते. येथे वराहमिहिराचार्यकृत बृहज्जातक नावाच्या प्रचलित ग्रंथाच्या राजयोग अध्यायात एक श्लोक आहे–

कर्किणी लग्ने नरस्थे जीवे चन्द्रसितज्ञैरायप्राप्ते ।
मेषगतेके जात् विद्याक् विक्रमयुक्त् पृथ्वीनाथम् ।।

भावार्थ - ज्या बालकाचे जन्मकाल समयी कर्क–लग्नात बृहस्पति, मेषचा सूर्य आणि अकरा स्थानी बुध, शुक्र आणि चन्द्र असतो तो बालक पराक्रमी– विख्यात राजाच होऊ शकतो, हे लक्षात घेतले पाहिजे. हा असा दुर्लभ ग्रहयोग श्रीमद् शंकराचार्यांचे जन्मकालि आलेला होता.––

श्रीशंकराचार्यांच्या जन्म टिपणाचा विशेष लेख येथे अभ्यासू आणि ज्योतिष शास्त्राच्या जाणकार – व्यासंगी आणि उपयुक्त होण्यासारखा आहे, हे उघड आहे. त्याचा ते उपयोग करतीलच याचा भरवसा आहे.

(टीप : प्रस्तुत लेख 'सरस्वती' (अलाहाबाद) मासिकाचे फेब्रूवारी १९५७ च्या अंकातील एका पुन-मुद्रित लेखावरून घेतला आहे. मूळ लेख मद्रास १९११ च्या दरम्यान प्रसिद्ध होणाऱ्या 'इंडियन रिव्हय्' नावाच्या मासिक पत्रिकेतून श्री गिरिजाप्रसाद त्रिवेदी यानी त्यावेळी उद्घृन केला होता; तोच येथे मराठीत वाचकास दिला आहे.)

जहांगीर आणि ज्योतिषी

लेखक : वि. के. फडके, बी. ए.

मोगल सम्राट जहांगीर याचा ज्योतिषशास्त्रावर पूर्ण विश्वास होता. त्याच्या पदरीं कित्येक हिंदु ज्योतिषी व पण्डित होते. कुठेंहि प्रवासाला किंवा युद्धाला निघण्यापूर्वी तो त्यांच्यांकडून प्रथम शुभमुहूर्त काढून त्य वेळेंसच निघण्याची खबरदारी घेत असे.

'जहांगीर नामा' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या आपल्या दैनंदिनींत या संबंधांत त्यानें जी हकिकत लिहून ठेवीलीं आहे, ती बरीच मनोरंजक आहे.

त्यावरून असें दिसतें कीं, स्वत: जहांगिराला देखील ज्योतिषशास्त्राचें बरेंच ज्ञान होतें. ग्रहांची शांति केल्यानें किंवा ब्राह्मण व गोरगरीब यांना विविध प्रकारचें दान दिल्यानें पापग्रहांची बाधा होत नाहीं, किंवा झालीच तर फार कमी होते, या गोष्टीवर त्याचा पूर्ण विश्वास होता.

जहांगिराजवळ एक धार्मिक पुस्तक होतें. कुठलेंहि लहान मोठें काम करण्यापूर्वी त्या पुस्तकाचें एखादें पान उघडून त्यावर जी ओळ प्रथम लिहिलेली असेल ती वाचून त्यावरून तो त्या कामांत यश येईल किंवा नाहीं, याचा अंदाज घेत असे !

तो बादशहा बनण्यापूर्वीपासूनच त्याला ज्योतिषशास्त्राची आवड उत्पन्न झाली होती व त्या शास्त्रावर त्याचा पूर्ण विश्वास बसला होता, असें दिसतें. कारण, 'जहांगीरनामा' या आपल्या दैनंदिनीच्या सुरुवातीलाच तो लिहितो, 'वयाची अडतीस वर्षें पूर्ण झाल्यावर एका ज्योतिषानें काढून दिलेल्या शुभमुहूर्तावर मी गादीवर बसलों.'

पुढेंसुद्धां दरबारांत प्रवेश करतांना तो ज्योतिषांनीं काढून दिलेल्या शुभमुहूर्तावर प्रवेश करीत असे. त्याच-प्रमाणें, लढाईवर निघतांना, एवढेंच नव्हे तर शिकारीसाठीं जातांनासुद्धां शुभमुहूर्तावर निघण्याचा नियम तो काटेकोरपणें पाळीत असे.

एकदां जहांगिराला एका युद्धांत जय मिळाला वा त्याचें कारण, 'आपण शुभमुहूर्तावर स्वारीसाठीं निघालो,' असें त्यानें लिहून ठेविलें आहे !

त्या प्रसंगीं तो आपला गणिततज्ज्ञ ज्योतिषी हकिमअल्ली याला म्हणाला, "युद्धामध्यें मला जो अपूर्व विजय मिळाला त्याचं कारण सांगूं ? तूं काढून दिलेल्या मुहूर्तावर मी स्वारीसाठीं निघालों."

"होय. शहेनशहा, स्वारीवर निघण्यासाठीं चांगल मुहूर्त बऱ्याच वर्षांनीं सांधतां आला व त्यामुळेंच विजय. श्रीनं आपल्या गळयांत यशाची माळ घातली." हकिमअल्ली त्यावर उत्तरला.

अशा प्रकारचे संवाद जहांगिराच्या दरबारांत नेहमी ऐकूं येत व ज्योतिषांनीं सांगितलेल्या भविष्याचा पडताळाहि त्याला बऱ्याच वेळा येई.

एकदां तो काश्मिरमध्यें असतांना एक विचित्र घटना घडून आली. त्या दिवशीं रविवार होता. त्याचा मुलगा शहाजहान राजवाडयांतील एका महालांत खेळत होता. खेळतां खेळतां तो मध्येंच खिडकीजवळ आला व वांकून खालीं पाहूं लागला. परंतु त्यावेळीं त्याचा तोल जाऊन तो सुमारे सत्तावीस फुटांवरून खालीं कोसळला.

परंतु दैवयोग असा कीं, तो पडला त्या ठिकाणीं पुष्कळशीं जाजमें अंथरून ठेवलेली होतीं. त्यामुळें त्याला एवढया उंचावरून पडूनसुद्धां मार बसला नाहीं.

जहांगीर लिहितो,' तीनचार महिन्यांपूर्वींच एका प्रसिद्ध ज्योतिष्यानं शहाजहानची कुंडली पाहून अस

भविष्य वर्तविलं होतं कीं, त्याला येते तीनचार महिने अशुभ आहेत. कदाचित् तो उंचावरून खालींसुद्धां पडेल. परंतु त्याच्या शरीराला अपाय होणार नाहीं. ज्योतिषाचार्यांची ही भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली !

हें भविष्य वर्तविणारा ज्योतिषी पूर्वी सम्राट अकबराजवळ होता व त्यानेंच त्याला ' ज्योतिषराय ' ही पदवी देऊन त्याच्या ज्ञानाचा यथार्थ गौरव केला होता. हा ज्योतिषी जातीनें ब्राह्मण होता व त्यानें वर्तविलेली बहुतेक भविष्यें तंतोतंत खरीं ठरलीं होतीं.

एकदां असेंच झालें. छोटा शहाजहान गळचाच्या दुख:ण्यानें अतिशय आजारी पडला. त्याला अन्नदेखील गिळता येईना. जहांगिराच्या पदरीं असलेल्या बऱ्याच ज्योतिषांनीं जहांगिराची कुंडली पाहून असें भविष्य केलें कीं, लवकरच त्याला पुत्रवियोगाच्या संकटाला तोंड द्यावें लागणार !

परंतु वर उल्लेखिलेल्या ज्योतिषरायाचें मत यापेक्षा सर्वस्वी भिन्न होतें. त्यानें सम्राट जहांगिराला छातीवर हात ठेवून सांगितलें कीं, या वर्षी त्याच्या भाग्यस्थानावर शुभग्रहांची दृष्टी असून त्याला शोक करण्यास लावील अशी एकहि घटना तूर्त तरी घडण्याची शक्यता नाहीं, फार तर बादशहाच्या कुटुंबातील मुलाचा मृत्यु घडण्याचा संभव आहे.

ज्योतिषरायाचें हें भविष्य तंतोतंत खरें उतरलें, कारण लवकरच शहाजहानला आराम वाटूं लागला व त्याची प्रकृति हळू हळू सुधारूं लागली. मात्र त्यानें पुढें सांगितल्याप्रमाणें बादशहाच्या दूरच्या नात्यांतील एक लहान मुलगी अचानक मरण पावली.

अशा प्रकारें ज्योतिषरायाचीं अनेक भाकितें खरीं ठरल्यामुळें जहांगिरानें प्रसन्न होऊन त्याच्या वजनाइतके रुपये (साडेसहा हजार रु.) त्याला बक्षीस दिले व त्याचा मोठा गौरव केला.

त्यानंतरहि एकदां जहांगीर अतिशय आजारी पडला असतांना ज्योतिषरायनें तो लवकरच बरा होईल अशी भविष्यवाणी करून मोठमोठ्या हकिमांना व वैद्यांना आश्चर्यचकित करून सोडलें. परंतु गंमत अशी कीं, त्यानें सांगितलेल्या दिवशींच बादशहा खडखडीत बरा झाला व त्या आनंदाप्रित्यर्थ त्यानें ज्योतिषरायाला पुन्हा सात हजार रुपये बक्षीस दिले.

पुढें एकदां चौदा पंधरा हजार रुपये किंमत असलेला एक मोती राजमहालांतून अचानक हरवला तेव्हां बादशहानें साहजिकच पदरच्या मोठमोठ्या ज्योतिषांना बोलावून तो मोती मिळेल किंवा नाहीं, हें सांगावयाची आज्ञा केली.

प्रथम ज्योतिषरायानें प्रश्नकुंडली मांडून सांगितलें कीं, दोनतीन दिवसांतच तो मोती सांपडेल.

सादिक खां ' रम्माल ' (रमल विद्या जाणणारा) म्हणाला, ' दोन व तीन दिवसांत एका पवित्र ठिकाणीं तो मोती अचानक मिळेल. '

असेंच भविष्य एका स्त्रीनेंदेखील बादशहाला कथन केलें. ती म्हणाली, ' एक गौरवर्णीय स्त्री हसतमुखानें तो मोती बादशहांच्याजवळ आणून देईल. '

आणि खरोखरच तिसऱ्या दिवशीं एका गौरवर्णीय तुर्की स्त्रीनें हसतमुखानें तो मोती बादशहाला आणून दिला. ती हसत मुखानें म्हणाली कीं, हा मोती प्रार्थनागृहांत मला सांपडला.

अशा प्रकारें सर्वच ज्योतिषांचें भविष्य खरें ठरल्यामुळें बादशहानें प्रसन्न होऊन प्रत्येकाला यथोचित बक्षीस दिलें.

' तुजुके जहांगिरी ' (म्हणजेच जहांगीरनामा) व ' आइने अकबरी ' मध्यें अशा प्रकारच्या अनेक विलक्षण घटनांची मोगलबादशहा जहांगीर व अकबर यांनीं नोंद करून ठेवलेली आहे. त्यावरून त्या काळांत मोगलांच्या दरबारांत ज्योतिषशास्त्राला किती मानाचें स्थान होतें हें दिसून येतें.

मंत्रशास्त्र—योगसिध्दी

लेखक-ज्योतिर्मुकुटमणी होरारत्न **आर. जी. सप्रे,** राहुरी.

सर्व ऐहिक गोष्टींचे विचार काढून टाकून परमेश्वराच्या अतर्क्य सामर्थ्याचे चिंतन करणे हीच ध्यान धारणा असून योग सिद्धीच्या मार्गातील ती सातवी पायरी आहे असे अधिकारी जनांचे म्हणणे आहे. ज्ञानी लोक त्यास निदिध्यास म्हणतात तर भक्त त्यासच भजन म्हणतात. चिंतन हेच मोक्ष मार्गाचे सुलभ साधन आहे. परमेश्वरी चिंतनावाचून आत्मज्ञान होणार नाही, आणि त्या वाचून दैवीसंपत्ती हाती येणार नाही. असाच योगी जनांचा संदेश आहे ध्यान धारणेत होणाऱ्या संवेदना अगर प्रथम दिसणारी वेगवेगळी दृष्ये ह्यांनी घाबरून जाण्याचे मुळीच कारण नाही. उलट अत्यंत चिकाटीने साधन चालू ठेवण्यानेच अखेरचे ध्येय गाठतां येते, हे लक्षांत ठेवले पाहिजे. त्याचप्रमाणे योग सिद्धि अगर ईश्वरी साक्षात्काराबद्दल अधीरता उपयोगी नाही. तसेच देहाची शुद्धी—भावना—हरपली तरी त्यांत भिण्याचे कारण नाही. उलट हा असाधारण अनुभव मिळणे हीच महत्वाची गोष्ट आहे. त्यासाठी थोडे धैर्य पाहिजे व ते अनुभवांनी आपोआप प्राप्त होते.

ध्यान धारणेने अंतःस्फूर्ति जागृत होण्यास मदत मिळते. मनांतील सर्व प्रकारच्या शंका दूर होऊन मनाची समतोल वृत्ति कायम ठेवतां येते. शुद्ध विचार उत्पन्न होतात व त्यामुळेच शुद्ध रक्त निर्माण होऊन शरीर निरोगी होण्यास मदत मिळते. चिंतनाने सर्व दुष्ट विचारांची होळी करिता येते आणि आपल्या अंतर्यामी असलेल्या महान तेजाची साक्ष पटते. आणि असा अनुभव येऊ लागला म्हणजे सर्व ऐहिक अडचणीबद्दल विधि-निषेध वाटेनासा होतो. स्वामी शिवानंदांचा वरील संदेश प्रत्येकाने मनन करण्यासारखा असून त्यातच ऐहिक व पारमार्थिक प्रगतीचा पाया असल्याची साक्ष पटते.

कित्येकांना स्वप्न दृष्टांतद्वारे पूर्व सूचना मिळतात व त्या कालानुरोधाने सत्यसृष्टीत उतरत असल्याची प्रचिती मिळते. नुकताच सदर लेखकास आलेला अनुभव विशेष महत्वाचा असल्याकारणाने तो ह्या ठिकाणी मुद्दाम नमूद करीत आहे. दर सोमवारी सदर लेखकाचे घरी परगावचें एक प्रख्यात डॉक्टर येत असतात. सुमारे एक वर्षापूर्वी सदर डॉक्टरांना स्वप्न पडले; त्यात सदर लेखकाचे टेबलावर कोणीतरी एक नवीन टाईप रायटर आणून ठेवला आहे. दुसरे सोमवारी ते डॉक्टर नित्याप्रमाणे लेखकाकडे आले असताना परदेशचे एक गृहस्थ सदर लेखकास भेटण्यास आले व काही वाच्यता नसतांना एक टाईप रायटर आणून देण्याचे त्यांनी आश्वासन दिले. पुढे ते गृहस्थ परदेशात कामावर रुजु होण्यासाठी गेले. त्या नंतर एक वर्षानी अचानक मुंबईचे एका गृहस्थांनी सदर लेखकाचे उपयोगासाठी एक टाईप रायटर मशीन घेतले शुक्रवारी त्यांनी मुंबई सोडली व मध्ये एका गावी मुक्काम करून सोमवारी सकाळी दहा वाजतां ते मुंबईचे गृहस्थ सदर लेखकाचे घरीं येऊन त्यांनी टेबलावर ते मशीन ठेवले. तत्पूर्वी एक तास अगोदर डॉक्टरही सदर लेखकाचे घरी आले होते व ते त्याठिकाणी बसले असतानाच टाईप रायटर देण्यांत आला. ही गोष्ट इतकी अकल्पिक घडली आहे की, त्यात कोणताहि प्रयत्न न करिता डॉक्टरचे स्वप्न त्यांच्या देखतच (फक्त सोमवारी सकाळीच त्यांचा मुक्काम ह्या गावी असताना) सत्य सृष्टीत उतरावयाचे होते. अर्थात् ह्या सर्व घटनेच्या मागे काही तरी सुप्त शक्ति कार्य करीत असली पाहिजे अशी खात्री पटते. कारण केवळ योगायोगाने ह्या सर्व गोष्टी वरीलप्रमाणे घडून येणे संभवनीय वाटत नाही.

वरीलप्रमाणेच मानवी विचारांचे जडवस्तूवर होणारे संस्कार व त्याचे अनुभव पहावयास मिळालेली आणखी एक घटना घडून आलेली आहे. एका गावच्या सीमेच्या बाहेरच्या बाजूस मूर्ति कोरलेला एक मोठा दगड पडलेला होता तो एका गृहस्थाने गावातील एका प्रमुख ठिकाणी आणून बसविला त्यावर कोरलेल्या मूर्तिमुळे त्याचेवर हार, फुले वगैरे वाहून कांही लोकांचे नवसास ती मूर्ती पावल्यामुळे त्या मूर्ति पुढे भजन पूजन वगैरे कार्यक्रम होऊ लागले. कित्येक महिने ह्या प्रमाणे संस्कार चालू राहिले, परंतु ज्या गृहस्थानी ती मूर्ति आणून बसविली त्यांना अत्यंत त्रास होऊ लागला व शेवटी त्याच्या मनावर परिणाम झाल्याचे दिसू लागल्याकारणाने त्यांचे एका स्नेह्याने ती मूर्ति उचलून गावाचे दुसरे टोकास नेऊन ठेविली. त्यानंतर लवकरच पहिले गृहस्थ बरे होऊन पूर्ववत् आपला काम धंदा पाहू लागले. ह्या सर्व घटनेवरून त्या मूर्तिवर कांही ठराविक काळपर्यंत भजन पूजन वगैरे संस्कार व्हावयाचे होते असे स्पष्ट दिसते यावरून ज्यावेळी कारागिराने त्या दगडावर मूर्तीचे चित्र कोरले त्यावेळी त्याच्या विचाराचे जे संस्कार होते ते काही काळ पर्यंतच फलद्रूप झाले असे दिसून येते.

विचार ही महानशक्ति आहे. समुद्राच्या लाटे प्रमाणे विचारलहरी कार्य करीत असतात. विचाराचा बाण लक्षपूर्वकच सोडला पाहिजे. कुविचाराना केव्हाही थारा देता कामा नये व त्यासाठी मन नेहमी कार्यमग्न ठेवणे जरूर आहे. विचार शक्तिचे सामर्थ्य वर्णन करावयाचे म्हटले तर एक स्वतंत्र ग्रंथही पुरणार नाही. दिव्यश्रुती दिव्यदृष्टी, ही मनाचे व विचारांचे एकाग्रतेनेच प्राप्त करून घेता येतात असे शास्त्रज्ञांचें मत आहे. पश्चिमात्य शास्त्रज्ञानी विचाराचे सामर्थ्य पुढील शब्दांत वर्णन केले आहे.

We boild our future thought by thought . For good or bad we know it not : Yet so the nuiverse is worught.

"Thought is another name for fate; Choose then they destiny and wait, For love and hate brings hate.

" Mind is the master of the sphere Be calm be steadfast, and sincere; Fear is the only thing to fear.

"Thought, like an arrow flies where sent. Aim well, be sure of lhy intent. And make thy own environment." (Leo)

मंत्र रहस्यांत सायनाचार्यांनी साधनेंश अनुसरून फल मिळते असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे साधना जितकी उत्कृष्ट तितके लवकर फल मिळते, परंतु तशी न झाली तरी उशीराने का होईना साधनेचे फल मिळाल्या वाचून रहात नाही, कित्येक वेळा मंत्रसिद्धीच्या वेळी काही अकल्पिक अडचणी निर्माण होतात. परंतु अशावेळी साधकाच्या निष्ठेची कसोटीच असते व साधना नेटाने पुढे चालविल्यास ती संकटे आपोआप दूर होतात. विनाशांत विकासाचे बीज असते हे तत्त्व ह्याठिकाणी समजावून घ्यावे लागते व जसजसे अनुभव येतात तसतसे परमेश्वराच्या अगाध लीलेचा अचंबा वाटून अंत:करण कृतज्ञतेने भरून येते.

निसर्गापेक्षा काही वेगळ्या शक्तिचा अविष्कार दिसला की आपण त्यास सिद्धी म्हणतो. काहीना पूर्व-जन्मींच्या तपश्चयर्येने लवकर यश मिळते. तर काहीना ते ह्याच जन्मांत तपश्चर्येने मिळवावे लागते. आपल्याला जे समजत नाही त्यावर आपला विश्वास बसत नाही. म्हणून प्रत्येक गूढ शास्त्रांतील सुप्त सामर्थ्याचा अभ्यास करून ते समजावून घेतल्यास त्यापासून आत्मसाक्षात्कार झाल्यावाचून रहात नाही. प्रयत्नानेच पूर्णत्व प्राप्त होते. आणि श्रद्धेनेच सर्व चमत्कारांचा उलगडा होऊ शकतो. ह्याबाबतींत इंग्रजी शास्त्रज्ञाचे पुढील वाक्य अत्यंत महत्वाचे आहे.

"Faith is the element which transforms the ordinary vibration of thought, created by the finite mind of man, into spiritual equivalent. It is the only agency through which the cos mic fosce of Infinite Intelligence can be harnessed and used by man Faith is the 'eternal elixir' which gives life, power and action to the impulse of thought..." (N. H)

श्रद्धायुक्त अंतःकरणानें केलेले कोणतेहि काय फुकट जात नाही. एवढेच नव्हे तर श्रद्धेत फार मोठे सामर्थ्य आहें अशी साक्ष पटून देते.

देवांची निर्गुण व सगुण स्वरूपे म्हणजे अव्यक्त व व्यक्त देव होत. प्रतिमेत देवकला आणण्याचा 'प्रतिष्ठाप्रयोग' व त्या संबंधी खुलासा, तसेच तंत्र शास्त्रांतील काही महत्त्वाचा खुलासा श्री. कामत यांचे श्रीगुरुचरित्राचे मोठ्या प्रतीचे परिशिष्ट पान ७६५ वर पहावयास मिळतो. तरी जिज्ञासूनी त्याकडे अवश्य लक्ष द्यावे म्हणजे बऱ्याच शंकांचे निरसन होण्यास मदत मिळेल अशी अपेक्षा आहे.

त्याचप्रमाणें आरंभी उल्लेख केलेल्या ग्रंथात परमेश्वर कोण, तो कोठे आहे, त्याला कसें ओळखावे वगैरे संबंधी खुलासा सदर ग्रंथाचे पृष्ठ १७५ वर केला असून, योग सिद्धीबद्दलचे विवेचन सदर ग्रंथाचे अखेरचे प्रकरणात केले आहे. सांपत्तिक अडचणी दूर होण्यासाठी प्रत्येक मंगळवारी व शुक्रवारी "श्रीलक्ष्मी हृदय नारायण हृदय" ह्या स्त्रोत्राचा साधा अगर संपुटपाठ नित्य पठणाने शुभफल मिळाल्याची काही उदाहरणे लेखकास माहीत आहेत. संपुटपाठ म्हणजे काय व तो कसा करावा याचा खुलासा वरीलपैकी श्री. नारायण स्त्रोत्राचे शेवटी आहे. जिज्ञासूनी तो अवश्य पाहून नंतर स्त्रोत्रपठण करणे जास्त हितकारक ठरेल.

निरपेक्षबुद्धीने केलेल्या उपासनेचे महत्त्व फार मोठे आहे. तरीपण सकाम अगर निष्काम ह्यापैकी कोणतीही उपासना करतांना जरुर ते नियम पाळणे आवश्यक असते. शक्ति व सामर्थ्य ह्यांचे महत्त्व आपणास सगळीकडे दिसून येते. आत्मशक्तिने कित्येक कार्यांची सिद्धी करून घेता येते. व ती शक्ति म्हणजेच देवीची उपासना होय. प्रत्येकजण आपल्या कुळांतील परंपरेप्रमाणे वेगवेगळ्या देवतेची उपासना करीत असतो, तरीपण सांप्रतच्या काळांत गणपतीची व देवीची उपासना करणेहि श्रेयस्कर आहे. कित्येकांना पूर्वजन्मार्जित संस्कारामुळे लवकर सिद्धी प्राप्त होते तर काहीना कित्येक तपें उपासना करूनही त्यांचे श्रेय मिळत नाही. परंतु ते निष्ठेने मिळविण्याचा प्रयत्न सोडता कामा नये. उपासना ही केव्हाही वाया जाणारी गोष्ट नाही. तिचे फल कालानुरोधाने मिळालेच पाहिजे असा सिद्ध पुरुषाचा सिद्धांत आहे. काही वेळा पूर्वकर्म–दोष निवारणार्थ ठराविक संख्या होईपर्यंत व तसेच द्रव्याचे दान करीपर्यंत ते दोष निवारण होत नाहीत, ह्या संबंधीचे दाखले "श्रीगुरुचरित्रांत" पहावयास सापडतात.

० ० ०

ग्रहांचा मनुष्यावर परिणाम

लेखक– होराभूषण सुवर्णपदक विजेते **अरविंद दत्तात्रय बर्वे,** B. Sc. D.I.A.S.

निग्रहाने व निष्ठेनें केलेल्या मंत्रजपाचे सामर्थ्य फार मोठे आहे; त्याचप्रमाणे निष्ठापूर्वक अनुष्ठान सर्व बंधने पाळून केल्यास त्यापासून प्रत्यक्ष फल प्राप्ती मिळाल्याची कित्येक उदाहरणे आहेत सिद्धपुरुष अगर महात्मे ह्यांचे चरित्र सूक्ष्म अवलोकन केले तर त्यांनीही प्रथम उपासना केली असल्याचे दिसून येते. सारांश ऐहिक जगांत ज्या प्रमाणे कायद्याची बंधने पाळावीच लागतात त्याचप्रमाणे अध्यात्म जगतांत त्यासंबंधीचे सर्व नियम काटेकोरपणाने पाळल्यास त्यापासून इष्ट फल प्राप्ती झाल्यावाचून ती रहात नाही. सध्याचे सर्व बाजूनं अनिश्चित परिस्थितीत प्रत्येकाने आपली आध्यात्मिक प्रगती करून घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यापासून थोडी तरी स्वस्थता मिळून आत्मबल वाढण्यास मदत मिळेल असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

सर्वेऽपि सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया:
सर्वे भद्राणि पशन्तु मा कश्चिद दु:खमाप्नुयात

भविष्यकाळातील घटना जाणून घेण्याच्या अनेक साधनापैकी 'फलज्योतिष' हे प्रमुख साधन होय. मनुष्याच्या जन्मकाली असणाऱ्या आकाशस्थ रविचंद्रादि नवग्रहांच्या स्थितीवरून त्या मनुष्याच्या भावी जीवनातील घटना वर्तविणे हे फल ज्योतिष्याचे स्वरूप होय. आकाशस्थ ग्रह-तारे मानवी जीवनावर परिणाम करतात हे फलज्योतिषशास्त्राने गृहित धरले आहे.

फलज्योतिषशास्त्र खोटे आहे असे कोणीही सिद्ध करू शकलेले नाही परंतु लक्षावधि मैल दूर असलेल्या ग्रहांचा परिणाम मनुष्यावर कसा होऊ शकेल? हाच मुख्य आक्षेप घेतला जातो व या आक्षेपाचे निराकरण करण्याचा प्रयत्न सदर लेखात केलेला आहे.

विश्व व्यापून टाकणारी तीन विविध कार्यशक्तीची क्षेत्रे विज्ञानात आहेत. १) चुंबकिय क्षेत्र २) विद्युत क्षेत्र ३) आकर्षण क्षेत्र.

सूर्य जसा स्वयंप्रकाशित आहे तसेच ज्या ताऱ्यांनी नक्षत्रे बनली (व नक्षत्रांनी राशी बनल्या) ते तारेही स्वयंप्रकाशित आहेत. या सर्वांपासून प्रकाश किरण फेकली जातात. ग्रह हे कमी अधिक प्रमाणात परावर्तनाचे कार्य करतात. ही सर्व प्रकाशकिरणे 'इलेक्ट्रिसिटी'च्या सिद्धांतानुसार स्वत:सह चुंबकिय क्षेत्र निर्माण करतात. पृथ्वी हाही मोठा चुंबकच आहे. अर्थात प्रकाशकिरणे ही चुंबकाद्वारे पृथ्वीवर येतात. यामध्ये पृथ्वीच फक्त भाग घेते असे नसून इतर ग्रह गोलही असेच कार्य करतात. प्रकाशकिरणे ही जशी एक कार्यशक्ति आहे तसेच इतर चुंबकिय शक्ति तसेच न्युटनच्या सिद्धांतानुसार आकर्षण शक्ती या सर्व शक्ति दोन गोलामधील वरील तऱ्हेचे प्रक्षेपण (Radiation) कार्यास मदत करतात. म्हणूनच अन्य गोलावरून पृथ्वीवर होणारे कार्यशक्तिचे हे संचलन मनुष्याच्या जीवनातील घटनास कारणीभूत होते.

ही झाली जुनी कारण मीमांसा, आता नवीन पाहू फलज्योतिषास अत्याधुनिक आधार.

ग्रहांचा मनुष्यावर परिणाम होतो या विधानास जग प्रसिद्ध वैज्ञानिक व गणितज्ञ आल्बर्ट आईनस्टाईन यांचे अत्याधुनिक संशोधनाने एक फार मोठा आधार सापडला आहे.

आईन्टाईनने जी नवी आकर्षण शक्ती (Gravitational energy) म्हटली ती सर्व शक्तिहून भिन्न असून सर्व विश्वांत पसरली आहे. ही आकर्षण शक्ति

उत्सर्गाच्या (Radiation) रूपात व्यक्त होते. व या शक्ती उत्सर्गाच्या लहरी आहेत त्या आकर्षण लहरी होय. आकाशस्थ वस्तूमानाचा समूह जेव्हां आपल्या गतीमध्ये बदल करतो तेव्हा आकर्षण लहरी निर्माण होतात.

ग्रह हे सूर्याभोवती फिरत आहेत, त्यांच्या गतीमध्ये बदल होत असतो. अर्थातच प्रत्येक ग्रह स्वतःच्या अशा आकर्षण लहरी निर्माण करतो. अर्थात प्रत्येक ग्रहाचे आकर्षण क्षेत्रही असतेच. तात्पर्य, प्रत्येक ग्रहाला आकर्षण शक्ती, आकर्षण क्षेत्र व आकर्षण लहरी या संस्था लागू आहेत.

सुर्याभोवती फिरणारे मंगळ बुधादि ग्रह स्वतःच्या आकर्षण लहरी निर्माण करतात व त्यांचा दुसऱ्या ग्रहांवर परिणाम होऊन ते स्वतःच्या कक्षेतून (दुसरे ग्रह) किंचित स्थानभ्रष्ट होतात उदा–पृथ्वी सूर्याभोवती फिरताना स्वतःच्या आकर्षण लहरींनी सूर्याच्या आकर्षण क्षेत्रांत विशिष्ट परिणाम करतात तद्वतच कोणत्याही ग्रहांचा कोणत्याच दुसऱ्या ग्रहावर परिणाम होतो. म्हणजेच पृथ्वीवर सुर्य–चंद्र मंगळादी ग्रहांचा परिणाम होतो.

ह्या आकर्षण लहरींना अंतराचे बंधन नसते प्रकाश-लहरी कोठूनही अनंत अंतराहून आल्या तरी त्यांच्या परिणामात फरक होत नाही. लहरींची कंपनवेगसंख्या हीच परिणामास कारण असते. Frequency बाबत या लहरी अत्यंत सूक्ष्म तशा अत्यंत विशालही असतात किंबहुना यामुळेच या आकर्षण लहरींना स्थळकाळाचा अभाव असताही परिणाम करू शकतात.

चंद्रावर मनुष्य पाठविण्याच्या युगांत आपण फल ज्योतिषावर विश्वास ठेवतो यामुळे आपण हास्यास्पद होऊ या समजूतीने अनेक सुशिक्षित (?) लोक ज्योतिष-शास्त्राची होटाळणी करतात. परंतु फलज्योतिष हे एक सर्वश्रेष्ठ व उदात्ततम शास्त्र आहे असे डांटेचे मत होते तसेच गुरुत्वाकर्षणाच्या शोधाचा जनक सर ऐझॅक न्यूटन एका कुंडलीवर विचारमग्न झाला असताना फलज्योतिषाकडे आकर्षिला गेला. या शास्त्राचा त्याने अभ्यास केला व रोज तो कांही वेळ या शास्त्राच्या साठी खर्चित असे. न्यूटन सारख्या श्रेष्ट शास्त्रज्ञाने फलज्योतिषावर विश्वास ठेवावा हे याचे आश्चर्य वाटते परंतु त्यानेच खगोल श्यास्त्रज्ञ 'हॅले' यास स्पष्ट लिहिले की I have found there exists a definite relationship between the hevy bodies (Planets) and the human life and other. terrest rial phenomenon, Hence it is my unwilling submission to believe in astrology.

—o—

' राज योग !'

लेखक–साहित्यभूषण, होराभूषण, **श्री. एम्. सत्यनारायण,** डी. आय्. ए. एस्.

सध्या जगामधील बहुसंख्य लोक आपल्या जन्म–कुंडली मध्ये ' राज–योग' आहे काय ? हे पाहाण्यासाठी ज्योतिष्यांना सारखे विचारीत असतात आणि ते सहाचिकच आहे. पण कुंडली मध्ये ' राज–योग' असल्या शिवाय तरी ज्योतिष्यानी सांगावयाचे कसे ! म्हणून कुंडलीमधील ' राज–योग' कसा पाहावा ते येथे थोडक्यांत देतो.

राजयोगाचे प्रकार –

(१) सामान्य योग आणि (२) राज–योग.

प्रत्येक कुंडली मध्ये सामान्य योग असतोच. पण सामान्य योगामुळे लोकांना तितकेसे समाधान लाभत नाही. आणि म्हणूनच प्रत्येकजण आपले पत्रिके मधील राजयोगा संबंधी माहिती विचारण्यास उत्सुक असतो. आता आपण राजयोगा संबंधी विचार करू:–

राज-योग म्हणजे काय ? काही ' ज्योतिष,' शास्त्राचा सखोल अभ्यास न करताच कुंडली बघून राजयोग कारक ग्रह दिसल्यास लगेच स्तुती करू लागतात. हे चुकीचे आहे. खरं म्हणजे कुंडली बघून भविष्य वर्तवितांना ते शास्त्रोक्त (सांयिटिफिक) असावे लागते.'

राज योग म्हणजे, 'राजा' होणे किंवा राजासारखा वैभव अधिकार भोगणे असे म्हणतात. कुंडली मधील ग्रह बलवान असून राज–योग पूर्णत: असेल तर ती व्यक्ति आवश्य 'राजा' होऊ शकते; परंतु नुसता राजयोग असून ग्रह जर बलवान नसतील तर सदर व्यक्ति ' राजा' सारखा वैभव अधिकार भोगते पण राजा मात्र होत नाही. ज्याचे कुंडलीत ' राज–योग' आहे अशा व्यक्तिला वर्तमान महादशा, अंतर्दशा किंवा विदशा वाईट असले अथवा गोचर ग्रह वाईट असले तरीहि त्या पासून होणारा त्रास ती व्यक्ति आनंदाने भोगू शकते. पण सामान्य योगाचे कुंडलीचे व्यक्तिना होणारा त्रास फारच दुःखाने भोगावा लागतो.

ज्योतिष ग्रंथात अनेक प्रकारचे योग सांगितले आहेत. अर्थात् ते सर्वच येथे देण्याचे हे स्थळ नाही. पैकी रुचक, भद्रक, हंसक, मालव आणि शशक–योग असे राज योगाचे मुख्य पांच भेद असून यालाच पंच महा पुरुष लक्षणे असेहि म्हणतात. शिवाय राज–योगा मध्ये हजारो योग आहेत. त्याचा संपूर्ण अभ्यास करावयाची इच्छा असली तरी शास्त्रज्ञाला कमीत-कमी सहा वर्षे लागतील. आणि संशोधनात्मक दृष्टीने परिशिलन करून आधुनिक पद्धतीने समन्वय करावयाची भावना मनांत असली तरी एकंदर बारा वर्षे पाहिजेत. म्हणून वेळ आणि स्थळाअभावी थोडक्यांत काही राजयोगाचे प्रकार येथे विवरण करीत आहे :—

(१) तीन ग्रहापासून उच्च राशीमध्ये असणे हा एक राजयोग आहे. लघु जातकामध्ये असे म्हटले आहे की,

" त्रिप्रभृतिभिः उच्चस्थैः नृपवंश भवा भवन्ति राजानः "

(२) ज्या कुंडलीत कर्क लग्नी गुरु असून अकराव्या स्थानात चंद्र, शुक्र, बुध असून रवि मेषेंत असेल तर तो पराक्रमवान आणि राजा होऊ शकतो. बृहज्जातकांत असे म्हटले आहे की, " कर्किणि लग्ने तत्स्थे जीवे चंद्र सितज्ञैराय प्राप्तैः मेषगते ऽर्के जातं विद्या द्विक्रम युक्तं पृथ्वीनाथम । "

(३) ज्या कुडलीत मकर लग्न असून त्यांत शनि मेषेंत मंगळ, कर्कंत चंद्र, सिंहेत रवि, मिथुनेत बुध

तुळेंत शुक्र असता तो कीर्तिवान आणि भूपाल होऊ शकतो. श्री. वराहमिहिराचार्यनें असे म्हटले आहे की, ' मृगमुखेऽ कंतनये तनुसंस्थे क्रियकुळिर हर यो ऽधिपयुक्ताः 'मिथुन तौळिसहितौ बुधशुक्रौ यदि तदा पृथुयाशाः पृथ्वीशः ।"

(४) ज्या कुंडलीत गुरु, बुध आणि शुक्र लग्नांत असून सप्तम स्थानात शनि व दशमस्थानात रवि असल्यास ती व्यक्ति राजासारखी भोगवान असते. मागमुनीने म्हटले आहे की, "जीवज्ञ भार्गवैर्लग्ने सप्तमस्थे ऽ र्कनंदने, दशमस्थेरवौ जातो भोगवान् पुरुषो भवेत ।"


(५) सर्व ग्रह सात राशीमध्ये असता त्यास वल्लकी योग म्हणतात. या योगांत जन्मलेला मनुष्य सूक्ष्मदृष्टीवान गायनप्रिय, नाटयप्रिय आणि मित्रजन परिवृतः असतो.

६) सर्व ग्रह सहा राशी मध्ये असल्यास दामिनी योग होतो. सदर योगाची व्यक्ति दान शिल, गो गण रक्षक परोपकारी असते.

७) सर्वग्रह पांच राशीत असलेल्या योगाला पाश योग म्हणतात. पाशयोगामुळे जातक उत्तम मार्गाद्वारे धनार्जन करिते.

८) सर्वग्रह चार राशीत असल्यास त्यास केदार योग म्हणतात. केदारयोगावर जन्मलेली व्यक्ती पुष्कळ लोकांवर उपकार आणि उपचार करावयाची बुद्धि असलेला महाबुद्धिवान असतो.

योगांचीं विभागवार प्रमाणी :–



(अ) सामान्य योग (ब) राजयोग

राजयोगामध्ये – (१) महाराज योग आणि २) नाभास योग असे दोन मुख्य प्रकार असून महाराज योगामध्ये १) सार्वभौय योग आणि २) प्रव्रज्या योग असे दोन उपप्रकार आहेत. शिवाय नाभसयोगामध्ये १) आकृतियो २) संख्यायोग ३) आश्रयोग आणि ४) दळयोग असे चार उपप्रकार असून आणखी अनेक प्रकारचे विभाजन आहे.

नल योग, माला योग, सर्प योग. ते असे:– रज्जू योग, मुसल योग, आकृति योग संख्यायोग आश्रय योग दळ योग सर्पयोग. स्त्रक्सर्पयोग, गदायोग, शकटयोग, विहंगयोग, शृंगारकयोग, हलायोग, वज्र, यव, कमल, वापी, यूप, शर, शक्ति, दंड, नौयोग, कूटयोग, समुद्र, चक्र, छत्र, धनुर्योग, युगयोग आणि गोलकयोग इत्यादि नाभस योगांतर्गत योग श्री. वराहमिहिराचार्या प्रमाणिनुसार एक हजार आठशे योग आहेत. शिवाय चंद्रयोग, अधियोग, सुनफा, अनफा, धुरधुरा, केमद्रुम, कुसुम, गजकेसरी, पारिजातयोग, बुधदित्ययोग, चंद्रमंगळयोग, उपचय, द्विग्रह, त्रिग्रह, चतुर्गृह, पंचग्रह, षड्ग्रह, सप्तग्रह आणि अष्टग्रह योग इत्यादि हजारो योग हे शास्त्र वाचत असता सापडलेले आहेत.

वरील सर्व प्रकारचे योग राजयोगासाठी लघुजातक बृहज्जातक, बृहत, पराशरहोरा, उत्तरकालामृत, जैमिनी सारावळी, गर्गसंहिता आणि शतयोग मंजरी इत्यादि ग्रंथ वाचून श्री. बादरायणांचे वचन, श्री. पाराशर्याणांचे मतानुसार, सत्याचार्यांचा अभिप्राय, गार्ग्यमुनीचे प्रमाण कालिदासानी केलेल्या समन्वयानुसार, श्री. वराहमिहिराचार्यांचे नूतन संशोधनानुसार आणि आधुनिक योग पद्धतिचे परिशिलनासह समन्वय करून, ग्रहस्फुट करून आपले ज्ञानशक्तिद्वारे सर्व ग्रहांची रश्मि साधना आणि गणित पद्धतिनुसार जातक फळ सांगावे

० ० ०

वक्ता सुखी प्रजायुक्तो बहुनिर्वो निरर्थकः ।
पूर्वाभाद्रपदा जातो नरो भवति दुःखितः ॥

पूर्वाभाद्रपदामध्ये जन्माला येणारा पुरुष वक्ता, सुखी संतानयुक्त निरर्थक रहाणारा आणि दुःखी असतो.

गौरः समस्तधर्मज्ञः शत्रुघाती च पामरः।
उत्तरा भाद्रनक्षत्रजातः साहसिको भवेत् ॥

उत्तरा भाद्रपदामध्ये जन्माला येणारा गोऱ्या रंगाचा असतो, सर्व धर्मांना जाणणारा, शत्रूचा नाश करणारा पामर आणि साहसी असतो.

भारताबाहेर ज्योतिषशास्त्राचे स्थान

लेखिका–कु. स्नेहसुधा अंबाडे



कु. स्नेहसुधा अंबाडे

या विश्वाची निर्मिती परमेश्वराने केलेली असून सृष्टीतील चराचराचे व्यवहारहि परमेश्वरी इच्छेनुसार चालतात. पृथ्वीवरील सजीव सृष्टीचा व विश्वातील गोलांचा अतिशय निकटचा संबंध आहे. व मानवाच्या प्रयत्नापलिकडे एक दिव्य गूढ शक्ति आहे हे जगातील कोणाही व्यक्तिस मान्यच करावयास हवे.

'मनसा चिंतितं कार्य दैव अन्यत्र चिंतयेत्' अशी मानवाची कित्येकदा अवस्था होते. प्रयत्न योग्य दिशेने केले गेले असूनहि किंवा सर्व गोष्टी सहजसुलभ असतानाही जेव्हा ध्येय अथवा यश दुर्लभ होते तेव्हा मनुष्याला 'दैव' मानावे लागते मग त्यास कोणी कर्मभोग म्हणो पूर्वसुकृत म्हणो अथवा इश्वरेच्छा म्हणो !

व्यक्तिचे प्रारब्ध तर श्रेष्ठ आहेच पण दैवाची अनुकुलता किंवा प्रतिकुलता ज्योतिषशास्त्राच्या आधारे अजमाविता येते. मानवाचा सुखप्राप्तिसाठी नित्य प्रयत्न चालू असतो. मनोविकार आणि इच्छा-शक्ति यांच्या जोरावर मनुष्याने इच्छित फलासाठी जरूर प्रयत्न करावा परंतु मनुष्याच्या बुद्धीचे क्षेत्र मर्यादित आहे व म्हणूनच जगातील शे. ९५ लोक दैववाद मानतात. जगातील सर्व देशांमध्ये आणि विशेषतः भारतामध्ये ज्योतिषशास्त्रावर बहुसंख्य लोकांची श्रद्धा दिसून येते.

परंतु आजचे स्वतःला सुधारक म्हणविणारे आधु-निक बुद्धीवादी ज्योतिष शास्त्रावर अनेक आक्षेप घेतात व ज्योतिष शास्त्र हे शास्त्रच नव्हे तर ती एक भ्रममूलक कल्पना आहे असे विधान करण्यासही ते कचरत नाहींत परंतु भारतीयांना अंधश्रद्धाळू व पुराणमतवादी (orthodox) ठरवून पाश्चात्यांचे अनुकरण करणारे हे लोक विसरतात कि, ज्योतिषशास्त्र केवळ भारतापुरतेच मर्यादित नसून ते जगामध्ये पूर्वापार चालत आलेले एक विगमनात्मक शास्त्र आहे. ऋग्वेदामध्ये व महाभारतामध्ये अनेक ठिकाणी ज्योतिष-शास्त्रासंबंधीचे उल्लेख आढळतात त्यावरून ज्योतिष-शास्त्र हे परकियांचे नसून मूळ भारतातीलच आहे हे स्पष्ट होते परंतु संशोधन केल्यास असेही आढळून येईल कि, भारतीयांइतकाच इतर देशातील लोकांचा या शास्त्रावर विश्वास आहे. उदाहरणार्थ आपण सायन पद्धतीचा अवलंब करतो तर पाश्चात्य निरयन पद्धती मानतात. पद्धती, ग्रहांची नावे भिन्न असतील परंतु ग्रहिततत्वे, ग्रहांचे गुणधर्म व फले यांचे भारतातील ज्योतिष शास्त्राची सर्व जगातील ज्योतिष शास्त्राचे साम्य आहे.

जर्मन महाकवि गटे याने स्वतःच्या आत्मचरित्रा-

मध्ये त्याच्या जन्मवेळेच्या ग्रहास्थितीचे उत्तम वर्णन केले आहे व त्यावरून भारतीय व पाश्चिमात्य ज्योतिष्यशास्त्रातील अभिन्नत्व सिद्ध होते त्याने लिहले आहे. त्याच्या जन्मवेळी रवि कन्या राशीत ख-मध्यावर आलेला होता गुरू शुक्र मित्र असून शनि, मंगळ सम होते. व बुधही प्रतिकूल नव्हता, पूर्ण चंद्र विशिष्ट तासांत पोहोचलेला असून जन्मकाळी प्रतिकूल होता.

म्हणजेच भारतीयांप्रमाणे चंद्राचा मनावर ताबा असून कवित्वशक्ति, वेड इ. गोष्टी चंद्राच्या स्थितिवर अवलंबून असतात असेच पाश्चिमात्य मानतात.

पाश्चात्य राष्ट्रात चिरो या हस्तरेषा तज्ज्ञ व फलज्योतिष शास्त्र तज्ञानेही दोन वर्षे भारतात राहून ज्योतिष शास्त्राचा अभ्यास केला होता.

भारता प्रमाणे पाश्चिमात्य विद्वानांनीही या शास्त्रात निरनिराळ्या प्रकारे संशोधन करून काही अनुमाने निश्चित केली आहेत दैववाद हा केवळ भारतातच नसून नेपोलियन सारख्या शूर बुद्धीवादी दृढनिश्चयी योद्धयालाहि केवळ दैव प्रतिकूलतेमुळे यशास मुकावे लागले व दैवाचे सामर्थ्य मान्य करावे लागले १८२४ साली राजत्याग करून एल्बा बेटात जाण्यापूर्वी त्याने आपल्या पत्नीस लिहले आहे की,

"Since providence whose purpose I have nither to missunderstood has given its verdict against me and in favour of my enemies and lacking men money and munitions. I can no longer fight against it and subdue its will to mine.'"

एवढेच नव्हे तर त्यानेच मुळे भावक दैववादी वृत्तीने पुढे लिहीले आहे !

I have no idea what the future holds for you but whatever it be I hardly think that destiuy will bring us together again."

नेपोलियनसारख्या व्यक्तिच्या तोंडून असे उदगार निघावेत यामध्येच दैवाचा जय नाही काय ? तात्यासाहेब केळकर, लो. टिळक यासारख्या असामान्य कर्तत्व अंगी असलेल्या, कणखर वृत्तीच्या प्रयत्नवादी व्यक्तिनी दैवाचे सामर्थ्य मानावे याचे आपणास आचर्श्य वाटते परंतु ब्रिटिश साम्राज्याची धुरा सांभाळणाऱ्या दुर्दम्य आशावादी पं. चर्चिल यांनीही आपल्या Thought and adventures या पुस्तकात दैवाची शक्ती मान्य करून म्हटले आहे की,

"Let us be contented with what has happened to us and be thankful for all we have been spared. Let us accept the natural order in which we move, Let us reconciel ourseuves to the mystrocs rhythm of our destinies such as this must be in this world of space and time."

प्रख्यात ज्योतिषी वुइल्यम लिली याने १६४८ साली पहिल्या चार्लसच्या मृत्युचे व इंग्लंडमधील राज्यक्रांतीचे भविष्य वर्तविले होते व त्यानंतर दोन वर्षानंतर ते खरेही ठरले.

अगदी अलिकडेच २६-२-६७ च्या दै. लोकसत्तेमधे माझ्या वाचनांत आले आहे कि बॉन मधील मादाम बूशेला या जर्मन स्त्रीने तिच्याकडे आलेल्या पत्रकारास स्वतःच्या व्यवसायासंबंधी माहिती देऊन मुलाखतीत

सम्पूर्णाङ्ग शुचिदर्दक्षः साधु शूरा विचक्षण
रेवती सम्भवो लोके धनधान्यैरलंकृतः ॥

रेवती नक्षत्रावर जन्माला येणारी व्यक्ती सर्व जाणणारा, पवित्र निपुण साधू वीर आणि प्रवीण तसेच धनधानयनें अलंकृत असतो.

म्हटले आहे कि, 'डॉक्टर्स, प्रोफेसर्स वकिल, कोटयाधीश, खासदार, मंत्री यापैकी बहुतेकजण भविष्याविषयक सल्ल्यासाठी मजकडे येतात पौर्वात्य देशातील. राजेरजवाडे आपल्या खाजगी चिटणीसांना धाडतात. संध्याकाळी अंधार पडल्यावर ही मंडळी आपली मोटार पाठवून मला त्यांच्या निवासस्थानी घेऊन जातात.'

या वरून असेच सिद्ध होत नाही का कि, जर्मनी सारख्या प्रगत राष्ट्रातील सुक्षिक्षित लोकांचाही या शास्त्रावर विश्वास आहे !

हॉलिवूड सारख्या चित्रपट निर्मितिसाठी प्रसिद्ध असलेल्या अत्याधुनिक राहणी व विचारसरणीच्या नटनटींच्या निवासाने नटलेल्या शहरातही ज्योतिषी व्यवसायिकांना फार मोठी मागणी आहे.

हॉलिवूडमध्ये कॅरोल रायटर(Carrol Righter) या प्रथम क्रमांकाच्या ज्योतिष व्यावसायिकाच्या सल्ल्यानेच तेथे प्रत्येक चित्रपटाची सुरूवात होते असे वाचनात आले आहे. इतकेच नव्हे तर सुप्रसिद्ध नटी मार्लिन डिट्रिच हिचाही ज्योतिष शास्त्रावर विश्वास असून प्रत्येक प्रवासाचेवेळी ती ज्योतिषाचा सल्ला घेते. मार्लिन प्रमाणेच ग्रेटा गार्बो, सूसान हेवर्ड, टॅब हंटर आलिव्हिया हॅविलॅंड इ. नटनटींचे दिग्दर्शकांशी होणारे करार कॅरोलच्या सल्यानुसारच होतात असेही वाचनात आले आहे.

पाश्चात्य राष्ट्रातील लोकांचा केवळ फलज्योतिष्यावरचा नव्हे तर संख्याशास्त्र व हस्तसामुद्रिक शास्त्रावरही तितकाच विश्वास आहे माञ भारतातील पूर्वाचार्यांनी हस्तसामुद्रिक व फलज्योतिष शास्त्रामध्ये सखोल संशोधन केलेले आढळते.

सांगावयाचे तात्पर्य इतकेच कि आजचा सुशीक्षित वर्ग गणित शास्त्राने सिद्ध झालेले व कार्यकारण तत्वाने बांधलेलेच सत्य मानतो परन्तु कार्यकारणसबंधाने सर्व गोष्टी सिद्ध होत नाहीत. इतर अनेक शास्त्राप्रमाणे ज्योतिष्यशास्त्र हेही एक आधिभौतिक शास्त्र असून. त्याचीही कांही गृहीततत्वे आहेत. चंद्रसूर्याचे नियमित उदय, अस्त, चंद्राच्या कला, तारकांच्या स्थानातील बदल गुरू शुक्र या तजोगोलांचा उदय अस्त, ग्रहणे यांचा मनुष्याच्या सुखदु:खावर व शरीरावर परिणाम होतो व यावरून पक्ष, महिना, वर्ष ही कालगणना करतात. यावरूनच ग्रहगणिताची (Astronomy) निर्मिति झाली आहे व ग्रहगणित हा ज्योतिषशास्त्राचा पाया आहे. म्हणूनच ज्योतिष हे केवळ कला नसून शास्त्र आहे हे मान्यच करावयास हवे.

० ० ●

" ज्योतिषाचे समाजातील स्थान "

लेखक : भालचंद्र म. लेम्भे एम. ए.

हिंदुस्थानचा नावलौकिक ज्या काहीं शास्त्रामुळें जगांत दुमदुमला त्यांत ज्योतिष शास्त्राचाहि प्राम-ख्यानें उल्लेख करावा लागेल. परंतु इतर अनेक गोष्टींप्रमाणें आपल्या कूपमंडुक वृत्तीमळें या शास्त्राचीहि सुसंगत अशी प्रगति होऊं शकली नाही. याचे कारण एका श्लोकात वर्णन केले आहे.

ज्योतिःशा।महह्रोदधौ बहुतरोंत्सर्गापवादात्मभिः।
कल्लोलैर्निबिडै कणान्कति पयान् लब्ध्वा कृतार्थाइव।
दीर्घायुः सुतसंपदादि कथनै दैवज्ञपाशा इमे।
गेह गेहं मनुप्रविश्य धनिनां मोहं मुहुकुर्वते ॥ १ ॥

" अनक सिद्धांत व त्यांच्या अपवादरूपी लाटांनी पूर्ण असलेल्या ज्योतिषशास्त्ररूपी महासागराच्या पाण्याचे थोडेसे कण मिळाल्यानें कृतार्थ झाल्यासारखे वाटणारे हे कुगणक धनवान लोकांना दीर्घायु, संतति संपत्ति आदिंचे भविष्य सांगून घरोघर हिंडून आपले पाश त्यांच्या भोवती टाकतात "

ब्रम्हदेवाचा आव आणून ही मंडळी 'तमेकं वेधसंविना' या ऐवजी 'तमेकं अहं विना' असेच समजून वाटेल त्या गोष्टी कथन करीत. त्यामळे या शास्त्राचे आधुनिक दृष्टिकोनांतून संशोधन वा संवर्धन होण्याचे बाजूलाच राहिले उलट या शास्त्राची टिंगल वा टवाळीच होऊं लागली. किंबहुना असे करणें वा मानणें पुरोगामित्वाचे लक्षणच मानले जाऊं लागले.

वास्तविक ज्योतिष जाणणें वा त्याची इच्छा बाळगणे यांत गुन्हा वा कमीपणा काय आहे हे कळणे अशक्य आहे. आपण जर एकाद्या नाटकाला गेलो तर तेथील त्या नाटकाची कालमर्यादा आपणाला निश्चित माहित असूनहि प्रत्येक प्रसंगानंतर आता पुढचा प्रसंग काय येणार म्हणून आपण उत्कंठेने वा मोठ्या जिज्ञासेने पाहण्यास आतूर झालेलो असतो. मग आपले जीवन हे जगाच्या रंगभूमिवर चाललेले एक नाटक वा त्यांतिल एक भाग असताना उद्या आपणास कोणती भूमिका कशी करावी लागणार याची जर चौकशी केली तर त्यांत बिघडले कोठे ? किंबहुना ही जिज्ञासा असणे ही एक मानवी प्रवृत्तिच मानावी लागेल.

आकाशस्थ ग्रहांचे सर्व प्राणिमात्रांवर परिणाम होत असतात हे सांगण्याची काहीं आवश्यकता नाहीं. इतकेच काय पण नवीन संशोधनानें आता हेहि सिद्ध झाले आहे की ग्रह जरी आपणापासून इतक्या दूर असले तरी वस्तू व ग्रहांच्या मधील अंतर परिणामाच्या आड येत नाही. असे असताना ज्योतिषशास्त्राची जी अवहेलना होते त्याला कारण वर उल्लिखिलेली ज्योतिषांची वृत्ति व पूर्वग्रह दूषित जनतेची दृष्टि याखेरीज दुसरे काहीच नाही. एका पाश्चात्य विद्वानाने म्हटले आहे.

" We cannot deny the influence of the stars,
Without disbelieving in the wisdom of God "

खरे पाहतां आज समाजात डॉक्टर्स, वकील यांना जे स्थान आहे जी प्रतिष्ठा आहे त्यांच्याहून कितीतरी अधिक पटीने ज्योतिषाला मान वा सन्मान मिळायला हवा. कित्येक वेळा डॉक्टर वकिलांच्या बाबत कोणताहि अधिक्षेप न करतां असे म्हणावेसे वाटते कीं यांना ही

जी प्रतिष्ठा वा समाजात मान आहे त्याची आवश्यकताच काय ?

पण कां कुणास ठाऊक आपण डॉक्टरांच्याकडे मोठ्या आदरानें पाहत असतो एवढे मात्र खास. एखाद्या डॉक्टराचे एखादे निदान चुकले तर तोहि मान ताठ करून सांगतो माझे निदान चुकले व आपणहि ते मान्य करून इतरांना कौतुकानें सांगत असतो. दावा हरलेल्या विधिज्ञाच्या बाबतहि हेच म्हणता येईल.

वास्तविक समाजांत आदराचे स्थान प्रथम कोणाला मिळणें अगत्याचे असेल तर ते ज्योतिषाला नंतर शिक्षकाला व त्यानंतर इतर. पण आज तरी परिस्थिति अगादि उलट आहे. कुडमुड्या ज्योतिषांनी ज्योतिष हा एक दीडदमडीचा धंदा आहे अशीच समज सर्वसाधारणपणे करून दिली आहे.

इतर अनेक झगड्याप्रमाणें दैववाद का प्रयत्नवाद हाहि झगडा अनंत काळ चालूं आहे.

"दैवं फलाने सर्वत्र न च निंद्या न पौरुषम्"

"मनसा चिंतित कार्यं देव अन्यत्र चिंतयेत्"

येथपासून "यत्न तो देव जाणावा" किंवा "उद्धरेदात्मनात्मानम्" येथपर्यंत अनेक उलट सुलट मते या बाबत मांडली गेली आहेत. ज्योतिष हे एक अनुभवजन्य शास्त्र आहे आणि इतर अनुभवजन्य शास्त्राकडे आपण ज्या भूमिकेतून पाहतो त्याच भूमिकेतून जर शास्त्राकडे पाहिले तर हे जे प्रश्न निर्माण होतात ते होणार नाहीत वा जी दिशाभूल केली जाते तीहि केली जाणार नाही.

ज्योतिषशास्त्राकडे आपण ज्याप्रमाणें एका मर्यादित अर्थाने पाहणे आवश्यक आहे तद्वतच ज्योतिषानीहि आपल्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. ज्योतिष हा एक धंदा या दृष्टिने त्याकडे न पाहता ज्योतिष हा एक संस्कार या भूमिकेतून त्यानी या शास्त्राकडे पाहिले पाहिजे. अर्थात हे फलादेश सांगणाऱ्यानाच लागू आहे.

आज फलादेश जाणून घेणाऱ्यांची संख्या किती मोठी आहे किंबहुना अपवादात्मक एकादे उदाहरण सोडता समाजातील सर्व थरातील लोकांना आपले भविष्य काय आहे हे जाणून घेण्याची उत्कंठा सतत लागून राहिली आहे. मंत्र्यापासून संत्र्यापर्यंत व रावापासून रंकापर्यंत प्रत्येकजण उद्याचे काय म्हणून ज्योतिषाला विचारीत असतो. परंतु हे करत असता आपणाकडे कोणी पाहणार नाही ना वा आपले हे विचारणे कोणाला कळणार तर नाही ना याची तो खबरदारी घेत असतो.

स्वतःला "हिंदु" म्हणवून घेणे हे ज्याप्रमाणे कमीपणाचे, प्रतीगामीत्वाचे वा लज्जास्पद वाटते अशा तऱ्हेचा एक न्यूनगंड समाजात निर्माण झाला आहे तशीच परिस्थिती या शास्त्रासंबंधाने झाली आहे.

सुदैवाने आता ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. तथापिहि ज्योतिषांचा या शास्त्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन व जनतेचा या शास्त्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याखेरिज एकूण परिस्थितीत विशेष असा बदल घडेल असे आम्हास वाटत नाही. जे ज्योतिषी रस्त्यावर बसत तेच एखादे तथाकथित उपाधि घेऊन आंत बसू लागले एवढाच बदल झाल्याचे दिसेल.

आणि म्हणून आपणास वा या शास्त्रास समाजात मानाचे स्थान कसे मिळेल याचा विचार ज्योतिषांनी केला पाहिजे. केवळ जनतेच्या भावनांशी खेळून त्यांची दिशाभूल करून पैसा उकळणे ही या शास्त्राशी प्रतारणा केल्यासारखे होईल.

थोडक्यात Deserve and desire या वृत्तीने वा धोरणाने जरी ते वागले तरी त्याना समाजात मानाचे स्थान मिळेल व त्यांचा व्यावहारिक प्रश्नहि सुटेल.

—o—o—

" दैव, उद्योग, व संख्याशास्त्र "

लेखक-मंत्ररत्न प्रो. करमकर ५१ बुधवार, पुणें २

मानवी जीवनात 'दैव' व 'उद्योग' या दोन घटनांचे इतके विलक्षण प्राबल्य आहे की सर्वसाधारण माणसास यातील खरे कोणतें व खोटे कोणते हे न सुटणारे कोडेच होऊन राहिले आहे. उद्योगाने साध्य झाले नाही म्हणजे ते आपल्या दैवातच नाही असे म्हणण्याची प्रथाच पडलेली आहे. 'दैव' हे आहे तरी काय याचे संशोधन करणारी अनेक शास्त्रे आहेत खरी. हस्तरेषेवरून, जन्मवेळेवरून, मुखपरिक्षेवरून ही शास्त्रे प्रचलीत असून दैवाची रूपरेखा समजते असे वरील शास्त्रांचे अभिप्राय आहेत. संख्याशास्त्रही या वरील शास्त्रांच्या पंक्तीमध्ये खात्रीने बसू शकेल असे आमचे मते आहे. ज्योतिषशास्त्राशी ते उत्तम सहकार्य करू शकते असे मत पाश्चिमात्यांचेही आहे.

कोणत्याही व्यक्तीचे दैव पहावयाचे असेल तर संख्या शास्त्रदृष्टया आम्ही त्या व्यक्तीची जन्मतारीख, महिना व सन ही विचारात घेतो. व इंग्रजी तारीख घेऊन त्यावर संशोधन करून काही प्रमेये ठरवली गेली आहेत. व त्या संख्यांचा ग्रहाशी संबंधही जोडला आहे. अंक प्रामुख्याने १ ते ९ आहेत. 'शून्य' ही विशेष प्रभावी बाब आहे. प्रत्येक संख्येला विशेषत-हेचे अर्थ आज कत्येक हजारो वर्षांच्या अनुभवाने, संशोधनाने दिलेले आहे हे आपण पहातोच व तसे संख्येच्या अर्थाचा उपयोगही आपण आपल्या रोजच्या व्यवहारातसुद्धा वापरतो. 'त्याचे बारा वाजले' म्हणजे तो कंगाल झाला. 'असे सतराशे साठ पाहिले आहेत.' याचा अर्थ ती व्यक्ती क : पदार्थ आहे. 'छत्तीसाचा आंकडा दोघामध्ये आहे.' याचा अर्थ भिन्न मतांचा व न पटण्याचा मार्ग दोघांनी अवलंबिला आहे 'पांचामुखी परमेश्वर' म्हणजें पाच जणाचे एकमतानें सांगतील ते परमेश्वराचे वचन असण्याइतके माननीय व वंदनीय आहे असे कित्येक भाव व्यक्तीच्या दैवाशी निगडीत झालेली संख्यारूपानी प्रगट करण्याची प्रथा मानवी जीवनात आहे. आपल्या जन्मतारखेत कोणत्या संख्या आहेत हे प्रथम निश्चित झाले म्हणजे त्या संख्येने दाखविलेले भाव चैतन्य बीजरूपाने त्या व्यक्तीमध्ये असणारच असे गृहीत धरले जाते. आपल्या जन्मतारखेत ज्या प्रकारच्या संख्या असतील त्याप्रमाणे मनुष्य जन्मता काही गुण घेऊनच जन्माला येतो. मग त्यामध्ये काही गुण व काही अवगुणही असू शकतील. जे गुण आहेत ते आपले मुद्दल आहे. व मानवी जीवनाचा पाया होय व जे अवगुण आहेत ते अवगुण अडचणीच्या रूपाने, प्रगतीमध्ये अडवणूक करणारे, जीवनाचा जो हेतू 'नराचा नारायण होणे' हा जो आहे त्याला केव्हा प्रगतीपर केव्हा अडथळा असे दाखविणारे अर्थ त्या संख्येतून निघतात. संख्यांचें अर्थ जरूर लक्षांत पाहिजेत.

१ अधिकार,	२ अनिश्चितपणा.	३ सौख्य,	४ प्रवास,
ओढचता,	नशीबवान	अव्यवहारीक	कीर्तीलोलूप
५ हटवादीपणा	६ कलाकुशल	७ विद्याव्यासंगी	
बुद्धीमान	त्यागी	पोकळडौली	
८ ध्येयनिष्ठ	९ कीर्तीवान		
कष्टाळु	अपंगुत्व		

असे हे अर्थ प्रामुख्याने त्या त्या संख्येच्या अमलाखाली असलेल्या व्यक्ती, समाज अगर राष्ट्रेसुद्धा यामध्ये प्रामुख्याने दिसलीच पाहिजेत, गुण व अवगुण यांचा प्रामुख्याने निर्देश केला आहे.

प्रत्येक व्यक्तिला आपला भाग्यांक आपल्या जन्मतरखेवरून काढता देईल. हा भाग्यांक काढण्यासाठी

तारीख महिना व सन अशांची बेरीज घ्यावी लागते उदा.-आज ता. ११-१-१९६७ अशी आहे. याची बेरीज घेतली तर ११+१+१९६७=१९७९=२६= ८ म्हणजे या व्यक्तिचा भाग्यांक ८ येतो म्हणजे वर सांगितलेले ८ या संख्येचे जे अर्थ आहेत ते म्हणजे ध्येयनिष्ट व कष्टाळू अशी ही व्यक्ती होईल. जन्मभर शरीर कष्ट करावे लागते पण ते सुद्धा एखादे विशीष्ट ध्येय नजरे समोर ठेऊन त्याप्रमाणे करण्या करता कष्ट करावे लागतील. विशेष म्हणजे या व्यक्तीच्या ८ वे वर्षी १७ वे वर्षी २६ वे वर्षी व ३५ वे वर्षी पाऊल पुढे पुढे पडत चाललेले दिसेल. आणखी कितीतरी गोष्टी या व्यक्ती सबंधाने लिहिता येतील. म्हणजे या व्यक्तीने ध्येयनिष्टेचे ध्येय अनकुल असून प्रयत्नाने बरेच कष्ट जरी सोसावे लागले तरी त्यामध्ये जन्म-तारखेला निरनिराळ्या अंकावरून दिसून येणारी कार्यसिद्धि व अलौकिक निश्चित रितिने दृष्टोत्पत्तीस येईल. कारण जन्मतारखेच्या संख्येमध्ये तारखेचे ११ म्हणजे २ महिन्याचा १ व सनाचा १९६७ म्हणजे बेरीज करून ५ येतात. म्हणजे या व्यक्तिला २, १, आणि ५ या संख्येचे जन्मजात आलेले गुण व अवगुण प्रगतीला पोषक असेच राहतील. जन्मतारीख प्रापंचिक वातावरण, महिना अंक भोवतालच्या समाजाचे वातावरण, व सनाचा अंक देशांतील वातावरण; दाखवणारे असल्यामुळे त्या सर्वांकडून कितपत सहाय्य व विरोध होईल. हे या व्यक्तिचा जो भाग्यांक ८ आहे. त्यावर अवलंबून राहिल.

अशा रितिने प्रथम व्यक्तिचा भाग्यांक व त्याच्या भोवतालच्या परिस्थितीचें थोडेबहूत अकलन जरूर करता येईल. व त्या प्रमाणे त्याला प्रगतीसाठी कशा तऱ्हेची सल्ला-मसलत द्यावयाची हे उत्तम रितिने ठरविता येते. याच वरील तारखेला जरी हजारो व्यक्ती जन्माला आलेल्या असल्या तरी प्रत्येकाचे एकंदर वातावरण वेगळे वेगळे असते. त्यावर अर्थात त्याची प्रगती अवलंबून राहिल. पण त्याच्या अंगी असलेले गुणधर्म मात्र वर सांगितल्या प्रमाणे असतीलच. दैव अनुकुल राहिल. प्रयत्नांची पराकाष्ठा बरीच करावी लागणे हे मात्र अटळ असेच आहे.

ज्योतिषशास्त्रदृष्टचा पाहिले असता या व्यक्तीची ८ ही भाग्य संख्या शनिग्रहाच्या अमलाखाली येते. त्यादृष्टीने प्रत्येक ग्रहाला जी एक एक संख्या दिलेली आहे. त्या संख्येच्यादृष्टीने काही ग्रहांची अनकुलता अगर प्रतिकुलता जन्मापासूनच आलेली दिसेल उदा. वर ज्या व्यक्तीची आपण जन्मतारीख वगैरे घेतली आहे. त्या व्यक्तीला जन्मतारखेच्या बेरजेची २ ही संख्या चंद्राच्या अंमलाखाली यते. महिन्याची १ ही संख्या रवीच्या अंमलाखाली येते. व सनाच्या बेरजेची संख्या ५ ही बुधाच्या अंमलाखाली येते. म्हणजे या व्यक्तीला चंद्र, रवी आणि बुध या ग्रहांचे गुण अवगुण शरीरात रूजलेले असणार त्यांचा उपयोग या व्यक्तीला निश्चित करून घेता येईल. ही झाली एकंदर दैवाने दिलेली जन्माच्या वेळची शिदोरी होय. या शिदोरीवर प्रत्येक व्यक्तीला मानवी जीवन सफल करावयाचे असून मानवी जीवनाचा हेतू अध्यात्म दृष्टीने जो ठरवून गेला आहे. तो म्हणजे, नराचा नारायण होणे यादृष्टीने या शिदोरीवर वाटचाल करावयाची आहे. ह्या वाटचाली-मध्ये येणारे अडथळे कोणते, येणाऱ्या संधी कोणत्या-ते अडथळे नाहीसे होण्याकरिता काय उपाय योजावेत हे ठरविणे अत्यंत आवश्यक आहेत. व्यक्तिने कितीही मोठ्या बढाया मारल्या कसाही युक्तीवाद मांडला तरी मानव कमकुवतच वाटतो. निसर्गामध्ये ज्या असंख्य बलाढ्य शक्ती वावरत असतात त्याचा उपयोग मानवाने करून घ्यायला हवाच. व त्यासाठी त्याला निरनिराळ्या शक्तींची आराधना करावीच लागेल.

मग त्या शक्तींना तुम्ही कोणतेही नाव द्या. इच्छा शक्ती, क्रियाशक्ती, मंत्रशक्ती, दैवीशक्ती त्याला काय वाटेल ते नाव द्या. ही अनकुल करून घेतलीच पाहिजे तरच मानवी जीवनाची वाटचाल सुसंगत व बिनधोक होईल हेच प्रत्येक व्यक्तीचे आद्यकर्तव्य आहे. या योगे शरीर स्वाध्य, बुद्धी, विकास व निष्ठा यांचा लाभ होईल. आपण जे संख्याशास्त्रदृष्टचा वरील एका व्यक्तीच्या जन्माची संख्या विवेचनास घेतली आहे त्यावरून या व्यक्तीला कशा कशा तऱ्हेचे व किती प्रमाणात निसर्गातून सहाय्य घेता येईल, हे संख्या शास्त्रावरून निश्चितपणे आजमावता येण्यासारखे आहे या व्यक्तीचा भाग्यांक ८ आहे. याने बरोबर आणलेली शिदोरी २,१,५ या संख्यांची म्हणजे रवी, चंद्र आणि बुध यांची आहे. या व्यक्तीला होणारे अडथळे खालील संख्यापासून म्हणजे ३, ९ व चार किंवा ज्या व्यक्तीचे भाग्यांक ह्या संख्या आहेत. त्यांचेपासून प्रगतीला बरेच अडथळे होणार आहेत. ग्रहांच्या भाषेत बोलावयाचे तर गुरु, मगळ राहू (कोणी याला हर्षलही मानतात) या ग्रहाचे अडथळे फार; या संख्यांनी दाखवलेले अडथळे म्हणजे सौख्य कमी, अधिकार मिळण्यास अडचणी आणि प्रवासात हजारो अडचणी या नाहीशा होण्याकरीता आम्ही अशा व्यक्तिला मग शास्त्राचा आश्रय घ्यावा असे सुचवितो. प्रत्येक भाग्य संख्येचे काही ग्रह आहेतच की, ज्यांच्याकडून अडथळे व्हावयाचें ते दूर होण्याकरीता आम्ही काही दैवी उपासना किंवा ग्रहांची उपासना सुचवितो की, त्यायोगे अडथळे दूर होऊन प्रगतीचा रस्ता सुकर व्हावा. या गोष्टी अर्थात त्या व्यक्तीने करावयास पाहिजे. कोणत्या भाग्यांक संख्येने कोणत्या दैवी उपासनेला **दैवत** घ्यावे ते खाली दिले आहे.

(भाग्यांक संख्या)

एक- रवी (सूर्य)-नमस्कार घालणे व प्रकृतिच्या दृष्टीने आमलकी खाण्यात ठेवणे.

दोन- चंद्र (नवग्रहांतील)-चंद्राचा श्लोक म्हणणे आर्द (आले) खाण्यात ठेवणे.

तीन -गुरु (दत्त उपासना) भूईमूग.

चार -राहू- काळभैरवस्तोत्र वाचण्यांत ठेवणे (चणे खाण्यांत ठेवणे.)

पांच -बुध गणपती- गुळ खाण्यात ठेवणे.

सहा -शुक्र-देवी दूध खाण्यात ठेवणे.

सात-केतू-नवग्रहांचे स्तोत्र-पिंपळीं.

आठ-शनी-हनुमान (बटाटा खाण्यात ठेवणे.)

नऊ-मंगळ-काळभैरवस्तोत्र-हिरडा खाण्यांत ठेवणे.

यामध्ये **उपासना** व **खाण्यात कोणत्या** गोष्टी वापरांत घ्याव्यात ह्या गोष्टींचा उल्लेख केला आहे. कारण प्रकृती ठीक पाहिजे.

। शुभं भवतु ।



ज्योतिष व अध्यात्म

(ले. या. रं. कुलकर्णी बी. ए. अेल. अेल. बी. जोतिषप्राज्ञ)

अहमदनगर कॉलेजचे प्राचार्य श्री भास्करराव हिवाळे तत्वज्ञानाबद्दल सांगताना म्हणत, "एखाद्या यात्रेला हवशे व गवशे, नवसे जातात; पण हे काय करतात हे पहायला जातो त्याला म्हणायचं तत्वज्ञ."

ज्योतिष हे एक शास्त्र आहे असे म्हणताना एक गोष्ट प्रथम ध्यानात ठेवली पाहिजे की ईश्वरावर भरवसा ठेवणारे व त्यास प्रमुख मानणारे ते शास्त्र आहे. एवढेच नव्हे तर जड वस्तूमात्रापेक्षा, विश्वात परिभ्रमण करणाऱ्या स्वयंप्रकाशीत व परप्रकाशीत ग्रहांचा अगर ग्रहस्थितीचा साकल्याने अभ्यास करून त्यांच्या आघातकाली जन्मास येणाऱ्या प्राणीमात्रावर व घटनावर तत्कालीन ग्रहमानाचा काय परिणाम होतो हे स्थिर बैठकीतून सांगणारी ती एक शक्ती आहे.

कधी कधी असं सहज वाटतं की जेजे आहे किंवा जे निश्चीत घडणार आहे त्याच्या वर्णनात काय आस्वाद आहे. वरवर जरी या युक्तीवादावर भरवसा बसला तरी आतला आवाज निराळा असतो. आपले स्वरूप आपल्याला माहित असले तरी प्रतीमा (फोटो) ठेवावी वाटते. याला एक कारण असे की कालच्या ओघात आपणांत बदल होतात आणि आपण एका ठराविक क्षणाचे स्वतःचे चित्र सुद्धा ठेवू शकत नाही ते नजरेपुढे सुद्धा आणू शकत नाही. याशिवाय आपण स्वतःकडे सुद्धा स्थिर बैठकीतून पाहू शकत नाही. ज्योतिष आणि अध्यात्मशास्त्र मात्र अखिल विश्वाकडे अशा स्थिर दृष्टीने ठराविक कालच्या ओघाचा ठाव घेऊन पाहू लागते. कोणत्याही गोष्टीला आत्मनिष्ठ Subjective अगर वस्तूनिष्ठ Objective दृष्टी ठेवावी लागते आणि आपल्या समष्टीच्या भारतीय तत्वानुसार प्रत्येक प्राणीमात्र जे काही करतो, वागतो, उत्पादन करतो फार काय सांगू नाश सुद्धा करतो तो सर्वांकरतां करतो. केवळ स्वतः करता नाही ! गाई सर्वांकरता दुध देतात. वारा सर्वांसाठी वहातो. पाऊस सर्वत्र व सर्वांसाठी पडतो. गिरणीत पीठ दळणारा मजूर सर्वांसाठी दळतो.

मानवी जीवनात अध्यात्मिक भावनेस अति महत्वाचे स्थान आहे. व खरे सुख अध्यात्मीक पद्धतीची मनाची स्थिर बैठक जडल्या घडल्याशिवाय मिळणे दुरापास्त आहे.

विश्वाची विविधता अध्यात्मशास्त्र मानते. या विविधतेतूनच एक प्रकारची एकता निर्माण होते. एकादेवेळी वाद्यवृंदाच्या संचातून निरनिराळी वाद्ये असलीतरी, जशी एकादी गाण्याची लकेर निघते; तसेच जीवनातील विविध घटनातूनच समतेचा, ऐक्याचा; सुसंबद्धतेचा दूवा निघतो.

विश्वातील घटनांशी नजीकच्या प्रेमाच्या दृष्टीने बघून, तादात्म्य पावण्याच्या अनेक सिद्धांताचा पुरस्कार अनेक प्राचीन आचार्यांनी केलेला आहे. परकायाप्रवेश हा संदेह न धरला तरी मनाने केला पाहिजे. सोहऽम् व तव दासोहऽम् हे दोन्हीही उद्‌गार घेतले तरी त्यातून समतेची व नम्रतेची लय निघते.

अध्यात्म आणि ज्योतिष यांच्या अभ्यासाने, अनेक उदाहरणे व घटना पाहून दोन भावना तरंग मनापुढे हेलकावू शकतात. एक अशी की, विधीघटना अटळ आहे. दुसरी अशी की, समजून आल्यावर आपणास एकादे गोष्टीबद्दल खंत वाटते. हे निराळे पण स्थिर चित्त वृत्तीने पाहू गेल्यास त्यात काही आश्चर्य नाहीः कारण तशी अनेक उदाहरणे जगात घडली आहेत.

आणि पुढे घडतील. अशा रीतीने ज्योतिष दृष्टीकोनातून व अध्यात्म अभ्यासातून माणसाला स्थिरचित्तवृत्ती निर्माण होते.

जगात कोणतीही गोष्ट मुलतः चांगली नाही अगर वाईटही नाही. योग्यवेळी तेच कृत्य चांगले ठरते तर अयोग्य वेळी ते वाईट ठरते. या वेळी एक सकृत श्लोक मला आठवतो.

' असंतुष्टाः द्विजा नष्टा ।
संतुष्टाश्च नराधिपाः ।।
सलज्जा गणिका नष्टा ।
निर्लज्जाश्च कुलास्त्रियः ऽ । १ ।

जो एकाचा गुण तोच दुसऱ्याचा दुर्गूण, म्हणतात ना, ' योजकस्तत्र दुर्लभः ।।

जोतिषाच्या अभ्यासाने सुद्धा सयोजकतेचे (अॅप्लीकेशन) (योग्य रीतीने जोडण्याचे) महत्व कसे आहे हे पटते. चतुर्थ द्वादश अगर अष्टम स्थानातील मंगळ अशुभ खरा पण साधारणतः पत्नीचे तसेच ग्रहमान असल्यास त्या विवाहाने अशुभत्व जाऊन शुभफल प्राप्त होते.

अशा रितीने ज्योतिषशास्त्र व अध्यात्मज्ञान ही दोन्ही शास्त्रे परमेश्वरावर विश्वास ठेवणारी, त्याची शासनक्षमता मानणारी आहेत. दोन्हीही चांगली येण्यासाठी एका स्थिर बैठकीतून जगाकडे पाहण्याची व संयोजकतेची नजर येणे अवश्य आहे. एवढेच नव्हे तर आत्यंतिक ममतेच्या व समरसतेच्या भावनातून सृष्टीतील यच्चयावत् घटनाकडे प्राणीमात्राकडे पाहायची सवय दोन्हीसाठी जरूर आहे जगांत सर्वांना स्थान आहे. मारणाराला आहे. मार खाणाराला आहे. शिक्षा सांगणाराला आहे. शिक्षेची बजावणी करणाराला आहे. तसेच सर्वांचे थोडे फार बरे असेल. तर त्याची स्तुती करणाराला आहे. चूक दिसेल तर दोष देणारालाही आहे. एखाद्या वेड्याला दंड करायचा झाला तर जर डॉक्टर त्याजवर वेडा म्हणून दया दाखवा म्हणतील. न्यायाधीशही दंड करताना वेडा म्हणून दया दाखवायला विरोध करणार नाहीत. मात्र त्याच्यावर गुन्ह्याची जबाबदारी ठेवताना निकालाच्या वेळचे त्याचे वेडेपण लक्षात न घेता, आक्षेपार्ह कृत्य करताना त्याची स्थिती कशी वेडपट होती कां चांगली डे पाहातील. पण या भिन्न दृष्टी कोनाबद्दल दोघेही दोषास पात्र नाहीत. कारण दोघानीही आपले कक्षेतील शास्त्रानुसार व तत्वानुसार बाजू मांडलेली असते. नक्की याच दृष्टीकोनातून पहायची दृष्टी जोतिष सांगणारे व ऐकणारे याना यायला पाहिजे. कारण कुठलाही विशेष प्रयत्न न केल्यास काय होईल हे जोतीष सांगते. ते एक गतिमान शास्त्र आहे. जातक रहायचे ठिकाण लांब दुरवर बदलून देखील फलीतात बदल करू शकतो. असे म्हणतात की रावणाच्या एका हुषार जोतिषाने त्याला लांब दुरवर रहायला सांगितले होते. ग्रहाचे पुजन करून, दान करून रत्ने बाळगून परिश्रम करून योग्य माणसाशीं संबध जोडून जातकास जरूर पडल्यास फायद्यासाठी प्रयत्न करणे प्राप्त व अवश्य आहे.

कोणतेही शास्त्र किंवा तत्वज्ञान कितीही उत्तम असले तरी ते गतिमान राहीलेच पाहिजे. नवीन नवीन घटनांचा अभ्यास करून बदलत्या प्राप्तपरिस्थितीशी त्याची सांगड घालण्याची कुवत व धारणा धरून चालल्याशिवाय प्रगतीस वाव रहात नाही. उदाहणार्थ सध्याचे दिवसांत लूप अवलंबणाऱ्या स्त्रिया, खच्ची करणाची शस्त्रक्रिया करणारे स्त्रीपुरूष श्रीयुत व्ही. एम. जोशी थिअरी ऑफ फोनेटिक्स यांच्या सिद्धांत पुस्तकाबरहुकूम वागणारी कुटुंबे यांच्या कुंडल्यांचा समग्र अभ्यास केल्याशिवाय आपले जोतिषज्ञान अपुरे राहील. अध्यात्म दृष्टीने सुद्धा खरा परमार्थ संसार पाहुनच आपले भारतीय जोतीषी आकाशाचा असा असा ठाव घेवोत की नवे नवे प्रश्न व त्यांची गुंतागुंत याची उकल त्यांच्या संशोधन पद्धतीतून केला.

त्या दृष्टीनें पाहू गेले तर ऐहीक युगात अध्यात्मज्ञान अभ्यास परमेश्वर प्राप्तीनें संपेल.

पण ज्योतीष संशोधन मात्र ग्रहाप्रमाणें गतीमान व दैदीप्यमान राहील. आमचे फल जोतिषशिक्षण मंडळ पुणे त्यासाठी भरीव कार्य करील अशी आमची मनोमनी खात्री आहे. परमेश्वर ही जोत प्रज्वलीत राहाण्यास व ठेवण्यास आम्हास शक्ति देवो ही प्रार्थना

निश्चयाचे बळ तुका म्हणे तेची फळ ।

—०—

पुराणांतील ग्रहांच्या जन्मकथा

लेखक- पं. नारायण श्रीधर वारेशास्त्री, ज्योतिषालंकार

ग्रहाधीना नरेन्द्राणामुच्छ्रया पतनानिच ।।
भावाभावौच जगतस्तस्मात्पूज्यतमा: स्मृता: ।।
(याज्ञ. स्मृति)

आकाशाच्या महान् पोकळीत तरंगणारे असंख्य तारे आणि खगोल हे अधांतरी लोंबकळत राहातात; तर त्यांचे परस्परात गुरुत्वाकर्षण शक्ती असते म्हणून हे आकर्षण थोडे जरी ढिले पडले की, ते निखळून पडतात. यालाच आपण उल्कापात म्हणतो. ग्रह व पृथ्वी हेही पण खगोलच आहेत. अर्थात यांचे परस्परांतही गुरुत्वाकर्षण आहेच. पृथ्वीवर असणारे ग्रहांचे हे आकर्षण म्हणजेच सर्व प्राणीमात्रांच्या जीवनावर होणारे परिणाम होत. सूर्याभोवती परिभ्रमण करीत असता हे ग्रह पृथ्वीपासून जसे कमी अधिक दूर होतात तसे त्यांचे परिणामही कमीअधिक प्रमाणात होत असतात. याच कारणास्तव स्मृतिकारानी वरील श्लोकांत म्हटले आहे की, अखिल जगताचे भवितव्य उन्नति, अधोगती इत्यादि प्रकारची सर्व प्राणिमात्रांच्या जीवनामधील स्थित्यंतरे, हे सर्वच ग्रहांच्या आधीन आहेत. ग्रहांच्या अंगी इतके महान् व विश्वव्यापी सामर्थ्य असल्यावर त्यांना कोण पूज्य मानणार नाही.

याप्रमाणे सर्वपूज्य अशा ग्रहांची उत्पत्ती कशी झाली तर

निर्गुण: शाश्वतो देवस्त्वया प्रोक्तो दिवाकर: ।
सकथं तेजसो रश्मिरदितेर्गर्भे महाद्युति: ।१।ब्रह्मपुराणे
अनादिनिधन: श्रीमान्विष्णुर्नारायण: प्रभु: ।
स एव देव कार्यार्थं भूत्वा द्वादशधा पुरा । १ ।
अदितेर्जनयामास ह्यात्मानं कश्यपात्प्रभु: ।
तेषांतु मध्यात्सविता आदित्यस्यच देवता । २ ।
(विष्णुधर्मोत्तरे)

दक्ष प्रजापतीने आपल्या एकंदर साठ मुलीपैकी तेरा कन्या कश्यपऋषीला दिल्या. तेव्हा अदिती पासून सर्व देव, दिती पासून दैत्य, दनुपासून दानव विनतेपासून गरूडादि सर्व पक्षी आणि कद्रू इत्यादि बाकीच्यांचेपासून सर्पादि कृमिकीटक, व सर्व चराचर जीवजंतू जन्माला आले, दैत्य आणि दानव हे देवांच्या यज्ञाचा नाश करीत. यज्ञभाग पळवीत असत हा त्रास नाहीसा व्हावा व देवांचें रक्षण व्हावे या इच्छेनें अदितीने घोर तप केले. त्यायोगे शेषशायी भगवान् महाविष्णु प्रसन्न होऊन स्वत: अदितीच्या उदरी सूर्यरुपाने जन्मले व देवांचें व यज्ञयागांचे रक्षणकर्ते झाले. असा ब्रह्मपुराणांत व विष्णुधर्मोत्तर पुराणांत सूर्यांचा जन्म कथन केला आहे.

पिता सोमस्य भोविप्र जज्ञेऽत्रिर्भगवानृषि: ।
नेत्राभ्यांतच्च सुस्राव दशधाद्योतयद्दिश: ।१।
(स्कांद पुराणे)

विष्णुरेवाभवद्राजन्पुत्र: स मृगलाञ्छन: ।
दाक्षायणी वसोर्नाम पत्नी धर्मस्य विश्रुता ।१।
जनयामास धर्मज्ञं वसुमध्ये निशाकरम् ।
श्रीसहायस्तथा जात: सोमश्चामृत मन्थनात् ।।२।।
प्राकाम्येन शशांकस्य जन्मतेऽभिहितं त्रिधा ।।
(विष्णुधर्मोत्तरे)

सप्तऋषि हे ब्रह्मदेवाचे सात मानसपुत्र होत. ब्रह्मदेवानें त्या सर्वांना प्रजोत्पादनाची आज्ञा केली तेव्हा अत्री ऋषीनें अनुत्तर नांवाची घोर अशी तपश्चर्या तीन हजार वर्षेपर्यंत केली त्यामुळे अत्यंत तप्त झालेल्या त्याच्या नेत्रातून गर्भोत्पत्ति झाली. ब्रह्मदेवानें तो गर्भ दशदिशांच्या दशदेवीना दिला, परंतु धारण रूक

न शकल्यानें त्यांनीं तो पृथ्वीवर टाकून दिला. त्याच्या तेजापासून अनेक औषधी वनस्पति निर्माण झाल्या. नंतर ब्रह्मदेवानें रथांत बसून पृथ्वीला एकवीस प्रदक्षिणा घातल्या व तो एकत्र करून त्याचे रक्षण करून बाढविला. त्यापासून जो कुमार जन्मला तोच चंद्र होय. या चंद्रानें काशी क्षेत्रात परार्ध वर्षेपर्यंत तपश्चर्या केल्यामुळे शंकराने संतुष्ट होऊन त्याला आपल्या मस्तकावर धारण केले. तसेच धर्माची पत्नी असलेल्या वसु नामक दक्षप्रजापतीची कन्या हिच्या उदरी भगवान् विष्णूनी चंद्ररुपाने जन्म घेतला आणि समुद्र मंथनातून लक्ष्मीला सहायक असा चंद्र वर आला. अशा रीतीनें चंद्राचा तीन प्रकारें जन्म झाल्याचे पुराणातून वर्णन केलेले आहे.

पुरातपस्यतः शंभोर्दाक्षाण्यया वियोगतः।
भालस्तलात्पपातैकः स्वेदबिंदुर्महीतले ।१।
ततःकुमारः संजज्ञे लोहितांगो महीतलात् ।
(स्कांद-पुराणे)

क्रोधायास्वोभ्दवः स्वेदो हरस्य समपद्यत।
तंदुधार महीपाल धरादेवी स्वरूपिणी ।१।
(विष्णुधर्मोत्तरे)

अग्निर्विकेश्यां जज्ञेतुर्युवाऽसौ लोहितार्चिषः।
(लिंगमहा पुराणे)

आपली पत्नी दक्षकन्या सती हिच्या वियोगदुःखामुळे तपाचरण करणाऱ्या शंकराच्या कपाळावरून घर्मबिंदू पृथ्वीवर पडला व त्यापासून अग्निप्रमाणे तेजस्वी असा कुमार जन्मला तोच मंगळ होय अशी स्कंद पुराणात भौम जन्म कथा आहे.

आणि महापराक्रमी हिरण्याक्षदैत्याची कन्या विकेशी हिने शीव प्राप्तीसाठी तप केले असता शंकर प्रसन्न झाले. परंतु मदनदहनाच्या प्रसंगी शंकराचा तृतीय नेत्राग्नि निर्माण झाला होता त्याच प्रमाणे आताही प्रलयाग्नि निर्माण होईल की काय, या भीतीने अग्नीने वि न आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शंकर संतप्त झाले व क्रोधामुळे आलेल्या मुखघर्माचा एक बिंदु विकेशीच्या मुखात पडला त्यामुळे ती गर्भवती झाली. परंतु तो तेजस्वी गर्भ सहन करू न शकल्यामुळे तिने जमीनीवर टाकून दिला. भूमीनें तो धारण करून वाढविला व त्यापासून भौम जन्मला. अशी विष्णुधर्मोत्तर पुराणांत कथा आहे. लिंगमहा पुराणांत देखील विकेशीपासूनच भौमजन्म दिला आहे.

अप्सुलीना तदा जाता तपसोग्रेण दानवः।
मथ्यमाने जले तेन तदा सोमेन पार्थिव। १।
विवेश तेजसि पयो विष्णुर्देवनमस्कृत ।
ततः कुमारस्संजातो बुधस्तु ग्रह बोधन। २।
तद्दधार तदा तारा गुरूपत्नी यशस्विनी।
यदा धारयितुमशक्तान् बालं तेजसान्वितम् । ३ ।
दाक्षायणी चोत्ससर्ज चंद्र पत्नी सुतं तदा ।
(विष्णुधर्मोत्तरे)

कश्यप ऋषीची पत्नी दनु हिच्यापासून रज नांवाचा दानव जन्माला आला. त्याने आपले तपतेज, बल व पराक्रम वरुणाला देऊ करून त्या मोबदल्यात त्याची अतिशय सुंदर अशी वारुणी नामक जलकन्या घेऊन आला. दानवाच्या अत्युग्र तपाला भिऊन वारुणीने पाण्यात प्रवेश केला. तेव्हां तो दानवही पाण्यात प्रविष्ट झाला हे जाणून चंद्राने पुत्रकामनेच्छेने त्या पाण्यांत एकदम अतिशय जोराची खळबळाट निर्माण केली आणि आपणही त्या जलांत प्रविष्ट झाला. सर्व देवानी भगवान् विष्णूची प्रार्थना केली. तेव्हा त्यांनी त्या पाण्याच्या तेजामध्ये प्रवेश केला. त्यावेळी त्याठिकाणी गर्भोत्पत्ती झाली. तो गर्भ गुरुपत्नीने धारण केला. परंतु ती अतीशय तेजस्वी असा गर्भ धारण करण्यास असमर्थ झाल्यामुळे तिने टाकून दिला. तेव्हा तो चंद्रपत्नीने धारण केला. व त्यापासून जो कुमार जन्मला तोच बुध नांवाचा ग्रह होय. अशी बुधजन्मकथा विष्णुधर्मोत्तर पुराणांत वर्णन केली आहे.

सुरुपानाम दुहिता मरिचेस्तु प्रजापते :।।
दत्तात्वंगिरसे सातु रूप यौवनशालिनी ।१।
तस्यां स जनयामास देवाचार्यं बृहस्पतीम् ।
बृहद्वाचं महाबुद्धि वेदवेदांगपारगम्।१।(विष्णु धर्मोत्तरे)
बृहता तपसानेन बृहतापतिरेध्यहो।
नाम्ना बृहस्पतिरिति ग्रहेष्वर्चेभवद्विज ।१।
(स्कांद पुराणे)

ब्रह्मदेवाच्या सात मानसपुत्रांपैकी मरीची व अंगिरा हे सृष्टि प्रवर्तक ऋषी होत. मरीचीचा पुत्र मारीच याची सुरूपा नावाची कन्या अंगिरा ऋषीचा पुत्र अंगिरस याची पत्नी झाली व तिच्या पासून अत्यंत बुद्धिमान् वेदवेदांग व सर्व शास्त्र पारंगत असा जो पुत्र जन्मला तोच गुरु नावाचा ग्रह होय. याने काशीक्षेत्री दहा हजार वर्षे तपश्चर्या केल्याने शंकराने प्रसन्न होऊन त्याला

'बृहतांपतिरेधि' म्हणजे इंद्रादि देवांचा स्वामी आचार्य हो असा वरप्रदान केला. अशा प्रकारे विष्णु धर्मोत्तर आणि स्कांद या दोन्ही पुराणांत गुरुजन्म कथा आहे.

ततःक्रुद्धो महादेवो भार्गवं हंतुमुद्यतः ।
भार्गवोऽपिच योगेन प्रविवेश हरं तदा ।१।
हरोदरस्थ स्तुष्टाव देवी पर्वत नंदिनीम् ।
तयोक्तस्त्वंतु तत्याज तदा शिश्नेन शंकरः ।२।
(विष्णुधर्मोत्तरे)

सवर्षाणां शतं कुक्षौ भवस्य परितोभ्रमन् ।
शांभवेनाथ योगेन शूक्ररूपेण भार्गवः ।१।
(स्कांदपुराणे)

हिरण्यकश्यपूची कन्या उषा ही भृगूऋषींची पत्नि होय. तिला ज्ञानी व योगशास्त्रनिपुण असा औशनस नावाचा पुत्र झाला. भृगूचा मूलगा म्हणून यालाच भार्गव म्हणतात. त्याने कुबेराचे सर्व धन हरण केले. कुबेर शंकराला शरण गेला तेव्हा शंकर क्रुद्ध होऊन भार्गवाला मारण्यास प्रवृत्त झाले. शंकरापुढे आपली ताकद चालणार नाही हे जाणून आत्मरक्षणासाठी भार्गवाने आपल्या योगबलाने शंकराच्या उदरांत प्रवेश केला. तेथे पार्वतीची स्तुती करून तिला त्याने संतुष्ट केले. प्रसन्न झालेल्या पार्वतीच्या विनंतीवरून शंकराने त्याला शिश्नावाटे बाहेर काढले अशी विष्णु धर्मोत्तर पुराणात शुक्र जन्मकथा आहे.

आणि देवदानवांच्या युद्धकोलाहलामुळे भयभीत होऊन भार्गवाने आपल्या योगसामर्थ्याने शंकराच्या उदरात प्रवेश केला. परंतु नंतर त्याला बाहेर येण्याचा मार्ग सापडेना. शंभरवर्षे हरोदरात राहून निराशा झाल्यावर शेवटी त्याने पार्वतीची प्रार्थना केली तेव्हा या कर्माचे प्रायश्चित्त म्हणून शंकराने त्याला वरील प्रमाणे अशुद्ध द्वाराने बाहेर काढले. अशी स्कंदमहापुराणात शुक्राची जन्मकथा आहे.

ब्रह्मणो मानसः पुत्रस्त्वष्टानाम प्रजापतिः
संज्ञा तु जनयामास कन्यां त्रैलोक्य सुंदरीम् ।
तां ददौ सवितुः पत्नी तस्यां सूर्यो महातपः ।
छायायांच तथार्को ऽपि संज्ञेय मिति चिन्तयन् ।
द्वौपुत्रौ जनयामास सावर्णं तु शनैश्चरम् ।
(विष्णु धर्मोत्तरे)

एवंशनैश्चरो जज्ञे सवर्णायां विवस्वतः ।
(स्कांद पुराण)

ब्रह्मदेवाचा मानसपुत्र त्वष्टाप्रजापति याची संज्ञा नामक कन्या ही सूर्यपत्नी होय. तिला सूर्यापासून वैवस्वतमनु, यम व यमुना अशी तीन अपत्य झाली. परंतु सूर्याचे तेज असह्य झाल्यामुळे संज्ञेने आपल्या सावलीला सांगितले की, तू माझे रूप धारण करून माझ्या पतीजवळ राहा आणि या तिन्ही मुलांचा सांभाळ कर. आणि संज्ञा आपल्या पित्याकडे गेली. परंतु पित्याने तिला परत पाठविले. त्यामुळे ती उत्तरकुरु प्रदेशांत जाऊन तपश्चर्या करू लागली सूर्य मात्र छायलाच संज्ञा समजू लागला. व छायेपासून सावर्णिमनु आणि शनेश्वर असे दोन पुत्र सूर्याला झाले. अशा प्रकारे शनिच्या जन्माची कथा पुराणातून वर्णन केली आहे.

दाक्षायणी सिंहिकाख्या भार्या वै कश्यपल्यतु ।
अकाले वरयामास भर्तारं तपसान्वितम् ।१।
अकालयांचा संक्रुद्धस्तांजगाद स कश्यपः
दैत्यदानव शंकाशं पुत्रंत्वं जनयिष्यसि ।२।
राहुं सा जनयामास वरदानान्महात्मनः ।
(विणुधर्मोत्तरे)

स्वर्भानुः सिंहिकापुत्रो भूतसंतापनोऽसुरः ।
(लिंगमहापुराणे)

दक्षप्रजापतीने आपल्या साठ मुलींपैकी तेरा कन्यांचा विवाह कश्यप ऋषीबरोबर लावून दिला. त्या तेरापैकीच सिंहीका नामक एक कश्यपपत्नी होती. तिने तपश्चर्येमध्ये निमग्न असलेल्या आपल्या पतीला समाधिभंग करून धर्मशास्त्र मर्यादेने निषिद्ध अशा कुमहूर्त काली पुत्रप्राप्तीची याचना केली त्यामुळे कश्यपाने क्रुद्ध होऊन तुला देवनानवसदृश असा पुत्र होईल असा शापयुक्त वर दिला. तो वर फलद्रूप होऊन तिच्या उदरी राहू जन्माला आला. अशी राहुची जन्मकथा विष्णुधर्मोत्तर व लिंगमहापुराणात सांगितली आहे.

क्षयं चिंतयतस्तस्य प्रजानां मनुजेश्वर ।
प्रादुर्भुता ततः कन्यामृत्यूमेति विश्रुता ।१।
दीर्घं मष्णंच निश्वासं मुमोच वर वर्णिनी ।
कृष्ण सर्पसमाकारस्तस्मा त्केतुरजायत
(विष्णुधर्मोत्तरे)

महाभया महारौद्रा महाभयकरा नृणाम् ।
केतवस्त्रिषुलोकेष तस्मात्पूज्या सदानृणाम् । १ ।
(विधानमाला)

ब्रह्मदेवाने प्रजा उत्पन्न केली. परंतु अतिशय झपाट्याने होत असलेली प्रजेची वाढ पाहून त्याला चिंता उत्पन्न झाली. तेव्हा तो तिच्या नाशाचा उपाय शोधू लागला असता मृत्यू नावाची कन्या उत्पन्न झाली. ब्रह्मदेवाने तिला प्रजासंहाराची आज्ञा केली ही दुष्करा आज्ञा ऐकून ती रडू लागली, तेव्हा तिच्या अश्रुपासून असंख्य व्याधि निर्माण झाले. तेव्हा तिने अतिशय घोर तपश्चर्या केली. तरी देखील विधात्याने तिला पुनश्च तीच आज्ञा फर्माविली. परंतु तिच्या तपश्चर्येने संतुष्ट होऊन वर दिला की, मानवांच्या मरणाला कोणत्यातरी व्याधीचे निमित्त कारणीभूत होऊन तुझ्या वर दोष कदापिही येणार नाही. या वरप्रदानामुळे थोडेसे समाधान लाभून मृत्यूनामक कन्येने अत्यंत उष्ण असा दीर्घ श्वास सोडला. त्या श्वासातूनच केतूची उत्पत्ती झाली. अशी केतूची जन्मकथा पुराणांतरी वर्णन केली आहे.

अशा प्रकारे अनेक महापुराणांतून सर्व ग्रहांच्या जन्मकथा वर्णन केलेल्या आढळून येतात.

॥ इतिशम् ॥



जन्म दिनांकावरून जन्मदिवस कसा ओळखावा ?

लेखक :—**श्री. वसंत यशवंत घारपुरे**
B. Sc. B. E. (Civil) A. M. I. E. मंडळाचे सभासद पुणे.

एखाद्या व्यक्तिने जर त्याचा जन्मदिनांक, महिना व वर्ष आपणास सांगितले तर त्यावरून आपणास त्या व्यक्तीचा जन्मदिवस ओळता येईल. ह्या कृतीसाठी आपणास सोबत दिलेल्या प्रत्येक महिन्याचा अंक लक्षांत ठेवणे जरूर आहे. हे महिने व त्यांचे अंक यांचा तक्ता डोळ्यासमोर ठेवावा.

० जानेवारी	६ एप्रिल	६ जुलै	० ऑक्टोंबर
३ फेब्रुवारी	१ मे	२ ऑगस्ट	३ नोव्हेंबर
३ मार्च	४ जून	५ सप्टेंबर	५ डिसेंबर

कृति :—समजा एखाद्या व्यक्तिन आपणास जर त्याचा जन्मदिनांक १३ फेब्रुवारी १९२९ आहे असे सांगितले तर त्याचा जन्मदिवस सांगण्यासाठीं खालीलप्रमाणें कृति करावी.


पहिल्यानें जन्सदिनांक घेऊन त्या संख्येंत त्या महिन्याचा विशिष्ठ अंक मिळविणे. ह्या बेरजेमधे १९०० साल नंतर चीं २९ वर्षे मिळवावीत. कारण १९२९ हे जन्मवर्ष आहे. आलेल्या बेरजेंत २९ वर्षातील लीप वर्ष मिळवावीत. दर ४ वर्षांनी एकदां लीप वर्ष येते. म्हणजे २९ वर्षात ७ वेळां लीप वर्षे येतील. हा अंक वरील बेरेजत मिळवावा सर्वांत शेवटीं जी बेरीज येईल त्या संख्येस आठवडयाचें दिवस ७ म्हणून ७ ने भागावे. व भागाकार करून जी बाकी उरेल त्यावरून दिवस ओळखावा.

वर दिलेल्या उदाहरणाचें गणित खालील प्रमाणें होईल.

१३ – जन्मदिनांक
\+ ३ – फेब्रुवारी हा महिन्याचा अंक
+२९ – १९२९ ह्या वर्षातील १९०० साल नंतरची वर्षे
\+ ७ – २९ वर्षातील लीप वर्षे

५२ एकूण बेरीज

$= \frac{५२}{७}$ म्हणजे भागाकार करून ३ येईल.



श्री. घारपुरे मंडळांत गणिताचे प्रयोग करून दाखवित आहेत.

बाकी – ० – रविवार
– १ – सोमवार
– २ – मंगळवार
– ३ – बुधवार
बाकी – ४ गुरुवार
– ५ शुक्रवार
– ६ शनिवार

म्हणजे जन्मदिवस बुधवार हे उत्तर होय.

अपवाद :– ज्यावेळेस व्यक्तिचा जन्म जानेवारी अगर फेब्रुवारीत असेल व जन्मसालाला ४ ने पूर्ण भाग जात असेल त्यावेळी वरील प्रमाणे सर्व कृति करून आलेल्या संख्येंतून १ वजा करावा व मग ७ ने भागाकार करून जी बाकी येईल त्यावरून वरीलप्रमाणें जन्मदिवस ओळखावा.

उदा० – १६ जानेवारी १९२८

१६ – जन्मदिनांक
० – जानेवारीचा विशिष्ठ अंक
२८ – १९०० नंतरची वर्षे
७ – २८ सालातील लीप वर्षे

५१ एकूण बेरीज
– १

५० = ५० भागाकार ७
७

म्हणजे सोमवार हा जन्मदिवस होय. आतां आपण हे सर्व गणित जितक्या लवकर करूं तितके ते लोकांना आश्चर्यकारक वाटेल.

ज्योतिषशास्त्राआधारे संततीचे अनुमान

लेखक : ग. श्री. गोसावी, बी. एस्‌सी.

सामान्य माणसाची आर्थिक परिस्थिती इतकी तंगीची झाली आहे कीं, तीन किंवा चार संततीपेक्षां जास्त संतती झाली तर त्याला ते एक मोठे संकट वाटू लागले आहे. ज्योतिष शास्त्र मनुष्याला किती संतती होऊ शकेल याची कल्पना देते.

संततीदृष्टीने राशीचे वर्ग केले आहेत. राशी-वंध्या, बहुप्रसव, मध्यमप्रसव, अल्पप्रसव, पुत्रसंतती देणाऱ्या (पुरुष) किंवा स्त्री संतती देणाऱ्या अशा सांगितल्या आहेत तसेच राशींचेही परत नक्षत्रांत भाग पाडले आहेत. या नक्षत्रावरून संतती पुत्र कीं कन्या यांची कल्पना दिली आहे.

वंध्या राशी–सिंह व कुंभ कांहींच्या मते ३–५–६ या वंध्या राशी आहेत. अल्पप्रसव राशी–मेष, तुला व धनु; मध्यम प्रसव–वृषभ, मिथुन, कन्या, वृश्चिक. बहुप्रसव राशी–कर्क, मकर, मीन. पुरुष संतती दर्शविणाऱ्या राशी—विषम राशी–१–३–५–७–९–११; स्त्री संतती दर्शविणाऱ्या राशी–समराशी–२–४–६–८–१२.

टीप :—माझे मते मकर यास केवळ जलराशी आहे म्हणून बहुप्रसवा राशी मानली असावी. परंतु त्याचा अधिपति शनि हा नपुंसक ग्रह असल्याने संततीसंख्येवर त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. पंचमात मकरेचा शनि स्वगृहीचा असतांना देखील वय ३२ झाले तर एकही सन्तती नाही. सन्ततीकारक गुरू कन्येत आहे तेव्हा व केंद्रांत असता पुढें थोडीफार कन्या सन्तती होण्याची शक्यता आहे. तेव्हा मकर ही मध्यम प्रसव राशींत घालावयास हरकत नाही.

संतती संख्या व नवमांश :—पंचम भावांतील राशीवरून नुसती संततीसंख्या ठरवू नये तर त्या राशीचा अंश कोणत्या नक्षत्राचा आहे त्यावरून संततीविषयी विचार करण्याची पद्धती आहे. राशीचे नवमांशाचे धर्म व राशीचे धर्म यांचे मेळाने विचार करावा. उ. पंचमस्थानात सिंह राशी आहे. सिंह वंध्या राशी तर राशीचा नवांश सिंह असतो. सन्ततीचे बाबतीत वंध्यत्व समजावे पण नवांश कन्या असता एक ते दोन सन्तती असते.

संतती संख्या व पंचमेश :—लग्नकुंडलीतील पंचमेशाचे स्थान व चंद्रकुंडलीतील पंचमेशाचे स्थान या दोघांत जितके अन्तर तितकी सन्ततीसंख्या असते किंवा लग्नकुंडलीतील पंचमेश आणि पंचमस्थान यांतील अन्तराइतकी मुले असतात, मात्र निपुत्रिक योग नसावा व नक्षत्र सन्तती आधारे पुत्र किंवा कन्या सन्ततीसंख्या नक्की करावी;

संतती संख्या ११ वें व ५ वें स्थान :—पंचम भावांतील राशी व अकरावे भावांतील राशी याचे राशी आंकड्यांची बेरीज यांचा मध्य इतकी संतती संख्या असते किंवा जी कमी राशी असेल त्याप्रमाणे अगर सर्वांत जास्त म्हणजे दोन्ही राशींची बेरीज उ. पंचमात धनुराशी आहे व अकरावे स्थानात मिथुन राशी येते, तर कमीत कमी संतती संख्या ३, ९+३÷२=६; किंवा बारा यांत धनु ही अल्पप्रसव राशी आहे तर मिथुन ही मध्यम प्रसव तर पंचमेश मीन या बहुप्रसव राशीत असतां सन्तती संख्या ५ ते ६ या आसपास असते.

संतती संख्या–संतती स्थान :—लग्न, चंद्र अथवा गुरूपासूनच्या पंचम भावांतील राशीवरून किंवा त्यांच्या पंचमेशावरून संततीसंबंधी विचार करतात. पत्नीपासूनचे पंचम भावांतील राशीवरून देखील प्रत्येक सन्ततीसंख्येचा विचार करावा. स्त्री वंध्या असू शकते तर पुरुष नपुंसक असू शकतो. म्हणून सन्ततीसंबंधी विचार करता दोन्ही पतीपत्नीची कुंडली पहावी. किंवा स्त्री अगर पुरुषाचे कुंडलीतील त्यांच्या स्थानापासूनचा पंचमभाव, त्यांतील राशी व भावेश यावरून सन्ततीचा विचार करावा. लग्नकुण्डलीतील सन्तती उत्पादक स्थाने, विषम स्थाने एक, तीन, पाच, सात, नऊ, अकरा ही होत. तेव्हा प्रथम अपत्य पंचमस्थान, द्वितिय अपत्य सप्तमस्थान या अनुक्रमाने प्रत्येक अपत्यासम्बंधी विचार करावा.

संतती व ग्रह :-सन्ततीनाशक ग्रह–शनि, राहू, हर्षल, नेपच्यून, मंगळ, रवि, बुध या अनुक्रमानें आहेत. यांत शनि व बुध यांना नपुंसक ग्रह समजतात. म्हणजे शनि व बुध वंध्य, सन्तती प्रतिबंधक किंवा अनियतकालिक सन्तती दर्शवितात. नेपच्युन-राहू हा गर्भपात घडवितो किंवा विकृत सन्तती निर्माण करतो. हर्शल सन्ततीमारक किंवा चमत्कारिक सन्तती निर्माण करणारा; मंगळदेखील सन्ततीस अपायकारक किंवा सन्ततीचेवेळीं शस्त्रक्रिया करावी लागते.

संतती पोषक ग्रह :-चंद्र, शुक्र व गुरु, चंद्र विपुल पण लौकर लौकर सन्तती देतो; शुक्र विपुल सन्तती पण चंद्राप्रमाणे कन्याधिक्य तर गुरु पुरुष संतती दर्शवितो. गुरुवरून संततीसम्भवाचा काल काढता येतो.

वंध्याराशी –	नक्षत्रे	चरण	राशी अंश –	नक्षत्र-स्वभाव	फल	संतती संख्या
सिंह –	मघा	१–४	सिंह–१३– २०क पर्यंत	राक्षस गण	वंध्या	
	पूर्वा	१–४	,, २६ ४० क. प.	मनुष्य गण	पुत्र	
	उत्तरा	पहिले	,, ३० पर्यंत	मनुष्य गण	पुत्र	
कुंभ	घनिष्ठा	३–४	कुंभ ६ ४० क. प.	राक्षस गण	संतती नाश	वंध्या किंवा
	शततारका	१–४	,, २० पर्यंत	,,	वंध्या किंवा पुत्र	२ ते ३ पर्यंत
	पू. भाद्रपदा	१–३	,, ३० पर्यंत	मनुष्य गण	पुत्राधिक्य	पुत्र
अल्पप्रसव राशी						
मेष	अश्विनी	१–४	मेष १३ २०क. प.	देवगण	अल्प पुत्र	संतती
	भरणी	१–४	,, २६ ४०क प.	मनुष्य गण	अल्प कन्या	२ ते ३
	कृत्तिका	पहिले	,, ३० पर्यंत	राक्षस गण	गर्भपात	पुत्रकारक
तुला	चित्रा	३–४	तुला ६ ४०क. प.	राक्षस गण	मिश्र	संतती ५ पेक्षा
	स्वाती	१–४	,, २० पर्यंत	देवगण	अल्पपुत्र	कमी अधिक पुत्र
	विशाखा	१–३	,, ३० ,,	राक्षण गण	संतती नाश	किंवा पुत्राधिक्य
धनु	मूळ	१–४	धनु १३ २०क. प.	राक्षस गण	अल्पपुत्र	संतती ५ पर्यंत
	पू. षाढा	१–४	,, २६ ४०क प.	मनुष्य गण	पुत्राधिक्य	पुत्र किंवा
	उ. षाढा	पहिले	,, ३० पर्यंत	मनुष्य गण	पुत्राधिक्य	पुत्राधिक्य
मध्यप्रसव राशी						
वृषभ	कृत्तिका	२–४	वृषभ १० पर्यंत	राक्षस गण	गर्भपात	५ ते ६
	रोहिणी	१–४	,, २३ २० क. प.	मनुष्य गण	पुत्राधिक्य	पर्यंत
	मृग	१–२	,, ३० पर्यंत	देवगण	पुत्राधिक्य	कन्याधिक्य
मिथुन	मृग	३–४	मिथुन ६–४० क. प.	देवगण	कन्याधिक्य	सातपर्यंत
	आर्द्रा	१–४	,, २० प.	मनुष्यगण	पुत्राधिक्य	पुत्र किंवा
	पुनर्वसु	१–३	,, ३० प.	देवगण	पुत्राधिक्य	पुत्राधिक्य
कन्या	उत्तरा	२–४	कन्या १० प.	मनुष्यगण	पुत्राधिक्य	५ पेक्षा अधिक
	हस्त	१–४	,, २३ २० क. प.	मनुष्यगण	कन्याधिक्य	कन्या किंवा
	चित्रा	१–२	,, ३० पर्यंत	राक्षसगण	मिश्र	कन्याधिक्य
वृश्चिक	विशाखा	चौथे	वृश्चिक३ २० क. प.	राक्षसगण	सन्ततीनाश	५ पेक्षा अधिक
	अनुराधा	१–४	,, १६ ४० क प.	देवगण	कन्या	कन्या किंवा
	जेष्ठा	१–४	,, ३० प.	राक्षसगण	संतती नाश	कन्याधिक्य
कर्क	पुनर्वसु	चौथे	कर्क ३ २० क. प.	देवगण	पुत्राधिक्य	१० पेक्षा अधिक
	पुष्य	१–४	,, १६ ४० क. पर्यंत	देवगण	कन्याधिक्य	कन्या किंवा
	आश्लेषा	१–४	,, ३० पर्यंत	राक्षसगण	संततीनाश	कन्याधिक्य
मकर	उ. षाढा	२–४	मकर १० पर्यंत	मनुष्यगण	पुत्राधिक्य	१० पेक्षा अधिक
	श्रवण	१–४	,, २३ २० क. प.	देवगण	कन्याधिक्य	कन्या किंवा
	घनिष्ठा	१–२	,, ३० पर्यंत	राक्षसगण	संतती नाश	कन्याधिक्य
मीन	पू. भा.	चौथे	मीन ३ २० क. क.	मनुष्यगण	पुत्राधिक्य	
	उ. भा.	१–४	,, १६ ४० क. प.	मनुष्यगण	कन्याधिक्य	
	रेवती	१–४	,, ३० पर्यंत	देवगण	कन्याधिक्य	

नवमभाव विचार

लेखक : वि. का. पुराणिक ज्योतिष विशारद

(१) स्थान नामाति:– "धर्मो गुरु: शुभ तपो नव भाग्य मानि."

धर्म, गुरु, शुभ, तप, नव, भाग्यम:– अशीं नांवे आहेत.

लग्नापासून– नवव्या व पांचव्या स्थानास त्रिकोण अशी संज्ञा आहे. नवम स्थानास त्रि– त्रिकोण अशी पारिभाषिक संज्ञा असून. दशम केंद्राच्या मागील– स्थान म्हणून यास आपोक्लिम असेही नांव देण्यांत आले आहे.

नवम्–भाव–फलम्.

(२) भाग्य प्रभाव गुरु धर्म तप: शुभानि ।।
संचित ये भवम देव पुरो हिताभ्याम् ।।
भाग्येश देव सचिवौ शुभ वर्ग यातौ ।।
भाग्ये शुभग्रह युते समुपैति भाग्यम्. ।।१।।

नवमस्थानावरून पुढील गोष्टींचा विचार केला जातो; भाग्य, शक्ति, गुरु, धर्म, तप, शुभकार्य, प्रवास, लोकशिक्षण, जलपर्यटन, तीर्थयात्रा, पुण्यकर्म, धार्मिक मतें दातृत्व, औदार्य, ऐश्वर्य, वृद्धमंडळींचे सौख्य, पूर्वजन्मार्जित कर्मफल, दैविक सामर्थ्य, धर्मश्रद्धा, धर्माचरण सत्कर्म, साधुसन्त दर्शन, गुरुपदेश, मंत्रसिद्धि, नातवंडे, लौकिक, स्वप्नादिकाष, कल्पना तरंग, भूतदया, ईश्वरसेवा, शरिरांतील मांडचांची स्थिती–इत्यादि गोष्टींचां – ., नवमभावावरून फलादेशाकरितां विचार करावयास पाहिजे.

(३) भाग्यस्थानचे मूळचे कारकत्व पुढील ग्रहांस देण्यात आले आहे. (१) रवि (२) गुरु :– हे दोन कारक ग्रह होत. (१) रवि आत्मा, बाप, तेज, आरोग्य, शक्ति संपत्ति इ० गोष्टींचे कारकत्व नैसर्गिकरित्या याच्याकडे देण्यात आले आहे. तसेच २. गुरु:– शहाणपणां, द्रव्य, पुत्र, ज्ञान, इ० कारकत्व गुरूकडे आहे. पंचतत्वापैकी गुरू :– हा आकाश तत्वाचा मालक असून, शरीरातील "वसा" त्या पदार्थांवर गुरुचा अंमल असतो. गुरूचा वर्ण गौर, प्रधान अधिकार गुरूकडे आहे. रवि काळसर तांबडा, आत्मा, तेज आणि शरीरातील "अस्थि" त्यावर अंमल रविचा असतो.

(४) ज्याप्रमाणे आपण लग्नापासून भाग्य स्थान अवलोकन करतो. त्याप्रमाणेच चंद्रापासूनही (प्राधान्य देऊन) भाग्यस्थान अवश्य पाहिले पाहिजे. भाग्यस्थानच्या अधिपतिबद्दल (भाग्येश) शुभग्रह, पापग्रह, युतियोग दृष्टीयोग उच्चस्थिती अगर नीचत्व स्थानमहात्म्य इ० गोष्टींचा विचार करून भाग्येशाचे बलाबल कमी जास्त ठरवून फलादेशाचा विचार केला पाहिजे.

(५) भाग्यस्थान:– भाग्यस्थानांत जर शुभग्रह असला तर जन्मणारा भाग्यवान असतो. भाग्यस्थानांत जरा पापग्रह नीचग्रह शुभग्रह अस्तंगतग्रह वाईट दृष्टीयोग अशा प्रकारचे प्रकार आढळून आल्यास यश, धन, धर्म यांची प्राप्ती होत नाही.

अशी जरी स्थिति असली, तरी मला:–भाग्य स्थानांत जर एकदां पापग्रह उच्च स्थितीत असेल, स्वगृही असा असेल तर मनुष्याचे भाग्य चांगले असते. नशिबाची अनुकूलता असते. नवमस्थान:– शुभग्रहस्थित स्वामी तेथेच भावेशाची भावावर दृष्टी असा योग असला, तरी भावफल उत्तम मिळते.

नवमेश:– (१) ज्या राशीत असेल त्या राशीचा स्वामी–भाग्योत्पादक असतो.

(२) भाग्येश–भाग्याचा उपभोक्ता होय.

(३) भाग्यस्थानापासून ५ वे स्थान म्हणजे आपले जन्मलग्नकुंडलीतील तनुस्थान होय. त्याचा स्वामी सुद्धां भाग्योत्पादक असू शकतो याप्रमाणे जन्मलग्न कुंडलीत जितके अधिक योग प्रबल होतील त्याप्रमाणे निरंतर भाग्यप्राप्त होते असे म्हणावयास हरकत नाही.

(६) ग्रह विचार:– नवमांत पुढीलप्रमाणे ग्रह-स्थित असल्यास निरनिराळी फले मिळतात.

(१) रविः— पितृद्वेषी, गुरुजनांचा द्वेष करणारा अन्यधर्म स्वीकारणारा. इ.

(२) चंद्र:– पितृकर्म, देवकार्य, दाता. इ.

(३) मंगळ:– बापास वाईट, प्रख्यात होतो. इ.

(४) बुध:– सन्मार्गाने धन मिळविणारा, शास्त्री सदाचारी, इ.

(५) गुरुः– ज्ञानी, धर्मनिष्ठ, अधिकारी. इ.

(६) शुक्र:– विद्या, धन, स्त्री, पुत्र, वैभवशाली इ.

(७) शनि:– योद्धा, स्त्रीविरहीत, धनवान, इ.

(८) राहू:– धर्म, कीर्तिमान् धनवान, इ.

(९) केतू:- रागीट, वक्ता, धर्महीन, परनिंदक, शूर, दांभिक, निरुत्साही, अभिमानी इ. :—: अन्यमतेः–

(१) रविः– शुद्धकीर्ति, ऐश्वर्य, धार्मिक कर्मठ. इ.

(२) चंद्र:– सन्मित्र, सत्पुत्र, जमीनदार उत्तमगृह साधुजनांचा, आश्रयदाता, सत्पात्री, धन व्यय करणारा शुक्राबरोबर चंद्र असल्यास सापत्न माता योग येतो इ.

(३) मंगळ:- अधिकारी, कवनशील, शत्रुहीन, इ.

(४) बुध:– धनलाभ, स्त्री, पुत्र, गृह, मंदीर मित्र, सज्जनापासून हित करून घेणारा, दाता, प्रसिद्ध असा होतो.

(५) गुरुः– तेजस्वी, पराक्रमी, कविश्रेष्ठ सुंदर, देखणा, इ.

(६) शुक्र :- दानशूर, धार्मिक, शुचिर्भूत, मित्रवान, सर्वगुणसंपन्न, स्त्री सौख्य, इ.

(७) शनि :– राजद्रोह करणारा, वाईटसंगत. श्वापदापासून भीती, धर्महित, कृशांग इ.

(८) राहू :– धर्महित, भटकणारा, अल्पसुखी, नित्य देहपीडा भोगणारा, बंधसौख्य कमी, दारिद्रय भोगणारा, इ.

नवमांत :– द्विग्रह–योग-फलें—

१. र+बु= शत्रू पुष्कळ, दुःखी, सधारोगी.

२. र+गु= बापाला प्रिय, स्वतः धन मिळवणारा.

३. चं+मं= मातेला वाईट, दाता होतो.

४. चं+बु= वक्ता, शास्त्री होतो.

५ चं+गु= धैर्यवान, श्रीमान होतो.

६ चं+शु= वाईट पत्नी, सावत्र मातेला आवडता होतो

७. चं+श= धर्महीन, गुणहीन होतो.

८. मं+बु= शास्त्री, भोगी.

९. मं+शु= द्विभार्या योग, वादी, परदेशगमन.

१०. बु+गु= चतुर, विद्वान, धनवान, पंडीत होतो.

११. ब+शु= शहाणा, गायनप्रिय.

१२. र+चं+मं= मातृ-पितृ-हीन.

१३. र+चं+बु= कुकर्म करणारा.

१४. र+चं+गु= वाहनसौख्य भोगणारा.

–: दृष्टीयोग :–

१. गुरु– चं. व र. =दृष्ट= विद्या, घोडे, गाई, धनसंपन्न होतो.

२. ,, – र. व मं. =सेनापती, वाहने, रत्ने.

३. ,, – र. व बु.= विद्याविषयक चर्चेत विनोद करणारा, धनवान.

४. ,, – र. व शु.= विनयाने बोलणारा होतो.

५. ,, – र. व श.= गुणवान, बुद्धिमान, जहागिरदार होतो.

६. ,, – चं. व मं.= कीर्तिमान, सुखी, संपत्तियोग चांगला.

७. ,, – चं. व बु.= गृहसौख्य उत्तम, ऐष आराम प्राप्त होतो.

८. ,, – चं. व शु.= पुत्रहीन, शूर, धनवान, उद्योगी होतो.

९. ,, – चं. व श.= गुणवान, कायदेपंडीत होतो.

१०. ,, – बु. व शु.= विद्वान होतो.

११. ,, – सर्वग्रह= संपत्तिमान होतो.

सर्व शुभ ग्रह नवमस्थानी असल्यास= मोठी इस्टेट, वैभव प्राप्ती होते.

-: चितायोग :-

१ मंगळ- नवम स्थानांत अगर दशमांत असल्यास- क्षेत्रचिंता.

२ मंगळ- ५ ८ १२ स्थानांत असल्यास-सौख्यचिंता.

३ गुरु- ६ ८ १२ स्थानांत असल्यास- वाहने, अलंकार, वस्त्रे, घोडे यांची चिंता

४ शुक्र व चंद्र- ६ ८ १२ स्थानांत असल्यास- छत्र, चामरांची चिंता.

५ गुरू- सप्तमांत असता- पुत्रचिंता असते.

६ बुध- पंचमांत असता- बुद्धिचिंता असते.

७ रवि- पंचम व नवम स्थानांत असतां- चुलते वगैरे-चिंता.

८ शुक्र- पंचम सप्तम नवम स्थानांत असता- यात्रा चिंता.

९ गुरू- पंचम नवम स्थानांत असल्यास-पुत्रचिंता.

-:वय मर्यादा:- फल:-

नवम स्थानांत- रवि असतां- २० वे वर्षी तीर्थयात्रा धर्मकृत्ये होतात.

॥-- चंद्र असता- २० वे वर्षी तीर्थयात्रा धर्मकृत्ये होतात.

॥-- मंगळ असता- १४ वे वर्षी वातविकार उत्पन्न होतो.

॥-- बुध असतां- २९ वे वर्षी मातेला त्रास होतो.

॥-- गुरू- १५ वे वर्षी पित्याला त्रास होतो.

॥-- शुक्र- असता- १५ वे वर्षी सपत्ति प्राप्त होते.

७. नवम स्थानांतील ग्रहांचे फल पाहातांना ते ग्रह कोणत्या प्रकारे बलवान आहेत. हे प्रथम पाहिले पाहिजे. नुसते- एक दोन तीन ग्रहांचें फल पाहून भागावयाचे नाही. तसेच नवमांतील ग्रह कोणत्या स्थानाचें अधिपति आहेत, ते कोणत्या स्थितींत आहेत. उच्च-नीच स्वराशी नवमांश राशी अस्तंगत दृष्टीयोग. इ. गोष्टींचा अवश्य विचार केला पाहिजे.

उदा.- भाग्येश अष्टमांत असल्यास भाग्यहीन योग होतो.

भाग्यांत शुभग्रह शुभराशी शुभदृष्टी योग- कीर्ति, धन, भाग्य त्यांची प्राप्ती होते.

भाग्येश लग्नेशाने, दशमेशाने दृष्ट असल्यास मोठा दाता होतो.

भाग्यांत पापग्रह असल्यास धर्महीन योग होतो.

कोणताही ग्रह भाग्यांत उच्च स्थितीत असल्यास- संपत्तिमान श्रेष्ठ योग.

भाग्यांत असलेले पापग्रह शुभग्रहाने दृष्ट असता- प्रतिपक्षाचा पाडाव करणारा, दिव्य देहाचा, कीर्तिमान् होतो.

(८) १. नवमस्थानचा स्वामी लग्नीं त्यावर गुरुची दृष्टी असल्यास मनुष्य राजवंद्य होतो.

२. चतुर्थ स्थानचा स्वामी- लग्नी, चतुर्थेश व नवमेश आपापल्या स्थानास पाहात असतील, तर तो मनुष्य संपत्तीने युक्त होतो.

३. चतुर्थं स्थानचा अधिपति- अष्टमस्थानी भाग्य-हीन योग.

४. चतुर्थ स्थानचा स्वामी बलवान असल्यास- वाहनयोग उत्तम.

५. नवम स्थानचा स्वामी लाभस्थानांत असल्यास राजवंद्य होतो.

६. लग्न, धन, चतुर्थ या स्थानांचे स्वामी आपापल्या स्थानी असल्यास सौख्यकारक परिस्थिती असते.


७. नवमस्थानचा स्वामी लग्नीं असल्यास मनुष्य दीर्घायु, धर्मशील असा होतो.

९. चलित योग- गुरु आणि शनि- हे ग्रह चंद्राच्या व लग्नाच्या उक्तस्थानीं बलवान झाले की, मनुष्याचा भाग्योदय व्हावयाचा. हे दोन प्रमुख ग्रह ज्या वर्षी बलवान होतील, त्यावर्षी सौख्यप्राप्ती झाल्याशिवाय राहाणार नाही. म्हणजेच शुभफल प्राप्त व्हावयास पाहिजे.

(उक्तस्थानी म्हणजे- ३-५-६-९१०-११) ही होत.

१०) उदा० जन्म-लग्न कुंडली.

श्री.



मिथुन लग्न– मंगळ गुरू व रवि हे ग्रह या लग्नास अशुभ फल देणारे आहेत.

कारण– मंगळ ६ व्या व ११ व्या स्थानांचा स्वामी आहे.

गुरू– मारक स्थानचा अधिपति आहे.

रवि– तृतीय स्थानचा अधिपति आहे.

केंद्राधिपत्य दोषस्तु बलवान् गुरू शुक्रयोः ।

मारकत्वेऽपिच तयो मरिक स्थान संस्थितिः ।

गुरु शुक्र:– केंद्रांचे अधिपति असतील तर अशुभ फल देतात. त्याचप्रमाणे ते २ व ७ या मारक स्थानांचे अधिपति असतील तर बलवान मारक होतात.

शनि–गुरु :–मारक योग. अनिष्ट फल उत्पन्न करणारा होता.

शुक्र :–हा मात्र एकच शुभफल उत्पन्न करणारा आहे कारण पंचमाचा स्वामी आहे. (व्ययेश व द्वितियेश हे साहचर्यानुसार फल देणारे आहेत. चंद्र :– २ स्थानाचा अधिपति असल्यानें हा पापग्रहांशी संयुक्त नसेल तर तो मारक होत नाही. बुध व शुक्र यांचा संयोग होईल तर तो राजयोग जाणावा.

१ नवमेश :–६-८-१२ स्थानी असून, भाग्यस्थानी पापग्रह असेल व दशम स्थानावर शुभग्रहांची दृष्टी नसेल तर कर्महानी सांगावयास हरकत नाही.

२ द्वितियेश :–६ व १२ स्थानी असेल किंवा व्ययाधिपति धनस्थानी असेल अगर लाभेश ६ व १२ स्थानी असेल तर धननाश होतो.

३ गुरु–व्ययस्थानी, धनेश बलहीन, लग्नावर पापग्रहांची दृष्टी असेल, तर धननाश होतो.

४ चतुर्थेश –शत्रुक्षेत्री, नीच असा १२–२–१–७ या स्थानी असेल तर इष्टेटीचा नाश होतो.

५ दशमेश –१–४–७ या स्थानी असेल किंवा दशमांत शुभग्रह असेल, तर कर्मसिद्धी. (उद्योगांत यशप्राप्ती होते)

६ नवमांत –केतू – रागीट, वक्ता, धर्महीन, परनिंदक, बापाचा द्वेष करणारा, दांभिक, निरुत्साही, अभिमानी होतो.

आता सर्वसाधारण फलादेश —

१) भाग्यस्थान –कारक ग्रह–रवि आणि गुरु भाग्यस्थानाचा अधिपति शनि, यांची जन्मलग्नकुंडलीतील बैठक लक्षांत घेता –(परिस्थिती खालावणे)

रवि —जलराशींत

गुरु —शत्रू राशींत

शनि – द्विस्वभावराशींत अष्टमेश म्हणून असमर्थ:– यामुळें साधारणपणें वय वर्षे २२ पर्यंतच भाग्याचा काळ चांगला असावा. तदनंतर हळूहळू भाग्याची बाबतींत ओहोटी सुरू व्हावी.

२) धर्माचरण :– भाग्येश शनि लग्नांत–बुधाचे घरी बुध अस्तंगत यामुळे धर्माप्रमाणे वागावे यात कमीपणा आचार विचारात क्रांति, भेदाभेद न मानणे इ. शुद्धाचरण, पवित्रपणा, देवतापूजन इ.

३) प्रवास :– भाग्यांत केतु, चंद्र, नवमस्थान वृश्चिक मंगळ, व्ययांत गुरु बरोबर त्यामुळे रेल्वे प्रवास विशेष नाहीच. अत्यावश्यक प्रवास योगाचा संभव. प्रवासाचा मनापासून तिटकाराच असावा !

४) लोकशिक्षण–सामाजिक कामगिरी समाजोन्नति ज्ञातिकारक ग्रह मंगळ गुरुबरोबर गुरु मारकेश, मनाचा कारक चंद्र यावर शनीची १० वी दृष्टी यामुळे याही बाबतीत दांभिकपणा फुकटाचा मानमरातब मिळविण्याची इच्छा, कार्य थोडे फुशारकी मात्र जास्त इ.

५. वृद्ध मंडळी, आप्तेष्ट अगर वडील मंडळीपासून सौख्य, पणजे, आजे, वडील, राहू, गरु, रवि, सिंह राशी तितकीशी चांगली नाही. गुरु, रवि यांची बैठक चांगली नाही.

फक्त दशमांत दिनराज प्रत्यक्ष स्वयंप्रकाशित असल्यामुळे मात्र वडिलांची आपल्या कर्तबगारीवरच भरभराट व्हावी. ही भरभराट साधारणपणे या मुलाचे जन्मापासून वय वर्षे अंदाजे १७ पर्यंतच चांगली राहावी. तदनंतर त्यात श×र= केंद्रामुळे विपरीत बुद्धि सुचून पैसा जाण्यास सुरवात व्हावी असे दिसून येते.

कारण :– दशमात शुक्र धनेश चंद्र लग्नेश व चतुर्थेश बुध व गुरु अचानक द्रव्यव्यय दर्शवितो. पैशाची हाव जास्त याकरता द्रव्यखर्च म्हणजेच सट्टे, लॉटरी, रेसेस इ. मुळे नुकसान योग संभवतो.

६. पूर्वजन्म :– भाग्यांत बौद्धिक राशीत यामुळे पूर्वजन्म बुद्धिप्रधान समाजातला असावा. भाग्येश शनि भाग्यात केतू :–यामुळे सारस्वत ब्राह्मण अगर प्रभू वाणी इ. असावा. त्या जन्मातील धनाची आणि सप्तम स्थानासंबंधी इच्छा अपुरी राहिल्यामुळे चालू जन्म प्राप्त झाला या गोष्टीकरिताच चालू जन्मात परिस्थितीशी झगडावे लागणार हे उघड दिसून येते. या जन्मात मानसिक समाधान लाभणे कठीण दिसते. म्हणजेच भाग्याचा पूर्वसंचितानुसार साठा कमी प्रमाणांतच असल्यामळे यापुढील परमेश्वरी संकेतानसार उरलेले आयुष्य कमी प्रतीचे कंठावे लागणार ! असे ग्रहयोगानुसार म्हणावे लागते.

॥ शुभंभवतु ॥

अभागी पण अटळ घटना !

लेखक : **पुरुषोत्तम द्वा. राजे.** (असि. रजिस्ट्रार)

जन्मकुंडली पाहताना अभागी घटना घडविणारीं स्थाने व ग्रह कोणते याचा विचार केला पाहिजे. अभागी घटना घडविणारी, अविचाराची कृत्ये, पापबुद्धीचे, समाजकंटकपणाचे फल निर्माण करणारी कुंडलींतील स्थाने म्हणजे चतुर्थ, अष्टम व द्वादश ही होत व शनि, मंगळ, हर्षल, नेपच्यून, व राहू केतू हे ग्रह आहेत. या ग्रहांचे केंद्र, प्रतियोग झाल्यास अगर विरुद्ध धर्माचे ग्रहांची युति अगर अशुभ योग झाल्यास भाग्यवान मनुष्यांचे कुंडलीत कितीही शुभ दृष्टीयोग अगर भाग्यकारक ग्रह असले तरी अटळ घटना निश्चितपणे घडतात.

प्रथम चतुर्थ स्थानांतील अभागी घटनांचा विचार करू. चतुर्थ स्थानांतील अभागी घटना पूर्वकर्मावरून भोगाव्या लागतात. या आपत्ती म्हणज कुटुंबांतील कर्त्या पुरुषाचा अगर पत्नीचा मृत्यू होणे, अपघाताने दुर्बलता येणे, चोरीमळे संपत्तीचा नाश, नोकरी सुटणे वगैरे आहेत. चतुर्थ स्थानांतील पापग्रहांवर ७,१० व १ या स्थानांतून केंद्र, प्रतियोग झाल्याने या घटना होतात. शुभ ग्रहांचे केंद्र, प्रतियोग होत असतील तर असें प्रसंग टळतात. त्याचप्रमाणे चतुर्थ स्थानात एकच पापग्रह असेल तर या स्थानावरून होणाऱ्या अशा घटना थोड्या प्रमाणात होतील, परंतु संसार विध्वंसक अगर आपत्तीकारक घटना एका ग्रहाने होत नाही. तसेच चतुर्थस्थानी शनि मित्रगृही अगर स्वगृही असल्यास विशेष हानी होणार नाही. पण शनि अग्नि अगर जल राशीस असल्यास थोडे असमाधान राहील. थोडक्यात असे दिसून येईल की, सूक्ष्म निरीक्षणाने या घटना समजू शकतात. कोणते योग या घटना घडवतील हे पाहू.

चतुर्थ स्थानीं शनि–चंद्र यांची युति असणे हा अत्यंत अभागी योग आहे. जन्मतः साडेसातीचा हा योग. हे ग्रह विरुद्ध धर्मांचे आहेत. अशा लोकांना लहानपणीं अनेक हालअपेष्टा भोगाव्या लागतात. वयाचे २० वर्षे पर्यंत अनेक अडचणी येतात. त्यांस अदृष्टाच्या अभागी घटना भोगाव्या लागतात. बालपणी मातेचा मृत्यु मध्यम वयांत पत्नीचा मृत्यु होणे यांच्या नशिबी ठरलेले असते. मात्र चंद्र शनि मिथुन' कर्क असे लोक सांपत्तिक स्थितीमध्यें भाग्यशाली असतात. वडिलार्जित इस्टेट चांगली असते व स्वतःची कमाई देखील चांगली असते पण या अभागी घटना टळत नाहींत.

चतुर्थ स्थान हे पाताल केन्द्र असल्यानें शनिबरोबर कोणताहि पापग्रह असल्यास अशा घटना घडतील. शनि बरोबर केतू असल्यास कुटुंबांत अकाली मृत्यू होऊन संसार सुख एकदम नाहीसें ह'ईल.

शनि हर्षल एकत्र असल्यास त्यांचे परिणाम स्फोटक होणार नाहीं. कारण हे ग्रह समान धर्मांचे आहेत. मात्र नोकरी एकाएकी जाईल. मालमत्तेचा नाश होईल. या घटना वयाचे ३०, ४२, ४५, ४९ या वर्षी होतील. शनि हर्षल यांचेबरोबर रवि अगर मंगळ असेल तर अभागीपणाला सीमा असत नाहीं. आयुष्यांत सुख व शांतता कधीही मिळणार नाहीं. शनिबरोबर इतर पापग्रह म्हणजे हर्षल, मंगळ, राहू, नेपच्यून, केतू नोकरी धंद्यावर कधीहि परिणाम करणार नाहीं. शनि मात्र चतुर्थं स्थानी पापग्रहांबरोबर असल्यास दशम स्थानावर दृष्टि असल्याने नोकरीत संकटे आणतो. एका ऑफिसरचे कुंडलीत कर्क राशीस चतुर्थं स्थानी शनि मंगळ व दशमेश शनि असल्यानें दशम स्थानी गोचर शनि आल्यावर नोकरीत संकट येऊन तात्पुरती बडतर्फीचा प्रसंग आला. दशम

स्थानांतील शनिचे भ्रमण संपल्यावर संकटमुक्त झाले.

चतुर्थ स्थानीं शनी मंगळामुळें नोकरीत, संकट आले. कौटुंबिक स्थिति एकसारखी कधीच रहात नाही. वार्षिक कुंडलीत देखील अशुभ दृष्टीयोग होतेच.

शनी, रवी, हे विरुद्ध धर्माचे ग्रह आहेत. चतुर्थस्थानी रवि असलेले लोक मोठ्या कुळांत जन्मास येतात· पण शनि, रवीची युति या स्थानी असल्यास लहानपणीं वडिलांचा अकाली मृत्यु झाल्यानें शिक्षणांत व्यत्यय येतो. ही युति अत्यंत घातक आहे. सोने हातांत घेतले तरी माती होईल. नोकरी योग्यतेप्रमाणें मिळणार नाही· जन्मभर अपयश पाठीशीं लागलेले असते. द्विस्वभाव राशीस ही युति असल्यास स्वतःचे आरोग्य बिघडून विलंबी आजार तारुण्यांत होईल. अशा कुंडलीत चंद्र-बुधाचे अशुभ योग असल्यास मानसिक विकृती निर्माण होईल. एका ऑफिसरच्या कुंडलीत चतुर्थ स्थानीं रवी शनी युति व चंद्राचा तनुस्थानांतून काटकोन योग असल्यानें वरिष्ठांशी न पटल्यामुळें नोकरीचा राजीनामा दिला. पत्नीचा अकाली वियोग झाला. शेती व्यवसाय सुरू केला. ज्या जमिनींत कापूस, भुईमूग अशी पिके येऊन दुसऱ्यांनी अमाप पैसा मिळविला त्यांत या गृहस्थांना दरवर्षी अपयश आले. व वृद्धापकाळीं विपन्नावस्था आली.

शनि मंगळ चतुर्थ स्थानीं असतांना रवी शनिइतके जाचक परिणाम होणार नाहींत. कौटुंबिक अनेक तऱ्हेच्या अडचणी येतील. वडिलार्जित इस्टेट कर्जापायी जाईल. द्विभार्या योग होईल. दशमस्थानीं एकादा ग्रह असल्यास वर दिल्याप्रमाणें नोकरींत संकट येईल.

शनि–मंगळाबरोबर हर्षल असेल तर नोकरींत आकस्मिक संकट येईल. वयाचे ३०,४४,४५ व ५२ या वर्षी संकट अग्नि राशींत हर्षल किंवा नेपच्यून असल्यास अग्नीपासून अगर प्रवासात अपघात होईल. जलराशीत असेल तर घर पडणे मालमत्तेचे नुकसान होते. हर्षल अनेक आकस्मिक संकटे निर्माण करीतो.

शनि अगर मंगळाबरोबर राहू अगर केतू असल्यास वडिलार्जित घरात सुख लागणार नाही. हिस्टेरिया-सारखा आजार होईल.

मंगळ हर्षल ही जोडी मात्र शनी हर्षल, शनि मंगळ, शनि रवि मंगळ राहू, केतू ह्या जोडीइतकी घातक नाही. गृहसौख्य, मातृसुख यांवर परिणाम करील. वडिलांचा मृत्यु केव्हाहि झाला तरी आकस्मित होईल. ही युती वायु व पृथ्वी राशीत घातक असत नाही. पत्नीचा मृत्यु या युतीने एकाएकी होईल. एका वकिलाचे कुंडलींत चतुर्थस्थानी मंगळ हर्षलची युति आहे. प्रॅक्टिस भरपूर असल्याने सांपत्तिक स्थिती उत्तम होती परंतु आयुष्याचे भर अमदानींत म्हणजे वयाचें ४२ वे वर्षी धनुर्वाताने पत्नीचा मृत्यु झाला पुढील आयुष्य शेवटपर्यंत निरुत्साही झाले. नेपच्यूनचे परिणाम हर्षलइतके घातक असत नाहीत.

चतुर्थेश शुभ ग्रह असून तो रवि, चंद्र, गुरू शुक्र १, २, ५, ९, १०, ११ या स्थानी शुभ ग्रहांच्या युति, द्विराश्यांतर, त्रिकोण योगांत असल्यास या आपत्ती टळू शकतात. या स्थानांतील आपत्ती मानवी कृतीन होणाऱ्या नसतात. त्या अधिदैविक व अधिभौतिक असतात. वर दिलेल्या शनि चंद्र, शनि रवि, मंगळ शनि, मंगळ शनिबरोबर राहू अगर केतू यांच्या युतिने मनुष्याच्या आयुष्यांत अभागी घटना घडलेल्या अनेक कुंडल्या आमच्या पाहण्यांत आहेत. कुंडलीचे योग्य निरीक्षणाने या घटनांच्या सूचना देता येतात. अष्टम, द्वादशस्थानातील घटना लेखविस्तारामुळे येथे देता येत नाही. चतुर्थ स्थानाचाच विचार करून हा विषय पुरा करीतो.

० ० ०

॥ चक्षुर्मय सत्यं ॥

लेखक : चं. अ. धनवटे ज्योतिषप्राज्ञ

मातरं पितरं वन्दे वन्दे श्रीकुलदैवतम् ।
ज्ञान दीप प्रदातारं वंदे ज्ञानगुरुपरम् ।

ठेविले अनंते तैसेची रहावे चित्ती असू द्यावे समाधान ।

अनंत म्हणजे परमेश्वर. परमेश्वराने जसे ठेवले तसे रहावे. त्यांतच समाधान मानावे. हा झाला सर्वसाधारण अर्थ. पण मी विशेष अर्थ असा करतो की, अनंत म्हणजे आकाश व त्यांतील ग्रह व तारे हे होय. त्यांच्या इष्टानिष्ट बलाप्रमाणे—परिणामाप्रमाणे सुखदु:खाचे जे प्रसंग येतात, व ते अटळ आहेत म्हणून त्यांतच समाधान मानावे. हा माझा अर्थ 'चक्षुर्मय सत्यं' असा स्वानुभव आहे.

वेदांग ज्योतिषाने स्पष्ट म्हटले आहे की—

यथा शिखामयुराणां नागानांमणयोयथा ।
तद्वद्वेदांग शास्त्राणां ज्योतिषं मूर्धनिस्थितम् ।

म्हणजे मोराच्या मस्तकावर ज्याप्रमाणे तुरा असतो, नागाच्या मस्तकावर ज्याप्रमाणे मणी असतो, त्याप्रमाणे वेदादि शास्त्रांत ज्योतिषशास्त्र हे शिरोभागी किंवा अग्रभागी शोभते.

प्रत्यक्षं ज्योतिषशास्त्रं सूर्याचंद्रमसौ यथा । १ ।
वेदस्य निर्मलंचक्षः ज्योतिःशास्त्रमनूत्तमम् । २ ।

असे ज्योतिषशास्त्राचें व कालनिर्णय शास्त्राचे महत्व सांगणारी वचनें पुष्कळ आहेत. या कालनिर्णय शास्त्राचे प्रभुत्व अनादि कालापासून आजतागायत अगदी कायम आहे. सर्व जगाचे व्यवहार या कालनिर्णय शास्त्राप्रमाणे चाललेले आहेत; आणि जगांतील सर्व चराचर वस्तूची व प्राणीमात्रांची उत्पत्ती, स्थिती आणि लय या तिन्ही स्थिति या महान व अपूर्व अशा शास्त्राच्या सर्वस्वी आधीन आहेत.

ज्योतिषशास्त्र म्हणजे आकाशांतील तेजस्वी ज्योतींचे, प्रकाशमान व दैदिप्यमान ताऱ्यांचे शास्त्र. अत्यंत गहन व अत्यंत गूढ अशा ज्योतिषशास्त्राची जरूरी प्रत्येकास क्षणोक्षणी आहे.

जोपर्यंत मनुष्यांत भावी गोष्टींची जिज्ञासा व भविष्यकालीन शुभाशुभ फले आगाऊ कळावी अशी इच्छा जागृत आहे तोपर्यंत प्रत्येकास ज्योतिषशास्त्राची जरूरी आहेच. भविष्यकालीन गोष्टी आगाऊ वर्तवणारे फलज्योतिष हे फक्त एकच शास्त्र आहे. मनुष्य दैववादी असो अगर अट्टल प्रयत्नवादी असो त्यास याचा फार उपयोग होतो. दैववाद्यांस कोणता काल अनुकूल किंवा प्रतिकूल आहे हे समजते व प्रयत्नवाद्यांस जास्त प्रयत्न करण्यास उत्तेजन देणारे असे हे मार्गदर्शक व अति महत्वाचे कालविधानात्मक, कालज्ञान व भविष्यज्ञान शास्त्र आहे

पाश्चिमात्य सुधारलेल्या देशांत आमच्या ज्योतिषग्रंथांची भाषांतरे होऊन त्यांनी अनेक शोध लावून ते सप्रमाण सिद्ध करावे व आमच्याकडे इतके अमूल्य ग्रंथभांडार असतांना नवीन शोध लावणे तर दूरच राहिले पण आम्हास पंचांगसुद्धां पाहता येऊ नये यापेक्षा दुर्दैव कोणते ?

अशी ही दैन्यावस्था सुधारण्यास एकच मार्ग आणि तो हाच की, सामान्य शिक्षितानें ज्योतिष शिक्षण घेणे व त्याचा प्रसार करणे. याच विशिष्ट हेतूने—

जे जे आपणांसी ठावे । ते ते इतरांसी शिकवावे ।
शहाणे करोनी सोडावे । सकळजन ।

या उच्च ध्येयप्रेरणेने प्रेरित होऊन ज्योतिष शिक्षणकार्य ही संस्था करीत आहे. त्यांना धन्यवाद देण्यास मी असमर्थ आहे. या संस्थेमार्फत शिक्षण घेणे म्हणजे गंगेत स्नान केल्याप्रमाणे आहे. अशा वाहत्या गंगेत हात धुवून घेणे हे प्रत्येक सूज्ञाचे आद्य कर्तव्य होय.

फलज्योतिष अभ्यास मंडळास धन्यवाद !



समाज आणि ज्योतिषशास्त्र

लेखिका : कु. जयश्री वैद्य

फलज्योतिष शास्त्र हे खरेखुरे शास्त्र नसून अज्ञान व भोळ्या लोकांची दिशाभूल करून स्वतःची तुंबडी भरण्याकरिता काही स्वार्थी व धूर्त लोकांनी काढलेली क्लृप्ति आहे हे प्रतिपादन करणारा वर्ग समाजांत आहे अनेकजण ज्योतिषशास्त्र हे झूट आहे असे मोठ्याने सांगतात पण त्यांच्यावर कधी भयंकर प्रसंग आला तर त्या संकटाचे निवारण कसे करायचे म्हणून गुपचूप ज्योतिषाकडे जातात हे दृष्टोत्पत्तीस आले आहे.

मनुष्याला आजच्या युगांत प्रत्येक वस्तूची, प्रत्येक शास्त्राची गरज आहे. कारण पूर्वीच्या मानवात आणि आताच्या मानवांत आता जमीन-अस्मानाचे अंतर आहे. समाजांत अनेक प्रकारची दु:खे आहेत. शेजारच्या घरात जरी नुसते डोकावून पाहिले तरी आपणाला त्याची प्रचिती येते. गरीबाच्या झोपडीपासून श्रीमंतांच्या हवेल्यांतूनहि कोणते ना कोणते तरी दु:ख जणू वास्तव्य करून राहिलेले असते. कोणाला संततीचे दु:ख तर कोणी गरीबीने गांजलेला, कोणी दीर्घकाल अंथरूणावर तर कोणाला कसले तरी व्यंग असे एक ना अनेक प्रकार दिसून येतात.

बागेतील सायलीच्या वेलाला मांडव घालायचा राहिला तर जवळच्या कांटेरी कुंपणावरच तो चढू लागतो व त्यानंतर त्याचे गुंतलेले धागें सोडवताना जसा त्रास होतो तद्वत तरुण स्त्रीच्या आयुष्यांत अशी कांही ३।४ वर्षे अनावर येतात की त्यावेळी नीट वळण लागले नाही तर सापडेल तो जवळचा आधार नकळत स्त्रीच्या आयुष्यांत गुरफटतो ! मग तो बरा वाईट कसाही असो. त्या स्त्रीचे गुंतलेले धागे त्या राक्षसी आधारातून सोडवणे कठीण होते व ते यशस्वी न झाल्याचे दु:ख किती हे सांगणेहि कठीण होऊन बसते. त्यासाठी योग्य मार्गदर्शन व जबाबदार व्यक्तीची अत्यंत गरज आहे.

आजच्या काळांत विवाहाची समस्या फार कठीण होऊन बसली आहे. विवाह म्हणजे एक प्रकारचा जुगार आहे. दैवाचे फासे जसे पडतील ते दान निमूटपणे सहन करणें व जीवनाची नौका किनाऱ्याला पोहचवण्यासाठी मानवाने झटले पाहिजे. जगांतील स्त्री-पुरुष आकाशांत ज्याप्रमाणे एखादा चिठोरा हेलकावे खात असतो त्या निर्जीव चिठोऱ्याप्रमाणे असतात. दोन प्रेमी युगुलांना एकत्र आणणारी व दूर फेकून देणारी दैवी लाट का उठावी हे त्या वरूणदेवतेच्या इच्छाशक्तीला प्रेरणा देणाऱ्या एका परमेश्वराला माहीत !

हिंदूधर्मशास्त्राप्रमाणे मनुष्य आपल्या पूर्व कर्मानुसार आपल्या आयुष्यांतील सुखदु:ख भोगत असतो. परिस्थिती आणि प्रवृत्ती या संयोग–लाटांनी त्याचा कार्य संसार थाटलेला असतो. मनुष्याला आपण गळ्यापर्यंत बुडेपर्यंत बुडतो आहोत त्याची कल्पना येत नाही जेव्हां पायाखालचा आधारच गेलेला असतो. तेव्हा त्याला मागे हटता येत नाही पुढे जाता येत नाही. तर मग ह्या वेदनेला अंतच रहात नाही. प्रत्येक माणसाच्या अंत:करणात कोणते तरी असं एक विचित्र खोल दु:ख असतं की ते जुनं शिळं झालेलं असतं परंतु दुसऱ्या कोणत्या तरी निमित्ताने मन अस्वस्थ झालं की त्या जुन्या दु:खाची आठवण ताजी होते.

ह्यावरून असे दिसून येते की, मानव हा अनेक दु:खाने, व्याधींनी त्रस्त झालेला आहे. आणि ज्यावेळी डोळ्यापुढे अंधार दिसतो तेव्हांच मनुष्य दैववादाचा अंगिकार करतो. प्रत्येकाने दैवांत लिहिले आहे म्हणून

मानवी जीवन व ग्रह यांचे संबंध आणि परिणाम

लेखक : दिगंबर ग. ठिपसे

आपल्यापासून हजारों मैल दूर व लांब असणाऱ्या आकाशांतील सूर्य, चंद्र वगैरे ग्रहांचे या जगावर आणि मानवी जीवनावर इष्ट किंवा अनिष्ट असे परिणाम होत असतात.

माणसाच्या जन्मकालीन कुंडलीप्रमाणें किंवा ग्रहांप्रमाणें, त्याच्या जीवनावर इष्ट किंवा अनिष्ट असे परिणाम होत असतात. व त्याप्रमाणें आणि त्या प्रमाणात, त्याला आपल्या आयुष्यांमध्यें सुख किंवा दुःख भोगावे लागते. त्याचप्रमाणें आकाशांतील ग्रहांचे या जगावर म्हणजे या जगामध्ये अस्तित्वांत असलेल्या सर्व निरनिराळ्या देशांवर त्या त्या देशांच्या कुंडलीप्रमाणें किंवा ग्रहमानाप्रमाणें अनुकूल किंवा प्रतिकूल असे परिणाम निश्चितपणें होत असतात. अणि तसे आपल्या अनुभवास येते.

या जगांतील प्रत्येक जड व अजड किंवा चेतन व अचेतन वस्तु गणितशास्त्राच्या नियमानें म्हणजे गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें (Law of the centre of gravity) ने बद्ध आहे. नाहींतर वर फेकलेली एखादी वस्तु आणि वरून खाली पडणारी एखादी वस्तु या तशाच हवेत तरंगत राहिल्या असल्या. तसेंच मानवी जीवनामध्यें अतिशय गोड व हृदयस्पर्शी असे जे संगीत शास्त्र आहे, किंवा संगीताची निरनिराळी वाद्यें आहेत, तीसुद्धां सप्तसुरांनीं नियमबद्ध अशीच आहेत. त्याचप्रमाणें मानवी जीवन हेसुद्धां माणसाच्या जन्मकालीन ग्रहयोगांनीं नियमबद्ध असेच आहे आणि त्या शुभ किंवा अशुभ अशा ग्रहयोगांप्रमाणेंच माणसाच्या जीवनांमध्यें अनुकूल किंवा प्रतिकूल अशा घटना घडत असतात.

नास्तिकवादानें जसे परमेश्वराचे अस्तित्व कधींहीं नष्ट होत नाहीं, त्याचप्रमाणें या शास्त्रावर जरी कांहीं लोकांनी विश्वास ठेवला नाहीं, तरीसुद्धां हजारों मैल दूर अशा अनंत ब्रह्मांडात असलेल्या ग्रहांचे मानवी जीवनावर अणि या जगावर जे व्हावयाचे ते परिणाम निश्चितपणें होत असतात. आणि ते कधींहि चुकत नाहींत. कांहीं वेळेस माणूस आपले कर्तव्यकर्म चुकेल अथवा विसरेल परंतु ग्रह मात्र आपली कामें अगदी नियमितपणानें, पद्धशीररीतीनें आणि बरोबर करीत असतात.

आकाशांतील ग्रहांचे मानवी जीवनाशीं आणि या जगाशीं संबंध कसे काय आहेत आणि त्यांचें परिणाम या दोन्हींवर कसे काय होतात, ह्या गोष्टीं आपल्या भोंवतालच्या जगाकडे आणि निसर्गातील कांहीं गोष्टींचे किंवा घटनांचें सूक्ष्म अवलोकन केले असतां त्या आपणांस सहज समजून येतील. सूर्योदय झाल्यावर कमळ उघडते आणि सूर्यास्त झाल्यावर ते मिटते. ही क्रिया कोणालाहि कोणत्याहि साधनानें कधींतरी करतां येईल कां ? अर्थात् ती कधींच शक्य नाहीं असेंच शेवटी म्हणावे लागेल. सूर्याचा-सूर्यप्रकाश व सूर्यकिरणांचा मानवी जीवनांवर व या जगांवर पोषक असाच परिणाम होत असतो. तसेंच समुद्राच्या भरती व ओहोटीशी चंद्राचाच संबंध जोडला जात आहे आणि वरील दोन्हींहि गोष्टी चंद्राच्या उदयावरच अवलंबून असतात. फलज्योतिष शास्त्रामध्यें चंद्र हा मनाचा कारक ग्रह असल्यामुळें, वेडे लोकांचा संबंधहि चंद्राशीच विशेषतः दर्शविला जातो आणि पौर्णिमेच्या सुमारास वेड्यांच्या वेडेपणास भरती येते, आणि

अमावास्येस ती ओसरते असा अनुभव शेंकडो वैद्य व डॉक्टर्स सहज सांगू शकतील. तसेंच पुष्कळ रोग्यांना आणि आजारी माणसांना, सर्वसाधारणपणें अमावास्या फारच जड जाते आणि प्रसंगी त्यांतील थोडेजणांचा त्याच सुमारास मृत्युहि होतो, असे आपल्या पाहण्यात येते. बहुतेक वेडे लोकांच्या कुंडलींत विशेषतः गुरुच्या शुभयोगांत नसलेले मुख्यतः चंद्र व बुध हे शनि व मंगळानें चांगलेच दूषित असतात, आणि त्यामध्ये राहू हा रवि-चंद्राला आणखीन दूषित करून भरच घालतो. आणखीन त्यांत जर चंद्र व बुध हे लग्नेश असतील तर मग कांहीं विचारायलाच नको.

त्याचप्रमाणें शनि व मंगळ या बलाढ्य अशा पापग्रहांच्या युतींचे किंवा त्यांच्या अशुभ योगांचे अनिष्ट असे परिणाम मानवीं जीवनांवर आणि या जगांतील निरनिराळ्या देशांवर कमी-अधिक प्रमाणांत झालेले आहेत आणि तसे ते होत असतात. त्याचप्रमाणें रवि हा आत्माकारक व राजकारक ग्रह असल्यामुळे, शनि रवि युती, रवि राहु युती, किंवा त्यांच्या अशुभ अशा योगांचें अनिष्ट असे परिणाम वरीलप्रमाणेंच पहावयास मिळतात. तसेंच बुध हा ग्रह बुद्धीचा मालक आहे, परंतु तो विशेषतः मंगळानें दूषित झाल्यावर, त्याचे फारच अनिष्ट असे परिणाम पाहावयास मिळतात. विशेषतः मंगळ-बुध युती किंवा षडाष्टक योग, या अशुभ अशा योगांमुळें डोक्याला फार त्रास होतो; मानसिक स्वास्थ्य बिघडते आणि कांहीं वेळेस वेडचासारखे सुन्न होऊन कांहीं सुचेनासे असे होते. त्याचप्रमाणें गुरुसारखा अत्यंत

महत्वाचा व तारक आणि सात्विक असा शुभग्रह दुसरा कोणताहि नाहीं. त्यामुळें साहजिकच त्याचे मानवी जीवनावर आणि जगांवर शक्य तेवढे इष्ट व चांगले असेंच परिणाम होत असतात. परंतु तोच गुरु जर शनि व राहू यासारख्या पापग्रहांनीं दूषित नसेल किंवा तो त्यांच्या अशुभ योगांत नसेल तरच शुभ व चांगली फलितें देण्यास तो चांगला समर्थ ठरतो. शुक्र हा गुरुशीं युति करणारा असेल तर तो गुरुची शुभ फलिते दूषित करतो. शुक्र हा विशेषतः कलेचा व सौंदर्याचा कारक असून तो स्त्रीकारक असा ग्रह आहे, आणि तसेंच मानवी जीवनांतील एक महत्वाचे सत्वहि दर्शविणारा असा तो ग्रह आहे. शुक्र हा जर मेष किंवा वृश्चिक राशीत असेल तर शुक्राची फलितें मानवी जीवनाला मिळत नाहीं. याच राशींमध्ये जर शुक्र हा शनि किंवा मंगळाच्या सान्निध्यांत असेल तर आणखीन तीव्र अशीं फलितें पाहावयास मिळतात. एकंदरीत वरील सर्व गोष्टीं ग्रहांचें अस्तित्व, त्यांचीं महती व त्यांचें कार्य आणि त्यांचें होणारे परिणाम पटवून देण्यास पुरेशा व समर्थ आहेत.

या जगामध्यें दैव अथवा ग्रहयोग म्हणून जी कांहीं अनंत, अद्भुत व अदृश्य अशी शक्ति आहे, तीं जर नसती तर या विश्वांतील सर्वच माणसें सदासर्व-काल सुखी किंवा दुःखी अशीच कायमची राहिली असती. दैव आहे म्हणूनच अगदी अल्प अशा कालांत, राजाचा रंक किंवा रंकाचा राजा बनूं शकतो आणि दैव ते बनवूं शकते.

एखाद्या बुद्धिवान व हुशार माणसाला दैव अनुकूल असले म्हणजे दुधांत साखर टाकल्याप्रमाणेंच होते. दैवाच्या अनुकूलतेमुळेच अशा माणसाच्या अंगच्या गुणाचें आणि कर्तबगारीचे चांगले तेज आणि प्रभाव पडून तो अगदी अल्प कालांतच अगदीं खालच्या जागेवरून किंवा परिस्थितीतून मोठ्या उच्चपदाला आणि वैभवाला जाऊन पोंहचतो. याचे मोठे उदाहरण म्हणजे फ्रान्सचा बादशहा नेपोलियन बोनापार्ट किंवा जर्मनीचा मोठा डिक्टेटर हेर हिटलर हे होय. त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीला प्रथम हे दोघेहि साधे लष्करी शिपाई म्हणून होते. परंतु दैवाच्या अनुकूलतेमुळेंच त्यांच्या कर्तबगारीचा चांगला प्रभाव पडून, अगदी

अल्पकालांतच दोघेहि सत्तेच्या आणि वैभवाच्या उच्च अशा शिखरावर जाऊन पोहचले. परंतु शेवटीं दुर्दैवानेंच किंवा अत्यंत अनिष्ट अशा ग्रहयोगांमुळेच या दोन्ही थोर वीर आणि मुत्सद्दी पुरुषांचा शेवट मात्र फारच वाईट व दुःखद असा झाला.

माणूस हा जन्मतःच प्रयत्नवादी व मोठा आशावादी आहे. परंतु माणसाच्या आयुष्यांमध्यें मनापासून प्रयत्न करूनसुद्धां, जेव्हां त्याला बरेच वेळां अपयश येते आणि निराशा पदरी पडते. तसेच चांगले व सरळ वागूनदेखील जव्हां त्याच्यावर एका मागून एक संकटें येतात आणि अतिशय त्रास होतो, तेव्हा तो माणूस शेवटी दैववादी बनतो, आणि साहजिकपणें त्याचा ओढा ज्योतिष-शास्त्राकडे वळतो.

मानवी जीवनामध्यें प्रयत्नाला दैवाची जोड असणें अत्यंत आवश्यक आहे, नाहींतर माणसाचे जीवन अतिशय कष्टमय व त्रासदायक आणि रुक्ष व नीरस असेंच होईल व होते.

या जगामध्यें काहीं अतिशय बुद्धिवान व हुशार अशी माणसें केवळ त्यांना दैव अनुकूल नाहीं म्हणूनच त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचें व कर्तबगारीचे चीज न होता ती या जगाच्या पाठीवर कुठेतरी कानाकोपऱ्यांत उपेक्षितपणे पडलेलीं आहेत असें आपणांस आढळून येंईल. आणि अशी माणसें कष्ट करून, ते आपले जीवन कसेतरी जगत आहेत एवढेच. अशा गुणी माणसांच्या खडतर अशा जीवनाकडे पाहिले म्हणजे सुप्रसिद्ध इंग्लिश कवि थॉमस ग्रे यांच्या जगप्रसिद्ध असलेल्या कवितेतील कांही महत्वाच्या व समर्पक अशा ओळींची जरूर आठवण होते. त्या अशा आहेत कीं :—

Full many a gem of Purest ray sereue,
The dark unfathomed caves of ocean bear,
Full many a flower is born to blush unseen,
and waste its sweetness on the desert dir.

याच्या अगदीं उलट परिस्थिती म्हणजे कांहीं अगदीं थोडी शिकलेली व साधारण बुद्धि असलेली परंतु दैवाची चांगली अनुकूलता असलेली अशी माणसें या जगामध्यें चांगला भरपूर असा पैसा मिळून अैश्वर्यात आणि सुखांत ऐषआराम करीत आहेत असें आपणांस दिसून येईल.

मानवी जीवनाच्या विविध अशा क्षेत्रांमध्ये कोणत्याहि एका विषयामध्यें, किंवा शास्त्रामध्यें किंवा कलेमध्यें, उत्तम ज्ञान, चांगली विद्वता व अनुभव असणें हा अेक योग आहे. तसेंच चांगला भरपूर असा पैसा मिळणें हा अेक दुसरा योग आहे, आणि हे दोन्हींहि योग अगदी भिन्न, निरनिराळे व स्वतंत्र असे आहेत.

या जगांतील प्रत्येक माणूस आपल्या दैवाप्रमाणें म्हणजे जन्मकालीन असलेल्या त्याच्या ग्रहयोगाप्रमाणेंच तो आपल्या आयुष्यामध्यें सुखदुःखें भोगीत असतो. तेव्हां कोणी कोणाचा हेवादावा अथवा मत्सर करूं नये.

श्री समर्थ रामदासस्वामीनी असे म्हटले आहे की,

मना त्वांचिरे पूर्वं संचित केले,
तयांसारिखे भोगणें प्राप्त झाले.

इतर कोणत्याहि शास्त्रापेक्षां ज्योतिषशास्त्राचा मानवी जीवनाशीं अगदीं निकटचा संबंध आहे. म्हणूनच या शास्त्रामुळें मानवी जीवनामध्यें उत्तमप्रकारें मार्गदर्शन होऊं शकते आणि तसें ते आतापर्यंत झाले आहे. म्हणूनच त्या दृष्टीनें लोकांनीं या शास्त्राकडे मोठ्या अवस्थेनें पाहून, या शास्त्राचा आपल्या जीवनांमध्ये मोठ्या श्रध्देनें वेळीच सदुपयोग करून घ्यावा. हे केव्हांहि इष्ट व श्रेयस्कर आहे आणि परिणामी ते हितकारकच ठरेल. संसाररूपी सागरांमध्यें मोठे वादळ झाल्यावर आयुष्यरूपी नौकेला अशावेळीं बरोबर मार्ग दाखविण्यास, ज्योतिष ह्या महान शास्त्राचा एखाद्या होकायंत्राप्रमाणें किंवा दीपस्तंभाप्रमाणें अतिशय उपयोग होतो आणि झाला आहे.

मानवी जीवनाचा ग्रहांशीं अत्यंत निकटचा असा संबंध आहे म्हणूनच ग्रहांचें इष्ट किंवा अनिष्ट असे

परिणाम मानवी जीवनावर होत असतात. अर्थात जन्म-कालीन कुंडलीप्रमाणें जसे ज्याचे ग्रहयोग असतील त्या-प्रमाणें त्या माणसाला आपल्या आयुष्यामध्यें कमी किंवा जास्त अशा प्रमाणांत सुख किंवा दुःखें भोगावी लागतात आणि त्याचप्रमाणें अनुकूल किंवा प्रतिकूल अशा घटन घडत असतात.

"सुख पाहतां जवापाडें । दुःख पर्वताएवढें ।।" असेंच पुष्कळ माणसांच्या आयुष्यांत सापडते. माणसाच्या प्रारब्धांतील विशेषतः अनिष्ट असे ग्रहयोग हे सहसा टळत नाहींत, हे जरी खरे असले तरीसुद्धां अनिष्ट ग्रहयोगांमुळें येणारीं संकटे आणि त्रास कमी करण्याकरितां त्या त्या ग्रहांचीं किंवा त्या त्या ग्रहरुपी देवतांचीं, मोठ्या श्रद्धेनें व विश्वासानें आणि शुद्ध आचरणानें योग्य ती उपासना केल्यास, अनिष्ट ग्रहयोगांमुळें होणाऱ्या भयंकर पीडेची व परिणामाची तीव्रता थोडीफार कमी होऊन ग्रहपीडचा त्रास थोडा कमी होतो किंवा तो सौम्य स्वरुपांत होतो.

श्रद्धापूर्वक नियमित अशा ईश्वरी उपासनेनें मनः शांति मिळून, आत्मबल वाढतें आणि त्यामुळें माणूस प्राप्त झालेल्या परिस्थितीला धैर्यानें तोंड देऊं शकतो ईश्वरी उपासना कधींहि वायां जात नाहीं. माणसाला स्वप्नांतसुद्धा कल्पना करता येणार नाहीं, असा ईश्वरी उपासनेंमुळें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीनें फायदा होत असतो.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी असे म्हटले आहे कीं,–

प्रारब्ध माझे सहसा टळेना ।
तुजविण रामा मजकंठवेना. ।।

राहू--केतूंची शुभाशुभ फलें

लेखक : ज्योतिष विशारद : **वामन रामचंद्र पंडित**, बी. ए., डी. आय्. ए. एस्.

कुंडलींत साधारणपणें नऊ ग्रह लिहिलेले आढळतात. ह्यापैकी रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि हे पूर्ण ग्रह असून राहु आणि केतु हे उपग्रह आहेत. ज्या वर्तुल-मार्गानें पृथ्वीसभोवतीं चंद्र फिरतो तो मार्ग आणि ज्या मार्गानें पृथ्वीची सूर्यासभोंवतीं प्रदक्षिणा होते तो मार्ग, हे दोन्ही मार्ग परस्परांस आकाशांत ज्या दोन भिन्न स्थळीं छेदितात त्यापैकीं एका छेदनबिंदूस 'राहू' व त्याच्या समोरील छेदनबिंदूस 'केतु' म्हणतात. हे बिंदू समोरासमोर असल्यानें अर्थात् कुंडलींतहि ते नेहमीं परस्परांच्या सप्तमस्थानींच म्हणजेच समोरासमोर (६ राशि=१८० अंश अंतरावर) असतात (आणि तसेच दाखविले जातात.) सामान्यत: राहु-केतूंची फलें शनि-पासून मिळणाऱ्या फलाप्रमाणेंच असतात. शनि, बुध, व शुक्र हे राहु-केतूंचे नैसर्गिक मित्र व रवि, चंद्र, मंगळ हे राहु-केतूंचे शत्रू समजले जातात. गुरू हा सम असतो. म्हणजे राहूचे गुरूशीं शत्रुत्वहि नाहीं आणि मित्रत्वहि नाही. राहू आणि केतु हे शुभग्रहांसमवेत असतांना शुभफलें देतात व अशुभ ग्रहांसमवेत असतांना अशुभफलें देतात. कुंडलीत तिसऱ्या, सहाव्या, दहाव्या व अकराव्या स्थानी ते असले म्हणजे शुभफले देऊ शकतात. आठव्या स्थानांतील राहु-केतु आयुष्ययोगास बरे समजले जातात. कन्या राशि हे 'राहु'चे स्वगृह समजलें जाते आणि मीन राशी हें केतूचें स्वगृह समजले जातें. वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या ह्या राहूच्या शुभराशी समजल्या जातात. वृश्चिक, मकर व मीन ह्या राहूच्या साधारण शुभराशी समजल्या जातात आणि मेष, तूळ, धनु व कुंभ ह्या राहूला अनिष्ट राशी मानल्या जातात. केतूला फक्त धनु व मीन राशि जास्त शुभ मानल्या जातात.

राहू-केतूंचे गुणधर्म व स्वभाव पुढीलप्रमाणें प्रत्ययास येतात–'हुषारी, विवेक, कार्यसाधना, बोलण्याचा तिट-कारा, दांडगी कल्पनाशक्ति, उच्च महत्वाकांक्षा, राज-कारणांत प्रावीण्य, उद्योग, कोणत्याहि गोष्टीचा साधक-बाधक विचार करण्याची पात्रता, गूढ व कठीण विष-यांची आवड, हस्तकला, पेंटिंग, फोटोग्राफी वगैरेंची आवड, स्वभावानें शांत, भाषण मुद्देसूद, मनानें स्वार्थी, इतरांच्या सुखदु:खांबद्दल उदासीन, धार्मिक मते पौरा-णक व जुन्या पद्धतीचें, परोपकाराची इच्छा, धार्मिक ग्रंथांच्या अध्ययनाची आवड, स्वातंत्र्याविषयीं आवड हे गुणविशेष उल्लेखणें आवश्यक आहे.

राहू-केतु शुभस्थानी, शुभराशीला किंवा मित्र-राशीला असल्यावेळीं हे गुणधर्म प्रकर्षानें प्रत्ययास येतात. पापग्रहांसमवेत म्हणजे रवि, मंगळ, शनिबरोबर राहु-केतु असल्यास अशुभफलेंच जास्त मिळतात. जन्म-कुंडलींतील द्वादशस्थानस्थित राहू-केतु कोणकोणती फलें देऊ शकतात ते आतां पाहूं:–

१) तनुस्थानी (लग्नी) शनिसहित राहू असल्यास मनुष्य भांग, गांजा इ. व्यसनांनीं युक्त होतो. तो पित्यास व भावंडाना त्रास देतो. त्याला कानाचा विकार उत्पन्न होतो व आयुष्य कष्टमय जाते. लग्नी एकटा राहु असता ती व्यक्ती दुष्टबुद्धीची, लोकांना फसविणारी, मस्तकशूलाचा उपद्रव असणारी व विषयी (कामी) असते. लग्नी राहू असणारे स्त्रीं-पुरुष दिसण्यांत ऐटबाज

व नीटनेटके असतात. कर्तबगार असतात. शरीरबांधा सडपातळ असणें हा लग्नी राहूचा मुख्य धर्म आहे. शुभ राशीला लग्नी राहू असणाऱ्या स्त्रिया वर्णानें काळ्या सावळ्या असतात परंतु त्या कर्तबगार व व्यवहारदक्ष असतात. लग्नीं असलेला वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, वृश्चिक, मकर, मीन राशींचा राहू मनुष्यांत नाटकी ऐट, हातवारे, हावभाव करण्याची संवय उत्पन्न करतो. मेष, तूळ, धनु व कुंभ ह्या राशींचा लग्नस्थ राहू शारीरिक सौंदर्य, तेज व आकर्षकपणा देत नाही. सिंहेचा राहू लग्नी असणें हा राजयोग समजला जातो. केतु लग्नीं असता ती व्यक्ती रोगीट, भित्री, उद्वेगी व स्त्रीविषयक चिंता असणारी असते. केतु शरीर बेढब बोजड करतो, चेहऱ्यावर कांहींतरी व्यंग निर्माण करतो. केतु लग्नी असणा-या व्यक्तीचा जन्म गरीब स्थितींत झालेला असतो.

२) धनस्थानी (द्वितीयस्थानी) राहुशुक्र जोडी असेल तर मनुष्य द्रव्यसंग्रही होतो. शुभ राशीचा राहू वडिलार्जित इस्टेट देतो. परंतु अशुभ राशीचा राहू धनस्थानी असणें हा एक दारिद्र्ययोग आहे. वृषभ, मिथुन, कर्क व कन्या राशींचा राहू आवाज मधुर देतो व गायनाची आवडहि निर्माण करतो. परंतु त्याच ठिकाणी (म्हणजे धनभवनीं) केतु कोणत्याहि पाप-ग्रहानें युक्त असतां मनुष्य खर्चिक असतो. धनस्थानांतील राहू (विशेषतः मेष व वृश्चिकेचा) व केतू मनुष्याच्या

वाणींतहि दोष निर्माण करतात. धनस्थानी राहु, शुक्र-युक्त असता मनुष्यास कौटुंबिक सुख मिळत नाहीं. ह्या ठिकाणी एकटा राहू असतां मनुष्य गुप्त गोष्टींचा स्फोट करणारा व भटकणारा होतो. द्रव्याची कमतरता, परा-धीनता, मानसिक व्यग्रता, नेत्रांस त्रास इ. गोष्टी धन-स्थानांतील अशुभ राशींचे राहू-केतु उत्पन्न करतात. एकटा केतु शुभग्रहाचे क्षेत्री व किंवा बलवान् (धनु किंवा मीन राशीत) असतां अत्यंत सौख्य मिळते परंतु तसे नसता कुटुंबविरोध, धननाश व मुखरोग उत्पन्न होतात. पुरुषांच्या कुंडलीत द्वितीय स्थानी राहू असता पतीवर पत्नीचा पगडा (अंमल) असतो.

३) तृतीयस्थानीं एकटा राहू असतां मनुष्य यशस्वी, सुखविलास भोगणारा, पराक्रमी, शत्रूपासून कार्ये करून घेणारा व बंधुबांधवांना मारक होतो. समराशीचा राहू (वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर, मीन राशीचा) उत्तम फलें देतो. पुरुष (मेष, मिथुन, सिंह, तूळ, धनु, कुंभ) राशीचा (सिंहखेरीज करून) राहू आप्तेष्ट भाऊबंद यांचेशीं कलह निर्माण करतो. शुभ राशीचा राहु कलाकौशल्य, छायाचित्रें यांची आवड निर्माण करतो. शास्त्रीय शिक्षण व यंत्रशास्त्र वगैरेमध्यें प्राविण्य मिळतें. मात्र बंधु-भगिनींकरिता पैसा खर्च करावा लागतो. एकटा केतु तृतीयस्थानीं असतां मनुष्य पराक्रमी होतो. त्याला समाजांत मानमान्यता मिळते. स्वभाव मात्र चांगला नसतो. कांहींसा दुष्ट व कारस्थानी असतों. तसेंच तो मनुष्य गुप्तपापी व मनांत दुःखी असतो. नैतिक आचरणहि चांगलें नसतें. त्याला कर्णरोग व बाहुपीडा उत्पन्न होतात. उतार वयांत किंचित् बहिरेपणा येतो; कलह वाढतात. मात्र कला कौशल्यात प्रगति होऊं शकते.

४) चतुर्थस्थानांतील शुभराशींचा राहू घरदार, स्थावर इस्टेट देतो. बहुतकरून लहानगांवीं रहावें लागतें. वृषभ, मिथुन, सिंह व कन्या राशिखेरीजचा (म्हणजे मेष, कर्क, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ, मीन राशींचा) राहू चतुर्थस्थानीं असल्यास त्या व्यक्तीनें जुन्या घरांत राहूं. स्वतंत्र घर बांधून रहावे. चवथ्या स्थानातील राहू मातृसुखास विघातक असतो. अशी व्यक्ती सुखरहित, आप्तांपासून अपयश प्राप्त होणारी व नित्य भटकणारी असते. येथे एकटा केतु असल्यास मातृसुख चांगले मिळत नाही. आप्तेष्टहि

नीट विचारीत नाहींत. कष्टमय जीवन जाते. पित्त-विकारापासून त्रास होतो.

५) पंचमस्थानांतील शुभराशीचा राहू विद्येच्या कामी उत्तम समजला जातो. इतर राशींचा राहु बुद्धि तीव्र असली तरी विद्या अपुरी ठेवतो. फोटोग्राफी, ट्रॉईंग, पेंटिंग, शिल्पकला, हस्तव्यवसाय वगैरे विद्यांचा कारक 'राहू'च समजला जातो. शुभराशीचा राहू संतती मर्यादीत देतो. अशुभ राशीचा राहू व कोणत्याही राशीचा केतू संतती सुखास व स्त्रीसुखास विघातक असतो. गर्भपात, बालमृत्यू संततीत व्यंग असणें वगैरे दोष पापग्रहयुक्त किंवा दृष्ट (पंचम स्थानांतील) केतु उत्पन्न करतो. अशुभ राशींचा राहू मित्रसुख लाभूं देत नाहीं, पोटशूळ उत्पन्न करतो व क्वचित् भ्रमिष्टहि बनवतो. स्त्रियांचे कुंडलींत पांचव्या स्थानांतील केतू संसारसुख चांगले लाभूं देत नाहीं, कष्टमय जीवन व्यतीत करायला लावतो.

६) षष्ठस्थानीं राहु–केतु असतां दंतरोग उत्पन्न, होतात. हे दोन्ही ग्रह सहाव्या स्थानीं बलवान असतात. अशी माणसें पराक्रमी असतात. त्यांच्यापुढें शत्रूंचा निभाव लागत नाहीं. राहू मात्र कटिशूलाची पीडा उत्पन्न करतो. अशी व्यक्ती म्लेंच्छांशीं स्नेह ठेवते, मात्र बलवान् व धनिक असते. षष्ठस्थानीं केतू असतां मातुलसुख मिळत नाहीं. मनुष्य बहुधा निरोगी असतो व त्याला सदा द्रव्यलाभ घडत असतो. राहु केतूपैकीं कुणीहि सहाव्या स्थानीं असतां नोकरी अधिकारयुक्त असते, स्वतंत्र उद्योग–धंदा असल्यास हाताखालीं नोकर असतात. अशुभ राशींतील राहु–केतु मात्र क्वचित् नेत्रपीडा उत्पन्न करतात.

७) सप्तमस्थानीं एकटा राहु असतां मनुष्य विषयी व कामासक्त होतो. हाच राहू पापग्रहयुक्त किंवा दृष्ट असतां मनुष्य गुप्तपापी होतो, त्याला द्विभार्यायोग घडतो. पत्नीचें वर्तन पतीच्या मनाप्रमाणें नसतें. सप्तमांतील राहू चौर्ययोग घडवितो असाहि अनुभव आहे. शुभराशीचा राहू वैवाहिक सुख उत्तम देतो. मेष, कर्क, वृश्चिक, धनु व मकर राशींचा राहू द्विभार्यायोग घडवितो; पत्नी कलहप्रिय असते (मिळते) मिथुन, सिंह, कन्या राशींचा राहू असतां विवाह अतिविलंबानें होतो, कधी कधी तर होतहि नाहीं. वृश्चिक राशीचा केतु सप्तमस्थानीं असतां निरंतर लाभदायक होतो परंतु त्या व्यक्तीच्या मनाला व पत्नीलाहि पीडा असते (स्वास्थ्य नसतें) इतर राशींचा केतु असतां मनुष्य सदा प्रवासी असतो, पत्नीशीं त्याचे तंटेबखेडे होतात व धनक्षय होतो. त्याला स्त्रीसुखहि चांगलें मिळत नाहीं. तसेंच त्याला पाण्यापासून भय उत्पन्न होतें. केतु (सप्तमस्थानीं) असतां भागीदारीचे कोणतेहि व्यपार - व्यवहार करूं नयेत. विवाह वयाच्या २७ वर्षानंतर करणें श्रेयस्कर ठरतें.

८) अष्टमस्थानी राहु केतूंपैकीं कोणताहि ग्रह असला तरी तो आयुष्ययोगास बरा असतो. परंतु विषारी जनावरांपासून भीति असते. वृषभ, कर्क, वृश्चिक व मीन राशीचे राहु किंवा केतु (अष्टमस्थानीं) असतां घरगुतीं जनावरें, मांजर, कुत्रीं वगैरे पाळूं नयेत, कारण त्यांच्या दंशाची भीति असते. विंचू, घोण, सर्प, उंदिर वगैरेपासूनहि सावध रहायला हवें. राहु व केतु दोघांपैकीं कुणीहि (अष्टमस्थानीं) असतां गुह्येंद्रियाला

पीडा उत्पन्न होते. शुभ राशींचा राहु गुप्तधन व लांचलुचपतीचा पैसा भरपूर देतो. केतु मात्र अष्टमस्थानीं आपत्ति व क्लेशच देतो. केतुचें एकच फल बरें आहे आणि तें म्हणजे आयुष्य योग बरा असतो व अध्यात्मिक ज्ञानाची आवड उत्पन्न करतो. स्त्रियांचे कुंडलींत अष्टमस्थानांतील राहु–केतु संततीसंबंधी त्रास उत्पन्न करतो. प्रसूति समयीं खूप त्रास, ऑपरेशनची पाळीं येण किंवा जन्मलेलें बालक अल्पजीवि ठरणें इ. अशुभ फलें प्रत्ययास येतात.

९) नवमस्थानीं राहु असणें (विशेषतः वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या ह्या राशींत) हें भाग्याचें लक्षण आहे. असे लोक परक्या प्रांतांत भाग्यशाली ठरतात. ह्यांची धर्मश्रद्धा चांगली असते, आणि ३३ वर्षांनंतर (वयाच्या) भाग्योदय होतो. बंधुसौख्य मात्र लाभत नाहीं. येथें केतु असतां राहुप्रमाणेंच भाग्योदयाला चांगला समजावा, धर्मश्रद्धाहि बरी असते परंतु प्रत्येक व्यवहारांत दांभिकता असते. (नवमस्थानीं) केतु असलेल्या व्यक्तीची म्लेंच्छांपासून भाग्यवृद्धि होते. राहु–केतूपैकीं कुणीहि नवमस्थानीं असतां तीर्थयात्रा पुष्कळ घडतात; हातून लोकोपयोगी कार्यें घडतात. मिथुन, कर्क, सिंह, कन्या राशीचा नवमांतील राहू त्या व्यक्तीला कीर्तिलाभ करून देतो; सामाजिक मानमान्यतेच्या जागा मिळतात, भूषविल्या जातात.

१०) दशमस्थानीं राहु किंवा केतु असतां पित्यापासून व मातेपासून सुख लाभत नाहीं, व वातपीडा उत्पन्न होते. हें एक अशुभत्व सोडल्यास दशमांतील राहु मोठ्या भाग्याचें लक्षण आहे. वृषभ, मिथुन, सिंह, वृश्चिक राशीचा राहु (दशमस्थानीं) असल्यास असे पुरुष राजकारणी व धोरणी असतात. कोणत्याहि राशीचा राहू दशमस्थानीं असला तरी त्यायोगें हातांत सत्ता मिळालीच पाहिजे. स्वतंत्र कारखाने व उद्योगधंदे काढण्यास दशमांतील राहु उत्तम जाणावा. वय वर्षें १९, ३८ व ५७ हीं क्रांतिकारक वर्षें समजावींत. दशमांतील केतु फार मोठा दर्जा देत नाहीं. नोकरीचा आरंभ कारकुनींत करून शेवटीं ऑफिसरची ग्रेड मिळवून देतो. दशमांतील राहु किंवा केतु अशुभ राशींत असून पापग्रह दृष्ट असल्यास नोकरींत बडतर्फ होण्याचा प्रसंग येतो; किंवा आपत्ति फार येतात.

११) कोणताहि ग्रह एकादशस्थानी असणें चांगलें. एकादशस्थानीं केतु पेक्षां राहु असणेंच उत्तम, तो अधिक शुभफलें देऊं शकतो, केतु नेत्रपीडा व गुह्यरोग उत्पन्न करतो आणि मनुष्याला खर्चिक बनवतो. पण राहूचें तसें नाहीं. एकादशस्थानीं राहु असतां पैसा भरपूर मिळतो. सांपत्तिक अडचण केव्हांहि भासत नाहीं. शुभराशीचा राहु असल्यास चतुष्पाद वाहनांचेंहि सुख लाभतें हरप्रकारें लाभ आणि विजय प्राप्त होतात. राहु-केतूंपैकीं कोणताहि ग्रह एकादशस्थानीं असता संततीपासून सुख मिळत नाहीं. संतती आई-बापांचे मनाविरूद्ध वागते. पापग्रहयुक्त राहु-केतु एकादशस्थानीं असल्यास निदान प्रथम अपत्यासंबंधीं त्रास व धोका उद्‌भवतो.

१२) व्ययस्थानीं (द्वादशस्थानीं) राहु असतां भूमि व धन ह्यांचा नाश होतो. आप्तेष्टांसाठीं पुष्कळ पैसा खर्च होतो. विषम राशीचा (मेष, मिथुन, सिंह तूळ, धनु व कुंभराशीचा) राहू नेत्ररोग व पायांना

विकार उत्पन्न करतो. असा मनुष्य मध्यम प्रतीची नोकरी करतो. केतु (द्वादशस्थानीं) असतां मनुष्य उधळ्या, गुह्यरोगी व आनंदरहित असतो. राहुपेक्षां केतुचीं फलें कांहींशीं सौम्य असतात. दोघेहि शत्रूपासून रक्षण करतात; अध्यात्मिक ज्ञानाची आवड निर्माण करतात. द्वादशस्थानीं विषम राशीचा राहु असल्यास 'गोमेद 'चा खडा अंगठीतून वापरावा आणि केतु असल्यास ' लसण्या ' वापराव्यात म्हणजे दुष्परिणाम कमी होतात.

स्त्रियांच्या कुंडलींत लग्नीं एकटा राहु असणें वाईट नसतें. त्या मध्यम बांध्याच्या असतात. भुंवया बारीक व कमानदार असतात. वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ व मकर राशींत राहु असता चेहरा सुंदर, वर्ण काळा सांवळा असतो. बोलतांना हावभाव करण्याची संवय असते. केशसंभार दाट व लांब असतो. दंतपंक्ती सुबक असते. लग्नीं मेष, कर्क, वृश्चिक, धनु, कुंभ व मीन राशींचा राहु असतां चेहऱ्यावर नीटपणा नसतो. मेष व धनु राशींना राहु असतां केशकलाप कमी असतो. इतर राशींत (राहु लग्नीं) असता केशकलाप बरा असतो. मेष, सिंह धनु व कुंभ ह्या राशींत राहु असतां सडपातळ व उंच शरीर असतें. राहु कोणत्याहि राशीला लग्नीं असतां त्या स्त्रिया कामासक्त, सुखलोलुप, पतीला प्रिय, अपमानाचा सूड घेणाऱ्या, टापटीप व शिस्तप्रिय असतात. मेष, सिंह, किंवा धनु राशींचा राहु लग्नीं असतां स्वभाव मनमोकळा असतो. त्या इतरांवर चांगलीं छाप पाडू शकतात. कर्क वा मीनेचा राहु असतां त्या ध्येयरहित बनतात. वृषभ, कन्या मकर राशींत राहु असणाऱ्या स्त्रिया भाग्यशाली असतात. वृश्चिक राशींत लग्नीं राहु असतां त्या संततीमारक ठरतात. (संतति जगत नाहीं) वैवाहिक सुखहि त्यांना कमी मिळतें. वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ व मकर ह्या राशींत राहु शुभफलदायक ठरतो. अशा स्त्रिया कार्यक्षम, उद्योगी व नटव्या असतात. वृश्चिक राशींत लग्नीं राहु असतां त्या स्त्रिया वातविकारी, मत्सरी व तामसी असतात. मेष, सिंह, धनु राशीत राहु असता त्या स्त्रिया पुरुषी वृत्तीच्या असतात. स्त्रियांच्या कुंडलींत लग्नी केतु असतां आरोग्य चांगलें राहतें शरीर काटक असतें. त्या फार मेहनती असतात. समराशीला (वृषभ, कर्क, कन्या, वृश्चिक, मकर, मीन राशीला) केतु असतां शुभफलें देतो. पण केतु एकटा लग्नीं असणें हें भाग्याचें लक्षण नाहीं. नशीबाशीं झगडावें लागतें. बांधा बुटका असतो. विवाहाचे वेळीं केतु लग्नीं असलेल्या मुली लवकर पसंत पडत नाहींत.

स्त्रियांचे कुंडलींत पंचमस्थानीं राहु असता संततीवर अशुभ परिणाम होतात. अशा स्त्रियांना रजोदर्शनाचे व गर्भाशयाचे विकार उत्पन्न होतात. अशुभ राशींत किंवा अशुभ ग्रहांचे दृष्टींत राहु असता संसार सुरळीत चालत नाही व सुख अबाधित मिळत नाहीं. चैन, ऐषाराम, कपडचालत्त्याची आवड मात्र असते. वृषभ, मिथुन, कन्या, तूळ व मीन राशींत राहू पंचमस्थानी असतां त्या स्त्रिया फार नटव्या असतात. मात्र त्या कोणाचें नादी लागत नाहींत. जुन्या चालीरीतींना मान देणाऱ्या असतात त्या. पंचमांतील राहु जर शुक्राने युक्त असा कर्क, वृश्चिक वा मीन राशींत असेल तर अशा स्त्रिया प्रेमाच्या भानगडींत गुरफटल्या जातात. वृषभ, मिथुन, कन्या, तूळ व मीन राशींत राहु असणाऱ्या स्त्रिया कोणत्याहि कलेंत निपुण बनतात. त्या जुन्या वळणाच्या असतात आणि स्वतःच्या चारित्र्यास फार जपतात. मात्र सौंदर्यप्रसाधनांची त्यांना फार आवड असते. पंचमस्थानीं एकटा केतु असतां मात्र शुभफलें मिळत नाहींत. मनोविकार व कोमल भावना यांचेवर यांचा अंमल राहत नाहीं. प्रेम व नवमतवादाचा ह्यांना गंध नसतो. ह्या साध्या राहणीच्या असतात. कृत्रिम आकर्षकता, नजरेतील चंचलता, नटवेपणा ह्या गोष्टी ह्यांच्याकडे नसल्यानें यांचे वाटेस कोणी जात नाहीं.

अष्टमस्थानांतील राहू केतु स्त्रियांना अनिष्ट फलें देतात. ते गुह्येंद्रिय, गर्भाशय, ओटीपोट ह्यासंबंधीं पीडा उत्पन्न करतात. यांची नीतिमत्ता शुद्ध असून देखील केवळ ग्रहपरिणामामुळें त्यांना अशा प्रकारचे त्रास काढावे लागतात. त्यांच्यावर ऑपरेशनची पाळी येते. मेष, कर्क, वृश्चिक व मीन राशीस राहू असतां हें अटळ असतें. कर्क, वृश्चिक व मीन किंवा मेष, सिंह व धनु राशीस अष्टमस्थानीं केतू असतां खरजेसारखे त्वचारोग उत्पन्न होतात व राहु केतु हे शनि मंगळ किंवा हर्शलानें युक्त किंवा दृष्ट असतां कुष्टरोग, कोड वगैरे किळसवाणे आजार उत्पन्न होतात.

राहू आणि केतू ह्या ग्रहांच्या महादशेच्या काळांतहि अनिष्ट परिणामांना तोंड द्यावें लागते. केतूची महादशा बरीच अनिष्ट फलें देतें. केतु महादशेंत

(ही फक्त विंशोत्तरी दशाक्रमांतच लाभू शकते) स्त्रीला आजार, स्त्रीवियोग, द्रव्यहानि, कर्जबाजारीपणा प्रवास व शरीरकष्ट होतात. राहुच्या (१८ वर्षांच्या काळांत विंशोत्तरी मानानें व बारा वर्षांच्या काळांत अष्टोत्तरी मानानें) महादशेंत दैन्य, चिंता, कष्ट, बंधन, मानसिक अस्वास्थ्य, चोरी, शत्रुपासून उपद्रव इ० गोष्टीचे त्रास होतात. त्यांतल्या त्यांत गुरु व बधाच्या अंतर्दशेचा काळ मनाला कांहींसा विरंगुळा देऊ शकतो. परंतु रवि, चंद्र व मंगळ ह्यांच्या अंतर्दशेंत तर जीव नकोसा होतो. जगावें की, जीवन संपवावें अशी परिस्थिती निर्माण होतें. जन्मकुंडलीमध्यें शुभस्थानीं (तिस-या, सहाव्या, दहाव्या व अकराव्या स्थानीं) राहु केतु असतां मात्र ह्या महादशांचा काळ बऱ्याच प्रमाणांत सुसह्य ठरून जीवनांत क्रांतीकारक बदल घडवून आणतात. धंदा-नोकरीत उत्पन्न व दर्जा वाढवितात.

याप्रमाणें राहू केतू हे शुभस्थानीं व शुभराशींत असतां व्यक्तीचें जीवन उज्वल करण्यास सहाय्यभूत ठरतात तर तेच अशुभस्थानीं व अनिष्ट राशींत असतां माणसाला जीवनांतून उठविण्याचा प्रयत्न करतात. "वनानी दहतो वन्हे:" प्रमाणें दुहेरी भूमिका हे उपग्रह वजावीत असल्यानें कुंडली पाहतांना राहू केतूंचेहि बलाबल व शुभाशुभत्व लक्षांत घेणें अत्यंत जरूरीचें आहे.



परिभ्रमण पद्धतीची उपपत्ति

(ज्योतिर्भुषण —का. न. केळकर)

ज्योतिषास्त्रात 'काल निर्णय' हा सर्वात महत्त्वाचा तितकाच गुंतागुंतीचा प्रश्न आहे. त्याचे निर्णायक उत्तर मिळत नाही. ते काढण्याकरिता गोचर, दिनवर्ष, ताजिक दशा व महादशा प्रश्नजातक परिभ्रमण, वगैरे अनेक पद्धती उपलब्ध आहेत. पण त्यांचा एकमेकांशी मेळ पडत नाही. व त्यांचा समाधानकारक उपपत्तीहि फार थोडयांना अवगत असते. केवळ अमुक पद्धतीनें फळ जमते असें म्हणणे म्हणजे उपपत्ती समजणे नव्हे ! सुमारे ७५ वर्षापूर्वी ठाण्याचे श्री. रामनारायण यांनी 'परिभ्रमण पद्धति' हे पुस्तक लिहिले. त्याचा उपयोग करून कै. जिवाजीपंत चिटणीस हे भराभर भावी कालांतील अनेक गोष्टीसंबंधी भविष्ये वर्तवित असत. आणि ही पद्धति लक्षात ठेवण्यालाहि इतकी सोपी आहे की, कोणत्याहि पंचांगाचे साहाय्याशिवाय केवळ तोंडच्या हिशेबाने चलित ग्रह समजतात व मूळ कुंडलीतील ग्रहांशी ते कसे योग करतात हे पाहून त्यावरून भविष्य सांगता येते.

ग्रहांच्या परिभ्रमणाचा हा काळ पुढीलप्रमाणे आहे. ग्रहांचा वरीलप्रमाणे काळ कसा येतो याची उपपत्ति सेफारियल या ग्रंथकाराने टॉलेमीच्या ग्रंथावरून सांगितली आहे. ती अशी विंशोत्तरी महादशेप्रमाणे मानवी जीविताची मर्यादा १२० वर्षे सामान्यत: धरलेली आहे. व प्राचीन सुप्रसिद्ध ज्योतिषी टॉलेमी याचे ग्रथांत दिलेली ग्रहाच्या परिभ्रमणाची वर्षे व विंशोत्तरीचे १२० वर्षाचे मान हे बरोबर जमते हे आश्चर्य आहे. आता पृथ्वीला सर्वांत जवळ चंद्र हा एका टोकाला व दुसऱ्या टोकाला सर्वात दूरचा शनि याप्रमाणे हे ग्रह व त्याची वर्षे खाली मांडू (यात रवि धरलेला नाहीं)

चं. बु. शु. मं. गु. श.
४ १० ८ १५ १२ ३०

या संख्येचा लघुत्तम साधारण भाजक १२० येतो. आता १२० संख्येला चंद्राची वर्षे ४ या संख्येने भागले तर ३० वर्षे शनीचीं वर्षे आली, ती शेवटी मांडली. पुढे

(पान ८१ वर)

काल--निर्णय

लेखक--ना. गं. टिळक, (जातकभूषण)

काल निर्णयाच्या विविध पद्धति आहेत. विंशोत्तरी, अष्टोत्तरीं दशा, गोचरी, ताजिक वर्ष प्रवेश वगैरे.

मी स्वतः अनुभव घेऊन ठरविलेल्या पद्धतीला

'ग्रहमालिका भ्रमण'

किंवा 'स्थानवर्ष पद्धति असें नांव दिलें आहे.

जन्मापासून प्रत्येक वर्षी काय फलें मिळतील हे ठरविण्याकरतां जन्मकुंडली ही जन्मणाराचे पहिले वर्षाची फळाची द्योतक असें मानून त्यांतील ग्रहयोगांचा विचार करून फलदेश ठरविणेचा.

दुसरे वर्षाची फल ठरवितांना जन्मकुंडलींतील प्रत्येक स्थानांतील राशीदर्शक अंक तेंच कायम ठेवावयाचे आणि जे जे ग्रह ज्या ज्या स्थानांत असतील, ते ते ग्रह त्या त्या स्थानाचे पुढील स्थानांत मांडावयाचे. उदाहरणार्थ, लग्नांतील ग्रह धनांत, धनस्थानांतील ग्रह पराक्रम स्थानांत याप्रमाणें ही त्यांची त्या वर्षाची चलित स्थिति होय.

याप्रमाणें ते प्रत्येक वर्षी एक एक स्थान पुढें सरकत जाऊन तेरावें वर्षी मूळ जाग्यावर येणें हीच 'ग्रहमालिका भ्रमण' स्थिति होय. याप्रमाणें चलित झालेले ग्रह, जन्मकुंडलींतील ग्रहांशीं अगर स्थानांशीं जसे शुभाशुभ योग करतील त्याप्रमाणें त्या वर्षी फलें मिळतील. या रितीनें दर बारा वर्षांनीं समान स्थिति येते. अर्थात फलें सारखींच मिळाली पाहिजेत पण तें कसें शक्य आहे ? याकरितां आणखी एक स्थितींचा विचार करावा लागतो.

कलियुगामध्यें माणसाचें पूर्णायुष्य १०० वर्षांचें मानिलेलें आहे. या काळांत १२, १२ वर्षांचा एक भाग असे सुमारें ८ भाग (१२×८ =९६) पडतात. रव्यादि नवग्रहांपैकीं राहू व केतू हे समोरासमोरचे बिंदू आहेत. त्यापैकीं केतू हा बिंदू वगळला तर एकूण आठ ग्रहच होतात. केतूला वगळल्यानें जुन्या परंपरेला बाध येत नाहीं. कारण अष्ट दिशांचे स्वामित्वांत पूर्वाचार्यांनी केतूला स्थान दिलेलें नाहीं. वर दिलेलें ८ भाग म्हणजे पूर्णायुष्यामध्यें, दर बारा वर्षांचा एक फेरा याप्रमाणें आठच फेरे होणार. फेरे आठ व ग्रह आठ म्हणजे प्रत्येक फेऱ्याचा एक एक ग्रह सत्ताधीश मानणें चुकीचें होणार नाही. पहिल्या फेऱ्याचा अधिकारी कोण दुसऱ्या फेऱ्याचा अधिकारी कोण हा क्रम प्रत्येक कुंडलीचा स्वतंत्र आहे.

जन्मकाळीं बरोबर दशम बिंदुवर असणारा ग्रह-पहिल्या फेऱ्याचा अधिकारी अथवा सत्ताधीश. त्यानंतर निज गतीनें दशम बिंदूवर येणारा ग्रह दुसरे फेऱ्याचा सत्ताधीश असें ओघानें येतें; परंतु त्या दृष्टीनें न पहातां अंशानुक्रमानें दशम बिंदूपासून जसे ग्रह असतील तसा त्यांचा क्रम घ्यावा. जन्मकाळीं दशम बिंदूवर ग्रह नसेल त्यावेळीं पुढें असलेला क्रम पहिला सत्ताधीश हें उघडच आहे. फलादेश पहातांना त्या काळाचे सत्ताधीशाला अधिक महत्व दिलें पाहिजे. त्याचे मूळ व चलित स्थितीचा विचार मुख्य मानावयाचा. या विचारसरणीप्रमाणें प्रत्येक फेऱ्याचें बरोबर फल मिळेल.

या पद्धतीनें फलें पहातांना गोचरी पद्धत विचारांत घेतली तर फळामध्यें सूक्ष्मता व विश्वास निर्माण होतो.

जन्मकाळापासून दर ५।५ वर्षांनी काय फलें मिळत जातील याची स्थूळ मानानें नोंद खालीं दिल्याप्रमाणें करतां येते.

वय ० ते ५ जन्मकुंडलीमध्यें दशम स्थानात जे ग्रह असतील ते ग्रह व दशमेश यांनी दर्शित फलें या काळांत मिळतात.

ग्रह ज्या स्थानात असतात आणि ते ज्या स्थानांचे स्वामी असतात त्या स्थानावरून ज्या गोष्टीचा विचार होतो तीं फलें त्यांचे इष्टानिष्ट स्थितीप्रमाणें मिळतात.

वय ६ ते १० लाभ-स्थानांतील ग्रह व लाभेश फलोत्पादक. त्यांचे स्थितीप्रमाणें फळ मिळतें.
वय ११ ते १५ व्ययस्थानांतील ग्रह व व्ययेश.
वय १६ ते २० लग्नांतील ग्रह व लग्नेश.
वय २१ ते २५ धनस्थानांतील ग्रह व धनेश.
वय २६ ते ३० तृतीय स्थानांतील ग्रह व तृतीयेश.
वय ३१ ते ३५ चतुर्थस्थानातील ग्रह व चतुर्थेश.
वय ३६ ते ४० पंचमस्थानांतील ग्रह व पंचमेश.
वय ४१ ते ४५ षष्ठस्थानांतील ग्रह व षष्ठेश.
वय ४६ ते ५० सप्तमस्थानांतील ग्रह व सप्तमेश.
वय ५१ ते ५५ अष्टमस्थानांतील ग्रह व अष्टमेश.

वय ५६ ते ६० नवमस्थानांतील ग्रह व नवमेश. यापुढें चक्रगतीनें वय ६१ ते ६५ दशमस्थान वगैरे पुढील काल यापद्धतीनें अलिकडेच पटलेली एक दुःखद घटना. प्राणिमात्र जन्मास येतांना मृत्यूला सोबत घेऊनच येत असतो. याचा अर्थ इतकाच कीं जो प्राणी जन्मास आला त्याचा केव्हांतरी मृत्यु ठरलेलाच आहे. मृत्यु कधी येईल हें सांगणें दुरापास्तच आहे. परंतु जन्मकाळ व मृत्यूकाळ या दोन्हीं वेळाच्या ग्रहस्थितीचा मेळ घेतला तर खालील गोष्टी निदर्शनास येतात. तशी स्थिति ज्या वर्षी आढळेल तें वर्ष आजाराचें, गंडांतराचें किंवा मृत्युकाळ दर्शक मानण्यास हरकत नाहीं.

प्रथमतः आयुर्दाय, अल्पायु, मध्यमायु, अथवा दीर्घायु आहे तें पाहिलें पाहिजे. या ठिकाणीं वय २५ पर्यंत अल्पायु. वय ५० पर्यंत मध्यमायु व त्यापुढें आयुष्य असल्यास दीर्घायु असें मानलें आहे.

अल्पायु.

लग्नेश पापयुक्त पापदृष्टीत अथवा अशुभ स्थानांत असणें. लग्नेश व अशुभ स्थानधिपति यांचा अशुभ संबंध असणें, चंद्र बिघडलेला असणें.

मध्यमायु.

१-४-८ हीं स्थानें पापयुक्त, पापदृष्टींत अथवा अशुभ स्थानांचे स्वामींनें युक्त असणें.

दीर्घायु.

लग्न अथवा लग्नाधिपती बलवान् असेल त्याचप्रमाणें अष्टम स्थान व अष्टमेश बलवान् असेल किंवा लग्नेश व अष्टमेश यांचा आपसांत शुभ संबंध असेल व त्याचे खालोखाल सुखस्थान व सुखेश यांची शुभस्थिति असेल तर दीर्घायु होतो.

मृत्युकाळची स्थिति.

१) मृत्युकाळीं फेऱ्याचा जो सत्ताधीश ग्रह असतो तो पापग्रह असतो. अथवा कुंडलींतील मारक स्थानें २।७ रोग स्थान ६, मृत्युस्थान ८ व व्ययस्थान १२, या स्थानांचा स्वामी असतो.

२) फलोत्पादक ग्रह २।७।६।८ १२ या स्थानांचा स्वामी असतो.

३) मृत्युकाळचें जें स्थान वर्ष त्याचा अधिपती कुंडलीतील एखादे अशुभ स्थानाचाहि स्वामी असतो.
मृत्युकाळीं 'ग्रहमालिका भ्रमण' प्रमाणें चलित लग्नेश अशुभ स्थानांत भ्रमण करीत असतो. अथवा मूळ अशुभ ग्रहाजवळ युति प्रतियुति किंवा अशुभ योग करीत असतो.


चलित गतीनें अशुभ ग्रह अथवा अशुभ स्थानाधिपति लग्न अथवा लग्नाधिपतिबरोबर युति, प्रतियुति अथवा अशुभ योग करीत असतो.

मूळ चंद्राजवळ अशुभ ग्रहांची युति अथवा अशुभ योग होतो किंवा चलित चंद्र मूळ अशुभ ग्रहांजवळ तसा योग करतो.

अलीकडेच बॅ. सावरकर स्वर्गवासी झाले. त्यावेळी त्यांचे कुंडलीप्रमाणें घडलेले योग.

जन्म तारीख २८ मे १८८३. मृत्यु ता. २६ फेब्रुवारी १९६६

जन्मकुंडली   मृत्यवर्ष ८३ एकादश स्थानचें चलित ग्रह



योग.

फेरा ७ वा सत्ताधीश बुध. फलोत्पादक व्दितीयेश शनि. एकादश स्थानचें वर्ष. त्या स्थानाचा स्वामी शुक्र.

१ फेऱ्याचा सत्ताधीश बुध मारकेश असून षष्ठांत आहे.

२ फलोत्पादक ग्रह शनि मारकेश असून षष्ठांत आहे.

३ स्थानाधिपति शुक्र षष्ठेश आहे.

चलित लग्नेश गुरु मूळ अशुभ ग्रह मंगळ, शुक्र, केतू यांचेजवळ युति योग करीत आहे.

चलित अष्टमेश चंद्र लग्नी आला आहे.
मूळ चंद्राजवळ अशुभ ग्रह मंगळ शुक्र केतू आले आहेत.

यामुळें घटना घडली.
परमेश्वर त्यांचे आत्म्यास शांती देवो.

अशी स्थिति आहे.

(पान ७८ वरून चालू)

बुधांची १० वर्षे यांनी १२० ला भागून शनीचे अली-कडचा गुरू त्याची १२ वर्षे आली नंतर शुक्राचे ८ वर्षानी १२० ला भागून मंगळाची १५ वर्षे आली. मंगळ १५ याने १२० ला भागले तर शुक्राची ८ वर्षे गुरु १२ वर्षे यांना १२० चा भाग १० वर्षे बुधाची व शेवटी शनि ३० वर्षे यांनी १२० चा भाग म्हणजे चंद्राची ४ वर्षे असे हे चक्र पुरे झाले. आता रवि १२ वर्षात संबंध ३६० अंशाचे राशिचक्र पुरे करतो. पण पृथ्वीचे स्वत:भोवती भ्रमण लक्षांत घेता त्याचे बिंदू-पाशी रविला यावयाला १ दिवस जास्त लागतो. म्हणजे ३६१ अंश (दिवस) १९१९ होतात. या वरुन टॉलेमीने रवीची परिभ्रमण गति १९ वर्षे ही दिलेली आहे. रविचंद्राची त्याच बिंदूपाशी ग्रहणे ही पुन: १९ वर्षानी येतात, यावरूनहि रविचा १२ राशीचा परिभ्रमण काल १९ वर्षे धरणे सयुक्तिक दिसते.

चंद्रापासून शनीपर्यंत वर ज्या क्रमाने ग्रह मांडले आहेत त्याकडे पाहता त्यांच्या राशीसुद्धा समोरच्या म्हणजे समसप्तकात येतात असे दिसेल. उदा. चंद्र, शनि म्हणजे कर्क व मकर, बुध, गुरु म्हणजे कन्या व मीन शुक्र मंगळ म्हणजे ७ व १० आता सर्व राशीचक्र म्हणजे ३६० अंश समसप्तक १८० अंश हे लक्षात धरले म्हणजे ४५ अंश ९० अंश १३५ व १८० अंशाचा योग अशुभ व त्याचप्रमाणे आयुष्याची १५,३०,४५,६०,७५, ९० ही वर्षे कष्टाची व श्रमाची जावीत तसेच ६० अंश व १२० अंशाचे अंतर शुभ असल्याने २०,४० व ८० ही वर्षे शुभ जावींत असें अनुमान युक्ति सिद्ध रीतीने काढता येते

अवकहडाचक्राचे उपयोग

लेखक : **पं. रा. ना. केळकर**, डी. एफ्. (अॅस्ट्रॉल एस्.) आसगांव गोवा

आपल्या ज्योतिपशास्त्रांत असलेलें अवकहडाचक्र कोणत्या तत्वावर आधारलेलें आहे तें कळण्यास कांहींच मार्ग नाहीं पण त्यावरून नांव ठेवण्याची, संध्येंत नांव देण्याचीं व त्यावरून राशी ठरविण्याची आणि त्यावरून भविष्य पाहाण्याची आपली फार प्राचीन कालापासून पद्धती आहे आणि कांहीं विशिष्ठ परिस्थितींत त्यांवरून पाहिलेलें भविष्य जुळलें पाहिजे असें दिसून येतें. म्हणून त्या अवकहडाचक्राविषयी येथें थोडी माहिती देण्याचें ठरविलें आहे.

अवकहडाचक्राचा उपयोग करण्याची प्रथा फार प्राचीन कालापासून आहे. सध्या त्याचा आरंभ चू चे चो ला अश्विनी असा धरतात; पण तो प्राचीन कालीं तसा नसावा. कारण आपल्या ज्योतिषशास्त्रांतच नव्हे तर धर्मशास्त्रांतहि चू चे चो ला या आद्याक्षरांनीं कसल्याच प्रकारची सुरवात झालेली दिसत नाहीं. मग ती अवकहडाचक्राचीच तेवढी कशी असेल ? विंशोत्तरीय महादशा कृत्तिका नक्षत्रानें आरंभ झालेली असून सूर्याच्या महादशेनें तिचा आरंभ आहे. अष्टोत्तरीय महादशाही कृत्तिका नक्षत्रापासूनच धरण्याची पद्धती प्रचलित होती. सध्या आर्द्रानक्षत्रांत चंद्रानें प्रवेश केला कीं, अष्टोत्तरीय महादशेचा आरंभ धरतात पण याविषयीं एकमत नाही. महादशेचा आरंभ सूर्य महादशेपासून धरीत असल्यानें आर्द्रा नक्षत्राचा आरंभ अष्टोत्तरीय महादशेसाठीं घेण्यात आला असावा. ग्रहमालेंत सूर्य पहिला आहे. दिवसाच्या गणनेनें सूर्याचा वार पहिला आहे. सगळ्या पृथ्वीवर तोच क्रम असून सगळीकडे वार सातच आहेत. यावरून मानव समाज ज्यावेळी एकत्र होता व त्याच्या शाखा कोठेंच पसरल्या नव्हत्या त्यावेळी वारगणना अंमलांत आली असावी. त्यकालांत राहू—केतु यांची गणना नवग्रहांत केली गेली नव्हती हे आपोआप सिद्ध होते. राहू केतूंची गणना नवग्रहांत केल्याचा उल्लेख याज्ञवल्क्य स्मृतींत मिळतो. अथर्ववेदांत सात ग्रहांची नांवें आहेत. ह्या गोष्टी लक्षांत घेता राहू—केतूंची गणना ग्रहांत नंतर झाली हें निश्चित आहे.

आपल्या हिंदु समाजांत रूढ असलेली अग्निपूजा फार प्राचीन कालापासूनची आहे. पर्शियन, ग्रीक, रोमन यांच्यांतहि पूर्वी अग्निपूजा चालू होती. अर्थातच अग्निपूजा करणारे समाज कोणत्यातरी एका काळीं एकत्र होते व नंतर कांहीं कालानें त्यांच्या शाखा बाहेर गेल्या हें सिद्ध होतें.

आपल्या हिंदु समाजांत प्रत्येक धर्मकार्यांत अग्निकार्य आवश्यक आहे. सूर्य हा अग्नितत्वाचा आहे. रात्रीच्या वेळी सूर्य आपलें तेज अग्नीच्या ठिकाणीं प्रस्थापित करतों अशीं वर्णनें वेदग्रंथांतहि आहेत.

अग्निवानादित्यः सायंप्रविशति ।। तस्मादग्निर्दूरान्नक्तं दद्दशे ।। (तैत्तरीय ब्राह्मण २ १ ८)

यावरून अग्नि हा सूर्याचा प्रतिक समजला जातो हें समजून येईल. अग्निकार्यांत घालण्याच्या आहुतींचा आरंभ अग्नीच्या आहुतीनें अगर सूर्याच्या आहुतीनें होतो. आपल्या ऋग्वदसंहितेचा आरंभ अग्निसूक्तानें होतो ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

या सगळ्या दृष्टीनीं विचार केला तर आपल्या ज्योतिषशास्त्रांतील अवकहडा चक्राचा आरंभ 'अ' नें होणें साहाजिक आहे.

आणि म्हणून त्याचा आरंभ विंशोत्तरीय महादशेप्रमाणें कृत्तिका नक्षत्रानें आहे. व त्या नक्षत्रास आं, इ, ल, ए. ही अक्षरे दिलेली आहेत आपल्या देवनागरीं वर्ण-मालेचा आरंम अ, आ या अक्षरांनीच आहे. आता आरंभीं आपल्या पूर्वजांस अ, हेंच अक्षर कां सुचले ह पाहाणें जरूर आहे. आमच्या मनें मानवाला आरंभी शब्दच फुटतो तो अ, आ या अक्षरांनीच म्हणूनच

बालक आरंभीं आ ऽ ई म्हणते व तीं आईच आदिमाया सर्व शक्तीची जन्मदाती आहे. तिच्या नांवाची अक्षरें वर्णमालेच्या आरंभीं घालणें योग्य आहे. या शिवाय सृष्टीरचनेचे मूळ आकाश आहे त्यामुळे सृष्टेः पूर्व असें जें आकाश त्याचें आद्याक्षर वर्णमालेस घेणें शक्य आहे.

अग्नि शद्बाचा मूळ धातु 'अक्' असा आहे. तो अग्रणी आहे, अक् धातुवरुन अग्नि, आग हे शद्ब झाले असून अग्यारी शब्दहि त्याचाच वाचक आहे. भगवान् श्रीकृष्णहि गीतेंत "अक्षराणां अकारोस्मि" म्हणजे अक्षरांत आपण अ ' आहें असें सांगतात यावरूनहि 'अ' या आद्याक्षराचें महत्त्व दिसून येईल.

कृत्तिका नक्षत्राची देवता अग्नी आहे, त्या नक्षत्रापासूनच नक्षत्रांची गणना होते व आ इ उ ए हीं अक्षरें कृत्तिका नक्षत्रास देऊन त्या चक्राची सुरवात केली असावी असें म्हणता येतें.

हें अवकहडाचक्र हिंदुस्थानाबाहेरचे ज्योतिषी उपयोगांत आणीत नाहींत व तिकडे ते प्रचारांतहि नाहीं. त्यावरून तें केव्हांहि असो पण तें भारतांतच तयार झालें असलें पाहिजे. आपल्याकडे पाणिनीचीं प्रत्याहार सूत्रें आ इ, उ ऋ, या अक्षरांनीं सुरुवात झालेलीं आहेत. अवकहडाचक्राचा आरंभ त्याच अक्षरांनीं आहे. त्या अर्थी पाणिनीच्या काळीं अवकहडाचक्र प्रचारांत असलें पाहिजे यांत मुळींच शंका नाहीं. पांडवांच्या काळीं वसंत संपात मृगशीर्ष नक्षत्रांत होता. त्या काळीं तें चक्र प्रचारांत आलें असतें तर त्याचा आरंभ मृगशीर्ष नक्षत्रापासून झाला असता. ज्या अर्थी तो तसा नाहीं व तो कृत्तिकापासून आहे त्या अर्थी कृत्तिकानक्षत्राचा आरंभ ज्या काळीं होता त्या कालापासून तें चक्र प्रचारांत होतें हें सिद्ध होतें.

वेदांत नक्षत्रें सांगितलीं आहेत त्यांचा आरंभ कृत्तिकापासून आहे. कृत्तिका पूर्वेपासून कधींहि चळत नाहींत म्हणून त्या नक्षत्रांत अग्न्याधान करावे असें सांगितलें आहे इ. स. पूर्व २३२० वर्षे या काली वसंत संपात कृत्तिकात होता. शतपथ ब्राह्मणांतहि कृत्तिका पूर्वेस उगवतांत असे वर्णन आहे. शतपथ ब्राह्मणाचा काल शकपूर्व ३१०० हा आहे असे विद्वान लोकांचे मत आहे. चिनी लोकांत नक्षत्रांचा आरंभ कृत्तिकापासून आहे असे ज्यो. डॉ. वायो म्हणतो व त्यानें तो काल इ. स. पूर्व २३५७ हा ठरविला आहे. डॉ. थीबो यानेंहि फार पूर्वी कृत्तिकापासून नक्षत्र गणना होती असें म्हटलें आहे. चिनी लोकांचा नक्षत्रारंभ कृत्तिकापासून असला तरी त्यांच्यांत अवकहडाचक्र प्रचारात नाहीं.

आता अवकहडाचक्र कोणत्याहि काली प्रचारात आलेले असो पण एक गोष्ट मात्र निश्चित आहे ती हीं कीं, आमच्या पूर्वजांनी तें कांही विशिष्ट हेतूनें व कांही मूलभूत तत्वासार तयार केलें आहे आणि त्याचा अनुभव येतो की काय हें पाहणें आवश्यक आहे.

हें अवकहडाचक्र नक्षत्रावलंबी असल्यानें नक्षत्रचरणावरून आद्याक्षर घेण्याचा प्रघात आहे. तथापि आपण सध्या ठेवीत असलेली नांवें त्या अवकहडाचक्राप्रमाणेंच ठेवतो असें नाही. संध्या करण्याची प्रथा ज्या समाजात आहे त्या समाजात संध्येंतील नांव म्हणून एक नांव देतात व त्याचा उच्चार संध्या विधींत करावयाचा असतो. हें नांव अवकहडाचक्रानुसार असते. ज्यांच्याकडे संध्याविधी नसतो अशा समाजांत बाराव्या दिवशी बारशाचा एक होम असतो त्यावेळीं अवकहडाचक्रानुसार पुरोहित नांव देतो व गण नाडी योनी सांगतो, यालाच नांवरस म्हणतात. नांवराशींचा अपभ्रंश नांवरस आहे. उदाहरणार्थ— टाटांचा लोखंडाचा कारखाना जमशेटपूरला आहे. ज हें अक्षर मकर राशीच्या म्हणजे शनिच्या अंमलाखाली आहे. किर्लोस्करांचा कारखाना सातारा जिल्ह्यांत असून मालकाचे नांव शंकरराव म्हणजें शनिप्रधान राशींखाली आहे. वरील उदाहरणावरून कायम स्वरूपाचीं जीं नांवें आहेत त्यांच्या आद्याक्षरांवरून राशीभविष्य पाहिल्यास बऱ्याच अंशीं त्याचा अनुभव येतो असे दिसेल.

बहुशः माणसांचीं नांवे व्यक्तिगत रुचिवैचित्र्यानुरूप ठेवलेली असल्यानें त्यांचें भविष्य तंतोतंत पटेलच असें नाहीं. पण धोंडों केशव, लक्ष्मण नारायण वामन, नारायण, रामचंद्र अंताजी, लक्ष्मण नारायण हरी, बाळ, गंगाधर अशा जोडगोळींने आढळल्यास त्या त्या व्यक्तीच्या स्वभावांत कांहीं वैशिष्टच दिसून येईल व त्यांच्या कृतींतहि कांहीं वैशिष्टच असेंल. आतांपर्यंतचे घराण्यांचे इतिहास व ऐतिहासिक कागद पाहिल्यास या गोष्टींचें प्रत्यंतर मिळेल. बाळ-गंगाधर (शास्त्री जांभेकर) बाळ-गंगाधर (टिळक) बाळ गंगाधर (खेर) हीं नांवें पाहिल्यास त्या पुरुषांतले लोकोतरत्त्व, कार्याची

तळमळ व पुढारीपणा यांत वैशिष्टच होते हे सर्वांस माहितच आहे.

ह्या सगळ्या विवेचनावरून आपल्या पूर्वजांनीं प्रत्येक गोष्टीचा सूक्ष्म अभ्यास करून आपले सिद्धांत ठरविले होते. आजहि आपण निरनिराळ्या साधनांचा उपयोग करून घेऊन त्या शास्त्रांचें सूक्ष्म रहस्य समजून घेतले पाहिजे.

अवकहडाचक्र पंचांगात दिलेलें असते. त्यावरून नाडी, गण, वर्ण, योनि व राशी आपण पहातोच पण त्यांचा उपयोग निरनिराळ्या रीतीनें करून घेऊन त्यांचा मानवी जीवनाशी प्रत्यक्ष संबंध कसा येतो व अनुभव काय मिळतो हें पाहिले पाहिजे.

ज्योतिषशास्त्राची उपयुक्तता

लेखक : श्री. धुं. ह. जोशी ज्यो. विशारद

प्रत्येक माणसाच्या जीवनांत बऱ्या - वाईट प्रकारच्या घटना नेहमींच घडत असतात व अशा गोष्टींना 'नशीब' अशी संज्ञा दिली जाते. उदा. एखाद्याला लॉटरीचें तिकीट लागते वा एखाद्या मनुष्यास अन्य मार्गानें श्रीमंती प्राप्त होणें वा दारिद्रय प्राप्त होणें, नोकरींत अकस्मिकपणें बढती मिळणें, हातातोंडाला आलेलीं मुले देवाघरीं जाणें या ज्या चमत्कारिक घटना घडत असतात, त्यालाच आपण नशीब वा दैव म्हणतो. तेव्हां दैव व नशिब म्हणजे काय याचाच शोध हे ज्योतिष शास्त्र घेतें. त्यांत अनेक साधनें व मार्ग आहेत. साधारणपणें कोणत्याहि माणसाचीं जन्मकुंडलीं असेल तर त्यावरून त्याच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांचा कालनिर्णय घेतांना तो घेणाऱ्यानें पत्रिका नीट अभ्यासिली पाहिजे.

कांही लोक असें म्हणतात की, जे होणार आहे ते होणारच असेल तर मग या जन्मकुंडलीची आवश्यकता काय? तर आम्ही असे म्हणूं की आपण थोडेसे आजारी पडल्यानंतर डॉक्टरची तरी काय जरुरी असते? आपण लगेच धांवपळ करून त्यांची पायरी चढतो कीं नाहीं? त्याचे उत्तर असे देतां येईल की त्या आजारांतून आपला जीव वांचविण्याचा तो एक प्रयत्न असतो. तद्वतच जन्मकुंडलीचें आहे. कोणताहि डॉक्टर असे कधीच छातीठोकपणें सांगू शकत नाही की, मी हा रोगी बरा करीनच!

त्याच तत्त्वानुसार ज्योतिषशास्त्र हे मनुष्याला त्याच्या जन्मकुंडलीवरून भावी काळात घडणाऱ्या इष्टानिष्ट घटनांची फक्त जाणीव करून देऊं शकते वा वेळप्रसंगीं सावधगिरी बाळगण्यास लावतें.

पुष्कळदा आपणांस असे प्रसंग अनुभवास येतात की' त्यावेळी आपले मन अस्थिर बनून हेंलकावे खावू लागते. हें करूं की ते करूं असा संभ्रम निर्माण होतो' तेव्हां तो दूर करण्याचे साधन म्हणजेच तुमचीं जन्मकुंडली हें ठरते!

सध्यांचें जीवन हें अतिशय त्रासाचें, धांवपळीचें, व अस्थिर झालें असून अनेकांपुढें विविध प्रकारच्या समस्य आ वासून उभ्या आहेत. उदा. कॉलेजचें शिक्षण होईल कीं नाहीं? नोकरींत फायदा कीं स्वतंत्र बिझिनेस करावा? नोकरी असेल तर ती कोणत्या स्वरूपाचीं? या स्वरूपाचे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न असतात. तेव्हां हे प्रश्न जन्मकुंडलीवरून सुटू शकतात.

या शास्त्रावर अंधश्रद्धा ठेवावी काय? असा जर प्रश्न मला कोणीं केला तर मी म्हणेन मुळींच नाहीं! कोणत्याहि गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव आल्याविना कोणीच श्रद्धा ठेवणार नाहीं! व ठेऊं नये असें आमचें मत आहे. मात्र प्रचिति येण्याकरतां तुम्हीं आपली पत्रिका कोणाला तरी दाखविणें जरूर आहे व काय अनुभव येतो त्याचाहि पडताळा घेतला पाहिजे. मात्र या विषयांतल्या तज्ज्ञ माणसाकडेच या बाबतींत मार्गदर्शन वा सल्ला घेणें इष्ट असते.

ज्योतिषाकडे येणाऱ्या लोकांपैकीं बहुतेक लोकांचे प्रश्न सारखेच असतात. पण त्यांचीं फलें सर्वांनाच सारख्याच स्वरूपांत मिळत नाहींत, कारण प्रत्येकाच्या जन्मकुंडलींत फरक असतो. तेव्हां जन्मकुंडलींशिवाय मार्गदर्शन घेऊं नये असें आमचें स्पष्ट मत आहे.

सध्यांच्या धकाधकीच्या मामल्यांत आपणांस बरेच मासलेवाईक असे बरेवाईट अनुभव येतात. कोणी सज्जन भेटतो, तर एखादा लफंग्या भेटतो, तर एखादा श्रीमंत असूनहि मनानें दरिद्री असल्यानें त्याचा वाईटहि अनुभव येतो. एखादा खराच गरीब असतो, तर एखादा नुसताच भपकेबाज असतो. तेव्हां या विविध प्रकारच्या लोकांत वावरतांना, त्यांच्याशीं व्यवहार करतांना, आपलें नुकसान होऊं नये अशीच प्रत्येकाची स्वाभाविक इच्छा असतें. तेव्हां त्यासाठीं प्रत्येकानें आपल्या जन्मकुंडलीच्या आधारें फलज्योतिषशास्त्राचे मार्गदर्शन घेतलें पाहिजे, असाच निष्कर्ष आम्हीं काढूं.

संख्याशास्त्राचे गुपित

लेखक : जयवंत वालावलकर

आपल्या आयुष्यात पुढें घडणाऱ्या घटना केव्हां घडतील वा कोणती वर्षे महत्त्वाची हें नवांकावरून काढण्याचीं एक पद्धति आहे, तीं येणेंप्रमाणें.

१ ला गट	२ रा गट	३ रा गट
(१, २, ४, ५, ७, ८)	(३, ६)	(९)

वरीलप्रमाणें १ ते १० या संख्यांचे तीन गट पडतात. पहिला १ २ ४ ५ ७ ८ यांचा असून दुसरा गट ३ व ६ या संख्यांचा व तिसरा गट ९ या संख्येचा आहे.

वरील १ २ ४ ५ ७ ८ हे अंक एकाच गुणधर्माचे मानले जातात. तद्वतच ३ व ६ हे अंक दुसऱ्या धर्माचें व ९ हा अंक तिसऱ्या धर्माचा मानतात. हे तीन गुणधर्म म्हणजे रज, सत्त्व व तम हे होत व ते ब्रह्मा, विष्णु व महेश यांचेंच त्रिविध स्वरूप आहे.

उदाहरणार्थ म्हणून पुढें दिलें आहे--

कोणत्याहि सालीं जन्म झालेला मनुष्य वरील तीन गटांत मोडतो. जन्मवर्षाचे जे अंक असतील त्यांची-बेरीज एकांकी येईपर्यंत करावयाची, उदाहरणार्थ जन्म वर्ष १९३७ धरूं म्हणजे त्याची बेरीज १ + ९ + ३ + ७. = २० = २

उदा २ रें - १९३८ = १ + ९ + ३ + ८ = २१ = ३

उदा. ३ रें - १९४४ = १ + ९ + ४ + ४ = १८ = ९

१ ज्या व्यक्तीच्या जन्मवर्षाची एकांकीं बेरीज १ ल्या गटांत पडते १ २ ४ ५ ७ ८ यांपैकी त्यांच्या आयुष्यांत घडामोडींचीं वर्षे ८ ७ ५ १ २ ४ या अनुक्रमानें येतात. (२) ज्या व्यक्तींच्या आयुष्यांतील जन्मवर्षाची एकांकी बेरीज दुसऱ्या गटांत मोडते (म्हणजे ३ व ६ यांपैकीं)

गट पहिला	गट दुसरा	गट तिसरा
जन्मवर्ष १९३९ = ४	जन्मवर्ष १९१४ = ६	जन्मवर्ष १९४४ = ९
+ ४	+ ६	+ ९
१९४३ = ८	१९२० = ३	१९५३ = ९
+ ८	+ ३	+ ९
१९५१ = ७	१९२३ = ६	१९६२ = ९
+ ७	+ ६	+ ९
१९५८ = ५	१९२९ = ३	१९७१ = ९
+ ५	+ ३	+ ९
१९६३ = १	१९३२ = ६	१९८० = ९
+ १	+ ६	+ ९
१९६४ = २	१९३८ = ३	१९८९ = ९
+ २		
१९६६ = ४		
+ ४		
१९७० = ८		

त्यांच्या आयुष्यांत घडामोडींचीं वर्षे ३ व ६ या अनुक्रमानें येतात. व (३) ज्या व्यक्तीच्या जन्मवर्षाची एकांकी बेरीज तिसऱ्या गटांत मोडते ९ त्यांच्या आयुष्यांत दर नवव्या वर्षी स्थित्यंतर होतें.

याप्रमाणे गटात येणाऱ्या सनाचीं सारखी बेरीज करीत गेल्यास ४,८,७,५,१,२, हेच अंक परत फिरून येतात. म्हणजे या अंकांचे एक वर्तुळ पूर्ण झालें की दुसरे वर्तुळ चालू होते. बरें त्याचा क्रमहि ठरलेला आहे तो म्हणजे ८ नंतर ७ नंतर ५, १, २,४ याप्रमाणे व पुन: ८ पासून सुरवात होते.

याप्रमाणें इतर दोन गटांच्या संख्याचीं बेरीजहि अशीच क्रमाने येते. ह्याचा अनुभव प्रत्येकास घेता येईल.

योगांची फले

संकलक :—विजय जकातदार

१ विष्कंभक:—या योगावर जिचा जन्म झाला असेल ती स्त्री शास्त्रज्ञ, स्वतंत्रपणें कार्य करणारी, गृहकार्यात दक्ष, उदार चारित्र्याची, पतिप्रिय, विनयशील, पुत्रपौत्रादि सुखांनीं युक्त अशी असते.

२ प्रीति:—या योगावर जन्मणारी, शास्त्रज्ञ धनधान्य युक्त, रूपवान्, दानशील, चतुर, प्रसन्नचित्त व लोकप्रिय होते.

३ आयुष्मान :— या योगावर जन्मणारी, कांतिमान, दीर्घायु, वन, पर्वत किल्ला, नदी इत्यादि स्थानांची आवड असणारी, विनम्र, धर्मशील अशी होते.

४ सौभाग्य :—श्रेष्ठ भाग्याची, प्रज्ञावान्, सत्यवादी, धनवान् मंदहासिनी, प्रियभाषणी, स्वस्वरुपाविषयीं, गर्विष्ठ अशी असते.

५ शोभन :—शोभायमान, हजरजबाबी, बुद्धिवान्, सत्यप्रिय, व्यवहारचतुर, पुत्रवान्, सदाचरणी अशी होते.

६ अतिगंड :— दुसऱ्याचें मन जाणणारी, विशालमुख, अहंकारी, क्रोधी, कलहप्रिय, कुरुप, विवेकहीन, व्यसनरत अशी होते.

७ सुकर्मा :—बुद्धिवान्, कलाप्रवीण, साहसी, दानशील कृतज्ञ, परोपकारात, सत्कार्यात उडी घेणारी अशी होते.

८ धृति :—प्रज्ञावान्, विधिज्ञ, सत्यपरायण, विनम्र, व्रतनियमांनी युक्त, शांत, धीर गंभीर, पुत्रपौत्रान्वित अशी होते.

९ शूल :—बुद्धिहीन, मद्यरत, व्यसनी, दुष्कर्मरत, पोटांत शूल, रोगी, गर्विष्ठ, कृतघ्न, दांभिक अशी होते.

१० गंड :—दुष्ट, मित्राला फसविणारी, क्रोधी, गंडस्थल फार मोठे, पुरुषप्रकृतीची, क्रूर स्वभावाची असते.

११ वृद्धि :—धनवान्, संग्रही, सुस्वरुप, प्रेमळ, अति चतुर, लोकप्रिय, पुण्यवान्, शीलवान् अशी होते.

१२ ध्रुव :—भाग्यवान्, पुत्रवान्, क्षमाशील, सद्व्यवहारचतुर, प्रसन्न भाषण करणारी, धनधान्ययुक्त, लोकप्रियता, शास्त्रांची भोक्ती अशी असते.

१३ व्याघात :—घातपात करणारीं, असत्यवादी, हीन शरीरी, कृपण, कठोर, कलहप्रिय, दांभिक, कृतघ्न अशी असते.

१४ हर्षण :—स्वत:च्या कर्तबगारीनें प्रसिद्ध होणारी, सुभगा, कृतज्ञ, लाल वस्त्र प्रिय असणारी, सुवर्णभूषणें व सुंदर स्निग्ध शरीर असणारी, सुख व कीर्ति यांनी युक्त अशी असते.

१५ वज्र :—बुद्धिमान्, हिरेरत्नजडित भूषणें घालणारी बांधवजनप्रिय, सत्यवादी, दानशील, सुंदर व चतुर अशी असते.

१६ सिद्धि:—उदार अंत:करणाची, श्रेष्ठ भाग्याचीं, सत्कृत्यें करणारी, शास्त्रज्ञ, ब्राम्हणांस पूज्य मान-

पान ८९ वर पहा

माझे कांहीं अनुभव

लेखक : भा. न. टोणगांवकर, ज्यो. प्रवीण

(१) लग्नाधिपति शुभ ग्रह असून तो उच्चीचा किंवा ज्या राशीत असेल त्यां राशीचा स्वामी उच्च असेल तर तो मनुष्य चांगल्या नांवलौकिकास चढतो.

(२) भाग्याधिपति लग्नांत, पंचमाधिपति दशमांत, लग्नेश लग्नांत, दशमाधिपति दशमांत किंवा लग्नांत स्वगृहीचे उच्चीचे किंवा मित्रक्षेत्री असले तरींहि ती माणसें अत्यंत कर्तृत्वान् निघून प्रसिद्धी पावतात.

(३) धनाधिपति लाभांत, लाभाधिपति लाभांत, अगर धनाधिपति उच्चीचा, तसेच लाभाधिपति लग्नांत – लाभ स्थानांत उच्चीचा शुभग्रह असल्यास त्या माणसास धनाचा गड्डयानीं योग येतो. असाच अष्टमेश अष्टमेशावर पहात असेल तर त्यासहि अकस्मात् धनलाभाचे योग येतात.

(४) तृतियांत रवि असल्यास बहुतेक भावंडांमध्यें वडिलपणा येंत असतो. स्त्रीकारक ग्रह असल्यास बहिणी पाठींवर असतात. पुरुष स्त्रीकारक ग्रह असल्यास दोन्हीं प्रकारची भावंडे असतात. बुध व शुभग्रह तेथे असल्यास लेखनशैली चांगली असते.

(५) चतुर्थाधिपति त्रिकोणांत असेल तर ती माणसें विद्वान म्हणून व सुखी असें जींवन चांगल्या प्रकारें घालवू शकतात. चतुर्थाधिपति त्रिकोणांत स्वगृहीचा अगर मित्रक्षेत्री असल्यास, किंवा लाभांत अगर धनांत असल्यास ते स्थावर इस्टेटीची वृद्धि करूं शकतात. किंवा स्वत: स्थावर इस्टेट मिळवू शकतात. पापग्रह शत्रूक्षेत्री किंवा व्ययांत असल्यास पूर्वीची इस्टेट नाहींशी होते. किंवा तिचा फायदा मिळू शकत नाही. तसेच वाहनांनाहि नहमी दुरुस्ती करावी लागते. शुभग्रह असून त्रिकोणांत मित्रक्षेत्री वगैरे असल्यास वाहनसौख्य चांगले मिळते. मातृसौख्यहि चांगलें मिळते. चतुर्थेश चतुर्थावर पाहात असेल तर त्याच्या मातेचे त्याच्यावर फार प्रेम असते. व त्याचे घरहि बऱ्याच सुखसोयींनी युक्त असतें. षष्टांत शुक्र असल्यास अशा लोकाना चांगलें घर रहात-यास मिळतें.

(६) पंचमाधिपति पंचमात असल्यास त्याचा विद्याभ्यास अखंड व चांगल्या प्रकारानें होतो. तो दशमात स्वगृहीचा किंवा लग्नांत स्वगृहींचा किंवा उच्चीचा असल्यास नोकरीत दर्जा चांगला मिळतो. पंचमाधिपति भाग्यांत स्वगृहीचा उच्चीचा किंवा मित्रक्षेत्री असल्यास विद्येने प्रख्यात व धनवान होतो. त्याची संततिहि फार बुद्धिमान निपजते. पंचमाधिपति षष्ठांत, अष्टमांत अगर व्ययांत व तेहि पापग्रह असल्यास शिक्षणांत फांरच अडथळे येतात. मानसिक त्रासहि फार होंतो. तो ग्रह जर उच्चीचा, मित्रक्षेत्री अगर स्वगृहीचा असेल तर तो मनुष्य खालच्या दर्ज्यातून मोठेपणा प्राप्त करून घेतो.

(७) षष्ठांत शुभग्रह असल्यास त्या माणसास मानसिक त्रास फार होतो. शनि असल्यास शत्रूची भीती बाळगतो. शुक्र असल्यास स्वत: भित्रा असतो, मंगळ असल्यास शत्रु सहसा निर्माण होत नाहीत. रवि असल्यास उष्णतेचे आजार होतात. षष्ठेश ज्या स्थानांत असतो, त्या त्या ठिकाणच्या कारकत्वाचा त्याला त्रास होत असतो.

(८) सप्तमेश त्रिकोणांत असल्यास प्रेमविवाह होतो किंवा भार्या अतिशय चांगली मिळते. सप्तमेश ज्या स्थानांत असेल त्याप्रमाणे स्त्रीसौख्य मिळते उदा. सप्तमेश लाभांत अगर धनात असेल तर लग्नानंतर आर्थिक परिस्थिति सुधारतें. व्ययात असेल तर एकमेकास नेहमी दूर राहण्याचे प्रसंग निर्माण होतात. षष्ठांत अगर अष्टमात असेल तर भांडणे अगर अपघाताचे योग येतात.

(९) अष्टमात चंद्र असल्यास दुसऱ्याच्या पैशाचीं अभिलाषा करणारे असतात. अकस्मात धनलाभाचे, तसेच आर्थिक विवंचनेचे प्रसंग निर्माण होतात. शुभग्रह असल्यास सहजासहजी अकल्पित लाभ व पापग्रह असल्यास खूप पैसा मिळवण्यासाठी अति प्रयास व क्लृप्त्या कराव्या लागतात.

(१०) भाग्येश भाग्यात असल्यास प्रसिद्धी लवकर मिळते प्रचार भरपूर होतो. भाग्येश दशमांत असल्यास चांगल्या दर्जाची नोकरी. भाग्येश लाभांत असल्यास मित्राकडून लाभाचे प्रसंग येतात.

(११) दशमेश दशमांत अपेक्षेप्रमाणे नोकरी व त्यातहि दर्जा चांगला राहतो. चंद्र दशमांत असल्यास निरनिराळ्या ठिकाणी स्थित्यंतरें किंवा बदल्यांचे प्रसंग येतात. शनि, रवि, मंगळ यासारखें ग्रह दशमांत असल्यास नोकरींत अधिकार चांगला मिळतो. पितृसुख शुभग्रह त्या स्थानांत अगर त्याचा कारक असल्यास चांगले मिळते. त्याचा ग्रह केंद्री अगर त्रिकोणांत, उच्चीचा स्वगृही, मित्रगृही असल्यास चांगलें फल मिळते. दशमेश अष्टमांत असल्यास नोकरीत वारंवार मोठमोठ्या जबाबदारीची कामे करण्याचे प्रसंग उद्भवतात. म्हणजे स्वतःच्या कर्तृत्वशक्तीला न पेलणाऱ्या गोष्टी कराव्या लागतात, अनेक अडथळे येतात व नंतर ते कार्य होते.

(१२) लाभेश लाभांत मनासारखे लाभ व योग्य मित्रसंग्रह. लाभांत शनि असल्यास मित्रांच्या सल्ल्यानें संपत्ति कोणत्यातरी उद्योगांत गुंतली जाते.

(१३) व्ययेश व्ययांत असल्यास योग्य व्यय होतो. लग्नेश व्ययांत असल्यास स्वभाव उधळा व फिरस्ती फार. व्ययाधिपति उच्चीचा त्रिकोणांत असेल तर नोकर सुख चांगलें मिळतें. शय्यासुख चांगलें मिळतें. अनिष्ट पापग्रह किंवा नीचीचे पापग्रह असल्यास एकांतवासाचे योग अगर कांहीं काल कारागृहवासाचा योग येण्याचा संभव असतो. येणेंप्रमाणें सर्वसाधारण त्रोटक अनुभव दिले आहेत. अभ्यासूंनीं अशाच प्रकारचे अनुभव स्वतः कुंडल्या पाहून संग्रहित करावेत. कारण, नुसत्या स्थानावर ग्रह अमुक असला म्हणजे निश्चितच तसा अनुभव येणें कठीण आहे. कारण, पुन्हा तो ग्रह कसा आहे, त्याच्यावर कोणत्या ग्रहांची दृष्टि आहे, कोणत्या ग्रहांशीं युति आहे, कोणत्या स्थानाचा कारक आहे वगैरे सूक्ष्म निरीक्षण केल्याशिवाय फल निश्चित सांगतां येणार नाहीं.

पान ८७ चालू

णारी, निरोगी अशी होते.

१७ व्यतिपात :— कुरूप, कलहप्रिय, रोगी, पापरत, अप्रबुद्ध, विकृत शरीराची अशी होते.

१८ वरीयाण:—विनयशील, वडिल मंडळीवर प्रेम करणारी, दानशील, चतुर, रुपवान्, दक्ष, कीर्तिमान् अशी होते.

१९ परिघ :—खोटया चालीची, खर्चिक, शत्रूंना जिंकणारी, मद्यरत, रागीट, मितभाषण करणारी, घुम्या स्वभावाची, आतल्या गांठीची अशी होते.

२० शिव :—मंत्रशास्त्र प्रवीण, जितेंद्रिय, गोड बोलणाली उत्तम शीलाची, शिवभक्तीनें कल्याण पावणारी अशी होतें.

२१ सिद्धि :—सुखी, सत्यरत, गौरवर्णी, बुद्धिवान्, दानशील, दयावान्, इच्छित कार्य पूर्ण करणारी, कृतार्थ, अशी होते.

२२ साध्यः—सुंदर रुपाची, नम्र स्वभावाची, मंत्रविद्या विधि जाणणारी, धान्य व धनयुक्त, स्त्रीवर्गात लोकप्रिय अशी होते.

२३ शुभ :—डोळे मोठे, प्रमत्त, शुभभाषणी, शुभ उपदेश करणारी व शुभ लक्षणांनीं युक्त अशी होते.

२४ शुक्ल :—कृतज्ञ, सन्मान्य, शुभ्रवस्त्रप्रिय, जितेंद्रिय, सत्यरत, साध्वी, विनीत व शत्रु जिंकणारी अशी,होते.

२५ ब्रह्म :—कर्ममार्गांत चतुर, सत्यप्रिय, शास्त्रप्रवीण दानशील, पंडित, वादविवादकुशल, सुंदर गृही राहणारी अशी होते.

२६ ऐंद्र :—राजपत्नी, प्रपंचात श्रेष्ठ व कुशल, कफप्रकृतीची,दानशील,बांधवप्रिय, दक्ष,सत्यवादी अशी होते.

२७ वैधृति :—कठोर अंतःकरणाची, कुटिल स्वभावाची, पाखंडी, दुष्टजनांचा सहवास करणारी, दया व भयरहित अशी होते.

स्वप्नाचे शुभाशुभ परिणाम

संग्राहक—**नानासाहेब वाळके** (माजी उपमहापौर)

नदी समुद्रतरण माकाशगमनं तथा।।
भास्कररोदयनं चैव प्रज्वलन्तं हुताशनम् ।।१।।
ग्रह नक्षत्र तारणां चंद्रमंडल दर्शनम्।।
हर्म्यस्थारोहणं चैव प्रासाद शिरसोऽपि वा।।
एव मादीनि संदृष्टवा नरः सिद्धिमवाप्नुयात।२।।

अर्थ—नदी,समुद्र, याचे पलीकडे पोहून जाणे, आकाशांत उडणे, उगवत असलेला सूर्य प्रज्वलित अग्नि सूर्यादिक ग्रह, अश्विन्यादिक नक्षत्रे, ध्रुवादिक तारे, चंद्रमंडल इत्यादिकाचे दर्शन घेणे व गृह, देवालय, राजवाडा याजवर चढणे इत्यादिक कृत्ये स्वतः करीत असल्याचे स्वप्नाचे ठायी जो मनुष्य पांहतो, त्या मनुष्याला सर्व सिद्धी प्राप्त होतील असे जाणावे.

आदित्यमंडलं स्वप्ने चंद्रं वा यदि पश्यति ।।
व्याधितो मुच्यते रोगाद्रोगी श्रियमवाप्नुयांत।।३।

अर्थ—जो मनुष्य सूर्यमंडल व चंद्र याना पाहील, तो रोगीं असल्यास बरा होईल, अथवा अरोगी असल्यास धन मिळेल.

आसने शयने याने शरीरे वाहने गृहे ।।
ज्वलमाने विबुद्धयेत तस्य श्रीः सर्वतोमुखी ।। ४ ।।

अर्थ— जो मनुष्य बसण्याची गादी व निजण्याचा बिछाना, तसेच पालखी गाडी इत्यादीं वाहनें किंवा शरीर, घर, इत्यादिकांना आग लागली आहे असें पाहून जागा होईल' त्याच्या सन्मुख लक्ष्मी सर्वकाळ उभी राहते

अग्निना वेष्टितो यो वैं नगरेऽपि गृहेऽपिवा ।।
गृहे माण्डलिको राजा नगरे पार्थिवो भवेत् ।।५।।

अर्थ—आपणांस अग्नीनें घरात कोंडलें आहे असें जो स्वप्नांत पाहील त्याला काहीं गांवांचे राज्य मिळेल व आपणांस अग्नीनें शहरांत कोंडलें आहे, असें जो स्वप्तांत पाहील त्याला पृथ्वीचें राज्य मिळेल.

आदित्यं वाऽथ चंद्रंवा विगतच्छविकं तथा ।।
पतच्चाप्यथ नक्षत्रं तारकादिश्च वा यदि ।।
वीक्षते मानवः स्वप्ने मरणं शोकमाप्नुयात ।। ६ ।।

अर्थ—स्वप्नाचे ठायी सूर्य किंवा चंद्र हे निस्तेज झाल्याचें पाहील किंवा आश्विन्यादिक नक्षत्रें पडत आहेत किंवा ध्रुवादि तारे पडत आहे असे पाहील त्याला मरण किंवा शोक हीं प्राप्त होतील.

देवविप्रद्विजच्छत्र तुष पङ्क जपार्थिवान् ।।
शुक्ल पुष्पांगर धराः प्रशस्ताभरणाङ्गनाः ।। ७ ।।
वृषभं पर्वतं क्षीरीफल वृक्षादिरोहणम् ।।
दर्पणामिष माल्याप्तिस्तरणं च महाम्भस्सां ।।
दृष्टवा स्वप्नेऽर्थलाभः स्याद्वयाधि मुक्तिश्च जायते ।।८।।

अर्थ— देव, ब्राम्हण, भारद्वाजादि श्रेष्ठपक्षी, छत्र तूस, कमळ व राजा तसेंच पांढरा पुष्पे, पांढरे वस्त्र, आणि उत्तम अलंकार यांनीं युक्त अशा स्त्रिया जो स्वप्नात पाहील किंवा बैल, पर्वत, उंबर फळे आलेला वृक्ष याजवर स्वतः चढणें; आरसा, मांस, पुष्पें ही स्वतःला मिळणेंआणि मोठया पाण्यामध्यें स्वतः पोहणें इतकी स्वप्नामध्यें जो पाहील, त्याला द्रव्य मिळेल व कांहीं असल्यास दूर होईल.

शुक्लाम्वरधरा नारी शुक्ल गन्धानुलेपना ।।
अवगाहति वैं स्वप्नें श्रियं तस्य विनिर्दिशेत् ।।९।।

अर्थ— जो स्वप्नामध्यें पांढरे वस्त्र किंवा पांढरें गंध धारण केलेल्या स्त्रीनें आपणास स्नान घातलें असें पाहील, त्याला लक्ष्मी प्राप्त होईल.

सर्वाणि शुक्लान्यपि शोभनानि कार्पास भस्मौदन तक्रवर्ज्यम् ।। सर्वाणि कृष्णान्यपि निन्दितानि गोहस्ति देवद्विजवाजिवर्ज्य ।। १० ।।

अर्थ— स्वप्नांत पाहिलेल्या किंवा मिळालेल्या सर्व पांढऱ्या वस्तु शुभ परंतु कापूस, राखाडी, भात व ताक

हे वाईट फल देणारे समजावे. स्वप्नांत पाहिलेले सर्व काळे पदार्थ वाईट फलें देतात. परंतु काळी गाय, काळा हत्ती, काळा घोडा, काळ्या वर्णाचा देव, व काळा ब्राम्हण काळ्या पदार्थांत उत्तम फळ देणारे आहेत.

आरोहणं गोवृषकुंजराणां प्रासादशैलाग्र वनस्पतीनाम ।। विष्ठानुलेपो रुदितं मृतं वा स्वप्नेष्वगम्यागमनं च धन्यम् ।। ११ ।।

अर्थ —जो मनुष्य स्वप्नात गाय, बैल, हत्ती, देवालय, पर्वताग्र, वृक्ष यांजवर चढतो, विष्ठेचा लेप अंगाला लावतो, तसेच रडणें, ज्या स्त्रीशीं गमन करूं नये त्या स्त्रीशीं संग या क्रिया स्वतः करितो, तो धन्य होईल.

क्षीरिणं फलितं वृक्षमेकाकी यः प्ररोहति ।।
तत्रस्थः स विबुद्ध्येत धनं शीघ्रमवाप्नुयात ।। १२

अर्थ-- जो मनुष्य स्वप्नांत वटवृक्ष किंवा फळें आलेला वृक्ष यांजवर एकटाच चढून तेथें जागा होतो त्याला द्रव्यलाभ लौकरच होईल.

प्रासादं शैलमारुह्य समुद्रं तरते नरः ।।
अपि दासकुले जातो राजा भवति वै ध्रुवम्।।१३।

अर्थ— जो मनुष्य स्वप्नात देवालय, राजगृह किंवा पर्वताग्र यांजवर चढतो, किंवा समुद्रामध्यें पोहतो, तो जरी दासकुलामध्यें उत्पन्न झालेला असला तरी राजा होईल.

विहारकरणं स्वप्ने रक्तवस्त्रं विधारणम् ।।
स्त्रोतसां हरणं नष्टं पक्वमांसस्य भोजनम् ।। १४ ।।

अर्थ — स्वप्नांत क्रीडा करणें, तांबडे वस्त्र धारण करणें, नदीस अडवून आणणें व शिजलेलें मांस खाणें, ह्या बाबी नाशकारक समजाव्यात.

रक्ताम्बर धरा नारी रक्तगन्धानुलेपना ।।
अनगाहति यं स्वप्ने मृत्युं तस्य विनिर्दिशेत् ।।१५

अर्थ-- स्वप्नामध्यें तांबडें वस्त्र नेसलेल्या व आरक्त गंध लावलेंल्या स्त्रीनें ज्याला आलिंगिलें त्याला मृत्यु लवकर प्राप्त होईल.

अशोकं करवीरं वा पलाशं वाऽथ पुष्पितम् ।।
स्वप्नान्ते यस्तु पश्येत नरः शोकमवाप्नुयात ।।१६।

अर्थ-- जो मनुष्य स्वप्नाच्या शेवटी अशोक, कण्हेरी, अथवा पळस हे वृक्ष फुललेले पाहील त्याला शोक प्राप्त होईल.

।। शुभं भवतु ।।



माननीय शंकरराव उरसळ

अध्यक्ष, पुणें जिल्हा परिषद



माननीय शंकररावजी उरसळ हे मूळचे पुण्याचे. त्यांचे लहानपण येथेच गेले.स्वत:चे सारे शिक्षण स्वकर्तृत्वाने पूर्ण करून त्यांनी बी. ए. ची पदवी प्राप्त केली. पुढे लॉकडे जाण्याची त्यांची मनीषा होती. त्याप्रमाणे त्यांनी सुरुवातीस वर्षभर टर्मस् भरल्या.पण पुढे कांही अपरिहार्य कारणामुळे त्यांना ते अपूर्णच सोडावे लागले. लहानपणापासून त्यांना व्यायामाची, सामाजिक कार्याची भारी आवड. सभा, संमेलने, परिषदा यामधून ते हिरीरीने भाग घेत असत. पुढे वयाच्या २९ व्या वर्षी त्यांना महद् भाग्याचा क्षण आला. तो म्हणजे ते पुणे महानगरपालिकेचे महापौरपदी निवडून आले. त्या पदावरहि त्यांनी उत्तम प्रकारे कार्य केले. (वयाचे २९ व्या वर्षी मोठी बहुमानाची जागा भूषवाल असे एका ज्योतिशाने त्यांना बरीच वर्षे आधीं सांगितले होते. त्याचा प्रत्यय आला.) पुढे १९६२ मध्ये जिल्हा परीषदांची महाराष्ट्रात स्थापना झाल्यावर पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून ते अविरोध निवडून आले. गेली ५वर्षे त्यांनी त्या पदावर राहून जि. प. चे कार्य मोठ्या कुशलतेने व जनहित बुध्दीने चालविले होते. त्याचा स्वभाव उमदा, दुसऱ्याच्या अडचणी जाणून घेण्याची वृत्ती तसेच सहकार्य देण्याची नेहमी तयारी यामुळे अल्पावधींतच त्यांनी पुष्कळ लोकप्रियता व लोकसंग्रह प्राप्त केला आहे. त्यांचे हातून अधिकाधिक जनसेवा घडून येण्यासाठी त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो हीच प्रभूचरणी प्रार्थना.

नुकत्याच झालेल्या जि.प.च्या निवडणुकीत ते कांग्रेस तर्फे विनविरोध निवडून आले आहेत हे विशेष होय.

—०—०—


समाज आणि ज्योतिषशास्त्र

(पान ६८ वरून)

स्वस्थ बसण्यातहि अर्थ नाही तर त्याला प्रयत्नाची जोड पाहिजे तरच त्याचा कार्यभाग होईल. म्हणजे सर्व प्रयत्नावरच आहे असे नाही. प्रयत्नांना हटकून यश येईलच असे खात्रीने सांगता येत नाही. God helps those who help themselves म्हणजे देवावर श्रद्धा ठेवली पाहिजे.

ज्योतिषशास्त्र हे जडशास्त्रापैकी एकमान्य शास्त्र आहे. अद्‌भुत व प्रगल्भशास्त्र आहे, अदृश्य काळाचा वेध घेऊन त्याच्या उदरांतील घटना सांगण्याचे सामर्थ्य ज्योतिषशास्त्रांतच आहे. ज्योतिषशास्त्र हे दु:ख, आपत्ती हानी, संकट हे अंशत: कमी करण्यासाठी आहे. म्हणजेच हे शास्त्र मार्गदर्शक व सल्लागार जीवनांतील होकायंत्र आहे. वैद्यकीय शास्त्राइतकीच ज्योतिषशास्त्राची आजच्या मानवाला गरज आहे. ज्योतिषशास्त्राने दु:ख नाहीसे होईल असे नाहीं तर त्याचा आगाव विचार केल्यानेच ते दु:ख सहन करण्याची शक्ती व्यक्तीच्या अंगात येते. ज्योतिषशास्त्र मानवाचा आधारस्तंभ आहे हे म्हणणे त्रिवार सत्य आहे.

।। शुभं भवतु ।।



सामुद्रिक व ज्योतिष एकमेकांस पूरक आहेत काय ?

लेखक : श्रीधर र. वर्तक B. A. L. L. B.

हस्तसामुद्रिक व फलज्योतिष ही शास्त्रे एकाच तात्विक भूमिकेवर आधारल्यासारखी दिसतात. हातावर जे उंचवटे दिसतात ते सूर्य, चंद्र, शुक्र, बुध, मंगळ, गुरु व शनी सर्व ज्योतिर्मालिकेंतील मुख्य सात ग्रह आहेत असे त्यांच्या नामसादृश्यावरून भासते. आकाशातील क्रांतिवृत्त या सूर्यग्रहाच्या मार्गावरून सूर्य भ्रमण करतो. एका दिवशी सूर्य उगवल्यापासून दुसऱ्या दिवशी तो उगवेपर्यंत जो वेळ लागतो त्याला आपण वार असे म्हणतो. असे वारहि वरील ग्रहांच्या अनुक्रमाने म्हणजे रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरवार, शुक्रवार, शनिवार हीच सात नांवे प्रत्येक सात दिवसांनी पुनः पुन्हा अनुक्रमे येतात. अशा रीतीने ज्योतिषशास्त्राने जरी नऊ ग्रह मानलेले असले तरी राहु केतू यांची नांवे वारांना दिलेली नाहीत. कारण ते उपग्रह आहेत असे सांगण्यांत येते.

या सात ग्रहांच्या भ्रमण मार्गांत कल्पिलेल्या बारा घरांतून त्यांचा प्रवेश असतो. ज्यास ज्योतिष शास्त्रांत कुंडली अशी संज्ञा आहे. यात बारा घरे दाखविली असतात. चमत्कार असा आढळून येतो की, कुंडली बरोबर असल्यास कुंडली-प्रमाणे जो ग्रह उच्चीचा, शुभ व सुफल देणारा असा असेल तोच बरोबर तळहातावर फुगीर, तेजस्वी व सुचिन्हांनी युक्त असा आढळून येतो. त्यावरून हातावरील रेषा व चिन्हे इत्यादि पाहून जन्मकुंडली मांडण्याची शक्यता आहे याबद्दल खात्री पटते; ग्रहाच्या उंचवटयावरून व चिन्हावरून राशीबद्दल निश्चय होऊ शकतो. अर्थात हे काम अतिशय अनुभवाचे व विचाराचे आहे.

आणखी एक दृष्टीनें फलज्योतिष व हस्तसामुद्रिक या दोन्ही शास्त्रांचा एकमेकाला पूरक अशा दृष्टीने फार चांगला उपयोग होण्यासारखा आहे. ज्योतिष शास्त्राच्या आधारे केलेले भविष्य निरनिराळ्या कारणासाठी व निरनिराळ्या माणसाकडून केलेले भिन्न भिन्न प्रकारचे आढळते. त्यामुळे त्याच्यापैकी खरे व ग्राह्य कोणचे याबद्दल नेहमी संबंधित माणसाचे मनांत संभ्रम उत्पन्न होतो. व्यवहारांत आपण पहातो कीं कोणताहि हिशोब किंवा गणित बरोबर आहे किंवा नाही हे पहाण्यासाठी त्याचा ताळा करून पहाण्याची पद्धत आहे. फलज्योतिष शास्त्राचेआधारे काढलेले निष्कर्ष व फलश्रुती बरोबर आहे किंवा नाही हे पहावयास हातावरील रेषा, उंचवटे व चिन्हे यांचा योग्यरीतीने उपयोग करून ते निष्कर्ष व फलश्रुती बरोबर आहेत काय याचा पडताळा पहाता येणे शक्य आहे. उदाहरणार्थ, होराशास्त्रात दशमाचा मालक असलेल्या रवि वगैरे ग्रहांची, दशमेश ज्या नवमांशी असतो त्या अधिपतीची आणि खमध्य बिंदूची राशिस्थिती व भावस्थिती, बलवत्ता, आणि षष्टचंश स्वरूप यांचा यथायोग्य विचार करून व्यवसाय मार्गदर्शन केले असता ते मार्गदर्शन करतलावरील चिन्हाची दर्शकता, रेषांची सूचकता, उंचवटयाची बलवत्ता, बोटांची पात्रता वगैरेच्या साहय्याने करतलाने दर्शविलेले व्यवसाय मार्गदर्शनाशी बरोबर जमते आहे किंवा नाही हे पहाणे हे उदाहरणाचा किंवा हिशोबाचा

ताळा जमविण्यासारखे आहे. जर ते जमले तर होराशास्त्राप्रमाणे काढलेला निष्कर्ष बरोबर आहे अशी खात्री पटेल. परंतु तो चुकला तर होराशास्त्राप्रमाणें केलेल्या विचारात कोठे तरी चूक आहे असे निश्चित समजावे. कारण कायद्याच्या भाषेत एक म्हण आहे ती अशी की.

' माणूस स्वलनशील, चुकीस पात्र आहे. तो विपरीत बोलू, लिहूं किंवा विचार करू शकेल परंतु लेखी दस्तऐवज कधीही विपरीत दाखवु शकत नाही. **Men may lie but document cannot** त्याचे स्पष्टीकरण असे की ,एखादा माणूस खोटे बोलू शकेल परंतु दस्तऐवज नेहमीच वस्तुस्थिति दाखविल. (तो खोटे सांगणे अशक्य आहे.) निसर्गाने उत्पन्न केलेला हात हा एक न बदलणारा दस्तऐवज आहे व तो निसर्गनिर्मित असून मानवाच्या बुद्धीचे व विचाराचे प्रतिबिंब त्यात उमटल्यावाचून राहात नाही. म्हणून ज्यावेळी फलज्योतिषाने तर्किलेले सिद्धांत व प्रत्यक्ष करतलावरील रेषा उंचवटे व चिन्हे यांनीं दाखविलेले सिद्धांत यात फरक पडेल त्यावेळी हस्तमुद्रिक शास्त्राने काढलेले सिद्धांत जास्त भरंवशालायक आहेत असे अनुभवाअन्ती आढळून येईल. अर्थात निसर्गाने करतलावर स्पष्टपणे लिहिलेली भाषा समजणे फार कठीण आहे ! परंतु तसे असले तरी ते प्रयत्नाने अशक्य नाही. व म्हणून त्या भाषेत लिहिलेले मार्गदर्शन अबाधित राहील ! करतलावर माणसाच्या आयुष्यांतील घडणाऱ्या भवितव्याचे-दिग्दर्शन केलेले असले तरी ती भाषा जाणणारे फारच थोडे असतात. ती भाषा जाणणारा व फलज्योतिष जाणणारा यांचा संगम झाल्यास दोन्ही शास्त्रानें निष्पन्न होणारे सिद्धांत ताडून पहाण्यास सुलभ होईल. त्यामुळे ज्योतिषशास्त्र खरे किंवा हस्तसामुद्रिक शास्त्र खरे यासंबंधी अभिनिवेषात्मक तेढ उत्पन्न होण्यास जागा राहात नाही. यासाठी ज्योतिषशास्त्रज्ञांनीहि हस्तसामुद्रिक शास्त्राचा अभ्यास करणे, वर लिहिल्याप्रमाणे ज्योतिषशास्त्रदृष्टया प्राप्त होणाऱ्या सिद्धांताचा खरेपणा ताडून पहाण्यास म्हणजे ताळा पहाण्यास व समाधान होण्यास सोइस्कर होईल. वास्तविक ज्या ठिकाणी कुंडली तयार करण्यास साधनभूत असे जन्मलग्न बरोबर नसेल किंवा संशयित असेल तर त्या ठिकाणी हस्तसामुद्रिकाचे दिग्दर्शन हेच प्रमाणभूत मानणें हेच श्रेयस्कर आहे !

ज्योतिषाची दोन्ही शास्त्रांच्या दृष्टीने तयारी नसल्या त्याची कशी फसगत होते त्याचे नुकतेच घडलेले उदाहरण हे यादृष्टीने मोठे उद्बोधक आहे म्हणून खाली दिलें आहे.

माझ्या एका मित्रांना सुमारे एक वर्षापूर्वी एक ज्योतिषी भेटला. त्याने माझ्या मित्रांना त्याच्या पूर्व आयुष्यात घडलेल्या गोष्टी बिनचूक सांगितल्या. अर्थात त्यावरून त्याचेवर माझ्या मित्राचा पूर्ण भरंवसा बसला. माझे स्नेही हे मातब्बर वृद्ध व विचारी सद्गृहस्थ आहेत. त्यांचा संसार बहुतेक आटोपलेला असून अध्यात्माची विशेष आवड असल्यामुळें व संसारातून विरक्त होण्याची त्यांच्या मनाची तयारी झालेली आहे. अशा स्थितीत त्यांनी त्या ज्योतिषाला आपल्या निधनाची वेळ व नक्की तारीख विचारली. ज्योतिषीबुवानींहि पूर्ण विचार करून त्यांना १८ डिसेंबर १९६५ ही त्याच्या निधनाची तारीख सांगितली. माझे स्नेही हे विवेकी असल्यामुळे त्यांच्या मनावर जरी त्या भविष्यकथनाचा फारसा परिणाम झाला नाही किंवा त्यांनी हायहि खाल्ली नाही. परंतु अशा तऱ्हेचे भविष्य ज्योतिषाने वर्तविले आहे ही वस्तुस्थिती मात्र त्यांनी आपल्या नातलगांना व माझ्यासुद्धा सर्व मित्रांना कळविली. म्हणून त्यांचे आप्तसंबंधी मुले, मुली व माझ्यासारखे मित्र त्यांच्या भेटीला गेले. डिसेंबर ९-१० तारखेचे सुमारास मी त्यांचेकडे गेलो. मी हस्तसामुद्रिकाचा अभ्यासू आहे असे त्यांना माहित असल्यामुळे त्यांनी मला हात दाखविला व ज्योतिषाने केलेले भविष्यहि कथन केले. हात पाहून मला असे आढळले की त्या माझ्या मित्राच्या त्यावेळच्या वयाचे मानाने आयुष्यरेषेवर जरी तुटकपणा छेदामुळे दिसत असला तरी ती रेषा दोन्ही बाजूच्या रेषामुळे सांधली आहे असे दिसले. त्यामुळे त्यांचे जीवास काही धोका नाही असे मी त्यांना भरवशाने खात्रीलायक सांगू शकलो. त्यामुळे त्यांची व त्यांच्या संबंधितांची भीती दूर झाली. त्यांचा मृत्यु टळला हे सांगणे नकोच !

त्या ज्योतिषाला जर हस्तसामुद्रिक येत असते तर त्याने केलेले भविष्य वर्तविण्याचे त्यास कारण पडले नसते व धाडसहि झाले नसते, असो.

यासाठी वरवर पाहाताहि ज्योतिष व सामुद्रिक ही शास्त्रे एकाच तत्वावर उभारली गेली असल्यामुळे ती एकमेकांना पूरक व साहाय्यकारी आहेत हेच म्हणणे योग्य ठरेल.

○ ○ ●

एक चिंतन

ले. : श्रीकृष्ण अ. जकातदार

मानवी जीवन किंवा पृथ्वीवरील यच्चयावत, जीव इतकेच नव्हे तर सर्व जड वस्तूवर देखील ग्रहांचा परिणाम होत असतो. ग्रहांचा परिणाम परस्परांच्या गतीवर आणि अंतरिक्ष किरणांच्या घटनेवर होत असतो असे आधुनिक शास्त्र सांगते. मग अशाच एका ग्रहावर—पृथ्वीवर—निर्माण झालेला जो मानवी जीव त्याच्यावर या ग्रहांचा परिणाम अप्रत्यक्ष रितीने होत असतो असे म्हटल्यास ते अविश्वसनीय का वाटावे ? आकाशस्थ ग्रह या दृष्टीने महत्त्वाचे का नसावेत ? त्यांच्या परस्पर संयोगास, वियोगास किंवा युतीस महत्व का नसावे ? ज्योतिष शास्त्र हेच सांगतें व आधुनिक विज्ञानशास्त्राच्या दृष्टीने हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. म्हणजेच पारंपारिक सनातनी आणि आधुनिक विज्ञानवादी या दोघांच्याही दृष्टीकोनातून ज्योतिषशास्त्र हे एक महत्त्वाचे शास्त्र आहे असे निश्चयपूर्वक म्हणता येते.

मानवी जीवनाच्या दृष्टीने विचार केला तर प्रत्येकाच्या जीवनांत असे काही क्षण उद्भवतात की त्यावेळी मनुष्य अंतर्मुख होऊन स्वतःच्या जीवनाचा तसेच सभोवतीच्या विश्वाचा विचार करू लागतो. अगदी सर्वसामान्य माणसाच्या जीवनाकडे दृष्टीक्षेप टाकला तरी दिसून येते कीं, प्रत्येक माणूस कधी-तरी आणि केव्हांतरी किंचित्सा अंतर्मुख बनतो. मग हा माणूस शेतकरी असेल, कामगार असेल किंवा मध्यमवर्गीय सुशिक्षितहि असेल. हा माणूस शेतकरी असेल तर सुगी संपून गेल्यावर उन्हाळचांत रिकाम-पणी त्याला देव देव सुचत असेल. पण देव देव तरी कशासाठी ? माझं भलं व्हावं म्हणूनच, तो माणूस कामगार असेल तर चहाचा घोट पिऊन, सिगारेटचा झुरका मारता मारता सिगारेटच्या धूम्रवलयांत भावी जीवनाची अनेक स्वप्ने तो पाहू लागेल आणि तो माणूस मध्यमवर्गीय सुशिक्षित असेल तर रिकाम्या वेळांत जीवनाविषयीच चिंतन हा त्याचा दैनिक कार्यक्रमातील एक अपरिहार्य किंवा अनाहूत भाग होऊन राहतो.

कदाचित् आपण विचाराल काहो, ही तीन प्रकारचीच माणसे आपण का गृहीत धरलीत् ? यावर माझे असे म्हणणे आहे की, सर्वसाधारणतः आजचे मानवी जीवन शेतकरी, मजूर आणि मध्यमवर्गीय बुद्धिजीवी अशा प्रकारांनी जगले जाते.

सूर्य, चंद्र उगवतात आणि मावळतात. या घटनेस केवळ भौगौलिक महत्व नसून त्याला विशीष्ट अर्थ आहे. सूर्य उगवताच या विश्वातल्या अनंत कारभाराला गति मिळते. उत्साह, आनंद, ईर्षा, महत्वाकांक्षा कांहीं सुप्त वासना जागृत होतात, स्वोन्नतिसाठीं मानवाची धडपड सुरु होते, कर्तृत्वशक्तीला धार चढते, सूर्य मावळताच, रात्र चढते आणि मानवाला वाटू लागते की जीवनकलहा-तील विकासवादातील एक घडी संपली, एक अंक संपला, एक पर्व संपले. जीवनकलहाने संत्रस्त झालेला मानवी जीव चंद्रोदयाबरोबर आपोआप विश्रांतिस्थानाकडे वळतो. दिवसभराची थकावट विश्रींती आणि प्रेम यांत बुडबू पाहतात. सूर्य मानवास पुढे पाऊल टाकण्यास उत्कर्ष शिखरावर नेण्यास प्रोत्साहन देतो तर चंद्र त्यास गति देतो, महत्वाकांक्षेला ममतेची मायेची सावली देतो.

या निशा सर्वभूतानाम। तस्या जागर्ति संयमी।
यस्या जाग्रती भूतानि। सा निशा पश्यतो मुने।

रात्रीची वेळ ही तप:साधनेची वेळ. रात्रीच्या वेळी मनुष्य आत्मकेंद्रित होतो; अंतर्मुख होतो. आकाशातील ग्रह नक्षत्राचे दर्शन घेऊन त्यांचे डोळे सुखावतात. तो विनम्र श्रद्धाशील बनतो. त्याचे हात नकळत जोडले जातात, भारावलेल्या मनाने तो प्रार्थना करतो.

"तमसो मा ज्योतिर्गमय" हे परमेश्वरा, मला अंधारातून प्रकाशाकडे ने– प्रकाश याचा अर्थ ज्ञान. प्रकाश नसेल तर सर्वत्र काळोखाचे साम्राज्य पसरेल म्हणजेच अज्ञान पसरेल. प्रकाश नाही म्हणजे ज्ञान नाही. केवळ डोळे आहेत म्हणून अंधारातदेखील मांजराप्रमाणे पाहू शकू असे कोणी म्हटले तर? प्रकाशाचें माध्यम असेल तरच डोळयाचा उपयोग– आणि चक्षु म्हणजे तरी काय? ज्ञान ग्रहण करण्याचे ते एक साधनच नव्हे काय?

सामान्य माणसाची दृष्टी संकुचित असते कारण आकाशस्थ ग्रहगोल त्याला दिसत असले तरी ते गोल म्हणजे विश्वशक्तीचे ज्ञान देणारे ते एक माध्यम आहे, याची त्यास कल्पना नसते. पण ज्याना या तेजोगोलाचा अथवा विश्वशक्तीचा अभ्यास करावयाचा असेल त्यांना ज्ञानसाधनेने ते शक्य होते. बायबलमध्ये 'सेंटल्यूक' या प्रकरणात सेंट जीझस हा आपल्या शिष्यांना म्हणतो Those who have eyes to see they alone will see those who have ears to hear they alone will hear" या वचनातील मर्म काय आहे? डोळे असूनदेखील कित्येकवेळा आपण आंधळयाप्रमाणे वागतो, व म्हणून जीवनाच्या वाटचालीत ठेचा लागून रक्तबंबाळ होतो. मग अशा असहाय्य अवस्थेत तो देवाकडे धाव घेतो नि प्रभूला विचारतो काय झाले हे? देव म्हणतो, "हे असेच होणार, कारण मी दिलेल्या डोळयांचा उपयोग करणे तुला साधले नाही."

या आजूबाजूच्या पसाऱ्यांत ज्या ज्या वस्तू माणसाच्या जीवनात आवश्यक दिसतात त्या त्या प्रत्येक वस्तूंत भावना व ज्ञान साठलेले आहे. मोटारीचेच उदाहरण घ्या, एक सुखावह साधन म्हणून मनुष्य मोटारीकडे पाहात असतो. म्हणजेच सुखाची भावना त्या मोटारीत लपलेली असते. तहानलेला माणूस पाण्याच्या घोटाने सुखी होतो. म्हणजे त्या घोटभर पाण्यानं मनुष्याचे सुख असते. एरवी घोटभर पाण्याकडे कुणी ढकून पहाणार नाही. म्हणजेच हवी वाटणाऱ्या वस्तूची पूर्तता म्हणजेच सुख. अप्राप्य किंवा अपेक्षित वस्तू मिळण्यासाठी जी धडपड करावी लागते त्या धडपडीतहि सुख आहे. मानवी जीवनावर दैन्य, अज्ञान यांचा पगडा अधिक असतो. अनेकदा अपयश सहन करावे लागते. ही अंधकारमय अवस्था दूर व्हावी, जीवनात सुखसमृद्धी, यश यांची वाढ व्हावी असे प्रत्येकास वाटते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात अर्थात सुखदु:खाचे प्रमाण अधिक असते.

प्रारब्ध, कर्म, संचित किंवा प्राक्तन ही अत्यंत बलवान अशी गोष्ट आहे. इंग्रजीत त्याला डेस्टिनी म्हणतात. विज्ञानशास्त्राचे १९५९ चे नोबेल पारितोषिक मिळविणारा पोलीश शास्त्रज्ञ डॉ. सिरिल म्हणतो 'विज्ञानाला आणि आधिभौतिकतेला सीमा आहे परंतु आध्यात्मिक शक्तीला कर्तृत्वाला सीमा नाही.'

पूर्वकर्मांस-प्रारब्धास नांव काहीहीं द्या मानवी जीवनाशी संबंधित असलेली ती एक कारणपरंपरा आहे असे मानल्याखेरीज गत्यंतर रहात नाही. मानवाच्या आयुष्यांत जे जे सुखदायक किंवा दु:खदायक प्रसंग येतात त्यांच्या पाठिशी एक पारंपारिक कारणमीमांसा असावी. त्या कारणपरंपरेचा शोध घेण्यासाठी भारतातील अनेक ऋषींनी तपश्चर्येचा मार्ग अवलंबिला. त्यांनी या मार्गानें ज्ञानसाधना केली. त्या ज्ञानसाधनेंतूनच जी शास्त्रें प्रगत होत गेली त्यापैकी ज्योतिष हे एक शास्त्र आहे. या शास्त्राचा अभ्यास केल्यास त्या शास्त्राचें ज्ञान प्राप्त होईल व त्या ज्ञानामुळें त्यांच्या शंकांचें आपोआपच निरसन होईल.

भविष्यकथनाच्या गूढ पद्धति !

ले. : शांताराम आठवले

भविष्याची प्रचिती –

भविष्य केवळ पत्रिकेवरून सांगता येते असे नाही. हातावरील रेषा पाहूनच वर्तविता येते असे नाही तर कित्येक भविष्यज्ञांच्या अंगी अशा काही उपजत दैवी शक्ती असतात की– केवळ मुद्रा पाहूनदेखील ते भविष्याचा पाढा अचूक वाचून दाखवितात. महाडकर नांवाचे एक ज्योतिषी महाराष्ट्रांत गेल्या पिढीत होऊन गेले. ते माणसाची नाडी पाहून किंवा त्याची जीभ पाहून भविष्य वर्तवीत, आणि ते इतके असे की अचूकत्यांना कर्णपिशाच्च वश आहे असा लोकांचा त्यांच्याबद्दल समज होऊन बसला होता. त्यांना ती शक्ती उपजत व दैवी होती. ते एक साधे कोर्टातले बेलिफ होते. लो. टिळकांचे भविष्य त्यांची नाडी पाहून त्यांनी वर्तविले होते व त्या महापुरुषाकडून शाबासकी मिळविली होती असे म्हणतात.

काही व्यक्तींना काचेच्या एखाद्या गोळ्यावर लक्ष केन्द्रित केल्याने भविष्यकथन साध्य होते. काशाची थाळी उभी करून तिच्यापुढे तुपाचा दिवा उजळून त्या थाळीत दिसणारे भविष्य सांगणाऱ्या काही वृद्ध स्त्रिया मी स्वतःच पहिल्या आहेत. पण सगळ्या प्रकारापेक्षा भविष्य सांगण्याचा एक वेगळाच प्रकार आहे. आणि त्यातील अचूकपणा पाहिला की, मन आश्चर्यात बुडून जाते. केवळ खेळण्याच्या पत्त्याच्या साहाय्याने भविष्य सांगणे हा तो प्रकार. या प्रकारात जिप्सी लोक प्रवीण असतात. पण एका वृद्ध जर्मन ज्योतिषीबाईंनी नमूद केलेला याबाबतचा एक अनुभव जितका वेगळा तितकाच गुंग करून सोडणारा आहे.

डॉ. गर्ज वॉल्टेर या स्वत: ज्योतिषी आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रातील प्रगतिबद्दल त्यांना अभिमान वाटतो. त्यांचे काही ज्योतिषविषयक लेख बंगलोर येथील "ॲस्ट्रॉलॉजिकल" या मासिकात प्रसिद्ध होतात. दुसऱ्या महायुद्धाचे अखेरीस चोहीकडे विध्वंस, अत्याचार आणि अस्वास्थ्य यांचे वातावरण पसरलेले होते. अशावेळी म्युनिचपासून दूर अशा एका खेड्यातून त्यांना दिवस घालवावे लागले. शहराशी दळण–वळण तुटलेले, कित्येक दिवसात वर्तमान पत्र देखील पहावयास मिळावयाचे नाही. अशा अवस्थेत त्यांचा काळ जात होता त्या मोकळ्या वेळात डॉ. गर्ज वॉल्टेर यांना घरबसल्या हा पत्त्यांच्या सहाय्याने भविष्य सांगण्याचा अनुभव मिळाला.

एका तालुक्याच्या गावी डॉ. गर्ज वाल्टेर यांचा मुक्काम त्यांच्या एका मैत्रिणीच्या घरी होता. तिचा नवरा म्यूनिच विद्यापीठात आचार्य होता तिच्या मुलींपैकी 'लिली' नांवाच्या २१ वर्षे वयाच्या धाकट्या मुलगीजवळ पत्ते पाहून भनिष्य सांगण्याची अद्भूत शक्ती होती. डॉ. गर्ज त्या कुटुंबात आश्रयाला आल्यावर बराचसा वेळ काय करावयाचे हा प्रश्न असे. अशा वेळी लिलीच्या अंगी असलेल्या या अद्भुत गुणाकडे त्यांचे लक्ष वेधले त्यांना पत्त्यांतील काही ज्ञान नव्हते. पण ज्योतिष व इतर गूढविद्या व शास्त्र याचे ज्ञान त्यांना होते. त्यांचा व लिलीचा सहयोग असा काही जमला की त्या दोघांनी मिळून पत्त्यावर भविष्य पहाण्याचे जे प्रयोग केले ते अपूर्व व अचूक ठरले आणि लिलिसारख्या एरवीं तुमच्या आमच्याप्रमाणेच असणाऱ्या एका साध्या–सामान्य मुलीच्या अंगी ही शक्ति, हे ज्ञान येते कुठून याचा उलगडा डॉ. गर्जा यांना करणे अशक्य झाले पण त्या काळातले आपले सारे प्रयोग त्यानीं नोंदवून ठेवले. लिलीने त्या काळात जी जी भविष्ये वर्तविली त्या प्रत्येकाची प्रचीती डॉ. गर्ज यांना अजमावता आली.

उपस्थित असलेल्या व्यक्तीच्या प्रश्नाचे पत्त्यांच्या सहाय्याने उत्तर देणे किंवा त्यांच्या भविष्यातील घटनांची सूचना करणे हा लिलीच्या हातचा मळ असे. पण डॉ. गर्ज यांच्या मनात उपस्थित नसलेल्या

व्यक्तिबद्दलच भविष्य पहावे असे आले. तसा प्रयत्न करण्याचे लिलीने त्यांना आश्वासन दिले त्या सुमारास त्या गावात एका तरुणाला झालेल्या अटकेमुळे खळबळ उडाली होती. वास्तविक डॉ. गर्ज यांचा त्या तरुणाशी परिचय नव्हता व त्याच्याविषयी सहानुभूति वाटण्याचे पण कारण नव्हते. तरीही एका तिऱ्हाईतावद्दल भविष्य पहाण्याची ती संधी साधावी असे त्यांना वाटले.

पत्ते पिसून भविष्य पहाण्याच्या तंत्राप्रमाणे डॉ. गर्ज यांनी एक पत्ता काढून त्या परक्या तरुणाबद्दलचा एक प्रश्न आपल्या मनांत धरला. लिलीने भविष्य कथन केले ते असे – " ज्या व्यक्तिचे भविष्य पहावयाचे आहे त्याच्यावर सध्या काहीतरी अचानक संकट आले आहे. पण त्याचे भाग्य मूळातच चांगले आहे. त्यामुळे या आंगतुक संकटातून तो सुटेल. ही सुटका होण्यास एका स्त्रीचे सहाय्य होईल. प्रवास आणि एका स्नेह्याचा पाठिंबा यामुळे त्याची आपत्ति दूर होईल." पुढे काही दिवसांनी डॉ. गर्ज यांना लिलीने एका अगदी अपरिचित अशा तरुणाबद्दल केलेल्या त्या भविष्यातील अक्षर न अक्षर खरे असल्याचा पुरावा मिळाला. ज्या तरुणाला अटक झाली होती त्या तरुणाचा एक युक्रेनियन वजनदार व्यापारी मित्र त्याच्या मदतीला धावला. त्या मित्राची पत्नी त्या तरुणावर मनांतून लोभ करीत होती. तिने त्या तरुणाच्या मूळ गांवी जाऊन खटपट करून त्याच्या-बद्दलच्या माहितीचे अधिकृत कागदपत्र पैदा केले आणि त्या या 'नॅशनल सोशालिस्ट' पक्षाशी कसलाहि संबंध नव्हता हे पुराव्याने शाबीत करून त्याला अटकेतून मुक्त करविले.

ही सगळी हकीगत समजल्यावर डॉ. गर्ज यांना कमालीचे आश्चर्य वाटले असल्यास नवल नाही पुढे लिलीच्या ठिकाणच्या दैवी शक्तीचा प्रत्यय वेग-वेगळ्या प्रकारे प्रयोग करून त्यांनी घेतला व ते सारे प्रयोग त्यांनी नोंदवून ठेवले. व्यक्तीचे भविष्य सांगता येते तसे एखाद्या स्थळाचेही येते का ते अजमावावे असे त्यांना वाटले आणि म्हणून त्यांचे आवडते पण लढा-ईने उध्वस्त केलेले म्युनिच शहर हाच त्यांनी आपल्या मनाशी प्रश्न विषय कायम केला. पत्ते पिसून त्यांनी म्युनिच शहराच्या भवितव्याच्या प्रश्नावर आपले लक्ष व मन केंद्रित केले. लिलीला प्रश्न कशाबद्दल आहे याची कल्पनाहि नव्हती. तिने भविष्य सांगण्यास आरंभ केला. ती म्हणाली, " एखाद्या जखमी सैनिकासारखे काहीतरी वाटते–भासते आहे. त्याच्याबद्दल उलट–सुलट अभिप्राय सध्या आहेत. सध्यांची स्थिति खात्रीने शोचनीय, अनेक आघातामुळे सध्याची अवस्था मृतवत पण त्याला कारण कसलातरी गैरसमज. पण हळू हळू स्थिती पालटेल, महत्व वाढेल. एखादी महत्त्वाची अनुकूल घटना घडेल. संकटातून हळूहळू वर येण्याची लक्षणे दिसतात. लोकांच्या आदराचा व प्रेमाचा हा विषय असेल' पण त्याची एखादी इच्छा मात्र अपुरीच रहाण्याचा योग दिसतो."

—– लिलीचे म्युनिच शहराबद्दलचे हे भविष्य किती अचूक होते हे सांगताना डॉ. गर्ज लिहितात–—

"युद्धानंतर म्युनिच शहराची हानि ही एखाद्या मृतवत सैनिकासारखीच होती. विद्यापीठें, धर्ममंदिरे कलाकेन्द्रे यांचे आगर असलेले हे संस्कृतिसंपन्न नगर हिटलरच्या राक्षसी अत्याचारांना बळी पडले होते. १९४३ साली काही विद्यार्थ्यांनी हिटलरविरुद्ध एक पत्रक प्रसिद्ध केले होते व त्याबद्दल पुढे त्यांना फाशी झाली होती. या प्रकाराचा पुसट उल्लेख या भविष्यात आढळतो." एखादी अपुरी राहणारी इच्छा कोणती याबद्दल खुलासा त्यांनी केला आहे. विस्तार भयास्तव मी तो वगळला आहे. आणि आज युद्धानंतर अनेक वर्षांनी म्यूनिचची स्थिति हळूहळू निश्चित सुधारते आहे. लिलीने रेखाटलेले चित्र अगदी हुबेहूब होते– आणि त्यांच्या प्रत्ययाने डॉ. गर्ज यांच्या मनात काही विशिष्ट व्यक्तीच्या ठिकाणी वास करणाऱ्या या अद्भूत दैवी शक्तीबद्दल जे विचार आले ते त्यांनी आपल्या लेखांतून प्रगट केले आहेत.

डॉ. गर्ज वॉल्टेर या स्वत: ज्योतिषी आहेतच, पण युद्धकाळातील आपत्तीहि त्यांनी आपले संशोधनाचे काम चालूच ठेवले व एका वेगळयाच गूढ शाखेवर प्रत्यक्ष प्रयोग करून त्यांनी झगझगीत प्रकाशझोत टाकला हा त्यांचा मोठेपणा प्रशंसनीय !

––०––

हातावरील विशिष्ट चिन्हे

लेखक : श्रीकृष्ण अ. जकातदार

प्रत्येक व्यक्तिमात्राच्या करतलावर जन्मतःच ठराविक रेषा व काही चिन्हे दृष्टीस पडतात. परमेश्वर निर्मित तारे व ग्रह यांचा परिणाम चराचर वस्तूवर होत असतो व तो परिणाम आपणास 'ज्योतिष' शास्त्राच्या द्वारे कळू शकतो. त्याचप्रमाणे हातावरील रेषा व चिन्हे यांच्याद्वारे मनुष्याच्या जीवनातील घडामोडीची अटकळ बांधता येते.

सामुद्रिकशास्त्राचा अर्थ पाहू गेल्यास तो 'सामुद्र अंगलक्षणम्' म्हणजे 'शरीर लक्षण विद्या' असा होतो. पण ज्यामध्ये केवळ हाताचा (रेषा–चिन्हे आकार) विचार केला जातो त्यास हस्तसामुद्रिक म्हणतात. हातावरील काही रेषा प्रथम प्रतीच्या असून काही दुय्यम स्वरुपाच्या असतात. जन्मतःच व्यक्तीच्या हातावर २–५ प्रथम प्रतीच्या रेषा असणे योग्य होय. आयुरेषा, मस्तकरेषा, धनरेषा अंतःकरण रेषा, विद्या, रेषा, आरोग्यरेषा, अंतर्ज्ञानरेषा व विवाहरेषा या रेषा प्रथम प्रतीच्या मानण्यात येतात. या रेषा जन्मतः हातावर असल्यास पुढे यामध्ये फारसा बदल होत नाही. पण शुक्रकंकण, गुरुवलय संतानरेषा इ. दुय्यम स्वरूपाच्या रेषा हातावर २५ वर्षानंतर दृष्टीस पडतात हातावर या रेषा ठराविक घडामोडीचे वेळी निर्माण होतात व कालांतराने त्यांचे कार्य संपताच नष्टहि होतात.

या लेखामध्ये केवळ हातावरील प्रमुख चिन्हांचीच चर्चा करण्याचा माझा विचार आहे वस्तुतः सामुद्रिक, शास्त्रामध्ये स्त्रीचा डावा, व पुरुषाचा उजवा हात पहाण्याची पौर्वात्य पद्धति आहे. 'वामहस्ते तु नारीणां, पुरुषाणामं च दक्षिणे । चिन्हं निरुपयोद्धीमान समुद्र वचनं यथा । असा विचार आपल्या पूर्वाचार्यांनी व्यक्त केला आहे. पाश्चात्य देशात मात्र असा भेद मानीत नाहीत सध्याच्या समान हक्काच्या युगात असा भेद मानणेही व्यर्थ आहे कारण सध्याची 'स्त्री' बऱ्याच प्रमाणात स्वतंत्र स्वावलंबी झाली आहे तेव्हा डावा व उजवा दोन्ही हात पाहून फलादेशाचा निर्णय करणें योग्य होईल. दोन्ही हातावरील रेषा व चिन्हे सारखी असल्यास फलादेश निश्चित समजावा मात्र एकच चिन्ह स्त्रीस व पुरुषास भिन्न भिन्न फल देणारे असू शकते

शंख, चक्र, शुक्ति, त्रिकोण, चतुष्कोण, फुली, यव, बिंदू, मत्स्य ही हातावरील प्रमुख चिन्हे असून ती सामान्य प्राणीमात्राच्या हातावर आढळतात. याउलट कमल, ध्वज, मंदिर, कुण्ड, पालखी, पर्वत इ. चिन्हे केवळ राजघराण्यांतील, असामान्य, विद्वान अथवा जगद्विख्यात पुरुषाच्या हातावर दृष्टीस पडतात. अशा असामान्य मनुष्याचा हात सुकुमार असून त्यावर अन्य वाकडया तिकडया रेषाहि आढळत नाहीत पण जगात अशा व्यक्ति विरळाच ! म्हणून सामान्य हातावर आढळणाऱ्या चिन्हांचाच विचार करणे योग्य होईल.

पौर्वात्य व पाश्चात्य पद्धतीत या चिन्हांच्या फलादेशामध्ये पूर्ण साम्य आढळते.

हातावर चतुष्कोण चिन्ह बऱ्याच वेळा दृष्टीस पडते. हे चिन्ह हस्ततलावर असणे शुभसूचक अथवा संरक्षक समजतात. हातावर कोठेहि चौकोन चिन्ह असल्यास ते त्या मनुष्याचे संकटापासून निवारण करते उदा.— हातावरील शनि टेकडीवरील नक्षत्रचिन्ह हे अशुभ असून ते सर्पदंश, अपघात, आकस्मिक मृत्यू यांचे सूचक असते. पण याचवेळी गुरु टेकडीवर चतुष्कोणाकृति चिन्ह असल्यास व्यक्तीचे संकटापासून संरक्षण होते.

पाश्चिमात्यांनीहि या चौकोन चिन्हास Mark of Preservation असे संबोधिले आहे.

त्रिकोणचिन्ह दोन्ही पद्धतींत शुभसूचक मानतात. ते शुभफलाची वृद्धी करणारे असून अशी व्यक्ति ज्ञानपिपासू असून त्यामुळे मनुष्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जातो. हे चिन्ह ज्या ग्रह उंचवटयावर असेल त्या ग्रहाच्या गुणधर्मानुसार मनुष्यास त्या विशिष्ट विद्येच्या प्राप्तीची लालसा असते.

हातावर अनेकदा मत्स्याकार दृष्टीस पडतो. हे चिन्ह व्यापार–धंद्यातील यश व सांसारिक सौख्य यांचे दर्शक असून आर्थिक स्वास्थ्याचे द्योतक समजावे.

हातावर दोन रेषांच्या छेदनामुळे फुलीचिन्ह (क्रॉस) तयार होते. हातावर गुरुटेकडीवरील फुलीचिन्ह सोडल्यास ते अन्यत्र अशुभ फलदायी समजावे. ज्या ग्रह पर्वतावर हे फुलीचिन्ह असेल त्या ग्रहाच्या गुणधर्मानुसार मनुष्यास त्या गोष्टीपासून त्रास होतो. उदा– शुक्रटेकडीवर फुली चिन्ह असता प्रेमसंबंधांत अपयश दर्शविते व तेच चिन्ह चंद्र टेकडीवर असल्यास पाण्यापासून भय असते व हेच मंगळ टेकडीवर असल्यास मनुष्य आत्मघातास प्रवृत्त होतो. पण गुरु पर्वतावर फुलीचिन्ह असता ते विवाहसूचक असून त्या मनुष्याचा श्रीमंत घराण्यांतील मुलीशी विवाह होतो.

नक्षत्र अथवा तारकाचिन्ह हेही अशुभ असून भावी आपत्तीचे सूचक असते पण पाश्चात्य पद्धतींत हे शुभ मानतात.

करतलावर कोठेहि यवचिन्ह उभे असल्यास ते अशुभ असून आडवे यवचिन्ह शुभ होय. दोन वक्ररेषामुळे निर्माण होणाऱ्या लांबट पोकळीस यव म्हणतात. आंगठा व बोटे यांच्या पेऱ्यांच्या संधीवर असणारे आडवे यवचिन्ह शुभ व सुस्थितीचें द्योतक असून रेषेवरील उभे यवचिन्ह भावी आपत्तीचे सूचक असते. धनरेषेवर यवचिन्ह असता त्या वयोमानाच्या सुमारास द्रव्यनाश अथवा मानहानीचा प्रसंग येतो, तर विवाह-रेषेवर हे चिन्ह असल्यास पतीपत्नीतील वियोग अथवा विरोध यांचे सूचक असते.

वर्तुळ, बिन्दु अथवा जाळी ही चिन्हे हातावर असणेंहि अनिष्ट फलदायी असून फक्त सुर्यटेकडीवरील (अनामिकेच्या मुळाशी असलेली) वर्तुळ चिन्ह हे हरकामांतील सुयश दर्शविणारे असते. हातावर अन्यत्र कोठेहि किंवा रेषेवर असणारे बिन्दु चिन्ह हे फलाचा नाश करणारे असून दुःख आणि संकट सूचित करते. तसेच हातावर आडव्या तिडव्या रेषांच्या योगाने जी जाळी तयार होते तीहि मानसिक अस्वास्थ्य मेंदूचा विकार आणि दारिद्र्याची सूचक असते.

या चिन्हाखेरीज हाताच्या बोटांच्या अग्रपेऱ्यावर शंख, चक्र, शुक्ती ही चिन्हे असतात. शंख–चक्र हे वामावर्त व दक्षिणावर्त असे दोन प्रकारचे असून त्यांच्या संख्येनुसार त्याचे भिन्न भिन्न फळ मिळते. उदा०– नऊ बोटांच्या अग्रावरील चक्र चिन्ह असणे चक्रवर्ती राजाचे लक्षण असून चार बोटावरील शंखचिन्हे सत्प्रवृत्ति व सदाचरण दर्शवितात. शुक्तीचिन्ह सदैव शुभफलदायी असून त्यांच्या वाढत्या प्रमाणात श्रेष्ठ फल मिळते.

महारथी कर्ण....दैव....आणि पराक्रम

एक मुक्त चिंतन

❀ लेखक-दत्तात्रय शं. जोशी बी. ए. (स्पेशल)

दैवायत्तं कुले जन्म । मदायत्तं तु पौरुषम् ।

महाभारतातील महारथी कर्णाच्या तोंडचे हे वाक्य "ज्योतिष-बितीश कुछ नही... सबकुछ झूट है" पंथाचे लोक आपल्या म्हणण्याच्या पुरस्कारार्थ नेहमी आपल्या विरोधकांच्या तोंडावर फेकीत असतात. क्षणभर महारथी कर्णाचे अलौकिक आयुष्य ऐकणाऱ्याच्या डोळ्यापुढून विजेसारखे लख्कन चकाकून जाते. तो अवाक् होतो. आणि "जितं मया" च्या आविर्भावांत वाद करणाराहि निघून जातो.

महारथी कर्णाच्या पराक्रमाबद्दल किंवा त्याच्या व्यक्तिमत्वाच्या उंचीबद्दल वाद नाही. पण तरीहि प्रश्न असा पडतो की, महारथी कर्णाचा दावा सर्वस्वी खरा आहे काय ?

पराक्रमाची किंवा पौरुषाची, इतकी स्वयंभू, संदर्भरहित आणि केवळ विशिष्ट व्यक्तीच्या आधीन असू शकते काय ? तिचा त्याच्या कुलाशी, ज्या परिस्थितीत तो वाढला त्या परिस्थितीशी किंवा ज्या परिस्थितीविरुद्ध तो संग्राम देण्यास उभा ठाकलेला असतो त्या परिस्थितीशी तिचा .. या पौरुष गाजविण्याच्या ऊर्मिचा कांहीच का संबंध नाही ? प्रस्तुत लेखकाचा असा दावा आहे की, या सर्वांचा घनिष्ट संबंध असतो. तो तसा असतो हे ज्योतिषशास्त्राच्याच अध्ययनाने स्पष्ट होऊ शकते. पण तत्पूर्वी काही सामान्य सृष्टीनियमांच्या आधारे असा संबंध असतो हे मी प्रथम दाखवून देणार आहे. नंतर ज्योतिषशास्त्रीय विवेचनाचा प्रपंच करू या.

(१) विश्वाची नियमितता-

विश्व हीच मुळी एक नियमबद्ध कार्यकारणभावयुक्त प्रचंड यंत्रणा आहे. येथे संदर्भरहित, अतीतशून्य काहीहि नाही. कळीचे फूल व्हावे त्याप्रमाणे येथे भूतांतून वर्तमान आणि भविष्य विकसते. त्यामुळे भूताच्या आधारे वर्तमान आणि भविष्याविषयी साधारण अंदाज बांधणे या बौद्धिक प्रक्रियेत काहीहि अशास्त्रीय नाही. म्हणून फलज्योतिष ही प्रामुख्याने एक बौद्धिक प्रक्रिया आहे मानवी आयुष्यहि या नियमाला अपवाद नाहीं. कारण ज्या विराट विश्वाचें मानवी आयुष्य एक घटक आहे त्या विश्वाचें आकलन जर विशिष्ट बौद्धिक प्रक्रियेद्वारा होऊ शकते तर मानवी आयुष्य या नियमाला अपवाद कसें असू शकेल ? फलज्योतिषाला असलेले हे शास्त्रीय अधिष्ठान अभ्यासूनीं वा जिज्ञासूंनीं आवर्जून लक्षांत घेतलें पाहिजे. तरच फलज्योतिषाच्या आधारे मानवी आयुष्यांतील प्रेरणांचा उलगडा होऊ शकेल.

आता आपण आपल्या मूळ विषयाकडे म्हणजे पौरूषाच्या उर्मीमागील प्रेरणेकडे वळू या. पौरूष गाजविण्याची उर्मि ही केवळ मानवायत्त आहे काय ? नाहीं . ती तशी नाही. तिला अतीताचा कांही विशिष्ट परिस्थितीचा निश्चित आधार असतोच. तो तसा नसता तर घरोघरी ज्यूलियस सीझर, नेपोलियन, शिवाजी, शिकंदर, शंकराचार्य, आइस्टिन निर्माण झाले असते पण ते तसे होत नाहींत. प्रबळ अिच्छा असूनहि होत नाहींत. याचाच अर्थ असा की, पौरूषाची प्रबळ प्रेरणा असलेली संतति उत्पन्न होणे ही गोष्टी मानवाधीन नाही. ती गोष्ट आहे दैवाधीन !

वर उल्लेखीलेल्या युगपुरूषांची गोष्ट तर बाजूलाच राहू द्या. दैनंदिन सामान्य आयुष्यांत प्रतिष्ठा पांवलेल्या डॉक्टर, इंजिनियर, लष्करी अधिकारी इच्छेप्रमाणे जन्माला घालणे वा जन्माला आलेल्या बालकाची तशी करिअर बनविणेहि मानवाच्या हातची गोष्ट नाही. डॉक्टर व्हावे अशी ज्याबद्दलची अपेक्षा तो मुलगा डिप्लोमाला जातो. इंजिनिअर व्हावे असा ज्याच्याबद्दल पालकांचा मानस तो मास्तरकी करतो. आणि अपेक्षित लष्करी अधिकारी होतो.

"म्युनिसिपालिटींतील नाकेकारकून ज्यांच्याकडून कांही भव्य दिव्य घडावे अशी अपेक्षा ते बसतात पाटचा टाकत ८५–५–१३० च्या, मानवी आयुष्याची ही शोकांतिका आहे खरीच. पण ही गोष्ट मानवाधीन नाही ती आहे दैवाधीन. एवढेच नव्हे तर असामान्य अलौकिक महापुरुषाची संततीहि अलौकिक...असामान्य निपजेल असे नाही. जर पौरुषाची प्रेरणा ही केवळ मानवाधीन गोष्ट असती तर ही प्रेरणा एका पिढीतून तिसऱ्या पिढीत जशीच्या तशी निदान काही प्रमाणांत संक्रामित नसती का करता आली? पण ती तशी संक्रामित करता येत नाही. कारण ही प्रेरणा आहे दैवाधीन. महापुरुषांच्या विशिष्ट दैवामुळे त्यांना पराक्रम गाजविण्याच्या हृचा स्फूर्तीची देणगी मिळाली. ती त्यांच्या बालकाचे दैव भिन्न असल्यास त्यांना कशी मिळणार? मोठ्या माणसांच्या पोटी जन्माला येणें एवढेंच त्यांचे भाग्य. त्यांच्या पराक्रमाच्या स्फूर्तिवर केवळ एवढ्या अधिकारावर ते आपला वारसा सांगू शकतीलच असे नाही.

मानवी विकासाच्या पातळ्या भिन्न-भिन्न असतात, व्यक्तिमत्वाच्या कोठल्या उंचीवरती मानव उभा आहे त्याची विकासक्षमता किती हे ठरविण्यचे गमक म्हणजे मानवाची कुंडली वा त्याचा हात.

हृयाच्या आधारावर मानवाच्या विकासाची अटकळ बांधून तदनुरूप योजना आंखली पाहिजे नपेक्षा अपेक्षाभंगाचे दु:ख ठरलेलेंच.

बेडूक कितीहि फुगला तरी बैल बनू शकत नाही अशी एक म्हण आहे. जन्माला आलेली व्यक्ति बेडूक आहे का बैल आहे. त्याची फुगण्याची क्षमता किती हे ज्योतिषशास्त्र सांगते त्याचा फायदा आवर्जून घ्यावा. नपेक्षा कृत्रिमरितीने फुगविण्याच्या नादांत बिचारा बेडूक फुकट उरी फुटून मरायचा आणि "स्वप्नांतला बैल." स्वप्नांतच राहून "तेलहि गेले...तूपहि गेले आणि हाती धुपाटणे राहिले." अशी शोचनीय अवस्था व्हावयाची. प्रस्तुतचे युग हे संघर्षाचे तसेंच वैशिष्टचाचें आहे. यात टिकाव धरावयाचा असेल तर मानवी आयुष्याचे शास्त्रशुद्ध नियोजन केले पाहिजे. नाहीतर साधनसंपत्तिचा विनाकारण अपव्यय होऊन अपयश हाती येईल. मानवी विकासक्रमाच्या या नियोजनाचा मूलभूत पाया म्हणजे ज्योतिषशास्त्र. जगांतील प्रत्येक गोष्टीला मर्यादा असतात, तशा त्या मर्यादा मानवी कर्तृत्वालाहि आहेत. या मर्यादा ओळखणे हाच सूज्ञपणाचा-बुद्धिवादाचा मार्ग आहे. यात काही लोक समजताता तसा पलायनवाद वा पळपुटा दैववाद नाही.

आर्थिक नियोजन करताना जर राष्ट्राच्या साधनसंपत्तिच्या मर्यादा लक्षांत घेणे अशास्त्रीय ठरत नाही तर मानवी आयुष्याच्या विकासाच्या नियोजनाची रुपरेषा ठरविताना त्याच्या मूलभूत भांडवलाची, निसर्गदत्त साधनसंपत्तीची मर्यादा लक्षांत घेणे अशास्त्रीय कसे? आमच्यांतील तथाकथित बुद्धिवाद्यांनी वरील म्हणण्याचा जरूर विचार करावा.

प्रस्तुत लेखाची सुरवात महारथी कर्णाच्या उद्गारापासून झालेली आहे. तेव्हा महाराथी कर्णाच्या आयुष्याबद्दल एक धांवता विचार मांडून त्याचा समारोप करणे उचित ठरेल. महारथी कर्णाची आई कुंती. रविपासून झालेल्या उत्पत्तीची कथा आणि जन्मजात कवचकुंडलाच्या प्राप्तीबद्दलचा उल्लेख आपण अविश्वसनीय दंतकथा म्हणून सोडून देऊ या. पण कुंतीची दुर्धर्ष वृत्ति लक्षांत घेतली म्हणजे कर्णाच्या तेजस्वी वृत्तीचा बरोबर शास्त्रशुद्ध छडा लागतो. आपल्या आईच्या या तेजस्वी मनोवृत्तीचा वारसा... प्रतिकूल परिस्थितीशी टक्कर देण्याची त्याची मनोवृत्ती; स्वत:च्या व्यक्तिमत्वाच्या उंचीबद्दल यथातथ्य कल्पना, आणि त्यातून उत्पन्न होणारा ज्वलंत पण यथातथ्य अभिमान, महारथी कर्णाला जसाच्या तसा प्राप्त झाला होता. हा वारसा ही कर्णाची दत्तक माता राधा व दत्तक पिता अधिरथ यांची देणगी नव्हे. क्षत्राणी कुंतीच्या पोटी झालेला जन्म म्हणजेच दैवलीलेने प्राप्त झालेला क्षत्रिय वृत्तीचा

वारसा हाहि एक प्रमुख आणि प्रबळ घटक कर्णाच्या युयुत्सु वृत्तीमागे होता.

ही गोष्ट नाकारता येण्यासारखी नाही. वा दुर्लक्षिताहि येणार नाही. बिचारा कर्ण ! ज्या दैवाने त्याला कुंतीसारख्या तेजस्वी मातेचा आणि तिच्या क्षात्र मनोवृत्तीचा वारसा दिला. त्याच दैवाच्या क्रूर लीलेने त्याच वारश्याच्या अधिकृत आणि समाजमान्य प्राप्तीचा त्याचा रास्त अधिकार मात्र त्याच्यापासून हिरावून घेतला.

दैवाची लीला विचित्र असते म्हणतात ती ही अशी. जे दैव एका हाताने देते तेच दैव दुसऱ्या हाताने काढून घेते. दैवाचा हा खेळ क्रूर असेल. विचित्रहि पण असेल. पण तो आहे आणि अटळ आहे ही गोष्ट निश्चित.

हा खेळ लक्षांत घेऊनच मानवी कर्तृत्वाचा खेळ खेळला गेला पाहिजे. तरच त्यात यश येईल. Luck is a factor definately to reckon with हाच महाभारताचा संदेश आहे.

म्हणून कर्णाची कथा आणि त्याचे वरील उद्गार हे दैव आणि ज्योतिषशास्त्र यावरील विश्वास दृढमलच करतात.

तथाकथित "पराक्रमवादी" त्याचा उपयोग "चुकीचा पुरावा" म्हणून करतात. त्यांनी तो तसा करू नये ही प्रार्थना. वर काही परिच्छेदांत उल्लेखिलेल्या मर्यादांची "पंचतंत्र" या विश्वविख्यात ग्रंथाच्या कर्त्या विष्णुशर्म्याला जाणीव होती. म्हणून त्याने आपल्या ग्रंथांतील सिंहीणीच्या रूपाने इशारा दिला आहे.

"शूरोऽसि: कृतविद्योऽसि । निश्चयोऽसि पुत्रक ।
यास्मिन्नकुले त्वमुत्पन्नो गजस्तत्र न हन्यते ।

शुभं भवतु

० ० ०

कालिदासाची ज्योतिषदृष्टि : एक संदर्भ

लेखक— दत्तू गोरे


भारतीय साहित्याच्या प्राचीन–अर्वाचिन विशाल वाङ्मयीनन नेत्रदिपक कलाकृतीमध्ये महाकवि कुलगुरु कालिदासाचे साहित्य अग्रगण्य आहे. ही गोष्ट निर्विवाद होय. काव्य नाटकादि आपल्या सुंदर प्रसन्न आणि श्रेष्ठ अशा विविधरूप साहित्यात अनेक विषयप्रकार त्याने लीलया हाताळलेले आहेत. ते सारेच अवीट माधुर्याने रसरसलेलें असून उभ्या जगाला त्यामुळे या श्रेष्ठ महाकवीबद्दल नेहमीच हेवा वाटतो. गटे या जर्मन कवीने कालिदासाबद्दल दाखविलेली प्रीति या दृष्टीने लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

महाकवि कालिदासाने भारतीय संस्कृत साहित्यांत जी अजोड आणि चिरंतन स्वरूपाची भर घातली आहे. त्यामुळे तो आज कैकवर्षाच्या काळानंतरहि नित्यनूतन असाच भासतो. कालिदासाच्या विविध साहित्यात आदि महाकाव्य म्हणून रघुवंश कृतीकडे पहावे लागेल. त्यात त्याने केलेले सूर्यकुलाचे वर्णन आहे ते विशेष असेच आहे. रघुवंशांतील प्रसन्न आणि सुंदर महाकाव्यात ज्योतिषविषयक दृष्टि मुद्दाम लक्षांत घेण्यासारखी आहे. काव्य–नाटकाबरोबर कालिदासाने रघुकुलाचे केले ज्योतिष निर्देशक श्लोकरचना आजच्या ज्योतिषविषय अभ्यासकास विचार करावयास लावणारी आहे. रघुवंशातील दिलीपराजाचा पुत्र रघुराजा यांचे जन्मकालीन प्रसंगानुसार कालिदासाने लिहून ठेवलेल्या पुढील श्लोकात त्याचा ज्योतिषदृष्टीचा प्रत्यय येतो. त्याचा विचार केला गेला तर त्यासंदर्भात नवीन माहितीवर प्रकाश पडू शकेल असे वाटते. कालिदासाच्या ज्योतिषज्ञानाची किमयाहि सहज स्पष्ट होऊ शकेल. रघुवंशांतील त्या श्लोकपंक्ति अशा—

ग्रहैस्नत: पञ्चभिरूच्चसंश्रयैरसूर्यगै:
सूचित भाग्य सम्पदम् ।
असूत पुत्रं समये शचीसमा त्रिसाधनाशक्ति
रिवार्थक्षयम् ।।

(अर्थात्–सूर्यसान्निध्यांत न येता पाच ग्रह बली उच्चस्थानी जेव्हा आले तेव्हा इंद्रासमान तुल्य अशी सुदक्षिणेतील त्रिसाधना शक्ती एका तेजस्वी अशा पुत्ररत्नाला निर्मिती झाली —(पुत्ररत्न निर्माण झाले !)

येथे ' असूर्यगै। ' म्हटले आहे. म्हणजे सूर्यापासून दूरच आहेत तोपर्यंत! कारण सूर्याच्या प्रखर किरणाच्या योगाने इतर ग्रह अस्तास गेलेले दिसतात. (म्हणजे दिसू शकत नाहीत !) येथे याचसाठीं ' असूर्यगै: ' असे जे म्हटले ते यासाठीच. म्हणूनच ' असूर्य गै: चा अर्थ दीप्ताशंकाशी जोडला आहे. किंवा त्यावरून घेतला गेला आहे. या सर्वसाधारण निवेदनातून रघुकुलवंशप्रवर्तक राजा–रघू याची जन्मकुंडली सादर करण्यात आली आहे–



१– येथे ' कर्केन्द्रिज्ययुतोऽर्थ्ये .. इत्यादिवरून कर्क लग्नही उचित मानले गेले आहे.

२– सूर्य उच्च स्थानी आहे कारण की दैदिप्यमान सूर्यप्रभेमध्ये मेषराशीच्या मध्यान्हीच्या वेळी रघुराजा जन्माला आला.

३– येथवर यावरून त्याचा जन्म मध्यान्हकालातच झाला हे निश्चित मानायला हरकत नाही. जर रघु-वंशाचा सूर्य उच्च स्थानी नसता तर, तो (रघुवंश) सूर्यवंशी म्हणून पुढे आला नसता.

४– मेष राशीचा सूर्य वशाखात येत असतो. यावरून रघुवंशाचा जन्म वैशाखातील आहे हे उघड आहे. येथे शुक्ल पक्ष द्वितीया अगर तृतीया सन्निध आहे.

५– ' राजानौ रविशीतग् 'रवि तथा चंद्र राजा आहे म्हणून ज्याचा रवि उच्च स्थानी राहील (असेल) तेव्हा राजयोग संभवतो ही गोष्ट ज्योतिषदृष्टचा निर्विवाद होते.

६– येथे मंगलभाव सप्तम आहे. ज्याचे मंगल स्त्री (सप्तम) सप्तमात असते तो सहसा कधी स्त्रीवश होत नाही. रघुराजा स्त्रीशी सहसा कधी स्त्रीवश जो होऊ शकला नाही. त्याचे कारण या ठिकाणी स्पष्ट आहे. आणि तो नेहमीच कर्तव्यपालनाचे मागे असलेला दिसून येतो.

(७)– येथे सूर्य बुध राशीत प्रवेश केलेला आहे. त्यामुळे बुध अस्तंगत झालेला दिसून येतो व एक प्रकारे दोष राहतो. परंतु ही स्थिति कालान्तराने बदलते. एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश होत असताना मधली स्थिति दोषास्पद राहाते पण पुढे ही बाब कमी होऊं लागते. दोष नष्ट होण्याच्या मार्गाला लागतो.

(८)– मेष राशिगत कालात सूर्य उत्तरायणाकडे झुक लागत असल्याने उत्तरायणाची सुरवात (जन्म) होत असते. म्हणजे उत्तरायणाचा जन्म होत असतो.

आजपर्यंतच्या सालानुसार विचार करता कोणी कवि व्यक्ति अगर राज्य याचे संदर्भात कालनिर्णयाबाबत आज नवीन नवीन इतिहास अभ्यास व संशोधन साधनाचा पसारा वाढता आहे नवे नवे सिद्धान्त. विचार पुढे येत आहेत. शोधशक्तिही वाढती आहे. याच अनुषंगाने विचाराने जर पाहिले तर महाकवी कुलगुरु कालिदासाच्या विश्वविख्याती श्रेष्ठत्वाबरोबर त्याच्या जन्म कालच्या निश्चितीचा निर्णय अद्याप निश्चितपणे पुढे येऊ शकलेला नाही हे लक्षांत ठेवले पाहिजे.

ज्योतिषशास्त्राची विशिष्टता व विशेषता पहाता असे. म्हणावे लागते की, थोड्या फार कालाच्या स्थितीचा ओझरता असा निश्चित मेळ किंवा निर्णय उल्लेखनीय असला म्हणजे गणितशास्त्राने व ग्रहस्थितीने ठराविक अमुक अवस्थेत होती ह्याचे अनुमान बांधता येते. येथे कालिदासाच्या रघुवंशातील ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीचा संदर्भ श्लोकात दाखविला आहे. कालिदासाच्या अन्य ग्रंथकृतीमधून ग्रहस्थितीचा जो उल्लेख असेल तोही पुढे येत असेल तर तज्ज्ञ अभ्यासूंनी दाखवून द्यावा, त्यानुसार आपणास आणखी याबाबत अनेक गोष्टींचा मागोवा मिळू शकेल. असे निश्चित वाटते.

रघुवंशात कालिदासाने रघुराजाच्या जन्मकालानुसार मांडलेल्या कुंडली ग्रहमानाच्या अनुषंगाने जे काही विचार प्रस्तुत केले आहेत ते येथे दिलेच आहेत. त्यावर जाणकारांनी अधिक प्रकाश टाकावा. आणि कालिदासाच्या ज्योतिषविषयक ज्ञानाची अधिक ओळख जिज्ञासू जगास करून द्यावी.

हातावरून कुंडली मांडता येईल कां ?

लेखक--य. श्री. गोसावी B. Sc.

प्रत्येक मनुष्य आशावादी असतो आणि मग तो कोणीहि असो. त्याला नेहमी वाटत असते की, माझ्या आयुष्यांत सुखाचे क्षण केव्हा येतील. माझी इच्छा तृप्ति होईल कां आणि मी किती काल जगणार आहे आणि साहजिकच जो भविष्य ज्ञान सांगत असतो त्याच्याकडे प्रत्येक जणाची ओढ लागत असते.

भविष्य सांगणारे लोक निरनिराळ्या साधनाचा उपयोग करून घेतात. कोणी जन्मतारीख व वेळ यावरून कुंडलीं मांडून ज्योतिष–भविष्य सांगतात, तर कोणी हाताचे रेषांवरून वर्तवितात. कोणी चेहरेपट्टीवरील रेषांचा अभ्यास करून सांगतात तर कोणी पायावरील रेषा पाहून सांगतात, कोणी सही करावयास सांगून सहयांतील खोचक कडावरून कालमापन करून सांगतात. तर कोणी जन्मतारखेतील आंकडयांची बेरीज करून जो आकडा येईल त्यातरून कुंडली मांडून सांगतात. तर मनांत कोणता तरी आंकडा धरावयास सांगून त्यावरून भविष्य वर्तवितात. हे भविष्य वर्तविण्याचे निरनिराळे प्रकार आहेत त्याचा उपयोग करतात. आणि हे सर्व थोतांड आहे असे मानणारे बरेचसे लोक आहेत. याला कारण एकच आहे आणि ते म्हणजे भूतकाळाविषयी अचूक कालमापनाविषयी तो तितकासा उत्सुक नसतो पण भविष्यकाळातील प्रत्येक घटनाविषयी व भविष्यवादी जी वेळ सांगत असतो त्यासंबंधी तो जागृत दृष्टीनं पाहत असतो वाट बघत असतो व त्यावेळी ती घटना घडली नाही की त्याचा भविष्यवाद्यावरील विश्वास उडत असतो. व त्याचे पलिकडे जाऊन तो ज्योतिष हे सबझूट आहे असे मानू लागतो. मलाहि १९३७ साली बी. एस्सी क्लासमध्ये बडोद्यास असताना ज्योतिष हे थोतांड आहे असं वाटत होते पण आज हातपायावरून कुंडली मांडता येते. असे वाटू लागले व ज्योतिषशास्त्राचे योग व कालमापन पद्धतीचे मार्गाचा हातावरील कुंडलीवर उपयोग करून भूत, वर्तमान व भविष्यांतील घटनांचे स्थूल स्वरूप तर्कशास्त्र पद्धतीचाहि अवलंब करून सांगता येते असा अनुभव येतो व त्यांत खूप संशोधनासहि वाव आहे असे वाटू लागते.

हातावरून कुंडली मांडता येते का ? १९४० साली माझी बदली जबलपूरला झाली असता सहज माझे मित्र बापट यांचेकडे एक चिरोचे हस्तसामुद्रिकाचे छोटेसे पुस्तक पडले होते व ते वाचू लागलें असता इतर मुलांनी ते पाहिल्यावर माझेपुढे हात धरू लागले. अर्थात मला हात पहाता येत नाही असें सांगितले तरी त्यांना खरं वाटेना व शेवटी चिरोचे पुस्तक वाचून काही गोष्टी सर्वसामान्य भविष्य सांगितले ते खरें ठरले. पण मला घटनांचे स्वरूप सांगता येईना. नंतर चिरोची सर्व पुस्तके वाचली पण माझे समाधान होईना. चिरोनी रेषांवर बरेचसे संशोधन करून लिहिले. पण एक दिवस जबलपूर येथील वैद्य परांजपे यांचे पत्नीविषयी विचारले. पती-पत्नी दोघेहि म्हातारे होते. मी पत्नीविषयक हातावरील रेषा पहातो आहे असे पाहिल्याबरोबर आणि दोन रेषावरून दोन बायका असाव्यात असे सांगण्याचे मनांत येताक्षणीच त्यांनी सांगितले, मला माझे वीस वर्षे वयापासून एकच पत्नी आहे. आणि दुसरे कसलेहि व्यसन नाही. अर्थात रेषावरून भविष्य सांगण्याविषयी साशंकता निर्माण केली. बेनहॅमचे ग्रंथ वाचले. त्यात उंचवटयाविषयी बरीच माहितीशी साम्य असलेली आढळली. परंतु हातावरील उंचवटयाचा भरीव पोकळपणा, दुसऱ्या ग्रहाकडील झुकणे, प्रत्येक हाताचे तीन भाग पाडून मनुष्य स्वभावाचे ज्ञान उ. शुक्र व चंद्राच्या उंचवटयावर पहिला

भाग, बोटाखालील उंचवटयाचा दुसरा भाग व तिसरा बोटाचे नखाकडील पेऱ्याचा आकार, गरगरीतपणा व लांबटपणाचा भाग यावरून तो मनुष्य सुखासीन वृत्तीचा आहे की उद्योगी प्रवृत्तीचा आहे की निव्वळ कल्पनेच्या तरंगावर वावरणारा आहे की या तिन्ही प्रवृत्तीची त्यामध्ये सरमिसळ आहे. पण घटना केव्हा व कोणत्या स्थूल स्वरूपाच्या असतील हे सांगता येणे कठीण वाटू लागले आणि प्रत्येक व्यक्तीचे प्रश्न तर अशाच स्वरूपाचे असतात. पुढे एक घटना घडली.

ज्योतिषी श्री. दीक्षित यांचा म. गांधींच्या प्रकृती-विषयी काळजी घेण्याबद्दलचा ज्योतिषशास्त्राचे आधारे वर्तविलेला इशारा व गांधीची नंतरची मृत्यूची घटना यामुळे ज्योतिषाचा अभ्यास करण्याची प्रेरणा झाली. परंतु कुंडल्यामध्ये एक मोठी अडचण दिसून येऊ लागली. अंशात्मक योग नसतील तर किंवा जन्मवेळ वगैरे चुकली तर ज्योतिषाचा सर्वसामान्य माणसाची गरज भागविण्यास फायदा होत नाही, पोटार्थी ज्योतिषी फायद्याकडे बोट ठेवून असल्यामुळे बुद्धिवादी माणसे तिकडे आकृष्ट होत नाहीत.

धड हातावरून जनतेला भविष्याविषयी, धंद्याविषयी विश्वास उत्पन्न करण्याजोगे मार्गदर्शन करणे अवघड जाते. तर ज्योतिषास कुंडलीचे ज्ञान उत्तम झाले तरी ज्याचेजवळवळ कुंडली नाही किंवा जन्मवेळ ठाऊक नाही अशा व्यक्तींना त्यास मार्गदर्शन करता येत नाही. हातावरून ग्रहाचा बलशालीपणा कळतो आणि साध्या कुंडलीतून बारा भावावरून भविष्यांतील कोणत्याहि घटनेविषयी विचार करता येतो. अशा वेळी हातावरून जर कुंडली मांडता आली तर कोण-त्याहि व्यक्तीस त्याच्या आयुष्यांतील घडणाऱ्या बाबी, विषयी, धंद्याच्या स्वरूपाविषयी, प्रत्येक संततीविषयी-आरोग्याविषयी, पत्नीविषयी, धंद्याच्याविषयी ग्रहांच्या तत्वाचे आधारे व ग्रहांच्या भ्रमणावरून कालमापन पद्धतीप्रमाणे मार्गदर्शन करता येते हा मला मोठा अनुभव आला.

हातावरून कुंडली मांडताना लग्न कसे काढावे याविषयी श्री. नायर यांचा १९४८-१९४९ सालातील अॅस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिनमध्ये एक लेख आला होता. त्यांनी वेदामध्ये सांगितलेला फॉर्म्युला दिला होता. त्यांनी लग्न कसे काढावे एवढाच फॉम्युला सांगितला पण ग्रह कसे मांडावे हे काही लिहिले नव्हते.


दोन्ही करंगळयाच्या पेऱ्यावरील स्वच्छ दिसणाऱ्या उभ्या रेषांची बेरीज यास तेरांनी गुणून जी संख्या येईल त्यात पाच मिळवायचे व बारांनी भागून जी बाकी राहील ते हातावरील कुंडलीचे लग्न होय. उ. डाव्या हातावरील करंगळीचे तिन्ही पेऱ्यावर ४ + ५ + ६ = १५ रेषा आहेत व उजव्या करंगळीवर ७ + ८ + २ = १७ रेषा आहेत तर १७ + १५ = ३२ एकंदर रेषा झाल्या. तेव्हा ३२ × १३ + ५ = ४२१ ÷ १२ बाकी १ आली तर हातावरील कुंडलीचे मेष लग्न आले. बाकी शून्य आली असता मीन लग्न घ्यावे. स्पष्ट रेषेमध्ये संभ्रम निर्माण झाला असता दुसऱ्याहि रेषा घ्याव्या व दुसरेही लग्न काढावे. एकदा हातावरील लग्नकुंडली मांडल्यानंतर ती बरोबर आहे किंवा नाही हे मेष लग्नाप्रमाणे त्या व्यक्तीचा चेहरा किंवा स्वभाव येतो आहे का पहावे. दोन आकडे लग्नाचे येत असतील तर (संभ्रम निर्माण झाला असता) दोन्ही लग्नाचे स्वभाव पडताळून पहावे. व जो अधिक बरोबर दर्शवितो ते लग्न घ्यावे व कुंडली मांडल्यानंतर ग्रह कसे मांडावे हे पहावे ते खाली दिले आहे.

रवि दोन्ही हातावर रविरेषेची पहाणी करावी. रविरेषा स्पष्ट असेल तर व रविउंचवटा त्याबरोबर बलवान असता रवि हा ग्रह निश्चितपणे बलवान असतो. ग्रहांचे तत्त्वावरून व स्थान व राशीवरून आपणास हे ठाऊक आहे की, रवि उदित भागांत असता बलवान असतो. अशा व्यक्तीचा जन्म दिवसा झालेला असतो. दुसरे आपणास ठाऊक आहे की, रवि अग्नि राशीत असता सर्वांत अधिक तेजस्वी असतो उ. मेष राशीत तो प्रखर असला तरी मेष रविचे लोकात दुसऱ्या व्यक्तीविषयी तुच्छता अधिक असते. स्वतःचे सामर्थ्या-विषयी गर्व असतो. सिंहेच्या रविमध्ये धाडसीपणा व मनाची उदारता असते व स्वभाव बेडर असतो तर धनुचे रविमध्ये तत्वाधिष्ठित मनाचा बेडरपणा असतो. व बुद्धीचा प्रभाव अधिक असतो. या रविच्या गुणावरून हातावरील बोटाचा अभ्यास करावा लागतो. रविची राशी काढताना वर सांगितलेल्या फॉर्म्युलाचा उपयोग रविबोटाचे पेऱ्यावरील रेषा मोजून करावा. अनुभव असा आहे की श्री. माधव दत्तात्रय टिपणीस,

(जिमखाना) यांचा जन्म १५–८–१९२७ आहे. त्याप्रमाणे सिंह रवि आहे. हातावरील रेषा उत्तम आहेत पण उंचवटा मध्यम आहे. रवि बोट शनिकडे झुकलेले आहे. हस्तरेषेवरून रविची रास वृश्चिक आली. हाताचे लग्न कन्या आले. बुध बोट रविकडे दोन्ही हातावर झुकलेले आहे. याचा अर्थ रवि-बुध यांची वृश्चिक राशीत युति आहे. त्यांचा स्वभाव वृश्चिकेंतील रवि-बुध युतिचा आहे. सूर्यं मंडलांत रविपासून बुध २७ अंशांत आहे. तर शुक्र ४५ अंशापर्यंत जातो. हातावर शुक्र उंचवटयावरील उभ्या रेषा मोजून वरीलप्रमाणे शुक्राची राशी काढावी. तसेच प्रत्येक ग्रहाच्या राशी काढून हातावरील कुंडलीत ग्रह बसवावे. कित्येक वेळा ग्रह संधिराशीत असतात. अशावेळी ग्रहांची बोटे व उंचवटे यांच्या परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास करून समोरून व्यक्तीस फले सांगून पहावे. ग्रहांची कुंडलीत निश्चिती करावी. आमचा अनुभव असा आहे की पामिट्री व अँस्ट्रॉलॉजी याचा उत्तम अभ्यास असल्यास व हाताचे आकारावरून एकदा व्यक्तीची उत्कर्षाची मर्यादा ठरविल्यावर प्रत्येक बाबतीत कोणत्याहि व्यक्तीस मार्गदर्शन करता येते असा अनुभव आहे.

थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे हातावरून कुंडली मांडता आली असता कोणत्याही व्यक्तीस ग्रह व राशी तत्त्वाच्या आधारे मार्गदर्शन करता येते.

श्री. रघुरामय्या डे. डि. मिनिष्टर (१९५८) यांच्या हातावरील कुंडली खाली शिकंदराबाद येथे काढली. २६ डिसेंबर १९५१.



करंगळीवरून कर्क लग्न आले.
उजवी करांगुली = ४ + ६ + ३ = १३.
डावी करांगुली = ५ + ३ + २ = १०
१३ + १० = २३ X १३ + ५ = बाकी ४.

या कुंडलीवरून त्यांच्या आयुष्यातील घटना बोलक्या आहेत. दशमेश मंगळाचा नीचभंग राजयोग आहे पण सप्तमेश शनिच्या दृष्टीत दशमेश मंगळ आहे व दशमेश मंगळ नुसता भाग्येश गुरुशी ९.५ योग करीत नाही तर मंगळ व गुरू परिवर्तन योगात आहेत. तसेच र. बु. शु. म. यांची युती केंद्रस्थानांत लग्नांत असून भाग्येशाशी ९.५ योग करीत आहेत. हे सर्व उत्तम राजयोगी कुंडली दर्शवित आहेत तर ही व्यक्ति महत्त्वाकांक्षी व परिस्थितीचा भंग करून धोरणाने (मिथुन चंद्र) वागून पुढे येणारी आहे. हाताचा आकार प्रथम श्रेणीचा म्हणजे हात चौरस आकाराचा, स्पर्श फार मऊ नाही फार रफ् नाही. मस्तकरेषा खोल, स्वच्छ व अंतःकरणरेषा व मस्तकरेषेत थोडे अंतर असलेली असते. अशा हातात वरील स्वरुपाचे ग्रह असतां निश्चितपणे वरील माणसे व्यवहारी असून परिस्थितीचा भेद करून पुढे आलेली असतात. रवि ग्रह शनि अगर राहू दृष्टीत असता शनिचे बोट रविकडे झुकलेले अगर रविचे बोट शनिकडे झुकलेले असते. ह्या कुंडलीतहि शनि रविचे दृष्टी स्वरूप दिसून येते.

हस्तकुंडलीतील लग्न हे तुमचे कुंडलीतील जन्मलग्न असू शकते. नवमांश लग्नहि असू शकते. रवि बलवान असतां रविराशी असू शकते. अगर चंद्र राशी असू शकते, अगर दशमस्थानांतील बलवान राशी असता तेहि असू शकते.

कोणत्याहि व्यक्तीचे भविष्य वर्तविताना त्याचे कुंडलीतील राजयोगी ग्रह, रवि, चंद्र व लग्न आणि लग्नेश यांची स्थिती हातावरील त्या ग्रहाची स्थितीवरून दर्शविता येते. हाताचे स्थूलमानाने तीन भाग पाडले आहेत. चंद्र व शुक्र उंचवटयाकडील भाग भोग्यवृत्तीचा दर्शवितो. चंद्र व शुक्र जितके बलिष्ट त्या स्वरूपांत मनाची व कुंडलीत शुक्राने दर्शीत केलेल्या फलाचे स्वरूप असते. दुसरा भाग तळहातावरील उंचवटयाचा आहे. हा भाग व्यक्ति आपला उत्कर्ष उद्योग प्रवृत्तीवरून करणारा आहे की वाममार्ग अवलंबणार आहे. तिसरा भाग हाताचे बोटांच्या नखाकडील पेऱ्याच्या (बोटांचा) त्यावरून व्यक्तीची बुद्धिमत्ता तर्कशुद्ध, विचारपद्धतीविषयीचे सामर्थ्य दर्शवित असतो. हे तिन्ही भाग उत्तम हाताचा आकार उत्तम, हातातील रेषा स्वच्छ व खोल असे लोक निश्चित भाग्यवान असतात.

हातावरील कुंडलीचे अजून बरेच संशोधन व्हावयास पाहिजे. ग्रहांची कुंडलीतील राशीची निश्चिती ठर_

वितानाराशीचे फल त्या स्थानाविषयीबरोबर येते की, नाही हे त्या व्यक्तीस विचारून पहावे. ग्रह राशीत निश्चित करतांना हातावरील बोटे म्हणजे त्यांचा आकार व त्यांचे उंचवटयाची परिस्थिती ध्यानांत ठेवूनच करावयास पाहिजे व त्याबरोबर त्या बोटांचे पेऱ्यावरील रेषा मोजताना योग्य व अयोग्य कोणत्या याची निश्चिती हे अनुभवानेच ठरणार आहे. अर्थात हे सर्व ठरवितांना संदेह निर्माण झाला असता "सती हि संदेह पदेषु वस्तुषु प्रमाणान्त:करण प्रवृतय: !" हे खरे असते. ज्योतिष फल सांगणाऱ्याचे अंत:करण शुद्ध असावे लागते, तेव्हाच फलाचे संभ्रमावस्थेत त्याचे अंत:करणाची प्रवृत्ति त्याला योग्य मार्गदर्शन करते. परंतु ग्रहांचा व राशीतत्वाचा अभ्यास उत्तम पाहिजे हे विसरता कामा नये.

— लेखन प्रसिद्धी योग —

• प्रभाकर यशवंत काकडे (होराभूषण)

Astrology is a red signal & also a green signal in a human life. अशी सर्वसाधारण ज्यो. शास्त्राची माझ्या मते व्याख्या करता येईल. लेखन प्रसिद्धि योग जन्मकुंडलीत कसे असतात ते आपल्यापुढे मांडत आहे.

लेखनाचे कारक ग्रह बुध, शुक्र व गुरू हे होत. कारकस्थाने पाच, तीन व दोन ही आहेत. शुक्र कला, कल्पनादाता आहे. गुरु ज्ञानविकास करणारा आहे. पंचमस्थान हे विद्या, बुद्धि यांचे कारक आहे. द्वितीय स्थान हे वाक्‌सिद्धि स्थान होय कारक ग्रह, कारक स्थान, त्या स्थानांचे अधिपती यांच्या शुभसंबंधावर लेखन योग कुंडलीत आहे किंवा नाही हे सांगता येईल.

लेखन योगाचे कारक ग्रह गुरु, शुक्र, बुध या ग्रहात कुंडलीत शुभयोग झालेला पाहिजे अगर युति, प्रतियुतिही चालेल पण हे योग द्वितीय, तृतीय स्थानांतून होतील तर फार चांगले. शिवाय या कारक स्थानांचे अधिपतीचा शुक्र गुरु, बुध यांच्याशी शुभसंबंध असावयास पाहिजे. शिवाय हे ग्रह ६, ८, १२ या स्थानाशिवाय कोठेही असतील तर लेखनयोग होतो. आता हा कोणत्या क्षेत्रांत उत्तम प्रतीचा लेखक होईल ते त्याचे कारक ग्रह व स्थाने बलिष्ठ आणि शुभ संबंधीत असतील तर त्या मानाने ठरविता येईल.

याशिवाय कारक ग्रहांपैकी दोन-दोन ग्रहात शुभ योग व दोन स्थानात शुभसंबंध असतील तरी ती सुद्धा व्यक्ति लेखक होईल व त्यापैकी एखादा ग्रह सहा, आठ, बारा स्थानांत असला तरी चालेल.

उच्चस्थानी आलेला व गुरुने दृष्ट असा पंचमाधीश केन्द्रात आला म्हणजे तो मनुष्य विद्वान, गुणवान्‌ ग्रंथकर्ता होईल.

लग्न, चतुर्थ, पंचम, नवम किंवा दशमस्थानी शुक्राने युक्त किंवा अवलोकीत चंद्र असता मनुष्य कवि होतो.

एकटा पंचमेश गुरुयुक्त सहा, आठ, बारा या स्थानाशिवाय कोठेहि असेल अगर गुरुने दृष्ट असेल तर लेखन योग होतो.

रवि हा ग्रहांचा राजा आहे. नैसर्गिकरित्या पंचमेश आहे. त्याचे कारक ग्रहांशी होणारे शुभसंबंध त्या कुंडलीस लेखन विभागातील अलौकिकत्व देतात.

कारक ग्रह बुध, गुरु, शुक्र हे दोन्ही प्रकारे शुभ असलयास व शुभयोग असेल तर तो कवि, कादंबरीकार

नाटककार, ललित कथालेखक होऊ शकतो. कारक ग्रहात मंगळ येईल तर गणितकार होईल. त्याचा बुध, गुरूशी होणारा संबंध वर्तमानपत्रकार करतो. कारक ग्रहात शनिचा संबंध असेल तर त्याचे हातून शास्त्रीय ग्रंथाची निर्मिती होईल व चिरकाल टिकणारे वाङ्मय निर्मिती होईल.

कारक ग्रहात जर गुरू बलवान असेल तर १६ वे वर्षी सुरुवात. चंद्र बलवान असेल तर बावीसवे वर्षी, रवि जर बलवान असेल तर तेवीसवे वर्षी मंगळ जर बलिष्ठ असेल तर अठ्ठाविसावे वर्षी होईल.

ज्याच्या लिखाणात दैवी तेज दिसून येते त्यास नेपच्यून व केतु कारणीभूत आहेत असे समजावे.

जे अचानक वाङ्मय क्षेत्रांत चमकतात त्यांना हर्शल अनुकूल असला पाहिजे.

लाभस्थान, लाभेश यांच्याशी लेखन योगाचा शुभ-संबंध येईल तर त्यास ऐश्वर्य, धन, कीर्ति प्राप्त झाल्या-शिवाय रहात नाही.

सहा, आठ, बारा या स्थानाधिपतीचा कारक ग्रहांशी संबंध नसावा.

दशमेश बलवान असून दशमस्थान अगर दशमेश यांच्याशी कारक योगाचा संबंध येईल तर लेखक स्वतःच ग्रंथकर्ता व प्रकाशक होईल.


गुरूशी राहूचा शुभसंबंध होईल तर ज्योतिषज्ञ बनवतो.

स्थलसंकोचास्तव दोन कुंडल्यांचे मी लेखनयोग या दृष्टिकोनातून विवेचन करतो.

श्री. रा. रा. प्रल्हाद केशव अत्रे

जन्म दि. १३।८।१८९८ जन्म वेळ स. ७-५०.


कारक ग्रह :–गुरू व शुक्र धनांत, लग्नी बुध यांचा शुभसंबंध. पंचमेश गुरू व तो धनात (कारकस्थान) त्यामुळे विद्वान, ग्रंथकर्ता, वर्तमानपत्रकार योग प्राप्त झाले.



नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर

जन्म दि. २५–११–१८७२

ह्या कुंडलीत पंचमात गुरु भाग्यात बुध शुक्र त्यावर गुरूची दृष्टि हा योग साहित्यसेवक होण्यास कारण झाला. शनि संबंधामुळे राजकारणातील छिद्रे नाटकाचे द्वारे उघडकीस आणण्याचे कार्य केले.



ज्योतिषशास्त्र व मंगळाविषयी सूक्ष्म विचार

लेखक: केसरीनाथ सि. शास्त्री मोडक

आजच्या जगांत मानवाला योग्य मार्गदर्शन करणारी अनेक शास्त्रे उपलब्ध आहेत. त्यात मानसशास्त्र, तर्कशास्त्र व ज्योतिष शास्त्र इत्यादि शास्त्रांचा समावेश होतो. विशेषत: आर्थिक परिस्थितीने गांजलेले लोकच भविष्याकडे वळतात,. तर कांहीं व्याधीने ग्रासलेले लोक ज्योतिषशास्त्राकडे अधीरतेने पाहतात. मात्र सुखवस्तू लोकांच्या मुखांतून "**ज्योतिष शास्त्र**' हे थोतांड आहे! असेच उद्‌गार कर्णोपकर्णीं ऐकू येतात. ह्याचे मूळ कारण म्हणजे वर्तमानपत्रातून व मासिकातून प्रसिद्ध होणारे "राशीभविष्य" हे होय. सूर्यावरून फक्त ५% हे तीन दिवस साधारण खरे पटते. मी असे स्पष्टपणे निवेदन करू इच्छितो की, ज्योतिषशास्त्र हे एक वेदांचे अंग आहे. आणि त्यापासून लोकांना भूत, वर्तमान व भविष्यकाळ जाणण्याचे एक साधन आहे. ज्योतिषशास्त्रात गणित, मुहूर्तादिक, फलादेश असे वेगवेगळे तीन प्रकार आहेत. हे तीन प्रकार जर व्यवस्थित हाताळले आणि भविष्य वर्तविले, तर ते ८० टक्के निश्चित पटेल. आणि ज्योतिषशास्त्र हे त्रिकालबाधित सत्य आहे अशी जनतेची खात्री होईल.

ज्योतिषशास्त्रांत एकून बारा राशी आहेत. ह्या बारा राशींतच सगळ्या जनतेची विभागणी केली आहे. वास्तविक पाहातां विधात्याने प्रत्येक मानवाच्या आवाजांत, शरीररचनेत भिन्नता ही ठेवलेली आहेच. तद्वतच जरी काही माणसे एकाच राशीची असली; तरी त्यांचे प्रारब्ध हे वेगवेगळे असणारच. उदाहरणार्थं अमूक एक राशीचा इसम बॅरिस्टर, फॉरेन् रिटर्नड् असतो. किंवा हायकोर्टात सरन्यायाधिश असतो; तर त्याच राशीची काही माणसे दारिद्र्याने पछाडलेली व मोठे गुन्हेगार म्हणून आपल्या पाहण्यांत येतात. यास्तव राशीवरून भविष्य वर्तविणे म्हणजे ज्योतिषशास्त्राला धाब्यावर बसविण्यासारखेच होईल. जर जन्मकुंडली ज्या स्थळी ज्यांचा जन्म असेल त्या गांवचे अक्षांश रेखांश व जन्मवेळ बरोबर असेल तरच भविष्य वर्तविले असता ते ६० % टक्के खरे पटते. त्यामध्यें सुद्धा अनेक वेगवेगळे प्रकार आहेत. रवीची अंतर्दशा ते शुक्राच्या अंतर्दशेपर्यंत पुरुष जातक कोष्टक जन्मलग्नी तन्वादि द्वादशभाव स्थानी जे जे ग्रह येतील त्यांच्यावर भविष्य बहुतेक खरे ठरते. तद्वत साडेसातीचे निरनिराळे प्रकार आहेत. सगळ्यानांच साडेसाती अनिष्ट जाते असे स्पष्टपणे सांगता येत नाही. हे सर्व जन्मकुंडलीवर अवलंबून असते.

आता आपण मंगळाविषयी विचार केला असता ज्या जन्मपत्रिकेत तनु, सहृत (मुख) जाया, मृत्यु व व्ययस्थानात जर मंगळ असेल तर त्याला मंगळाची कुंडली असा अपवाद असतो. परंतु ज्योतिषशास्त्र आधारे मंगळाच्या जाती भिन्न भिन्न आहेत. तो सौम्य आहे किंवा अस्तंगत आहे त्याचप्रमाणें चतुर्थस्थानात कर्केचा आहे किंवा नाही हा विचार कोणी करीतच नाहीत. मुलास मंगळ आहे असा बाऊ करून तद्वत मुलीच्या पालकांचे होते.आपल्या कन्येला मंगळाचा, वर मिळावा म्हणून ते शोधात असतात. नाइलाजाने श्रीमंत पालक यथायोग्य वर मिळाला नाही तर फक्त मगळाचा वर आहे एवढी एकच गोष्ट लक्षात घेऊन अयोग्य वराच्या गळ्यात आपली कन्या बांधतात. मग तो वर रोगी असेल, दरिद्रीहि असेल. परंतु मंगळाला मंगळच पाहिजे ह्या नियमानुसार हा अमंगळ वर श्रीमंताचा जामात बनतो. वास्तविक पाहता मंगळाला मंगळच पाहिजे असे ज्योतिषशास्त्र सांगत नाही. जर गुरू त्रिकोणात किंवा केंद्रस्थानांत असेल तर मंगळाचा दोष नष्ट होतो. दुसरा सारासार विचार केला असतां पूर्वी "अष्ट वर्षांत भवेत कन्या" ह्या रूढीप्रमाणे आठ वर्षे झाली की मुलीचा विवाह होत असे त्यावेळीं मंगळाचा विचार करणे योग्य होते. हल्ली आपल्या महाराष्ट्रांत मुलीचे पालक २२-२३ वर्षे होऊन गेल्यावर वर शोधण्यास लागतात. आणि अर्थातच वराचे वय २७/२८ वर्षे असणारच यास्तव कोणत्याहि प्रकारे दोघांची पत्रिका न पाहता विवाह जमविणे हा एक सुलभ मार्ग होय.

—०—

ग्रहरत्ने आणि मानवी जीवन

ले.— विनायक कागजी रेगे

एम. डी एच. अँस्ट्रीज्युवेलर

गृहरत्ने माणसाच्या जीवनांत सुख, समाधान आणि आनंद निर्माण करतात; परंतु ग्रहरत्नेहि तेच कार्य करतात, हें अनुभवसिद्ध वर्णन या लेख वाचनाने कळून येईल.

मानवी जीवनावर आकाशांतील ज्योतींचा म्हणजे ग्रहांचा परिणाम होतो हे ज्योतिषशास्त्राने सिद्ध झाले आहे. गुरुत्वाकर्षणाचा जोर प्रचंड अंतरावर भासमान होऊ लागतो व त्याच न्यायाने ग्रहांचे आकर्षण पृथ्वी. वरील व्यक्तीवर व पदार्थावर इष्टानिष्ट परिणाम घडवते हा अनुभव ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासाने व अनुभवाने सिद्ध झाला आहे.

पराशर, भृगु, नारद, गर्ग आदि ऋषींनी ज्योतिषशास्त्राचे नियम व फले उद्‌धृत केली आहेत. वराहमिहिराचार्यांनी व्यक्तिगत भविष्य व राष्ट्रीय भविष्याची माहिती ग्रंथरूपाने लिहून ठेवली. पाश्चात्य ग्रंथकार अॅलन लिओ, सेफारियल, वुईल्यम लीली, झडकील, रॉफेल, कार्टर इ. ग्रंथकारांनी फार श्रमपूर्वक संशोधन करून ज्योतिष सिद्धांत लोकांना पटवून दिले.

प्रत्येक व्यक्तीवर व अणूरेणूवर ग्रहमालिकेतील ग्रह आपल्या प्रकाशकिरणांचा व आकर्षणाचा परिणाम करीत असतात हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ व सत्य आहे. पृथ्वीपासून सूर्याचे अंतर कमीजास्त होताच ऋतुमान बदलते ही गोष्ट सर्वांना माहित आहेच. सूर्याच्या प्रकाशांतून जीवनाचा झरा सतत स्रवत असतो. उदा० सूर्यप्रकाश ज्या वनस्पतीवर पोचत नाही अशी वनस्पती सडलेली व रोगट आढळेल. "सूर्य आत्मा जगतस्थुषश्च" असे वर्णन वेदांत आहे. हेच नियम बाकीच्या ग्रहांना लागू आहे. सर्व ग्रहांचे परिणाम देहावर विविक्षित भागी होत असतात. निरनिराळ्या तऱ्हेचे अन्न पोटात जाते. त्याचा परिणाम देहाच्या विविक्षित भागावर होत असतो. याप्रमाणेमानवी जीवनावर ग्रहांच्या आकर्षणाचा परिणाम होत असतो, जसा ग्रहज्योतींचा शुभाशुभ परिणाम मानवावर होतो तसाच रत्नज्योतींचा शुभाशुभ परिणाम मानवी जीवनावर घडून येतो असा आमचा अनुभव आहे. आर्यज्योतिष्यांनी ग्रहरत्नांचे वर्णन, धारण वगैरे खुलासा केला आहे. अनिष्ट ग्रहांसाठी शांति, जप, सांगितले आहेत. पाश्चात्य ज्योतिष्यांनी फक्त रत्नाचे धारण करून अनिष्ट ग्रहांचे परिणाम टाळावेत एवढेच वर्णन केले आहे. कोणत्या ग्रहाचे कोणते रत्न व त्या रत्नधारणापासून कोणते फायदे मिळतील यासंबंधी विस्तृत वर्णन केलेला ग्रंथ नाही. तरीपण कोणते रत्न कोणत्या कुंडलीच्या मालकाने धारण करावे, ते अनुभवाने सांगण्यांत येते.

कोणते रत्न कोणी वापरावे व त्याचे शरीरावर व मनावर परिणाम कसे होतात व कांही रत्ने रोगप्रतिबंध करण्यास समर्थ आहेत हे शास्त्रीयदृष्टचा व अनुभव यांनी निश्चित झाले.

पृथ्वीच्या पोटांतील उष्णता सहन केलेली रत्ने आपल्या प्रकाशकिरणांनी आकाशांतील ग्रहांचे परिणाम सुधारू शकतात असा अनुभव आहे. आकाशांतील मिश्र आकर्षण व प्रकाश यांतील ठराविक आकर्षण, प्रकाश व विद्युत् ही ग्रहरत्ने खेचून घेतात व त्या त्या शक्तीचे परावर्तन करतात असे अनुभवांती सिद्ध झाले आहे. प्रत्येक रत्नामध्ये वेगवेगळे स्नेहाकर्षण होत असते. आकाशांतील ग्रहतत्वानुसार स्वाभाविकच आकर्षण उत्पन्न होऊ शकते. चंद्राच्या आकर्षणाने समद्राला भरती ओहोटी येते हे सर्वांस माहित आहेच. रेडिओ

यंत्राने ठराविक नगरीचें प्रयोग ऐकू येतात. त्या ध्वनि-क्षेपकामधून ठराविक वेळी ठराविक प्रयोगाचें ध्वनिकिरण क्षेपित केले जातात हे दृश्य जसें सत्यस्वरूपी आहे, तसेच आकाशांतील ग्रहांच्या प्रकाशांतील तेजकिरणांची विविक्षित खेच, विविक्षित रत्नांच्या रंग, स्नेहाकर्षण व विद्युतादि गुणामुळे होत असते. ग्रहरत्नांच्या उपयोगांत प्रकाश, परिवर्तन, केंद्रीभवन, व विद्युत् आकर्षण या गोष्टींना महत्व आहे.

जनतेच्या अंधश्रद्धेचा फायदा –

पुष्कळ ज्योतिष्यांना रत्नाचें प्रकार व रंगभिन्नतेविषयी ज्ञान नसते, ते थोतांड मांजवून जनतेच्या अंधश्रद्धेचा फायदा घेतात. पंचांगांत कोणत्या ग्रहासाठी कोणते रत्न धारण करावे हे लिहिले आहे. नवग्रहांची रत्ने धारण करा असे सांगून ज्योतिषी स्वस्थ बसतात.

खरी रत्ने कोणती ? खोटी कोणती ? रत्नांचे प्रकार, आकार, अवयव, रंग, इष्टानिष्टता, व मुहूर्तज्ञान इतक्या गोष्टींची या धारणेत जरूर आहे. ग्रहरत्ने म्हटली म्हणजे ती; खरी असली पाहिजेत. रासायनिक (Chemical) किंवा काचमणी (glass stones) असता कामा नये, असा संकेत आहे.

जन्मकुंडलीत अनिष्ट ग्रहांचा जोर कमी करण्यासाठी व आपले उद्दिष्ट साधण्यासाठी ग्रहरत्नांचा उपयोग करणे योग्य ठरले आहे. ग्रहांच्या बलाबलाचा पूर्ण विचार करून जे विकृत स्वरूप आढळून येंते त्या विकृत स्वरूपाचा जोर कमी करण्यासाठी त्या ग्रहाचे रत्न मध्यवर्ति ठेवून दोन बाजूस शुभयोगी ग्रहांची रत्ने सेटिंग केलेली आंगठी ठराविक बोटात धारण करण्यास सांगतो.

जन्मकुंडलीत अनिष्ट ग्रह कोणता हे प्रथम सिद्ध केले पाहिजे व त्या अनिष्ट ग्रहामुळे प्राप्त होणारे वाईट फल कुडलीच्या मालकास मिळते किंवा नाही हेही विचारपूर्वक पाहिले पाहिजे. जुन्या काळी ठराविक नक्षत्रावर, ठराविक वारी, ठराविक हो-यावर आंगठीच्या कोंदणामध्ये रत्न बसवून धारण करावे, असे वर्णन आहे; परंतु रँफेलच्या एफिमरीजवरून शुभत्रिकोण काळी (जन्मपत्रिकेत) आंगठी धारण केली तर गुण देण्यास समर्थं होते असा अनुभव आहे.

ASTRAL JEWELS

कोणत्या ग्रहांना कोणती रत्ने प्रिय आहेत, यासंबंधी ग्रंथांत खुलासा आढळतो. सर्व ग्रहांचा राजा श्रीसूर्यनारायण याचे रत्न माणिक आहे. यालाच संस्कृतमध्ये " माणिक्य " अशी संज्ञा आहे. इंग्रजीमध्ये रूबी (Ruby) म्हणतात. चंद्रासाठी मोती हे रत्न मानले जाते. संस्कृतमध्ये " मुक्ता " व इंग्रजीमध्ये Pearl असे संबोधिले जाते. तिसरे रत्न पोवळे असून मंगळासाठी योजले जाते. संस्कृतमध्ये " प्रवाळ " व इंग्रजीमध्ये coral म्हणतात. चवथे रत्न पाच हे बुधाचे असून संस्कृतमध्ये 'पाचि' व इंग्रजीमध्ये एमरॉल्ड (emrald) म्हणतात. गुरूचे रत्न पुष्कराज असून संस्कृतमध्ये " पुष्पराग " व इंग्रजीमध्ये येलोसफायर (yellow sapphire) म्हणतात. पाश्चात्य लोक गुरूसाठी टोपाझ (topaz) वापरावे असे वर्णन करतात. शुक्र या ग्रहांचे रत्न हिरा आहे. संस्कृतमध्ये " वज्र " व इंग्रजीमध्ये डायमंड (diamond) म्हणतात.

शनिसाठी इंद्रनीळ रत्नाची योजना केली जाते हे सर्वश्रुत आहेच. संस्कृतमध्ये नीळ व इंग्रजीमध्ये सफायर म्हणतात. राहूसाठी गोमेदरत्न असून संस्कृतमध्ये 'गोमेद' हेच संबोधन आहे. इंग्रजीत हेसोनाइफ गारनेट म्हणतात. काही लोक सिनॅमन स्टोन म्हणतात. केतुसाठी वैडूर्य ऊर्फ लसण्यारत्न असून संस्कृतमध्ये ' वैडूर्य ' व इंग्रजीमध्ये कॅटस् आय् म्हणतात. जो लसण्या सतेज सोनेरी पिवळा असतो त्या रत्नास-कनकक्षेत्री वैडूर्य म्हणतात.

हर्षल या नवीन ग्रहासाठी शिवधातु रत्न धारण करावे. इंग्रजीमध्ये ओपेल ही संज्ञा आहे. नेपच्यूनसाठी पिरोजा रत्न वापरण्याचा प्रघात आहे. इंग्रजीमध्ये टरक्युआँइज् म्हणतात. पिरोजामध्ये रजाकी पिरोजा ही जात उत्तम मानली जाते.

प्लुटो या ग्रहाचे रत्न अद्याप संशोधनांती सिद्ध झाले नाही. तरीपण ब्लडस्टोन प्लुटो ऊर्फ शेषग्रहासाठी धारण करणे उत्तम असे मला वाटते. याखेरीज पाश्चात्य पद्धतीनुसार अलेक्झांड्रा, ॲमेथिस्ट, ब्लडस्टोन, लॅपिसलाझुली, अँगेट, मूनस्टोन, गार्नेट, किसोलाइट व सार्डोनिक्स अशी रत्ने सायन सूर्यगत राशीप्रमाणे धारण करण्याचे वर्णन ग्रंथांत आहे.

पाश्चात्य ग्रंथात सायनमेषेचा रवि असलेल्यांना

माणिक किंवा गार्नेट धारण करण्यासंबंधी वर्णन केले आहे. सायन वृषभेचा रवि असणाऱ्यांनी पाच व वैडूर्य, मिथुन राशीवाल्यांनी सफायर, कर्क राशीच्या कुंडलीमालकांनी हिरा किंवा मूनस्टोन व सायन सिंह राशीवर जन्मणाऱ्यांनी माणिक किंवा पुष्पराग धारण करावा. कन्याराशीवर जन्मणाऱ्यानी सार्डोनिक्स एमरॉल्ड तुळराशीस्थ सूर्यंगत लोकांनी किसोलाइट ॲमेथिस्ट, वृश्चिक राशीस्थ सूर्यंगत लोकांनी माणिक किंवा ओपेल धनुराशीस्थ सूर्यंगत लोकांनी टोपाझ, मकरराशीस्थ सूर्यंगत लोकांनी गारनेट,कुंभराशीस्थ लोकांनी इंद्रनीळ व मीनराशीस्थ सूर्यंगत लोकांनी ब्लडस्टोन धारण करणे हितप्रद ठरते.

आमच्या आर्य ग्रंथामध्ये नवग्रहांची आंगठी धारण करावी असे वर्णन आहे. नवग्रह पवित्र ज्योतिष व धर्मशास्त्राचे दृष्टीने श्रेष्ठ मानले जाते.

।। ॐ स्वस्ति, श्रीशुभं ।।

धन योग

ना. गं. टिळक, जातकभूषण

या बाबतीत जन्मकुंडलीतील शुभाशुभ स्थितिप्रमाणे विचार करावयाचा. तत्पूर्वी व्यक्तीचे प्रत्यक्ष परिस्थितीचे प्रकार कसे असू शकतील ते पाहून त्यापैकी शुभस्थिती खालीलप्रमाणे—

(१) गर्भश्रीमंती आणि मागाहून सहज गतीने किंवा व्यवसायाने अधिक संपन्न होणे.

(२) गर्भश्रीमंत राहोच उलट वडिलार्जित कर्जाचाच भार स्वीकारावा लागणे परंतु मागाहून नाना प्रकारे धनलाभ होत जाऊन निष्कर्जीपणा व संपन्नता प्राप्त होणे.

अशुभ स्थिती.

(१) गर्भश्रीमंति आणि मागाहून सहज गतीने किंवा व्यवसायामध्ये विपरीतपणा उत्पन्न होऊन सर्व संपत्तीचा ऱ्हास होणे व दारिद्र्यात आयुष्य काढावे लागणे.

(२) वडिलार्जित कर्जाचा भार स्वतःला कोणतेहि अपयश येत जाणे आणि अखेरपर्यंत पोटापुरेशीही प्राप्ती न होणे.

त्याप्रमाणे शुभाशुभ प्रकार मानता येतील.

अतिसंपन्नता किंवा अति दारिद्र्य हे योग जन्मकुंडलीमध्ये कशा प्रकारे ग्रहयोग असता प्राप्त होत असतात याचे ज्ञान झाले तर उत्तमच परंतु बहुजन समाजाचे दृष्टीने विचार केला तर निदान इतके तरी ज्ञान झाले पाहिजे की—

(१) आयुष्यभर चरितार्थ चालण्याइतके धन मिळेल अथवा नाही ? चरितार्थ चालण्याइतके धन म्हणजे किती ? याची व्याख्या या ठिकाणी करणे अवश्य आहे. 'अन्न आणि वस्त्र' या जीवनांतील मुख्य उपयुक्त बाबी आहेत. त्यांतील पहिली बाब 'अन्न' होय. अन्न उत्तम मध्यम किंवा कनिष्ठ, कोणत्या दर्जाचे मिळाले पाहिजे. हा प्रश्न विवाद्य

म्हणावा लागेल. त्या वादाकडे न वळता असे म्हणावेसे वाटते की 'खाण्याकरिता जगण्यापेक्षा, जगण्याकरिता खावे' या म्हणीकडे लेक्ष देऊन, अन्नाचा दर्जा ठरविणे उत्तम. साधूसंत किंवा भिकारी, या वर्गाप्रमाणे मिळाले तर खावे, नाहीतर स्वस्थ उपास काढीत बसावे अ. होता नये किंवा संसारी जीवन जगण्याकरिता, शरीर सामर्थ्य व्यवस्थित टिकेल अशापेक्षा कमी दर्जाचे असता नये असे अन्न स्वतःला व ज्यांची सर्वस्व जबाबदारी स्वतःवर आहे त्यांना मिळेल. ते मिळण्याकरता जरूर इतके धन आणि त्याचप्रमाणे शरीर संरक्षणास जरूर इतके वस्त्रआवरण मिळविण्याकरिता जरूर इतके धन मिळेल किंवा नाही याचे ज्ञान होणे.

(२) प्रसंगानुसार वरीलप्रमाण कमीत कमी अपेक्षा टिकविण्याकरिता कांही काळ ऋणयोगात काढावा लागला तरी अंतकाळी नैष्कर्ज्य स्थिति प्राप्त होणे.

(३) वरीलप्रमाणे जन्मकुंडलीमध्ये योग नसतील म्हणजे अर्थातच पूर्ण दारिद्री योग आहे अथवा काय? व तसा योग असल्यास मानवी प्रयत्नाने त्यातून तरून जाण्यास काही उपाय करतां येतील किंवा कसे त्या बद्दल ज्ञान होणे.

(४) आयुष्यामध्ये आर्थिकदृष्टचा बरा वाईट काळ कोणता त्याचे ज्ञान होणे.

(५) साधारणपणे धनप्राप्तीचे मार्ग व काळ.

(६) धनहानीचे योग असल्यास साधारणपणे केव्हा व त्याला कारणे काय असू शकतील व त्याचा परिहार मानवी प्रयत्नानीं होईल किंवा नाही.

इतक्या गोष्टीचे ज्ञान कुंडलीवरून होईल तरीही बहुजन समाज सुस्थितीमध्ये राहील. जन्मकुंडलीतील स्थिति शुभाशुभ कशीही असो ती स्थिति बदलणे मानवाचे हाती असो वा नसो, परंतु तिचे ज्ञान प्रत्येकाला योग्यवेळी होईल तर, त्यापासून खात्रीने लाभ होईल. 'अदृश्य अडचण कशी दूर होणार?' या प्रश्नाचे उत्तर कोठें सांपडणार रसेल तर ते जन्मकुंडलीरूप आदर्शातच होय. त्यावर विश्वास ठेवून त्याने दर्शित अशा मार्गाचा अवलंब करणे इतकेच मानवाचे हाती आहे व तो स्वीकारून मानवी प्रयत्न केल्याचें श्रेय मिळविले पाहिजे. पुढील अडचणींची जाणीव पूर्वी असेल तर प्रवासांतील पुष्कळ हाल चुकविता येतात. ही गोष्ट कोणीही नाकारणार नाही.

यादृष्टीनेच जन्मकुंडलीतील ग्रहयोगाचा, या ठिकाणी विचार करावयाचा आहे.

संपत्तिदर्शक स्थाने

कुंडलीतील, धनस्थान, चतुर्थस्थान आणि लाभस्थान ही मुख्य होत. त्याचे खालोखाल षष्ठ, सप्तम, दशम व नवम ही होत.

(१) धनस्थानावरून, अन्न, धन, पूर्वार्जित धन लाभ, वस्तूचा क्रयविक्रय व त्यामुळे होणारे नफा नुकसान यांचा विचार होतो.

(२) चतुर्थ स्थानावरून, स्थावर मिळकत, वडिलोपार्जित जमीन--जुमला, भूमिगत द्रव्यलाभ यांचा विचार होतो.

(३) लाभ स्थानांत अनेक प्रकारचे द्रव्य संपादनाचें मार्ग, राजद्रव्य, सांपत्तिक सुस्थिती वस्त्रालंकार भूतणे यांची प्राप्ती, आश्रयदात्यापासून होणारा लाभ ही पाहतात.

(४) षष्ठ स्थानावरून शरीर सुस्थितीमध्ये ठेवण्यास लागणारे अन्न, कपडा व धंदा रोजगार यापासून होणारा लाभ. जमीन बाबीपासून मिळणारे उत्पन्न यांचा विचार होतो.

(५) सप्तम स्थानावरून व्यापारापासून होणारा लाभ, भागीदारांपासून अथवा चोरांकडून होणारे नुकसान याचा विचार होतो.

(६) दशमस्थानावरून, उद्योग धंदा, व्यापार' नोकरी या पासून होणारा लाभ, हातून घडणारे अनिष्ट कर्मामुळे होणारी हानि, शेतकीपासून होणारा लाभ, उपजीविकेचे साधन यांचा विचार होतो.

(७) नवमस्थानावरून पूर्वार्जित कर्मफल, ऐश्वर्य भरभराट, संपन्नता. परराष्ट्रांशी संबंध येऊन त्यामुळे होणारा लाभ ही पाहतात.

आकस्मिक धनयोग दर्शक स्थाने

कुडलीतील, पंचमस्थान व अष्टमस्थान यावरून यांचे ज्ञान होते.

(१) पंचम स्थानावरून, शर्यती, सट्टे, जुगार, शेअर्स वगैरे पासून होणारा आकस्मिक लाभ, संपत्ति लाभ

करिता केलेल्या मानवी प्रयत्नाचे अखेरचे यशापयश याचा विचार होतो.

(२) अष्टम स्थानावरून विवाहाचेवेळी अगर ज्यात स्त्रीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध येतो, अशा प्रकारे होणारा लाभ, वारसा अथवा उद्योगामध्ये कल्पनेला अशक्य वाटणारा द्रव्यलाभ लॉटरी, नोकरीत लांच गुप्त धन वगैरे पाहतात.

धनहानी ऋण योग

कुंडलीतील अष्टम स्थान व व्ययस्थान यांजवरून यांचे ज्ञान होते.

(१) अष्टम स्थानावरून आकस्मिक नुकसान ऋणयोग व ऋणमुक्ती यांचा विचार होतो.

व्ययस्थानांवरून सदसद्व्यय, ऋणग्रस्त स्थिती, अनीमान लोकांबरोबर संगत होण्याने व चोरांकडून होणारे नुकसान तंटेबखेडे उत्पन्न होऊन कोर्ट दरबारामुळ होणारे नुकसान, मित्राकरता द्रव्यनाश राजदंडाने होणारे नुकसान कष्टमय जीवन यांचा विचार होतो.

धन अथवा ऋणयोगाचे मुख्यत्वेकरून कारक गृह

धनयोग:– गुरू आणि शुक्र हे ग्रह धन देणारे आहेत.

ऋण योग:– मंगळ आणि शनि हे ग्रह ऋणयोग आणणारे आहेत.

सूचना:– कुंडलीतील स्थानाधिकाराप्रमाणे यांची निरनिराळी फळे मिळतील. परंतु स्थानाधिकाराकडे लक्ष न देता फक्त त्यांचे शुभाशुभस्थिती प्रमाणे ते वर दिल्याप्रमाणे धनऋण योगास कारणीभूत होतील इतकेच. यादृष्टीने इतर ग्रह विचारात घेतलेच पाहिजेत असे नाही. परंतु जर या शास्त्राचे मुख्य आधारभूत ग्रह आणि आत्मा व मन यांचे कारक रवि व चंद्र यांजबरोबर संपत्ति दर्शक स्थानातून, पापग्रह अशुभ दृष्टीसंबंध करीत असतील तर त्या योगाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण तो एक मोठा हानिकारक योगच आहे असे मानावे लागेल. इतर शुभयोग बलवत्तर असतील तर या योगाचा मोठा अनिष्ट परिणाम होणार नाही.

एकेक गोष्टीचा विचार करता कुंडलीतील प्रथम तृतीय ही स्थाने आणि बुध व राहू हे ग्रह यांचा विचार केलेला नाही. तत्वतः त्यांचाहि समावेश केला पाहिजे, कारण :–

१. प्रयत्नाचे कर्तृत्व लग्नाकडेच आहे. सर्व ठीक आहे. परंतु स्वतः निष्क्रीय 'पारमार्थिक दृष्टया नव्हे हं नाहीतर–न हि कश्चित क्षणामपि याकडे लक्ष द्याल ? राहिल तर कितीहि शुभयोग असतील तर त्याचा काय उपयोग?

२. तृतीय स्थान हे तर प्रयत्नांचे व चळवळींचे द्योतक मग त्याला वगळून कसे चालेल?

३. बुध नैसर्गिकरीत्या पराक्रम स्थानाचा कारक व बुद्धिदाता अर्थात याची स्थिती नीट नसल्यास हातून पराक्रम किंवा कर्तव्य म्हणून करावे लागणारे प्रयत्न कसे घडणार व ते करण्याकरिता बुद्धीला चालना तरी कशी मिळणार ? म्हणून याचे स्थितीकडे लक्ष दिलेच पाहिजे.

४. राहू, उलट अथवा सुलट कोणतीहि गोष्ट अकस्मात घडवून आणणारा असत्याचे नसते व नसत्याचे असते असे करणारा कोणालाही ग्रहणयोगाने अंधारात टाकणारा याचे स्थितीकडे दुर्लक्ष करून कसे चालेल.

असे जर आहे ! ! !

तर इतके लांबलचक वर्णन करीत बसण्याचे काय कारण होते ? थोडक्यात, सर्व स्थाने व सर्व ग्रह विचारात घ्यावे असे म्हणण्याने विषयाची एकाच वाक्यात पूर्तता करता आली नसती काय ? नाही. खात्रीने नाही असेच विचाराअंती म्हणावे लागेल. क्रमाक्रमाने उतरत्या गतीने एक एक स्थान व एक एक ग्रह याजबद्दल चिकित्सा करूनच धनऋण योग ठरवावा लागतो. आणि त्या अनुसरूनच स्थानांचा व ग्रहांचा क्रम दिला आहे. वरील एका वाक्यालाच प्राधान्य द्यावयाचे असेल तरीहि हरकत नाही. कमीतकमी श्रमात परिस्थितीची जाणीव करून घेता येईल. व ती अगदीच चूक ठरणार नाही.

केतू सोडून एकूण आठ ग्रह व कुंडलीतील एकूण बारा भाव. दोन्ही मिळून वीस संख्या होते. पापग्रहाने युक्त अथवा दृष्ट स्थाने किती. त्याचप्रमाणे अन्य पापग्रहाने युक्त अथवा दृष्ट ग्रह किती. याप्रमाणे एकूण येणारी संख्या निम्मेपेक्षा म्हणजे दहापेक्षा कमी असेल

तर ती जितकी अधिक कमी असेल तितका धनयोग अधिक आहे असे मानण्यास हरकत नाही. अशावेळी ज्या ज्या स्थानामध्ये पापग्रह असतील ते ग्रह त्या ठिकाणी उच्चस्थ अथवा स्वगृहस्थ असतील तर, ते शुभ स्थान समजावे. त्याचप्रमाणे त्या स्थानावर दृष्टीयोग करणारा पापग्रह जर उच्चस्थ अथवा स्वगृहस्थ असेल तर ती दृष्टी अशुभ मानू नये. ग्रहां-बद्दलहि असेच म्हणता येईल. एकादा ग्रह पापग्रहाचें दृष्टीत असेल किंवा पापग्रह त्याचे जवळ असेल अशा वेळी, तो ग्रह जर स्वगृहस्थ, उच्चस्थ, अथवा कारक स्थानांत असेल तर तो शुभयोगांत आहे असे मानावे.

या ठिकाणी कारकस्थानाचे स्पष्टीकरण केले पाहिजे.

रवि दशमांत, चंद्र चतुर्थांत, मंगळ तृतीयांत, बुध अष्टमांत, गुरु पंचमांत, शुक सप्तमांत, शनि ६ ७ ८ या स्थानांत, असे मानले आहे. अनुभवाने ते ते ग्रह त्या त्या स्थानांत कोणत्याहि राशींत असले तरी शुभफल देतात.

राहूचा फक्त स्थानयोग पाहावा. दृष्टीयोग पाहू नये. या पद्धतीने विचार करतांना, फक्त कुंडलीतील धनस्थानाकडे विशेष लक्ष पुरवावे. धनस्थान, ऋण-योग कारक ग्रह मंगळ व शनि यांनी युक्त अथवा दृष्ट असेल तर वरील रीतीने ग्रह व स्थाने शुभाधिक्य दाखवित असतील तरीही मोठा धनयोग मानता येणार नाही. ऋणयोग अनुभवाला लागेल, परंतु मरणापूर्वी ऋणमुक्त होण्याची बरीच शक्यता आहे असे अनुमान करण्यास हरकत नाही. मंगळ व शनि धन-स्थानात असले तर आर्थिक स्थिती समाधानकारक रहात नाही. ऋणयोग येतो परंतु त्यामधून बहुतांशी अब्रूनिशी बाहेर पडता येते असे अनुभवास येते.

वर कोणते विषयाचे ज्ञान होणे अवश्य आहे ते विषय दिले आहेत. त्यानंतर त्यांचें ज्ञान होण्याकरता कोणती स्थाने व ग्रह विचारात घेतले पाहिजेत त्यांचा खुलासा आहे. त्यावरून फलें कशी पहावयाची तें पाहू.

विषय व ते पाहण्याची कारक स्थाने

१. चरितार्थ चालण्याइतके धन मिळेल काय? कारक स्थानें धन व षष्ठ.

२. ऋणयोगाचा प्रसंग आहे काय? कारक स्थाने अष्टम व व्यय.

३. पूर्ण दारिद्र्ययोग आहे काय? कारक स्थाने धन, चतुर्थ व लाभ.

४. आर्थिकदृष्ट्या बरा वाईट काळ केव्हा? कारक स्थाने धन व लाभ.

५. धनप्राप्तीचे मार्ग कोणतें? कारक स्थानें धन, षष्ठ, सप्तम व दशम.

६. धनहानीचा योग असल्यास केव्हा व कशामुळें कारक स्थाने पंचम व नवम.

याप्रमाणें कारक स्थाने मानली आहेत.

ज्या विषयाचे फळ पहावयाचे असेल त्या विषयाचे कारक स्थानाचे शुभाशुभत्वाप्रमाणे फळ प्राप्त होईल.

शुभ स्थिती

१. स्थानाधिपति स्वक्षेत्रांत किंवा स्वतःचे उच्च राशीत असणे.

२. स्थानाधिपति शुभ ग्रहाने युक्त किंवा दृष्ट असणे,

३. स्थानाधिपति कारक स्थानांत असणें.

४. स्थानाधिपति अन्य कारक स्थानाधिपतीचे शुभ योगांत असणे.

५. कारक स्थान शुभग्रहाने युक्त किंवा दृष्ट असणें.

६. स्थानाधिपती लग्नाधिपतीबरोबर शुभयोगांत असणे.

अशुभ स्थिति

१. स्थानाधिपति स्वक्षेत्रापासून उलट स्थानात किंवा स्वतःचें नीच राशीत असणें.

२. स्थानाधिपती पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट असणें.

३. स्थानाधिपति कारक स्थानापासून अशुभ स्थानांत असणें ६।८।१२ ही अशुभ स्थानें होत.

४. स्थानाधिपति अन्य कारक स्थानाधिपतीचे अशुभ योगात असणे.

५. कारकस्थान अशुभग्रहाने युक्त किंवा दृष्ट असणे.


६. स्थानाधिपति लग्नाधिपतिबरोबर अशुभ योगात असणे.

अपवाद :— जन्मकुंडलीमध्ये गुरु किंवा शुक्र सुस्थितीत असतील तर अशुभ योगांची तीव्रता कमी होते.

समजुतीकरता उदाहरण.

जन्म शके १८२० पौष व. ५ इ. घ. २०।२२

॥ जन्मलग्न कुंडली ॥



शुभ स्थाने व शुभ ग्रह

१. लग्न शनीचे दृष्टींत आहे. परंतु शनि सप्तम या कारक स्थानांत.

२. तृतीय स्थान पापयोगरहीत.

३. चतुर्थस्थान शुभ व कारक ग्रह चंद्राने युक्त शनीचे दृष्टीत आहे परंतु ती दृष्टी ग्राह्य नाही.

४. षष्ठस्थान पापयोगरहित.

५. दशमस्थान पापयोगरहित.

६. लाभस्थान गुरूचे शुभदृष्टीत.

७. व्ययस्थान पापयोगरहित.

८. चंद्र चतुर्थात कारक स्थानात.

९. बुध अष्टमात कारक स्थानात.

१०. गुरु पंचमांत कारक स्थानात.

११. शुक्र सप्तमांत कारक स्थानात.

१२. शनि सप्तमांत कारक स्थानांत.

एकूण निम्मेपेक्षा अधिक प्रकार शुभस्थिति दाखवित असल्यामूळे, संपन्नस्थिति नसली तरी अन्नाला मोताद होण्याइकी निकृष्टावस्था नाही, असें मानण्यास हरकत नाही. धनस्थानात मंगळ असल्यामुळे, ऋणयोग आहेच. मात्र अब्रूवर घाला न येता मरणापूर्वी ऋणमुक्त होता येईल.

पूर्वार्जित धनलाभ नशिबात होता पण धनस्थानात नीच राशीत मंगळ, चतुर्थात चंद्र पण चतुर्थेश पापपीडित असा अष्टमांत व्ययस्थान चुलत्याचें दर्शक त्याचा स्वामीं स्वस्थानापासून अष्टमात पापपीडित यामुळें चुलत्याचें सुख मिळण्यापेक्षा त्यानीच मिळणारे इस्टेटीचा बराच अपहार केला.

चोरांकडून नुकसान होण्याचे दर्शक स्थान व्ययस्थान त्याचा स्वामी शुक्र वर दिल्याप्रमाणें अशुभ योगात यामळें घरफोडी होऊन ७–८ हजार रुपयांचा माल गेला.

कोर्टदरबाराचे खर्चाचें दर्शक हेच स्थान त्यामुळें इस्टेटीसंबंधी दाव्यांत कामी ३-४ हजार रुपये गेले.

सदर कुंडली धारण करणारांची स्थिती वय वर्षे ५६ शके १८७६ पर्यंत वरील वर्णनाप्रमाणे आहे.

वयवर्ष ३० शके १८५० पासून ऋणयोग सुरू झाला.

वयवर्ष ३३ शके १८५३ पासून थोडी सुधारणा होऊ लागली.

वयवर्ष ४५ शके १८६५ मध्ये ऋणमुक्तता झाली. पुन्हा लगेच थोड्या वेळाने आर्थिक बाजू घसरत जाऊन वय ५४ शके १८७४ मध्ये पूर्णपणे ऋणयोगास सुरवात झाली. व तो योग वय ५६ शके १८७६ पर्यंत सुरूच आहे.

वय ५७ शके १८७७ पासून सुधारणा होऊ लागेल.

वय ६९ शके १८८९ मध्ये पुन्हा ऋणमुक्त स्थिति प्राप्त होईल.

मुलगा कर्तबगार झाल्यामुळे वय ६८ शके १८८८ मध्येच ऋणमुक्तता होण्याची लक्षणे दिसत आहेत.

मंगळाची समस्या !

लेखक— शरद रेगे (ज्यो. पंडित)

हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे मनुष्य आपल्या पूर्वकर्मानुसार आपले आयुष्यांतील सुखदुःख भोगत असतो. व ते भोगण्याची कालमर्यादाच फक्त ग्रहांच्या ज्ञानावरून मोजता येते. म्हणजें ग्रह हे प्रत्यक्ष परिणाम करण्यापेक्षां फक्त कालाचे मापन करतात. म्हणूनच घटना घालतात. त्या केव्हा घडतात त्यांचा कालनिर्णय फक्त ग्रहांवरून घेतला जातो. तर मग विवाहादि घटना ठरल्याप्रमाणे घडणारच. तेव्हां मंगळाचा विचार करण्याची जरूरच भासत नाही.

गुणमेलन कोष्टक :- वधुवरांचे विवाह जमवितांवा भारतांत ज्योतिषशास्त्राचा आधार घेऊन वधुवरांचे पत्रिकांचा गुणमेलनदृष्टचा विचार करून पत्रिका जमवितांना वर्ण, योनि, गण, राशी, नाडी, नक्षत्र, कुजदोष (मंगळाचा दोष) इत्यादि गोष्टींचा विचार करून ज्योतिषी पत्रिकाचे गुणमेलन करतात. व पत्रिका जमते किंवा नाही याचा निष्कर्ष घेतात.

साधारणतः १८ गुणाचेपेक्षा जास्त गुण जमणाऱ्या पत्रिका असल्या म्हणजे विवाह करण्यास हरकत नाही. असे मत ज्योतिर्विद देतात. परंतु हे गुण पाहातांनाच पत्रिका मंगळाची आहे का याकडे ज्योतिर्विदांचे बारकाईने लक्ष जाते. वधुवरांपैकी एखादी पत्रिका मंगळाची नसेल व दुसरी मंगळाची असेल तर ती जमण्याबाबतचा विचार तेथेच थांबतो.

दोन पत्रिका (वधुवरांच्या) विचारात घेताना लग्न-कुंडलीत गुणमेलन कोष्टकांतून जरी ३६ गुण जमत असले व एका कुंडलीला मंगळाचा दोष असला तर त्या पत्रिका विवाहास पात्र ठरत नाहीत अशी बहुतेकांची समजूत असल्याने पुढील हालचाली थांबवण्यात येतात.

पत्रिकेतील मंगळ : लग्न (प्रथमस्थान) सुखस्थान (चतुर्थस्थान) जामित्र (सप्तमस्थान) मृत्युस्थान (अष्टमस्थान) व व्यय (बारावे स्थान) या स्थानांत मंगळ असेल तर ती पत्रिका मंगळाची आहे असे मानले जाते. व या स्थानांपैकी कोणत्याहि स्थानांत वराच्या पत्रिकेत मंगळ असेल तर तो त्याच्या स्त्रीस मारक होतो. व वधूच्या पत्रिकेत त्याच स्थानांपैकी कोठेहि मंगळ असल्यास तो तिच्या पतीला मारक होतो अशी कल्पना केली जाते. मात्र वधुवरांच्या दोन्ही पत्रिकांत वर दिलेल्या पांच स्थानांपैकी कोणत्याहि स्थानांत मंगळ असेल तर बाधक होत नाही असे कांही ग्रंथकारांचे मत आहे.

निरनिराळी मतांतरे—: वधुवरांपैकी एकाचे पत्रिकेत सप्तम स्थानीं मंगळ असून दुसऱ्या पत्रिकेत सप्तमस्थानात शनि असेल अगर शनिची दृष्टी असेल तर ते ग्राह्य धरून विवाह करावा असे कांहीचे मत आहे. काही ज्योतिर्विद सप्तमस्थानांतील राशीस्वामीपासून १, ४, ७, ८, १२, या स्थानी मंगळ असेल तर तो अनिष्ट मानावा असे म्हणतात. तर काहींच्या मते चंद्रापासून १, ४, ७, ९, १२, या स्थानी असलेला मंगळ अनिष्ट आहे. अशाप्रकारे निरनिराळ्या मतें निरनिराळ्या ग्रंथकारांनी सांगितली आहेत परंतु कशाहि स्थितींतील म्हणजे लग्न-कुंडलीतील, राशी कुंडलीतील अगर सप्तमाच्या राशी-स्वामीपासून १, ४, ७, ८, १२, स्थानीं येणारा मंगळ असलातरी तो अनिष्ट असून विवाह जमण्यास अडथळा आणणारा असाच सांगितला आहे.

वरसंशोधनाचा आटापिटा:-कुंडलीतील बारा स्थाना-पैकी पांच स्थाने मंगळास विवाहदृष्टचा अनिष्ट सांगितलेली आहेत. त्यामुळे बऱ्याचशा कुंडल्या मंगळाच्या असल्यामुळे विवाह जुळविणे मोठे कठीण होऊन बसले आहे. एखादे मुलीचे पत्रिकेत मंगळ असला तर मंगळाचीच पत्रिका असलेला वर शोधण्याचा आटापिटा मुलीचे पाल-कांस करावा लागतो व मुलाच्या पत्रिकेत मंगळ असेल तर मंगळाची पत्रिका असलेली मुलगी आल्याशिवाय विवाह

करायचा नाही. म्हणून मुलीचाहि विवाह लवकर जमत नाही असा प्रकार पुष्कळ ठिकाणी पाहावयास सांपडतो.

मंगळ हा पापग्रह असून तो स्वभावतःच तीव्र गुणधर्माचा आहे. तो ज्या स्थानांत असतो त्या स्थानावरून ज्या व्यक्तीचा अगर ज्या गोष्टीचा विचार होतो त्याबाबत तो मारक (पीडाकारक) असतो असे शास्त्रकार म्हणतात. मंगळ हा जरी निसर्गतःच पापग्रह मानला असला तरी त्याचे शुभाशुभ परिणाम हे केवळ त्याच्या निसर्गदत्त गुणधर्मावर अवलंबून नसतात तर तो ज्या स्थानांत, राशीत, नक्षत्राजवळ, ताऱ्याजवळ अगर ज्या ग्रहाच्या सान्निध्यात अगर योगात असेल त्यावर अवलंबून असतात. म्हणजे केवळ लग्न, चतुर्थ, सप्तम, अष्टम व व्यय स्थानांत मंगळ आहे एवढ्यावरून ती पत्रिका विवाहास अनिष्ट आहे अशी कल्पना करणे चूक आहे.

सर्वच पत्रिकांत मारक :– मंगळ ज्या स्थानांत असतो त्या स्थानास मारक होतो असे ग्राह्य धरल्यास व तो ज्या ज्या स्थानावर दृष्टीयोग करतो त्या त्या स्थानास मारक आहे असे गृहीत धरल्यास पत्रिकेतील कोणत्याहि स्थानांतील मंगळ ज्या स्थानात असेल ते व ज्यावर दृष्टीयोग करील ती स्थाने दूषीत होतील आणि त्यामुळे कोणत्या ना कोणत्या गोष्टीबद्दल तो मारक राहिलच तेव्हा असा मंगळ असताना केवळ विवाहामुळे वरील परिणाम बदलू शकणार नाहीत.

सुख दुःख बरोबरच येते:– फलज्योतिषशास्त्र तत्त्वानुसार जन्मणाऱ्या व्यक्तीच्या कुंडलीतील शुभाशुभ ग्रहांचे परिणाम जन्मणाऱ्या व्यक्तीसच मिळतात दुसऱ्यास नाही. म्हणजे ज्याचे त्याचे दैव त्याला त्यालाच भोगावे लागते. तेव्हा विवाहसुखाचा योग जर एखाद्या व्यक्तीच्या जन्मकुंडलीत नसेलच तर वधूच्या कुंडलीतील ग्रहावरूनच थोडेच त्याला सुख मिळणार? अगर एखाद्या व्यक्तीला दीर्घायुष्य योग असेल व त्याचा विवाह मंगळाच्या कुंडलीच्या मुलीशी झाल्यास तो मंगळ (वधूच्या पत्रिकेतील) त्यास मारक होईल असे म्हणणे चूक होईल. म्हणजेच जन्मणारी प्रत्येक व्यक्ति आपल्या आयुष्यात उपभोगावयाचे सुख व भोगावयाचे दु.ख आपल्याबरोबरच आणत असते.


पत्रिका बरोबर नसतात :– विवाह पत्रिका जमविताना वधूवरांच्या सामान्यतः लग्नकुंडलीत अगर राशीकुंडलीवरून मंगळ विचार केला जातो. बहुतांशी तंतोतंत बरोबर जन्मवेळ मिळू शकत नाही. त्यामुळे केलेल्या पत्रिकांत थोडेतरी वैगुण्य रहातेच. व भावचलित पत्रिकांचा विचार बहुतांशी केला जात नाही. त्यामुळे पत्रिकेत मंगळाचा दोष निश्चित आहे किंवा नाही याची कल्पना ज्योतिर्विदांना येत नाही. कारण पुष्कळशा जन्मलग्न पत्रिकांत द्वादश, चतुर्थ व सप्तमस्थानांत असणारा मंगळ भावचलित पत्रिकेत एकादश, तृतीय व षष्ठ स्थानात येतो. व त्यामुळे मंगळाचा विवाहदृष्ट्या पहाण्यात येणारा दोष नाहीसा होतो. म्हणजे पत्रिकेतील मंगळाचा दोष अजमावयाचा असेल तर वधूवरांच्या "भावचलित" पत्रिकांचाच विचार व्हावयास हवा. परंतु तो होत नाही. यावरून लग्नकुंडली (ढोबळ) अगर राशीकुंडलीवरून पहाण्यात येणारा मंगळ हा शास्त्रशुद्धदृष्ट्या पहिला जात नाही असेच म्हणावे लागेल.

भावचलितांत फरक होतो.– कित्येकवेळा ढोबळ लग्नकुंडल्यात मंगळाचा विवाहदृष्ट्या दोष दिसत नाही. म्हणजे व्यय, लग्न, चतुर्थ, सप्तम व अष्टम या स्थानांत मंगळ नसतो. परतु त्याच पत्रिका भावचलित मांडल्यास ढोबळ पत्रिकात असणारा द्वितीय, पंचम, अगर नवम स्थानांतील मंगळ अनुक्रमे लग्न, चतुर्थ अगर अष्टमात येऊ शकतो. व तो मंगळ दुष्ट ठरतो. म्हणून मंगळाचा विचार विवाहदृष्ट्या करावयाचा झाल्यास वधूवरांच्या भावचलित पत्रिकेवरूनच व्हावयास हवा. व तसा न केला गेल्यास व केवळ ढोबळ पत्रिकेवरून मंगळाचा दोष ग्राह्य धरल्यास पत्रिका दाखविणाऱ्यावर अन्याय केला जातो असे म्हणणे रास्त होईल.

जुन्या ग्रंथांत आधार नाहीत :– अशा रीतीने जर मंगळाचा विचार केला गेला तरच तो योग्य होईल व तसा (भावचलिताप्रमाणे) करण्याचा त्रास कोणी घेऊ शकणार नसेल तर मग मंगळ आहे किंवा नाही हे पहाण्याची जरूरीच नाही. वास्तविक पहाता ज्योतिषशास्त्राचे पंडित वराहमिहीर यांचा प्रसिद्ध ग्रंथ बृहत्जातक तसेंच मुहूर्त चिंतामणी, मुहूर्त मार्तंड, सारावली, इत्यादि ग्रंथांतून विवाहघटितांचा विस्तृत विचार केलेला आंढळतो. परंतु त्यात मंगळाविषयी कांहीहि उल्लेख दिसत नाही. वधूचे सप्तम व अष्टमस्थान खलग्रहांनी दूषीत नसावे एवढेच त्यात सांगितले आहे. याचा अर्थ

मंगळाच्या दोषाची कल्पना पौर्वात्यांना नसावी व हा दोष अर्वाचीन म्हणजे गेल्या शेदोनशें वर्षांतच उपलब्ध झाला असावा. यावरून त्यास किती महत्व द्यावे याचा विचार ज्योतिष्यांनीच करावा.

विरुद्ध उदाहरणें सांपडतात :– आमच्या पहाण्यांत अशी काही उदाहरणे आहेत की, नवऱ्याचे कुंडलीत मंगळ आहे. तर बायकोच्या पत्रिकेत मंगळ नसून संसार व्यवस्थित चालला आहे. कांही स्त्रियांच्या कुंडलीत मंगळ आहे तर त्यांचे पतीच्या कुंडल्यात मंगळ नसून सांसारिक स्वास्थ्य त्यांना मिळत आहे. या उलट दोघांच्या पत्रिकेत मंगळ असून त्यांचे जीवन कष्टप्रद व दुःखदायक जात असल्याचीहि उदाहरणे आमच्या पहाण्यांत आहेत. तेव्हा मंगळाचा परिणाम भयानक असतो असे म्हणणें योग्य वाटत नाही.



मेदिनीय ज्योतिष

होरारत्न *आर. जी. सप्रे* B. S. C.

"ज्ञानभांडाराची कुलूपे उघडली जात नसल्या-कारणाने त्याच्या किल्ल्या गंजून चालल्या आहेत" असे एका शास्त्रज्ञाने म्हटले आहे. किती महत्वाचे वाक्य आहे ! वेदांत, मंत्रशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिष अध्यात्मशास्त्र वगैरे शास्त्रांवर प्राचीन ऋषीमुनी व आचार्य यांनी एवढी मोठी ग्रंथसंपत्ती निर्माण करून ठेवली आहे की, त्याकडे नजर टाकल्यास मति कुंठित होते. ज्या काळात हल्लीप्रमाणे छपाईची साधने नव्हती त्यावेळी वेद, योगशास्त्र इत्यादिवरील पर्वतप्राय: लेखन पाहून आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाही. अर्थातच हे महान कार्य ! परंतु आधि भगवताचे। अधिष्ठान पाहिजे । म्हणजेच अदृश्य दैवी शक्तीच्या सहाय्यावाचून झाले नाही अशी खात्री पटते.

फलज्योतिषशास्त्राचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून पाश्चिमात्य ज्योतिर्विदांचे असे म्हणणे आहे की, "हे शास्त्र दैववाद शिकवीत नाही, तर आत्मिक पुनर्देहधारित्वाच्या तत्वास अनुलक्षून प्रारब्ध म्हणजे काय त्याचा खुलासा करते. तसेच पूर्वजन्मोद्भूत गतिमान वासना व विचार यांचे फलस्वरूपी क्रियमाण त्याचा खुलासा करते. खरे कर्तृत्व, स्वातंत्र्य हे ज्ञानजन्य असून ते भूतकालीन प्रमादावरून आगामी जन्मव्यवस्था नियमित करण्याचे सामर्थ्य देते. यातच प्रारब्ध व कर्तृत्व स्वातंत्र्य ह्यांचे सर्व रहस्य गर्भीत आहे. त्याच-प्रमाणे मि. सी. ए. हॉल म्हणतात :–

'We sow cut thoughts and reap the action.'

We sow the action and reap the habits.

We sow the habits and reap the character.

We sow the character and reap the destiny. But we cannot control chara-cter, unless we control the thought.

ह्यावरूनच विचाराचे सामर्थ्य केवढे आहे त्याची साक्ष पटते.

सुवर्ण महोत्सव कौस्तुभग्रंथ ह्या ग्रंथावर नुकताच विस्तृत अभिप्राय लिहिण्याची संधी सांपडली. त्या ग्रंथाचे भाग १ पृष्ठ १४ वर न्यायरत्न डॉ. विनोद ह्यांनी "पूर्वाचार्यांची आधुनिकता" ह्याविषयी अत्यंत महत्वाचे विवेचन केले आहे तें शास्त्र जिज्ञासूंना उपयुक्त असल्याकारणाने त्याचा थोडक्यात सारांश देत आहे. त्यावरून आजच्या संशोधनावर प्राचीन ऋषीमुनींनी फार पुरातन काळांतच प्रकाश टाकलेला आहे हे स्पष्ट होते.

पराशर, जैमिनी व वराहमिहिर ही त्रयी म्हणजे भारतीय फलज्योतिषाचे ब्रह्मा, विष्णु, महेश होते. पराशरांचे होराशास्त्र हा ज्योतिषाचा आधारग्रंथ होय, पराशर हा ज्योतिर्विदांचा आद्यपिता होय.

पराशराला Curvature Theory of Space माहित होती. ग्रहांच्या व नक्षत्राच्या गति, त्यांचे पृथ्वीवरील जीवनावर होणारे परिणाम व प्रतिक्रिया याविषयी पराशराने प्रस्थापिलेले सिद्धांत व बांधलेली अनुमाने इतकी अचूक व संग्राहक आहेत की, हा महर्षि त्रिकालज्ञ असला पाहिजे असे वाटू लागते. जैमिनि हा असाच महान् ज्योतिर्विद झाला. त्याचे सिद्धांत इतके मूलगामी आहेत की, त्यांचा स्थूलसादेखील परिचय करून देणे सर्वथैव अशक्य आहे. वराहमिहिराची प्रतिभा इतकी सर्वंकश आहे की, हल्ली चर्चा विषय असलेल्या Inflation Problem वर, आणि वस्तूंच्या किंमती का वाढतात अथवा कमी होतात याबद्दल त्याने स्वतःचे सिद्धांत बसविले होते. National Economy राष्ट्रीय अर्थकारण, राष्ट्रीय पुनर्रचना, या विषयांचा त्याने विचार केला असून, खगोल व फलज्योतिष या शास्त्रांचा सूक्ष्म अभ्यास केल्याशिवाय व समन्वय साधल्याशिवाय राष्ट्रीय पुनर्व्यवस्थापन अशक्य आहे अशी त्याची श्रद्धा होती. वराहमिहिर याने सूर्योपासना केली व साक्षात् सूर्यनारायणाच्या किरणांचे उपयोजन करून त्याने सर्व विश्व व्याहाळले ! सूर्यकिरणाचे नेत्र करून त्याने आकाशस्थ गोलांच्या गति व परिणाम निश्चित केले, अशी एक सत्यकथा उपलब्ध आहे. सूर्योपासना ही ज्योतिर्विद्येच्या जिज्ञासूंना सर्वथैव उपकारक अशी उपासना आहे, हे यावरून स्पष्ट होते.

भगवान पतंजलीनी योगदर्शनाच्या विभूतिपादांत लिहिलेल्या सूत्रांचा विनियोग केल्यास वराहमिहिराचे हे योगप्रयोग आजदेखील अशक्य वाटणार नाहीत. ध्यान-धारणा व समाधि यांच्या संयोगाला 'संयम' अशी परिभाषिक संज्ञा आहे. या संयमाला वाटेल त्या बिंदूवर किंवा वस्तूवर केंद्रित केले की, तेथील शक्ती, प्रकाश किंवा तत्वरहस्ये एकदम व संपूर्णपणे उपलब्ध होतात. सर्व तऱ्हेच्या विभूति किंवा सिद्धी या योग्यशास्त्रीय संयम प्रयोगाने उपलब्ध करता येतात. हा भगवान पतंजलीचा सिध्दांत सर्वमान्य आहे. 'संयमाचि फलें दुसऱ्या उत्कट उपासनेनेहि मोठ्या प्रमाणात प्राप्त होऊ शकतात. ज्योतिषशास्त्राच्या प्रत्येक अभ्यासकाने उत्कटतेने उपासना करीत राहिलें पाहिजे.'

वरील उताऱ्यावरून बऱ्याच महान तत्वांचा स्पष्ट उलगडा होत असल्याचे दिसून येते.

पूर्वीच्या ऋषि-महर्षीनी काढलेले सिध्दांत आजच्या विज्ञान युगांत अचूक असल्याचे पश्चिमात्य शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. त्यावेळेस हल्लीसारखी साधनें उपलब्ध नसतांना इतके अचूक सिद्धांत काढलेले पाहून आश्चर्य वाटते. माझ्या इंग्लंडमध्ये प्रसिध्द केलेल्या लेखमालेंतून (न्यू वर्ल्ड ॲस्ट्रॉलॉजीद्वारे) त्याचा खुलासा केला आहे. विशेषतः Precession of the equinoxes त्यासंबधी पूर्वाचार्यांनी मांडलेले सिध्दांत व केलेलें गणित पाश्चिमात्य शास्त्रज्ञांनी आता अचूक असल्याचे मान्य केले आहे ही गोष्टच पूर्वाचार्यांची प्रतिभा सिध्द करीत आहे.

मेदिनीय ज्योतिष हा खगोलशास्त्रांतील महत्वाचा भाग असून त्यावरून जागतिक परिस्थिती, हवामानाचा निर्णय करण्यास मदत मिळते. त्यासाठी निरनिराळ्या कुंडल्यांची आवश्यकता असून त्या बिनदोष असणे अत्यंत आवश्यक आहे.

जागतिक भवितव्याचे दृष्टीने पुढे दिलेल्या कुंडल्या विचारात घेण्यासारख्या असून शास्त्र जिज्ञासूनी त्या कागदावर मांडल्यास त्यांतील विविध प्रकारचे योग समजून येण्यास मदत होईल.

१ इंग्लंडची राष्ट्रीय कुंडली –

१४।१०।१७६६ दुपारी ४।५९ लो. टाईम. सायन प्रथम स्थान मेष २९ ते मिथुन ४ अंश असून नेपच्यून वृषभ २४ अंशात वक्री आहे. द्वितीय मिथुन ४ ते २४

तृतीय कर्क १२ पर्यंत, चतुर्थ सिंह २ पर्यंत पंचम कन्या २ पर्यंत षष्ठ तूळ २९ पर्यंत रवि–तूळ २७–६ आहे. सप्तम तूळ २९ ते धनु ४ असून शुक्र तूळ २९।४८ व बुध वृश्चिक २–३ वक्री आहे. अष्टमस्थान धनु २४ पर्यंत असून मंगळ त्याठिकाणी १३ ६ आहे. नवमस्थान धनु २४ मकर १२ असून त्यात हर्षल धनु २४-४२ दशम मकर १२ ते कुंभ २ लाभस्थान कुंभ २ ते मीन २ व द्वादशस्थान मेष २९ पर्यंत असून प्लूटो मीन ६–१८ वक्री आहे. अक्षांशानुसार प्रथम व सप्तमस्थाने ३५ अंशाची बसतात. व तृतीय नवमस्थाने फक्त १८ अंशाची बसतात हे लक्षांत घेण्यासारखे आहे.

२ यू. एस. ए. राष्ट्रीय कुंडली:–

स्वातंत्र्याचा जाहीरनामा ता. ४।७।१७७६ पहाटे २–१७ लो. मी. टाईम (फिलाडेलल्फिया) लग्न मिथुन ८–४७ हर्षल ८ ५० व मंगळ २०।५७ धनस्थान कर्क २तेथेच शुक्र २—२०, गुरु ५–४८, रवि १२–५३ आहे. तृतीय कर्क २२ असून बुध २४-३२, व राहू सिंह ७–३५ चतुर्थस्थान सिंह १५ पंचम कन्या १४ त्यात नेप. २२–७ व तूळेत शनि १४–५० आहे. षष्ठ तूळ २५ नवमांत प्लूटो मकर २७-५४ आहे. दशम कुंभ १५ असून त्यांत चंद्र १८- ६ अंश आहे. लाभस्थानी मीन राशीचा १४ वा अंश व व्ययस्थानी मेष २५ असून मंगळ हर्षल, शुक्र-गुरु वगैरे योग विचारांत घेण्यासारखे आहेत. गेल्या सुमारे दोनशें वर्षाचा काल-खंड व त्यांतील उत्कर्षापकर्ष लक्षांत घेतां वरील दोन्ही कुंडल्या एकमेकांस पूरक ठरतील.

३. **यू. एस. एस. आर. राष्ट्रीय कुंडली** लेनिनग्राड नोव्हेंबर ७. इ. स. १९१७ ता. २२। ४५ मिनिटे तनुस्थानीं सिंह राशीचा २१ वा अंश असून त्यांत सिंहराशीचा चंद्र २७ ३० आहे. मंगळ कन्या २ त्याच ठिकाणी असून धनस्थानारंभ कन्या ७ अंश. तृतीय कन्या २८, चतुर्थ वृश्चिक ० असून रवि १४॥ व बुध १६ अंशांत आहेत. पंचम धनु २५ व षष्ठ मकर २५ असून पंचमांत शुक्र ०-१५ मकरेत आहे. षष्ठांत हर्शल १९॥ कुंभ राशीत असून सप्तम भावारंभ कुंभ २१ आहे, अष्टम मीन ७ नवम मेष २८ व दशम वृषभ ० असून दशमात गुरु मिथुन ९, वक्री आहे. लाभस्थानारंभ मिथुन १५ असून कर्क ५ अंशात वक्री प्लूटो आहे. द्वादश स्थानारंभ कर्क २५ असून त्यात नेपच्यून ७ अंशात वक्री व शनि १४ दोन्ही सिंह राशीत आहेत.

"फोरकास्टिंग वर्ल्ड इव्हेन्टस" ह्या ग्रंथांत पुढील कुंडल्यांचे विवेचन केले असून त्यातील काही ह्या ठिकाणी उपयोगी पडतील म्हणून पुढे दिल्या आहेत.
४ **ब्रिटीश इंडिया** जून २३ इ. स. १७५७ लग्न कर्क दोन अंश, धनस्थानी सिंह २ व नेपच्यून २ अंशात आहे तृतीय कन्या २, चतुर्थ तूळ २, पंचम वृश्चिक २, त्यात गुरु २० अंश, षष्ट धनु २, सप्तम मकर २, अष्टम कुंभ २, आहे व तेथे शनि षष्ट अंशात आहे. नवम मीन २ असून त्यात मीन २३ नेपच्यून, दशम मेष २, लाभस्थान वृषभ २, त्यात मंगळ २३ अंश व व्ययस्थानी मिथुन २ रा अंश उदित होत आहे. वरील योगावरून गेल्या दोनशे वर्षांचा भारताचा इतिहास व उत्कर्षापकर्ष ह्यांचा उलगडा होईल.

क्लाईव्हने प्लासीची लढाई जिंकून ता. २३।६।१७५० रोजी ब्रिटीश इन्डियाची स्थापना झाली आणि बंगाल व बिहार हे प्रांत मिळाले. इ. स. १७७२ मध्ये वॉरन हेस्टिंग गव्हर्नर होऊन १७७९ ते १७८२ मराठा युद्ध (शनि मंगळ युति) झाले. ता. १०।५।१८५७ रोजीं मीरत येथे दंगल सुरू झाली त्यावेळी रवि वृषभ क०, नेपच्यून मूळ हर्षल प्रती युति, गोचर हर्षल मूळ मंगळ युति, शनि कर्क १० व मंगळ वृषभ २७ चालू शतकाचा इतिहास ताजा असल्याकारणाने तो देण्याची जरूरी नाही.

५ **पाकिस्तान**– स्थापना ता. १५।८ । १९४७ शुक्रवार लग्नी सिंह २१ अंश उदित असून रवि २१–३० आहे. व्ययस्थानी सिंहेत चंद्र ४, बुध ८, शनि १३ व शुक्र १६ अंशात आहेत. धनस्थान कन्या २१ असून त्यांत नेपच्यून तूळ ८–५१ अंशात आहे. तृतीय तूळ २१ असून गुरु १९ वृश्चिक राशीत आहे. चतुर्थ वृश्चिक २१ अंश पंचम धनु २१, षष्ठ मकर, सप्तम कुंभ, अष्टम मीन, नवम मेष व दशम वृषभ २१ अंश आहेत. लाभस्थानी मिथुनेचा २१ वा अंश आहे. वरील कुंडलीत सिंह राशीत होणारे युतियोग व मंगळ–हर्षल योग विचार करण्यासारखे आहेत.

६ **भारत**– ता. २६।२।१९५० ची राष्ट्रीय कुंडली लग्न कुंभ ६ अंश असून रवि त्याच अंशात व गुरू कुंभ १२–२३ आणि शुक्र २३–५० धनस्थान मीन

६ अंश, तृतीय मेष व चतुर्थ वृषभ ६ अंश आहेत. चतुर्थांत चंद्र पंचम मिथुन ६, हर्षल कर्क १, वक्री आहे. षष्ठस्थान कर्क ६, सप्तम सिंह, अष्टम कन्या ६ व त्यात शनि ८–४५ वक्री आहे. नवम तूळ ६, त्यात मंगळ ९–२३ गुरु १७–२० आहे. दशम वृश्चिक ६, लाभस्थान धनु ६, व व्ययस्थान मकर ६ असून त्यात बुध १८–२८ आहे, अष्टमस्थ शनि व इतर योग परिस्थितीवर प्रकाश टाकीत आहेत.

७ ता. ९।६।१९६४ ची नवीन मंत्रि मंडळाची घटना सकाळी ११-२० ची मंत्री (निरयन कुंडली) लग्न सिंह असून पंचमात केतू, सप्तमात शनि, नवमात गुरु, दशमात मंगळ बुध रवि व चंद्र आहेत, लाभस्थानी शुक्र राहू असून नवमांश कुंडलीत सिंह लग्न व तेथेंच रवि तुळेत गुरु, मकरेत राहू, मंगळ शनि शुक्र, मीनेत बुध वृषभेत चंद्र, ह्याप्रमाणे नवमांश कुंडली आहे.

८ पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री ता. ९–१० १९०४ (२–१०–१९०४ नव्हे) इ. घ. १२-३२ सूर्य ५–२२ लग्न ७।२७ मकरेत शनि, कुंभेत केतू, मेषेंत गुरू, सिंहेत राहू, मंगळ, कन्येत रवि, चंद्र, बुध तूळेंत शुक्र ह्याप्रमाणे कुंडली असून विशेष म्हणजे ता. ९।६।१९६४ रोजी नवमाशांत राहू, मंगळ, शनि, शुक्र मकरेत आहेत, व गोचर कुंडलींत रवि, चंद्र, बुध, मंगळ एकाच राशीत तर जन्मकुंडलीत ते एकाच राशीत आहेत.

वरील सर्व कुंडल्यांचा तौलनिक अभ्यास करून पुढील ग्रहयोग विशेषत: मोठ्या गोलाचे युति, प्रतियुति वगैरे योगशास्त्रजिज्ञासूनी विचारांत घेण्यासारखे आहेत.

जागतिक घडामोडीचे दृष्टीने त्याचप्रमाणे नैसर्गिक अपघात, उत्पात वगैरे दृष्टीने वरील सर्व कुंडल्या एकत्रित करून विचार केल्यास शास्त्रीय सिद्धांत स्पष्ट होण्यास त्यापासून मदत मिळेल यांत शंका नाही.

विवाहाची कालमर्यादा

लेखक—श्रीकृष्ण अ. जकातदार, ज्योतिर्मार्तण्ड

समाजांत कांहीं धार्मिक रूढी आणि परंपरा मान्यता पावलेल्या असतात. एक काळ असा होता की, अष्टवर्षा भवेत् कन्या! अशा समजुतीने मुलींचे विवाह तिच्या वयाच्या आठव्या वर्षीच होत असत. आज काळ बदललेला आहे. जीवनकलहाच्या एका विशिष्ट चाकोरीतून समाज नेहमी जात असतो. जीवनकलहाचे मार्ग बदलतात, त्या अनुरोधाने त्याचे विचार, त्याच्या श्रद्धा, त्याचे आचार-विचार हेहि बदलत असतात.

सध्याच्या आर्थिक संक्रमणाच्या काळांत पुरुष जसा स्वतःच्या पायावर उभा आहे त्याचप्रमाणे स्त्रीहि आर्थिक स्वातंत्र्य संपादन करून, आपल्या पायावर उभी राहूं इच्छित आहे. कुटुंब - नियोजनाची जाणीव आज निदान मध्यमवर्गातील कुटुंबांना तीव्रतेने होत आहे. याचाच परिणाम आज असा झाला आहे कीं, मुलगी किमान मिळवती झाल्याखेरीज तिला लग्नाच्या पाशांत गुंतवू नये, असे विचारवंतांनां वाटू लागले आहे.

हे सर्व जरी खरे असले तरी आर्थिकदृष्टया स्वतंत्र असलेल्या मुलींची लग्नेदेखील कां लांबणीवर पडतात? या विषयाचा छडा लावतांना त्या मुलीवर आध्यात्मिक, आधिदैविक सत्ता गाजविणाऱ्या दिव्यव्यक्तीकडे वळणे भाग आहे. कुंडलीतील ग्रहांची स्थाने, या बाबतीत आपल्याला मार्गदर्शन करू शकतील असे मला वाटते ग्रहांची मानवी जीवनावर परिणाम होत असतो याबद्दल पाश्चिमात्य तज्ञांचे आणि शास्त्रकारांचे एकमत झालेले आहे.

अर्थात हिंदु धर्मशास्त्रानुसार पूर्वकर्मानुसार आपल्या आयुष्यांतील सुख, दुःखाविषयी पूर्वाचार्यांनी ज्योतिष-शास्त्रावर उत्तम ग्रंथ लिहून सिद्धांत ठरविले आहेत व ते वेळोवेळी अनुभवास येत असतात. विवाहास उशीर होण्यास हल्लीची परिस्थती जरी कारणीभूत असली तरी अशा सुशिक्षित मुली अगर मुलगे हे आर्थिकदृष्टया कार्यक्षम असूनहि त्यांचे विवाह वयाच्या ३२ ते ३५ च्या पुढे झालेले दिसून येतात. तरी ज्योतिषशास्त्रदृष्टया असे कां? हे जाणून घेण्यासाठी आपल्याला प्रथम जन्म-पत्रिकेंत लवकर विवाह होणारे योग कोणते याचा विचार करणे आवश्यक आहे.

लवकर विवाह घडविणारे योग कोणते? विशेषतः कुंडलीचा प्रामुख्याने विचार करता १. कुंडलीत रवि, शुक्र हे ग्रह बलवान असून, पाप-विरहित असल्यास लवकर विवाह घडवितात.

२. शुभग्रह गुरू, चंद्र ह्या ग्रहांची पंचम, सप्तम स्थानांवर संपूर्ण शुभदृष्टी असता विवाह लौकर होतात. तसेच,

३. प्रथम, सप्तम भाग्य या स्थानात शुभग्रह असून पापग्रहाने ते दूषित नसल्यास विवाह लौकर होतात.

४. नवम, सप्तम आणि लग्न ह्या स्थानात उच्च राशीस अथवा स्वक्षेत्री किंवा मित्रगृही शुक्र हा विवाह लवकर घडवून आणून भाग्योदयहि चांगला करतो.

५. मुलीच्या कुंडलीत रवि बलवान, मुलांच्या कुंडलीत शुक्र बलवान असून १।५।७।९ ह्या स्थानात असता विवाह लवकर होतो.

आणि विलंब योग कोणते?

ह्या सर्व गोष्टीचा सूक्ष्म विचार केल्यानंतर विवाहास विलंब का होतो? शास्त्रीयदृष्टया खालील प्रमेयाकडे लक्ष दिल्यानंतर ते सहज लक्षांत येईल.

विवाहाचा विचार करताना प्रथम, लग्न, पंचम व सप्तम ह्या स्थानांचा विचार केला पाहिजे. हा विचार करीत असता, पंचमेश, लग्नेश व सप्तमेश षष्ठांत, अष्टमात, व्ययात असताना विवाहास हमखास

विलंब करतो. तसेच ह्या स्थानात कोणत्याहि राशीचा शनि असल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतात.

विशेषत: १।५।७ ह्या स्थानात मेष, धनु, मकर ह्या निमवंध्या राशी आणि मिथुन, सिंह, कन्या ह्या वंध्या राशि यांचे प्राबल्य प्रामुख्याने दिसून येते. ह्याचा अर्थ सप्तमात शनि, हर्षल, शुक्र हे ग्रह तेथें असतील तर विवाहास ३२ च्या पुढे काल दर्शवितो. इतकेच काय सप्तमेश शनि हा ३।६।८।१२ ह्या स्थानी असल्यास विवाह न होणे ही लक्षणे आणतो.

दुसरे पंचम, सप्तम, द्वादश, षष्ठ, या स्थानांत शनि मंगळ, हर्षल—राहू, शनि, हर्षल, बुध, शनि, ह्या युत्या विवाहास अडथळे आणून विवाहास विलंब करतात पण विवाह होणे दुरापास्त करून ठेवतात. ह्याचे कारण पंचम स्थान हे कुंडलीत वैषयिक स्थान असून सप्तमस्थान त्याची पूर्तता असल्यामुळे त्यात पापग्रहाचा प्रादुर्भाव असल्यास दुःखमय करून ठेवतो. म्हणून विवाहाचा विचार करताना सप्तमांत १ गुरु स्वराशीचा असताना वयाच्या १९ ते २४ या कालात विवाह होतो२ शुक्र स्वराशीचा असता २२ ते २५ वयाच्या कालमर्यादेत विवाह दर्शवितो. तोच चंद्र हा स्वगृह राशीत असताना वयाच्या १८ ते २१ या कालमर्यादेतच विवाहयोग आणतो पण शनि, राहू हर्षल यासारखे ग्रह वयाच्या ३२ नंतरच विवाहकाल आणतात, ३ पण सप्तमात असता वयाच्या २८ नंतरच विवाहयोग घडवून आणतो.

याप्रमाणे विवाह लौकर अगर उशीरा घडवून आणणारे ग्रहयोग पाहिल्यानंतर विवाह नक्की कोणत्या वर्षी होईल, त्याची माहिती असणे आवश्यक आहे. त्याकरिता गोचर ग्रहांचाहि विचार करणे जरूरीचे आहे. त्यांत विशेषत: मंगळ, गुरू, शनि, राहु यापैकी कोणत्या ग्रहांची अनुकूलता आहे व ते जन्मपत्रिकेंत कोणत्या स्थानांचे स्वामी आहेत त्याचाहि विचार करावा.

प्रामुख्यानें जन्मकुंडलीत प्रथम, द्वितीय, चतुर्थ, पंचम, सप्तम, नवम या स्थानांचा स्वामी (मालक) चंद्र, शुक्र, गुरु असून वरील स्थानातून गोचर गुरुचे भ्रमण होत असेल तरच त्यावर्षी विवाह घडवून आणील.



" पंचांग शुध्दि " चा वाद
आणि
त्याचा निर्णय

लेखक–प्रो. र. वि. वैद्य एम. ए. बी. टी. ज्योतिर्विद्यारत्न,

प्रचलित पंचांगे अशुद्ध आहेत व त्यांची सुधारणा व्हावयास पाहिजे, अशा प्रकारची ओरड गेल्या पन्नास-साठ वर्षांपासून आजतागायत चालूच आहे. या संबंधाच्या कित्येक परिषदा व संमेलनें झाली. अखेर सरकारनें यांत लक्ष घालून एक तडजोडी स्वरूपाचे पंचांग सन १९५५ मध्ये एका पंचांग समितिद्वारा तयार करविले व त्याचा प्रचारहि थोडाफार झालेला आहे. तरीपण पंचांगशुद्धीच्या प्रचारार्थ नियतकालिकांत लेख प्रसिद्ध होणे चालूच आहे.

पंचांगवादाचा विषय बहुजन समाजास समजत नाही व म्हणून जनता उदासीनच आहे. तसेंच, पंचांग कर्त्यांची पंचांगे जोपर्यंत खपत रहातील तोपर्यंत सर्वच प्रकारची पंचांगे प्रचारांत रहातील, हे त्यांना ठाऊक असल्याने तेदेखील पंचांगवादाकडे फारसे लक्ष देतांना दिसत नाहीत. फक्त समाजांतील ज्या कांही सुविद्य लोकांनां चालू परिस्थिती मनाला खटकते तेच पंचांग-शुद्धीबद्दल व हा वाद निकालात निघावा म्हणून लेख लिहून कांही प्रयत्न करतांना दिसतात.

तज्ञांच्या मते पंचांगांची दोन प्रकारची अशुद्धता नजरेस येते. त्यांतील मुख्य बाब गणितविषयक असून कांहीं पंचांगांचे गणित वेधाशी (प्रत्यक्ष ग्रहस्थितीशी) जुळत नाही, ही एक प्रकारची अशुद्धता. दुसरी अशुद्धि धर्मशास्त्रविषयक नियमांचे पालन न होणाऱ्या बाबतींत मानली जाते.

पंचांगवादांतील मुख्य मुद्दे खालीलप्रमाणें असून त्यांच्याबद्दलचा प्रत्येक पक्षाचा दृष्टिकोन व मते थोडक्यांत पुढे दिलेली आहेत.

हा वाद नीट लक्षांत येण्यासाठीं कांही पारिभाषिक शब्दांची माहिती प्रथमतः वाचकास असावयाला पाहिजे. सूर्य हा महाग्रह अवकाशांत स्थिरप्राय असून बुध शुक्रादि त्यांचे उपग्रह त्याच्याभोंवती, पश्चिमेकडून पूर्वेकडे, भिन्न भिन्न लंबवर्तुळाकृति कक्षांत elleptical Orbit भ्रमण करतात. ही वास्तव स्थिती असली तरी आपणांस असे वाटते कीं, आपली पृथ्वी स्थिर असून सूर्यादि सर्व ग्रह पृथ्वीसभोंवार फिरतात. हे ग्रह नक्षत्रमंडळांत ज्या एका राजमार्गावरून फिरतांना दिसतात त्याला क्रांतिवृत्त ecliptic म्हणतात. आपल्याला परिचित असलेले २७ नक्षत्रपुंज या मार्गाच्या आसपास पसरलेले आहेत. या नक्षत्रपट्टीस ' नक्षत्रचक्र 'Zodiac म्हणतात. तसेच, पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या पातळीत आकाशांत देखील एक वृत्त असल्याची जर आपण कल्पना केली तर त्या वृत्तास ख–विषववृत्त Celestial equator म्हणतात. ही दोन्ही वृत्ते परस्परांस ज्या दोन बिंदूत छेदतात त्यांस संपातबिन्दु किंवा नुसता संपात equniox असे म्हणतात. सूर्य क्रांतिवृत्तांतून फिरतां फिरता वर्षांतून दोन वेळा क्रमाने (ता. २१ मार्च व २३ सप्टेंबरला) या बिन्दूजवळ येतो आणि त्या दिवशीं सर्व पृथ्वीभर १२ तासांचा दिवस व १२ तासांची रात्र असते.

ग्रह नक्षत्रांच्या स्थानांचे निर्देश करताना त्यांचे चक्रप्रारंभ बिंदूपासून रवि केंद्रबिंदूशी होणारे कोणात्मक अंतर सांगतात, परंतु क्रांतिवृत्तांतील कोणत्या बिंदला

आरंभबिंदू Starting Point मानावयाचे हाच पचांग वादांतील क्रमांक एकचा मुद्दा आहे. हे ग्रह किंवा तारका नक्की क्रांतिवृत्तावर असतातच असे नाही. काही उत्तरेंस व इतर काही दक्षिणेंस असतात. या अंतरास शर (Latitude) व संपातापासूनच्या अंतरास भोग (Longitude) असे म्हणतात.

पंचांग वादांतील पाच पक्ष

सर्व पक्षांना मान्य असा एक ज्योतिष ग्रंथ आहे, त्यास " सूर्यसिद्धांत " म्हणतात. या सूर्यसिद्धांताच्या मते अश्विनी नक्षत्र विभागातील कोणतातरी एक बिंदु होता, याबद्दलहि कोणाचे दुमत नाही. पण हा बिंदू नक्की कोणता होता हाच वादाचा पहिला मुद्दा आहे. हा बिंदु चल की स्थिर (सायन कीं निरयन) हा एक पक्ष, व निरयनच (स्थिरच) मानल्यास त्याबद्दलचा आग्रह धरणारे चार पक्ष प्रचारात आलेले आहेत. जसे,

१. रैवतपक्ष,-टिळकपक्ष=झीटापक्ष या पक्षाच्या मते क्रांतिवृत्तावर मीन राशि (Piscem) पुन्जांतील झीटा हा अत्यंत बारीक तारका सूर्यसिद्धांताने (सू सि.) मानली होती. हा बिंदु वरील आकृतीत 'झ' या अक्षराने दाखविला असून त्यांचा कोन ∠ मेसूझ =१९° आहे. म्हणून या पक्षाला १९ अशनांश पक्ष म्हणतात.

२. दक्षिण हिंदुस्तानातील मद्रास, बंगलोर या बाजूचे लोक २१।।।अशनांश असणारा ' म ' हा बिंदू आरंभबिंदू मानतात.

३.चित्रापक्ष-यांच्यामते चित्रा तारकेच्या नक्की समोरचा बिंदू चि हा आरंभस्थानी मानतात. या बिंदूचे अशनांश (∠ मेसूचि)= २३° (सुमारे) या पक्षास २३ अशनांश पक्ष असेही म्हणतात.

४. गृहलाघवपक्ष- यांचा बिंदू ' ग्र ' हा असून याचे अशनांश २४ अंश आहेत.

५. सायनपक्ष-पहिले चार पक्ष आरंभस्थानी स्थिरबिंदू किंवा तारका मानतात म्हणून त्यास निरयनपक्ष म्हणतात. विरुद्ध आणखी एक पक्ष प्रचारांत आहे.त्यांच्यामते "संपात बिंदू" आरंभस्थानी सू. सि. ने मानला होता. त्यांचा बिंदू अर्थातच ' मे ' हा आहे. पण हा बिंदू हळू हळू दर वर्षी मागे मागे (पूर्वेकडून पश्चिमेकडे) सरकतो म्हणून या पक्षास सायन पक्ष म्हणतात.

समजा, आकाशांत 'न' हे एक नक्षत्र आहे व ते 'नर' इतके अंश उत्तरेला आहे, व त्याचा भोग ' मेर ' हा आहे. हा जर समजा, ४२ अंश असेल, तर याच तारकेचा भोग निरनिराळ्या पक्षाप्रमाणे असे सांगितले जातील.

१. रैवतपक्षः-२३ अंश २. चित्रापक्षः-१९ अंश ३). सायनपक्षः- ४२अंश ४) मद्रासपक्षः- २० अंश ५). ग्रहलाघवपक्षः- १८ अंश.

(२) चित्रा विरुद्ध झीटापक्ष ३. सायन विरुद्ध निरयन या सर्वांचे दृष्टिकोन समजून घेण्याचा आपण प्रयत्न करूं या.

पहिल्या गटाचा दृष्टीकोन

(जना निरयन व मद्रास ग्रहलाघव पक्ष)

ग्रहलाघव (ग्र. ला.) पक्षास आरंभस्थान जाणून घेण्याची मुळीच आवश्यकता वाटत नाही. त्यांच्यामते इष्ट शकांतून ४४४ हा शकांक वजा करून येणारा अंक कलात्मक अयनांश दाखवतो. शके ४४४ हेच यांच्या मते शून्यायनांश वर्ष, ६० विकला ही वार्षिक अयनगति व ग्र. ला ग्रंथावरून गणित करून येणारे तिथि नक्षत्रादिकाचे गणितच धर्मकार्यासाठी ग्राह्य मानले जावे. नक्षत्र-योग-तारकांबद्दलचा विचारच यांच्या मनांत येत नाही. यांचा मुख्य भर द्विधा तिथि घेण्यावर आहे. यांचे गणित वेधतुल्य नसते ही गोष्ट यांना अमान्य नाही. तरीदेखील त्यांच्या मते ग्रहयुति, ग्रहणे, उदयास्त इत्यादींचे नजरेस येणाऱ्या गोष्टींचे गणित (दृश्यगणित) करताना सूक्ष्मता आणण्यासाठी, प्रत्येकात काही संस्कार, (बीजसंस्कार) द्यावा, पण तिथि आदींचें गणित करतांना ग्रंथावरून येणारे गणित, तें स्थल व वेधास न मिळणारे असले तरी, आहे तसेच धर्मकार्यासाठी घ्यावे असे प्रतिपादन करतात व यासाठी लल्लाचार्यांचा पुढील श्लोक (वचन) आधार म्हणून देतातः-

शृंगोन्नतौ ग्रहयुतौ ग्रहणे तथास्ते
छाया-निरीक्षण विधौ उदयेऽब्ददेयम् ।।
बीजं फलम् तिथि— भ-योग विधौ त्वदेयम्
चंद्रेप्रदेयमखिलं क्षितिजादिकेषु ।।

यांच्या या विधानाचे खंडण अजून केले गेले नाही याचे नवल वाटते.

(आ) मद्रास व बंगलोरकडील दाक्षिणात्य ज्योतिर्विदाच्या मते शके २१२ हे शून्यायनांश वर्ष २१॥। हे चालू वर्षाचे अयनांश आहेत. बाकीच्या सर्व गोष्टी ग्र. ला. पक्षाप्रमाणेच ते मानतात.

(इ) कै. प्रो. आर्. एम्. आपटे यांनी "कला लक्षणा तिथि" या नांवाचा तिथीचा एक प्रकार नुकताच समाजासमोर ठेवला आहे, व त्याप्रमाणे केलेले पंचांगच धर्मानुकूल व वेदानुकूल आहे असा त्यांचा दावा आहे. या स्वमत पुष्टचर्थ ते बृहदारण्यकांतील पुढील मंत्र आधार म्हणून देतात–

" एष संवत्सरः प्रजापतेः षोडशकलः। तस्य रात्रय एव पंचदशकलाः। स पंचदशकलाभिः आचपूर्यते अपचक्षीयते।...स एतया स्थिरया षोडश्या कलया...॥"

दुसऱ्या गटाचा दृष्टिकोन

"पंचांगवादाची कुस्ती खेळणारे" रैवत व चित्रा हेच मुख्यतः दोन पक्ष आहेत. सूर्यसिद्धान्तकाराने नक्षत्रयोग तारकांची जी स्थाने सांगितली आहेत त्यावरच यांचा विशेष भर आहे. त्यांचे म्हणणे थोडक्यांत असेः–

(अ) चित्रापक्षः– ज्या अर्थी चित्रानक्षत्र पुंजांत एकच चित्रा नांवाची ठळक व निःसंदिग्ध तारका आहे व ज्या अर्थी सू. सि. नें चित्रेचा भोग 'खवेदाः, या पाठाने सूचित केला आहे' त्या अर्थी या पाठावरून सिद्ध होणारा १८० अंश चित्रेचा भोग मानणे क्रमप्राप्त होते' व म्हणून सू. सि. ने चित्रासन्मुख जो बिंदु असेल तोच बिंदु आरंभस्थानी मानला पाहिजे असें यांचे आग्रहपूर्वक सांगणे आहे. आणि चित्रेचा वर्तमानकालीन सायन भोग २०३ अंश आहे म्हणून चित्रापक्षाचे अयनांश २०३-१८०– २३ अंश सुमाराचे मानले गेले पाहित. तसेच या पक्षाची मंडळी स्वपक्ष समर्थनार्थ जी वचने उद्धृत करतात, त्याच्या अर्थाची ओढाताण करतात किंवा अपापठ सुचविणात ते मुळीच पटणारे नाहीत.

(आ) रैवतपक्षः– या पक्षाचे मुख्य आधार तीन आहेतः–

(१) सू. सि. ने रेवती योगतारकेचे स्थान "रंध्रादयः" या पाठाने सूचित केलेले आहे. त्यावरून या तारकेचा भोगरंध्र=९ व अद्रि=७ यावरून ३५९ अंश ५० असल्याचे ठरते. तसेंच हिचा शर १० कलांचा म्हणजे शून्यप्राय सांगितलेला आहे. या पक्षाचे असे म्हणणे आहे की, मीन (पिशियम), राशिपुंजांतील झीटा नांवाने दिग्दर्शित तारका अशा प्रकारची दिसणे व म्हणूनच झीटा तारकाच सू. सि. ने आरंभाला मानली असली पाहिजे.

(२) शके ५५० मध्ये ब्रम्हगुप्ताने सूर्याचा वेध घेतला असता त्याला वेधागत रवि व करणागत (गणितागत) रवि यात ५४ कलांचे अंतर आढळले, असे ग्रंथावरून कळते. ब्रम्हगुप्ताने अयनगती १ कला मानली असल्यामुळे येवढ्या चुकीचो ५४ वर्षे केली असता ५५०-५४- शके ४९६ हे रैवतपक्षाचें शून्यायनांश वर्ष येते. या वर्षांपासून वार्षिक (वास्तव अयनगति) ५०–२ घेतली असतां प्रचलित काली रैवत पक्षाचें अयनांश १९ अंशाच्या सुमाराचे येतात. एक तिसरा आधार शतपथ ब्राह्मणांतील पुढील वचनाचा :–

कृत्तिकाः प्रथमं विशाखे उत्तमं तानि देवनक्षत्राणि
अनुराधा प्रथमं अपभरणी उत्तमं तानियमनक्षत्राणि

या वचनाचा आधार घेऊन टिळकपक्षाची मंडळी असे प्रतिपादन करतात की, कृत्तिकेची तारका कृत्तिका विभागारंभी मानलेली होती. व यावरून झीटेचा तारका राशिचक्रारंभी मानणे भाग पडते.

सायन पक्षाचा दृष्टिकोन

या पक्षाचे असें म्हणणे आहे कीं, गेल्या १२००० वर्षांपासून.

१. ऋत्वारंभ, संवत्सरारंभ, यज्ञारंभ, नक्षत्रारंभ, इत्यादि गोष्टींचा आरंभ वसंतऋतूच्या प्रारंभीं, विषुवदिनी निश्चितपणे होत असे. याच दिवशी पूर्वेकडील नक्षत्रावर अग्नीची स्थापना केली जाई. व पूर्वेकडे स्थापित अग्नीची पुजा केली जाई. अशा अग्नीला मेषारूढ व मेषध्वज म्हणत; म्हणजेच मेषराशीचा देखील आरंभ देवलोकांत (उत्तर गोलार्धांत) सूर्यप्रवेश झाला असता केला जाई.

२. पारशी लोक वेदानुकूल अग्निपूजक असून त्यांचा नववर्षदिन (नवरोज) ता. २१ मार्चला म्हणजेच विषुवदिनी मानला जातो.

३. तसेच इस्लामिधर्मीय लोकांनी प्रारंभी वेदानकूल चंद्रपूजा स्वीकारली. वेदकालीन चंद्रदर्शनाचे व चंद्रपूजनाचे महत्व आजदेखील ईदक चांद म्हणून ते मानतात. ईद हा ईड (=पुजा करणे) या शद्वाचा अप-

भ्रंश असून ' ईडगृह ' या शब्दाचाच इदगाह हा अपभ्रष्ट शद्व त्यांच्यांन प्रचारात आहे. वेदकाली १४ दिवस सतत चंद्रप्रकाशाचा शुक्लपक्ष व सतत १४ दिवसाची-काळोखी रात्र कृष्णपक्ष अशाप्रकारे २८ दिवसांचाचांद्रमास असे. अशाप्रकारच्या १३ चांद्रमासांचा (=३६४ दिवसांचा) प्राजापत्य संवत्सर मानला जाई आणि ३६५ वा दिन विषुवदिनच असे. या दिवशीची रात्र १४ व्या महिन्याची (=नूतन संवत्सराची) रात्र पवित्र असल्याने या दिवशींच्या चंद्राला "चौदहवी का चाँद" चे अनन्यसाधारण महत्व होते.

४. खिस्तधर्मानुयायी लोक सूर्यपूजक असून Eastern sun-day (Easter) म्हणजे पूर्वेकडे उगवणाऱ्या सूर्याचा दिवस यारितीने विषुवदिनच त्यांनी मुख्यदिन मानला होता.

५. मुखंवा एतन्नक्षाणां यत् कृत्तिका: मुखंवा एतत् ऋतूनां यत् वसंत: मुखंवा एतद्देवानां यदाग्नि: या वचनांवरून या सर्व चक्रांचा प्रारंभ वसंतारंभी होत असे ही गोष्ट नक्की.

६- महाभारतकालापर्यंत विभागात्मक नक्षत्रपद्धती नव्हती तर तारात्मक होती. म्हणन विभागात्मक नक्षत्रचक्राचे आरंभस्थान पहाणे अर्थहीन आहे आणि धनिष्ठेपासून कृत्तिकेपर्यंत सर्वच नक्षत्रे पूर्वोदित झाल्यामुळे त्यांना क्रमाने प्राथम्य मिळत गेले व याचाच अर्थ असा की, वैदिक परंपरा पाहिल्यास चलित-अस्थिर-अयनशील अशा संपात बिंदूलाच सदैव आरंभस्थानी मानले गेले आहे.

७. संपात गति वर्षास ५०–२ घ्यावी.

८. तिथिमर्यादा ५० ते ६१ घटकांच्या मानाव्या.

९. नक्षत्रे तारात्मकच घ्यावीत. पण विभागात्मक नक्षत्रांचा उपयोग करून घ्यावयाचा असेल तर विभागांचा प्रारंभ विषुवबिंदूपासूनच केला जावा व राशिचक्रांचा आरंभ संपातापासून करून तेथून ३०।३० अंशाचे मेषादि राशी विभाग मानावेत अशा राशिप्रवेशासच "संक्रांति ' म्हणावे.

१०. "करणे" पंचांगांत असण्याची आवश्यकता नाही. मात्र योगांपैकी फक्त व्यतीपात व वैधृति हे दोनच योग (सायनगणिताने काढून) ते पंचांगांनी दाखवावेत.

सायन विरुद्ध निरयन

निरयनपक्षाचे असे म्हणणे आहे की, ज्याअर्थी सू. सि. कार अयनाभिध संस्कार ग्रहास द्यावयास सांगतो त्याअर्थी तो स्थिर अयनांश पक्षाचाच पुरस्कर्ता असला पाहिजे. त्याचप्रमाणे "पौष्णान्ते भगण: स्मृत:" या वचनावरूच रेवती हेच राशीचक्राचे शेवटचे नक्षत्र सांगितले आहे व म्हणून नक्षत्रचक्र व राशिचक्र स्थिरच मानलें पाहिजे. पहिल्या मुद्द्याच्या समर्थनार्थ ते पुढील श्लोक नेहमी उद्धृत करतात :–

"त्रिंशतकृत्यो युगेभानांचक्रं प्राक् परिलंबन
तद्दिनात्भदिनैर्भक्तात्...

या मुद्यांचे समाधानकारक रितीने खंडन सायनवाद्यांनी अजून केलेले नाही. परंतु या उलट सायनपक्ष पुढील मुद्यांचा विचार करावयास सांगतो :–

१. सूर्यसिद्धान्तकाराने भगणाची स्पष्ट व्याख्या काही श्लोकांत दिली आहे त्यावरून कोणीही सांगू शकेल की, सूर्याचे देवलोकात आगमन झाल्याबरोबर मेषादि सुरू होतो व दिवसरात्रींचे मान सारखे होते. अशा मेषे ऽ र्कपासून पुन्हा होणाऱ्या मेषेऽर्कापर्यंतच्या कालास भगण म्हणतात. अर्थात् भगण=सायन सौरवर्ष ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. या भगणाचा १२ वा भाग म्हणजेच राशि व या राशींचे प्रवेश काल म्हणजेच संक्रांत्या."

(भूगोलाध्यायांतील "मेषादौ देवभागस्थे.... इ. ४५, ४६, ५०, ५७ व अध्याय १४ मधील श्लोक २० वा पहावा.)

२. व्यतीपात व वैधृति यांचे गणित सायनमानानेच करावयास सू. सि. काराने सांगितले आहे. (पाताधिकार श्लोक १ व २ पाहा)

३. शाकल्योक्त ब्रह्मसिध्दांन्त व आर्यभट यांनीदेखील एक "दिव्य अहोरात्र षट्ऋतवी वर्ष" असा स्पष्ट उल्लेख श्लोक २१ व २२ मध्ये केलेला आहे.

४. "सायनंहि विशुध्दं पंचांगं" असा स्पष्ट आदेश शंकराचार्यांनी दिलेला आहे. तसेच, धर्मशास्त्रासाठी सायन गणनाच योग्य असल्याचे शेकडो आधार धर्मग्रंथांतून उध्दृत करता येतील.

(यासाठी भा. ज्यो. शा. इतिहास पहा.)

आतां वरील प्रत्येक पक्षाचे कांही मुद्दे कसे चुकीच्या समजुतीवर आधारलेले आहेत व म्हणून स्वीकारण्यास अयोग्य आहेत हे दाखवितो.

१) बीजरहित व बीजसहित तिथीचा मुद्दा –

लल्लाचार्यांनी "शृंगौन्नतौ ग्रहयुतौ " या श्लोकांत पंचांग गणिताच्या विषयांचे दोन गट पाडले आहेत. जसे, ज्या गोष्टींचा पडताळा नुसत्या डोळ्यांनी पहातां येतो अशा (दृक्प्रत्ययी) विषयांचा गट. उदाहरणार्थ, चंद्राची शृंगे, ग्रहांचे उदयास्त व युति, ग्रहणे इत्यादि. या विषयांच्या गणितास "दृश्य गणित" म्हणतात. यांचे गणित चुकले असल्यास ती चूक कोणालाहि चटकन् सांगतां येते परंतु तिथि, नक्षत्र, योग हे विषय 'दृश्य' मानलेले नाहीत. म्हणून यांचा समासेश दुसऱ्या गटांत केला आहे. ग्रहलाघवासारख्या पुराणमताभिमानी मंडळींची अशी श्रध्दा आहे की, दुसऱ्या गटाचे गणित, प्रत्यक्ष वेधास जुळले नाही तरी, आणि ग्र. ला. सारख्या ग्रंथांच्या स्थूल रितींनी केलेले असले तरी ते धार्मिक कार्यासाठी ग्राह्य मानावे, आणि पहिल्या गटाचे गणित करतांना ते दृक्प्रत्ययी व्हावे. एतदर्थ ग्र.ला.ग्रंथावरून येणाऱ्या गणितास कांही विशिष्ट संस्कार बीजसंस्कार देऊन ते जास्त सूक्ष्म करावे.

या मंडळींना वेध, वेधप्रक्रिया व ग्रहचाराचे प्रत्यक्ष ज्ञान नसल्यामुळे वरील श्लोकाचा खरा अर्थ लावावयास ते चुकले असे खेदाने म्हणावे लागते. या श्लोकात "निरीक्षणविधौ" हा अत्यंत महत्वाचा शब्द आचार्यांनी वापरला आहे. त्याकडे सर्वांचेच दुर्लक्ष झालेले आहे. यांत सांगितलेला संस्कार गणित करतांना द्यावयाचा नसून दृक्प्रत्ययी विषयांचे वेध घेत असतांना (निरीक्षण विधींत) वेधज्ञाने एक विशिष्ट संस्कार Personal correcttion वापरावयास सांगितले आहे. व दुसरा गट दृक्प्रत्ययी विषयांचा नसल्यामुळे त्यांचे वेध घ्यावयाचे नसल्यामुळे त्यांच्या बाबतींत कोणताच बीजसंस्कार देऊ नये, असे आचार्यांनी सांगितले आहे. याचा अर्थ स्थूल व चुकीचे गणित चालू राहू द्यावे असा नाहीं.

हे बीजांक प्रत्येक वेधकर्त्यांचे भिन्न भिन्न असतात व ज्याने त्याने स्वतःच्या उपयोगासाठी ठरवावयाचे असतात. ग्र. ला. पक्षांतील ही गोष्ट समजली नसल्यास त्यांत काही आश्चर्य नाही.

२. कला लक्षणा तिथि–या तिथिप्रकारचे वर्णन करताना हे पंचांगकर्ते आधारभूत म्हणून "एक संवत्सरः- प्रजापते षोडषकलः..." हा जो श्लोक उद्धृत करतात त्यांतील 'कला' हा शब्द "एक अंशाचा ६० वा भाग किंवा चंद्रबिंबाच्या व्यासाचा ३० वा भाग". अशा प्रकारचा क्षेत्रविभाग दर्शक नसून तो कालविभाग आहे, ही गोष्ट या पंचागांच्या प्रवर्तकांना मी स्वतः समजावून सांगितली आहे तरी देखील त्यांचा चुकीचा प्रचार चालूच आहे ही नवलाची गोष्ट आहे. या मंत्रांतच 'तस्य रात्रय एव पंचदश कला ' (म्हणजे त्याच्या रात्री याच पंधराकलाः असा स्पष्ट कालवाचक उल्लेख आहे. त्याकडे ही मंडळी कां दुर्लक्ष करतात? तसेच 'कला काष्ठश्च युज्यते एवं कालविभागेन काल चक्रंप्रवर्तते' या महाभारतातील श्लोकात महाभारतकाली कला हा एक काल विभाग असल्याचे स्पष्ट सांगितले आहे. यांनी चंद्राचे गणित करतांना सर्व संस्कार जुळणी अशा रितीने केलेली आहे की त्यामुळे पौर्णिमा आमावास्येचे काल नॉटिकलशी जुळावेत व बाकीच्या तिथीचे काल ग्र. ला. प्रमाणे यावेत.

यांच्या मते सू. सि. काराने चित्रेचा भोग "ख–वेदाः या पाठाच्या आधारे १८० असल्याचे सांगितले आहे. हा यांचा दावा चुकीचा आहे. कारण अितर सिद्धान्तानुसार याच चित्रेचा भोग १८३ असल्याचे सांगतात व आजतर नॉटिकलमध्ये तो २०३ सांगितलेला आहे. यावरून हीच गोष्ट सिद्ध होते की, सर्वांचेच अंक खरे आहेत कारण हे भोगांक सायन असल्यामुळे, चित्रेचा वेध भिन्न भिन्न काळी घेतलेला असल्यामुळे ते भिन्न आले.

त्याचप्रमाणे या पक्षाची मंडळी स्वपक्षसमर्थनार्थ" "उक्ताभांशे विकृतिः" उक्ताभावे विकृतिः सारखे असे पाठभेद व अर्थभेद सुचवितात की जे कोणासही पटणारे नाहीत.

यांचा मुख्य आधार कृत्तिकाः प्रथमं .. .. .. अि०" आहे, आणि रेवतीच्या रंध्राद्रयः या पाठावरून ते रेवतीचा भोग ३५९।–५० असा करून झीटापिशियन ही अत्यंत सूक्ष्म सातव्या प्रतीची, डोळयानीं सहज न दिसणारी तारका सू. सि.ने मानली असे प्रतिपादन करतात.

कृत्तिकः प्रथम विशाखेउत्तमं . . . . " हा श्लोक शतपथ ब्राम्हणांतील असून यांत आकाशांतील देवलोक व पितृलोक उत्तर गोलार्ध व दक्षिण गोलार्ध यांत

प्रजापतीने जी नक्षत्राची वाटणी केली तिचे वर्णन आले. जेव्हां कृत्तिकापुंज क्षितिजापासून सुमारे ६ अंश उंचीवर असतो तेव्हां दुसऱ्या बाजूला विशाखा पुंज तितक्याच उंचीवर असतो व ही १४ नक्षत्रे एकदम दिसतात. तसेच दुसरे दिवशी पहाटे आकाशाकडे पाहिले असता असे दिसेल की अनुराधा ते भरणी या या १३ तारका एकसमयावच्छेदेकरून दिसतात. ही गोष्ट मी स्वतः पुण्याचे कै. होराभूषण दीक्षित यांस उज्जयिनीस वकै. बाबासां हेब पटवर्धन यांस पुण्यास प्रत्यक्ष दाखविली तेव्हापासून रैवतपक्षातील या अध्वर्यूंनी वरील आधार देणे बंद केले. आपण नक्षत्र विभागाचे ७९०', ८००', ८१०' इत्यादि कोणतेही मान मानले तरी एका गोलार्धांत १४ नक्षत्रे व दुसऱ्यात १३ नक्षत्रे सिद्ध करता येणार नाही, व म्हणूनच नक्षत्रचक्राच्या आरंभस्थानाचा वाद मिटवण्यास या आधाराचा काडी-इतकाही उपयोग होणार नाही, हे सूज्ञांस सांगणे नकोच.

सू. सि. ने रेवतीचा शर १०' (शून्यप्राय) मानलेला आहे. अशा 'शून्यप्राय शर' असलेल्या बऱ्याचशा तारका मीन राशिपुंजांत आहेत. असे असतांना झीटापीशियम हीच तारका आरंभी मानणें तर्कसंगत होणारे नाहीं.

त्याचप्रमाणे, ब्रम्हगुप्ताने द्वादशांगूळ शंकूवरून छायेचा वेध घेऊन काढलेले अनुमान बिलकूल विश्वसनीय नाहीं. कारण, आम्ही ४८ इंच उंचीच्या शंकूच्या छायेचा वेध घेऊन विषुव काल काढण्याचा कित्येक वर्षपर्यंत प्रयत्न केला आहे. पण आमचे गणित नॉटिकल तुल्य आले नाही. पांच घटकांपर्यंत चुकलेला आढळला अशास्थितींत ब्रह्मगुप्ताचा वेध अत्यंत स्थूल व म्हणूनच कमी विश्वसनीय मानला पाहिजे.

आतां आणखी महत्वाची अशी गोष्ट सांगावयाची की, चित्रेचा भोग १८० अंश मानून इतर तारकांची अंतरे काढून पाहिली तर त्यांपैकी बहुतेकांची अंतरे वेधागत अंतरांशी जुळत नाहीत. तर दीड दोन अंशांपर्यंत चुकतात. हीच गोष्ट रेवतीचा (झीटेचा) भोग ३६० मानला तर दिसते. याचाच अर्थ असा कीं, चित्रेचा भोग १८० अंश व झीटेचा भोग ३६० अंश, हे दोन्ही अंक चुकीचे आहेत. परंतु गमतीची गोष्ट अशी की ख= ० च्या ऐवजी ख = ९ व रंध्र = ९ च्या ऐवजी ० असा घेतला तर येणारी दोन्ही तारकांची स्थानें नक्की बरोबर जुळतात. विद्वानांनी याचा विचार करावा.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास असे म्हणावे लागेल की, चित्रा व झीटा या दोन्ही पक्षाचे दावे तर्कसंगत नाहीत.

तिति मर्यादेचा मुद्दा :--

जुन्या काळी चंद्राचे गणित आजच्याइतके सूक्ष्म करता येत नसे. तत्कालीन ग्रंथावरून ज्या तिथी येत त्यांची व्याप्ती ५४ घटकेपासून ६५ घटिकेपर्यंतचीच त्या गणिताने येते, व म्हणून "बाणवृद्धिरसक्षयः" चा जुन्या मंडळींचा अडाखा त्यांच्यादृष्टीने बरोबर आहे. पण ज्याअर्थी अत्यंत सूक्ष्म गणित पद्धती प्रचलित काली प्रचारात आहे, त्याअर्थी त्यावरून सिद्ध होणाऱ्या ५० घ. ते ६९ घ. या तिथिमर्यादा कां मानल्या जाऊ नयेत ?

याचप्रमाणे, "कला—लक्षणा तिथीचे." हें लक्षण कोणत्याहि वैदिक ग्रंथात सांगितलेले नाही व कला शब्दाचा क्षेत्रवाचक असा चुकीचा अर्थ या कल्पनेच्या पुरस्कर्त्यांनी केलेला असल्याने, अशाप्रकारची तिथी बिलकूल ग्राह्यच नाही.

सूर्यसिद्धांतकार सायन किंवा निरयन कोणत्याच पक्षाचा पुरस्कर्ता नव्हता तर हेतुतः सायनगणिताचा पुरस्कर्ता होता असे असतांना त्यांच्या गणितात निरयन-तत्व कोठून आले याचा शोध केला असता लक्षांत आले की समग्र सू. सि. ग्रंथात "त्रिंशत् कृत्यो युगेभानां चक्रं-- इ०" या एकाच श्लोकांत फक्त एकच ठिकाणी अयनाभिध संस्कार ग्रहास द्यावयास सांगितले आहे. व या श्लोकाचा हेतु न समजल्यामुळे कोणाच्या तरी मनांत निरयन गणना करण्याची कल्पना प्रथमतः स्फुरली.

खरा प्रकार असा आहे की ग्रहांचे मध्यम व स्पष्ट-भोग काढण्याच्या रितीचे वर्णन पहिल्या दोन अधिकारांत (अध्यायांत) आलेले असून त्रिप्रश्नाधिकार नामक तिसऱ्या अध्यायात "शंकु वशंकुच्छाया' यांच्या वर्णनप्रसंगी हा श्लोक आलेला आहे, यात सांगितलेला संस्कार ग्रहाच्या "क्रांति" नामक अंगास द्यावयाचा असतो, कारण २६००० वर्षात प्रत्येक ग्रहाच्या क्रांत्यंकात आंदोलनात्मक परिवर्तन दोन वेळा होते. ग्रहाच्या भोगांकास संस्कार देण्याची अजब कल्पना ज्या कोणाच्या सुपीक डोक्यांत प्रथमतः आली असेल त्याचे अभिनंदनच करावयास पाहिजे.

त्याचप्रमाणे, सूर्यसिद्धान्तपूर्वकाली नक्षत्रचक्रारंभी

कृत्तिका तारा व शेवटी भरणी असा " भगण " मानला जाई. परंतु सू. सि. काली संपाताच्या विलोप चलना- मुळे अश्विनी नक्षत्र भगणारंभी व रेवती तारा भगणांती मानावी असा नवीन आदेश देतांना ग्रंथकाराने "----- पौष्णान्ते भगणः स्मृतः " असा उल्लेख केला आहे.

सायनवाद्यांचा दृष्टिकोन बहूतांशी बरोबर आहे. पण " सायन नक्षत्र विभाग " ही त्यांची कल्पना तर्क- संगत नाही. वेदकाली थेट महाभारतकालापर्यंत नक्षत्रे तारकात्मकच होती. तसेच, चैत्र, वैशाख, इ० मासनामे चित्रा, विशाखा इ० स्थिरतारांवरूनच प्रचारात आली. या संज्ञाचा आणि मेषादि संक्रांतीचा अर्थाअर्थी काही संबंध नाही. २३। स्थिर अयनांश मानून निर्माण केलेल्या या कृत्रिम राशि अखेर सायनच राहाणार पण त्यांना सायन मेष, सायन वृषभ म्हणणे हे सत्याचा खून करण्यासारखे आहे. वैदिक परंपरेचा इतिहास पाहिला असता दिसून येईल की, राशिचक्र व स्थिर नक्षत्रचक्र ही स्वतंत्रपणेच अस्तित्वात राहिलीव दोन्हीचा आरंभ- बिन्दु विषुव बिन्दू असूनदेखील तोच तो एक नक्षत्र विभाग सतत प्रारंभाला राहिलेला नाही. तरी " कृत्रिम मेष संक्रमण ज्या चांद्रमासात होईल तो चैत्र, हे लक्षण तर्कविरहित समजून या कल्पनेचा त्यागच करावयास हवा.

धार्मिक कृत्यासाठी योग्यकाल काढून देणे हेच ज्योतिष्याचे काम असते. म्हणजेच धर्मासाठी कालगणना हे तत्व प्रथमतः स्वीकारावे लागते. पण त्याबरोबरच वेदांग ज्योतिषात सांगितल्याप्रमाणे धर्मशास्त्र कालानु- पूर्व्य (म्हणजेच कालानुसारी) असावें लागते. याचा अर्थ असा की, ज्योतियाने केलेले गणित जर प्रत्यक्ष ग्रह- स्थितीत वेधास जुळणारे नसले तर ते धर्मशास्त्रदृष्ट्या कर्मविधीस आग्रहयच मानले पाहिजे. गणितागत अंक व वेधागत अंक याची कान्लातराने फारकत होणारच हे लक्षांत घेऊनच सु. सि. ने " त्रिशत्कृत्यो युगे भानां --- " या श्लोकात सूर्याचा वेध वर्षातून चार वेळा (अयने विषुवद्वये) घावयास व गणितागत अंक तपा- सावयास बजावले आहे.

तेव्हा ज्यात प्रत्यक्ष ग्रहस्थितीकडे दुर्लक्ष झालेले आहे अशा प्रकारचे पंचांग ग्रहलाघवानुसारी, सूर्य- सिद्धांतानुसारी किन्वा वेदपरपरानुसारी आहे, असे पंचागकर्त्यांनें म्हणणे कोठपर्यंत योग्य दिसेल याचा सूज्ञतज्ञांनीच विचार करावा

जर ग्रहस्थितीत व नैसर्गिक घटनांच्या स्थितीत परिवर्तन घडलेले आढळून आले तर प्रत्यक्ष नैसर्गिक स्थितीस मेळ बसेल अशाप्रकारेच गणिताच्या रिती बस- विल्या पाहिजेत, व धर्मशास्त्रविषयक प्रचलित नियमांत योग्य व आवश्यक तो बदल केला जावा.



—संख्याशास्त्राचा प्रभाव !—

—संकलक—
मो. स. गोडसे, बी. ए.

संख्याशास्त्रावर तुमचा विश्वास असो नसो, पंतप्रधान शास्त्रीजींच्या जीवनात १ह्या आकड्याने बजाविलेली कामगिरी तुम्हाला थक्क करील.

भारताच्या पराक्रमाची पताका आपल्या पंतप्रधानकीच्या अत्यल्प कारकीर्दीत उंचावून लालबहादूर शास्त्रीजींनी चिरनिद्रा घेतली भारताच्या परंपरेला साजेशी ऋषितुल्य निःस्पृह बाण्याने निष्कांचन अवस्थेत त्यांनी एका अर्थी धारातीर्थीच देह ठेवला. प्रथम श्रेणीची कामगिरी बजावणाऱ्या ह्या प्रतापी वामनमूर्तींच्या जीवनात एक ह्या आकड्याचे केवढे महत्वाचे स्थान आहे याची मोठी बोधक माहिती संख्याशास्त्रावर विश्वास असणाराकडून सांगितली जाते.

संख्याशास्त्रावर तुमचा विश्वास नसला तरी शास्त्रीजींच्या इतिहासाने तो बासल्यावाचून राहणार नाही असे ह्या शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे.

शास्त्रीजींचा जन्म १९०४ साली नारस येथे ऑक्टोबरच्या २ तारखेस झाला येथून आपण सुरुवात करू या.

त्यांचा जन्म ऑक्टोबरमध्ये म्हणजे दहाव्या महिन्यात (१०) झाला. शून्याला मूल्य नसल्यामुळे येथे आपल्याला हा आकडा मिळतो. त्यांचे नांव होते लालबहादुर इंग्लिशलिपीत Lal Bahadur म्हणजे १० अक्षरे पुन्हा एक हा आकडा आला.

खेड्यांतील एक सामान्य युवक पंतप्रधान झाला राजकारणात त्याला लवकर प्रवेश करावा लागला एकोणीसाव्या वर्षी त्यांनी ते पाऊल टाकले १९ १ + ९ = १० पुन्हा १ आकडा!

आपल्या नेत्याच्या जीवनातील बदलत्या सरकारी अधिकारपदाचा बारकाईनें अभ्यास करणाऱ्यांना माहितच आहे की शास्त्रीजींनी निरनिराळ्या सरकारी खात्यांत दहा अधिकारपदावर काम केले. त्यातही १ हा आकडा येतो.

मग १९६४ साली महत्वाचा क्षण उगवला. पं. नेहरूनंतर कोण? भारताच्या नेतृत्वाची धुरा कोणाच्या खांद्यावर पडणार? नेतेपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार? आणिबाणीच्या काळांतील काट्यांचा मुकूट बटूमूर्ती पण कणखर बाण्याच्या लालबहादूर शास्त्रीजींचीच त्यासाठी निवड झाली. कॉंग्रेस संसदीय पक्षनेत्याच्या निवडीसाठी, पंतप्रधानपदाकरिता, प्रत्यक्ष मतदान न होता एकंदर कल पाहण्यात आला. आणि तो शास्त्रीजींच्य बाजूने झुकला. ही निवडणूक जून महिन्यांत पण १ तारखेस झाली.

घटना जलद्‌गतीने घडत होत्या. पंतप्रधान शास्त्रीजींचे निवासस्थान जनपथावर होते. १० जनपथ.

१९ महिन्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीनंतर यमराजांनी भारताचा हा लाडका लाल अलगद उचलला. एकोणीस महिने १×९ = १० = १

मृत्यूने सुद्धा संख्याशास्त्राचा संकेत बिनचूक पाळला. शास्त्रीजींचा प्राण त्याने जानेवारी महिन्यांत हिरावून घेतला. पहिला महिना—१ आणि महिन्याची १० तारीख म्हणजे आणखी एक आला पण १ ह्या आकड्याचे शास्त्रीजींच्या जीवनांतील महात्म्य येथेच संपते, असे मात्र नाही.

शास्त्रीजींच्या मृत्यूने सर्व जग हादरले. (त्यानंतर वर्षाभराच्या आंतच त्यांचा मृत्यू झाला त्या ताश्कंदला धरणीकंपाचा तडाखा बसला) शास्त्रीजींचे प्राण पंचत्वांत विलीन पावले. तेव्हा १ वाजून गेला होता. शास्त्रीजींनी त्यावेळी नुकतीच साठी ओलांडली होती ते ६१ व्या वर्षात होते.

ताश्कंदहून शास्त्रीजींचा मृत देह दिल्लीला आणण्यांत आला. जगांतील सर्व लहान मोठ्या देशाचे प्रतिनिधी अंत्यविधीसाठी दिल्लींत आले. आणि अंत्ययात्रेची तयारी करण्यांत आली. पंतप्रधान पंडित नेहरूंचा अंत्यविधी झाला तेथून जवळच शास्त्रीजींच्या अंत्यविधीची जागा निवडण्यांत आली-यमुना काठी, शांतीवना नजीकच. शास्त्रीजींचे निवासस्थान नं. १० जनपथापासून अंत्ययात्रा निघून अंत्यविधीच्या जागी पोहोचेपर्यंत दहा लाखावर लोकांनी इतकी गर्दी केली होती. आणि स्मशानयात्रेचा मार्ग किती लांब होता हे माहित आहे ?

दहा मैल. १० पुन्हा १ आलाच!

० ० ०

पत्रिकेतील मंगळ

लेखक— श्रीकृष्ण अ. जकातदार ज्योतिर्मार्तण्ड

आजकाल विवाहाचा प्रश्न बराच गुंतागुंतीचा झाला आहे. तरूण-तरूणींची वये साधारणपणे विवाहास योग्य होऊन गेली तरी अनेकांचे विवाह जमण्यास वेळ लागतो. किंबहुना ते विवाहास लवकर तयारच होत नाहीत. अर्थात याला अनेक कारणे आहेत. काही सामाजिक आहेत. तर काही आर्थिक आहेत. याशिवाय आणखी एक बाब यासंबंधात विचारात घेतली जाते आणि ती म्हणजे पत्रिका! कुंडली! ! आणि त्यांतील. प्रामुख्याने मंगळ! ! !

सुशिक्षित, अशिक्षित स्वत:ला पुढारलेले समजणारे सर्व थरांतील लोक कोणी प्रांजळपणे उजळ माथ्याने, तर कोणी भीत भीत पण पत्रिका पाहून लग्न जमवण्याचा वा करण्याचा विचार करीत असतो. एकीकडे लोक मंगळावर जाण्याची तयारी करीत असतांना दुसरीकडे आम्ही पत्रिकेंतील मंगळाला भीत बसावे हे कितपत योग्य काहे? हे हास्यास्पद नव्हे का? पण याला कारण आजपर्यंत ज्योतिषांनी मंगळाची ही धास्ती घालून दिली तीच आहे याचा अर्थ आम्ही मंगळाच्या विरुध्द आहो असे मुळीच नव्हे पण सर्वसाधारण पत्रिका पाहून एखादी पत्रिका लगेच "मंगळी" ठरविणे हे शास्त्रीयच नव्हे तर सामाजिकदृष्टचाहि अयोग्य आहे, अहितकारक आहे. तसा मंगळाचा बाऊ करूनच ही समस्या केव्ळ तोटक्या ज्ञानामुळे जटील व बिकट झाली आहे असे आम्हाला स्पष्टपणे म्हणावेंसे वाटते. म्हणून यासंबंधी आम्ही थोडक्यांत येथे मंगळाच्या पत्रिकेसंबधी विचार करणार आहोत.

कुंडलीच्या १, ४, ७, ८, १२ स्थानात जर मंगळ असेल तर ती सामान्यत: मंगळाची पत्रिका मानली जाते आणि यापैकी एकाद्या स्थानांत अन्य पक्षाच्या कुंडलीत मंगळ असला की पत्रिका जमली असे ठोकून देण्यांत येते. आणि असा मंगळ एकाच्या पत्रिकेत नसेल तर तात्काळ त्या कुंडल्या जमत नाहीत असा शेरा मारला जातो. आणि असे प्रकारच मोठ्या प्रमाणांत होत असल्याने वधुवरांच्या पालकांना मंगळाची कुंडली ही एक मोठी धोंड वाटत असते. त्यापेक्षा प्रत्यक्ष मंगळावर जाणे परवडले असेच त्यांना वाटू लागते. तेव्हा याबाबत ज्योतिषांनी वरवर न पाहतां कुंडलीचा अभ्यास करून आपले मत द्यावे. त्याकरिता "आयाचित" नांवाच्या एका विद्वानाने जी वचने दिली आहेत तीहि मार्गदर्शनासाठी उपयोगी पडतील.

"सबलेगुरौ भृगौ
वा लग्नाद् द्युनगेपि वाथवा भौमे
वक्रिणि नीचारिगृहस्थे वा
कस्येपि वा न कुजदोष:।

ज्या कुंडलीत मंगळ असेल त्याच कुंडलीत बलवान असलेले गुरु, शुक्र जर जन्मलग्नांत किंवा सप्तम स्थानांत असतील, त्याप्रमाणे मंगळ असलेल्या कुंडलीत तो मंगळ जर अस्तंगत, वक्री असेल, शत्रुक्षेत्रात असेल नीच राशीत (कर्क राशीत) असेल तर त्या मंगळाचा दोष नाही.

तेव्हा मंगळ केवळ १, ४, ७, ८, १२, स्थानांत असला की, मंगळी पत्रिका मानण्याचे कांहीच कारण नाही.

त्याचप्रमाणे—

"स्वगृहे स्वोच्चगे भौमे, वर्गोत्तमम् गतेपि वा।
बलाढचो ऽ पंचमस्थाने भौमस्तस्य न दोषकृत् ।।

कुंडलीत मंगळ स्वगृही म्हणजे मेष व वृश्चिक, उच्च राशीत म्हणजे मकर राशीत, वर्गोत्तम म्हणजे स्वत:च्या

राशींत असेल तर मंगळाचा दोष मानण्याचे कांहीच कारण नाहीं.


इतकेच नव्हे तर भावचलितात तो कोणत्या स्थानांत मोडतो तो पाहणे अत्यावश्यक आहे. तद्वतच वधुवरांची लग्ने (तनुस्थान) व राशी भिन्न गुणधर्माच्या तत्वाची असता कामा नये. शिवाय रवि, गुरू, शुक्र, गुरू यांचे योगहि लक्षांत घेणे अगत्याचे आहे. संततीच्या दृष्टीने भिन्न नाडी असणेहि आवश्यक आहे.

तेव्हा या सर्व उपपत्तीचा साकल्याने, बारकाईने विचार करून मगच ती कुंडली मंगळी आहे की नाही याचा निर्णय घेतला पाहिजे. केवळ १–४–७–८–१२ स्थानांत मंगळ आहे म्हणून पालकांनीहि घाबरून जाण्याचे कारण नाही. म्हणजे पत्रिकेमुळे आज विवाहाच्याबाबत जो अडसर निर्माण झाला आहे, तो त्वरित दूर होऊन विवाह जमण्याचे सुकर होईल असे आम्हांला वाटते.

आपल्यामध्ये उभय दांपत्यांच्या कुंडल्या पाहून नाडी, गण व ३६ गुण उतरले असता शुभयोग म्हणून विवाह करण्याची वहिवाट आहे. परंतु अशा विवाहापासून खरे पाहतां सुख होत नाही.

त्यापेक्षा खालील अनुभविक नियम चांगले लागू पडतात. वर किंवा वधू ह्यांचे कुंडलीत लग्न, रवि व चंद्र हे ज्या राशींत असतील त्या राशींत दुसरे कुंडलींत पापग्रह नको. शुभग्रह पाहिजे. पापग्रह नसल्यास प्रेम वाढून संसार सुखावह होईल. लग्न, रवि व चंद्र ह्यांचे राशीचे केंद्री, प्रतियोगांत किंवा क्रांतीतसुद्धा ग्रह पाहिले पाहिजेत व वरील नियमांचा अनुभव घेतला पाहिजे.

एका पुरुषाचे कुंडलींत लग्न सिंह, रवि कन्येत व चंद्र मेषेत आहेत. त्याचे पत्नीचे कुंडलीत सिंहेत शनि, मीनेंत मंगळ व तुळेत हर्शल असल्यामुळे दोघांचे पटेना. वारंवार खटके उडत. ह्याप्रमाणे लग्न झाल्यापासून ३६ वर्ष लोटली. त्यांचा विवाह नाडी, गण व ३६ गुण पाहून झाला होता.



जन्मतारखेवरून आपले भाग्य

लेखक :- ज्योतिर्मार्तंड श्रीकृष्ण अ. जकातदार

या विश्वांतील रवि, चंद्र, गुरु, बुध, शुक्र, शनि, मंगळ राहू व केतू या नवग्रहांचा अम्मल पृथ्वीवरील चराचर वस्तूवर चालतो. जगाची उत्पत्ती शून्यातून झाली व त्यानन्तर नऊ आकड्यांच्या निर्मितीवर गणितशास्त्राची इमारत झाली. या नऊ आकड्यामध्ये सर्व विश्व सामावले गेले आहे. हे नऊ आकडेच उलटसुलट रितीने पुन्हा पुन्हा उपयोगात आणले जातात. अर्थातच नवग्रहावरच या नऊ अंकांची उभारणी झाली असून हे नऊ अंक म्हणजेच नऊ तत्वे होत. प्रत्येक अंकावर विशिष्ट ग्रहांचे स्वामित्व चालते. एकूण महिन्याच्या तारखा एकतीस तेव्हा ज्या ग्रहाचे स्वामित्व असते त्या तारखेस जन्मलेली व्यक्ति ही त्या ग्रहाच्या अंमलाखाली येते. महिन्याचे दिवस याप्रमाणे नऊ ग्रहांमध्ये विभागले गेले आहे. प्रथम नऊ अंक व त्यांचे स्वामी माहित असणे आवश्यक आहे.

अंक	स्वामी
१	रवि
२	चंद्र
३	गुरु
४	रवि, राहु, हर्षल
५	बुध
६	शुक्र
७	चंद्र, केतू, व नेपच्यून
८	शनि
९	मंगळ

म्हणून विशिष्ट तारखा ठराविक तत्वाखाली येतात ती अशी

तारखा	स्वामी
१–१०–१९–२८	रवि
२–११–२०–२९	चंद्र
३ १२ २१ ३०	गुरु
४ १३ २२ ३१	रवि राहू हर्शल
५ १४ २३	बुध
६ १५ २४	शुक्र
७ १६ २५	चंद्र, केतू, नेपच्यून

तारखांचे हे वर्ग पाडताना १ या अंकावर रविग्रहाचे स्वामित्व असल्याने १, १०, १९, २८ हे अंक रवि तत्वाखाली येतात. कारण यांतील अंकाची बेरीज एकच येते. उदा. १+९=१० म्हणजे बेरीज एकच तसेच २+८=१० म्हणजे अंक १ च. याप्रमाणे सर्व अंकाची वर्गवारी केली आहे व त्या त्या तारखा त्या विशिष्ट ग्रहाच्या वर्चस्वाखाली येतात. अर्थातच आपला जन्म ज्या तारखेस झाला असेल ती तारीख कोणत्या तत्वाखाली येते ते पाहून त्याप्रमाणे आपली भाग्योदयाची वर्षे, तापदायक वर्षे व भाग्यरत्ने पहावयाची असतात. कारण त्याच ग्रहाचे वर्चस्व त्या व्यक्तीवर असते. व त्यामुळे ग्रहाचा आपल्या स्वभावावर व आयुष्यावर परिणाम होतो.

१ रवितत्वः–

१, १०, १९, २८ या तारखास जन्मलेल्या व्यक्ती रवितत्वाखाली येतात. म्हणून त्यांच्या शरीरावर, स्वभावावर व आयुष्यतील घडामोडीवर रविग्रहाचे वर्चस्व चालते. यांची भाग्योदयाची वर्षे : १९ ते २८ ही नऊ वर्षे.

क्रांतिकारक वर्षे : १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४ सरकारी नोकरी, पतपेढ्या, बँका, रेल्वे इ. खाती यांच्या भाग्योदयास अनुकूल असतात.

त्रासदायक वर्षे : ६, ८, १५, १७, २४, २६, ३३, ३५, ४२ ४४, ५१, ५३, ६०, ६२, ६९, ७१ इ.

शुभवार : रविवार, सोमवार, गुरुवार

भाग्यरत्ने : आंगठींत पुष्कराज मगर आणिक वापरावे.

उलाढालीचा काळ २१ मार्च ते २८ एप्रिल व २१ जुलै ते २८ ऑगस्ट.

२ चंद्रतत्व

तारखा २, ११, २०, २९.

भाग्योदय २५ ते चौतीस या वयांत.

क्रांतिकारक वर्षे २, ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५

त्रासदायक वर्षे ४, १३, २२, ३१, ४०, ४९, ५८, ६७.

वैद्यकी, लेखन, पेन्टिंग, चित्रकला, नाटक, सिनेमा, वकिली, द्रव पदार्थाची विक्री, सार्वजनिक कार्ये.

शुभवार– रविवार, सोमवार, शुक्रवार.

भाग्यरत्ने– चंद्रकान्त मणी अथवा मांजर डोळा (Cat's eye)

उलाढालीचा काळ– २१ जून ते २० जुलै.

३ गुरुतत्त्व

तारखा– ३, १२, २१, ३०

भाग्योदय २१ ते ३० वर्षापर्यंत.

क्रांतिकारक वर्षे ३, १२, २१, ३०, ३९, ४८. ५७, ६६, ७५

त्रासदायक वर्षे ५, ६, १४, १५, २३, २४, ३२, ३३, ४१, ४२, ५०, ५१, ५९, ६०, ६८, ६९.

अध्यापन, कायदा, विद्याखाते, बँका, लेखनकला, न्यायखाते, ज्योतिष, गूढविद्या इत्यादीमध्ये उदय होईल.

शुभवार– मंगळवार, गुरुवार, शुक्रवार.

भाग्यरत्ने– आकाशी किंवा अंजिरा खडा अथवा पुष्कराज.

उलाढालीचा काळ– २१ नोव्हेम्बर ते २१ डिसेंबर १९ फेब्रुवारी ते २१ मार्च.

रवि– राहू व हर्षल तत्त्व तारखा–४, १३, २२, ३१

भाग्योदय– वय २२ ते ४० पर्यंत.

क्रांतिकारक वर्षे ४, १३, २२, ३१, ४०, ४९, ५८, ६७.

त्रासदायक वर्षे ६, १५, २४, ३३, ४२, ५१, ६०, ६९.

भाग्योदय– सार्वजनिक संस्था शास्त्रीय शोध यामध्ये,

शुभवार– शनिवार, रविवार.

भाग्यरत्ने –नीलमणी.

उलाढालीचा काळ– २१ जून ते २० जुलै.

५ बुध तत्त्व तारखा–५ १४ २३

भाग्योदय– २३ ते ३२

क्रांतिकारक वर्षे ५ १४ २३ ३२ ४१ ५० ५९ ६८

त्रासदायक वर्षे २ ११ २० २९ ३८ ४६ ५६ ६५ ७४

शुभवार– बुधवार गुरुवार

पुस्तकाचा-स्टेशनरीचा व्यापार, छापखाना, अकाउंट डिपार्टमेन्ट ही खाती फायद्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात.

उलाढालीचा काळ– २० मे ते २० जून

भाग्यरत्ने बुधाचा खडा, पांचू

६ शुक्रतत्व तारखा ६ १५ २४

भाग्योदय वय २४ ते ३३

क्रांतिकारक वर्षे ६ १५ २४ ३३ ४२ ५१ ६० ६९

त्रासदायक वर्षे १ १० १९ २८ ३७ ४६ ५५ ६४

शुभवार मंगळवार, शुक्रवार, गुरुवार

भाग्यरत्ने– पांढरा खडा

चित्रकला, नाटक, लेखन, इतिहास संशोधन यामध्ये भाग्योदय होईल.

उलाढालीचा २० एप्रिल ते २० मे व २१ सप्टेंबर ते २० आक्टोबर

७ नेपच्यून चंद्र केतू तत्त्व

तारखा ७ १६ २५

भाग्योदय १६ ते ३४

क्रांतिकारक वर्षे ७ १६ २५ ३४ ४३ ५२

त्रासदायक वर्षे ९ १८ २७ ३६ ४५ ५४ ६३

लेखन, पाण्याशी संबंधित धंदे, ज्योतिष, अध्यात्म इ. मध्ये भाग्योदय होईल.

शुभवार-सोमवार, रविवार

८ शनि तत्त्व

तारखा ८ १७ २६

भाग्योदय २६ ते ३५ वर्षे

कांतिकारक वर्षे ८ १७ २६ ३५ ४४ ५३ ७१

त्रासदायक वर्षे ९ १८ २७ ३५ ५४ ७२

गूढविद्या धार्मिक संस्था, शास्त्रीय संशोधन ही भाग्योदयास अनुकुल क्षेत्रे.

शुभवार- शनिवार रविवार सोमवार

भाग्यरत्ने- इंद्रनील, काळा निळा खडा

उलाढालीचा काळ- २१ डिसेंबर ते १९ फेब्रुवारी

९ मंगळ तत्व

तारखा- ९ १८ २७

भाग्योदय मिलीटरी, पोलिस खाते वैद्यकी, कायदे इ मध्ये भाग्य अनुकूल उदयास येईल. वय १८ ते३६

कांतिकारक वर्षे ९ १८ २७ ३६ ४५ ५४ ६३

त्रासदायक वर्षे ७ १६ २५ ३४ ५२ ७० ७९

शुभवार- मंगळवार शुक्रवार

भाग्यरत्ने पुष्कराज व नीलमणी.


मंत्रशास्त्रांतील काही प्रकार

लेखक— **बी. व्ही. हेजीब.**

ब्रम्हांडं चेतयंतीं विविधसुरनृणां तर्पयंती प्रमोदैः ।
दीप्तास्तं दीप्तयंती निजगुणवितथैः षड्विधैः प्रेरयंती ।
वर्णान् देवान् सृजंती दितिसुतदालगी साप्यहंकारकर्त्री
छेत्ता तस्यैव जाड्यं स्वरग्चिततनुर्मोचयेच्छाप-
जालम् ॥ १ ॥

टीपः– उपासनेच्यापूर्वी शूचिर्भुत होऊन, वरील श्लोकाचा (१ माळ) जप केला म्हणजे कोणतीहि कर्म, तंत्र यंत्र संबधी कर्मे यशस्वी होतात.

प्रपंचसौख्य यंत्र



पत्नी मनोरमा देही मनोवृत्तानुसारिणी
तारिणी दुर्गसंसारसागरस्य कुलोद्भवाम् ॥

टीपः– या मंत्राचा जप व यंत्राचे पूजन केल्याने आणि प्रति शुक्रवारी कुमारिकेस वस्त्र व भोजन दिल्याने विवाह, स्त्रसौख्य व धन मिळून जनाशी सख्य होते.

मंत्रः– कार्तवीर्यार्जूनोनाम् राजाबाहू सहस्त्रवान्
तस्यस्मरणमात्रेण गतं नष्टं च लभ्यते ॥

टीपः– या मंत्राचा जप केल्याने शत्रूचे कार्य लांबणीवर पडते. हाच मंत्र एका फळीवर लिहून ठेवल्याने गेलेले जनावर किंवा मनुष्य परत येते.

कार्तवीरस्य वीरस्य शिष्टानां रक्षकस्यच ।
मंत्र कार्तवीर्याजुना धन्वी राजेन्द्रो हैययेश्वरः ॥

टीप- या मंत्राच्या जपाने जय मिळून भय नाहीसे होते.


प्रभावी मंत्रकवच–तंत्रसिद्धि साधना !

लेखक— सदाशिव आ. शृंगारपुरे (मंत्रशास्त्रज्ञ)

प्रणव: परमं ब्रह्म प्रणव: परम: शिव ।
प्रणव: परमो विष्णु: प्रणव: सर्व देवता ।।

भारतीय ज्योतिषशास्त्राप्रमाणे मागील जन्माच्या-पापपुण्यामुळे आपला जो भोग असतो त्यामुळे आपला पुनर्जन्म होतो. याला आपले धर्मग्रंथहि मान्यता देतात. त्यामुळे प्रत्येक माणसाची जन्मकुंडली म्हणजे त्यानें गतजन्मात केलेल्या पापपुण्याच्यायोगे उत्पन्न झालेलें जे भाग्य असते ते दर्शविणारा प्रकाशाच आहे यांत शंका नाहीं. जन्मकुंडलीत एकूण बारा स्थाने असतात. प्रत्येक स्थानांत विशिष्ट वासना स्पष्टपणे दिसून येतात. जो-पर्यंत वासनांचा क्षय होत नाही. तोपर्यंत मनुष्यप्राणी जन्ममृत्युच्या फेऱ्यातून सुटत नाही व पू. श्रीमंत आद्य शंकराचार्यांनी म्हटल्याप्रमाणे पुनरपि जननं पुनरपि मरणं । पुनरपि जननी जठरे शयनम् या न्यायाने पुन्हा पुन्हा जन्म घेतो.

श्री



वर कुंडलीची जी चौकट दाखवली आहे, त्यामध्ये त्या त्या स्थानांतील प्रमुख संबंधीत वासनांचा उल्लेख केला आहे. गतजन्मीं ज्या बाबतींत इच्छा म्हणजेच वासना राहिली असेल त्याकरितां ती व्यक्ति पुन्हा जन्म घेऊन ते फल भोगते. पुण्य कृत्यांचा अमाप साठा असेल तर त्याबाबत अत्यंत उत्कृष्ट फल प्राप्त होते. जर अनेक पातके झाली असतील तर साहजिकच त्या स्थानाचे फल अति निकृष्ट मिळून दु:ख होते. व्यवहा-रांतसुद्धा एखाद्या व्यक्तीस कल्पनातीत दु:ख झाले' तर आपण सहजपणे म्हणतो की, " बिचाऱ्याने मागील जन्मी कोणते असे भयंकर पाप केले होते की त्यामुळे परमेश्वराने त्यास इतक्या यातना दिल्या."

वरील विवेचन वाचल्यावर साहजिकच आपल्या मनांत प्रश्न उत्पन्न होतो की, जी गोष्ट परमेश्वराच्या आज्ञेने आपल्या नशिबी आली आहे ती भोगण्यापलिकडे मनुष्यप्राण्याच्या हाती अन्य उपाय नाही. परंतु आपण जर आपल्या धर्मग्रंथांचे नीट मनन केले तर ही गोष्ट स्पष्ट होते की, प्रत्येक अपायास उपाय आहेच आपल्या अनेक पुराणांतून नानाविध कार्यांकरिता निरनिराळे यज्ञ व व्रते सांगितली आहेत. प्रत्येक कुयोगासाठी मंत्रतंत्राचे उपाय आहेत. परंतु याबाबत विद्वान व सुशि-क्षित लोकांनी अनेक वर्षे दुर्लक्ष केल्यामुळे आपली ही विद्या मरणावस्थेत आहे. असे अनेक लोक आपल्या पाहण्यांत येतात की जे कधीहि तीर्थाला अगर देवळांत जात नाही. परंतु बुवा अगर महाराजांच्या दर्शनाला जातात. कारण त्यांना कोठल्याहि प्रकारे कष्ट न करितां तुरंत दान महापुण्य पाहिजे असते. याच मनोवृत्तीतून अनेक ढोंगी साधुसंन्यासी उत्पन्न होऊन आपल्या देशांत आज याबाबत ढोंगीपणा सुरू आहे. वास्तविक दीन अधिक दोन=चार या गणिताप्रमाणे आपल्या मंत्रविद्येत शंभर टक्के यशस्वी होणारे उपाय दिले आहेत. परंतु सर्वसामान्यत: ही विद्या न जाण-णाऱ्या लोकांचा आज देशभर संचार सुरू असून अनेक खटले आपणास कोर्टात गेल्याचे वृत्त–वर्तमानपत्रांतून नित्य वाचण्यांत येते.

आपण केलेलें पाप वज्रलेप झाल्यावर आतां ते

नाहीसे करून त्यापासून सुटका होणे कसे शक्य आहे हा प्रश्न साहजिकच वाचकांच्या मनांत उत्पन्न होईल. म्हणून याबाबत थोडेसे लिहिणे क्रमप्राप्त आहे. ईश्वराच्या अनेकविध उपासनेने पापक्षालन होते हे सर्वश्रुत आहेच. यज्ञाने मनुष्य पुण्यसंचय करितो हे प्रत्येक हिंदूस माहीत आहेच. भगवान श्रीकृष्णांनी श्रीमंद् भगवत् गीतेंत 'यज्ञानां जप यज्ञोस्मि' असे स्पष्ट सांगून जप हा सर्व यज्ञांत श्रेष्ठ यज्ञ आहे हे प्रतिपादन केले आहे. म्हणून मंत्रजपाने मनुष्याच्या पापाने क्षालन होते. प. पू. दत्तावतार श्री. टेंभेस्वामी म्हणत असत की, "बारा कोटी जप केल्याने कुंडलींतील बाराहि स्थानें शुद्ध होतात" इथे साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो की, कुंडलींतील कोठल्या स्थानाचा कुयोग प्रथमतः नष्ट होतो? आपण ज्या कार्यांकरिता मंत्रतंत्र करितो त्याच स्थानाचे फल प्रथम मिळते. मंत्रविद्येत एका ऋषीनी मंत्राची व्याख्याच अशी केली आहे की, "मननं विश्व विज्ञानं माणं संसार बंधनात्।"

ज्यामुळे सर्व विश्वाचे शास्त्रीय ज्ञान होते व संसारापासून सुटका होते तोच मंत्र होय! मंत्राने "माणं संसार बंधनात्" कसे होते याचे एक उदाहरण येथे नमूद करणे अप्रासंगिक होणार नाही. डॉ. बेनीचरण महेन्द्र, अध्यक्ष विज्ञान विभाग आग्रा कॉलेज यांनी अनेक लोकांना ताप, डोकेदुखी वगैरे रोगापासून रामरक्षा स्तोत्राने बरे केले आहे. त्याचप्रमाणे कर्जबाजारीपण, बेकारी वगैरे बाबतही अनेकांना संकटमुक्त केले आहे. त्यांच्यामते 'ध्वनीचा प्रभाव मनुष्याच्या शरीरावर व मनावर होतो. मंत्राच्या साह्याने उत्पन्न झालेल्या लहरीमुळें रोग्याच्या मनावर परिणाम होऊन शांति व बळ उत्पन्न होते.

आपल्या देशांत मंत्रतंत्र विद्या हजारो वर्षापासून परंपरागत चालू आहे. मंत्रानें मनाची शक्ति वाढवून अनेक कामे करिता येणे शक्य आहे. पू. स्वामी विवेकानंद म्हणत असत की, 'मन आपला संबंध संपूर्ण विश्वाशी केव्हाहि जोडू शकते' म्हणूनच मंत्राने भारलेल्या वस्तू काढलेली चक्रें अनेक संकटग्रस्त लोकांना उपयोगी पडतात. तंत्रशास्त्रांत प्रत्येक मंत्राचे चक्र किंवा यंत्र दिले आहे. उदा. सर्व लोकांना वश करण्याकरिता "गोपाल–जन्म" पुरातन कालापासून प्रसिद्ध आहे.

सुरवातीस उल्लेख केल्याप्रमाणे कुंडलीत प्रत्येक स्थान कोठल्यातरी वासनेचे द्योतक आहे. त्या स्थानाचा नाश झाला असता त्याचे त्या व्यक्तीस वाईट फल मिळते. उदाहरणार्थ पंचमस्थान संततीचें आहे. जर हे स्थान विकृत असेल तर त्या व्यक्तीस पुत्र संततीच होणार नाही किंवा जगणार नाही. अशावेळी त्या स्थानाच्या संबंधीत जी देवता असेल तिचे चक्र किंवा यंत्र बांधून रोज पूजा केल्यास खचित पुत्र होईल.

भारताचे अर्थमंत्री ना. मुरारजीभाई देसाई यांनी पक्षाचे काम करण्याकरिता मंत्रिपदाचा राजिनामा दिला. त्यांची कुंडली जर अभ्यासली तर स्पष्ट दिसून येईल की, पक्षाचे काम करिण्याकरिता राजीनामा दिला हे निमित्त झाले. वास्तविक त्यांच्या कुंडलीत दशमस्थान (राज्य भुवन) शनीने बिघडविल्यामुळे ते मंत्रीपदावरून खाली आले. जर त्यांनी दशमबिंदूची शांती करून श्रीदेवीचक्र बांधून घेतले असते तर हा कुयोग गेला असता. असे अनेक पुढारी आहेत की, ज्यांना पुढारीपणाचा लाभ होतो. परंतु अधिकार किंवा सत्ता यापासून ते दूर रहातात. याकरिता त्यांनी 'श्रीदेवीचक्र बांधून जवळ ठेऊन जरूर अनुभव घेऊन पहावा. एखादा चमत्कार झाल्यासारखा त्यांना अनुभव येईल. काहीजणांना परमेश्वर कृपेने सर्व गोष्टी अनुकूल असतात. मात्र कारण नसताना त्यांना मनःशांती नसते या लोकांनी शांतीचक्र बांधून पूजा केल्यास मनाला समाधान वाटून अस्वस्ता हळूहळू नष्ट होऊन कालांतरानें पूर्ण मनःशांती मिळेल.

यंत्रोपासना

(१) सूर्य यंत्र

४	५	६	७	१	२	३
२	३	४	५	६	७	१
७	१	२	३	४	५	६
५	६	७	१	२	३	४
३	४	५	६	७	१	२
१	२	३	४	५	६	७
६	७	१	२	३	४	५

हे यंत्र रविवारी लिहून धारण केल्याने भूतादि ग्रह युद्धातील भ्याड मनुष्याप्रमाणे पलायन करितात.

(२) चद्र यंत्र

५	६	७	१	२	३	४
३	४	५	६	७	१	२
१	२	३	४	५	६	७
६	७	१	२	३	४	५
४	५	६	७	१	२	३
२	३	४	५	६	७	१
७	१	२	३	४	५	६

हे यंत्र सोमवारी लिहून त्याची धूपदीपादीकानी पूजा केल्यावर स्त्रीने धारण केले असता गर्भधारणा होते.

(३) मंगळ यंत्र

६	७	१	२	३	४	५
४	५	६	७	१	२	३
२	३	४	५	६	७	१
७	१	२	३	४	५	६
५	६	७	१	२	३	४
३	४	५	६	७	१	२
१	२	३	४	५	६	७

हे यंत्र मंगळवारी लिहून पूजा करून जवळ बाळगले असता दुष्ट स्त्रीसुद्धा पतीच्या आंकित होते.

(४) बुध यंत्र

७	१	२	३	४	५	६
५	६	७	१	२	३	४
३	४	५	६	७	१	२
१	२	३	४	५	६	७
६	७	१	२	३	४	५
४	५	६	७	१	२	३
२	३	४	५	६	७	१

हे यंत्र बुधवारी लिहून त्याचे पूजन करून मस्तकी धारण करावे, म्हणजे व्यापारधंद्यात लाभ होतो.

(५) गुरु यंत्र

१	२	३	४	५	६	७
६	७	१	२	३	४	५
४	५	६	७	१	२	३
२	३	४	५	६	७	१
७	१	२	३	४	५	६
५	६	७	१	२	३	४
३	४	५	६	७	१	२

हे यंत्र गुरुवारी लिहून यथासांग पूजा करून दंडास धारण करावे म्हणजे गुरुबल प्राप्त होते.

(६) शुक्र यंत्र

२	३	४	५	६	७	१
७	१	२	३	४	५	६
५	६	७	१	२	३	४
३	४	५	६	७	१	२
१	२	३	४	५	६	७
६	७	१	२	३	४	५
४	५	६	७	१	२	३

हे यंत्र शुक्रवारी लिहून त्यास धूपदीपार्चित करून जवळ बाळगिले असता लक्ष्मीची प्राप्ती होते.

(७) शनि यंत्र

३	४	५	६	७	१	२
१	२	३	४	५	६	७
६	७	१	२	३	४	५
४	५	६	७	१	२	३
२	३	४	५	६	७	१
७	१	२	३	४	५	६
५	६	७	१	२	३	४

हे यंत्र शनिवारी लिहून भक्तिपुरस्सर पूजा करावी मग दंडास धारण करून त्यास नित्य धूप दिल्याने शनि पीडा दूर होते.

ही सूर्यचंद्रादि यंत्रें गोरोचनाने भूजपत्रावर लिहून यथाविधि पूजा केली पाहिजे. ती अशुद्ध न होऊं देण्याविषयी दक्षता ठेवावी म्हणजे कार्यसिद्धी होते.

(आपल्या भारतीय ज्योतिषशास्त्रा मध्ये उपासना मार्गाला विशेष महत्व असून त्यातील एक मार्ग म्हणजे यंत्रोपासना होय. त्याविषयी वर दिलेली माहिती जिज्ञासूंना खचितच उपयुक्त ठरेल असे वाटते.)

—संपादक

भारतामधील वेधशाळा

संकलक—सौ. मंदाकिनी जकातदार

भारतांत आधुनिक पद्धतीची वेधशाळा ईस्ट इंडिया कंपनीचे मद्रासचे गव्हर्नर सर चार्लस ओक्ले यांनी १७९२ साली सुरू केली.

सर ओक्लेना ज्योतिषशास्त्राचा जबरदस्त छंद होता. ते सतत ज्योतिषशास्त्राचा अभ्यास व संशोधन करीत असत. त्यांनी गव्हर्नर असतां लंडनहून कंपनीच्या डायरेक्टरकडून परवानगी येण्याच्या आंतच वेधशाळेच्या उभारणीस सुरूवात केली होती. आणि या योजनेस संमति येण्यापूर्वी वेधशाळा उभारून पुरी केली होती हे विशेष होय. या वेधशाळेवर एक शिला बसवली होती. तीवर त्याने तामीळ व तेलगू भाषेत मजकर खोदून घेतला होता. मजकूर असा होता---'हजारो वर्षानंतरच्या पिढीस हे माहीत व्हावे कीं, आशियांत गणिताचा प्रसार इंग्रजांनी केला.' परंतु इंग्रजांना हे माहीत नव्हते की भारतीयांना गणित आणि ज्योतिषशास्त्र यांचे ज्ञान हजारो वर्षापूर्वीच झालेले आहे. एवढेच नव्हे तर दिल्ली, मथुरा, काशी, जयपुर व उज्जैन या ठिकाणी वेधशाळादेखील होत्या. महाराजा सवाई जयसिंह ह्यांनी त्या सुमारे २५० वर्षापूर्वीच तयार केल्या होत्या. दिल्ली येथील वेधशाळेने सतत सात वर्षी दीर्घ परिश्रम घेऊन ताऱ्यांची सूची तयार केली होती. या 'जंतर मंतर' नांव असलेल्या वेध—शाळेतील सर्वांत प्रचंड असे सम्राट यंत्र १२५ फूट लांब, १२० फूट रुंद व ६८ फूट ऊंच आहे. पण या प्राचीन व आधुनिक वेधशाळांत एक मूलभूत फरक आहे. तो म्हणजे प्राचीन वेधशाळांत ज्योतिषशास्त्र व सूर्याच्या स्थितीवरून ग्रहविषयक ज्ञान होत असे, तर आधुनिक वेधशाळांत पृथ्वी व इतर ग्रह यांची भौतिक रचना व ताऱ्यांचा विकास यांचे अध्ययन केले जाते. त्यासाठी अत्याधुनिक यंत्राचा व साधनांचा उपयोग केला जातो. अशा या वेधशाळांतून खगोलविद्या व चुंबकीय शास्त्रांचे अध्ययन होत होते. या प्रकारच्या वेधशाळा प्रामुख्याने भारतात कोडाईकनाल, नैनिताल व हैद्राबाद या ठिकाणी आहेत.

कोडाअिकनाल वेधशाळा

दक्षिण भारतांतील ही वेधशाळा केवळ भारतांतीलच नव्हे तर जगांतील प्रमुख वेधशाळांपैकी एक मानली जाते. सन १७९२ मध्ये ईस्ट इंडीया कंपनीने मद्रास येथे जी वेधशाळा उभारली होती तीच वेधशाळा १८९८ मध्ये कोडाईकनाल येथे हलविण्यांत आली. यापूर्वी म्हणजें १८४४ मध्ये या वेधशाळेने अकरा हजार ताऱ्यासंबंधीचे पंचांग तयार केले होते. शिवाय १८६१ मध्ये आणखी एक पंचांग तयार करून त्यांत पांच हजार ताऱ्यांची समग्र माहिती दिली होती.

मद्रास येथे असलेली वेधशाळा कोडाईकनाल येथे मुद्दाम हलविण्यांत आली. कारण कोडाईकनालची भौगोलिक स्थिती शास्त्रज्ञांचे मते जास्त अनुकूल होती. कोडाअिकनाल विषुववृत्तापासून उत्तरेला केवळ दहा अंशांवर वसले आहे. त्याची समुद्रसपाटीपासून ऊंची २३४३ मीटर आहे. या कारणामुळे येथून सूर्याचे निरीक्षण फार चांगले होऊं शकते. दक्षिण गोलार्धांत दिसणाऱ्या ताऱ्यांचे निरीक्षण देखील येथून चांगले करता येते. शिवाय पृथ्वीची विषुववृत्तरेखा या ठिकाणापासून जवळ आहे.

कोडाअिकनाल येथे भारतामधील पहिली सौर वेधशाळा उभारण्यासाठी आणखीहि एक कारण घडले. ते म्हणजें १८७६–७७ च्या सुमारास मद्रास प्रांतांत दुष्काळ पडला. या दुष्काळाच्या चौकशीसाठी सरकारने एक समिति नेमली होती. १८८१ मध्ये या समितीने आपला अहवाल सादर केला. या अहवालात नमूद केले होते की, सूर्याची गति व वार्षिक पाऊस

यांचा अन्योन्य संबंध असल्याचे भारताबाबत स्पष्ट दिसते. म्हणून त्यादृष्टीने भारतात सौर वेधशाळा स्थापन करण्यांत यावी ही शिफारस करण्यांत आली. या शिफारशीनुसार भारतीय वेधशाळांची पुनर्रचना करण्याची योजना आंखण्यात आली व १८९९ मध्ये प्रत्यक्ष अमलबजावणीस सुरुवात झाली व मद्रास वेधशाळेचे नियंत्रण केन्द्र सरकारकडे आले. १९०० मध्ये कोडाअिकनाल वेधशाळेची मुख्य इमारत व दोन घुमट पुरे झाले. सौर निरींक्षणाची यंत्रेहि बसविण्यांत आली जानेवारी १९०० पासून हवामान व भूकंप निरींक्षणाचे काम या वेधशाळेने सुरू केले. व सौर अध्ययन १९०१ पासून चालू झाले. या अध्ययनांत सूर्यावरील डागांसाठी सूर्याची छायाचित्रे घेणे, सूर्याचे निरीक्षण करणे, सूर्यग्रहणाचेवेळी त्याची छायाचित्रे घेणे अि० कामे समाविष्ट होती.

या वेधशाळेत हळू हळू आधुनिक यंत्रसामग्री बसविली गेली. १९५१ साली सुवर्ण–महोत्सव झाला. व त्यावेळी त्याला जोडून दोन विभाग उघडण्यांत आले.

ही वेधशाळा खूप उंचावर आहे. सपाटीवरील धूळ तिथपर्यंत पोचत नाही व त्यामुळे भोवतालचे वातावरण साफ रहाते. वर्षाच्या पहिल्या सहामाहीत येथून सूर्याचे निरीक्षण फार चांगल्या प्रकारे करता येते. सूर्योदय होताच येथील यंत्रे कामाला लागतात. सूर्याचे होणारे फाटे, व त्याठिकाणी निर्माण होणाऱ्या ज्वाळा व सूर्यावरील डाग यांचा अभ्यास तेथे केला जातो. या ज्वाळामुळे पृथ्वीवरील रेडिओलहरींच्या प्रसरणांत अडथळे निर्माण होतात. तसेच चुम्बकीय वादळे निर्माण होतात. म्हणून असा संभव दिसू लागताच वर्तमानपत्रे, नभोवाणी, सागरपार दूरध्वनीखांते यांना पूर्वसूचना दिल्या जातात.

अलीकडे ही कोडाइकनाल वेधशाळा अधिकाधिक परिपूर्ण होत आहे. १४ सप्टेंम्बर १९६० साली तिथे एक खास सौरचित्रग्राहक बसविण्यांत आला. सुप्रसिद्ध फ्रेंच शास्त्रज्ञ लियॉट यानें त्याची रचना केली आहे. हे यंत्र तयार होण्यापूर्वी सूर्यावरील अग्निशिखांची छायाचित्रे केवळ ग्रहणाच्यावेळीच घेता येत असत. पण ती आता वाटेल तेंव्हां घेता येऊ लागली आहेत. हे यंत्र पॅरिसहून आणले आहे. त्याच्या उभारणीसाठी अन्य सामग्री येथेच तयार केली आहे.

सुरूवातीपासूनच आंतरराष्ट्रीय कार्यक्रमात कोडाइकनाल वेधशाळेने भाग घेतला आहे. १९२८ ते १९४५ पर्यंत येथे सूर्याविषयक जे अध्ययन झाले त्याची माहिती आंतरराष्ट्रीय खगोल मंडळाला पुरविली गेली आहे. सूर्याच्या गतीमध्ये कधी विशेष वाढ दिसली की येथून तशी सूचना फ्रांस, इंग्लंड व अमेरिका या ठिकाणी वेधशाळांना दिल्या जातात. १ जुलै १९५७ ते ३१ डिसेम्बर १९५८ पर्यंतच्या आंतरराष्ट्रीय भूभौतिक वर्षात कृत्रिम उपग्रहावरील संदेशाचे ग्रहण, सौर चुंबकीय वादळे व उत्तरध्रुवावरील लोकांचे निरीक्षण करण्यात आले.

नैनिताल वेधशाळा

नैनितालपासून फक्त आठ मैलावर ६४०० फूट उंचींवर मनोरा शिखरावर ही वेधशाळा सुरू होऊन फक्त ९ वर्षे झाली. या अल्प मुदतीत तिने जागतिक महत्वाचे कार्य केले आहे. १९६० साली शुक्राने मघा नक्षत्रावर आच्छादन आणले होते. त्यावेळीं जगांतली ज्या बारा वेधशाळेनी निरीक्षण केले त्यात नैनितालची एक वेधशाळा होती. १९५५ साली या वेधशाळेतील शास्त्रज्ञांना सूर्यग्रहणाचे अध्ययन करण्यासाठी सिलोनला पाठविण्यांत आले होते.


१९५७ साली अरँड व मार्कोस या दोन प्रसिद्ध धुमकेतूचा अभ्यास येथें केला गेला.

आंतरराष्ट्रीय भूभौतिक वर्षात या वेधशाळेने महत्वाची मदत केली. चंद्राची छायाचित्रे घेणे कृत्रीम उपग्रहांचा वेध इत्यादि उल्लेखनीय कामे या वेधशाळेने केली. अमेरिकेतील दुर्लभ यंत्रे ह्या वेधशाळेला मिळाली आहेत. मार्कोबिटन छायाग्राहक हा त्यातील प्रमुख आहे. त्याच्या सहाय्याने चंद्राची छायाचित्रे घेतात त्याची किंमत जवळ जवळ २० लाख रुपये आहे. कॅमरें संबंध जगांत फक्त २० आहेत. याशिवाय कृत्रिम उपग्रहांचा वेध घेऊन त्याची छायाचित्रे घेणारे एक विशिष्ट यंत्र या ठिकाणी बसविले आहे. त्याची किंमत सहा लाख रुपये आहे. अशा प्रकारची यंत्रे पृथ्वीच्या पाठीवर बराच आहेत.

हैदराबाद वेधशाळा

१९०९ मध्यें स्थापना झाली. ग्रहनक्षत्राच्या अध्ययनासाठी ही वेधशाळा आहे. भूकंपाची नोन्द घेण्याची सोय या ठिकाणी आहे. ग्रहतारे, नक्षत्र सूर्य — चंद्र इत्यादींचे अध्ययन या ठिकाणी प्रामुख्याने होते.

—०—



तिळाचे शुभाशुभ परिणाम

लेखक–श्री. सदानंद नातू

ज्योतिष हा एकच विषय असा आहे की ज्याचेकडे शें.९० लोकांचे लक्ष वेधले जाते. मनुष्य गरीब असो श्रीमंत असो, लहान असो वा मोठा असो त्याला आपल्या भवितव्यांत काय आहे हे जाणून घेण्याची स्वाभाविक इच्छा असते. भविष्य वर्तविण्याचे अनेक प्रकार वा साधने आहेत. कांहीजण जन्मपत्रिका पाहून भविष्य सांगतात. तर कांही नुसत्या हातावरील रेषा पाहून भाकीत करतात. कांही जण तर तुमचा नुसता चेहरा पाहूनच भावीकालाचे चित्र रेखाटतात तर कांही तुमची जन्मतारीख वा हस्ताक्षर यावरून भविष्य सांगतात अर्थात हा ज्याचे त्याचे व्यासंगाचा नि अनुभवाचा प्रश्न आहे.

आणखी एक भविष्य वर्तविण्याचा प्रकार म्हणजे अंगसामुद्रिकशास्त्र. अंगावरील चिन्हे, खुणा (भौरी, लसूण, तीळ, मस वगैरे) याला या शास्त्रात फार महत्व असते. विशेषतः तीळाला त्यादृष्टीने विशेष महत्व देण्यात येते. तीळाचे २ रंग असतात. एक तांबूस तीळ व काळे या तिळाचे कांही अनुभव आमचे पहाण्यांत व ऐकण्यांत आल्याने ते येथे विशद करीत आहोत.

तीळ हे चिन्ह दोन प्रकारचे असते. त्यास इंग्रजीत 'सिस्टर मार्क' असे म्हणतात. प्रथम प्रकाराला उत्तर चिन्ह असे म्हणतात. तोंडावर अगर शरीराचे दुसऱ्या कोठल्याहि दृश्य भागावर असलेल्या तिळास उत्तर तीळ असे म्हटले जाते व अनुत्तर तीळ चिन्ह हे शरीराच्या अदृश्य भागावर दिसून येते.

हे तीळ प्रत्येकाच्या अंगावर एका अथवा अनेक ठिकाणी त्याच्यां जन्मपत्रिकेंतील ग्रहमानानुसार जन्मतःच आलेले असतात. ही तिलादि चिन्हे ग्रहांच्या इष्टानिष्ट परिणामांची द्योतक असतात.

शिरोभागी उजव्या बाजूस एखादे तिलचिन्ह असेल तर त्याचे उत्तर तिलचिन्ह पोट अथवा भुजा या भागावरील उजव्या बाजूस पहावे लागते व ते बहुधा असतेच. शरीराच्या दृश्य भागावरील एखाद्या तीलमसादि चिन्हावरून त्याच्या खरेपणाची प्रचीति पहाण्यासाठी तसेच दुसरे एखादे उत्तरदायी चिन्ह शरीरावर अन्य ठिकाणी पाहूनच फलाची खात्री करून घ्यावी लागते.

उजव्या कानचाफ्यावर तिलचिन्ह असल्यास त्याचे उत्तरचिन्ह उजव्या कुशीवर सापडते व तसे सांपडल्यास तो पुरुष प्रसन्नचित्त असतो. पण तेच चिन्ह स्त्रीचे ठिकाणी आढळेल तर तिला वैधव्य येते.

हेच तिलचिन्ह डाव्या कानचाफ्यावर असेल व त्याचे उत्तर तिलचिन्ह डाव्या कुशीवर सांपडेल तर ते बहुधा असाध्य असा रोग होण्याचे सूचक समजले जाते.

पूर्व तिलचिन्ह खालील ओठावर असून त्याचे उत्तर तिलचिन्ह गुडघ्यावर सांपडते व ते तसे सांपडल्यास परदेशांत मनुष्य विवाहित होतो.

अनुत्तर तीळ मानेच्या उजव्या बाजूवर असेल तर पुरुष बुद्धिमान असतो. हाच तीळ जर मानेच्या डाव्या बाजूला असेल तर पुरुष असो वा स्त्री असो, त्याचेवर उंचावरून पडण्याचा अगर पाण्यांत बुडून मरण्याचा धोका असतो.

हाच तीळ जर मानेच्या (कंठाच्या) मध्यावर असेल

तर पुरुष अथवा स्त्री कोणीहि असो त्यास अकस्मात मृत्यू येण्याची भिती असते.

पुरुषाच्या स्तनाच्या खाली उजवे बाजूस तीळ असेल तर तो शुभ. डाव्या बाजूस असेल तर पुरुष परिश्रमी असतो. पण स्वभावाने रागीट आढळतो. स्त्रीचे उजव्या स्तनाचे खाली तीळ अशुभ, पण तो तसा डाव्या बाजूस असेल तर ती स्त्री पतिव्रता असते. उजव्या पावलावर हाच अनुत्तर तीळ असता पुरुष उत्तम ज्ञानी असतो व स्त्रीच्या असता ती सुखी होते. मात्र हाच तीळ स्त्रीच्या वा पुरुषाच्या दोघांच्याहि डाव्या पायावर (पावलावर) असल्यास तो अशुभ समजला जातो.

पुरुषाचे उजव्या खांद्यावर असा तीळ असेल तर तो धनवान होतो. हाच तिळ डाव्या खांद्यावर असता तो पुरुषास अशुभ समजावा.

स्त्रीला खांद्यावरील तिळ, मग तो उजव्या बाजूस असो वा डाव्या बाजूस असो, अशुभच समजावा.

या तिळादि चिन्हाचा प्रत्यक्ष अनुभव बरेच ठिकाणी पहावयास मिळाला आहे अर्थात या तिल शास्त्रावर अधिक संशोधन होण्याची जरूरी आहे. इत्यलम् ।



योगचिंतामणी

(अनु. ज्योतिष भास्कर भालेराव गुरुजी, सोलापूर)

अहमदनगरचे ज्योतिर्महर्षी– वामनशास्त्री रेखी यांनी **श्रीयोगचिंतामणि** या नांवाचा ज्योतिषविषयक ग्रंथ संस्कृतात रचिला आहे. ग्रंथांतील श्लोकांचा अनुवाद मराठी भाषेत आर्यावृत्तांत केला आहे.

चंद्रचूडो भवेद्योगो धर्मपो यदि केंद्रगः ।
योगऽस्मिन् दानशीलश्च गुणपूर्णो भवेन्नरः ।
जेव्हा केंद्री येतो भाग्याधिप चंद्रचूडयोग घडे ।
यायोगे नर होतो सुगुणी दाता प्रसिद्ध चोहिकडे ।१।

पताख्यस्तदा योगो ग्रहः पंचम केंद्रगाः ।
धनवान् पुत्रयुक्तश्च योगेऽस्मिन् धर्मवान्नरः ।
योग पताका होतो, जेव्हा केंद्रात वा सुतस्थानी
बहुग्रह येता होतो, मनुज सुखी धर्म संतति-श्रीनी ।२।

उत्साहयोगे यदिरात्रिनाथः। स्वोच्चे नरः सर्वसुखान्वितः स्यात्
केन्द्री, कोणी, स्वोच्च चंद्र शुभस्थित तदा घडे योग ।
उत्साह नाम त्याचें जेणें मिळती नरास सुखभोग ।३।

गुरुर्यदा शुक्रयुतश्च केन्द्रे । सुखी मनुष्यः खलु पद्मरागे ।
गुरु–भार्गव केन्द्रामधि असता तो पद्मरागयोग घडे ।
सर्वसुखे मिळति नरा केव्हा त्याला कधी न वाण पडे ।४।

शनिश्चतुर्थेच यदा ज्ञदृष्टो। ददाति सौख्यं बहु पुंडरीकः
सुखास्थित मंद बुधेक्षित असतां तो पुंडरीक योग असे ।
या योगे जातक नित सर्वसुखान्वित सदैव तुष्ट असे ।५।

केंद्रायगो वित्तपतिर्मयूरो। वित्ते ऽथवा चेत् धनदः सुयोगः ।



धनपति धनभुवनी वा केंद्रीं लाभांत येतसे जेव्हा ।
योग मयूर गणावा नित्य धनागम नरा घडे तेव्हा ।६।

भास्कराद्विक्रमे बुद्धौ लाभे वा खेचरा यदा ।
मेकर्कजाख्य योगः स्याद्राराजमानफलप्रदः ।
रविपासूनि तिसऱ्या वा पंचम लाभात सर्व ग्रह येती ।
मेकर्कज योगाने मनुजा जगिं राजमान्यता प्राप्ती ।७।

लग्ने मीनाश्रिते चंद्रे पूर्णेच सुहृदीक्षिते ।
कुलभूषण योग स्यादत्र शास्त्रमतिर्नरः ।
लग्नी मीनाश्रित बुध–सूर्येक्षित पूर्ण चंद्र अस्तांत ।
कुलभूषण योग घडे करितो मनुजास तज्ञ शास्त्रांत ।८।

कुलदीपकयोगः स्याद् भ्रातृपोयदि कोणगः ।
परोपकारयुक्त स्याद् योगे ऽस्मिन् मनुजस्तदा ।
सहजाधिप विद्यालयिं किंवा भाग्यांत होय संप्राप्त ।
कुलदीपक योग तदा, मनुष्य होतो परोपकाररत ।९।

केंद्रेच कोणे गगनाधिपश्चेत्गे वत्नवान्धयो ! श्रीस मनुष्य :!

कर्माधिप केन्द्री वा कोणी येता श्रीवत्सयोग घडे।
या योगे नर होतो श्रीमान् जन वर्णितात चोहिकडे।१०

चतुष्टचे विक्रमगेहनाथे। स्यत्रिपाजाते नृपपूजितश्च
सहजाधिप सुखभवनी येतो तो पारिजातयोग असे।
राजासम सन्मानित मनुज सदा सर्वसौख्य भोगितसे।११।


केंद्रे वा लाभगेहे वा कोणेवांबुपतिर्यदा।
मुक्तादामाख्ययोग: स्याद् बहुभोगधनप्रद:।
केंद्र– त्रिकोण– स्थानी किंवा लाभात ये सुखस्वामी।।
मुक्तादाम सुयोगी नर होतो धनि अनेक सुख-भोगी। १२।

कोण केंद्र कुटुंबाय निकेतन ग तो यदा। मंगलो रात्री नाथेन युक्त:स्यात् – वित्तयोगद:।
तनु– धन– सप्तम सुख वा कर्मायीं चंद्रमंगळ प्राप्त।
होतो धनयोग तदा, श्री–ऐश्वर्ये नरांमिळे अमित।१३।

कौर्प्ये मेष हरि कर्कटयातौ। चापराशिझषगतौ वा।
भास्करात्मजवंसुधरात्मजौ–। स्यात् तदा सुखकरो मृगराज:।
धनुवृश्चिकमीन तथा कर्काटक मेष सिंह राशीत।
शनि मंगळ मृगराज योग करी मानवास तो मुदित।१४।

यदांबरचरा: संति मीनमेषवृषाश्रिता:
दोलाक्षत्रप्रदो योगस्तदा सुखकरोभवेत्।
मेषवृषभमीनाश्रित आधिकाधिक ग्रह नरास सुख देती।
याला कारण दोलाक्षत्रप्रद योग जाणती सुमति।१५।

'ज्योतिर्वैभव' ग्रंथाचे प्रकाशन समारंभ प्रसंगीं



ना. बाळासाहेब भारदे, सभापती.

छाया– देशपांडे फोटो स्टुडिओ

असा आहे हा धूमकेतू!

लेखक :- पं रा. ना. केळकर

या दिवसात या भागांत सकाळी साडेचार ते सव्वा-पांचच्या सुमारास पूर्वक्षितिजावर सुमारे ८ अंशावर एक मोठा धूमकेतू दिसत आहे. एवढा मोठा धूमकेतू अलिकडे बऱ्याच वर्षात दिसलेला नाही असे म्हणतात. इ. स. १९४८ च्या जानेवारीत आकाशात एक धूमकेतू दिसत होता; पण तो लहान होता. तथापि तो ऑस्ट्रेलिया, अमेरिका, आफ्रिका, व हिंदुस्थान या भागांत दिसत होता. इसवीसनाच्या आरंभापासून इ. स. १९१५ पर्यंत केवळ डोळयांनी म्हणजे दुर्बिणीच्या सहाय्याशिवाय ५७० धूमकेतू दिसल्याची नोंद युरोपियन ज्योतिषशास्त्रज्ञांनी करून ठेवलेली आहे.

धूमकेतू दर्शनाचे वर्णन

त्यापूर्वी म्हणजे इसवीसनाच्या सुमारे ३७१ वर्षे ॲरिस्टॉटलाला एक धूमकेतू दिसला होता, तो एका जळत्या मशालीसारखा असामान्य आकाराचा व दिसण्यास भयंकर स्वरूपाचा होता असे तो म्हणतो. त्यानंतर म्हणजे इसवीसनापूर्वी ४३ वर्षे असाच एक धूमकेतू रोम शहरांतून आकाशात दिसला. त्यावेळी जुलियस सीझरचा आत्मा परमेश्वराकडे जात आहे असे लोकांस वाटले इ. स. ७९ या वर्षी एक धूमकेतू दिसला त्याच सुमारास शालीवाहन शक सुरू झाला. त्याचवेळी वेस्पासियन (Vespasian) मेला त्याचाच तो द्योतक होता असे वाटलें.

अशुभकारक घटना

इसवी सन ६३२ या वर्षी धूमकेतू दिसत होता. त्यावेळी महंमद पैगंबर स्वर्गवासी झाले.

इ. स. १००० या वर्षी पृथ्वीचा लय होणार असे लोकांस भय वाटत होते कारण त्याच वर्षी एक मोठा भयंकर धूमकेतू आकाशात दिसत होता व उल्का पडत होत्या पण परमेश्वरी कृपेने तसे कांही झाले नाही. मात्र प्लेग, दुष्काळ असे प्रकार झाले.

कॉस्टॅन्टिनोपल येथील बादशाही मुसलमानांनी बुडविली त्या सुमारास म्हणजें इ. स. १४५५ मध्ये असाच एक धूमकेतू दिसत होता. त्यावेळी ही आगाऊ संकटाची सूचना आहे असे समजून पोपमहाराजांनी सगळया ख्रिस्ती देवळातून प्रार्थना करविल्या.

१५२८ साली दिसलेल्या धूमकेतूचे दुष्परिणाम

इ. स. १४५५ मध्ये एक धूमकेतू दिसत होता त्यास हॅलेचा धूमकेतू असे नांव देण्यात आले होते. कधी तो वाकडया तरवारीसारखा दिसे तर कधी सरळ तरवारीसारखा दिसे असे वर्णन केलेले आहे.

इसवी सन १५२८ मध्यं एक फारच मोठा व भयंकर धूमकेतू दिसत होता त्याचे वर्णन असे आहे.

It was so horrible and dreadful and engendered such terror in the minds of men, that they died some from fear alone, others from illness engendered by fear.

It was of immense length and of a blood red colour at its head was seen the figure of a curved arm holding a large swor in the hand as if preparing to strike. At the point of this were three stars and on either side a number of axes, knives and swords covered with blood amongst which were many hideous human faces with bristling heads and hairs.

(हा धूमकेतू फारच भयंकर होता. लोकांस त्याची इतकी भीति वाटली की कांही त्या भीतीनेच मेले कांहींना

भयामुळे दुखणे होऊन मेले तो फार लांब व रक्तासारखा लाल होता. त्याच्या अग्रभागी वांकडा हात होता व त्यांत तरवार होती तिचा जणू काय तो आता प्रहर करतो आहे अशी ती धरण्यात आल्यासारखी वाटे. तरवारीच्या टोंकाशी तीन तारा होत्या आणि दोन्ही बाजूस कुऱ्हाडी, सुऱ्या आणि तरवारी रक्ताने भरलेल्या होत्या. त्यातच माणसाची कांही भयंकर मुंडकी होती त्यावर राठ केंस दिसत होते.

या धूमकेतूचे एक चित्र लाकडावर कोरून ठेवण्यात आलेलें असून ते लंडनच्या म्युझियममध्यें आहे. (पहा The Mystery of Romance and astrology page No. 99)

जेव्हां इंग्लंडमध्ये अग्निप्रलय झाला

इ. स. १६६५ मध्यें धूमकेतू दिसत होता. त्यानंतर इ. स. १६६६ मध्ये तेथे मोठा अग्निप्रलय झाला. हा अग्निप्रलय म्हणजे इ. स. १३६५ मधल्या धूमकेतूचाच परिणाम असावा असे लोकांस वाटलें·

अमेरिकेंतील धूमकेतू

इ. स. १७१४ च्या आरंभी अमेरिकेत एक धूमकेतू दिसत होता. दोन महिन्यांनी त्याचे पुच्छ दुभंगलें. त्यानंतर एक आठवडा आभाळ पूर्ण आभ्राच्छादित होते तें स्वच्छ झाल्यावर मूळच्या जागी सहा पुच्छं दिसू लागली. हा दिसण्यात फार भयंकर होता असे ज्योतिषी सी. जे. एस. थॉमसन यांनी आपल्या ज्योतिष ग्रंथांत लिहिले असून त्याचा देखावाहि फार भीतिजनक होता असें तो म्हणतो.

हजार प्रकारचे धुमकेतू

आमच्या प्राचीन ग्रंथांतहि धूमकेतूंची माहिती दिलेली असून ते सगळे ख्रिस्तपूर्वकालीन आहेत. असे एक हजार प्रकारचे धूमकेतू आहेत. त्यांची माहिती निरनिराळया ग्रथांत मिळते. हे सगळे पाहिले म्हणजे आमच्या ग्रंथांतला धूमकेंतूविषयीचा उल्लेख व त्याचे संशोधन इसवी सनापूर्वी निदान चार हजार वर्षे तरी असावे असे विद्वान संशोधकांचे मत आहे. आपल्याकडील सुप्रसिद्ध ज्योतिष ग्रंथकार वराहमिहिर याचा जन्म विद्वान लोकांच्या मते इ. स. ४८५ च्या सुमाराचा आहे. त्याने आपल्या बृहत्संहिता ग्रंथात केतूचार नांवाच्या एका मोठया अध्यायांत अशा अनेक धूमकेतूची माहिती दिलेली आहे. यावरून त्याच्यापूर्वी कित्येक वर्षे ह्या धूमकेतूची माहिती आपल्या पूर्वजांस होती हे आपोआपच सिद्ध होते. अध्यायाच्या आरंभीच गार्गीयं शिखिचारं पाराशरमासित देवल कृतंच ।। अन्याश्च बहून दृष्टवा क्रियते यमानाकुलश्चारः म्हणजे गर्ग पराशर असित, देवल आणि अन्य पुष्कळ यांच्या वर्णनावरून आपण वर्णन करीत आहे असे त्याने म्हटले आहे. त्यावरूनहि आपल्या पूर्वजांस धूमकेतूची माहिती फार प्राचीन कालापासून होती हे सिद्ध होते.

धुमकेतू किती वर्षांनी दिसतो ?

या अनेक प्रकारच्या धूमकेतूंपैकी पैतामहकेतू पांचशे वर्षे प्रवास करून पुनः उदय पावतो म्हणजे एकदा दिसल्यापासून पुनः उदित होण्यास त्यास पांचशे वर्षे लागतात.

उद्दालक श्वेतकेतू एकशें दहा वर्षांनी उदित होतो. शूलाग्रासारखी शिखा धारण करणारा काश्यपश्वेतकेतू पंधराशे वर्षे प्रवास करून पद्मकेतु नांवाचा धूमकेतू उदय होऊन त्याचा अस्त झाल्यावर त्याच्यामध्ये कांही काल गेल्यावर पूर्व दिशेस उदय पावतो व मग अभिजित नक्षत्रास स्पर्श करून आणि ध्रुव, ब्रह्मराशि आणि सप्तर्षी यांस स्पर्श करून आकाशाच्या तिसऱ्या भागाचे आक्रमण करून अपसव्यमार्गे जाऊन अस्त पावतो.

अग्निपुत्र राशिकेतू, शंभर वर्षे प्रवास करून आवर्तकेतू नांवाच्या धूमकेतूचा उदयास्त झाल्यावर मग उदय पावतो.

सूर्य व चंद्रपुत्र धूमकेतू

हजारो धूमकेतूंपैकी कांही धूमकेतू सूर्यपुत्र आहेत, कांही चंद्रपुत्र आहेत तर कांही बुधादि पांच ग्रह राहू, पृथ्वी, मृत्यु ब्रह्मा, अग्नि, वायु, प्रजापति, वरुण यांचे पुत्र आहेत. कांही अंतरिक्षात निरनिराळया दिशांपासून उत्पन्न होणारे दिक्पुत्र आहेत. यांवरून धूमकेतू सूर्य चंद्र व ग्रह यांपासून उत्पन्न होतात असे आमच्या ऋषींचे मत होते.

पाश्चिमात्य संशोधकहि हे धूमकेतु प्राचीन काळी सूर्य, ग्रह व तारे यांच्या पोटातून जी उष्णद्रव्ये वेगानें दूर फेकली गेली, त्यांचेच बनले आंहेत असे म्हणतात. यावरून आपल्या प्राचीन ऋषींच्या संशोधनाचे महत्त्व व त्यांचे अचूक निदान करण्याचे सामर्थ्य लक्षांत येते.

मानवावर होणारे परिणाम

आता धूमकेतूविषयी माहिती मिळविल्यानंतर त्याचा परिणाम होऊ शकेल की काय हा प्रश्न आपोआप उत्पन्न होतो. कारण अंतारक्षातील गोलांच्या आकर्षणाचे परिणाम माणसावर होतात हे आता सर्वांस मान्य झाल्यासारखेच आहे तथापि ते कशाप्रकारचे होतील व किती प्रमाणावर होतील हे पाहिले पाहिजे. ग्रहाचे परिणाम, विशेषतः शनि, मंगळ, हर्शल या पापग्रहांचे परिणामहि वाईटच होतात असे नाही. हे परिणाम सामन्यतः आकाशांतील शुभनक्षत्र विभाग, शुभग्रहांशी संबंध यामुळे चांगलेहि होतात तसेच धूमकेतूचे परिणामहि शुभनक्षत्र विभाग, शुभग्रह संबंध, शुभदिशा, त्यांचा भ्रमण काल व त्यांचे स्वरूप यावर अवलंबून राहातील. ही गोष्ट विचारात घेता पैतामह धूमकेतूसारखा धूमकेतू पांचशे वर्षांनी उदय होणारा व उद्दालक श्वेतकेतूसारखा एकशे दहा वर्षांनी उदित होणारा असल्याने मानवापेक्षा राष्ट्रावर, राष्ट्रधुरिणांवर आणि जागतिक अशा पुष्कळ वर्षांनी घडून येणाऱ्या घटनावर त्यांचे परिणाम घडवील असे म्हणता येते आणि म्हणूनच उल्कापात, धूमकेतू यांचा विचार मेदिनीय ज्योतिषातून करण्यात येतो.

धूमकेतूविषयीं वाईट मत

आपल्या धर्मग्रंथांतून पुष्कळ प्रकारचे उत्पात दिले आहेत. त्यातच धूमकेतूंचा समावेश आहे. ' त्यांत रात्रौ धनुदये उल्का ताराचैव दिने तथा ।। रात्री तु धूमतुश्च भूकंपश्च तथैवहि ।। एतानि दुष्टचिन्हानी देशक्षयकराणिच ।।१।। म्हणजे रात्री धनुष्य व दिवस उल्का आणि नक्षत्रपात व रात्री धूसकेतू, अशी दुष्ट चिन्हे झाली असता ती देशक्षयकारक होत असें सांगितलें आहे.

युरोपियन ज्योतिष शास्त्रज्ञांनीहि धूमकेतू दिसणे हे वाईटच आहे असे म्हटलेले आहे.

धूमकेतूबद्दल एक पाश्चिमात्य ज्योतिषी म्हणतो–

We have accounts of flaming swords and sparts appearing in the sky, which were believed to ported wars and destruction.

विद्यमान युरोपियन सुप्रसिद्ध मेदिनीय ज्योतिषी डॉ. सी. इ. ओ. कार्टर आपल्या पोलिटिकल ॲस्ट्रॉलजी या ग्रथांत धूमकेतूची नक्षत्र विभाग व इतर ग्रहांचे शुभाशुभ संबंध यावरून बरी-वाईट अशी दोन्ही प्रकारची फळे मिळू शकतील असं म्हणतात, तथापि सूर्यग्रहण जवळ असतांना उदित होणारा धूमकेतु मात्र आवश्य विचारांत घेतला पाहिजे याविषयी मात्र पुष्कळांचे मतैक्य आहे.

हा धूमकेतू सावध करणारा

सध्या धूमकेतू दिसत आहे व येत्या अमावास्येला (दि. २३–३१–६१) सूर्यग्रहण आहे. ही गोष्ट विचारांत घेता आपणास पाकिस्तान व चीन या राष्ट्रांच्या कटकटी अजूनहि काढल्या पाहिजेत. अमेरिका, इंग्लंड या सारख्या हितशत्रूचे कावे ओळखले पाहिजेत. पंचमस्तंभीयांपासून सावधगिरी ठेवली पाहिजे अन्नधान्याचा प्रश्न बिकट होणारा आहे हे जाणले पाहिजे. सांथीच्या रोगापासून दूर राहिले पाहिजे आणि राष्ट्रहितासाठी वाटेल तो त्याग करावयास तयार असले पाहिजे

पंचमस्तंभीयांपासून सावध

गोव्याच्या दृष्टीनेहि हे सूर्यग्रहण व धूमकेतू भयावह आहे असं नाही, तथापि राष्ट्रीय ऐक्य, उद्योगधंदे व मंत्रिमंडळाची स्थिरता यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. परदेशी लोकांचे येथील पंचमस्तंभीय लोकांकरवी काही अनुचित प्रकार होण्याची शक्यता आहे त्यासाठी जपलं पाहिजे.

पाकिस्तानला अशुभ

आगामी सूर्यग्रहण पाकिस्तानासहि वाईट आहे. त्यांच्या त्यांच्यातच यादवी म्हणून अहिरावण महिरावण उत्पन्न होणारे आहेत, त्यासेळी पाकिस्तानला वाईट दिवस येणारे आहेत; तथापि त्याला जुलई १९६६ पर्यंत धीर धरला पाहिजे.

० ० ०

हस्तसामुद्रिक आणि लैंगिक जीवन

लेखक :—ज्योतिषाचार्य, दत्तात्रय शंकर केळकर

लैंगिक जीवनांतील असंतोष ह्यातूनच कौटुंबिक जीवनांत दुःख येते असा शेंकडा ९५ च्या बाबतींत जगाचा अनुभव आहे.

जगांतील सर्वश्रेष्ठ जीवनशास्त्राच्या तज्ञानें पुढील उद्‌गार काढले आहेत. लैंगिक सुखोपभोगात निराशा पदरात पडण्यासारखी दुसरी कोणतीहि बाव प्रेमांत निराशा व प्रेमविवाहाची नौका फुटण्यास कारणीभूत नाहीं. हजारों हात जे आम्ही अभ्यासिले आहेत त्यांत संशोधनाच्या दृष्टीनें विचार केला तेव्हां हे विधान खरे असल्याचें दिसून आले आहे.

मला असंख्य जोडपी भेटलेलीं आहेत. त्याची फुटलेली विवाह नौका सावरण्यास मी ह्या शास्त्रानें अचूक मार्गदर्शन केले आहे. एक जोडपे आपण एकमेकांला लायक आहों की नाहीं हा प्रश्न विचारण्यासाठीं आलें. त्यांचा वाङ्गनिश्चय झालेला होता. " तुम्ही एकमेकांला योग्य नाही " असा मी त्यांना सल्ला दिला. मी काय बोलतो ते मला समजत नाही असें तो तरुण मला म्हणाला. त्यांचे लग्न झाले. चार महिन्यानंतर ती स्त्री माझ्याकडे आली. सुरवातीसच त्यांचा विवाह हा संपूर्णतः अयशस्वी ठरला होता. तिला त्या पुरुषाची माहिती नव्हती. पत्रोपत्रीं त्यांचें प्रियाराधन झालेलें होते. या पुरुषाचा हात त्याची शारीरिक पाशवी भूक सुचवित होता. तर त्या स्त्रीचा हात ध्येयवादी मानसिक भुकेची ती भोक्ती असल्याचें दर्शवीत होता. शारीरिकरीत्या ती तेवढी कामुक नव्हती. लैंगिक सुखाचा त्रास ह्याचा त्या स्त्रीला कंटाळा होता. अन्य स्त्रीला त्याच्यापासून लैंगिक समाधान मिळाले असते. तिला नव्हते.

शारीरिक भूक व मानसिक भूक असे दोन प्रकार असतात. ही गोष्ट लक्षात घ्यावयास हवीं. वरील जोड़प्यानें पुढे घटस्फोट घेतला. बहुसंख्य पुरुष शारीरिक सुखाचें भोक्ते असतात. तर बहुसंख्य स्त्रिया मानसिक सुखाच्या भोक्त्या असतात. पुरुषाला लैंगिक सुखच जास्त प्रिय असतें तर स्त्रीला कामतृप्तीपूर्वी चुंम्न प्रणयलीला केलेल्या जास्त प्रिय असतात. प्रियकराच्या प्रेमलीला स्त्रीला फार प्रिय असतात. त्या फक्त आपल्या प्रियकराच्या शारीरिक गरजेसाठी शारीरिक मीलन करीत असतात. तर पुरुषाला शारीरिक क्रिया जास्त प्रिय असते.

हृचाहून तिसरा एक प्रकार आहे. हाताची मानसिक शास्त्रांतून चिकीत्सा केल्यास पवित्र मनाच्या व्यक्तींनीं केलेला अन्याय हा भावनात्मक दडपणांतून निर्माण झालेला असतो.

मानसशास्त्राचा ज्यांनीं अभ्यास केला आहे त्यांना माहीत आहे की, नैसर्गिक भावनांच्या दडपणातून अनेक मज्जातंतूंचे विकार होतात. असंख्य पाद्री, नन्स, साधु, संतिणी ह्यांना हिस्टेरिया व इतर आजार भावनांच्या दडपणातून झालेले असतात. धर्माचा इतिहास रक्ताने भरलेला आहे. भावनांचा कोंडमारा झाल्यामुळे दुःखद गोष्टीचा अनुभव येतो. काहीजण तर त्यामुळे आत्महत्या करतात, त्याला ईश्वराच्या नांवाचा उपयोग केला जातो. जीवनाची सहजप्रवृत्ती अनैतिक व उत्पत्तीक्षमतेला विरोधी वापरल्यामुळे त्यांच्याकडून मूर्खपणा व अमरत्व ह्या खोटया कल्पनांच्या आहारी जातो. संकुचित मानसिक दृष्टिकोन, भित्रेपणा, भावी जीवनाबद्दल अपुरादृष्टिकोन हृचामुळे व्यक्ति एकाकी होते. "ईश्वराबद्दल तुम्हांला खरे प्रेम वाटत असेल तर तुमच्याइतकेच शेजाऱ्यावर प्रेम करा" असे येशू ख्रिस्त म्हणतो. प्रेम करणें ही निसर्गाची सहज प्रवृत्ती आहे.

हातावरून माणसाच्या चारित्र्याचा चिकित्सक व अचुक असा चित्रपट आपण डोळ्यासमोर उभा करूं शकतो. धैर्यानें आपण त्यांच्या जीवनाचे सत्य उलगडू शकतो.

असंख्य दारूडे किंवा व्यसनी माणसें ही व्यसनी होण्याला ती माणसें त्यांची शारिरीक भूक अपुरी राहिली हें कारण असतें. साधूसारखी वागणारी अनेक माणसें ही रोगट किंवा त्यांच्यात कमतरता किंवा असमाधान असल्यामुळे असतात.

लैंगिक प्रवृत्तीचा जवळून व चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास केल्यास अनेक गूढ प्रश्नांची उकल होते. अनेक व्यक्तींच्या जीवनावर परिणाम करणारा हा प्रश्न आहे. सर्व जगात आज संतती–नियमनाची चळवळ सुरू करण्यात आलेली आहे.

संतती नियमन हें ईश्वरी इच्छेविरुद्ध व ईश्वराच्या मार्गात अडथळा करणें आहे अशी विचारसरणी काही लोकांकडून मांडली जात आहे. एक फार वाईट गोष्ट होत आहे की, बुद्धिमान माणसे भावी संततीच्या भीतीने संतती नियमन करीत आहेत व लैंगिक मीलनापासून अलिप्त रहात आहेत व बहुसंख्य निर्बुद्ध जनता त्याचे पालन करीत नसल्यामुळे बौद्धिकदृष्टचा अपरिपक्व माणसे जगांत जन्माला येत आहेत असाहि एक आक्षेप आहेच.

बहुसंख्य स्त्री-पुरुषांना हल्लीं लग्नापूर्वी संतती नियमनाची माहिती असते. आजच्या औद्योगक क्रांतीच्या जगात स्त्रीला स्वतःचे स्वातंत्र्य सहज मिळत असून ती पुरुषाचा गुलाम असण्याचें कमी होत असून ती त्याची मित्र किंवा खऱ्या अर्थाने सहचारिणी होऊ लागली आहे. विवाहित जोडप्याला त्यांच्या जीवनाला सुखकर होणारी संतती नियमनाची पद्धति जाणून घेणें आजच्या काळात अत्यंत आवश्यक आहे. सरसकट एकाच प्रकारचें संतति नियमन केल्याने स्त्री-पुरूषांवर वाईट परिणाम होतील. त्यासाठी त्या स्त्री-पुरुषांच्या लैंगिक भुकेचा प्रकार लक्षांत घ्यावयास हवा.

कांही स्त्री-पुरुष वीर्यपतनापूर्वी इंद्रिय बाहेर काढून संतति नियम करतात व आपली लैंगिक भूक अपुऱ्या स्थितीतच भागवतात असें आम्हाला अनेक विवाहीतांनी सांगितले आहे. त्याचा परिणाम त्या दोघांत असंतोष व असमाधान नांदते. आनंदाचा उच्च बिंदू आला असता एकदम इंद्रिय बाहेर काढले तरें तो मज्जातंतूला फार मोठा धक्का असतो. त्यामुळे स्त्री असमाधानी रहाते, तिला झोप येत नाही. ती अस्वस्थपणें रहाते तसेच ह्यातून पुरुषांना कांहीं काळाने नपुंसकत्व येते ही संतति नियमनाची पद्धति बिनधोक नाही.

पेसरीज वापरणे कलात्मक व सुसंस्कृत स्त्रीला तिरस्कार पूर्ण वाटते. त्याचा परिणाम स्त्रीच्या योनी मार्गाला सूज येते किंवा पुरूषाच्या श्रंथांना अस्वस्थता येते सूजही येते. मूर्खपणाचा व अनावश्यक ताण वैवाहिक जीवनावर ठेवल्यामुळे स्त्री अगर पुरुष यांच्या मानसिक परिस्थितीवर फार वाईट परिणाम होतो. माझ्याकडे अनेक स्त्री-पुरुष ह्या प्रश्नाबद्दल चर्चा करायला भेटले आहेत. त्यांच्या हातावरुन त्यांचें दुःख अचुक ओळखल्यामुळे त्यांनी आपली अंतःकरणें माझेजवळ उघड उघड व्यक्त केली आहेत. उत्कृष्ट हस्तसामुद्रिकतज्ञ हा विवाहित किंवा विवाहित होणाऱ्या स्त्री-पुरुषांना खरा मार्गदर्शक होत असतो.

हस्त मैथुन हा लैंगिक प्रश्न हातावरून सहज ओळखता येतो. हस्तमैथुन हें वाईट आहे पण त्याने सारे जीवन बरबाद होते हें मात्र खरे नाही. एक इंग्लंड रिटर्न्ड डॉक्टर तसाच इंजिनियर ह्यांना ही संवय होती ह्या संवयीमुळे त्यांचें लग्न झाल्यावर त्यांना आपल्या पत्नीची शारिरीक भूक शमविता येईल तेव्हा ते आमचेकडे आले. आम्ही संमोहन शास्त्राचा प्रयोग करून हा त्यांचा दोष घालवून दिल्यामुळे त्यांचे भावी जीवन सुखी झाले आहे. हस्तमैथुन हें पुरुषाइतकेच स्त्रियातहि असते.

सामान्यतः असे मानले जाते की, पुरुष हा स्त्री पेक्षा जास्त कामूक आहे व स्त्री तेवढी कामूक नाही. पण हजारो हातांचा अभ्यास केल्यावर हें वरील म्हणणे चूक असल्याचे सिद्ध झाले आहे.

कांही अपवाद सोडल्यास स्त्रिया ह्या जास्त कामूक असतात. लैंगिक आकर्षण सतत निर्माण करण्यास त्या अनेक साधनांचें सहाय्य घेत असतात. रोजच्या व्यवहारात बहुधा नकळत का असेना आपल्या अस्तित्वाने पुरूषाच्या जीवनावर अनेकरीत्या छाप पाडण्याचा प्रयत्न करीत असतात. पुरुषाच्या भावना जागृत करण्यास किंवा वाढीस लावण्यास नकळत त्या सहाय्य करीत असतात.

स्त्रिया आपल्या पोषाखाकडे इतकें लक्ष का देतात ? बाहेर जाण्यापूर्वी इतकी तयारी नट्टापट्टा स्त्रिया कां करतात ? बॉवर ह्या लैंगिक शास्त्रज्ञानें ह्याचे उत्तर दिले आहे, "ह्या गोष्टीचे बारीक पृथक्करण केल्यास स्त्रियांचा एकच हेतू असतो कीं, आपण जास्तीत-जास्त आकर्षक दिसावे व त्याचा परिणाम पुरूषावर व्हावा."

स्त्रीचे लैंगिक आकर्षण जितकें प्रभावी बनत चालले तितकें पुरूषांत स्त्रीत्वाचें अनुकरण होऊ लागले आहे. बहुसंख्य पुरूष दाढी मिशांना चाट देऊन राहिले आहेत. हा पुरूषात झालेला मानसिक स्त्रीत्वाचा बदल दुर्लक्षून चालणार नाही. पुरुषाच्या जीवनात झालेला हा बदल स्त्रीत्वाचा विजयच आहे. दाढीमिशा ठेवणारा प्रियकर आता दुर्मिळ चीज होऊ पहात आहे. स्त्रीनें दाढी मिशांचा पुरस्कार केल्यास त्या परत पुरुषाकडेही दिसू लागतील.

हृदय रेषेवरून प्रेमाची पारख करता येते. ह्या रेषे-वरून कोणत्या प्रकारची लैंगिक भूक आहे त्याचे निदान करता येते. गुरुच्या उंचवटयावरून निघणारी हृदय रेषा ही आदर्श मानसिक लैंगिक भूक किंवा प्रेम ह्याची द्योतक असते. ह्या व्यक्ति आपल्या प्रियकर किंवा प्रेयसीला फार आदर्श व पूजनीय मानतात. व त्यामुळे बरेच वेळा त्यांचे पदरात निराशा पडते.

हृदय रेषा जेव्हा गुरूच्या उंचवटयावरून निघत असेल व सरळ लहान बोटाच्या खालून हातावर जात असेल तर आदर्श ध्येयवादी प्रेमाचें द्योतक असतें. परंतु त्यांत मत्सराला फार स्थान असतें. हीं माणसें प्रेमांत फार जड जातात. आपल्या जीवनसाथीचें व्यक्तित्व उच्च दर्जाचे भावनात्मक असावें अशी त्याची अपेक्षा असते. असा त्यांचा मानसिक पिंड असतो. ही नकळत असणारी त्यांची मागणी असते. त्याचा परिणाम त्यांच्या प्रेमी जीवनावर Love aftairs होतो. व त्यामुळे प्रेमी जीवन कठीण जाते.

जेव्हा हृदय रेषा गुरु व शनि यांच्या उंचवटयां-वरून निघते व बुधाच्या उंचवटयाखालीं हातावर असते तेव्हां ती पुरुत्वयुक्त लैंगिक सुखाचा कल सुचविते. हृया व्यक्तीचे प्रेम हें प्रत्यक्ष शारिरीक आकर्षणांवर आधारलेलें असते. हृया व्यक्ति शारिरीकरीत्या फार कामूक, सहृदय, उदार व सहानुभूतीनें भरलेल्या असतात. पुरुषाच्या हातावर सरळ हृदयरेषा स्त्रीत्व-प्रकारची लैंगिक भूक सुचवतात. सरळ हृदयरेषा शारिरीकपेक्षां मानसिक लैंगिक सुखाची द्योतक असते. पण हीच रेषा रूंद, चांगली बांक घेऊन हातावर जाईल तर पुरुत्वयुक्त किंवा पूर्ण लैंगिक सुखाची इच्छा सुचवते.

बहुसंख्य मानवजात ही मानसिक व शारिरीक सुखाची भोक्ती असते. आपल्याला पुष्कळदा हृदयरेषा मेखेच्या (दोन फाटयांत) निघतांना आढळते. एकाद्याला पहिलें व दुसरें बोट हृयामधून जात असते तर दुसरी गुरुच्या उंचवटयावर जात असते. दोन बोटांच्या मधून निघणारी शाखा शारिरीक लैंगिक सुखाची द्योनक आहे तर गुरुवरून निघणारी स्त्रैण किंवा मानसिक शारिरीक सुखाची द्योतक असते.

हातावरून लैंगिक जीवनाचा अंदाज घेतांना इतर गोष्टीचाही विचार करावयाला हवा. फक्त हृदय रेषे-वरूनच अखेरचा निर्णय घेता येणार नाही. हृदय रेषा फार कामेच्छा दाखवत असेल व ती व्यक्त होत नसेल किंवा बुद्धिपुरस्सर तिचें खच्चीकरण किंवा साध्य केलेल्या संवयीनें त्या दाबून टाकल्या असतील.

लैंगिक सुखाच्या कळाचा विचार करतांना प्रथम त्याच्या आंगठयाचा विचार करावा. नंतर हातावर सूचित होणारी भावनात्मक संवदेनक्षमता शिकून घ्या. हाताच्या बोटांखालीं उंचवटयावर अनेक आडव्या अर्धवर्तुळाकार रेषा गेलेल्या दिसतात त्यांना शुक्र-कंकण म्हणतात. हें चिन्ह कामुकतेचें चिन्ह मानतात. हें चिन्ह म्हणजे भावनात्मक सूचनेला दिला जाणारा पाठिंबा सुचवतो. फक्त लैंगिक संबंधच सुचवत नाहीं. कलावंतांच्या व गायक-गायिकांच्या हातावर शुक्र कंकण असतें. स्वाभाविकपणें हें लोक फार कामुक असतात. भावनात्मकरित्या वातावरणाशीं ते चटकन समरस होत असल्यामुळे चटकन लैंगिक भुकेच्या अगर मोहाच्या आहारी जातात.

हृदय रेषा कामुकता सुचवत असेल, आंगठा उतावळे-पणा सुचवत असेल (बाहेर झुकत असेल) मस्तक रेषा सरळ चंद्राच्या उंचवटयाकडे कललेली असेल तर मन फार प्रणयी असते. तसेंच चांगले शुक्र कंकण असता हृया व्यक्तीची लैंगिक प्रवृत्ती फार धोक्याची असते. ही माणसें चटकन कामूक होतात. त्यांच्या मनावर ताबा नसतो.

सामान्य प्रकारचें लैंगिक सुख मिळण्यासाठीं लैंगिक भावना व इच्छा हृया प्रत्यक्ष लैंगिक कृती होण्यापूर्वी

चाळवलेल्या असतात. निमुळता व बाहेर झुकणारा आंगठा व चांगलें शुक्र कंकण फार लहान वयांत लैंगिक भावना सुचवतात. जेवढी हृदय रेषा मोठी तितक्या लवकर लैंगिक प्रगति किंवा वासना वाढीला लागते.

एक सतरा वर्षांची मुलगी माझा सल्ला घेण्यास आली होती. तिच्या प्रकृतीचा प्रश्न होता. डॉक्टरचें औषध तिला चालू होतें, पण त्याचा फायदा कांहीं दिसत नव्हता. तिला मानसिक थकवा आला होता. औदासिन्य होतें. तिच्या हाताच्या रेषा फार सुंदर होत्या. मस्तक-रेषेवर व आयुष्यरेषेवर लहान लहान बेटें होतीं हीं आजार सुचवत नसून मनाचा समतोलपणा नसणें व मानसिक तोल न रहाणें हे गुण सुचवितात. हृदयरेषा सरळ व लांब असतां ध्येयवादी किंवा आदर्श लैंगिक सुखाची आवड सुचविते.

शुक्रकंकण चार सरळ रेषांनीं तयार झालेलें असेल व आंगठा निमुळता असेल तसेंच तो बाहेर झुकलेला असेल तर उतावळेपणा व तुटक शुक्रकंकणामुळें तर सभोंवारच्या परिस्थितीचा चांगलाच परिणाम होतो. मस्तक रेषा बेटांनीं युक्त असतां मनावर ताबा नसल्याचें सुचवितो व उतावळेपणा दाखवतो.

मस्तक रेषा व हृदयरेषा ह्यांत खूप अंतर असतां जीवनाकडे पहाण्याची मानसिक दृष्टी निराळीच असते. चालीरितीनां हे लोक मान देत नाहींत. हें अंतर फार लहान किंवा अरुंद असतां व्यक्तीचे विचार कायम स्वरूपाचे असतात. बोटें लांब, बारीक व टोंकदार असतां ध्येयवादी व स्वप्नाळू वृत्ति सुचविते. ही माणसें व्यवहारी नसतात, पण बोटें वाकडीं तिकडीं असतां कौशल्या-पूर्ण व धोरणी कल असतो. खोटें बोलणाऱ्याची अशीं बोटें असतात. त्यांना वाटणारा मानसिक थकवा त्यांच्या लैंगिक वैवाहिक जीवनांत निर्माण होतो. कांहीं वडिलार्जित घर वगैरे विकतात.

वरील गोष्ट लक्षांत घेऊन व्यक्तीच्या मानसिक थकव्याला लैंगिक हालचाली अवलंबून असल्याचे सिद्ध होते. ही व्यक्ति हस्तमैथुन करणारी असते.

ज्या माणसाची हृदय रेषा गुरुच्या बोटाच्या पहिल्या पेरा जवळून निघून रुंद असे वर्तुळ घेऊन हाताच्या कडे-कडे जाते. शुक्रकंकण दोन किंवा तीन रेषांनी तयार झालेले असेल, मस्तक रेषा चंद्राकडे कललेली असेल, हृदयरेषा व मस्तकरेषा ह्यामध्यें खूप अंतर असेल तर लैंगिक भावनावर ताबा ठेवणें कठीण होते.

ज्याच्या हातावर हृदयरेषा फार उंच निघून गुरुच्या पहिल्या पेरातून निघालेली असते. फार रुंद होऊन हाता-कडे जात असते त्या शारिरीक सुखाची तीव्र इच्छा सुचविते. फार उंचावरून निघणें हे फार लहान वयात लैंगिक सुखाची सुखता व इच्छा दर्शविते. ग्रहांच्या उंच-वटयावरून जाणाऱ्या शुक्रकंकणाच्या तुटक रेषा लैंगिक वासना व इच्छा तीव्र असल्याच्या द्योतक आहेत. मस्तकरेषा व आयुष्यरेषा ह्यामध्ये असलेलें खूप अंतर तसेच आंगठयाची ठेवण उतावळेपणाची द्योतक आहेत. अशा व्यक्तींना लहान वयांत शारिरीक सुखाची चटक असते.

दुसऱ्या एका स्त्रीचा हात आमचे पहाण्यात आला वयाच्या विसाव्या वर्षी तिने आमचा सल्ला घेतला होता. तिची बोटे आखूड व आंगठा निमुळता होता. हे उता-वळेपणाचे द्योतक होय. मस्तकरेषा आयुष्य रेषेपासून वेगळी होती त्यांतहि उतावळेपणा सूचित आहे. मस्तक-रेषा लांब होती त्यामुळे हिशोबी वृत्ति आहे. पण बाहेर कळलेला निमुळता आंगठा व मस्तकरेषा स्वतंत्र ह्या चिन्हामुळे उतावळेपणा जास्त होतो. मस्तकरेषा व हृदयरेषा ह्यामध्ये फार अंतर त्यामुळे जीवनाकडे पहा-ण्याचा दृष्टिकोन स्वैर दाखवितो. हृदयरेषा सरळ होती, पण तिला दोन फाटे झाले होते. एक फाटा पहिल्या व दुसऱ्या बोटाच्यामध्ये फार उंचावर निघत होता. हा शारिरीक सुखाची तीव्र इच्छा दाखविते. तर दुसरा फाटा गुरुच्या उंचवटयावरून निघत असल्यामुळे मान-सिक किंवा स्त्रीत्व सुखाचा कल दाखवितो. त्या हातात दोन प्रकारचे गुण होते. शुक्रकंकण तुटक त्यामुळे भावनात्मक शारिरीक भूक.

एका स्वलिंगी संभोग घेत असलेल्या साहित्यिकाचा हात आमचे पहाण्यात आला. त्याच्या हाताच्या सर्व रेषा फार सुरेख होत्या. तसेच त्या पुष्कळ होत्या. ह्या-मुळे हा मनुष्य फार भावनाप्रधान असल्याचें सुचविते आंगठा निमुळता असल्यामुळें भावनावर ताबा नसणे हा गुण आणखी संभवतो. मस्तकरेषेवर फार बेटे त्यामुळे मनाची एकाग्रता न होणे, हृदयरेषा सरळ होती, पण गुरूवर तिचे दोन फांटे झालेले होते. ह्यामुळ स्त्रीत्वाचे गुण दर्शवितात. शुक्रकंकण सात आडव्या रेषांनी तयार झालेले अपवादात्मक भावना व लैंगिक सुखाचे हे द्योतक आहे.

हातावर खूप रेषा असणें हे भावनाप्रधानतेचे द्योतक आहे. निमुळता व बाहेर कललेला आंगठा विचारीपणा फुकट गेल्याचा द्योतक असतो. मस्तक-रेषेवर खूप बेटे असणे व ती आयुष्यरेषेला जोडलेंलीं असणें हे एकाग्रता न होण्याचें द्योतक आहे.

सरळ हृदयरेषा खात्रीने स्त्रीत्वाची भूक सुचवितें. शुक्रकंकण अनेक रेषांनीं तयार झालेलें असल्यामुळें असामान्य लैंगिक भूक सुचविते. बोटे वाकडी, बुधाचे बोट वक्र असल्यास हस्तमैथुनाचीं संवय लागते. एका लक्षाधीश लक्ष्मीपुत्राच्या हातावर ह्या रेषा आम्हाला पहावयास मिळाल्या आहेत.

तसेच शाळेत काम करणाऱ्या एका प्रमुखाध्यापिकेचा हात आमचे पहाण्यात आला. तिचा आंगठा घट्ट व सरळ होता. तो जबरदस्त इच्छाशक्ति व भावनात्मक ताबा सुचवितो. मस्तक रेषा फार लांब व सरळ असून ती सदसद्‌विवेक बुद्धीची द्योतक होती. हृदयरेषा सरळ असून गुरुवर निघत होती. ती मानसिक लैंगिक भूक सुचविते. मस्तक रेषा व हृदय रेषा ह्यामधील अंतर फार अरुंद असून जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन मर्यादित असून त्यात खूप स्वार्थ सुचवित होता. आयुष्य रेषा सरळ जात असून शुक्राच्या उंचवटयाला तिने मर्यादित केले होतें. ही खूण शारिरीक भूकेची किंवा पाशवी वृत्तींची कमतरता सुचवितें. ही स्त्री फार विचारी होती. तिचा आंगठा ताठ व सरळ असल्यामुळे तो तिची जबरदस्त इच्छाशक्ति सुचवितो. मस्तक रेषा लांब व सरळ आहे. ती विचार व बुद्धिमत्तेचीं द्योतक होय. मस्तकरेषा व हृदयरेषा ह्यांत थोडे अंतर होते. त्यामुळे तिचा दृष्टिकोन व मते कायम स्वरुपाचीं होती. हृदयरेषा गुरूवरून निघून जात असल्यामुळे मानसिक, शारिरीक सुखाची ती द्योतक होती. शुक्राचा उंचवटा आयुष्य रेषाने मर्यादित केल्यामुळे शारिरीक सुखाचे बाबतीत ती मर्यादित होती. ह्या स्त्रीने अनेक व्यक्तीवर मानसिक प्रेम केले. विवाहित पुरुषावर ती जाणून बुजून प्रेम करीत असे. प्रत्यक्ष शारिरीक सुख मात्र तिने कोणापासूनच घेतलें नव्हते.


हातावर हृदयरेषा सुरुवातीला अनेक सरळ रेषांनी छेदत असेल अगर हृदयरेषेंतून सरळरेषा खाली येत असतील तर फार कामुकता व चांचल्य सुचवितो. तसेच अन्यलिंगी व्यक्तीबद्दलचें आकर्षण सुचवितो. ह्या रेषा पंचवीस वर्षांपर्यंतचे आयुष्य सुचवितात त्यानंतर लैंगिक वासनेला नियमितपणा व आवडीला मर्यादा येते. हाताच्या रेषा जाड व रुंद असतां ह्या व्यक्ति आपली वैषयिक भूक शमवताना प्रणय करणार नाहीत. बोटे आखुड असल्यास त्यांतही उतावळेपणा असतो. सुंदर रेषा ह्या मानसिक सुखाच्या द्योतक आहेत. तर अरुंद रेषा शारिरीक लैंगिक बाबतींत पशुत्वदर्शक असतात.

ज्या स्त्रीच्या हातावर हृदयरेषा सरळ असते तिला आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेंल्या पुरुषाचा सहवास प्रिय असतो. सरळ हृदयरेषा ही मानसिक सुखाची भोक्ती असते. सरळ हृदयरेषा असलेल्या स्त्रीला प्रणयीच प्रियकर हवा, तरच तिचें जीवन सुखी होते.

हाताची बोटे फारच लहान असली तर मनाची पाशवी वृत्ति सुचविते. गुरुचे बोट फार लहान असणें हे स्वतःचा अभिमान व लज्जा नसण हे गुण दाखवितात. आंगठा लहान असून तो जाड व गांठाळ असता अविचारी, उद्धटपणा व पशुत्व सुचवितो. मस्तक रेषा चंद्राकडे कललेली असता व मस्तक रेषा व हृदय रेषा ह्यांत कमी अंतर असता ह्या व्यक्तीचे विचार व्यक्तिगत सुखाचे व स्वार्थाचे असतात. हृदय रेषा सरळ असून आखुड असतां शारिरीक वासनेला मनाची जोड असते. ही माणसे पाशवी लैंगिक सुखाची भोक्ती असतात. प्रेमाच्या मत्सरापोटी ही माणसे खूनहि करतात. संभोग घेण्यापूर्वी ते प्रेयसीला मारतील. तिला दुःख देऊन संभोग सुख घेतात. स्त्री असहाय झाली की तिचे शारिरीक सुख घेण्यास त्यांना आनंद वाटतो.

लैंगिक सुखाच्या भावनांचे पृथक्करण करताना हृदयरेषेला भावनेच्या दृष्टीने फार महत्व आहे. त्याचप्रमाणे आंगठा, बोटे, मस्तक, रेषा, व शुक्राचा उंचवटा ह्यालाही महत्त्व आहे. ही चांगली असली तर ह्या भावनेला लगाम पडतो व त्या भावनाचा स्फोट होऊ दिला जात नाही.

आपण इतर सर्व गोष्टींचे निरीक्षण करा. खूप हात पहा. तुम्ही व्यक्तीचा हात पहात असतां तिला विश्वासात घेऊन त्याचे विश्लेषण करा. हात हा लैंगिक सुखाचे ज्ञान मिळविण्यात केवढा आश्चर्यकारकरित्या उपकारक ठरतो हे यावरून आपणास समजून येईल. हस्तसामुद्रिकाची ही पद्धती विवाह जुळवितांना किती उपयुक्त आहे हे यावरून दिसून येंते. वरील गोष्टीचे निरीक्षण अभ्यास केल्यास वैद्यकशास्त्राइतकेच लैंगिक सुखाबद्दलहि अचुक निदान आपण करूं शकतां हे शास्त्र वैवाकहि जीवन व सुखी जोडपी एकत्र आणण्यास कसे उपकारक आहे ह्याची जाणीव सर्वांस होईल.



कुंडलीतील धनयोग कसे पहावेत?

लेखक– वि. रा. गोळे ज्योतिषरत्न

प्रत्येकाच्या आयुष्यात सुखदु:खाचे प्रसंग असतातच. कांहींच्या आयष्यांत दु:खानंतर सुख असते. कित्येकांच्या आयुष्यांत दु:खाचेच प्रसंग अनेक असतात व त्यामुळें सुखाचे प्रसंग येऊन गेल्याचे त्यांना स्मरतच नाही. दु:ख ज्याप्रमाणें अनेक प्रकारांनीं पसरलेले असते तसेच सुखाचेहि अनेक प्रकार असतात. ज्योतिषशास्त्राचा आधार घेऊन कुंडलीतील बारा स्थानें व त्यांत असणारे ग्रहराशी संबंध पाहून सुखदु:खाची सर्वसामान्य कल्पना करता येते. लग्नस्थानापासून व्ययस्थानापर्यंतच्या बारा स्थानामध्यें निरनिराळ्या विषयाची पर्यायाने प्रत्येकाच्या आयुष्यांत घडणाऱ्या सर्व गोष्टीची वर्गवारी केलेली असते. त्या सर्व गोष्टींचा उपभोग ज्याला चांगल्या प्रकारे घेता येईल तो 'सर्व सुखी' असे म्हणता येईल. परंतु प्रत्येकाच्या कुंडलीत ग्रहांची अशी योजना केली गेलेली असते की, त्यामुळे समर्थ रामदासस्वामी म्हणतात त्याचप्रमाणे सर्वसुखी कोणीही नसतो. एखाद्याला शरीरसौख्य उत्तम असेल तर त्याच्या कुटुंबाची वाताहात झालेली असल्याने तो दु:खी असेल. एखाद्याला पैसा व गृहसौख्य उत्तम असेल तर तो एका शारिरीक व्यंगाने अथवा व्याधीमळे निराशेचे जीवन कंठीत असेल. एखादी व्यक्ती बुद्धीमान व विद्वान असली तरीही त्याला गृहसौख्य नसणे, पुत्रसुख नसणे अथवा खायला अन्न न मिळणे अशी परिस्थिति प्राप्त होऊन तोहि दु:खीच राहील. एखादा इसम गडगंज संपत्तीत लोळत असेल शरीरसौख्य व वाहनादि अन्य सुखे असतील तर त्याला पुत्रशोकासारखे दु:ख जन्मभर जाचक ठरते. याप्रमाणे सुखाची निरनिराळी कल्पना आपण करू शकतो हे जरी खरे असले तरी **प्रत्येकाची पैशासाठी धडपड चालू असतें व पैसा म्हणजे सर्व कांही असें तो मानतो**. सध्यांच्या आर्थिक विषमतेच्या काळात तरी तसे प्रत्येकाला वाटते असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. यावरून असे आढळून येईल की, पैसा हेच सुखाचे एकमेव साधन नाही तर इतर साधनांपैकी ते एक आहे असे जरी मानले तरी अनेक सुखांपैकी बऱ्याच सुखाचा उपभोग घेता येण्यासाठी पैसा म्हणजेच 'धन' हे एक प्रभावी साधन होऊन बसले आहे. तेव्हा हे धनसुख कोणाला किती मिळेल त्याचाच प्रमुख विचार कुंडलीवरून कसा करावा याचा ऊहापोह येथे केला आहे.

कुंडलीतील धनस्थानें

कुंडलीतील चार स्थानांवरून धनाचा बराचसा विचार पूर्ण होतो. त्या स्थानांकडे वळण्यापूर्वी एक गोष्ट ध्यानांत ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे. ती म्हणजे धनलाभाचे एकूण तीन मुख्य भाग केलेले आहेत. १. पूर्वकर्मानुसार मिळणारे म्हणजेच वडिलोपार्जित धन २. चालू जन्मांतील कर्मामुळे मिळणारे धन ३. विनासायास मिळणारे म्हणजेच अचानक धन. या मध्येहि दोन मुख्य भाग पडतात (अ) अपेक्षित अचानक धन (ब) अनपेक्षित अचानक धन (यांचा सविस्तर खुलासा पुढे केलेला आहे.)

(१) कुंडलीतील द्वितीय स्थानावरून वडिलोपार्जित धनाचा विचार करावयाचा असतो. वाडलोपार्जित याचा अर्थ ज्या वाडवडिलांच्या पुण्याईने आपण जन्माला आलो, त्यांनी कमाविलेले धन पर्यायानें. आपल्या पूर्वजन्मांतील कर्मांमुळे प्राप्त होणारे धन.

(२) कुंडलीतील कर्मस्थानावरून नोकरीचा विचार करतात. (येथें नोकरी याचा अर्थ उदरनिर्वाहाचे कोणतेंहि साधन म्हणजेच हातून होणारें कर्म असा धरावा) म्हणून दशमाचे धनस्थान म्हणजेच एकादशस्थान यावरून चालू जन्मांतील कर्मामुळें मिळणारें धन पहातात.

(३) कुंडलीतील पंचमस्थान व अष्टमस्थान यावरून अचानक मिळणाऱ्या धनाचा विचार करतात. त्यापैकी पंचमस्थानावरून अपेक्षित-अचानक धनलाभाचा विचार केला जातो. एकादशस्थानावरून कष्टाचे धन पाहिल्यावर साहजिक त्याच्यासमोर हे स्थान (पंचमस्थान) विनाकष्ट धन देणारे योग्य आहे. कष्ट केल्यावर त्याचे ठराविक मोल जसे अपेक्षित असतें उदा:—ऑफीसमध्ये जादा काम केल्यावर मिळणारे ठराविक धन निश्चित असतें.) तसेच एखादे शब्दकोडे सोडविले व तें बरोबर आले तर आपल्याला अमूक बक्षिस मिळणार हेहि आपण अपेक्षित असतो. त्यांचप्रमाणें एखादे दुसऱ्याचे काम करून देताना तें करण्यापूर्वी ठरलेले कमिशन मिळण्याची अपेक्षा करतो परंतु त्यासाठी कष्ट घ्यावे लागत नाहीत. यावरून लॉटरी, रेस, सट्टा, शब्दकोडी अगर केवळ कमिशन यांचेमार्फत मिळणारे धनाचा विचार पंचमस्थानावरून का करावा तें कळलें असेलच. कुंडलीतील अष्टमस्थानावरून अनपेक्षित अचानक धनलाभ पहाता येतो. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्यानें लिहून ठेवलेले वारसाहक्क धन, जमिनीतील धन, लग्नाचेवेळी मिळणारा हुंडा अथवा गुप्तप्रकारानें मिळणारे धन यांचा समावेश या बाबतीत होतो.

वर निर्देश केलेली स्थानें कळल्यावर प्रत्येकाच्या वैयक्तिक कुंडलीचा विचार करण्यापूर्वी ग्रहांच्या नैसर्गिक बलाचा बोध होणे आवश्यक असतें. यासाठी नैसर्गिक कुंडली विचारांत घ्यावी लागतें. ही कुंडली म्हणजें मेष लग्नाची होय. या कुंडलीत द्वितीयस्थानाचा अधिपती शुक्र येतो. द्वितीयाची पोषकस्थानें षष्ठ व दशम ही आहेत. त्यांचे अधिपती बुध व शनि हे येतात. तेव्हा बुध, शुक्र व शनि यांचे परस्परामधील संबंध जसे असतील त्यावर वडिलार्जित धनाचा विचार अवलंबून आहे.

द्वितीय स्थानाच्या खालोखाल कुंडलीतील लाभस्थान पहावे लागते. नैसर्गिक कुंडलीतील लाभस्थानात कुंभ रास येत असल्याने त्याचा मालक शनि येतो तेव्हा स्वकष्टार्जित धनासाठी शनीची अनुकूलता असणे अत्यंत आवश्यक गोष्ट होय. ज्यांना शनि प्रतिकूल असेल त्यांची स्वकष्टार्जित धन मिळविण्यासाठी त्रेधातिरपीट उडेल हे निश्चित समजावे. लाभस्थानाची पोषक स्थानें तृतीय व सप्तम येतात व त्यांचे अधिपति बुध व शुक्र हेच येतात. तेव्हा बुध, शुक्र व शनि यांचे परस्परांशी शुभसंबंध असतील तरच वडिलोपार्जित धन व स्वकर्माचे धन यांचा उपभोग घेता येईल. अन्यथा काहीतरी अडचणी या नक्कीच आहेत असे समजण्यास हरकत नाही.

अचानक धनलाभाचा फायदा मिळण्यासाठी नैसर्गिक कुंडलीतील पंचमेश रवि बलवान असावा लागतो. तो अन्य ग्रहांनीं बिघडलेला असेल तर अशा प्रकारचा धनलाभ घडणे कठीण असते. पर्यायाने ते शक्य नसते. या रवीशी मंगळ व गुरु यांचे शुभसंबंध असतील तर अपेक्षित धनाचा उपभोग घेतां येईल. या ठिकाणी मंगळ व गुरु यांचा विचार कां केला आहे ते ध्यानांत आलें असेलच. पंचमाची भाग्य व लग्न ही पोषक स्थानें असून नैसर्गिकपणें गुरु व मंगळ हे त्या स्थानांचे अधिपति आहेत.

अचानक धनाचे दुसरे स्थान म्हणजे अष्टमस्थान. त्यावर वृश्चिक राशीचा अंमल असून पोषकस्थान व्यय व चतुर्थ ही आहेत. तेव्हा अष्टमाचा अधिपती मंगळ, व्ययाचा अधिपती गुरु व चतुर्थाचा मालक चंद्र यांचे शुभसंबंध असतील तरच असे लाभ होऊ शकतील. अन्यथा नाही. अशा प्रकारे ग्रहांच्या नैसर्गिक बलाचा विचार झाल्यावर प्रत्येकाच्या कुंडलीतील धनस्थानांचा, ग्रहांच्या शुभाशुभत्वाचा व बलाबलाचा विचार करून कोणाला कोणत्या प्रकारच्या धनलाभाचा फायदा व तो किती प्रमाणांत होणार आहे ते ठरविता येते. आतांच उल्लेख केलेलें ग्रहांचे शुभाशभत्व व बलाबल कसे पहावे त्याचा खुलासा खाली दिला आहे.

ग्रहांचे शुभाशुभत्व व बलाबल पहाण्याकरिता मुख्यत: तीन गोष्टींचा विचार करावा लागतो. (१) ग्रहांचे राशिबल व स्थानबल (२) ग्रहांचे नैसर्गिक व तात्कालिक शत्रुमित्रादि संबंध (३) ग्रहांची बाल, कुमार इत्यादी पांच अवस्थांपैकी येणारी बलें.

ग्रहांचे राशीबल

ग्रह ज्या राशीत असेल त्यावरून तो स्वत:च्या राशीत, उच्च राशीत, मित्रग्रहाच्या राशीत, शत्रु ग्रहाच्या राशीत अथवा नीच राशीत आहे ते समज शकते. (ही माहिती कोणत्याहि पुस्तकात मिळू शकते म्हणून त्याचा येथें उल्लेख केलेला नाही) हे समजल्या-

वर त्यांचे बलाबल समजणें कठीण नाही. कोणताहि ग्रह उच्च राशीत फार बलवान असतो. स्वतःच्या राशीत असलेला ग्रह त्यामानाने कमी बलवान असतो. याच क्रमानें मित्र राशीत, शत्रू राशीत व नीचराशीत त्याचे बल कमी कमी प्रतीचे ठरते. अर्थातच उच्च राशीत अतिशय बलवान तर नीच राशीत निर्बल असे बल असते हे ध्यानांत आले असेलच.

ग्रहांचे स्थानबल

कुंडलीत ग्रह ज्या स्थानांत असेल त्यानुसार त्याचे बलाबल ठरत असते. आपल्याला धनयोगाचा विचार करावयाचा असल्याने वर नमूद केलेली कुंडलीतील धनस्थाने (२-११-५-८) व त्यांची पोषक स्थाने यामध्ये असणारे ग्रह स्थानबली समजावे व त्या त्या प्रकारचे धन देण्यास समर्थ आहेत असे समजावे. (उदा:–धनस्थानाची पोषक स्थाने षष्ठ व दशम ही आहेत तेव्हां या तीन ठिकाणी असणारे ग्रहांचे बलाबलच कितपत पोषकता आणतील ते समजेल. इतर स्थानांत असलेले ग्रह धनस्थानावरून पहावयाच्या संपत्तीचा लाभ कितपत मिळेल ते समजण्यास उपयोगी नाहीत.) इतर स्थानांच्या बाबतीत असाच नियम ध्यानांत ठेवावा.

ग्रहांचे शत्रूमित्रत्व (तात्कालिक)

ग्रहांचे नैसर्गिक शत्रूमित्रत्व जसे ठरलेले आहे त्याचप्रमाणे पत्रिकेतील ग्रहांची परिस्थिति पाहून त्यांचे तात्कालिक शत्रूमित्रत्व पहाण्याचा प्रकार आहे. यासाठी नैसर्गिक शत्रूमित्रत्व प्रथम पहावे लागते व त्यावर हे तात्कालिक शत्रू–मित्रत्व अवलंबून असते. जन्मकुंडलीत एकादा ग्रह ज्या स्थानांत असेल तेथपासून दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, दहाव्या, अकराव्या अगर बाराव्या स्थानात असणारे ग्रह त्या ग्रहाचे तात्कालिक शत्रू होतात. कोणताहि ग्रह नैसर्गिक मित्र असून तात्कालिक मित्र झाल्यास त्याला अतिमित्र समजावे. असा ग्रह जास्त पोषक ठरतो. कोणताहि ग्रह नैसर्गिक शत्रू असून तात्कालिक शत्रू असेल त्याला अतिशत्रू समजावे. असा ग्रह फल देण्यास समर्थ नसतो. एका प्रकारे शत्रू व दुसऱ्या प्रकारे मित्र असणारा ग्रह सम अथवा उदासिन समजावा. तोहि विशेष फल देऊ शकत नाही.

जन्मतः मनुष्य बाल्यावस्थेत असतो. पुढे क्रमाने कुमार, युवा (तरुण), वृद्ध व मृत या अवस्थेत जातो. तसेच बाल, कुमार, युव या अवस्थामध्ये बल वाढत जाऊन वृद्ध व मृत या अवस्थेत तो कमी कमी निर्बल ठरतो. याचप्रमाणे ग्रहांच्या अवस्था मानण्यात आल्या असून त्यांच्या बलानुसार फलादेश देण्याची त्यांची ताकद अजमावता येते. ग्रहांच्या या अवस्था समजण्यासाठी विषम राशी व समराशी असे दोन भाग करण्यात आले आहेत. तसेच प्रत्येक राशीचे सहा अंशाचे विभाग करून या अवस्था ठरविल्या आहेत. विषम राशीच्या पहिल्या सहा अंशापर्यंत असणारा ग्रह बाल अवस्थेत म्हणून कमी फल देणारा मानला आहे. त्यापुढे प्रत्येक सहा अंशावर क्रमाने कुमार, युव, वृद्ध व मृत या अवस्थेत ग्रह असतो. समराशीत पहिल्या सहा अंशांत असणारा ग्रह मृत व त्यापुढे प्रत्येक सहा अंशावर वृद्ध, युव, कुमार व बाल अशा अवस्था मानण्यांत आल्या आहेत.

वरील गोष्टींच्या विचाराबरोबर ग्रहांच्या दृष्टि व अंतरात्मक योग यांचाहि विचार केल्यास धनयोगाचा निश्चित निर्णय सहज कळतो. यासाठी ग्रहांचे शुभाशुभत्व प्रथम ठरविले पाहिजे. रविपासून शनिपर्यंत सात ग्रहांचे यादृष्टीने तीन भाग पडतात. (१) निश्चित शुभ गुरु, शुक्र अशुभ–रवि, मंगळ, शनि (३) कधी शुभ तर कधी अशुभ–चंद्र, बुध (चंद्र–पौर्णिमेच्या आधी आठ दिवस व नंतर आठ दिवस शुभ याखेरीज अशुभ. बुध–शुभग्रहाबरोबर असल्यास शुभ व अशुभ ग्रहांबरोबर असल्यास अशुभ फल देणारा असतो. बुध एकटा असेल तेव्हां शुभ समजावा.)

ग्रहांचे अंतरात्मक योगः–

ग्रहांच्या स्पष्ट स्थितीवरून म्हणजेच राशी, अंश, कला, विकलात्मक भोगावरून (दोन ग्रहांत असणारे अंतर लक्षांत घेऊन) मुख्य असे सात प्रकारचे ग्रहयोग मानण्यांत आले आहेत. (१) युती–धनयोगकारक ग्रहांत झालेल्या युत्या शुभफल देतात. शुभ व मित्रग्रहांच्या युत्यामुळें चिरकाल टिकणारा धनलाभ घडतो. व अशुभ अगर शत्रूग्रहांच्या युत्यामुळे फारकाल न टिकणारा धनलाभ घडतो. (२) द्विर्द्वादश योग–हा योग धनयोगाच्यादृष्टीने पोषक समजावा. (३)

अर्धकेंद्र योग नेहमी अशुभ समजावा. (४) लाभयोग हा योग नेहमी शुभ समजावा. (५) केंद्रयोग–सर्वसाधारणपणे अशुभच समजावा. (६) त्रिकोण योग–या योगाला भाग्यकारक व शुभ फलादेशाचें द्योतक समजतात. (७) प्रतियोग–धनयोगाच्या दृष्टीने हा योग शुभ मानावा.

ग्रहांच्या दृष्टि

सर्व ग्रह ते ज्या राशीत असतात तेथपासून सातव्यास्थानी पूर्ण दृष्टीने पहातात. मंगळ–चतुर्थ व अष्टम, गुरु–पंचम व नवम आणि शनि–तृतीय व दशम स्थानावरहि पूर्ण दृष्टीनें पहातात.

धनयोगकारक ग्रहांशी होणारा शुभयोग अथवा शुभग्रहांची दृष्टी असणे पोषकता निर्माण करणाऱ्या मुख्य गोष्टी आहेत. तसेच अशुभ योगामुळे अगर अशुभ ग्रहांच्या दृष्टीमुळे ग्रहांच्या फलादेशांत वैगुण्य निर्माण होत असते हे ध्यानांत ठेवले पाहिजे. ज्यावेळी धनयोगकारक ग्रहाशी शुभ अथवा अशुभ कोणताच योग नसतो अथवा कोणत्याही ग्रहाची त्याच्यावर दृष्टी नसते अशावेळी त्या ग्रहाचे मागे आणि पुढे कोणते ग्रह (शुभाशुभ) आहेत ते विचारात घ्यावे. दोन ग्रहांच्यामध्ये असण्याच्या या योगाला कर्तरी योग असे म्हणतात. दोन शुभग्रहामध्ये असणारा ग्रह शुभकर्तरी योगात असून शुभफले देतो. दोन अशुभ ग्रहांमध्ये असणारा ग्रह पापकर्तरी योगात समजतात. तो निर्बल होऊन फले देण्यास असमर्थ असतो.

वर दिलेल्या बलाबलांचा संपूर्ण विचार करावा लागतो तेव्हां धनयोगाचा विचार पूर्ण होतो. या गोष्टीपैकी जितक्या गोष्टी पोषक असतील त्या प्रमाणांत धनयोग बलवान व उपभोगला येतो. वरीलपैकी एकहि गोष्ट पोषकता आणणारी नसेल तर असा योग असणारी व्यक्ती पैशाच्यादृष्टीने अतिशय बिकट परिस्थितीत राहणारी असेल हे निश्चित समजावे.

(ज्योतिविवेक वरून)

मंगळ-चंद्र व स्त्रीचा मासिक धर्म

लेखक : ज्योतिषाचार्य दत्तात्रय शंकर केळकर, सावंतवाडी

मासिक पाळी ही स्त्रीला नैसर्गिक देणगी आहे. ही देणगी पंचेचाळीस वर्षेपर्यंत असते. स्त्रीच्या जीवनात दोन वेळा मानसिक गोंधळ ह्यावेळी उडतो. तसाच मासिकपाळी बंद होताना होतो: मासिकपाळी सुरु होण्याचा काळ मानवी समाजाच्या व देशपरत्वे बदलत असतो. पण मासिक पाळी मात्र पंचेचाळीसनंतर चालू कुठेच रहात नाही.

गर्भाशय, बीजांडवाहिनी नलिका, गर्भाशयाचा बाहेरचा भाग, योनीत कार्य करणाऱ्या ज्यामुळे स्त्राव निर्माण होतो त्याचा कारक चंद्र आहे हे ज्योषतिशास्त्र मान्य करते. कुंडलीत चंद्राला होणारे परिणाम मानसिक अस्वास्थ निर्माण करतात.

मंगळ हा रक्त, तंतू ह्यांच्या तुटण्यास व गर्भाशयातून बीजांड बाहेर फेकण्यास कारणीभृत असतो. सामान्यतः आरोग्यसंपन्न स्त्रीला चंद्राचे सर्व राशीतून भ्रमण करून मूळ राशीत यायला अठ्ठावीस दिवस लागतात. त्याचकाळी गर्भाशय जे बीजांड फलद्रूप झाले नाही. ते बाहेर फेकण्याचे काम करतें. ह्या काळांत होणारे रक्तदर्शन (प्रवाह) ह्याला मासिक पाळी असे म्हणतात.

मगळ हा रक्तप्रवाह सुरु करण्यास कारणीभूत आहे पण प्रत्यक्ष त्याचा प्रवाह व तो किती काळ रहावां हे चंद्र ग्रहच ठरवित असतो. स्त्रीच्या सर्वसामान्य पाळीला चंद्र ह्राच जबाबदार आहे. कोणत्याही प्रकारे दूषीत झालेला चंद्र तिच्या मासिक पाळीत कायम निर्माण करतो. परिणामतः स्त्रीच्या गरोदर रहाण्यात अडथळे निर्माण होतात.

संततिनियमनाचेदृष्टया सरकारनें ज्योतिषांचा सल्ला घ्यावा. सर्व स्त्रियांना जास्त मुलें होत नाहीत. ज्या ज्या स्त्रियांना मुले होतील त्यांच्या बाबतीत खबरदारी घेता येईल. जगातले जेष्ठ व श्रेष्ठ लैंगिक शास्त्रज्ञ संततिनियमनाबद्दल विरुद्ध मत देत आहे, त्यामुळे स्त्री-पुरुषाचे मानसिक जीवन अस्वस्थ व बिघडते. जेव्हां मंगळ जन्मलग्नाला किंवा चंद्र राशीला गोचररित्या परिणाम करत असेल त्यावेळी मासिक पाळी सुरू होते. पहिली मासिक पाळी मात्र मंगळ जेव्हा लग्नावर दृष्टी टाकतो त्यावेळीच होते. ग्रह राशीत येण्यापूर्वी व राशीतून गेल्यावर परिणाम करतात. ह्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे स्त्रीची मासिक पाळी आहे. वाचकांना माहीत आहे की चंद्र दर राशीत सव्वादोन दिवस रहातो. चंद्रावर मंगळाच्या दृष्टीचा परिणाम होण्यापूर्वी कांही तास व चंद्र ती राशी सोडून गेल्या नंतर काहीं तास स्त्रीची मासिक पाळी रहाते. सामान्यतः आरोग्यसंपन्न स्त्रीला सव्वातीन ते सव्वाचार दिवस मासिक पाळी रहाते, पण चंद्र दूषीत असतां (मुळ कुंडलीत) तर चंद्र किंवा मंगळाच्या दशेत किंवा अंतर दशेंत ह्या मासिकधर्मात फरक होतो. कुंडलीत चंद्र दूषीत असतां स्त्रीचे भावनात्मक जीवनहि बिघडले जाते. किंवा अस्वस्थ होते: ह्याला कारण चंद्र हा तिच्या भावनात्मक जीवनावर सत्ता गाजवतो हे आहे. पौर्णिमा, शुक्ल प्रतिपदेजवळ प्रसूत किंवा मासिक पाळी होणाऱ्या स्त्रीला त्याची जाणीव फार रहाते. त्यामुळे अशिक्षित स्त्रियासुद्धा आपणास मासिक पाळी केव्हा आली होती हे अचूक सांगू शकतात.

चंद्र जर दोन पापग्रहांमध्ये असेल किंवा चंद्राच्या मागे व पुढील राशीत पापग्रह असतील तर बीजवाही-

नीत दोष असतो. त्यामुळे फार दुःखद वेदना व असमाधान होते. पंचमात चंद्र असून असा योग असतां स्त्री गरोदर राहू शकत नाहीं. संमोहन शास्त्राचा प्रयोग करून ह्या वेदना कायमच्या दूर करता येतात. व तसा प्रयोग मुंबईतील प्रसिद्ध सिनेमा जाहिरात कंपनींच्या मालकिणीवर तसेच मुंबईचे सुपारीकिंग ह्यांच्या मुलीवर करून त्यांना आम्ही बरे केले आहे. तांबड्या व पांढऱ्या रंगाच्या बाटलीत पाणी ठेवून ते उन्हात ठेऊन घेतल्यास स्त्रीच्या मासिक पाळीचा त्रास कमी होतो.

जेव्हा चंद्र शनी किंवा राहूने स्त्रीच्या कुंडलीत दूषीत होतो तेव्हां मासिकपाळीच्यावेळी स्त्रीला त्रास होतो. एवढच नव्हेतर तिला एक प्रकारचे औदासिन्य येते.

सप्तमात चंद्र दूषीत असून पंचमेश अष्टमांत असतां व तिथे रवि असतां स्त्रीला खूप मासिक पाळी म्हणजे अंगावर जाते. सप्तमांत चंद्र शनीने दूषीत असतां मासिक पाळीच्या त्रासाबरोबर फार अस्वस्थता व मानसिक औदासिन्य व थकवा येतो. ह्या शनी चंद्रावर राहूची पापदृष्टी असतां स्त्रीच्या गर्भाशयात ट्यूमर होतो. व तिलाशस्त्रक्रिया करावी लागते.

अष्टमात चंद्र व बुध असून त्यावर मंगळाची पूर्ण दृष्टी असतां स्त्रीला अनेकदा गर्भपात होतो. एवढेच नव्हेतर त्यच्याबरोबर राहू असता गर्भाशयाचा विकार होतो. चंद्र, बुध बिघडल्यामुळे मासिक पाळी बंद झाल्यावर स्त्रीला वेड येते.

स्त्रीचा चंद्र केतूने दुषीत असून त्या पुढील राशीत शनी असतां मासिक पाळी चांगली होत नाही. व त्रास होतो. षष्ठात चंद्र केतू असून त्यावर पापग्रहांची दृष्टी असतां स्त्रीला होणारे अपत्य फोरसेप लावल्याशिवाय काढता येत नाही. कांही स्त्रियांना गर्भपात होतो. व अपुऱ्या महिन्याचे बालक होऊन जाते.

चंद्र केतूने युक्त असता मानसिक पाळी पुरेशी किंवा फारच कमी होते व मंगळ जर कर्कैत असतां हा त्रास जास्त जाणवतो. लग्नेश, चंद्र व मंगळ दुषीत असतां स्त्रीला अपुरी मासिक पाळी व दुःखद होते. व्यक्तीची पाठ दुखते पाय दुखतात. सर्व शरीर दुखते एवढेच नव्हेतर मासिक पाळीच्यावेळी डोके दुखते.

अपुऱ्या काळात म्हणजे पंचेचाळीस वर्षापूर्वी मासिक पाळी बंद होण्याला हॉरमोन्स देणाऱ्या ग्रंथीत दोष रक्तक्षय, क्षय ही कारणे आहेत. तसेच बीजांडवाहिनी नलिकेत दोष ट्यूमर, जागेत बदल, एकदम धक्का, मानसिक काळजी व मानसिक अस्वास्थ्य गरोदर रहाण्याची भीति त्यामुळे मासिक पाळी बंद होते. पाशवी संभोग स्त्रीची मासिक पाळी जाण्यास कारणीभूत होतो. राहूने ग्रह दूषित असतां काल्पनिक भिती असते. तर चंद्र किंवा लग्न केतूने दुषीत असता स्त्री भित्री न होता ती जास्त आग्रही व आक्रमक होते. लग्नांत राहु स्त्रीला फार भित्री करतो. व तिची फार फसवणूक होते. अति मासिक स्राव होणाऱ्या स्त्रियांना लैंगिक भूक जास्त असते. मासिक पाळी कमी असता कामवासना कमी करते. मेष, मिथुन, कन्या, धनु व मीनेच्या व्यक्ती सामान्यतः भित्र्या असतात. व साध्या व क्षुल्लक गोष्टींची काळजी व भीति बाळगतात. तृतीय स्थान किंवा तृतीयेश बिघडता स्त्री भित्री ठरते, पहिल्या मीळनाच्या वेळी होणारे मानसिक संस्कार स्त्रीच्या जीवनात अपूर्व क्रांतिकारक होतात. ज्या स्त्रियांचे मानसिक दौर्बल्य लैंगिक सुखाच्या बाबतीत असते. त्यांनी संमोहन शास्त्राने दिली जाणारी वैद्यकीय सूचना घ्यावी त्याने त्यांची काल्पनिक भीति जाते.

स्त्रीची पहिली मासिक पाळी स्त्रीचे भवितव्य घडवते असें प्राचीन संस्कृत ज्योतिषग्रंथाचे म्हणणें योग्य आहे.

कुंडलींत मंगळ पाहू नका असें म्हणणारें फक्त वैद्यक ह्याच गोष्टीचा विचार करतात. पण त्याबरोबर स्त्रीचें लैंगिक जीवन, मानसिक जीवन व प्रजोत्पादन जो एक समाजाचा व निसर्गाचा हेतू आहे ह्यांचें मूल्यमापन अचूक करण्याला चंद्र, मंगळ ह्यांना फार काय सर्वस्वी महत्व आहे. ज्या स्त्रियांचें लैंगिक व वैवाहिक जीवन उध्वस्त झाले आहे त्या स्त्रियांच्या कुंडल्या पहा म्हणजे ज्योतिष हें किती परिपूर्ण शास्त्र आहे ह्याचा प्रयत्य येईल.

मृत्यू योग


लेखक :- वा. म. गोखले गुरुजी, ज्यो. विशारद

कै. बॅ. वि. दा. सावरकर

जन्मतारीख २८।५।१८८३

शके १८०५ वैशाख कृ. ६ सोमवार धनिष्ठा नक्षत्र ४६ घ. ५४ प. जन्मेष्ट घ. ३५ प. १० रात्री ८ वा. ६ मि. जन्म नक्षत्र धनिष्ठा ४ चरण

जन्मलग्न कुंडली



स्पष्ट ग्रह अंश लग्न ०–१५

रवि. १४–४६–५२ चंद्र. ३–४५
मं. ६–२० बु. २३—३
गु. १३–४० शु. १५–२
श. ९– ४ राहू १७–४६
केतू १७–४६

जन्मवेळी महादशा मंगळ
२८–५–१८८३
०–६– १ मं १८ रा.
१६ गु. १९ श. १७ बु. ७ के.

२८–११–१९६१ केतू पूर्ण
४–३ शुभदा दशा चालू

२८–३–१९६५
०–०— १ शु. रवि अंतर्दशा
२८–३–१९६६

शु. म. द. रवि. अंतर्दशा र.
२८–३–६५ दिन मास
१८–०–० र. र.

१६–४–६५
१ र. चं.

१६–५–६५
२१–१– र. मं.

७–७– ६५
२४–१ रवि. रा.

१–९–६५
२७–१ र. श.

२८–१०–६५
२१–१– र. बु.
१८–१ र. गु.

७–२–६६
२१–०– र. के.

२८–२–६६ मृत्युयोग

बॅ. सावरकर यांच्या कुंडलीवरून त्यांना शुक्राची महादशा २८–११–१९६१ चे पुढे चालू झाली. शुक्र त्यांचा षष्ठेश आहे. व त्यांत अंतर्दशा रविची आहे. शुक्र रवि हा द्विद्वार्दशक योग आणि त्यांत रवि असताना केतूची दिनदशा तारीख २८–२–६६ पर्यंत आहे. त्यांतच २६–२–६६ ला मृत्युयोग आला. ० ० ०

स्त्रींची कुंडली अभ्यासण्यास दिल्यावर चंद्र, मंगळ, राहू, केतू कुठे आहेत व त्याची कुंडलीतील स्थाने अभ्यासामग तिच्या आरोग्याची कल्पना येईल. स्त्रीचें लैंगिक जीवन बाजूला सारले तरी स्त्रीचें जीवन हे मुख्यत: चंद्रावर अवलंबून आहे. चंद्र हा स्त्रीच्या भावना, मासिकपाळी व मातृत्व ह्याला कारणीभूत आहे. स्त्रीचे अनेक विचार आहेत. संपादकांनी दिलेल्या मर्यादित इच्छा असून सर्वांचा परामर्ष घेता येणार नाहीं.

ज्योतिष शास्त्रानें अगोदर भावी धोक्याची सूचना बारा-पंधरा वर्षे देतां येते. फार काय बारकाईनें अभ्यास केल्यास तुम्हाला होणाऱ्या आजाराची अगोदर सूचना ज्योतिषी देऊ शकेल. वैद्यक शास्त्र आजार झाल्यावर त्यावर उपाय करून तें दूर करण्याचा प्रयत्न करते तर ज्योतिषशास्त्र आजार होण्यापूर्वी त्याची जाणीव देऊन त्यावर उपाययोजना सुचवून त्यातून बरें करते. Prevention is better ही वैद्यकशास्त्राची सर्वमान्य पद्धति खरी ज्योतिष शास्त्रांत आहे त्यादृष्टीनें वैद्यक शास्त्रापेक्षा ज्योतिषशास्त्र श्रेष्ठ आहे. अमेरिकन सरकार ज्योतिषांना मानाचे स्थान देत आहे, आपल्या सरकारलाहि ते द्यावेच लागेल. × × ×

फलज्योतिष हें शास्त्र आहे काय?

लेखक : श्रीराम केळकर

फलज्योतिष ह्या शास्त्राविषयीं तुम्हाला काय वाटते? हा प्रश्न माझे मित्र श्री. श्रीकृष्ण जकातदार यांनी मला विचारला त्यावेळी खरोखरच मला फार आश्चर्य वाटलं. कारण त्या शास्त्राविषयींचें माझे मत फारसे चांगले नाही हे त्यांना माहित होते. आणि तरीहि त्यांनी तो प्रश्न विचारला होता. दोन वर्षापूर्वी मी लिहिलेल्या एका नाटकाचा 'मुहूर्त' काढून घ्यायला मी त्यांचेकडे गेलो होतो.—कदाचित् त्यामुळें माझे मत-परिवर्तन झाल्याची खात्री त्यांना वाटली असावी.

नास्तिकांतले नास्तिक समजले जाणारे लोकहि कांहीं वेळां कुठेतरी अनपेक्षितरित्या चित् शक्तीच्या किमयेंतील दिव्य-भव्यत्वाचा साक्षात्काराने पूर्णपणें आस्तिक झालेले दिसतात; तसंच कांहीसे फलज्योतिष शास्त्राविषयींच्या माझ्या पूर्वकल्पनांचे झालेले आहे हे कबूल करण्यास मुळीच कमीपणा वाटत नाही.

पूर्वी ज्योतिषशास्त्राची चेष्टा करण्याकडे असणाऱ्या माझ्या प्रवृत्तीला कारणेहि तशींच झालेली होती. वृत्त-पत्रांतून प्रसिद्ध होणारी राशिकविष्यें, एकाचवेळीं परस्पर विरोधी विसंगत अशीं असतात. त्यांत भविष्य देणाऱ्या ज्योतिषांच्या विधानांचा परस्पर मेळ बसत नाहीं हे हरघडी मीं पहात आलो आहे. तसेच हात पाहून, चेहरा पाहून भविष्य सांगत दारोदार फिरणारे पोटभरू ज्योतिषीं हेहि त्या शास्त्रावरील विश्वास नष्ट करण्यास बहुतांशाने कारणीभूत झालेंले आहेत. त्या तथाकथित ज्योतिषाविषयीं एक खूणगांठ मात्र मनाशी मी पूर्णपणे बांधून ठेवलीं आहे. ती ही कीं, जवळ असलेंलें पंचांग आणि ग्रहांची जुजबी माहिती ह्याशिवाय त्या शास्त्राशीं त्यांचा काडीमात्र संबंध नसला तरी त्यांचे मानस-शास्त्राचें ज्ञान मात्र कौतुकास्पद असते, आणि त्याच एकमेव आधारावर पृच्छकाचा खिसा रिकामा करण्याची किमया ते करींत असतात.

कांही अपवाद वगळलें तर वृत्तपत्रांतील भविष्य-कथनाचा फॉर्म्युलाहि एकसारखा जवळजवळ ठरल्या-सारखाच असतो. (अर्थात् ज्या ठिकाणी ज्योतिषशास्त्रा-विषयींच्या ज्ञानाचा अभाव असतो त्या ठिकाणी !) महिन्याचा पूर्वार्ध त्यातल्या त्यांत पहिला आठवडा असेल तर द्रव्यलाभ, खरेदी, पत्नीसुख, काळ आनंदात हा मजकूर आलटून पालटून प्रत्येक राशीला असायचाच! आणि शेवटच्या आठवड्यांत द्रव्यचिंता, घरात असंतोष, मनस्वास्थ्य बिघडेल, वगैरे धर्तीची मोघम विधाने, व मधल्याकाळांत तारतम्याने ह्याच धर्तीचे ठोकळेबाज आडाखे ! लग्नाचा मोसम सुरू झाला कीं विवाह योग असायचाच! मात्र ह्या विधानाला राशिपरत्वें जर तर-च्या नक्षीदार महिरपी घातल्या कीं झाले काम.

एकदां तर एका ज्योतिषी म्हणविणाऱ्या स्वामीनी एक अजब चमत्कार दाखवून बोलता बोलता मला-पंधरा रूपयाचा गंडा घातला. ज्योतिष शास्त्राची चेष्टा करणारा मी त्यावेळी कसा बनलो हे अजूनहि मला सांगता येत नाही. असल्या भंपक लोकांमुळेच ह्या शास्त्राची अधिकाधिक बदनामी झालेली आहे. तो प्रकार जितका आश्चर्यकारक तितकाच मनोरंजकहि आहे.

सकाळी ९ वाजण्याची वेळ होती. नेहमीप्रमाणें मी माझ्या दुकानांत लिहिण्याचे कामांत मग्न होतो. इतक्यात एक सहा-सव्वासहा फूट उंचीचा गोरा इसम आत आला. त्यानें भगवी चाटीं परिधान केलेली होती. त्याला कांही माल घ्यावयाचा असेल असें समजून विक्रेत्यांनी काय हवें असे त्याला विचारले.

पण त्यांना काहींहि उत्तर न देता तो सरळ माझेकडे आला. व अस्खलीत इंग्रजीत बोलायला त्यानें सुरवात केली. तो ज्योतिषी असल्याचे त्याने सांगताच त्याला जावयास सांगून पुन्हा मी माझे काम पुढे सुरु केले. एक मिनिट-दोन-मिनिटे दहा मिनिटे झाली. तरी तो तेथून हलला नाही. वर मान करून मी त्याचेकडे पाहिलें त्यावेळीं त्याची नजर माझ्या डोळचावर रोखलेली मला दिसली त्याचे डोळे मोठे होते. कसलंतरी विलक्षण आकर्षण त्यात होते. चार-दोन सेकंद मी माझी नजर त्याच्या नजरेला भिडवली असेल पण तेवढचात त्याने आपल्या छातीचा पुढील भाग वर उचलला.

क्षणभर मी चकीत झालो. छातीखाली लंगोटीवर बजरंगाची आठ-नऊ इंचाची मूर्ती गळचांतून अडकवलेल्या काळचा दोरीत टांगलेली होती. तांब्याची मूर्ती मांडचांच्यामध्ये बांधण्याचे प्रयोजन काय ? आणि त्याचें प्रदर्शन करण्याचें कारण काय हें माझ्या लक्षांत येईना, पण ते अद्‌भूत पाहून मी क्षणभर भारावल्यासारखा झालो खरा ! तोहि त्याच स्थितींत स्थिर होता. कांहींतरी बोलण्यासाठीं मी तोंड उघडणार तोच त्याने त्या मूर्तीच्या गळचांतील फुलें ओरबाडलीं व त्याची पुडी करून ती त्याने माझ्या हाती दिलीं. सर्व कांही मनाविरुद्ध घडत होतं तरी मीं तें करीत होतो.बोलून त्याला झिडकारून टाकण्याची इच्छा होत होती तरी ओठांतून शब्द उमटत नव्हते. थोडचा वेळाने त्याने तीं पुडी उघडावयास सांगितलें तेव्हां ती रिकामी असल्याचे आढळून आलें. निमिषमात्र मी चकीत झालो खरा, पण मग ती कांहीतरी हातचलाखी असावी असें समजून त्याला निरोपाचा नमस्कार केला व पुन्हा काम सुरू केले. पण तो मात्र हलला नाही.

जवळींल कागद काढून त्याने इंग्रजीत माझे लाईफ रिडींग लिहायला सुरुवात केली---- " तुम्हाला एक सुंदर मुलगा आहे, पण "आणि वाक्य अर्धवटच सोडून त्याने त्या कागदाची गुंडाळी केली व तो जाऊ लागला. माझ्या मनाला त्या वाक्यापुढील मजकूर वाचण्याची रूखरूख लागून राहिली, उत्सुकता शिगेला पोहोचली व त्याचक्षणीं मी त्याला थांबवून विचारले, " स्वामीजी, आगे क्या ? --

" बहुत कुछ "---- एवढेंच उत्तर देऊन जाण्यासाठीं त्यानें आणखी दोन पावलें पुढे टाकली. सारा प्रसंग नाटचमय रितीने घडत होता. मी पुढें जाऊन त्याला घऊन आलो व लाईफ रिडींगची त्याची फी पंधरा रुपय त्याला रोख दिली. दोन-तीन मिनिटांत त्याने लिहिलेला मजकूर एका पाकिटांत घातला व ते बंद करून माझ्या हाती दिले वतो निघून गेला. स्वप्नांत एखादी घटना घडावी तसे ते सारे घडले. त्याने दिलेल्या कागदांतील मजकूर अजूनहि माझ्याजवळ आहे पण त्यांतील एक अक्षरहि खरें झालेलें नाही.

अदृष्ट जाणण्याच्या माणसाच्या सहजप्रवृत्तीचा असं काहीतरी लोक विलक्षण दाखवून ज्योतिषाचें नावाखालीं लूटमारीसाठी जेव्हा उपयोग केला जातो तेव्हांच जनतेच्या मनांतील या शास्त्रावरील विश्वास नष्ट होत जातो.

याउलट ह्या शास्त्रावरील डळमळत चाललेला माझा विश्वास दृष्ट होण्यासारखी आणखी एक घटना घडली आणि त्यामुळेंच आज " ज्योतिष हे शास्त्र आहे " असें मी ठासून प्रतिपादन करू शकतो. माझ्या आयुष्यांतील भरभराटीचा असा तो काळ होता. दररोज हजारो रुपयांची उलाढाल होत होती. व्यापारांत मी यशस्वी झालो होतो. अशा त्या भाग्यकाली कुटुंबातील सर्व माणसांना घेऊन कोकणांत कुलदेवतेच्या दर्शनाला जाण्याचा बेत मनाशी पक्का करून माझ्या इतर नातेवाइकांस तसें कळविलें व त्यांची अनुमति मिळवली.

१९ मार्च १९४८ या दिवशी बोटीनें कोंकण प्रवासाची तयारी मुंबईमार्गें करण्यात येऊन थोरल्या बंधूनी तिकिटें काढून ठेवली. कसलीहि कमतरता नव्हती. तरीहि त्यांत एक अडचण आलीच. माझ्या थोरल्या बहिणीचे यजमान एक चांगल्यापैकीं ज्योतिषी म्हणून कल्याणांत प्रसिद्ध होतें. त्या शास्त्रांत त्यांचा अभ्यास चांगला होता, पेशानें ते शाळामास्तर होते. त्यांनी माझ्या कुंडलीतील ग्रहयोग पाहून तूर्त प्रवासास निघू नये असा सल्ला माझ्या बहिणीतर्फे मला दिला. सर्व कल्याणांत उत्कृष्ट ज्योतिषी म्हणून सोमठाणकर मास्तरांचा लौकिक असला तरी व्यक्तिशः माझा त्या शास्त्रावर विश्वास नसल्यामुळे मी तो सल्ला झिडकारून लावला. बहिणींच्या प्रवासखर्चासाठी त्यांची ही टाळाटाळ चालली असावी असाहि माझा एक (गैर) समज झाला होता. मी अट्टाहासानें तो बेत कृतींत आणण्याचा निश्चय करून तिला तसे कळविलेहि ! पण तो प्रवास प्रत्यक्षांत घडू शकला नाही. आणि माझ्या कुंडलीतील शनी-मंगळ युती घात करील हे त्यांनी काढलेलें अनुमान खरे ठरले !

सकाळच्या गाडीने मुंबईला निघायचा बेत नक्की असल्यामुळे नेहमीप्रमाणे दुकान बंद करून दुसऱ्या दिवशीच्या प्रवासातील गंमतीजंमतीची चित्रे मनाशी रंगवीत रहात्या बंगल्याच्या प्रवेशद्वारातून आंत शिरलो त्यावेळी रात्रींचे सव्वानऊ वाजले होते. फाटक ओलांडून ब्लॉकच्या दरवाजाचे रोखाने मी पाऊल उचलले मात्र. इतक्यांत कुणा अनामिकाने माझ्या पोटांत सुरा खुपसला आणि यात्रेच्या तयारीने बसलेल्या माझ्या सर्व नातेवाईकांना पुण्याची यात्रा करावी लागली. माझ्याबरोबर येणाऱ्या इतर लोकांचे ग्रहमान चांगलें असावें त्यामुळे एकट्या माझ्यावरच त्या दुष्ट ग्रहांनी अंमल गाजविण्याची संधी आगाऊ साधून घेतली.

सुरामारीचा हा वृत्तांत कल्याणला ज्यावेळी वहिणीला कळविण्यात आला त्यावेळी माझी आई तिथंच होती. तिच्या दुःखाला सीमा नव्हती. मिळेल त्या त्या गाडीने पुण्याला येण्यासाठी ती स्टेशनवर वहिणीसह येऊन बसली. तिच्या डोळ्यांतील अश्रूंच्या धारांना खंड नव्हता. हृदयातून गद्गद्लेले मुके कढ बाहेर पडत होते. त्यावेळी तिचे सांत्वन करताना पुन्हा श्री. सोमठाणकर यांनी शास्त्राधारेच त्यांना धीर देऊन सांगितलें की, "घाबरूं नका, भेट जरूर होईल. एवढेच नव्हेतर गुरुबळ चांगले आहे. लवकर बरें वाटेल" आणि त्या त्यांच्या अनुमानांतील खरेपणामुळेच मी आज हा लेख लिहावयास जिवंत आहे. ह्या घटनेमुळे एक गोष्ट मात्र माझ्या मनावर निश्चितपणे बिंबली ती ही की, ज्योतिष हे शास्त्र आहे आणि त्याचा सखोल अभ्यास केला तर अनेकांच्या आयुष्याला योग्य ते मार्गदर्शन होण्यासाठी त्याचा उपयोग होईल. मात्र ह्या ज्ञानाला पैसे मिळविण्याचें साधन बनवून बाजारी स्वरुप आणतां कामा नये.

फलज्योतिष हे शास्त्र आहे. याची प्रचिती आलेल्या कांहीं विद्वानांनी याचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी कांही योजना आखल्या जाव्यात असे आपले मत इ. स. १८९२ साली भरलेल्या एका परिषदेत व्यक्त केल्याचे माझ्या वाचनात आले आहे. परंतु त्या कार्याला खरी चालन मिळावयास आणखी पंचवीस वर्षे उलटावी लागली. ज्योतिष शिक्षण महाविद्यालयाचे रौप्य-महोत्सवी अधिवेशन १९१७ साली लोकमान्य टिळकांचे अध्यक्षतेखाली पुण्यात भरले होते. त्यावेळी फलज्योतिष हा विषय चर्चेसाठी ठेवण्यात आला, परंतु त्यावेळी पंचांगावरील चर्चेतच सर्व वेळ संपल्यामुळे ती चर्चा झाली नाही. शेवटी लोकमान्यांचे घरी कांही निवडक ज्योतिर्विदांची बैठक होऊन त्यांत हा विषय चर्चिला गेला. तेव्हा लोकमान्यांनी फलज्योतिष शास्त्राचा पद्धतशीर प्रचार आणि प्रसार सर्वसाधारण जनतेत होण्याची नितान्त आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

कोठल्याहि कार्याची सुरवात करताना द्रव्यबलाची पुरेशी तरतूद असलीं तरच ते होऊ शकते अशी कल्पना उराशी बाळगणारे मुंबईचे श्री. भिडे नामक एक ज्योतिषी त्या सभेत उपस्थित होते. त्यांनी त्या शास्त्राच्या शिक्षणाठी किमान दोनशे पन्नास शाळा काढाव्यात व त्यासाठी तीन लाख रुपयांचा निधी उभा करावा व नंतर कार्याला सुरवात करावी असे आपले मत प्रतिपादन केले. तेव्हा त्यांना उत्तर देताना लोकमान्यांनी काढलेले परखड उद्गार मनन करण्यासारखे आहेत. "**प्रथम रुपये जमवून मग कार्य ही कल्पना मला पसंत नाही. निग्रहाने आणि निष्ठेनें कार्य करीत रहा म्हणजे जनता आपोआप सहाय्य करते. जनतेला कार्य दिसले पाहिजे.**"


कांही कांही संस्था—चालकांचा प्रथम पैसे जमविणे आणि नंतर कार्य असा खाक्या असतो मग अंगिकृत कार्यासाठी पदरचा पैसा खर्च करण्याची बुद्धि त्यांना कशी सुचावी ! कार्याच्या तळमळीशिवाय त्यागाची वृद्धि होत नसते. माझे मित्र श्री. श्रीकृष्ण जकातदार यांनी मात्र लोकमान्य टिळकांचे वरील उद्गार डोळ्यासमोर ठेवून फलज्योतिष अभ्यास मंडळ ह्या आपल्या संस्थेला सुरवात केली. सुरवाती सुरवातीला विद्यार्थी मिळविणे फारच जड गेले, तरीहि त्याच निष्ठेने पदरमोड करून त्यांनी ते कार्य तसेंच पुढे चालविले, आणि लोकमान्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या त्या कार्याला, लोकसंग्रह वाढून भरघोस यश मिळत चालल्याचे दिसून येते. सध्या अनेक विद्वान, व्यासंगी लोक बौद्धिकांच्या सभा, वादविवादांच्या रुपाने आपल्याजवळील अमोल ज्ञानाचा फायदा मंडळाच्या सभासदांस—विद्यार्थ्यांस उपलब्ध करून देत आहेत.

कुठल्याहि शास्त्रीय विषयास वाहिलेले मासिक सध्यांच्या कमाल महागाईच्या दिवसांत चालविणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. आसीम ध्येयवादाशिवाय तें चालणे केवळ अशक्य ? त्यातून फलज्योतिष उपेक्षित व सर्वसाधारण जनतेला अगम्य असे राहिल्याने तिचा उदार आश्रय असल्या मासिकाना मिळण्याची सुतराम् शक्यता नसते. अशा स्थितीत केवळ कार्यावर अढळ निष्ठा ठेवून नफा तोटयाचा विचार न करता 'ज्योतिष समाचार' हे मासिक श्री. जकातदार यानी सुरू केले; आणि त्या त्यांच्या धाडसाला लोकमान्यानी म्हटल्याप्रमाणे जनता उत्तरोत्तर उदार आश्रय देऊन त्याना प्रोत्साहन देत आहे हाही त्यांच्या कार्याचा गौरवच आहे.

देशोदेशी या शास्त्राची प्रगति झपाट्याने होत असली तरी अजूनहि म्हणावे तितके बुद्धीवान लोकांचे सहाय्य या शास्त्राला होत नाही ही खेदाची गोष्ट आहे. बुद्धी प्रामाण्यवादी लोक हे प्रयोगसिद्ध भौतिक शास्त्राचे निष्कर्षच फक्त ग्राह्य मानावयास तयार असतात. अदृष्ट जाणण्यास प्रवृत्त झालेली सर्व शास्त्रे मिथ्या असे ते आग्रहाने सांगत असतात. प्रयोग निरिक्षणांचेद्वारा जेवढे ज्ञान मिळेल तेवढेच सत्य व निरपेक्ष असते असे त्यांचे म्हणणे. ह्या त्यांच्या अहंकाराला त्यांच्यासारख्याच एका जगद्विख्यात शास्त्रज्ञानें एक चांगलाच मर्मभेदी टोला दिल्याचे माझ्या वाचनांत आहे. डॉ. जे एस्. हाल्डेन नावाचे ते शास्त्रज्ञ म्हणतात. Physical Science cannot express or describe biological phenomena so that its claim to represent objective reality cannot be admitted (जीवन शास्त्रातील घटना व्यक्त करण्याचे वा त्याचे वर्णन करण्याचे सामर्थ्य भौतिक शास्त्रात नाही, म्हणून वास्तविक सत्य सांगण्याचा आधिकार मला आहे असा दावा त्याने मांडला तरी तो ग्राह्य मानता येत नाही.)

जडवादाने झपाटलेल्या शास्त्रज्ञांत चैतन्य शक्ती हा बडा सैतान आहे असा भास नेहमी होत असल्याचे एक कारण असे की एकदा ती अतिंद्रीय शक्ती आपण मान्य केली की आपले महत्व रसातळास जाईल हे होय दूर अंतरावरील माणसाला आपले विचार कळविण्यासाठी आज भौतिक शोधाचे द्वारा उपलब्ध 'दूरध्वनी' चा वापर आपण करतो. त्यापूर्वी तेच कार्य योग शास्त्रद्वारा आपले पूर्वज करीत असत. योगसाधनेने मानसिक शक्तीची वाढ शेकडो पटीने वाढविता येते हे त्यासाठी सिद्ध झालेलेच आहे. म्हणजेच आजच्या भौतिक शोधापलिकडेहि एक दिव्य शक्ती आहे आणि ती अभावितपणे माणसाचे जीवनावर परिणाम करीत असते हे मान्य करावे लागते.

आकाशस्थ ग्रहांच्या जन्म कालीन स्थानावरून जन्माला येणाऱ्या व्यक्तीचे भविष्य कळते असे फलज्योतिष शास्त्र सांगते. व त्या दृष्टीने प्रत्येक ग्रहाचे गुणधर्म आहेत ते हजारो वर्षाच्या अभ्यासाने आपली दिव्यदृष्टी रोखून निश्चित ठरविले आहेत व त्यावर फलज्योतिषाची उभारणी केलेली आहे. सूर्यादी ग्रहांचे मनुष्य मनावर कसे कसे परिणाम होतात प्रत्येक ग्रहांचे गुणधर्म काय आहेत त्याचा शोध भौतिक शास्त्रज्ञाना अजून पुरतेपणी लागलेला नाही तरी ताऱ्यांचे व ग्रहांचे परिणाम सचेतनावर सतत घडत असतात एवढे तरी ते मान्य करतातच ! म्हणजेच फलज्योतिष शास्त्र जन्मस्थ ग्रहांच्या हालचालीत व्यक्तीच्या जीवनावर परिणाम करण्याची शक्ती आहे असे जे सांगते त्यावर त्यानाहि विश्वास ठेवावा लागेल.



खगोलशास्त्र

तेजस्वी तारकांचीं दर्शनें

लेखक : ज्योतिर्षालंकार कृ. वि. सोमण

कोणत्याहि रात्री निरभ्र आकाशांत असंख्य तारका दिसतात. त्या तारकांच्या ज्ञानाभ्यासाला कांहीसे साह्य व्हावे अशी माहिती प्रस्तुत लेखांत द्यावयाची आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत तारकादर्शनाच्या अभ्यासाला परंपरागत महत्त्व आहे. तपस्वी संशोधकांनी निरनिराळ्या तारकांचे जे गुणकथन केले आहे, ते आठवून त्या त्या तारकेकडे पाहण्यात आगळा आनंदहि प्रादुर्भूत होतो. पृथ्वीपासून अगदी जवळची म्हणतात ती ही मित्रतारका, कविलोक चंद्रप्रिया म्हणून संबोधितात ती ही रोहिणी, जिच्याजवळ सूर्य आला असतांना आपल्याकडे पर्जन्यकाल सुरू होतो ती ही आर्द्रा, सूर्यासभोंवती चौदा कोटी मैल एवढ्या अंतरावरच्या मंगळभ्रमणमार्गापेक्षांहि जिचा आकार मोठा आहे ती ही ज्येष्ठा, खवळलेल्या समुद्राला जिच्या दर्शनाने प्रशांतता येते ती ही अगस्तितारका, इत्यादि गुण आठवून निरनिराळ्या तारका ध्यानांत ठेवतांना अंतःकरणांत अनेकविध हृदयहारिणी तारका हेलावून जातात. तारकांचे निरनिराळ्या प्रकारे सविस्तर वर्णन् करण्याचे हे स्थळ नव्हे. अमुक तारका ती ही असे ध्यानांत येण्यासाठी कांही तारकासंबंधी येथे थोडेसे मार्गदर्शन करूं.

अभ्यासकांना आवश्यक असणारी अनुमाने

आकाशांतील तारका पाहण्याचा अभ्यास करतांना कांही सामान्य अनुमाने नेहमी माहीत असली म्हणजे सोयीचे होते. आपल्याइकडील पंचांगामध्ये सूर्य कोणत्या काळी कोणत्या नक्षत्रविभागांत असतो ते लिहिलेले असते. इंग्रजी वर्षाच्या तारखांप्रमाणे प्रत्येक नक्षत्रांत सूर्य असण्याच्या तारखा सामान्यतः दरसाल त्याच असतात. त्यांचे एक टिपण करून ठेवावे. ज्या दिवशी आपण नक्षत्रे पाहणार, त्या दिवशी सूर्य ज्या नक्षत्रांत असेल ते नक्षत्र, त्याच्या मागचे एक आणि त्याच्या पुढचे एक अशी तीन नक्षत्रे दिसणार नाहीत असे समजून घ्यावे. तसेच पंचांगात चैत्रादि महिने असतात, त्या प्रत्येक महिन्यांत त्या महिन्याच्या नांवाचे नक्षत्र साधारणतः रात्रीच्या प्रारंभी पूर्वेस असते, आणि पहांटेपर्यंत पश्चिम क्षितिजाकडे जाते. पृथ्वीवरील कोणत्याहि एका स्थळी कोणतीहि तारका दररोज पूर्वेस उगवल्यापासून आकाशामध्यावरून पश्चिमेस जाईपर्यंत आकाशांत ज्या मार्गाने जातांना दिसते, तो त्या तारकेचा मार्ग कित्येक वर्षेपर्यंत तोच कायम असतो. पृथ्वीवरील कोणत्याहि एका स्थळी एका दिवशी एकादी तारका घड्याळाप्रमाणे जितके वाजता उगवते, माध्यान्ही येते, आणि मावळते, त्या दिवसाहून पुढे दररोज सुमारे चार मिनिटे (१५ दिवसांना ५९ मिनिटे) प्रमाणे ती तारका आधी उगवेल, आधीं माध्यान्ही येईल, आणि आधी मावळेल. ज्या स्थळी आपण तारकादर्शनाचा अभ्यास करूं, त्याच अक्षांशांच्या अनुरोधानें तयार केलेले नक्षत्रनकाशे अभ्यासाला घ्यावे. नाहीतर समजुतीत चूक होईल. उदा० मुंबईकडील आकाश-नका-

शांत अगस्ति दिसतो. पण उत्तर ३८ अक्षांशापेक्षा जास्त उत्तरेकडील नकाशांत अगस्ति असणार नाही. आपल्या इकडील नकाशांत सप्तर्षि उगवतांना–मावळतांना दिस– तील तर उत्तर ४१ अक्षांशांपेक्षा जास्त उत्तरेकडील प्रदेशांतील नकाशात सप्तर्षि कधीच मावळलेले दिसणार नाहीत. इंग्लंडमधील आकाशीय अभ्यासाच्या नकाशांत सप्तर्षि, शर्मिष्ठा, हंस, सारथि (ब्रम्हहृदय) वगैरे पुंज सदोदितच क्षितिजावर दृश्य आकाशांत असतील. ते नकाशे तसेच भारतात अभ्यासाला उपयोगी नाहीत.

नक्षत्रे किन्वा अन्य तारका ओळखण्यासाठी अभ्यास– कांनी प्रथम मृग, सिंह, वृश्चिक, सप्तर्षि अशा तारकांनी बनलेल्या विशिष्ट आकृती ध्यानांत घ्याव्या. मृगाच्या पोटातील बाण, ज्येष्ठा, श्रवण यातील तीन–तीन तार- कांच्या ओळी लक्षांत ठेवाव्या. किंवा स्वाती, अगस्ति, व्याध, चित्रा, यमुना इ० पहिल्या प्रतीचे तेजस्वी तारे नीट पाहून ठेवावे. रोहिणीच्या पांच ताऱ्यांची त्रिकोणा- कृति, त्रिशंकूची दक्षिण क्षितिजावर दिसणारी चौकोना– कृति, पूर्वा उत्तराभाद्रपदांची विशाल चौकोनाकृति, कृत्तिकांचा लखलखणारा पुंज, अश्विनी, पुनर्वसु, मित्र ब्रम्हा अशा प्रत्येकी दोन—दोन तेजस्वी तारकांच्या जोडया पाहून घ्याव्या. म्हणजे या सर्व ठळकपणे दिस– णाऱ्या खुणांवरून आजूबाजूची नक्षत्रे व तारका ओळ- खणे सुलभ जाते प्राथमिक नित्य अभ्यासाला दुर्बिणीचा उपयोग करू नये. कारण एक तर सामान्य स्थितीच्या कोणालाहि अतिमूल्यवान दुर्बिण खरेदी करणे किंवा सांभाळणे परवडणार नाही. आपल्या ईश्वरदत्त डोळयां– नीच पाहण्याचा अभ्यास करावा. तोच केव्हांहि व कोठेहि उपयोगी पडणारा आहे. पूर्वेकडील क्षितीजावर सर्व तारका उगवतात. सामान्यतः आपल्या इकडे आपण ज्या तारकांचा अभ्यास करतो, त्या पूर्वदिशाबिंदूपासून दक्षिणेकडे सुमारे ६५ अंश, आणि उत्तरेकडे सुमारे ६५ अंश एवढया पूर्वक्षितिजावरील प्रदेशांत उगवतात. पृथ्वीवरील निरनिराळया अक्षांशांवर ही मर्यादा बदलेल. क्षितिजातील उत्तरदिशाबिंदु आकाशमध्य (खस्वतिक) आणि दक्षिणदिशाबिंदु हे बिंदु सांधणारी अेक रेषा आकाशात कल्पावी. तिला माध्यान्हरेषा म्हणतात. कोणतीहि तारका आकाशमध्यावर येते तेव्हा खस्वस्ति- काजवळ येते असे समजू नये. या माध्यान्हरेषेवर कोठेहि आली, म्हणजे ती तारका उगवण्याचा जो प्रदेश त्याच्या समोरचा तेवढाच प्रदेश पश्चिम क्षितिजावर तारक मावळण्याचा समजावा.

ठळक ताऱ्यांच्या अनुरोधाने लहान अल्पतेजस्वी तारे ओळखता येतात. उदा० अश्विनीच्या पूर्वेस (किंचित उत्तरेकडील) सुमारे १० अंश अंतरावर भरणीची अल्पतेजस्वी तीन तारकांची त्रिकोणाकृती आहे. मृगा– कृतीतील उत्तरेकडेचे जे दोन पाय, त्यातील पूर्वेकडचा पाय आणि पुनर्वसु यांना सांधणाऱ्या रेषेच्या मध्यभागी तेजस्वी आर्द्रा आहे. पुनर्वसूपासून मघांपर्यंतच्या अंत- रात पुष्य नक्षत्रांच्या तीन तारकांची अल्पतेजस्वी त्रिकोणाकृति आहे. त्या त्रिकोणाकृतीचा शिरःकोन पश्चिमेकडे असतो. पुष्य आकाशमध्यान्ही येते तेव्हां मुम्बईला अगदी खस्वस्तिकाजवळ दिसते. (स्वातीहि मुम्बईच्या खस्वस्तिकाजवळ येते) प्रश्वा आणि मघा यांना सांधणाऱ्या कल्पित रेषेत मध्येच आश्लेषांच्या पांच किंवा सहा अल्पतेजस्वी तारकांचा पुंज दिसतो तो पुण्यांच्या दक्षिणेस सुमारे १५ अंश अंतरावर आहे. पुष्य व आश्लेषा बहुधा एकाच वेळी माध्यान्हरेषेवर येतात. मघांच्या पूर्वेस सुमारें १५ अंश अंतरावर दक्षिणोत्तर अशा दोन तारकांचे पूर्वा फाल्गुनी नक्षत्र आहे. आणि पूर्वाच्या पूर्वेस सुमारे आठ-नऊ अंश अंतरावर उत्तरा-फाल्गुनी नक्षत्राच्या दक्षिणोत्तर अशादोन तारका आहेत. दोहोंतील उत्तरेकडची कमी तेजस्वी आहे. तेजस्वी चित्रेच्या नैऋत्येकडे जवळच सुमारे अठरा अंश अंतरा- वर हस्त नक्षत्राच्या पाच तारकांचा पुंज आहे. हस्त माध्यान्हरेषेवर येतात तेव्हा त्याच्या थेट दक्षिणेस क्षिति- जावर त्रिशंकूची चौकोनाकृति असते. त्या चौकोनांतील एक कोण हस्ताच्या समोर असून त्यासमोरचा जो कोण दक्षिण क्षितिजाजवळ असतो, त्या कोणस्थानीच त्रिशंकूची मुख्य तारका आहे. स्वाती आकाशमध्यावर येते तेव्हा तिच्यापासून थेट दक्षिणेस क्षितिजावर ब्रह्मा व मित्र या दोन अतितेजस्वी तारकांची जोडी दिसते. त्यातील पूर्वेकडचा तो मित्र आणि पश्चिमेकडील तो ब्रह्मा होय. हाच मित्र पृथ्वीच्या अतिशय जवळचा तारा समजावा. चित्रेच्या पूर्वेस सुमारे वीस-पंचवीस अंश अंतरावर विशा- खांच्या दोन किंवा चार तारका आहेत. जेष्ठांच्या तीन चांदण्यांची उभी रांग उगवते त्यातील मधली तीच अतितेजस्वी जेष्ठा चांदणी होय. जेष्ठांच्या पश्चि- मेस जवळच अनुराधांच्या चार तारकांची आडवी

ओळ आहे. जेष्ठांच्या आग्नेयीस 'र' अशा आकाराच्या चांदण्यांचे मूळ नक्षत्र आहे. अनुराधा हे वृश्चिकाचे मुख जेष्ठा हे त्याचा उदरभाग आणि मूळ हा पुच्छभाग अशी ही विंचवाची सुंदर आकृति दिसते. मूळाच्या शेवटच्या गोलाकृति तारकांच्या पूर्वेस पूर्वाषाढांच्या दोन किंवा चार तारका आणि त्यांच्या पूर्वेस उत्तराषाढांच्या दोन किंवा चार तारका आहेत. श्रवणाच्या तीन तारकांची तिर्कस उभी किंचित् वायव्येकडे झुकलेली अशी सरळ रांग उगवते. त्यातील मधील ती अतितेजस्वी असून तीच श्रवणाची मुख्य तारका आहे. श्रवणांच्या जवळच ईशान्येकडे सुमारे बारा चौदा अंश अंतरावर धनिष्ठा नक्षत्राचा पाच तारकांचा एक पुंज आहे. त्यातील एक अतितेजस्वी आहे. धनिष्ठा आकाशमध्याजवळ येतात, तेव्हा आकाशमध्याच्या उत्तरेस हंसमंडल असते. शततारका ही एक अगदी कमी तेजस्वी बारीक तारका आहे. पूर्वाभाद्रपदा आणि दक्षिणमत्स्य यांच्या मध्यंतरी ती आहे. ही कोणीतरी मुद्दाम एकदा दाखविल्याशिवाय लक्षांत येत नाही. पूर्वा–उत्तराभाद्रपदांच्या प्रत्येकी दोन–दोन तेजस्वी तारकांची विशाल चौकोनाकृति फारच छान दिसते. भाद्रपदात ही आकृति रात्रीच्या प्रारंभी उगवून मध्यरात्रीच्या सुमाराला आकाशमध्यावर येते, तेव्हा छान शोभते. गुजरातमध्ये या चौकोनाकृतीला 'खाटले' असे म्हणतात. रेवती ही अगदीच कमी तेजस्वी अशी बारीक चांदणी आहे. अश्विनी आकाशमध्याजवळ असते तेव्हा खस्वस्तिकापासून नैर्ऋत्येस जवळच रेवती असते. शततारकेप्रमाणेच ही रेवती कोणीतरी मुद्दाम दाखविल्याशिवाय लक्षांत येत नाही. मृगाकृतीच्या आग्नेयीस तेजस्वी व्याध आहे. व्याधाच्या दक्षिणेस सुमारे ३५ अंश अंतरावर अगस्ति असतो. अश्विनी आकाशमध्याजवळ असतात, तेव्हा त्यांच्या थेट दक्षिणेस क्षितिजावळ यमुना हा तेजस्वी तारा असतो. नक्षत्रे व अन्य तारका यांच्या दर्शनाचे हे वर्णन कितीहि लांबविता येईल. पण लेखाची मर्यादा जाणून येथेच आटोपते घेऊन पुढे जाऊ.

अति तेजस्वी तारकांचे वर्णन

माध्यान्ह मुंबई येथील

क्षेपक काल दिनार्ध

नक्षत्र नांव	कलाक–मि.	कलाक–मि.	क्रांति ×
१ यमुना (आरनार)	१९–३७	३–५०	द. ७५-२५
२ रोहिणी	२२–३३	६–२३	उ. १६–२७
३ ब्रह्महृदय	२३–१३	७–२४	उ. ४५–५ :
४ अगस्त्य (कॅनोपस)	२४–२२	४–१३	द. ५२–४१
५ आर्द्रा	२४–३५	६–२३	उ. १६–२६
६ व्याध (सीरियस)	२५–४३	५–३६	द. १६–४०
७ प्रकृति (कॅस्टर)	२५–३२	६–५०	उ. ३१.५८
८ प्रश्वा (प्रोसियन)	२५–३७	६–७	उ. ५.१९
९ पुनर्वसु (पोलक्स)	२५–४२	६–४३	उ. २८.७
१० मघा	२८–५	६–१७	उ. १२.८
११ त्रिशंकु (आलफाक्रुवस)	३०–२३	३–११	द. ६२.५४
१२ चित्रा	७–२५	५–४५	द. १०.५९
१३ ब्रह्मा (बीटासेंटारी)	८–३	३–३२	द. ६०.१२
१४ स्वाती	८-१६	६–२८	उ. १९.२२
१५ मित्र (आलफासेंटारी)	८–३९	३–२८	द. ६०.४२
१६ ज्येष्ठा	१०–२८	५–२१	द. २६.२१
१७ अभिजित् (व्हीगा)	१२–३७	७–४	उ. ३८.४५
१८ श्रवण	१३–५०	६–१२	उ. ८.४७
१९ हंस (डेनेब)	१४–४१	७-२१	उ. ४५.९
२० दक्षिणमत्स्य (फोमलहाऊट)	१६-५६	५-१४	द.२९.४९

या लेखांत एक कोष्टक दिले आहे. त्यांत नित्य परिचयांत येणारे असे वीस ठळक तेजस्वी तारे दिले आहेत. आवश्यक तेथे आपल्याकडील तारका–नांवाजवळ पाश्चात्य नांव दिले आहे. त्याच्यापुढे माध्यान्हकाल क्षेपक (तास–मिनिटे) दिले आहेत. ज्या तारखेच्या दिवशी आपण ते तारे पाहणार असू ती तारीख जानेवारीच्या प्रारंभापासून कितव्या दिवसाची आहे ते दिवस मोजावे. डिसेंबर ३१ तारखेच्या दिवशी ३६५ दिवससंख्या येईल. आपण आकाश पाहाण्याच्या तारखेपर्यंत जी दिवस संख्या येईल ती घ्यावी आणि पंधरा

दिवसांना ५९ मिनिटे (सुमारे एका दिवसाला चार मिनिटेप्रमाणे) त्या दिवसाचा काल काढावा. व तो त्या तारकेसमोर दिलेल्या क्षेपक तास मिनिटांतून वजा करावा. म्हणजे वजाबाकी तास मिनिटे उरेल तितके स्टँ. टा. प्रमाणे घड्याळात सुमारे वाजले म्हणजे ती तारका आकाशमध्यावर (माध्यान्हरेषेवर) असेल असे समजावे. रेल्वे पद्धतीने तास मिनिटे घड्याळात समजावी. रात्री बारा वाजता चौवीस तास होतात. त्यापुढे उजाडेपर्यंत २५, २६ असे तासांचे आकडें समजावे. शेवटी दिनार्ध तास–मिनिटे दिले आहे. तो तारा माध्यान्ही येण्याच्या पूर्वी तितका काल तो उगवेल आणि माध्यान्ही आल्यावर दिनार्धाइतक्या वेळाने मावळेल असे समजावे. या ताऱ्यांतील यमुना, अगस्त्य, त्रिशंकु, ब्रह्म, मित्र, वगैरे फार दक्षिणेकडे असतात. आणि ब्रह्महृदय, हंस, अभिजित् हे आकाशमध्याच्या उत्तरेकडे असतात. बाकीच्या तारकांचा सर्वसामान्य परिचय बहुधा असतोच.

आकाशदर्शनाच्या अभ्यासकास या लेखांतील माहितीमुळे अल्पसे तरी साह्य होईल असा विश्वास आहे.

(ज्योर्तिविवेक वरून)

☙ उत्तर गोलार्धात स्थानिक अक्षांशाइतके अंश खस्वस्तिकापासून दक्षिणेस विषुववृत्त असते. म्हणजे मुंबई येथे खस्वस्तिकाच्या दक्षिणेस १९ अंश विषुववृत्त असते. ताऱ्यांच्या क्रांतीनुसार ते उत्तर-दक्षिणेस विषुववृत्तापासून दूर असतात असे समजावे.

फलज्योतिष अभ्यास मंडळातर्फे झालेल्या पदवीदान प्रसंगीचें छायाचित्र



छायाचित्रांत मा. श्री. बी. डी. किल्लेदार, मेयर, समारंभाचे अध्यक्ष श्री. शंकरराव उरसळ, अध्यक्ष जि. प. पुणें, व संस्थापक श्री. श्री. अ. जकातदार दिसत आहेत.

कुंडली संग्रह


साहित्यिकांच्या कुंडल्या

" गीतरामायणासारख्या अजरामर काव्याचे जनक"

ग. दि. माडगूळकर

जन्म : १-१०-१९१९ जन्म स्थळ : शेटफळे, सांगली.

जन्मलग्न कुंडली




सुप्रसिद्ध मराठी लेखक

श्रीपाद महादेव माटे

जन्म दि. : ३१ ऑगस्ट १८८६ जन्म वेळ : स. ८ वा.

जन्मलग्न कुंडली



मराठी काव्यसृष्टीचा शुक्रतारा


आत्माराम रावजी देशपांडे

बी. ए., एलएल. बी.

जन्म : ११-९-१९०१ वेळ : रात्रौ ११-५५

जन्म स्थळ : मूर्तिजापूर (विदर्भ)

जन्मलग्न कुंडली




कौटुंबिक जिव्हाळ्याच्या सोज्वळ कथांचे

यशस्वी लेखक

य. गो. जोशी

मार्गशीर्ष शु. ७ शके १८२३

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कादंबरीकार व कथालेखक

शंकर दामोदर पेंडसे

एम. ए., पीएच. डी.

जन्म दि. : २८-२-१८९७ जन्म स्थळ : खेड, रत्नागिरी

जन्मलग्न कुंडली




मराठी काव्यसृष्टीचे सम्राट

यशवंतराव पेंढारकर

जन्म दि. : ९-३-१८९९

जन्मलग्न कुंडली



' रहस्य–जाल ' चे कुशल शिल्पकार


बाबुराव अर्नाळकर

जन्म– ९-६–१९०६

जन्मस्थळ – अर्नाळा

जन्मवेळ रात्रौ ९ वा. २७ मि.

जन्मलग्न कुंडली



धुंद करणाऱ्या शृंगारिक कथांचे सिध्दहस्त लेखक


चंद्रकांत काकोडकर

जन्म– २०–३–१९२१

वेळ– पहाटे ४–३०

जन्मस्थळ– काकोडा (गोवा)

जन्मलग्न कुंडली



साहित्य सृष्टींतील तेजस्वी तारा


श्रीपाद रघुनाथ जोशी

जन्म दि. – २३–१ १९२०

सायंकाळी ७ वाजता

जन्म ठि. कुडूत्री (राधानगरी–कोल्हापूर)

जन्मलग्न कुंडली



कौटुंबिक जिव्हाळ्याच्या अजरामर कथांचे लेखक


प, महादेवशास्त्री जोशी

जन्म– १२–१–१९०६

वेळ सकाळी ७ वाजता.

(आंबेडे गोवा)

जन्मलग्न कुंडली



शब्दसृष्टीचे परमेश्वर

ना. सी. फडके

जन्म दि.– ४–८–१८९४

आश्लेषा नक्षत्र

जन्मलग्न कुंडली




जागतिक कीर्तीचा खंदा लेखक

बर्नार्ड शॉ.

जन्म दि. २६–७–१८५६

जन्मलग्न कुंडली




भालचन्द्र म. म्भे. एम. ए.

जन्म दि. ६–११–१९२८

रात्रौ १२ वा. ५० मि. नी

जन्मलग्न कुंडली




हरि विनायक वाडेकर.

जन्म दि. ८–१०–१९१२

सुमारे ५ वाजतां (पहाटे)

जन्मलग्न कुंडली



पद्मश्री इतिहास संशोधक


म. म. दत्तो वामन पोतदार.

जन्म दि. ५–८–१८९०

श्रावण वद्य ५ शके १८१२ मंगळवार

जन्मवेळ – रात्रौ. १२ वा. ३० मि

जन्मलग्न कुंडली




हळुवार भावनांचे कुशल चित्रण !

दत्त रघुनाथ कवठेकर

जन्म दि. १८–९––१९०२

सकाळी ६ वाजतां

जन्मलग्न कुंडली




आनंद रतन यादव.

जन्म दि. ३–११–१९३५

पहाटे ५ वाजतां

जन्म लग्न कुंडली




नाटक, कादंबरीचे लेखक, नकलाकार विनोदमूर्ति

गणपति महादेव लेम्भे.

जन्म दि. ३०–८–१९२२

इष्ट घटी २ पळे ५०

जन्मलग्न कुंडली




पुरुषोत्तम गणेश मोडक

(संपादक, साप्ताहिक विनायक)

जन्म दि. ९–५–१९२९

जन्मलग्न कुंडली



अंबालाल शंकर अग्निहोत्री

जन्म १६–११–१९२३

संध्याकाळीं ५–४५ वाजतां.

जन्मलग्न कुंडली




डॉ. श्रीधर गं. केतकर

ज्ञानकोशचे संपादक

जन्म दि. ३० जानेवारी १८८४


जन्मलग्न कुंडली



श्री. ज. स. उर्फ तात्यासाहेब करंदीकर

जन्म दि. १५–२–१८७५

जन्मलग्न कुंडली




सुविद्य पदवीधर

प्रा. प्रभाकर वसंत तामणे

जन्म दि. २९–१०–१९३१

वेळ दुपारी २ वा.

जन्मलग्न कुंडली




कविवर्य माधवराव गो. काटकर

जन्म दि. २५–१५–१९१४

जन्मघटका १ पळे २

जन्मलग्न कुंडली




सिने-नाट्य कलावंत कुंडल्या

कै. मा दीनानाथ मंगेशकर

जन्म ता. २९ १२-१९००

जन्मस्थळ : मंगेशी (गोवा)

जन्मलग्न कुंडली




स्वरसम्राट

मा. कृष्णराव फुलंब्रीकर

जन्म दि.- २१-१-१८९८

जन्मलग्न कुंडली



मराठी चित्रपटसृष्टींतील सुप्रसिद्ध नट


चित्तरंजन चिंतामण कोल्हटकर

जन्म दि- १५-१-१९२३

जन्म स्थळ- अमरावती

जन्म वेळ-संध्याकाळी ४ वा.

जन्मलग्न कुंडली




संगीतभूषण

श्री. राम मराठे

जन्म दि.- २३-१०-१९२४

जन्मलग्न कुंडली




पौराणिक चित्रपसृष्टींतील सुप्रसिध्द नट

महिपालचंद भंडारी, बी. ए.

जन्म दि. २४-११-१९१९

जन्मस्थळ- जोधपूर (राजस्थान)

जन्मलग्न कुंडली




सुप्रसिद्ध मराठी दिग्दर्शक

राजा ठाकूर

जन्म दि. : २६-११-१९२३ जन्म वेळ : रा. १०-२३

जन्मस्थळ : मु. फोंडा (जि. रत्नागिरी)

जन्मलग्न कुंडली




हिंदी चित्रपटांतील

यशस्वी अभिनेत्री माला सिन्हा

जन्म : ११–११–१९३६   जन्मस्थळ : कलकत्ता

जन्मलग्न कुंडली



सुप्रसिद्ध विनोदी नट


अनंत बळवंत धुमाळ

जन्म : २९–३–१९१४

जन्मस्थळ : बडोदा

जन्मवेळ : रा. ११–३०

जन्मलग्न कुंडली




हिन्दी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय कलावंत

प्रेमनाथ, बी. ए.

जन्म : २१–११–१९२६   जन्मठिकाण : पेशावर

जन्म वेळ : पहाटे ३ वा. १५ मि.

जन्मलग्न कुंडली




यशस्वी दिग्दर्शक

गजानन जनार्दन जागीरदार, बी. ए

जन्म : २–४–१९०७   जन्म : रात्रौ १२ नं

जन्म स्थळ : उमरावती (वऱ्हाड)

जन्मलग्न कुंडली



मराठी नाटचसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री


सौ. माई भिडे

जन्म दि. :–२३–७–१९१७

जन्मवेळ :–रात्रौ २वा. २० मिनिटे

जन्मस्थळ:–पुणे.

जन्मलग्न कुंडली




संगीत कोहिनुर

गोविंद परशुराम उर्फ पंडितराव नगरकर

जन्म दि. :–२६–१२–१९१० जन्म स्थळ:–अहमदनगर

जन्मवेळ :–रात्रौ १० ते ११

जन्मलग्न कुंडली



मराठी नाट्यसृष्टीतील कुशल कर्णधार


बाबुराव गोखले.

जन्म : दि.१९–९–१९१५

जन्मस्थळ पुणें

जन्म वेळ पहाटें ५वा २मि.

जन्मलग्न कुंडली



मराठी चित्रसृष्टीतील कुशल नट


विवेक ऽ भ्यंकर

जन्म दि. २२–२–१९१८

जन्म वेळ रात्रौ १वा. ४८मि.

जन्मस्थळ अलिबाग (ठाणें)

जन्मलग्न कुंडली



मराठी चित्रसृष्टीचे ध्येयवादी दिग्दर्शक

विनायकराव कर्नाटकी उर्फ मास्टरविनायक

जन्म दि. १९–१–१९०६

जन्म वेळ रात्रौ ९ वा. १५मि.

जन्मलग्न कुंडली



संगीत नाट्यसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट

नारायणराव राजहंस (बालगंधर्व)

जन्म दि. २६–६–१८८८

जन्मलग्न कुंडली




सुप्रसिद्ध गायक व नट

सौदागर नागनाथ गोरे (छोटागंधर्व).

जन्म दि. मिती माघ व. १८३९

जन्म वेळ रात्रौ १०ते११चे दरम्यान

जन्मलग्न कुंडली




चित्रपटसृष्टीतील विद्युल्लता

श्रीमती बेबी शकुंतला

जन्म : १७–११–१९३२

जन्मलग्न कुंडली



हंसराज कोरडे

जन्म दि. : ३-९-१९१३

जन्मलग्न कुंडली




राजा परांजपे

मराठी चित्रपटसृष्टींतील यशस्वी दिग्दर्शक

जन्म दि. २०-४-१९१०

जन्मलग्न कुंडली




भारतीय चित्रसृष्टीचे किमयागार

व्ही. शांताराम

(राजकमल चित्र, मुंबई)

जन्म दि:- १८-११-१९०१

जन्मलग्न कुंडली



मराठी अभिनेत्री व गायिका


सौ. जयमाला शिलेदार

जन्म दि. : २१-८-१९२६

जन्म वेळ: सकाळी ६ वा. २० मि.

जन्मस्थळ : इंदूर

जन्मलग्न कुंडली



रंगभूमीवरील अभिनयपटु अभिनेत्री


श्रीमती शीला गुप्ते

जन्म दि. १८-११-१९३८

जन्मवेळ : सकाळी ११वा. ४५मि.

जन्मस्थळ : पुणें

जन्मलग्न कुंडली



नाटच व चित्रपटसृष्टीतील कुशल नट


शरद तळवलकर

जन्म दि. १-११-१९१८

जन्म : वेळ रात्रौ १२वाजता

जन्मस्थळ बीधेगांव (नगर)

जन्मलग्न कुंडली




'प्रपंच' सिनेमाचे दिग्दर्शक व सुवर्णपदविजेते

श्री. मधुकर पाठक

B. Sc.

जन्म दि. १८–११–१९२५

जन्मलग्न कुंडली



कै. मिराशीबुवा

जन्म दि. ३ नोव्हेंबर १८८३

जन्मलग्न कुंडली



श्री. भीमसेन जोशी

१३–१४ जानेवारी १९२२


जन्मलग्न कुंडली



श्री. विनायकबुवा पटवर्धन.

जन्म– २१–२२ जुलै १८९८


जन्मलग्न कुंडली



श्री. व्हॅन शिप्ले

जन्म दि. ३०–८–१९२७ सकाळी ८॥ वाजता


जन्मलग्न कुंडली



कै. दत्तात्रय विष्णु पलुस्कर

जन्म २८–५–१९२१


जन्मलग्न कुंडली



नाट्यरत्न **श्रीपाद गोविंद नेवरेकर**

जन्म ३-७-१९१२


जन्मलग्न कुंडली



श्री. अमृत विनायक हळदणकर

जन्म :-- १८-१२-१९२६


जन्मलग्न कुंडली



श्रीमती केसरबाई केरकर

जन्म दि. १३-७-१८९२

जन्मलग्न कुंडली




सुप्रसिद्ध भजनी मंडळांचे पुरस्कर्ते

मनोहर ना. सबनीस

जन्म दि. २१-१०-१९२४

सुमारे दुपारी ३ वाजता

जन्मलग्न कुंडली




सावंतवाडी संस्थानचे दरबार गवई

श्री. रामचंद्र ब. मोडक

जन्म दि :-- २३-८-१९०१ सकाळी ६ वा. ३० मि.नी

जन्मलग्न कुंडली




स्वरसम्राज्ञी--**लता मंगेशकर**

जन्म दि. २८-९-१९२९ जन्म वेळ रात्री ९।३३

स्थळ--इंदूर

जन्मलग्न कुंडली




सामाजिक नेते

थोर देशभक्त व वीराग्रणी

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

जन्म : २३ जुलै १८५६

जन्मलग्न कुंडली




हिंदू संस्कृतीसाठी त्याग करणारे

परम पू. मा. स. गोळवलकर गुरुजी

जन्म : १९-२-१९०६ नागपूर, पहाटे ४ वा. ३४ मि.

जन्मलग्न कुंडली




देशासाठी ज्यांनी चौदा वर्षे अंदमानात जन्मठेप भोगली ते

स्वातंत्र्यवीर बॅ. तात्यासाहेब सावरकर

जन्म : वैशाख कृ. ६ शके १८०५ ता. २८-५ १८८३

रात्रौ ८ वा. ६ मि.

जन्मलग्न कुंडली




आझाद हिंद सेनेचे संस्थापक व शूर देशभक्त

नेताजी सुभाषचंद्र बोस

पौष व. ५ शके १८१८

वेळ : रवि उदयापूर्वी ५ घ.८प. जन्म : दि.२३-१-१८९७

जन्मलग्न कुंडली




सत्य-अहिंसेचे पुजारी आणि दलितांचे कैवारी

महात्मा गांधी

जन्म : २ ऑक्टोबर १८६९, जन्मवेळ : ७ वा. ३६ मि.

जन्मलग्न कुंडली




गीताईचे लेखक आणि भूदानाचे पूजक

पू. विनोबाजी भावे

जन्म : ११-९-१८९५

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रांतील थोर समाजसेवक व स्त्रियांचे कैवारी

कै. धोंडो केशव कर्वे

जन्म : ता. १८-४-१८५८

जन्मलग्न कुंडली



महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध स. कार्यकर्ते

श्री. एस्. एम्. जोशी

जन्म : १२-११-१९०४

जन्मलग्न कुंडली




पुण्यांतील सुप्रसिद्ध कार्यकर्ते

कै. न. वि. गाडगीळ

जन्म : १० जानेवारी १८९६

जन्मलग्न कुंडली




बेळगांवमधील सुप्रसिद्ध कार्यकर्ते

श्री. बा. रं. सुंठणकर

जन्म : १७ फेब्रुवारी १९०८

जन्मवेळ : सायं. ६ वा. २० जन्मस्थळ : बेळगाव

जन्मलग्न कुंडली



स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्राध्यक्ष

कै. बाबू राजेंद्रप्रसाद

जन्म : ३ डिसेंबर १८८४

जन्मलग्न कुंडली




बेळगांवमधील सुप्रसिद्ध लेखक व देशभक्त

श्री. पुंडलीकजी कातगडे

जन्म : १२-६-१८९५ जन्मवेळ : दु. १२ वा. २५

स्थळ : --मिरज

जन्मलग्न कुंडली



गायनांतील जाणकार व शौकीन

श्री. आबासाहेब मुजुमदार

जन्म दि. : –१–२–१८८६

जमस्थळ :–भावनगर (काठेवाड)

जन्मलग्न कुंडली




भारतांतील त्यागी व झुजार देशभक्त

सेनापति बापट

जन्म दि. १२–११–१८८०

सकाळी १० वाजतां

जन्मलग्न कुंडली




श्री. के. टी. गिरमे

उपसभापति (महाराष्ट्रराज्य)

जन्म : १९ ऑगस्ट १९२१

जन्मलग्न कुंडली




श्री. शंकरराव उरसळ

(अध्यक्ष जिल्हा परिषद पुणे)

जन्म : १० सप्टेंबर १९२५

वेळ : सकाळी ९ वा. ३५ मि.

जन्मलग्न कुंडली




श्री. मुकुटराव काकडे

(सोमेश्वर शु. सहकारी फॅक्टरीचे डायरेक्टर)

जन्म : ३ मे १९१४

वेळ :–रात्री २ वा. ४६ मि.

जन्मलग्न कुंडली




श्री. रामचंद्र काशिनाथ म्हाळगी

जन्म : ९ जुलै १९२१

जन्मवेळ : सूर्योदय–मघानक्षत्र चतुर्थ चरण

जन्मस्थळ : –कडूस (जि. पुणे)




चाळीसगांवचे सुप्रसिद्ध काँग्रेस कार्यकर्ते

श्री. सखाराम गो. शेंदुर्णीकर (वकील)

जन्म २८-४-१८९१ रात्रौ १२ वा. २ मि. नी


जन्मलग्न कुंडली



हुतात्मा शिवराम हरि राजगुरु

जन्म दि. २४-८-१९०८


जन्मलग्न कुंडली



क्रां. ग. दा. तथा बाबाराव सावरकर

दिः- १३-६-१८७९


जन्मलग्न कुंडली



कै. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर

जन्म दि. २५-८-१८७२

जन्मलग्न कुंडली




डॉ. ना. दा. सावरकर

वैशाख कृ. १५ शके १८१०

सन. १८८८

जन्मलग्न कुंडली




श्री. हरिभाऊ पाटसकर

(भूतपूर्व कायदा मंत्री, राज्यपाल)

जन्म दि. १५-५-१८९२

जन्मलग्न कुंडली




काँग्रेसचे माजी अध्यक्ष

श्री. कामराज नाडर

जन्म दि. १५-७-१९०३

जन्मलग्न कुंडली




ना. श्री. गुलझारीलाल नंदा

(भूतपूर्व गृहमंत्री)

जन्म दि. ४ जुलै १८९८

वेळ-मध्यरात्रीनंतर

जन्मलग्न कुंडली




भारताचे माजी परराष्ट्रमंत्री

ना. कृष्णमेनन

जन्म दि. ३ **मे** १८९६


जन्मलग्न कुंडली



कै. स. गो. बर्वे

जन्म दि. २७-४-१९१४ दुपारी ३ वाजता

जन्मलग्न कुंडली




श्रीमती विजयालक्ष्मी पंडित

जन्म दि. १८-८-१९००

वेळ सकाळी ६ वा. ५० मि. नी.

जन्मलग्न कुंडली




जोसेफ स्टॅलिन (रशिया)

जन्म दि. १ जानेवारी १८८०

पहाटे ३ वा ५ मि.नी

जन्मलग्न कुंडली




इंग्लंडचे भूतपूर्व मुख्यप्रधान

विन्स्टन चर्चिल

जन्म दि. २९–११–१८७४

जन्मलग्न कुंडली




सिनार मुसोलिनी

जन्म दि. २९–७–१८८३

दुपारी २ वाजता


जन्मलग्न कुंडली



चॅन्ग कै–शेक (चीन)

जन्म दि. ३०–१०–१८८५


जन्मलग्न कुंडली



छत्रपती शिवाजी महाराज

जन्मसाल १६२७


जन्मलग्न कुंडली



कै. डॉ. वि. म. जोशी, एम्. बी. बी. एस्. हैद्राबादचे सुप्रसिद्ध डॉ: जोशी यांचे नांव त्या भागात सर्वांना परिचित आहे. यांचे घराणे मोठे, मुले सुविद्य कर्तृत्ववान, कीर्ती प्राप्त केली.

जन्म दि. २४–१०–१८९२


जन्मलग्न कुंडली



कॉंग्रेस स्थापनेची कुंडली.

स्थापना:– २८ डिसेंबर १८८५

वेळ:– दुपारी १२ वाजता



संपादकीय कुंडल्या



श्री. ह. रा. महाजनी

संपादक दै. लोकसत्ता (मुंबई)

धडाडीचे यशस्वी पत्रकार, निर्भीड टीकाकार आणि साहित्य व राजकारण यातील श्रेष्ठ जाणकार.

जन्म दि. १-६-१९०७

राशी कुंडली



卐

डॉ. ना. भि. परुळेकर


एम्. ए. पी. एच्. डी.

संपादक दै. सकाळ (पुणें)

धडाडी, कल्पकता आणि आत्मविश्वास यांचा त्रिवेणी संगम जेथे आढळतो ते स्वतंत्र बाण्याचे शाश्वत. समाज कल्याणाची आवड बाळगणारे दै. सकाळचे बहुजनप्रिय संपादक

जन्म दि. ३ जून १८९७

जन्मलग्न कुंडली



卐






आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

संपादक दै. मराठा, (मुंबई)
राजकीय सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात ताऱ्याप्रमाणे चमकणारे झुंजार पत्रकार, प्रभावी वक्ते आणि सव्यसाची लेखक

जन्म दि. १३ ऑगस्ट १८९८
वेळ:– ७ वा. ५० मि.

जन्मलग्न कुंडली



卐

卐


श्री. जयवंतराव टिळक

बी. एस्सी. (ऑनर्स)

"गोवा मुक्ति संग्राम" आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत स्वतःच्या खणखणीत आवाजानें आणि तेजस्वी विचाराने ज्यांनी लो. टिळकांची स्मृति करून दिली ते "केसरीचे ध्येयनिष्ठ संपादक"

जन्म दि. १२–१०–१९२१

जन्मलग्न कुंडली





श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

संपादक दै. तरूणभारत,


नागपूर.

महाराष्ट्राची एक पिढी ज्यांच्या ललित वाङ्‌मयाने पोसली ते जेष्ठ नि श्रेष्ठ पत्रकार

जन्म दि. २८ डिसेंबर १८९९

जन्म—सूर्योदयात.

जन्मलग्न कुंडली




श्री. अनंतराव पाटील

संपादक दै. विशाल सह्याद्रि, पुणें

पुण्यासारख्या शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय व बौद्धिक क्षेत्रांत कॉंग्रेसचा वैचारिक ध्वज फडकवीत ठेवणारे लोकसभेतील खासदार प्रतिथयश पत्रकार

जन्म दि. २२–११–१९२१

जन्मलग्न कुंडली



हंसचे संपादक

कै. अनंत अंतरकर


यांची अप्रकाशित कुंडली

हंस—मोहिनी व नवल या त्रैमासिकाने महाराष्ट्रातील वाङ्‌मय शौकीनांना अलौकिक आनंदाचा लाभ देणारे

जन्म दि. १–१२—१९११ जमखिंडी

सू. गत्‌घटी २ पळे २२

जन्मलग्न कुंडली




श्री. च. प. भिशिकर

दै. तरुणभारत संपादक

अत्यंत ध्येय निष्ठ स्वाभिमानी व महत्वाकांक्षी पण तितकेच प्रेमळ अंतकरणाचे तळमळीचे पत्रकार

जन्म दि. ९–८–१९१५

जन्मलग्न कुंडली




श्री. वा. रा. कोठारी

दै. प्रभात संपादक, एक सव्यसाची पत्रकार

जन्म दि. १२–९–१८९२ मध्यरात्री

जन्मलग्न कुंडली




साधू संतांच्या कुंडल्या

रामकृष्ण परमहंस



जन्मलग्न कुंडली



नित्यवंद्य परमपूज्य स्वामी रामकृष्ण परमहंस

जन्म १८ फेब्रुवारी १८३६


जन्म वेळ सकाळी ६।२३ मि.

अक्षांशः- उ. रेखांश- २२-५३ पू. रेखांश- ८७-४४

श्री शंकराचार्य कल्याणसेवक महाराज

जन्म २८–१–१९०९
वेळः– संध्याकाळी ६।३५ ते ६।४५
स्थळः– कटगुण (कोपरगांवचे पूर्वेस
११ मै. जि. सातारा)

जन्मलग्न कुंडली




डॉ. कुर्तकोटी, श्री शंकराचार्य

जन्म दि. २०।५।१८७९

वेळः— सकाळी ८ वा. १० मि.नी.


जन्मलग्न कुंडली



श्री मद्‌जगद्‌गुरु शंकराचार्य, संकेश्वर

स्वामी शिरोळकर महाराज.
जन्म दि. ९–३–१८७५


जन्मलग्न कुंडली



आद्यशंकराचार्य

शालिवाहन शके ७१०
मिती वैशाख शु।। १० दोन प्रहरी


जन्मलग्न कुंडली



श्री शंकराचार्य वाडीकरशास्त्री

जन्म ठि. नरसोबाची वाडी
मिती भाद्रपद शु।। ७ शके १८१८
सकळी ८ वा. २० मि.

जन्मलग्न कुंडली



दत्त उपासक

श्री. बापूसाहेब मिटकर

जन्म : १४–१–१९११
जन्मवेळ दुपारी १२ वा. वक्री

जन्मलग्न कुंडली



पूजनीय महायोगी स्वामी विवेकानंद


जन्म १२ जानेवारी १८६३

जन्म वेळ. सकाळी ६।३३ (स्थानिक)

जन्मस्थळ. कलकत्ता

अक्षांश. उ. २२-२३. पू. ८८-२१.

जन्मलग्न कुंडली




शक्तियोगी वामनराव गुळवणी महाराज.

जन्म २० डिसेंबर १८८६.

जन्म वेळ रात्रौ ८ ते ८॥

जन्मलग्न कुंडली




श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामीमहाराज

शके १७७६ श्रावण व. ५ रविवार

दि. १३-८-१८५४

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध संत छत्रपती शिवाजीचे गुरु

समर्थ रामदासस्वामी

जन्म— चैत्र शु. ९ शके १५३०

जन्म वेळ. दुपारी २ वाजता

जन्मलग्न कुंडली




श्री. मेहेरबाबा

दि:— २५-२-१८९४

पहाटे— ४ वा. ३० मि.

जन्म स्थळ— पुणें


जन्मलग्न कुंडली



श्री. अक्कलकोटचे स्वामी

जन्म चैत्र शु. २ शके १०७१

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रातील प्रसिद्ध संत, तुकारामगाथेचे जनक

श्री. संत तुकाराम

जन्मकाळ. शके १४९४ माघ शु।। ५

लग्न अंश–६।२।३५

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रातील जनतेचे श्रद्धास्थान झालेले

नारायण महाराज केडगांवकर

जन्मः– २० मे १८८५

जन्मलग्न कुंडली




स्वामी रामतीर्थ

जन्म दि. १५।१०।१८७३

सू. ग. घटी २२ पळे १५

मृत्यू - १७।१० १९०६


जन्मलग्न कुंडली



भास्करानंद परमहंस महाराज

जन्म दि. १० जून १९०१

जन्मलग्न कुंडली




स्वामी श्रद्धानंद

मिती फाल्गुन शु।। ३ शके १७७७

जन्म दि. ९।३।१५७६

जन्मलग्न कुंडली




प. श्री. दा सातवळेकर

जन्म दि. १९।१।१८६७

दुपारी १२ वा. ३० मि.नी

कोलगांवी (रत्नागिरी)

जन्मलग्न कुंडली




धनीक लोकांच्या कुंडल्या

सांगलीचे गजानन मिलचे मालक

श्री. दादासाहेब (धनी) वेलणकर

जन्म :– ६–१–१८८७

जन्मलग्न कुंडली




श्रीमंत दानशूर चंद्रशेखर आगाशे

संस्थापक बृहन महाराष्ट्र शुगर सिंडीकेट

मिती फाल्गुन शुद्ध ३, शके १८०९

जन्मलग्न कुंडली






साठे बंधु बिस्कीट कारखान्याचे मालक

श्री. गणेश रामचंद्र साठे

जन्म– ११ सप्टेंबर १८९९

जन्मलग्न कुंडली




श्री. बाळकृष्ण महादेव गोगटे

जन्म– १६ सप्टेंबर १९१६

जन्मस्थळ – कऱ्हाड


जन्मलग्न कुंडली



श्री. जयरामभाई डाह्याभाई चौहान (बिटको)

जन्म दि. १४–३–१९०४

जन्मलग्न कुंडली




कलाकारांच्या कुंडल्या

श्री. रणजित केशव बुधकर

जन्म दि. ९–६–१९२१

रात्री ११ । ४५ मि.नी

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध जादुगार

श्री. द. ना. कुलकर्णी उर्फ के. दत्ता

जन्म दि. ७–११–१९३४

जन्म वेळ. स. ६।। वा   जन्म ठिकाण–करमाळा

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नकलाकार

सदानंद जोशी

जन्म दि. १६–७–१९२३

जन्म वेळ:– २ वा. ११ मि.

जन्मलग्न कुंडली




महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध नकलाकार

श्री. गो. बि. मोंडे

जन्म. ३१ ऑक्टोबर १८८१

जन्मलग्न कुंडली



ज्योतिर्विदांच्या कुंडल्या

पं. न. प. महाजन


ज्योतिषविशारद, ज्योतिषालंकार.

मिती माघ व ॥ १ शके १८२६

सोमवार २० फेब्रुवारी १९०५

वेळ- दुपारी १ वाजून ३० मि.नी

जन्मलग्न कुंडली




होराभूषण

कै. ग. प्र. दिक्षीत

दि. ४ एप्रिल १८८६

जन्मलग्न कुंडली




ज्योतिषाचार्य पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन

मिती पौष शु. ८ शके १८१४

सायंकाळी ७ वा. ४ मि.


जन्मलग्न कुंडली



ज्यो. वल्लभ द. अवचट ऊर्फ सवाई म्हापणकर

जन्म दि : १८ जून १९०५

जन्मलग्न कुंडली




सायनाचार्य श्रीधर गोविंद जोशी

जन्मसाल- ९ मार्च १९०६

स्थळ : एरंडोली (सांगली)

वेळ:- पहाटे ४ वा. मघा नक्षत्र प्रथम चरण

जन्मलग्न कुंडली




वे: मू. तीर्थानंद केशव दिक्षीत

जन्म दि. २६-११-१९३३

जन्मवेळ: रात्री ८ वा. १५ मि.

जन्म गाव- बागलकोट (विजापूर)

जन्मलग्न कुंडली




ह वि. जोशी

जन्म- २६।१।१९१२

वेळ- सकाळी ७ वा.

स्थळ- अनगोळ बेळगांव

जन्मलग्न कुंडली




श्री. ज. द कळमणकर

होराभूषण

जन्म- शके १८४४ पौष कृष्णपक्ष ।।५।।

जन्मलग्न कुंडली



श्री. के. सी. मोडकशास्त्री


पॉमिस्ट ॲन्ड ॲस्ट्रॉलॉजर

जन्म दि. ५-१०-१९०९

वेळ- सकाळी १० वा. ५२ मि.

स्थळ- मुंबई

जन्मलग्न कुंडली




डॉ. शंकरराव गोपाळ पुरंदरे

जन्म दि. २८-५-१९१५

वेळ- रात्रौ २ वा. ४० मि.


जन्मलग्न कुंडली



श्रीमती वेणुताई म्हसकर

जन्म. १९०८

जन्मलग्न कुंडली




श्री. महादेव गोपाळ गोडबोले

जन्म दि. १८ सप्टेंबर १९०३

भाद्रपद कृष्ण १२ शुक्रवार सूर्योदयी


जन्मलग्न कुंडली



श्री. प्रभाकर विनायक अत्रे

जन्म दि. १५ ऑक्टोंबर १९३६
वेळ– पहाटे ४ वा. ४५ मि.


जन्मलग्न कुंडली



ज्योतिषी वसंत लाडोबा म्हापणकर

जन्म दि. : १३ ऑगस्ट १९०७
वेळ सकाळी १० ते १०॥ चे दरम्यान
स्थळ– मालवण देऊळवाडा


जन्मलग्न कुंडली



श्री. यशवंत केशव प्रधान

तारीख– ४ एप्रिल १८८६

जन्मलग्न कुंडली



श्री. गो. बा. राजकोंडावार

जन्म दि. ४–११–१९३६
सकाळी ११वा. ५मि.

जन्मलग्न कुंडली




श्री. या. रं. कुलकर्णी

(सिव्हिल जज्ज)

जन्म दि. १–३–१९२६
वेळ–– रात्रौ ८ वा ३९ मि.


जन्मलग्न कुंडली



श्री. सावळाराम ना इनामदार. B.E.Civil

जन्म : १ ऑगस्ट १९२७
वेळ ––रात्री २–३० वा.


जन्मलग्न कुंडली



अपघाती मृत्यू (ॲक्सिडेंट) झालेल्या व्यक्तींच्या कुंडल्या


जन्म दि. २३।८।१९३६
दि. २३।५।१९५८ ट्रकखाली सायं. ६॥ वा. ऑक्सिडेंट होऊन मृत्यू.
दुसऱ्या दिवशी सख्या बहिणीचे लग्न.

जन्मलग्न कुंडली




जन्म दि. २४।१०।१९३५
वे. ४ सकाळी ८ वा. ०५ मि. नी.
विवाह ५।१।१९६५ ला सकाळी
रात्री २॥ वाजता ट्रकच्या धक्क्याने मृत्यू

जन्मलग्न कुंडली




जन्म दि. १।९।१९३५
रात्री ९ वाजता.
२३।८।१९५८ ला बॉम्ब स्फोटात
एकाएकी मृत्यू

जन्मलग्न कुंडली




जन्म दि. ६।६।१९४५
पहाटे ४ वा. १८ मि.
प्रवासात मोटारचे धक्क्याने मृत्यू
दि. १२।४।१९६७ ला

जन्मलग्न कुंडली




जन्म दि. ९।६।१९४४
सकाळी ९ वा. २५ मि.
११।२।१९६० दुपारी ४ वाजता
रेल्वेखाली पडून मृत्यू

जन्मलग्न कुंडली



जन्म दि. २२।१२।१९१५ वेळ पहाटे ५वा. ४० मि
दि. १९।११।१९६२ ला ट्रकच्या धक्क्याने मृत्यू
५। वाजता संध्याकाळी

जन्मलग्न कुंडली



न्यायरत्न केवल अवधूत डॉ. धुंडिराज शास्त्री विनोद यांच्या कुंडलीचे विवरण





जन्म– दि. १२ जानेवारी १९०२ (शके १८२३ पौष शुक्लपक्ष तृतीया)


वार– रविवार.

जन्मस्थळ : मु. केतकीबन श्रीक्षेत्र सिद्धाश्रम (अलिबाग नजीक) ता. अलिबाग, जि. कुलाबा


जन्मवेळ : सुमारे १०–१५ (रात्रौ समयी)

अयनांश– २२-२९–२०. स्पष्ट लग्न १–४०.

जन्मलग्न कुंडली



नवमांश कुंडली



जन्म कुंडलीचे विवरण :

अध्यात्म महर्षि केवल अवधूत विश्वशान्ति सचीव-न्यायरत्न दर्शनालंकार, महाराष्ट्राचे सिद्धसंत, मंत्रविद्या. व तंत्रशास्त्राचे महान अधिकारी, गणितज्ञ, योगविद्येचे प्राप्तपुरुष आणि कितीतरी विद्यांचे माहेरघर ! किती असंख्य गुणांचा ठेवा आहे हा !

या थोर विभूतीचा जन्म मु. केतकीं ता. अलिबाग जि. कुलाबा या ठिकाणी १२ जाने. १९०२ रोजी रात्री सु. १०-१५ वाजता झाला.

केवल अवधूत यांची जन्मकथा फार विलक्षण आहे. त्यांच्या मातुश्रीचे ते एकमात्र पुत्र होत. त्यांच्या कोकणातील घरी म्हणजे अलिबाग जवळील पेटांबे येथे एका मध्यान्हीचे समयी कोणी एक सिद्ध पुरुष भिक्षेकरी वेषाने दारी आला व त्याने भोजनाची इच्छा प्रकट केली. त्याप्रमाणे यांच्या मातोश्रीने त्यांचा यथोचित सत्कार करून त्यास यथासांग भोजन दिले या ठिकाणी त्यांच्या मातुश्री बद्दलही चार शब्द लिहिणेही उचितच ठरेल ! त्यांनी स्वत: वेदपठण केले होते तसेच त्यांचे वडीलही दशग्रंथी ब्राम्हण असून त्यांनी स्वत:च्या मुलीला ७ वर्षे वेदपाठ दिले होते. त्यांची वेदशाळा संबंध महाराष्ट्रभर प्रसिद्ध होती. सौ. लक्ष्मीबाई यांचेकडून वैदिक मंत्राची संथा घेतलेले. कांही ब्राम्हण आजही हयात असतील.

या श्रेष्ठ साध्वीला पुत्र नसल्याने व वयही बरेच झाल्यामुळे मनाला एक प्रकारची खिन्नता आली होती. ही त्यांची मनोव्यथा जाणून त्या सिद्ध पुरुषाने म्हटले, " मुली तुझ्या नशीबी पुत्र नाही, मंत्र देह धारण करून आदिनाथ तुझ्या ठायी अवतरतील " एवढे सांगून ते सिद्ध पुरुष जाऊ लागले तेंव्हा नम्रतेने व कृतज्ञता बुद्धीने मातुश्रींनी विचारले की, महाराज, आपण पुन्हा कधी दर्शन देणार ! कारण पुत्र झाल्यावर त्याला आपल्या चरणावर घालावयाची माझी इच्छा आहे, यावर सिद्ध म्हणाले.

मी पुन्हा येणार नाही या शब्दाने मातुश्री व्यथित झाल्या व तशाच त्यांचे चरण धरून बसल्या. तेव्हा सिद्ध स्मित करून म्हणाले ' मी ' येथून गेल्यानंतरच ना पुन्हा येणार ? पण मी येथून जाईन तेव्हा ना ? इतके बोलून त्यांच्या घराच्या बाजूला केतकीचे दाट बन आहे



श्रीक्षेत्रसिद्धाश्रम (गुरुदेवांची जन्मभूमी)
केतकीबन–ता. अलिबाग
(जि. कुलाबा)



म. म. द. वा. पोतदार
कुलगुरु (पुणे विद्यापीठ) व
महर्षिविनोद एका सांस्कृतिक
समारंभ प्रसंगी भाषण

त्या वनांत ते गुप्त झाले. व पुढे सिद्धाच्या आशिर्वादा प्रमाणे पुढील पौष शुद्ध चतुर्थीला त्यांना पुत्ररत्नाचा लाभ झाला.

तेच आपले डॉ. जगद्गुरु महर्षि धुंडिराज शास्त्री उर्फ आप्पासाहेब विनोद होत.

महर्षि डॉ विनोद यांचे लग्न कन्या असून रास कुंभ आहे. ही शास्त्रीय रास समजली जाते. कुंभ व्यक्ति अति खोल विचार करणारी, शास्त्राचा शोध लावणारी अगर शास्त्रामध्ये पारंगत कुंभ- राशीच्या व्यक्तिना गुरु' गुप्त-विद्ये विषयी नैसर्गिकच अति आकर्षण असते.

पूज्य डॉ. विनोद यांच्या जीवनाकडे दृष्टीक्षेप टाकता महत्त्वाची गोष्ट नजरेस येते की त्यांनी मंत्रतंत्रादी गूढ विद्येच्या संशोधनासाठी व प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी हिमालयातील जम्नोत्री गंगोत्री, तुंगनाथ, केदारनाथ, बद्रीनाथ व इतर हिमालयातील अनेकानेक गुहातील ठिकाणी संचार केला आहे. मंत्र



न्यायरत्नविनोद व सौ. मैत्रीयी विनोद विवाहकाली



प्रो. विनोद गुप्ततऱ्हेने ईस्ट बर्लिन-मध्ये गेले होते तेथील एक समारंभ (१९५५)




अमेरिका व केनडा यांच्या सीमारेषेवरील नायगरा या विख्यात जलप्रपातासमोर डॉ. विनोद-१९५२

मंत्र शास्त्र तिबेट प्रान्ता इतके कुठेही पूर्णावस्थेला गेलेले बहुधा नसावे म्हणून डॉ. विनोद मुद्दाम मंत्रशास्त्राच्या अध्ययनासाठी व संशोधनासाठी तिबेटमध्यही गेले होते.

प. पू. वंदनीय डॉ विनोद यांच्या कुंडलीत पंचमामध्ये लग्नेश बुध, मंगळ गुरुने युक्त आहे. बुध ५।। अंशावर असून गुरु बरोबर त्याचे मागे असल्याने बुध बलिष्ट झाला आहे. पंचमातील मंगळ हा उच्च राशीचा, मकरेचा आहे. त्यांमुळे यांचा अध्यात्मिक विजयाची सर्वांवर छाप पडते. तो मंगळ गुप्त व गुढ विद्येस अनुकूल आहे. पंचमाच्या पंचमाध्ये वृषभ राशी असून त्याचा स्वामी शुक्र हा कुंभ राशीत चंद्राबरोबर दिसून येतो व गुरुमहाराज त्यावर द्वितीय दृष्टीने पहात आहेत. व शुक्र अत्यंत बलिष्ठ होण्यास सहाय्यभूत ठरले आहेत. लग्न म्हणजे शरीर. यांचे लग्न कन्या असून लग्नेश पंचमात शुभ स्थानात गुरु मंगळाने युक्त आहे. नैसर्गिक कुंडलीत लग्नेशमंगळ असून भाग्येश गुरु आहे. या पत्रिकेमध्ये मंगळ गुरुने लग्नेश युक्त असून लग्नावर दशम दृष्टीने शनि पहातो. त्याचप्रमाणे शनि हा कुंभ राशीचा स्वामी आहे. शिवाय कुंभ ही त्याची मूलत्रिकोण राशी बलिष्ठ आहे. शनि हा महा सन्याशी आहे. त्यामुळे त्यांना सन्यस्तवृत्ती स्वभावत: उत्पन्न झाली आहे. मंत्र देह लाभल्यामुळे त्यांना षड्विकार तीव्रतेने स्पर्शू शकत नाहीत.

महर्षिच्या पत्रिकेत पंचमांत मकर राशी असून त्याचा स्वामी शनि चतुर्थात गुरुच्या अन्योन्य योगांत आहे. हा गुरु शनिचा केंद्र त्रिकोण योग म्हणजे पंचम (विद्या, गूढविद्या, मंत्र तंत्र इ.) व चतुर्थ या शुभ स्थानातून झाल्याने अत्यंत बलिष्ट झालेले आहे. त्याच प्रमाणे चतुर्थस्थान हे ऐतिहासिक व प्राचीनतम गोष्टींशी संबंधित असल्याने महर्षिना हिमालयात व तिबेटमध्ये मंत्र तंत्र विद्येचा सखोल अभ्यास करून प्राचीन गूढ विद्येतील अनेक रहस्ये सहजगत्या हस्तगत करण्याचा योग आला व या योगामुळे त्यांना केवल अवधूत ही पदवी प्राप्त झाली.


वेदान्त व उपनिषिदे यांचे अध्ययन करणाऱ्या शास्त्री



१९३७ साली वर्धा येथे महात्मागांधींच्या आश्रमात डॉ विनोद, कृपलानी, वल्लभभाई पटेल



न्यायरत्न (मध्ये) ज्यायही (लेखिका)
बॅलॉकोव्हिच(जगप्रसिद्ध व्हायोलिनवादक)



न्यायरत्न डॉ. विनोद कै. डॉ. राजेंद्रप्रसाद
यांच्या बरोबर अध्यात्मिक ग्रंथावर चर्चा
करीत आहेत.

पंडितांच्या पत्रिकेत शनि गुरु बलिष्ट असून पंचमस्थान व चतुर्थस्थान जोरदार असते परंतु या योगामुळे त्यांना त्यातील रहस्याचे आकलन होईलच असे नाही. त्यासाठी पत्रिकेत चतुर्थस्थान, पंचमस्थान व दशमस्थान (वेदान्त, संन्यास व ज्ञान) व शास्त्रीय राशी बलिष्ठ असाव्या लागतात. याचे मूर्तिमंत उदा. म्हणजे न्यायरत्न विनोद होय. यांच्या पत्रिकेत चतुर्थ, पंचम शनि गुरु दशमेश व शास्त्रीय रास कुंभ या सर्व गोष्टी या करिता अनुकूल आहेत. त्यामुळे संपूर्ण षड्दर्शने व त्यांच्या शहस्त्रावधि सूत्राचा महर्षिचा सखोल अभ्यास झालेला असून त्यातील रहस्य ते सहजगत्या उलगडून दाखवतात या विसाव्या शतकांत अणुयूगामुळे उत्पन्न झालेल्या विचित्र आर्थिक, मानसिक, सामाजिक व राजकिय परिस्थितीत विशाल बूद्धीचे अधिकारी पुरुष निरनिराळचा शास्त्रांच्या मार्गं लागल्यामुळे षड्शास्त्रांचे सखोल अध्ययन करू शकत नाहींत. या अवनतीच्या काळामध्ये डॉ. विनोद यांनी ऋग्वेदातील सर्व ऋचांचे व दार्शनिक सूत्राचे सखोल अध्ययन केले आहे सहाही दर्शनांच्या सर्व मूल सूत्रांची उपस्थिती असलेल्या व्यक्ति भारतात दहापांच तरी असतील काय? यांच्या पत्रिकेत चतुर्थ पंचम ही विद्येची स्थाने रवि, शनि. बुध, मंगळ, गुरुनी युक्त असल्याने अति बलिष्ट झाली आहेत.

षष्ठचस्थानी चंद्र शुक्र एकत्र असता कन्या लग्नाला महान वैभव देतात. कारण कन्या लग्नाला भाग्येश शुक्र हा वैभवदायी आहे. षष्ठातील शुक्र चतुर्थ दृष्टीने भाग्यावर बघतो. शुक्राची चतुर्थ दृष्टी ही तीन चतुर्थांश असून ती न्या. महर्षि विनोदाच्या कन्या लग्नाला चांगले फल देते. त्या प्रमाणे षष्ठातील चंद्र हा चतुर्थ दृष्टीने आपल्या उच्चराशीवर भाग्यस्थानी बघून भाग्याची वृद्धी करतो. शिवाय राशीवर भाग्यस्थानीं पंचमातील गुरु द्वितीय दृष्टीने चंद्र शुक्र युतीस बलिष्ठ करीत आहे. त्यामुळे भाग्यावर गुरु, चंद्र, शुक्र हे तीन शुभग्रह पहात असून सर्व तऱ्हेने भाग्याची वृद्धी करीत आहेत.

श्लोक:—


> भाग्यप्रभाव गुरुधर्म तपः शुभानि।
> संचित येन्नवम देव पुरोहिताभ्यम्।
> भाग्येश देव सचिवौ शुभवर्गयातो।
> भाग्ये शुभग्रहयुते समुपैति भाग्यम्।

अर्थ:—


भाग्य, शक्ति, गुरु, धर्म, शभ कार्ये यांचा विचार नवमस्थान व गुरु या वरून करावा लग्नेश व गुरु हे शुभवर्गी असून भाग्यांत शुभग्रह असेल तर भाग्यवान होतो.



टोकियो (जपान) येथील सुभाष बोस मंदिरांत न्यायरत्नांचा सत्कार त्यांच्या मांडीवर सुभाष बोसांच्या अस्थींचा करंडक आहे (१९५४)



पूज्य महात्माजी न्यायरत्नांना मोटारीत चढण्याबद्दल सांगत आहेत. (१९४२)



शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रामन व प्रो. विनोद

श्लोक:—

सौम्यस्वामियुतेक्षित नवमभं भाग्यप्रदं प्राणिनाम् ।
तद्राशीरा समेतराशिरमणी भाग्य कर्ता भवेत् ।
भाग्येश: परिपाचको भवति तत्पुत्रेश्वरो बोधक ।
स्तुग स्वक्षंगृहोपगा यदि चिरं भाग्य प्रकुर्वतिते ।

अर्थ : नवमांत शुभ ग्रह किंवा त्याचा स्वामी असेल किंवा त्याची नवमावर दृष्टी असेल तर चांगले भाग्य प्राप्त होते. नवमेश ज्या राशीत असेल त्या राशीचा स्वामी भाग्योत्पादक आहे. भाग्येश हा भाग्याचा उपभोक्ता असून भाग्यस्थानाचे जे पंचम त्याचा स्वामी हा भाग्योत्पादक आहे हे दोन्ही ग्रह उच्च किंवा स्वक्षेत्री असता निरंतर भाग्य प्राप्त होते.

वरील विवेचनावरून चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत यईल कि, डॉ. विनोद यांच्या पत्रिकेत भाग्यस्थानावर चंद्र शुक्र, गुरु हे तीन ग्रह पहात चवथा शुभ ग्रह हा पंचमांत म्हणजे भाग्याच्या भाग्यांत असल्याने ही पत्रिका




कै. दादासाहेब कन्नमवार गुरुदेवांना डॉ. विनोदानाकोतता बरे यक्ष प्रश्न विचारीत आहेत.




रविंद्रनाथ टागोर व न्यायरत्न विनोद




केवलानंदसरस्वती सोमयाजी बापूजी दीक्षित वाजपेय यज्ञाचे यजमान देवधर गुरुजी (अध्वर्यु) व बापू विनोद
[illegible]



टिळक स्मारक मंदिरात (पुणे)
व्यास पौर्णिमा उत्सव प्रसंगी



श्री. अवधूत रूपशंकर महाराज हे विनोदमहाराजांचे सानिध्यात मृताचे जिवंत व पुनश्च मृत त्या चमत्काराचे चित्र



ना. यशवंतरावजी चव्हाण गुरुदेवांचे भाषण एकाग्रतेने ऐकत असताना


शूभ फल देणारी तर झालीच पण हे सर्व वैभव केवळ बूद्धीगणामूळे प्राप्त झालेले असावे सर्वोत्तम प्रारब्ध योगामुळे हे वैभव त्यांच्या भोवतीच असते. त्यांचे ताब्यांत किंवा मालकिचे वैभव असण्याचा योग दिसत नाही. असणार कसा ? जन्मतः अवधूत !

भाग्यस्थानावरून भाग्य शक्ति गूरु धर्म तप यांचा विचार होतो. डॉ. विनोदांचे भाग्यस्थान इतके बलिष्ठ आहे कि लाखात एखाद्याच व्यक्तिच्या नशिबात परमेश्वर कृपेने अथवा पूर्वसुकृतामुळे असा योग जमून येतो. भाग्यस्थानांवरून परंपरागत विद्येचा विचार करता येतो. कारण परंपरागत विद्या या पुस्तकांत किंवा एखाद्या विद्यालयांत शिकता येत नाही. भारतीय परंपरेत आलेल्या अनेक गूढ विद्या व तंत्रमंत्रसिद्धी या गुरुमूखाशिवाय कुठल्याही व्यक्तिस मिळत नाहीत ती व्यक्ति अति विद्वान आहे किंवा महान् बुद्धिशाली आहे म्हणून प्राप्त होत नाही. जर सुदैवाने लायक गूरु भेटले तरच गूरुकृपेने महान सिद्धी व अनेक गूढ गोष्टींची माहिती होऊ शकते. डॉ. विनोद यांना भाग्यस्थानाच्या बलिष्ठ योगामूळे हिमालयातील केदारनाथ येथील एका जीवनमुक्त सिद्धाकडून अनेक विद्या व सिद्धी मिळाल्या.

सन १९५४ मध्ये एप्रिल महिन्यांत जपानमध्ये ८० राष्ट्रांची 'विश्वशान्ती सम्राट' अशी अद्वितीय



न्यायरत्न विनोद न्यायरत्नांचे अतिप्रियावस्थेतील वाङ्मय साक्षेपाने टिपून घेणारे विद्वान बॅरिस्टर कै. रावसाहेब मेहेंदळ



न्यायरत्न विनोद आचार्य कृपलानी व सौ।। मैत्रेयी विनोद

सन्मानाची पदवी देण्यात आली. यावेळी त्यांच्या जन्मकुंडलीतील शनि महादशा सुरू असून गुरू अंतर्दशा होती. सुरवातीस उल्लेख केल्या प्रमाणे डॉ. विनोदांच्या पत्रिकेतील शनि गुरू अन्योन्य योगकेन्द्र त्रिकोणातून म्हणजेच शुभ झाल्यामुळे शनीच्या महादशेत व गुरूच्या अंतर्दशेत त्यांना हे महान शुभ फल मिळाले.

जातक परिजातक या ग्रंथात दशांतर्दशाध्यायामध्ये म्हटले आहे कि,

श्लोक:

पापापहारसमये सुत रा शिपस्य।
पापे नृपालभयमिष्ट सुतार्ति माहू:।।
सौम्यापहारसमेय सुतवित्तलाभ-
मुर्वीश बन्धू जन लालनभिष्ट सिद्धिम्।।

अर्थ:— पंचमेशाच्या दशेत पापग्रहाची अंतर्दशा असता राजापासून भय व मित्र आणि पुत्र यांना दुःख या गोष्टी घडतात व शुभ ग्रहांची अंतर्दशा असता पुत्र धन यांची प्राप्ती ' राजा व आप्त याचे प्रेम व हाती धरलेल्या कार्यात सिद्धी या गोष्टी घडतात.

डॉ विनोद यांच्या पत्रिकेत पंचमस्थानी मकरराशी असून त्याचा स्वामी शनि चतुर्थात गुरुच्या अन्योन्य योगांत आहे. जातक परिजातक या ग्रंथात चतुर्थस्थानाचे खालिल प्रमाणे वर्णन केले आहे!

श्लोक— वदन्ति विद्या जननीसुखानि सुगन्धगोबन्धूम-नोगुणानि महीपयानाक्षिति मन्दिराणि चतूर्थभावप्रतज्ज्ञ।।

अर्थ— विद्या, आई सुगन्धी पदार्थ, गाई, आज मनोधर्म राजवाहन, जमीन व घरे या गोष्टीचा विचार चतूर्थ भावावर करितात

पंचमेश बुद्धिकारक शनि हा चतूर्थात विद्यास्थानी व चतूर्थेश गुरू पंचमात. या अन्योन्य योगामुळे.

ज्यावेळी पंचमेश शनिची महादशा सुरू झाली त्य वेळी म्हणजे सन १९३९ ते १९४५ या कालांत डॉ. विनोदांच्या सिद्धिना बहर आला होता. विशेष नमूद करण्याची गोष्ट म्हणजे शनिच्या महादशेत शनिच्या अंतर्दशेत ही घटना घडली.

ॐ शान्ति। शान्ति। शान्ति।!

— संपादक



संत नामदेव वाङमय ग्रंथ लेखनाचार्य तत्त्ववेत्ते सुबंध गुरुदेवांना त्यांचा ग्रंथ अर्पण करीत आहेत.

म. ज्योतिराव फुले चरित्राचा

प्रचंड ग्रंथ

म. फुले चरित्राचे कथन म. फुले यांच्या चरित्राचे संशोधन यांच्याकार्याचे मूल्यमापन त्यांच्या अख्याइकांचे दिग्दर्शन त्यांनी लिहीलेल्या ग्रंथाचे एकत्रीकरण तत्कालीन लोकांनी त्यांच्यावर घेतलेल्या आक्षेपांचे खंडन त्यांच्या चरित्राचे लेखक व त्या लेखकांच्या पुस्तकांचे परीक्षण म. फुले यांची दुर्मिळ पुस्तके, त्यांची हस्ताक्षर, पत्रव्यवहार इ. अनेक प्रकारचे साहित्य या ग्रंथात पहावयास मिळावे अशा प्रकारचा 'ग्रंथराज' तयार करण्याचे महान ऐतिहासीक कार्य म. फले चरित्र ग्रंथ प्रकाशन संस्था करीत आहे.

या संस्थेस म. फले यांच्या विषयी असलेल्या अख्याइका, त्यांनी लिहीलेली पुस्तके, पत्रव्यवहार इ० साहित्य पाठवून त्याचप्रमाणें आर्थिक मदत देऊन संस्थेस कोणालाही सहाय्य करतां येते.

म. फुले चरित्रग्रंथ–प्रकाशन संस्था

स्थापना १९६५ रजि. नं. १४८९ आय् पी. ट्रस्ट न एफ् ३२२ पी

अध्यक्ष
क. संभाजीराव घाटगे
बी. ए. एल्. एल्. बी. कलेक्टर, मुंबई प्रांत

जनरल सेक्रेटरी
श्री ग ह. बरोडे
ऑनररी मॅजिस्ट्रेट

उपाध्यक्ष
'जनहित दक्ष' वसंतराव काणे
संपादक रोहिणी, ऊसमळा, पंचायत आणि संध्या

सेक्रेटरी
श्री द स. झोडग
संपादक गांवगाडा

कार्यकारी पंच

विद्यारत्न वि. य साटके बी. ए; एस्. टी. सी.

श्री ग. बा. तथा दादासाहेब शिंदे

श्री. लि. रो. जगझाप, एम्. ए.

श्री. विश्वनाथराव महादेवराव फुले

श्री. म. ना. झोळ एम्. ए; एम्. एड्

श्री. अ. कि. फुले, बी. ए.

श्री. राजारामबापू तथा. रा. व्यं फाळके.

श्री. कुंजबिहारी भोपटकर, बी. ए. एल्. एल्. बी.

फलज्योतिष अभ्यास मंडळ, पुणें.

संस्था परिचय

श्रीशंकरोविजयते

प. प्र. भे. २८
१०२६४

स्वस्ति श्रीमत्समस्तसुरवृन्दपूजितपादारविन्दशिवप्रतिबिंबवर्य–
श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीणयमनिय…
मासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टाङ्गयोगानुष्ठाननिष्ठतप --
श्चक्रवर्त्यनाद्यविच्छिन्नगुरुपरम्पराप्राप्तषड्दर्शनसंस्थापनाचार्यव्या ---
ख्यानसिंहासनाधीश्वरसकलनिगमागमसारहृदयसांख्यत्रयप्रतिपादक -
सकलनास्तिकमतोच्छेदपूर्वकसकलधर्मसंस्थापनैकधुरीणवैदिकमार्गप्र--
वर्तकसर्वतन्त्रस्वतन्त्रश्रीमहाराजधानीऋष्यशृंगपुरवराधीश–श्रीमद्रा–
जाधिराजगुरुमण्डलाचार्यश्रीमच्छङ्कराचार्यान्वयसञ्जाताभिनवपञ्चग –
ङ्गातीरवासकमलानिकेतनकरवीरसिंहासनाधीश्वरश्रीमदभिनवश्रीसच्चि-
दानन्दविद्यानरसिंहभारतीकरकमलकिंजल्कोद्भवश्रीसच्चिदानंद अभि-
नवविद्याशंकरभारतीस्वामिकृतानि श्रीभाक्सपरिवारच्छात्राणामनुदिन–
मेधमानभव्यजनकानि ॥

श्रीमच्छङ्कराराधनावसरीयनारायणस्मरणानि ॥

श्रीगुरुभक्तिपरायणस्य प्रियशिष्योत्तमस्य जकातदार कुलो-
त्पन्नस्य अनन्तात्मजस्य 'होरारत्नं, ज्योतिर्भूषणं' इत्युपाधिद्वयधारकस्य
'फलज्योतिष अभ्यासमंडळ, पुणे' संस्थापकस्य 'ज्योतिष समाचार
मासिक संपादकस्य पुण्यपत्तनस्थस्य श्रीकृष्णस्य श्रेयसे महातो-
न्यानुसन्धानसम्प्रयुक्त श्रीनारायणस्मरणसंभूषिता आशीषः ।
स्वकर्मनिरताय स्वनामकृतधन्याय श्रीकृष्णशर्मणे भास्क-
स्मानंदेनताभिधरणे: स्वानन्दान्त:प्रेरणया 'ज्योतिर्मार्तण्डः' इति
पदवी वितीर्यते ।
इत उत्तरं ज्योतिःशास्त्रविमर्शलेखनप्रकाशनेन अनन्तजना-
दिन सेवया भगवत्कृपा येहपरकल्याणं साधयित्वा चिरं जीव-
ताते श्रीशारदाम्बाचन्द्रमौलीश्वराराधनसमये नित्यं प्रार्थयामहे ।

कोपीनाम संवत्सरे
शके १८८६ मदनासुरे संवत्सरारम्भे

महानुशासनवर्ती वर्तते

पुणें हें अनेकविध विद्यांचें माहेरघर मानलें जातें. राजकीय, सामाजिक व शैक्षणिक या तिन्हीं क्षेत्रांत पुणें आघाडीवर आहे. ज्योतिष्य हेहि एक अमूल्य शास्त्र असून त्याची सत्यता व उपयुक्तता अनेकांनीं दाखवून दिली आहे. या शास्त्राचा उपयोग माणसाला त्याच्या दैनंदिन जीवनांत होऊन त्याचें जीवन सुसह्य व्हावे व तसेंच या शास्त्राचा प्रसार होऊन त्याचे महत्त्व वाढावें या हेतूनेच केवळ या शास्त्राचा अधिकाधिक अभ्यास व संशोधन व्हावें या दृष्टीनें ३०–३–१९५८ या दिवशीं 'फलज्योतिष अभ्यास मंडळ' या संस्थेची स्थापना करण्यांत आली. व तेव्हापासुन ही संस्था भांडारकर रोडवरील 'वेद माउली धाम' येथील कार्यालयांत वाढत्या प्रमाणांत कार्य करीत आहे.

या संस्थेनें आतापर्यंत केलेले ज्योतिषविषयक कार्य व संस्थेच्या भावी कामकाजाची कल्पना यावी या दृष्टीनें सर्वांगीण आढावा घेण्याचा अल्पसा प्रयत्न येथें करण्यांत आला आहे.

संस्थेचे प्रमुख उद्देश :—

(१) या शास्त्राचें शास्त्रीय दृष्टिकोनांतून चिकित्सापूर्वक संशोधन करणें.

(२) या शास्त्राचें महत्त्व जनतेस पटवून देणें.

(३) त्याकरितां, चर्चा, परिसंवाद, व्याख्यानें, निबंधस्पर्धा ग्रंथालय, मासिक प्रकाशन, ज्योतिष शिक्षण कोर्स यांचा माध्यम म्हणून उपयोग करणें.

(४) निरनिराळ्या क्षेत्रांतील व्यक्तींच्या कुंडल्यांचा संग्रह करणें व त्या व्यक्तींना आलेल्या अनुभवांवरून तौलनिकदृष्ट्या त्या कुंडल्यांचें समीकरण करणें.

वरील प्रमुख गोष्टी दृष्टीसमोर ठेवून संस्थेनें आपल्या कार्यास आरंभ केला. या कार्यास एक प्रकारची सुसंगति लाभावी व तें करणें सुकर व्हावें यादृष्टीनें संस्थेनें सुरुवातीस एक सभा घेऊन कार्यकारी मंडळ स्थापन केलें. याच सभेंत संस्थेचें नांव 'फलज्योतिष अभ्यास मंडळ' असें सर्वानुमतें मान्य करण्यांत आलें.

"संस्थेचा प्रथम वर्धापन दिन"

संस्थेचा प्रथम वाढदिवस समारंभ १५–१०–१९५९ रोजीं त्यावेळचें पुण्याचे महापौर मा. रामभाऊ तेलंग यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यांत आला. श्री. न. र. आपटे यांनीं प्रथम मंडळाचा अहवाल वाचून दाखविला. नंतर अध्यक्ष श्री. तेलंग यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें, "फलज्योतिष हें शास्त्र असून त्याचा सखोल अभ्यास होणें जरूर आहे."

त्यानंतर सर्वश्री जकातदार व शरद रेगे यांनीं अनुक्रमें या शास्त्रामधील होराभूषण व ज्यो. विशारद पदव्या सम्पादन केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यांत आला.

याच वेळीं एम्. सत्यनारायण यांनीं या शास्त्रावर थोडे विवेचन केलें.

रात्रीं श्री. गुप्ते यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला.

या वर्षी मंडळांत झालेलीं भाषणें :—

(१) श्री. वा. ह. नगरकर यांनीं "कुंडलीचा दर्जा पाहून भविष्य कसें सांगावें" यावर सोप्या भाषेंत व आकर्षक पद्धतीनें भाषण केलें. त्याच वेळीं त्यांनीं मानवाच्या कुंडलींतील स्थानांचीं फलें सोदाहरण पटवून दिलीं.

(२) फलज्योतिषशास्त्राची उपयुक्तता यावर श्री. भा. ल. लिखिते यांचें भाषण झालें.

(३) श्री. श. रा. रेगे यांनीं पत्रिकेंतील दशा–महादशा यांचा फलित वर्तवितांना किती उपयोग होतो व त्यांची जरुरी आपल्या भाषणांत पटवून दिली.

एकूण निरनिराळ्या विषयांवर संशोधनपूर्वक अशी २५ व्याख्यानें या वर्षी मंडळांत झालीं.

विशेष समारंभ :—

१) १५ जाने. १९६० रोजीं संस्थेंत तिळगूळ समारंभ साजरा करण्यांत आला.

या प्रसंगीं श्री. जकातदार यांचें 'विवाह उशीरा का



(प्रथम वर्षापन दिन समारंभप्रसंगीचे छायाचित्र :— ना. माजी मेयर तेलंग, पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन व संपादक श्री. अ. जकातदार आणि इतर सदस्य दिसत आहेत.

होतात ' यावर अभ्यासनीय व मार्गदर्शक असें व्याख्यान झालें. यांनीं ज्योतिषालंकार, मुहूर्त चिंतामणि, विवाह-ज्योतिष या ग्रंथांच्या आधारें आपलें मत सोदाहरण पटवून दिलें.

२) २९-३-१९६० रोजीं मंडळाचे अध्यक्ष पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांचा त्यांच्या ज्योतिषशास्त्रावरील कार्याबद्दल महाराष्ट्र कवि यशवंत यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कार करण्यांत आला. या प्रसंगीं राजकवि यशवंत आपल्या भाषणांत म्हणाले, "आपल्या भवितव्याची जिज्ञासा प्रत्येकाला असते. प्रत्येक व्यक्ती स्वप्नाळू असून भवितव्याचीं स्वप्नें रंगवीत असते. कवि अदृश्यांचीं काव्यमय चित्रें चितारतो तर ज्योतिषि अदृश्य घटनांचा विचार करतो म्हणून कवि व ज्योतिषि यांचे साध्य एकच असतें, साधन मात्र भिन्न असतें.

याशिवाय या प्रसंगीं श्री. लिखिते, श्री. स. आ. शृंगारपुरे, श्री. भा. न. टोणगांवकर यांचीं भाषणें झालीं.

या वर्षांतील महत्त्वाचीं व्याख्यानें :—

१) धूर्त व कारस्थानी ग्रह रानी :—श्री. धुं. ह. जोशी

२) मस्तकरेषेचा यशस्वी हात : श्री. स. आ. शृंगारपुरे

३) ग्रहांचीं शुभाशुभ फलें : श्री. नरहर आपटे

एकूण या वर्षी मंडळांत ३५ व्याख्यानें देण्यांत आलीं.

याच वर्षी संस्थेची सदस्य संख्या वाढून ती सुमारें ९५ झाली. त्यांत बाहेरगांवच्या सभासदांचाहि समावेश आहे. तसेंच स्थानिक सदस्य हे वेळोवेळीं होणाऱ्या सभांना उपस्थित राहात व बहुमोल सूचना करीत. तसेंच शक्य होईल तेवढें सक्रिय सहकार्य सर्वांकडून मिळत होतें, हें येथें नमूद करणें अगत्याचें ठरेल.

दुसरा वर्धापन दिन :—

दि. १५–१०–१९६० रोजीं संस्थेचा द्वितीय वर्धापन दिन मा. मो. ना. पाटसकर यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. श्री. पाटसकर हे आपल्या अध्यक्षीय भाषणांत म्हणाले, " ज्योतिष हें अनुभवानें प्रत्यय घेण्यासारखें शास्त्र आहे. "

याच प्रसंगीं सर्वश्री एम्. सत्यनारायण व जयवन्त वालावलकर यांचीहि भाषणें झालीं. धुं. ह. जोशी यांनीं आभारप्रदर्शन केलें.

विशेष कार्यक्रम :—

याच वर्षीं संस्थेतर्फे ज्योतिषविषयक निबंधस्पर्धा आयोजित करण्यांत आली होती. स्पर्धेत महाराष्ट्रांतून व इतरहि प्रांतांमधून सुमारें ५० स्पर्धकांनीं भाग घेतला होता. स्पर्धेसाठीं ५ विषय ठेवण्यांत आले होते :—

पहिल्या ३ क्रमांकांना रु. ५०, ३०, व १५ अशी रोख बक्षिसें व पुढील ७ जणांना प्रशस्तिपत्रकें देण्याचें ठरलें होतें.

२२ जानेवारी १९६१ रोजीं मा. अण्णासाहेब चिवटे यांचे अध्यक्षतेखालीं तिळगुळ समारंभ पार पडला. तसेंच याच वेळीं श्री. नानासाहेब वाळके (मंडळाचे सदस्य) यांचा ते त्या वेळच्या कॉर्पोरेशन निवडणुकींत उपमहापौर म्हणून निवडून आल्याबद्दल सत्कार करण्यांत आला. याच प्रसंगीं श्री. चिवटे यांनीं ज्योतिषशास्त्रांतील अचूकतेचा गौरव केला. तसेंच सर्वश्री शृंगारपुरे, गोडसे व टोणगांवकर प्रभृतींची श्री. वाळके यांच्या गुणगौरवपर भाषणें झालीं.

एक अशुभ घटना :—

९ मार्च १९६१ रोजीं मंडळाचे एक तळमळीचे कार्यकर्ते श्री. भा. ल. लिखिते यांचे आकस्मिक निधन झाल्यानें सर्वांना हळहळ वाटली.

निबंध–स्पर्धेचा निर्णय :—

ज्योतिषविषयक जाहीर केलेल्या निबंधस्पर्धेचा निर्णय दि. १८ एप्रिल १९६१ रोजीं जाहीर करण्यांत आला. निर्णय पुढीलप्रमाणें—

(१) प्रथम क्रमांक– यवतमाळचे श्री. शिलेदार गुरुजी हे ५० रु. चे पहिलें पारितोषिकाचे मानकरी ठरले.

(२) दुसरें बक्षीस (३० रु.) –रामकृष्ण ना. केळकर (आसगांव–गोवा)

(३) तिसरें बक्षीस (१५ रु.) –कु. भानुमती ठाकूर (ठाणें)

पुढील विजेत्यांना प्रशस्तिपत्रकें देण्यांत आलीं :—

(१) डॉ. वाय्. बी. भुसनळे (२) भगवान जोशी (३) प्रल्हाद ग. बुरकुले (४) भा. बा. आचार्य (५) रामचंद्र गांधी (६) एन्. आर्. साळवी (७) नारायण रा. जोशी (८) गणपत द. केळकर (९) शंकर ग. कर्वेशास्त्री (१०) सुरेशचंद्र ग देशपांडे

या निबंधस्पर्धेच्या परीक्षक मंडळावर सर्वश्री पं. गोरेशास्त्री, बाळासाहेब गोखले, पंडित कृष्णचंद्रशास्त्री शर्मा व एम्. सत्यनारायण यांची नियुक्ति करण्यांत आली होती. तसेंच निरक्षक म्हणून श्रीकृष्ण अनंत जकातदार (होराभूषण) यांनीं काम पाहिलें.

या स्पर्धेतील १ लें बक्षीस ५० रुपये सर्वश्री श्रीकृष्ण अ. जकातदार, २ रें बक्षीस ३० रु. नानासाहेब वाळके व ३ रें बक्षीस १५ रु शंकरराव लाहोटी यांनीं देणगी म्हणून दिले होतें.

हा उपक्रम अपेक्षेपेक्षां खरोखर अधिकच यशस्वी ठरला. तसेंच या शास्त्राबद्दल अभ्यासूंत असलेली आवड, निष्ठा व संस्थेला सहकार्य देण्याची भावना दिसून आली.

फलज्योतिष अ. मंडळातर्फे घेण्यांत आलेल्या ज्योतिष निबंधस्पर्धेत यशस्वी झालेल्या स्पर्धकांना पारितोषिकें व प्रमाणपत्रें देण्याचा समारंभ १९ जून १९६१ रोजीं

महापौर सरदार किराड यांचे अध्यक्षतेखालीं माया लॉज येथें पार पडला.


या वेळीं महापौर किराड म्हणाले, "ज्योतिषशास्त्र हें शास्त्रशुद्ध पद्धतीनें अंगिकारलें तर भविष्यें तंतोतंत खरी येतात हें मी स्वानुभवानें सांगू शकतो."

यानंतर स्पर्धेचे परीक्षक सर्वश्री शर्माशास्त्री, बाळासाहेब गोखले, एम्. सत्यनारायण यांचींहि समयोचित भाषणें झालीं.

या वेळीं शिलेदार गुरुजींनीं नक्षत्र पद्धतीवरून भविष्यकाल दिग्दर्शन कसें करावें तें सोदाहरण दाखवून दिलें. तसेंच त्यांचें अभिनंदन करणारीं सर्वश्री का. न. केळकर, श्री. अ. जकातदार यांची भाषणें झालीं. श्री. धुं. ह. जोशी यांनीं आभार मानले.

उल्लेखनीय :—

याच वर्षी संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. बाळासाहेब जकातदार यांनीं येथील स्थानिक वृत्तपत्रांत "चीन–पाकिस्तान



छाया चित्रात :—डावीकडून माजी महापौर ढेरे, श्री. नानासाहेब वाळके, (माजी उपमहापौर) संस्थापक, श्री. अ. जकातदार सीलबंद पाकीट देत आहेत. इंदुमती पंडीत, अंजता जैन, बी. डी. किल्लेदार (कार्पोरेटर) इत्यादी आहेत

विशेष कार्यक्रम :—

यवतमाळ येथील गणकभूषण व ज्यो. निबंधस्पर्धेतील पहिल्या पारितोषिकाचे मानकरी श्री. शिलेदार गुरुजी यांचा श्री. एम्. सत्यनारायण [होराभूषण] यांचें अध्यक्षतेखालीं ११–११–१९६१ रोजीं सत्कार करण्यांत आला.

हे भारताचे सरहद्दीवर युद्ध प्रसंग निर्माण करतील" या मथळ्याखालीं लेख लिहून अमोल असें मार्गदर्शन केलें होतें (पुढें १९६२ सालीं चीनचे भारतावर आक्रमण होऊन व पाककडून कटकटी वाढून त्याचा प्रत्यय आला.)

तसेच 'अष्टग्रहींचे परिणाम' या विषयावर

मंडळांत चर्चात्मक कार्यक्रम झाला. या वेळीं सर्वश्री गोडसे, टोणगांवकर, आपटे, धुं. ह. जोशी यांची त्यावर भाषणें झालीं. त्याच वेळीं मंडळाचे नूतन सदस्य श्री. एम्. सत्यनारायण यांचा सत्कार करण्यांत आला.

मंडळातर्फे पुढील वर्षी रामनवमीचें शुभमुहूर्तावर ज्योतिषशास्त्र शिक्षणाचे अभ्यासवर्ग सुरू करण्याचें ठरलें. कारण तशी सूचना अनेक सदस्यांनीं तसेंच बाहेरील व स्थानिक अभ्यासू व्यक्तींनीं समक्ष भेटून व पत्रद्वारें केली होती

तिसरा वर्धापन दिन :—

फलज्योतिष अभ्यास मंडळाचा तिसरा वर्धापन दिन महापौर श्री. शिवाजीराव ढेरे यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला. या प्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांनीं या शास्त्रावर घेण्यांत येणाऱ्या आक्षेपांना उत्तरें दिलीं.

महापौर ढेरे यांनीं आपल्या भाषणांत " ज्योतिष हा पूर्वजांनीं दिलेला अमूल्य ठेवा असून, त्याचा संशोधन-पूर्वक अभ्यास करून त्याची शास्त्रशुद्धता पटवून दिली पाहिजे " असें मत प्रतिपादन केलें.

याच प्रसंगीं श्री. जकातदार यांनीं त्यावेळच्या शिवाजी-नगर मतदार संघांत सार्वत्रिक निवडणुकीसाठीं जे उमेदवार उभे होते, त्यांच्या कुंडल्यांचा अभ्यास करून काढलेला निर्णय सीलबंद पाकिटांतून अध्यक्ष श्री. ढेरे यांचे हातीं दिला.

याच वेळीं सर्वश्री का. न. केळकर, श्री अजंता जैन, एम्. सत्यनारायण, गोरेशास्त्री यांचीहि भाषणें झालीं.

मंडळाचे सदस्य श्री. नानासाहेब वाळके हे उपमहापौर झाल्याबद्दल त्यांचाहि सत्कार करण्यांत आला.

शेवटी तिळगुळ देण्यांत आल्यावर हा समारंभ संपला.

तसेंच मंडळांत एकूण ४० व्याख्यात्यांचीं अभ्यासपूर्ण अशी व्याख्यानें या वर्षी झालीं.

" प्रकाशन समारंभ "

फलज्योतिष अ. मंडळानें स्वत:चें असें पहिलें पुस्तक ' संपूर्ण वर्ष भविष्य ' (शके १८८५) तयार केलें होतें. त्याचा प्रकाशन समारंभ न्यायरत्न धुंडीराजशास्त्री विनोद यांचे हस्तें ३१ मार्च १९६३ रोजीं माया लॉज येथें पार पडला.

या प्रसंगीं सर्वश्री बर्वे, एम्. सत्यनारायण, धुं. ह. जोशी यांची समयोचित भाषणें झालीं. कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांनीं ज्योतिष हें उपयुक्त असें मार्गदर्शक शास्त्र कसें आहे तें पटवून दिलें न्यायरत्न विनोद म्हणाले कीं, " ज्योतिष हें एक शास्त्रच असून आइन्स्टाइनपर्यंतच्या सर्व शोधांनीं या शास्त्राची सत्यता व उपयुक्तता वाढलीच आहे. "

याच वर्षी १३ मे रोजीं मंडळांत श्री. वासुदेवराव गोखले यांचे ' कुंडलीच्या अभ्यासांत कशाचा विचार करावा ' यावर उपयुक्त व मार्गदर्शक असें भाषण झालें.

तसेंच या वर्षी एकूण निरनिराळ्या ज्योतिषशास्त्राच्या अंगोपांगावरील विषयांवर ३० व्याख्यानें झालीं. त्यामुळें या शास्त्राचे अभ्यासूंना फारच मार्गदर्शन होऊन त्यांचे ज्ञानांत नवी भर पडली.


चौथा वर्धापन दिन :—

संस्थेचा चतुर्थ वर्धापन दिन ३ जानेवारी १९६३ रोजीं महाराष्ट्र लॉजमध्यें पुण्याचें त्या वेळचें महापौर गुरुवर्य बाबुरावजी जगताप यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें पार पडला.

याप्रसंगी डॉ. म. त्र्यं. सहस्त्रबुद्धे, श्री. वि. घों. गोरेशास्त्री, श्री. का. न. केळकर, ज्योतिर्भूषण एम्. सत्यनारायण, श्री. अवचट आदि वक्त्यांची भाषणें झालीं.

तसेंच पुणे विद्यापीठाचे कुलगुरु म. म. द. वा. पोतदार, अप्पासाहेब मुजुमदार, नागपूर विद्यापीठ प्रमुख श्री. बर्वे, बी. डी. किल्लेदार, श्री. के. भट, आदि व्यक्ति उपस्थित होत्या.

महापौर जगताप यांनीं आपल्या भाषणांत असें मत



फल ज्योतिष अभ्यास मंडळातर्फे तृतीय पदवीदान समारंभ ना. समाजकल्याणमंत्री निर्मलाराजे भोसले त्याप्रसंगीं भाषण करीत आहेत. डावीकडून सर्वश्री गाडगीळ, जकातदार व घारपुरे दिसत आहेत.

व्यक्त केलें कीं, "या शास्त्रावर केवळ अंधश्रद्धा वा, दैववादी असूं नये. परंतु या शास्त्राचा अभ्यास होणें जरूर आहे."

तसेंच म. म. द. वा. पोतदार म्हणाले, "ज्योतिष-शास्त्राचा आपणाकडे वारसा चालत आलेला आहे, तो आपण निष्ठेनें जतन केला पाहिजे. शास्त्राची आजची कसोटी ज्योतिषशास्त्राला लावली तर विद्यापीठांतहि या शास्त्राचा अभ्यास ठेवणें शक्य होईल. हें शास्त्र केवळ इतिहास संशोधनासाठींच म्हणून शिल्लक राहूं नये."

याच प्रसंगीं संस्थेचे अध्यक्ष पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन यांचा या शास्त्रांतील आजवरच्या कार्याचा गौरव व ७१ वा वाढदिवस समारंभ या वेळीं साजरा झाला.

श्री. धुं. ह. जोशी यांनीं आभार मानले.

आणखी एक नवीन उपक्रम :—

संस्थेचे कार्याध्यक्ष श्रीकृष्ण अ. जकातदार यांनीं मोठ्या प्रयत्नपूर्वक व उत्साहानें या शास्त्राला वाहिलेलें एक नवें 'ज्योतिष समाचार' हें मासिक सुरू करण्याचा उपक्रम केला. त्याचा प्रकाशन समारंभ त्या वेळचे महाराष्ट्राचे शेतीमंत्री असलेले मा. बाळासाहेब देसाई यांच्या हस्ते १ जुलै १९६३ रोजीं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या भव्य सभागृहांत पार पडला.

समारंभाचे अध्यक्षस्थानीं दै. लोकसत्ता (मुंबई) चे संपादक ह. रा. महाजनी हे होते.

या प्रसंगीं कै. काकासाहेब गाडगीळ, पं. रघुनाथ-शास्त्री पटवर्धन, श्री मुकुंदराव किर्लोस्कर, व सौ. शांताबाई किर्लोस्कर, कृषिखात्याचे संचालक डॉ. घाटगे, शंकररावजी उरळ इ. प्रमुख व्यक्ति हजर होत्या.

ना. बाळासाहेब देसाई आपल्या भाषणांत म्हणाले, "मी राजकारणांत कोणाला हात दाखविला नाहीं, किंवा ज्योतिषालाहि हात दाखविला नाहीं परंतु ज्योतिष हें एक शास्त्र म्हणून आमच्यासारखे कार्यकर्ते या विषयाकडे वळतात."

समारंभाचे अध्यक्ष श्री. महाजनी यांनीं सांगितलें कीं, "मानवी जीवनांत कितीहि प्रयत्नवाद असला तरी दैव नांवाची चीज शिल्लक उरतेच. आणि मनुष्य शेवटी अगतिक होऊन या शास्त्राकडे वळतोच. मात्र ज्योतिषा-विषयीं जनतेला आकर्षण आहे ही गोष्ट निर्विवाद सत्य आहे."

याप्रसंगीं सर्वश्री पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन, एम्. सत्यनारायण, नीलकंठ गोखले यांचींहि भाषणें झाली. आजपर्यंत झालेल्या सर्व समारंभांत हा प्रकाशन समारंभ विशेष गाजला.

ज्योतिष प्रमाणपत्र वितरण समारंभ :—


ऑक्टोबर ६३ मध्यें घेण्यांत आलेल्या ज्यो. प्रवीण [प्रारंभिक कोर्स] व इतर पदवी परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचे शेतकीमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांचें हस्ते प्रमाणपत्र देण्याचा समारंभ पार पडला.

याच वर्षी 'ज्योतिष समाचार' चा पहिलाच दिवाळी अंक प्रसिद्ध करण्यांत आला होता.

पुण्यांतील एक ज्ञानी व विद्वान असे महर्षि न्यायरत्न विनोद यांच्या ६३ व्या वाढदिवसानिमित्त संस्थेनें विनोद यांच्या कार्याचा गौरव करून असें सांगितलें कीं, ज्यो. शास्त्राची हेटाळणी न करतां त्याचा अभ्यास होणें जरूर आहे.

याप्रसंगी सर्वश्री प्रा. श्री के. क्षीरसागर, पं. वसंतराव गाडगीळ, आबासाहेब मुजुमदार, दादासाहेब भोगे, विद्याधर गोखले, [सहसंपादक 'लोकसत्ता'] इत्यादि विविध क्षेत्रांतील प्रमुख व्यक्ति हजर होत्या.

संस्थेनें घरच्या घरीं पोस्टल ट्यूशन द्वारें ज्योतिष शिक्षण कोर्स एप्रील ६३ मध्यें सुरू केला. त्या वर्गाला ज्यो. प्रवीण या परीक्षेसाठीं १० विद्यार्थी बसले होते.



१ जुलै १९६३ साली ज्योतिष समाचाराच्या मासिकाचे उद्घाटन करीत असतांनाचे छायाचित्र :—बाळासाहेब देसाई (माजी गृहमंत्री) भाषण करीत असून ह. रा. महाजनी व बकातदार दिसत आहेत.

न्या. विनोद विशेषांक प्रसिध्द केला. या अंकाचा प्रकाशन समारंभ महापौर मुन्नासिंग किराड यांचे हस्तें झाला.

सुरुवातीस श्री. कानडेशास्त्री यांनीं वेदमंत्र म्हणून समारंभाची सुरुवात केली.

नंतर श्री. सदाशिव आ. शृंगारपुरे यांनीं विनोद विशेषांक काढण्याची मंडळाची कल्पना व पार्श्वभूमि निवेदन केली.

अध्यक्ष किराड यांनीं आपल्या भाषणांत न्यायरत्न

तसेंच ऑक्टोबर ६३ मध्यें घेण्यांत आलेल्या परीक्षेक एकूण सुमारें २५ विद्यार्थी बसले होते. त्यांचा निर्णय १४ मार्च १९६४ रोजीं पुढील प्रमाणें जाहीर झाला.

(१) **ज्यो. प्रवीण :—** या परीक्षेंत श्री र. वि. सोवनी बी. ए. इचलकरंजी हे प्रथम क्रमांकानें उत्तीर्ण झालें

(२) **ज्यो विशारद :—** ही पदवी श्री. वि. वि

अभ्यंकरशास्त्री (डोंबिवली) यांनीं मिळवली. ते या परीक्षेंत प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाले. त्यांनीं या परीक्षेसाठीं 'वैद्यक व ज्योतिष' हा निबंध लिहिला होता.

याच परीक्षेंत मंडळाचे सदस्य श्री. धुं. ह. जोशी हे दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.


(३) ज्यो. भास्कर :—ही श्रेष्ठतम पदवी श्री. भालेराव गुरुजी (सोलापूर) यांनीं मिळविली या परीक्षेसाठीं त्यानीं 'जातक नवनीत' हा प्रबंध सादर केला होता.

विशेष कार्यक्रम :—

पांचवा वर्धापन दिन समारंभ :—

फलज्योतिष अभ्यास मंडळाचा ५ वा वर्धापन दिन महाराष्ट्राचे गृहमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांच्या अध्यक्षतेखाली न्यायरत्न विनोद यांच्या शांति मंदिरांत साजरा झाला.

समारंभाला महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे चिटणीस श्री. मोहन धारिया, आ. रामभाऊ तेलंग, श्री. ह. रा.




छाया चित्रात—डावीकडून (सहकारी संपादक) १. स. आ. शृंगारपुरे, २. पूज्यनिय डॉ. विनोद, 'ज्योतिष समाचार'' अवलोकन करीत आहेत. ३. संपादक श्रीकृष्ण अ. जकातदार, ४. कार्यकारी संपादक पद्माकर गोठीवरेकर

महाजनी, प्रा. श्री. के. क्षीरसागर आदि प्रमुख व्यक्ति हजर होत्या.

या वेळी केलेल्या अध्यक्षीय भाषणांत ना. बाळासाहेब देसाई म्हणाले, "फलज्योतिष शास्त्राचा शास्त्रशुद्ध पायावर व तपश्चर्यापूर्वक अभ्यास व्हायला पाहिजे. तसेंच फलज्योतिष शास्त्राला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त व्हायला हवी."

श्री. जकातदारांचा बहुमान :—

१४ मार्च १९६४ रोजीं (गुढीपाडवा) संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. श्रीकृष्ण अनंत जकातदार यांना श्री शंकराचार्य संस्थान मठ संकेश्वर–करवीर यांजकडून ज्योतिर्मार्तंड ही बहुमानाची पदवी मिळाली. ही गोष्ट संस्थेला खचितच भूषणावह आहे.



सदर छायाचित्रात :—(महर्षि विनोद शांती मंदिर हॉल) खासदार ॲडव्होकेट मोहन धारिया, प्रा. श्री के. क्षीरसागर, 'दै. लोकसत्ता' संपादक ह. रा. महाजनी, पुणे जिल्हा अधिकारी श्री. देशमुख, महर्षि विनोद, डॉ. के. नी. पहाडे, श्री. अ. जकातदार बसलेले असून मध्यभागी ना. बाळासाहेब देसाई भाषण करीत आहेत

न्या. विनोद, प्रा. क्षीरसागर, श्री. ह. रा. महाजनी, पं. किंजवडेकर शास्त्री, श्री. धु. ह. जोशी यांचींहि भाषणें झाली.

याच वेळीं मंडळाच्या ज्योतिष परीक्षेंत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी व प्रमाणपत्रें देण्याचा समारंभहि ना. देसाईंच्या हस्तें पार पडला.

तसेंच संस्थेचें कार्याध्यक्ष श्री जकातदार यांना श्रीमद् शंकराचार्य [करवीर] यांचेकडून जी 'ज्योतिर्मार्तंड' ही बहुमानाची पदवी मिळाली, त्याबद्दल त्यांचाहि सत्कार करण्यांत आला.

याच वर्षी जुलैमध्यें 'ज्यो. समाचार'ला एक वर्ष झाल्याबद्दल वर्षारंभ विशेषांक प्रसिध्द करण्यांत आला. तो विशेष वाचनीय असल्यानें अल्पकाळांत संपला. त्याचेबद्दल स्थानिक वृत्तपत्रांनीं लिहिलेलें अभिप्राय वाचकांची उत्सुकता वाढवून हा अंक विकत घेण्याकडे मनाची तयारी करणारे होते.

ज्यो. निबंध स्पर्धा दुसरी [सप्टेंबर ६४]

१९६१ सालीं जशी ज्योतिषविषयक निबंधस्पर्धा संस्थेनें आयोजित केली होती तशीच दुसरी निबंधस्पर्धा ऑगस्टमध्यें जाहीर करण्यांत आली होती.

स्पर्धेसाठीं पुढील विषय ठेवण्यांत आले होते.—

(१) कै. पं. जवाहरलाल नेहरूंच्या कुंडलीचे विश्लेषण.

(२) कुंडलीवरून धंदा कसा ठरवावा व धंद्याची निश्चिति.

(३) ज्योतिषशास्त्राबद्दल मला काय वाटतें ?

(४) १ ऑक्टोबर १९६४ ते ३० सप्टेंबर १९६५ अखेर हा काल भारताला ज्योतिषशास्त्रदृष्ट्या कसा जाईल ?

या स्पर्धेत उत्तीर्ण होणाऱ्या स्पर्धकांना पहिलें बक्षीस २५ रुपये, दुसरें १५ रुपये व तिसरें १० रुपये अशी ठेवण्यांत आलीं होती.

ज्योतिष निबंधस्पर्धेचा निर्णय :—

ज्योतिष निबंधस्पर्धेत (दुसऱ्या) एकूण २५ जणांनीं भाग घेतला होता. ही स्पर्धा सप्टेंबर ६४ मध्यें

जाहीर करण्यांत आली होती. त्याचा निर्णय ३१ डिसेंबर ६४ रोजीं जाहीर करण्यांत आला. तो पुढील प्रमाणें—

(१) पहिलें बक्षीस (विभागून) –(१) श्री. मधुकर अत्रे, बी. ए. (नाशिक) व (२) श्री. वि. र. प्रसादे (अंबरनाथ)

(२) दुसरें बक्षीस–(१) कु. भानुमती ठाकूर (ठाणें)

(३) तिसरें बक्षीस-(१) श्री. वि. वि. अभ्यंकरशास्त्री


पुढील स्पर्धकांना उत्तेजनार्थ म्हणून प्रशस्तिपत्रकें देण्यांत आलीं—

अरविंद बर्वे (होराभूषण) यांची नियुक्ति करण्यांत आली होती

निरीक्षक श्री. श्रीकृष्ण अ. जकातदार (कार्याध्यक्ष) हे होते.

फलज्योतिष अ. मंडळाचा सहावा वर्धापनदिन–

संस्थेचा सहावा वर्धापन दिन ७ फेब्रुवारी ६५ रोजीं म. सा. परिषदेच्या सभागृहांत सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. बी. एम्. गोगटे यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून लोकसत्तेचे संपादक श्री. ह. रा. महाजनी हे उपस्थित होते.



सदर छायाचित्रांत—(महाराष्ट्र साहित्य परिषद हॉल) श्री. वसंत घारपुरे, सुविद्य पत्नी सौ. उषाताई गोगटे, ह. रा. महाजनी, संस्थापक श्री. अ. जकातदार, बा. म. खाडीलकर, बापट, समारंभाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध उद्योगपति –बा. म. गोगटे अध्यक्षीय भाषण करीत आहेत.


(१) सर्वश्री आर्. डी. वेदपाठक, मुंबई. (२) नागनाथ मार्तंड खांडके (मालेगांव) (३) शंकर यज्ञेश्वर देवळालीकर (उज्जैन) (४) सुरेश कृष्णाजी साखळकर (सांगली) (५) श्री. सुरेशचंद्र सहस्रबुद्धे (पुणें)

या निबंधस्पर्धेचे परीक्षक म्हणून सर्वश्री का. न. केळकर (ज्योतिर्भूषण), शरद रेगे (ज्यो. पंडित),

श्री. ना. ह. खाडिलकर यांनीं सुरुवातीला पाहुण्यांची ओळख करून दिली.

अध्यक्षीय भाषणांत गोगटे म्हणाले, " ज्योतिषशास्त्र हें मानवी जीवनांत मार्गदर्शन करणारें असून मनुष्याच्या कर्तृत्वाला उत्साह प्राप्त करून देणारें आहे.

सौ. उषाताई गोगटे यांच्या हस्तें ज्योतिष परीक्षेंत उत्तीर्ण झालेल्या छात्रांना प्रमाणपत्रें व पारितोषिकें देण्यांत आलीं.



सदर छायाचित्रांत सर्वश्री वसंत घारपुरे, सौ. उषाताई गोगटे, संस्थापक श्री. अ. जकातदार, बा. म. खाडीलकर, बापट, प्रमुख पाहुणे—मा. ह. रा. महाजनी (दै. लोकसत्ता संपादक) भाषण करीत आहेत.

संस्थेच्या आजपर्यंतच्या कार्याचा गौरव करणारी अशी सर्वश्री पं. शर्मा, श्रीपादशास्त्री किंजवडेकर व गोखले यांची भाषणें झाली.

प्रमुख पाहुणे श्री. ह. रा. महाजनी यांनीं संस्थेच्या पोस्टल ट्यूशन कोर्सबद्दल गौरवोद्‌गार काढले, ते म्हणाले, " ज्योतिषाशास्त्रावर अंधश्रद्धा मात्र असूं नये. "

रात्रीं सौ. कुमुदिनी (कोठारी) पेडणेकर यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम तसेंच अनवळीकर बंधु (नकला व जादू) आणि श्री वसंत घारपुरे यांचे (गणिताचे प्रयोग) सादर करण्यांत आलें.

भालचंद्र लेम्बे यांनीं आभार मानले.


ज्योतिष ग्रंथालयाचे उद्‌घाटन :—

संस्थेच्या विद्यार्थ्यांना व या शास्त्राचे अभ्यासूंना उपयुक्त ठरावें या दृष्टीनें संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांनी फार प्रयत्नपूर्वक या शास्त्रातील निरनिराळे असे मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषेतील सुमारें ८०० ग्रंथ मिळवुन या ग्रंथालयाचे उद्‌घाटन ना. बाळासाहेब देसाई (गृहमंत्री महाराष्ट्र राज्य) यांचे हस्ते ता. ११–५–६५ रोजीं झालें.

ना. देसाई आपल्या भाषणांत म्हणाले, " केवळ देव व दैव यावर विसंबून न राहतां, अविरत व असीम प्रयत्नांची त्याला जोड दिली पाहिजे. तसेंच ज्यो. हे एक शास्त्र आहे. त्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास झाला तरच त्याच्याविषयीं गैरसमज पसरणार नाहींत. "

याच प्रसंगी पुण्याचे माजी उपमहापौर श्री. नानासाहेब बाळके यांना अध्यक्षांच्या हस्तें मंडळाची ज्यो विशारद ही पदवी देण्यांत आली. तसेंच मंडळाचे एक सदस्य श्री. ल. वि. जाधव यांची नेमणूक महानगरपालिका सचीव म्हणुन झाल्याबद्दल त्यांचाहि सत्कार करण्यांत आला.

याचवेळीं श्री. जकातदार, श्री. वा. ल. मंजूळ, श्री. घारपुरे यांचीहि समयोचित भाषणें झाली.



पुणें फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या ग्रंथालयाचे उद्घाटन, ना. बाळासाहेब देसाई – नंदादीप प्रज्वलित करताना दिसत असून बाजूस मंडळाचे संस्थापक श्री. जकातदार दिसत आहेत.

ज्यो. परीक्षांचे निर्णय १९६५

एप्रील १९६५ मध्यें घेण्यांत आलेल्या ज्यो. विशारद या तीन परीक्षांचा निर्णय जाहीर झाला. निर्णय पुढीलप्रमाणें :—एकूण या परीक्षांसाठीं ५० विद्यार्थी बसले होते.

प्रथम क्रमांक—(१) ज्यो. प्रवीण–नागेश प्र. जोशी (पहूर)

(२) ज्यो. प्राज्ञ :—र. वि. सोवनी (इचलकरंजी)


ज्यो. विशारद हीं. पदवी श्री. वा. पंडित यांनीं प्राप्त केली त्यांनी त्यासाठीं ‘ सिंह लग्न ’ यावर प्रबंध लिहून सादर केला होता.

परीक्षक म्हणून सर्वश्री का. न. केळकर अरविंद बर्वे व वासुदेवराव गोखले यांनीं काम पाहिलें.

शकुंतला देवींची सदिच्छा भेट :—

श्रीमती शकुंतलादेवी यांनीं गणित विषयांत फारच प्रावीण्य संपादिले असून त्यांनीं जवळ जवळ बहुतेक सर्व देशांना भेटी दिल्या आहेत. योगायोगानें त्या पुण्यात आल्या असतांना श्री. जकातदार यांनीं त्यांना संस्थेला भेट देण्याचें निमंत्रण दिलें. तें मोठ्या आनंदानें स्वीकारून १३ जून १९६५ रोजीं त्यांनीं संस्थेला भेट दिली. संस्थेने आजपर्यंत केलेलें ज्योतिष विषयक कार्य पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केले.

श्री· जकातदार यांनीं त्यांची हस्तरेषा पाहून त्यांचे



छायाचित्रांत :—श्री. व. य. घारपुरे, संख्याभट्ट —शकुन्तलादेवी, मंडळाचे संस्थापक —श्री. अ. जकातदार दिसत आहेत.

हातावर पताका व पालखी अशी हस्त सामुद्रिकांतील शुभचिन्हे असल्याचें सांगितले व त्यांना नैसर्गीक ईश्वरी देणगी मिळाली असली पाहिजे असें मत प्रदर्शित केलें त्यामुळेंच त्या गणितांतील चमत्कार दाखविणारे प्रयोग करूं शकतात.

ज्यो. परीक्षा प्रमाणपत्र वितरण समारंभ :—

फल ज्यो. मंडळानें मागील सत्रांत (एप्रिल १९६५) घेतलेल्या ज्यो पदवी परीक्षेसाठीं एकूण ४० विद्यार्थी बसले होते, त्यापैकी ३२ उत्तीर्ण झाले. त्यांना प्रमाणपत्रें देण्याचा समारंभ १ ऑगस्ट १९६५ रोजीं म. सा. परिषदेच्या सभागृहांत महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण मंत्री श्रीमती निर्मलाराजे भोसले यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला.

ज्यो. प्राज्ञ या परीक्षेंत प्रथम श्रेणींत आलेलें श्री. र. वि. सोवनी (इचलकरंजी) यांना सुवर्ण पदक देण्यांत आले.

समारंभाला मा. रंगराव पाटील, सर्वश्री ल. वि. जाधव (नगर सचीव) नानासाहेब वाळके, गुंडेवारजी, भालचंद्र लेंभे, राजे (अ. रजिस्ट्रार), शृंगारपुरे, सौ. कुमुदिनी पेडणेकर आदि ज्यो. प्रेमी व्यक्ती उपस्थित होत्या.

सुरुवातीस श्री. मंजूळ यांनीं अध्यक्षांचा परिचय करून दिला व नंतर संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार यांनीं संस्थेच्या कार्याचा अहवाल वाचून दाखविला.

पं. वसन्त गाडगीळ, प्रो. आर. डी. करमरकर यांची भाषणें झाल्यावर आपल्या अध्यक्षीय भाषणांत श्रीमती निर्मलाराजे भोसले म्हणाल्या, "ज्यो. शास्त्र हे एक उपयुक्त असे शास्त्र असून त्याचें संशोधन होणें जरूर आहे. या शास्त्राबाबत जे अनेक गैरसमज पसरले आहेत, ते दूर होणें जरुर असून त्यासाठीं अधिक संशोधन व अभ्यास व्हावा."


नंतर अध्यक्षांनीं प्रमाणपत्रांचें वितरण केलें.

श्री. धुण्डिराज ह. जोशी यांनीं आभार मानल्यावर समारंभ संपला.

राज्यपाल ना. चेरियन यांची फल ज्यो. अ. मंडळास भेट :—

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल नामदार चेरियन यांनीं ५ ऑगस्ट ६५ रोजीं सकाळीं संस्थेला धावती भेट दिली.

मण्डळाचे कार्याध्यक्ष सर्वश्री जकातदार, घारपुरे व जोशी यांनीं त्यांचे स्वागत केलें. व त्यांना संस्थेच्या कार्याची माहिती सांगितली.



छायाचित्रांत डावीकडून :— विजयकुमार, श्री. जकातदार, श्रीमति निर्मलाराजे भोसले (माजी समाज कल्याणमंत्री) आणि त्यांच्या भगिनी, सौ. मंदाकिनीबाई जकातदार, चि. नंदकुमार व चि. सतीश.

राज्यपालांनीं एकंदर कार्य पाहून समाधान व्यक्त केलें व कांहीं बहुमोल सूचनाहि केल्या.

परीक्षा निर्णय :—

ज्यो. प्रवीण :— ज्यो. विशारद या परीक्षांचा निर्णय १५-११-६५ रोजीं जाहिर करण्यांत आला. सप्टेंबर ६५ मध्यें त्या घेण्यांत आल्या. ज्यो. प्रवीण या परीक्षेसाठीं ५७ विद्यार्थी बसले होते. ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

ज्यो. प्रवीण :— सौ. शोमा आत्माराम प्रभु या सर्व प्रथम आल्या

ज्यो. विशारद :—या परीक्षेसाठीं ३ विद्यार्थी बसले होते. उत्तीर्ण २.

प्रथम क्रमांकः—(१) श्री. विठ्ठल पुंजाजी वाकोडे (२) विष्णूपंत काशीनाथ पुराणिक.

डिसेंबर १९६५ मध्यें ज्यो. प्राज्ञ ही परीक्षा घेण्यांत आली व त्याचा निर्णय १० जानेवारी ६६ रोजीं जाहिर करण्यांत आला.

या परीक्षेस १६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १० उत्तीर्ण झाले. परीक्षक श्री. अरविंद बर्वे हे होते.

पनवेल येथील श्री. यशवंत गजानन जोशी हे प्रथम श्रेणींत पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण झाले.



छायाचित्रांत :—मंडळाचे सदस्य वसंत घारपुरे, संस्थापक जकातदार, उभे असून, राज्यपाल डॉ. चेरीयन शेजारी बसलेले आहेत.

वालचंदनगर येथें मंडळाची शाखा :—

वालचंदनगर येथें तेथील कांहीं ज्योतिषप्रेमी मंडळींनीं एकत्र येऊन फलज्योतिष अ. मंडळाची शाखा स्थापन केली.

अध्यक्ष —भास्करराव कुलकर्णी.

कार्यवाह —रामचंद्र अलाटे.

कार्याध्यक्ष —श्री. काकडे.

या मंडळातर्फे ज्योतिष विषयक संशोधनाचें कार्य सुरू असून या शाखेंतून बरेच विद्यार्थी परीक्षेस बसून उत्तीर्ण झाले.


मंडळाचा ७ वा वर्धापन दिन :—

२० फेब्रुवारी १९६६ रोजीं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहांत महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री ना. प. कृ. सावंत यांचे अध्यक्षतेखालीं मंडळाचा ७ वा वर्धापन दिन साजरा झाला.

ना. सावंत या प्रसंगी आपल्या भाषणांत म्हणाले, "ज्योतिष शास्त्र हें मानवाच्या अंतापर्यंत टिकून रहाणारे शास्त्र आहे. हा प्राचीन वारसा आपण जतन करून ठेवला पाहिजे. तसेंच विद्यापीठांत यां शास्त्राला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे."

समारंभाला मेयर बी. डी. किल्लेदार, पुणें विद्यापीठाचे हंगामी कुलगुरु श्री. एन्. आर. कुलकर्णी, पं. रघुनाथशास्त्री कोकणे, श्री. ह. रा. महाजनी, सेनापती बापट आदि प्रमुख व्यक्ति हजर होत्या.

लोकसत्ताचे संपादक श्री. ह. रा. महाजनी यांनीं या वेळी अशी सूचना केली कीं, "विषयाची किमान शैक्षणिक पात्रता असलेल्यांनाच हा व्यवसाय करण्याची



वरील छायाचित्रांत :—फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या सातव्या वर्धापनदिन समारंभाचे छायाचित्र, डावीकडून सर्वश्री सेनापति बापट, प्रा. ए. आर. कुलकर्णी, मा. ना. बाळासाहेब सावंत, संस्थापक श्रीकृष्ण अ. जकातदार, उभे असलेले प्रमुख पाहुणे श्री. ह. रा. महाजनी (संपादक दै. लोकसत्ता) भाषण करीत आहेत.

परवानगी द्यावी, म्हणजे त्याला कांही दर्जा प्राप्त होईल. ''

मेयर बी. डी. किल्लेदार यांच्या हस्तें सप्टेंबर ६५ चे परीक्षा सत्रांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रें देण्यांत आलीं.

ना. हरिभाऊ पाटसकरांची संस्थेला भेट :—

मध्यप्रदेशचे माजी राज्यपाल ना. हरिभाऊ पाटसकर यांनीं मंडळास १५–४–६६ रोजीं भेट दिली. याप्रसंगीं जि. प. अध्यक्ष श्री. शंकरराव उरसळ हेहि हजर होते. श्री. जकातदार यांनीं पाहुण्यांना संस्थेच्या कार्याची माहिती दिली. ना. पाटसकर यांनीं एकंदर कार्य पाहून समाधान व्यक्त केलें.

ज्यो. परीक्षा निर्णय (एप्रिल १९६६)


फल ज्यो. अ. मण्डळातर्फें एप्रिल १९६६ मध्यें घेण्यांत आलेल्या ज्यो. प्रवीण व ज्यो. विशारद या परीक्षांचे निर्णय १ जून १९६६ रोजीं जाहीर करण्यांत आले.

ज्यो. प्रवीण परीक्षेसाठीं ४१ विद्यार्थी बसले होते. त्यांतील २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. श्री. गोविंद बा. राजकोंडावार (चंद्रपूर) हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

(१) श्री. व. रा. भार्गव, होराभूषण, सामुद्रिकभूषण

(२) डॉ. वि. का. रेगे. एम्. डी. एच्. यांनी अनुक्रमें सुखस्थान आणि अष्टमस्थान आणि ग्रहरत्नें व परिणाम या विषयावर निबंध लिहून सादर केले होते. परीक्षक म्हणून होराभूषण अरविंद द. बर्वे व पंडित नारायणशास्त्री जोशी यांची नियुक्ति करण्यांत आली होती.

जून १९६६ मध्यें घेण्यांत आलेल्या ज्यो. प्राज्ञ व ज्यो. विशारद या परीक्षांचा निर्णय १४ जुलै १९६६ रोजीं जाहीर करण्यांत आला.



छायाचित्रात :—(डावीकडून, उजवीकडे) संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. जकातदार, माजी केंद्रीय कायदेमंत्री श्री. हरिभाऊ पाटसकर व पुणे जि. प. अध्यक्ष श्री. शंकरराव उरसळ व मंडळाचे एक सदस्य श्री. खाडीलकर दिसत आहेत.

फलज्योतिष अभ्यास मंडळास भेट देऊन गेलेल्या मान्यवर प्रमुख व्यक्ति –

(१) श्री. बाळासाहेब देसाई. गृहमंत्रि, महाराष्ट्र-राज्य.

(२) श्री. स. गो. बर्वे, माजी अर्थमंत्रि, महाराष्ट्र-राज्य.

(३) म. म. द. वा. पोतदार.

(४) राजकवि यशवंत.

(५) मा. बी. डी. किल्लेदार, माजी महापौर, पुणे म. न. पा.

(६) मा. शिवाजीराव ढेरे, माजी महापौर, पुणे म. न. पा.

(७) राज्यपाल श्री. व. सौ. चेरियन.

(८) खासदार मोहन धारिया.

(९) श्री. रामभाऊ तेलंग, माजी महापौर, पुणे

(१०) श्री. ह. रा. महाजनी, संपादक, दै. ' लोकसत्ता ' मुंबई.

(११) आचार्य अत्रे, संपादक, दै. ' मराठा '

(१२) श्री. शंकरराव उरसळ, अध्यक्ष, पुणे जि. प.

(१३) ना. प. कृ. सावंत कृषिमंत्रि महाराष्ट्र राज्य.

(१४) श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर.

(१५) पं. रघुनाथशास्त्री पटवर्धन.

(१६) प्रा. श्री. के. क्षीरसागर.

(१७) न्यायरत्न विनोद.

(१८) मंत्ररत्न आर. डी. करमरकर.

(१९) मो. ना. पाटसकर, माजी राज्यपाल (म. प्र.)

(२०) श्री. कृष्णचंद्रशास्त्री शर्मा (पंचांगकर्ते.)

(२१) श्री. बर्वे, नागपूर विद्यापीठ प्रमुख.

(२२) सुप्रसिद्ध सिनेदिग्दर्शक, मधुकर पाठक.

(२३) डॉ. म. त्र्यं. सहस्त्रबुद्धे.

(२४) सरदार आबासाहेब मुजुमदार

(२५) कै. काकासाहेब गाडगीळ.

(२६) श्री. मुकुंदराव किर्लोस्कर.

(२७) सौ. शांताबाई किर्लोस्कर.

(२८) डॉ. घाटगे कृषिसंचालक.

(२९) माजी मेयर रोहिदास किराड.

(३०) पं वसंतराव गाडगीळ. सं. ' शारदा '

(३१) श्री. विद्याधर गोखले.

(३२) उद्योगपति बी. एम. व सौ. गोगटे.

(३३) श्री. डी. पी. खाडीलकर (इंजिनियर)

(३४) श्री. ल. वि. जाधव (नगरसचीव, पुणे, म. न. पा.)

(३५) गणिततज्ञ, श्रीमति शकुंतलादेवी.

(३६) समाजकल्याणमंत्रि निर्मलाराजे भोसले.

(३७) पं. रघुनाथशास्त्री कोकजे.

(३८) प्रा. एन्. आर. कुलकर्णी.

(३९) सेनापति बापट.

(४०) पंडितराव नगरकर.

(४१) पं. वि. म. जोशी.

फलज्योतिष अभ्यास मंडळाचे संस्थापक, श्री. श्री. अ. जकातदार
यांनीं वर्तविलेल्या भवितव्यांचा पडताळा व त्यावरील अभिप्राय —

(१) श्री. रामचंद्र ब. मोडक सेवानिवृत्त सावंतवाडी दरबारगायक व संगीत शिक्षक.

श्री. जकातदारांचा ज्यो. विषयक अभ्यास उत्तम असून मला माझे मुलाचें नोकरीचे बाबतींत त्यांचें भविष्याचा पडताळा आला.

(२) के. टी. गिरमे, [उपसभापति, महाराष्ट्र विधान सभा] (मुंबई).

आपण वर्तविल्याप्रमाणें परदेशी जाण्याचा योग बरोबर आला.

(३) श्री. डी. एम्. जोशी, चालक न. श्री सं. वि. पुणें ४.

संततीबद्दलचें [मुलगा होईल] व मुलीच्या लग्नाचें भविष्य अगदी तंतोतंत खरें ठरलें !

(४) भास्करपंत का. चंदूरकर [काव्यशेखर] (इचलकरंजी). श्री जकातदार यांनीं वर्तविलेली माझी तिन्हीं भविष्यें तंतोतंत खरीं ठरलीं.

(५) मधुसुदन खाबपणे, एम्. ए. (पुणें.)

विवाह व भावी काळासंबंधी वर्तवलेलीं भविष्यें प्रत्यक्षांत अनुभवास आलीं.

(६) हरी वामन काणे, बीएस्सी. ए. एम्. आय. इ. कन्सल्टींग इंजिनियर मुंबई.

नोकरीबद्दल सांगितलेलें भविष्य खरें ठरलें.

(७) श्री. मो. त्र्यं. किवळकर, चहाचे व्यापारी, पुणें.

श्री. जकातदार यांनीं पेजेवर सांगितल्याप्रमाणें पहिलेंच पुत्ररत्न होऊन त्यांच्या या शास्त्राचें ज्ञानाचा अनुभव आला.

(८) प्रो. अच्युत एस्. शिरवळकर, पुणें.

विवाह आणि नोकरींतील उच्च श्रेणीबद्दलचें भविष्याचा पडताळा आला.

(९) पी. एस्. आवळे, बी. ए. मुंबई.

विवाहानंतर १२ वर्षांनीं श्री. जकातदारांनीं पत्रिकेवरून सांगितल्याप्रमाणें मुलगा झाला. त्यांचें ज्ञानाचे खरोखर कौतुक करावें तेवढें थोडेंच होईल.

(१०) श्री. म. शं. अंबिके डी. सी. ई., ए. एम्. आय. ई. दिल्ली.

नोकरी केव्हां मिळेल त्याबद्दल वर्तविलेल्या काळांत नोकरी मिळाली.

(११) डॉ. घोरपडे, लोणी काळभोर.

श्री. जकातदारांनीं सांगितल्याप्रमाणें अनपेक्षित प्रॉपर्टी मिळून या शास्त्राची प्रचीति आली.

(१२) श्री. राजकवि य. दि. पेंढारकर, पुणें.

सरकारी मानधन मिळून लौकिक वाढेल असें ४ महिने आधी वर्तवलेलें भविष्य तंतोतंत खरें ठरलें. श्री. जकातदारांच्या ज्ञानाचें कौतुक करण्यास मजजवळील शब्द तोकडे आहेत.

(१३) श्री. दत्तात्रय शंकर जोशी, (पुणें.) [पेन्शनर शिक्षक]

कोर्टांतील दावा, मुलांचें शिक्षण, नोकरींतील बढती व मुलाच्या विवाहाची तारीख अचूक ठरून त्यांच्या ज्ञानानें चकित झालों.

(१४) कु. आशा दास्ताने उर्फ सौ. राणे, (मुंबई)

नोकरींत मानाची जागा मिळेल, तसेंच विवाह उशीर होईल पण स्थळ उत्तम मिळेल. त्याचप्रमाणें अनुभव येऊन या शास्त्राच्या ज्ञानाबद्दल कौतुक वाटलें.

(१५) श्री. गजानन दा. क्षीरसागर, (पुणें).

एल्. एल्. बी. परीक्षा उत्तीर्ण व्हाल असें आपण वर्तविलेलें भविष्य प्रत्यक्षांत अनुभवास आल्यानें आनंद झाला.

(१६) श्री. पां. इफळाणूरकर, (पुणें).
बी. ए., बी. कॉम्

कोणत्या खात्यांत नोकरी मिळेल याबद्दलचें भविष्य अचूक ठरलें.

(१७) श्री. मधुकर फडके, पुणें ४.

एम्. ए. पदवीपरीक्षेबद्दल वर्तविलेल्या भविष्याचा अंदाज खरा ठरला हें शास्त्र खरें आहे याबद्दल खात्री पटली.

(१८) श्री. शिवाजीराव ढेरे, माजी महापौर, पुणें महानगरपालिका.

आपण १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीसंबंधी पुण्यांतील उमेदवारांच्या पत्रिकांचा अभ्यास करून श्री. खर्वे निवडून येतील असे वर्तविलेल्या भविष्याचा प्रत्यक्षांत पडताळा आला व आपल्या ज्ञानाचे साश्चर्य कौतुक वाटले. आपली उत्तरोत्तर भरभराट होवो हीच इच्छा !

(१९) श्री. नीलकंठ भास्कर जोशी, पुणे.

जमीनीसंबंधी व उद्योगधंद्याबाबत आपण सांगितल्याप्रमाणें अनुकूल बदल होऊन आपल्या ज्ञानाची प्रचीति आली.

(२०) श्री. आर. सी. कटके कोंढवा रोड, पुणें २.
बी. कॉम., एल् एल् बी. (बॉम्बे) ॲडव्होकेट्.

आपले परीक्षेबाबत व विवाहासंबंधीचें भविष्य तंतोतंत खरें ठरलें.

(२१) नकलाकार श्री. सदानंद जोशी.

श्री. जकातदार यांच्या ज्ञानाची प्रचीति आली. त्यांचा भविष्यकाळ उज्ज्वल होवो हीच सदिच्छा !

(२२) श्री. बाळासाहेब पाठक,
एम्. एस्सी, [पीएच् डी]

श्री. जकातदारांनीं पत्रिकेवरून वर्तविल्याप्रमाणें परदेशी [अमेरिकेस जाण्याचा योग] बरोबर जुळून आला. तसेंच चांगल्या फर्ममध्यें कलकत्त्यास नोकरी मिळून दोन्ही गोष्टी अनपेक्षितपणें घडून आल्या. या शास्त्रावर माझा सुरुवातीस फारसा विश्वास नव्हता. पण हें शास्त्र खरें आहे अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे.

(२३) डॉ. बी. जी. शिरोळे,
(एफ् आर. सी. एस्.)

श्री. बाळासाहेब यांच्या ज्योतिषविषयक ज्ञानाचा पूर्ण अनुभव आला मला परदेशीं जाण्याचा योग अचानक जुळून आला. तसेंच तेथें माझें पदव्युत्तर शिक्षणहि पार पडले. श्री. जकातदार यांचे कौतुक करावें तेवढें तें थोडेंच होईल असें वाटतें.

(२४) सुप्रसिद्ध सिनेदिग्दर्शक म. गो. पाठक.

श्री. बाळासाहेब जकातदार यांनीं वर्तविलेली पुढील भाकितें अगदी तंतोतंत खरी ठरली व त्यांच्या ज्योतिषविषयक अभ्यासाचें मनापासून कौतुक वाटलें.

[१] पुत्ररत्नाचा लाभ त्यांनीं सांगितल्याप्रमाणें झाला.


[२] सिनेव्यवसायांत त्यांनीं सांगितलेल्या काळांतच प्रगति होत गेली. व शेवटीं त्यांतील विजयाचे शिखर म्हणून की काय मी ‘ प्रपंच ’ चित्रपटाचा दिग्दर्शक झालों. तसेंच त्या चित्रपटाला राष्ट्रपतिपदक मिळून मी लौकिकाच्या शिखरावर जाऊन पोंचलों.

[३] परदेशीं जाण्याचा योगहि असाच जुळून आला.

श्री. जकातदार यांच्या विद्येचे योग्य चीज होण्यासाठीं परमेश्वर त्यांना साहाय्य करो, हीच एकमेव प्रार्थना !

फल ज्योतिष अभ्यास मंडळाच्या ग्रंथालयांतील अमूल्य ग्रंथसंग्रह

1 Alan Leo's Dictionary of Astrology–Vivian E. Robson.
2 Your Destiny. and the Stars–A. Croysdale, G. Wilde.
3 The Graven Palm–Mrs. Robinson
4 Number Vibratian in Questions and Answers–Balliett.
5 Modern Astrology–Magazine.
6 My Heavens–Michael March.
7 Man and the Zodic–David Anrias
8 Everyday Astrology–V. A. K. Ayer.
9 Directional Astrology–Sepharial.
10 The Science of Vocational Astrology–M. H. Champion.
11 The Measure of life–Raymond Harrison.
12 Astrology For the Millions–Grant Lewi.
13 Practical Astrology – Edward Lyndoe
14 A. Taxt Book of Scientific Astrology–Dr Bh. Satyanarayna Rao.
15 Elements of Astronomy–G. W Parker.
16 Cheiro's Book of Numbers–Cheiro.
17 How I Foretold The Lives of Great Men–Cheiro.
18 Student chart Reader of Horos



फल ज्योतिष अभ्यास मडळाच्या कार्यालयांत ज्योतिष विषयक ग्रंथालयाचे ना. बाळासाहेब देसाई दालन खुले करीत आहेत. शेजारी चनबसप्पा मैंदर्गी आणि संस्थापक श्रीकृष्ण जकातदार दिसत आहेत.

cope Indications - Llewellyn, George.
19 The Royal Horoscopes-B. Suryanarain Row.
20 The study of Astro-logy-B. Suryanarain Row.
21 Fortune Teller (Fowshman's)
22 The Principles Theory and Practice of Scientific Prediction-Wm. J. Tucker
23 Principles of Scientific Astrology-William J. Tucker.
24 Span of life-G. S. R. Murthi.
25 Read Your Own Palm-A. L. Bhagwat.
26 Simplified Scientific Astrology-Max Heindel.
27 The Story of Your Palm-M. V. Rao.
28 Bonded Concrete Roads-
29 Astrology-C. E O. Carter.
30 Practical Hints on Astrology-G. A. Aranth.
31 Indian Ephemeris 1946- N. C. Lahiri M A.
32 Everyday Astrology-V. A. K. Ayer.
33 Jataka Chandrika-B. S. Rao.
34 The Results of the Years-B. S. Rao.
35 Financial Astrology- J. Ross Tyler.
36 Introduction to the Uranian System of Astorology- Richard Svehla.
37 The Astrological Self Instructor-B. S. Rao.
38 Practical Lessons on Medical Astrology-G. A. Aranth.
39 Astrology Made-Easy-
40 Astrology How to make and Read your own Palm-
41 Nine Stages of life and Sub-divisions-G. A. Ananth
42 Cheiro's Book of Numbers-Cheiro's.
43 The Teaching of the star-Georges Tanner.
44 The moons Nodes G. White.
45 Fowler's Self Instructor in Phrenology L. N. Fowler.
46 The Science of Numoerology-W. B. Gibson.
47 Praectical Astrology- Saint Germain.
48 Astronomy Applied to Horse Racing-Arie.
49 Hands up-Captini Vequion.
50 The Stars and Your Future-Leonid.
51 Cheiro's When Were You Born-Cheiro.
52 The Kabla of Numbers Part II-Sepharial.
53 Comfarts Palmistry Guide-Cheiro.
54 Solar Return and Revolutional Perids-W. Leon.
55 Hebrew Astrology-Sepharila.
56 Highways In Astrology-Kumbha
57 Cosmology of Numbers- G. H. Silcock.
58 Astrology and British Control-E. H. Bailey.
59 Mozan's Racing Numerology-Mozan.
60 Astrology and Marriage-Sepharial.
61 Numbers and Their Practical Application-Isidore Kozmainsky.

62 Lyndoe's Plan With the Planets–Lyndoe.
63 Compendium of strology–B. S. Rao.
64 Your Fortune in Your Palm–R. T. Thevar.
65 Palmistry For Pleasure– Pean Bryden.
66 The Influence of the Zodic upon Human Life–Eleanor Kirts.
67 Combincd Introductory Astrorogy-G. H. Kesl.
68 Raphael's Almanac–1935–Raphae.
69 Numerology up-to-date– Karen Adams.
70 Murthy World Predictions–P. E. S. Iyer.
71 What the Stars Predict for Your–Samuel Cox.
72 Be Your own Astrooger– Iris Vorel.
73 What is Astrology ? —Colin Bennett.
74 The Science of Foreknowledge–Sepharial.
75 Graha and Bhavabalas–B. V. Raman.
76 Sayan Tables of Hourses–R. V. Vaidya.
77 Horoscope of the Indian National —B. V. Raman.
78 Astrology for Beginners–B. V. Raman.
79 How to Judge A Horoscope Part I–B. V. Raman.
80 Astrological Primer–B. S. Rao.
81 Predictive Astrology–F. C. Dutt.
82 Your Future Through Astrology–M. J. Narsian.
83 Directionc Astrology of Hindus–V. G. Rale.
84 An A. B. C. of the Old Science of Astrology-Sidney Randau.
85 Phrenoscopy–Sepharial.
86 The Kabla of Numbers Part I–Sepharial.
87 A Treatise on Nautical Astronomy–John Merrifield.
88 Astrology an effort at simplification–William Wilson.
89 What the Stars Foretell 1935–R. H. Naylor.
90 A Key to the Stars–R. V. O. R. Woolley.
91 The Solar Spoch–Sepharial.
92 Astrology Self Taught–Astrophel
93 Names Dates and Numbers–What they mean to you–R. P. Walton.
94 Character Reading by Numbers–Karia.
95 The Astrological Aspects–C. E.O. Carter.
96 Raphael' Almanac–Raphael.
97 Zadkiel's Almanac– 1928–Zadlriel's.
98 Raphael's Almanac–1937-19 4–Aaphael.
99 Zadkiel's Almanac–1926–Zadkiel
100 Wilde's Primer of Astrology–George Wilde.
101 A Manual of Hindu Astrology–B. V. Raman.
102 Vorshaphal–B. V. Raman.
103 Astrological Prediction– Harwood.
104 Horoscopic Determinism–S. A. Kalyan.

105 Astrology of the Race Course–R. L. Sutaria.
106 Astrology For Beginners–B. V. Raman.
107 A Guide to Succesful Racing–P. N. Bam.
108 Astrological Investigations–W. Frankland.
109 Astrological Aphorisms and Divination–Henri Candiani.
110 Astrology How to Read Your Fortune in the Stars-Sagittarian.
111 Astronomy Sun, Moon, Stars Etc.–William Durham.
112 The Principles of Astrology–C. E. O. Carter.
113 A Beginner's Guide to Practical Astrology–V. E. Robson.
114 Eclipses in theory and Practice–Sepharial.
115 The Radix System– V. E. Robson.
116 Highlights of Indian Astrology–M. K. Wali.
117 First Principles of Astrology–Wilber Gaston.
118 Keys to symbolic Directing–Measuring Our Years– W. Frankland.
119 The Primary Progressed Horoscope–O. H. W. Owen.
120 Symbolic Directions in Modern Astrology–C. E. O. Carter.
121 Prognostic Astronomy–Sepharial.
122 Experiments With Horoscopes–R. G. Sapre.
123 The light of Astrology–P. Gopalan Nair.
124 Fortune Telling By cards–Margot Lemyne.
125 Transits and Planetary Periods–Sepharial.
126 Primary Directions Made Easy–Sepharial.
127 Astrology in Relation to Mind and character–Mental Specialist
128 Be Your Own Astrologer–K. G. Tokekar.
129 Total Eclipses at the sun–M. L. Toddld.
130 The Heavens Unveiled—
131 The Story in Your Hand–Emily Edwards.
132 Numerology up-to-date–Karen Adams.
133 Astrology The Link Between two Worlds-S. Elizabeth Hall.
134 Modern Palmistry– Ina Onentord.
135 Scientific Racing up-to-Date–H. Trevor.
136 Scientific Palmistry– Joseph Wood.
137 What the stars Predict For you–Samuel Cox.
138 Can you Read Him ?–M. Husen
139 Raphael's Astronomical Ephemereis 1896.- Raphael.
140 Raphel s Almanac–Rapael.
141 Raphael's Your Book 1958–Raphael.
142 Through Ths Gateway of Dreame-A. Dreamer.
143 The Art of Astrology–Gemini.
144 Astrology For Beginners–B. V. Raman.
145 Geocentric Longitudes and Declinations–Raphael.

146 Four Astrological Topics–R. D. Karmarkar.
147 Lectures on Occult Numerology–R. D. Karmarkar.
148 The Astrology of Accidents –C. E. O. Carter.
149 Wonders of the Sky–Mary Proctor
150 Fresh Sidelights on Astrology–C. G. M. Adam.
151 The Foundations of Astrology–C. E. O. Carter.
152 Astrology and Modern Thought B. V. Raman.
153 Varshaphal–B. V. Raman
154 Enlure 1945–46-M H. Almanac
155 Experiments with Horoscopes–R. G. Sapre.
156 Stars at a Glance–
157 Your 1947 Stars-K. Theodoss.
158 Raphael's Horary Astrology–Raphael.
159 Number, Name and Colour–N. H. Hora.
160 Raphael's Key to Astrology–Raphael
161 The Story of the Stars–G. E. Chambers.
162 Numerology in A Nutshell–Rasjo.
163 Harwood's Easy Lessons in Astrology–Harwood.
164 Astrology–Sepharial.
165 Astrological Ready Reckoner–Sepharial.
166 Astronomy-J. N. Lokyer.
167 How To Judge Character–Max Cromble.
168 Practical Astro–Numerology–V. G. Rele.
169 Palmistry Self–Taught– R. P. De.
170 Complete Guide to Palmistry–Charles Platt.
171 The Theory of Geodetic Equivalents–Sepharial.
172 Astrology of Annual Readings–B. M. Bharadwaj.
173 The Principles of Hindu Astrology–P. K. Dutt.
774 A Pairimer of Astrology for Children–
175 Raphael's Medica Astrology–Raphael.
176 Elementary Astrology–Sepharial
177 Secret Method of Calculating the Power of Race Horses–Hershell.
178 A Thousand and One Notable Nativities–Alan Leo.
179 The Horoscope In Detail–Alan Leo.
180 Mundane Astrology–Alan Leo.
181 Directions and Directing–Alan Leo.
182 Weather Dredicting–Alan Leo.
183 Theoretical Astrology–H. S. Green.
184 Can You read Him ?-M. Hsusen
185 Indian Astrology– R. R Mody.
186 What is Your Birth star July–F. A. Bates.
187 Practice lessons on Medical Astrology-G. A. Ananth.
181 Astrology - Bringing up the Children-L. B. Cram.
189 Astrology For Everyone-E. Adams.
190 Everybody's Astrolngy - Alan Leo.

191 What is Horoscope and How is it Cast ?– Alan Leo.

192 Planetary Influences- Alan Leo.

193 Medical Astrology- Alan Leo.

194 Palmistry Self Taught- A. P. De.

195 Guide To Astrology-Raphael.

196 Practical Astrology For Very Body-Llewellyn George.

197 The Power of Numbers–Numero

198 Cheircs Guide To The Hand-Cheiro.

199 Numerology in a Nutshell–Rasajo.

200 The Power of Numbers–Numero

201 Foulsham's Original Moore's–Almanacla–1941-

202 Fxperiments with Horoscopes Vol–VI–R. G. Sapare.

203 The Torch Bearers of Eternel Truth–.R G. Sapre.

204 Ephemeris of the Planet's Pleces S. D. Bhide.

205 The Theory of Phonetics or the Quintissance of Astrology–V. M. Joshi.

206 Kalyansevak–R. G. Sapre.

207 The Torch Bearers of Eterna–Thruth–R. G. Sapre.

208 Directional Astrology of the Hindus–V. G. Rele.

209 The Principles Theory and Practice–W. J. Tucker.

मराठी ग्रंथसंग्रह

१. प्रश्नभैरव — ल. गो. दीक्षित
२. सुखसंचारकजंत्री — शर्मा
३. करणकल्पलता — के. ल. दप्तरी
४. ज्योतिष तत्वदर्शन — पं. रघुनाथशास्त्री
५. जातका भरण — म. भा. गोडबोले
६. ज्योतिर्विलास — शं बा. दीक्षित
७. १८५६ चे वर्षभविष्य — पं. रघुनाथशास्त्री
८. तिथिचंद्रीका नामक पंचांग साधन — वि. बा. खिद्रापूरकर
९. जातकालंकार — वे. बा. केतकर
१०. चमत्कार चिंतामणी — म. भा. गोडबोले
११. दैनिक स्पष्ट ग्रह — पं. रघुनाथशास्त्री
१२. चित्रगुप्ताची शकावली — गो. वि. चौधरी
१३. भारतीय वेदपध्दती — रा. वि. पटवर्धन
१४. ताजिक निलकण्ठी — खेमराज
१५. पंचाग चिंतामणी —
१६. प्रारब्ध योग
१७. पंचांगाची माहिती —
१८. ज्योतिर्भूषण व व्यापार ज्योतिष — पं. रघुनाथशास्त्री
१९. जातक शिरोमणी — वि. गो. नवाथे
२०. सुलभ ज्योतिषशास्त्र — कृ. वि. सोमण
२१ भारतीय ज्योतिष शास्त्र — शं. बा. दीक्षित
२२. कुंडली साधन संग्रह — वा. ना. लेले
२३. उडुदाय प्रदीप — वि. गो. नवाथे
२४. सुभलजातक भाग १, २, ३, ४, — वि. गो. नवाथे
२५. सारावली — सुब्रह्मण्यम् शास्त्री
२६ बृहत ज्योतिःसारः — सूर्यनारायण सिद्धान्ती
२७ कुंडली रहस्य दर्पण — ज. स. करंदीकर
२८. जातक दर्पण — वि. बा. हेळेंकर
२९. शनिची साडेसाती-पं. रघुनाथशास्त्री
३०. स्वप्नमीमांसा-शं. ना. हरीप
३१. जातकरहस्य-द्वा. ना. राजे
३२. कुंडली संग्रह-पं. रघुनाथशास्त्री
३३. ज्योतिष मंजिरी-पुरंदरे आणि कंपनी
३४. जातक निधी-द्वा. ना. राजे
३५. खगोलाची माहिती- ,,
३६. जन्मपत्रिका प्रवर्तन-शि. ग. पवार
३७. मुहूर्त दीपिका व मुहूर्तकाल साधन-पं. रघुनाथशास्त्री
३८. षटपंचशिखा (प्रश्नविद्या)-वि. वा. शास्त्रीजोशी
३९. जैमिनियम उपदेशसूत्रम-के. वि. अभ्यंकर
४०. हर्षल व नेपच्यून-माधवीवसंत
४१. लग्न चंद्रिका-रामविहारी सुकुल
४२. नक्षत्र विज्ञान-वें. बा. केतकर
४३. शंभर वर्षांचे पंचांग-शं. न. जोशी
४४. विवाह प्रदीप-य. के. प्रधान
४५. लघुजातक-ग. बा. हेळेंकर
४६. जैमिनिय पद्धती-वि. गो. नवाथे
४७. कुंडली विज्ञान (मासिक)-वि. गो. नवाथे
४८. कुंडली-गुणनिर्णय-रघुनाथशास्त्री
४९. साडेसाती-वि. गो. नवाथे
५०. ग्रह साधन पुस्तक—,,
५१. योगावली-वि. गो. नवाथे
५२. तत्त्वज्ञान व उपयुक्त ज्योतिष-ह. वि. घावडे
५३. अथपंचपक्षी प्रारंभ—
५४. आकाश ज्योतिष-ग. वि. पटवर्धन
५५. कुंडली वर्णन (पाक्षिक)-ग. प्र. दीक्षित

५६. प्राथमिक ज्योतिष–शां. पा. केणी
५७. भारतीय ज्योतिर्गणित —
५८. ज्योतिर्विजय —
५९. लघुपाराशरी–के. गो. परांडे
६०. माझे भविष्य–ल. ना. जोशी
६१. नष्टजातक सार्थ–ज. वा. जोशी
६२. बालबोधज्योतिष भाग १ व २–य. के. प्रधान
६३. बृहत यवन जातक–ल. ना. जोशी
६४. प्रणयी शुक्र.–पद्माकर जोशी
६५. झुंजार शनि–पद्माकर जोशी
६६. जातक बोध–ह. र. भागवत
६७. आगामी काल–इंदुमति पंडित
६८. अनुभविक प्रश्नपद्धति–वि. का. रेगे
६९. अनागत काल–इंदुमति पंडित
७०. मेदिनिय किंवा राष्ट्रीय ज्योतिष–रामनारायण
७१. बृहत राशिमाला —
७२. सायन निरयन–वाद द. वा. जवखेडकर
७३. नूतन होरा दीप ” ” ”
७४. प्रश्नवैष्ठा व शास्त्र–गणेशशास्त्री देशिंगकर
७५. प्रश्नचिंतामणी–ना. ग. देशिंगकर
७६. आशुबोध ज्योतिष–पाठक व निवासी
७७. सुलभ ज्योतिष रहस्य–ग. द. मुळे
७८. सुलभ फलज्योतिष–का. वि. माणगांवकर
७९. प्रश्नभैरव–ल. गो. दीक्षित
८०. शुभाशुभ ग्रहनिर्णय विचार–ह. न. काटवे
८१. भावेश विचार–ह. ने. काटवे
८२. दैव रहस्य–ह. ने. काटवे
८३. मुहूर्त दीपिका–पं. रघुनाथशास्त्री
८४. रविविचार–ह. ने. काटवे
८५. बुधविचार–ह. ने. काटवे
८६. दैवी सिद्धान्त–भालचंद्र शिंदे
८७. ज्योतिषशास्त्र सोपानम्–श्री. सीतारामझा
८८. कालनिर्णय पध्दती–का. वि. माणगांवकर
८९. राहूविचार–ह. ने. काटवे
९०. तेजविचार–ह. ने. काटवे
९१. सुलभ वर्गसाधन–श्री. द. अवचट
९२. सुलभ जन्मकुंडली ” ” ”
९३. भालचंद्र ज्योतिर्माला ” ” ”
९४. सुलभ राशि गुणधर्म ” ” ”
९५. जातकवल्लभ–श्री. द. अवचट
९६. सुलभ पंचांग ” ” ”
९७. संपत्ति योग ” ” ”
९८. करदर्शन–ल. के. तांबे
९९. स्पष्टग्रहांचा उपयोग–ना. स. मराठे
१००. फलज्योतिष चिकीत्सा–रा. ज. गोखले
१०१. स्त्री जातक प्रदीप–पं. वा. मुंडले
१०२. सूर्यमाला–मो. ब. घारप
१०३. अचानक धनयोग साधन–न. प. महाजन
१०४. भावी ग्रहयोग –इंदुमति पंडित.
१०५. ब्रह्मयोग विद्या शिक्षक–ल. ना. जोशी.
१०६. सुबोध ज्योतिष–वि. का. पुराणिक.
१०७. लीलावती–आंबेडकर शास्त्री
१०८. सामुद्रिक शास्त्र–न. त्र्यं. वडणजेकर
१०९. आठ ग्रहांची शिखर परिषद–रा. दा. करमरकर
११०. शुक्रविचार–ह. ने. काटवे
१११. पंचांग म्हणजे काय? ते कसे पहावे?
–आ. स. कवरे
११२. ग्रहगोचर–वराहमिहीर
११३. तुमचे ग्रह तुमचे भाग्य–द. शं. केळकर
११४. सूर्यकुल–चंद्रात्रेय व ढवळे
११५. ज्योतिर्विलास–शं. बा. दीक्षित
११६. कुंडली वर्णन–ग. प्र. दीक्षित
११७. नाक्षत्र फल–वि. गो. नवाथे
११८. मुद्रा ज्योतिष–, ” ”
११९. होराशास्त्र–का. वि. माणगांवकर
१२०. मंगळ विचार–ह. के. काटवे
१२१. मृत्यु व कालपरीक्षा–बृजमोहन मिश्र
१२२. ज्योतिष विद्या– ” ”
१२३. हातावरील गुपित–ल. के. तांबे
१२४. स्वप्न मीमांसा–रा. वि. कुलकर्णी

१२५. भाग्यरेषा भविष्य–,, ,,
१२६. भविष्य बोधनी–पद्माकर जोशी
१२७. लघुपाराशरी व लघुजातक–वराहमिहीर
१२८. परिभ्रमण पद्धती–रामनारायण
१२९. जातक चंद्रीका–ह. रा. भागवत
१३०. श्री योगचिंतामणी–वा ना. रेखीजोशी
१३१. सायन निरयन वाद–भि. म. पेंडसे
१३२. श्री योगचिंतामणी—वा. ना. रेखी जोशी
१३३. सार्थ स्त्री जातक–अ. मा. वाघोलकर
१३४. ज्योतिष विवेचन–ग. ल. पावसकर
१३५. वैद्यक ज्योतिष शास्त्र–ल. ना. जोशी·
१३६. सामुद्रिक शास्त्र
१३७. भविष्य दीपिका
१३८. जोशीबुवा भाग १ ला–वि. ब. थोरात
१३९. ताजिक संग्रह
१४०. दशाविचार–म. मुं. हुंडेकर.
१४१. भास्कराचार्य व तत्कृत ज्योतिष–ज. बा. मोडक
१४२. स्त्री–पुरुष चिन्ह लक्षण विद्या
१४३. अचानक द्रव्य विधि रहस्य–न. प. महाजन
१४४. हस्तरेषा सामुद्रिक
१४५. ज्योतिः शास्त्र–का. बा. मराठे (लाक्रियर)
१४६. पंचांग शुद्धी रहस्य–वि. ब. नाईक
१४७. प्रश्नचिकित्सा–पां. ग. जोशी
१४८. परीक्षा विचार श्री. म. पाठक
१४९. हर्षल अथवा प्रजापति–,,
१५०. नेपच्यून अथवा वरूण–,,
१५१. सार्थ बृहत जातक–
१५२. व्यवहार ज्योतिष–य. गो. घोलप
१५३. खरे कौतुकम्–नव्वाब खानखाना.
१५४. हस्तरेषा–एन. एम्. मास्टर (चिरू)
१५५. जातकबोध—
१५६. पंचांग १९१५ ते १९३० चे
१५७. स्फुट ज्योतिष
१५८. हर्षल (ज्योतिष लेखनमाला)—ना. स. मराठे
१५९. रमलसार प्रश्नावली

१६०. वधुवर पत्रिका संमेलन—विनायक खानापूरकर
१६१. जातक शिक्षक गो. र. पुरंदरे
१६२. अंकशास्त्र–म. ग. दाते
१६३. स्वानुभवचंद्रीका–ड. वि. रूईकर.
१६४. दैवरहस्य ह. ने. काटवे.
१६५. पावसाची जुनी-नवी कारणे–दा. मा. बापट
१६६. भालचंद्र ज्योतिर्माला–श्री. द. अवचट
१६७. आठ ग्रहांची शिखर परिषद–रा. दा. करमरकर
१६८. जातक संग्रह–वि. गो. नवाथे
१६९. तुम्हीच ज्योतिषी व्हा भाग १, २, ३–
ना. बा. केळकर
१७०. सामुद्रिक तिलक (सामुद्रिक शिक्षक)
—पं. रघुनाथशास्त्री
१७१. ज्योतिषसार व ज्योतिषरत्न
१७२. ज्योतिर्मयुख गो. रा. मोघे
१७३. ज्योतिष शिक्षक अथवा जातककेसरी पं. रघुनाथ-
शास्त्री
१७४. संख्याशास्त्र शिक्षक–प्रो. के. न. भानू
१७५. सुलभ जन्मकुंडली–श्री. द. अवचट
१७६. पुढील ५० वर्षांची ग्रहस्थिती–पं. रघुनाथशास्त्री
१७७. जन्मपत्रिका प्रवर्तन—शिवराम गणपतराव पवार
१७८. पुढील ५ वर्षांचे सूक्ष्म ग्रहयोग आणि भविष्य–
पं. रघुनाथशास्त्री
१७९. सुलभ ग्रह गुणधर्म श्री. द. अवचट
१८०. कटिबंधमाला अथवा कटाव संग्रह गो. मो.
कालेलकर
१८१. प्रश्नविद्या अथवा षटपंचाशिका वि. वा. जोशी
१८२. नूतन होरादीप द. वा. जवखेडकर
१८३. मृत्युपरीक्षा बृजमोहनलाल मिश्र
१८४. सुलभ फलज्योतिष–का. वि. माणगांवकर
१८५. सुलभ जन्मकुंडली श्री. द. अवचट
१८६. बुध विचार हणमंत नेमासा काटवे
१८७. सुलभ वर्गसाधन–श्री. द. अवचट
१८८. कुंडलीविज्ञान वि. गो. नवाथे
१८९. जैमिनिय पद्धति" "

१९०. षट्पंचाशिखा वि वा. जोशी.
१९१. सुगम सायन निरयन वाद–भिकाजी महादेव पेंडसे
१९२. कालनिर्णय पध्दति–डॉ. माणगांवकर
१९३. होराशास्त्र डॉ. माणगांवकर
१९४. मराठी व्यवहार ज्योतिष–यज्ञेश्वर गो. घोलप
१९५. तिबोध पंचांग–पांडुरंग भास्कर पालये
१९६. भविष्य द्वीप १९३१–स. ना. कुकडे
१९७. सुबोध ज्योतिष–वि. का. पुराणिक
१९८. अनुभविक प्रश्नपध्दति— वि. का. रेगे
१९९. पंचांग चिंतामणि–गो. स. आपटे
२००. ज्योतिष कौस्तुभ (सुवर्ण महोत्सव स्मृतिग्रंथ)— –पं. रघुनाथशास्त्री
२०१. जातक शिरोमणि–वि. गो. नवाथे
२०२. पुढील पांच वर्षांचे सूक्ष्म ग्रहयोग आणि भविष्य –पं. रघुनाथशास्त्री
२०३. भारतीय ज्योतिष शास्त्र अथवा भारतीय ज्योतिषांचा इतिहास–शं बा दीक्षित
२०४. फलज्योतिष परिषदेचे संपूर्ण वृत्तांत–पं. रघुनाथशास्त्री
२०५. ज्योतिषसार व ज्योतिषरत्न—
२०६. ग्रहयोग दर्शन (नोव्हे ५७ ते एप्रिल ५८) –कृ. वि. बोंद्रे
२०७. ज्योतिर्मयुख–तुकाराम पुंडलिक शेटे
२०८. गृहिणी जातक–द्वा. ना. राजे
२०९. नशिबाचे घड्याळ–मा. कृ. बेहेरे
२१०. एकेकाचा स्वभाव–वा. शि. आपटे
२११. मेदिनीय किंवा राष्ट्रीय ज्योतिष–रामनारायण
२१२. आरोग्य जातक–द्वा. ना. राजे
२१३. उडुदाय प्रदीप अथवा लघुपाराशरी–के. गो. परांडे
२१४. अद्भुत भविष्य–मा. कृ. बेहेरे
२१५. भारतीय युद्धकाल निर्णय–र. वि. वैद्य
२१६. "जय" ग्रंथाचे सत्यस्वरूप—र. वि. वैद्य
२१७. कांहीं ज्योतिष ग्रंथ व त्यांचे काल—र. वि. वैद्य
२१८. चित्रगुप्त शास्त्रीय सिद्धांत—
२१९. फलज्योतिष परिषद पंढरपूर–ज. स. करंदीकर
२२०. कुंडली वर्णन (मासिकें)—ग. प्र. दीक्षित
२२१. प्रश्न जातक–न. प. महाजन
२२२. कुंडली तंत्र आणि मंत्र—म. दा. भट
२२३. तुमचे ग्रह तुमचे वैवाहिक जीवन—द. शं. केळकर
२२४. तुमचे ९५ प्रश्न आणि त्यांची उत्तरे—
२२५. तुमचा जन्म दिवस तुमचे भाग्य—,,
२२६. तुमचे नांव तुमचे भाग्य—,,
२२७. करण कल्पलता—के ल. दप्तरी
२२८. ताजिक नीलकण्ठी—
२२९. मुद्राज्योतिष—वि गो. नवाथे

– विशेष उल्लेखनीय –

संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. श्रीकृष्ण अं. जकातदार यांना, त्यांनीं वर्तविलेली अनेक भाकितें खरीं ठरल्यानें, न्यायाधिश, वकील, पत्रकार, डॉक्टर, शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते, पुढारी, मंत्री, प्रथितयश नट, नाटककार, दिग्दर्शक, व्यापारी, उद्योगपति असे सर्व क्षेत्रांतील व्यक्तींचे सुमारे ८०० ते ९०० अभिप्राय आलेले आहेत त्यापैकीं कांहीं पान नं. २३/२४ वर दिलेले आहेत.

—संपादक

‘ज्यो. समाचार’ मधून प्रसिद्ध झालेल्या लेखांचा परामर्ष

♠

लेख	लेखक
जुलै ६३ (अंक १ ला)	
१. अभ्यासनीय कुंडली	शुभांगी सबनीस
२. ज्योतिष व आधुनिक विज्ञान	महर्षि डॉ. धुं. गो. विनोद
३. संख्याशास्त्र व मानवी जीवन	प्रो. आर. डी. करमरकर
ऑगस्ट ६३ (अंक २ रा)	
४. भारताचा स्वातंत्र्य दिनांक व संख्याशास्त्र	प्रो. आर. डी. करमरकर
५. अभ्यासनीय कुंडली	कु. नीला कुलकर्णी बी. ए.
६. घरच्या घरी ज्योतिषी व्हा	संपादकीय
७. तुमचे जन्मतारखेवरून भविष्य	”
सप्टेंबर ६३ (अंक ३ रा)	
८. भारतीय ज्योतिषशास्त्राचे प्राचीनत्व	सदाशिव आ. शृंगारपुरे
९. घरच्या घरी ज्योतिषी व्हा. (लेखांक २ रा)	संपादकीय
१०. अभ्यासनीय कुंडली (सुप्रसिध्द चित्रपट निर्माता दिग्दर्शक राजा ठाकूर	
११. ज्योतिष म्हणजेच दैवज्ञ	एम्. सत्यनारायण
१२. तुमचे जन्मतारखेवरून भविष्य (खास महिलांसाठी)	संपादकीय
१३. पत्रिका समालोचन विद्यायोग	श्री. वि. धों. गोरेशास्त्री
ऑक्टोबर—नोव्हेंबर ६३ (अंक ४–५)	
१४. अंधत्वयोग	भालेराव गुरुजी
१५. एक चिंतन	श्री. अ. जकातदार
१६. तुम्हांस माहित आहे काय ? ग्रहगोलाचे निरीक्षण करणाऱ्या भारतामधील वेधशाळा	अनामिक
१७. प्रभावी मंत्रकवच–तंत्रसिद्धि साधना	सदाशिव आ. शृंगारपुरे
१८. ग्रहरत्ने आणि मानवी जीवन !	डॉ. वि. का. रेगे
१९. अभ्यासनीय कुंडली—संग्राहक	दिलीप नाईक
२०. अभ्यासनीय कुंडली संग्राहक	जयवंत वालावलकर
२१. शुक्र, मंगळ व स्वैर जीवन	द. शं. केळकर
२२. सायन कुंडली कां पहावी ?	बाळासाहेब गोखले
२३. संख्याशास्त्राधारे मानवी-जीवन साफल्य	प्रो. आर. डी. करमरकर
२४. घरच्या घरी ज्योतिषी व्हा	संपादकीय
२५. विशेष अभ्यासनीय कुंडली	संपादक
डिसेंबर ६३ (अंक ६ वा)	
२६. शुक्र-मंगळ आणि स्वैर जीवन लेखांक २	द. शं. केळकर
२७. पं. नेहरूंच्या कुंडलीचे विवेचन	संपादक
२८. चंद्राचे गोचर भ्रमण	पु. द्वा. राजे
२९. पुत्रसंततीसाठी प्रभावी मंत्र	स. आ. शृंगारपुरे
३०. चंद्राला स्वतःचा प्रकाश आहे काय ?	संपादकीय
जानेवारी–फेब्रुवारी ६४ (अंक ७ वा ८ वा)	
३१. न्यायरत्न आणि गूढ विद्या	
३२. उत्तर ध्रुवाच्या परिसरांत	
३३. ज्ञानयोग व जीवन्मुक्ति	डॉ. न्यायरत्न विनोद
३४. ज्योतिषी आणि समाजसेवा	ज्यो. वसंत ला. म्हापणकर

प्रधान मंत्री भवन
PRIME MINISTER'S HOUSE
NEW DELHI

Shri S.A. Jakatdar Jotish Mandal
Poona 4

Thank you for your message of good wishes, which I greatly value. Your affection and trust will give me strength to serve our country.

With good wishes,

Indira Gandhi

1.2.66

श्रीमती इंदिराजी गांधी यांना " त्या सार्वत्रिक निवडणुकींत यशस्वी होऊन पंतप्रधानहि होतील " असे भविष्य श्री. जकातदार यांनीं १ महिना आधीं कळविलें होतें. तें खरे ठरल्यानें त्यांचेकडून आभार मानणारे पत्र आलें त्याचें छायाचित्र छापलें आहे.

— संपादक

एप्रिल ६७ (अंक १०)

मे ६७ (अंक ११)

जून ६७ (अंक १२ वा)

***

वृत्तपत्रांच्या दृष्टीकोनांतून

ज्योतिष समाचार

लोकांच्या आयुष्यांतील इष्टानिष्ट घटनांचा कालनिर्देशासह प्रत्यक्ष व प्रमाणभूत संग्रह कुंडल्यांसह करून त्याचा चिकित्सापूर्व अभ्यास मंडळात चालू असतो, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

२३।७।१९६० तरुण भारत

ही संस्था म्हणजे श्री. श्रीकृष्ण अ. जकातदार यांच्या अविरत श्रमांचे फल होय.

३ ऑगस्ट १९६० प्रभात पुणे

जन्मकुंडलीचे शास्त्रीय पद्धतीनें संशोधन व ज्योतिष शास्त्राचे महत्व सतत जागृत ठेवणे या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली.

२१ ऑगस्ट १९६० विशाल सह्याद्रि—पुणे.

प्रत्येकाची यशाबद्दलची कल्पना वेगळी असते. ज्यांच्या मस्तकरेषाचा अंत यशदायक तो यशस्वी हात होय असे उद्गार श्री. शृंगारपुरे यांनी संस्थेतर्फे व्याख्यानांत सांगितले.

२९।८।६० विशाल सह्यद्री पुणे

ज्योतिषशास्त्राविषयी आस्था निर्माण करणे व अंधश्रध्दा न ठेवता जन्मकुंडलीचे फलज्योतिष शास्त्रदृष्टया संशोधन करणें ह्या उद्देशाने मंडळ स्थापन करण्यात आले.

प्रभात ७ सप्टेंबर १९६०

संस्थेच्या कार्यकारी मंडळात या विषयांतील तज्ज्ञांचा समावेश असून त्यांचे या विषयातील प्रभुत्व निर्विवादपणे मानले गेले आहे.

९।९।१९६० सकाळ—पुणे

मानव हा मूळ आशावादी असून आपला पुढील काल कसा जाईल याची जिज्ञासा असणे हे नैसर्गिक आहे असे उद्गार श्री. जकातदार यांनी भविष्यावर बंदी घालू नये या विषयावर बोलताना काढले.

२७।१२।१९६० सकाळ—

फलज्योतिष अभ्यास मंडाच्या तिळगूळ समारंभ प्रसंगी अध्यक्ष श्री. चिवटे यांनी ज्योतिषशास्त्राच्या अचूकतेबद्दल गौरवोद्गार काढले.

२३।१।१९६१ विशाल सह्याद्री पुणें

ज्योतिष शास्त्राचे संशोधन, महत्वाची प्रमेये निश्चित करणे हे या मंडळाचे ध्येय आहे.

१०।११।१९६४ प्रभात, पुणें

पुणें हे संस्थेचे माहेरघर म्हणून प्रसिध्द आहे. या ' फलज्योतिष अभ्यास मंडळ '' या संस्थेचे नांव सर्व महाराष्ट्रात पसरत चालले आहे.

"पूर्वजांनी ज्योतिष हा एक अमूल्य ठेवा आपणांस दिला आहे त्याचा संशोधनपूर्वक अभ्यास होणे अगत्याचे आहे." असे उद्गार पुण्याचे मेयर श्री. शिवाजीराव ढेरे यांनी संस्थेच्या तिसऱ्या वाढदिवस समारंभाचे अध्यक्षस्थानावरून काढले.

२९।१।१९६२ सकाळ

महाराष्ट्र कवि यशवंत यांना सरकारी पुरस्कार मिळेल असे भविष्य श्री. अ. जकातदारांनीं ७ महिन्यापूर्वीच केले ते खरे ठरले. यासाठी महाराष्ट्रकवींनी कौतुकास्पद उद्गार काढलें. तिसऱ्या वर्धापन दिनी पुण्याचे मेयर श्री. शिवाजीराव ढेरे यांनी मंडळाच्या कार्याचाहि गौरव केला.

२९।१।१९६२ प्रभात पुणें.

आपल्याकडे अनेक शास्त्रांचा ज्याप्रमाणें विचका झाला त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्राचाहि विचका झाला

आहे. कारण ह्या शास्त्राचा योग्यतो वारसच केला जात नाहीं. अशा आशयाचे उद्‌गार पुण्याचे महापौर श्री. ढेरे यांनी काढले.

संस्थेच्या चतुर्थ वर्धापन दिनी अध्यक्षीय भाषणांत महापौर गु. जगताप म्हणाले की, "विविध विचार व मते जरी असली तरी या शास्त्राचा अभ्यास होणे अगत्याचे आहे. परंतु केवळ अंधश्रध्दा व दैववाद त्यात असू नये. त्याला धैर्याने तोंड देणे यातच खरा पुरुषार्थ आहे" ५।१।१९६३ प्रभात—

संस्थेच्या चौथ्या वर्धापन दिनी म. म. द. वा. पोतदार यांनी सांगितले की, ज्योतिषशास्त्राचा आपणाकडे वारसा चालत आलेला आहे, तो आपण निष्ठेने जतन केला पाहिजे. ४।१।१९६३ सकाळ.

पारंपारिक चालत्या रूढी संकेत समजुती यांचे आधिकाधीक संशोधन होऊन त्या विशुध्द झाल्या पाहिजेत असे विचार म. म. द. वा. पोतदार संस्थेच्या ४ थ्या वर्धापन दिनी व्यक्त केले.

७।१।१९६३ संध्या.

"संपूर्ण भविष्य" पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी अध्यक्षीय भाषणांत न्यायरत्न विनोद म्हणाले कीं, विज्ञान आणि ज्योतिष यांत विरोध नाहीं, ज्योतिष हे एक शास्त्रच असुन आइस्टाइनपर्यंतच्या सर्व शोधांनी या शास्त्राची सत्यता व उपक्तयुक्ता वाढलीच आहे.

१।४।१९६३ प्रभात—

ही संस्था ज्योतिषप्रेमी व उत्साही अशा तरुणांनी स्थापन केली. या संस्थेचे नांव आता जनताजनार्दनापुढे हळू हळू येत चालले आहे.

—केसरी.

पुस्तक वाचनीय व संग्राह्य झाले आहे. हे वर्षभविष्य अल्पावधींतच लोकप्रिय झाले याकरूनच त्यांचा उपक्रम चांगलाच यशस्वी झाला आहे असे म्हटलें पाहिजे.

१५।८।१९६३ —दीन बंधु

श्री. जकातदारांनी १९६३ ते ६४ चे वर्षभविष्य सांगोपांग विचार करून लिहीले आहे. त्यांचें हार्दिक स्वागत करतो.

१०।४।१९६३ बलवंत

श्री. जकातदारांनी अतिशय सुबोधपणे लिहिलेले हे पुस्तक भवितव्यांतील घडामोडींची भीति वाटणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल यांत संदेह नाहीं.

१६।४।१९६३ दैनिक मराठा

४ थ्या वर्धापनदिनी अध्यक्ष मेयर जगताप म्हणाले, अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता व जे होणार आहे त्याला घाबरून न जाता धैर्याने तोंड देण्यांतच खरा पुरुषार्थ आहे.

५।१।१९६३ तरूण भारत

सामान्यजनांना मार्गदर्शनासाठी व अभ्यासूंना अभ्यासासाठी उपयुक्त असाच हा ग्रंथ संग्राह्य आहे.

२१ एप्रिल १९६३ विशाल सह्याद्रि पुणें,

"संपूर्ण वर्षभविष्य" हें पुस्तक वाचतांना लेखकाची भाषा सोपी व ओघवती वाटते त्यांत कशाचेही अवडंबर माजविलेले नाहीं.

तरुण भारत ५।५।१९६३

The book is very useful to a student of Astrology. It is indepenaible for an amateur in the sciene.

The Poona Daily News.

ज्योतिषशास्त्राचा जन्म भारतातच झालेला आहे ही गोष्ट जगांतील सर्व ज्योतिष्यांनी आतां मान्य केली असुन या शास्त्राच्या संशोधन कार्यास उत्तेजन देणे अगत्याचे आहे.

ना. बाळासाहेब देसाई, लोकसत्ता २ जुलै १९६३

अभिमानास्पद असणाऱ्या या ज्योतिषशास्त्राचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे. केसरी दोन जुलै ६३

ज्योतिष शास्त्र हा भारतीयांचा वारसा आहे. मीही एकदा कोयनेची कुंण्डली मांडली होती.

विशाल सह्याद्रि २।४।६३

अनेक लोकांची या विषयावर श्रद्धा आहे, ती अस्थानी आहे असे म्हणता येणार नाही. ज्योतिष

मंडळींनी या शास्त्राचा वापर अभ्यासाच्यादृष्टीने करून लोकांच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात.

तरुण भारत ३।४।६३

हे शास्त्र एक विद्या शाखा आहे. हे शास्त्र अविश्वासार्ह असे मुळीच म्हणता येणार नाही.

प्रभात ३।४।६३

Horoscopics is a definate science with ts root and development credited to Indian learnings. The Poona Daily News

ज्योतिष या विद्येचा उगम भारतात झाला असून त्यांच्यामुळेच मी प्रभावित झालो.

ना. हरिभाऊ पाठसकर संध्या ४।४।६७

Research is Astrology desevcd full encouragement. The Indian Express 2-4-67

ज्योतिष शास्त्रावर मराठी भाषेत मासिक सुरू करून श्री. जकातदार यांनी ज्योतिष अभ्यासकांना साधन उपलब्ध करून दिले आहे.

—विशाल सह्याद्रि. १४।४।६६

ज्योतिष समाचार यशस्वी होवो.

—लोकसत्ता २०।८।६५

या मासिकाचा धंदेवाईक दृष्टीकोन नसून समाजात आवड निर्माण व्हावी. उज्वल भविष्य प्रार्थितो.

—धनुर्धारी २४।५।६३

ज्योतिषाची आवड असलेल्या जिज्ञासू लोकांची ज्ञानपिपासा शमविण्याचे उद्दिष्ट ठेवल्याबद्दल संपादकाच्या धाडसी उपक्रमाचे अभिनंदन. प्रभात २५।५।६३

ध्येयवादित्वाने हे मासिक चालविण्याचा चालकांचा उपकृत्य दिसतो. सुयश चिंतितो.

Devoted to the task of research and propogation of Astrology.

Poona dailu news 26-5-63

तांत्रिकतेचे अवडंबर व माजविता सामान्यांना माहिती समजणे अत्यावश्यक आहे. या अंकामुळे हे महत्व लक्षात येते.

ज्योतिषशास्त्रावर श्रध्दा असणारांना प्रिय असणारांना तो निःसंशय आवडेल.

गांवकरी

सर्वच साहित्य ज्योतिषविषयक असून ते वाचनीय व अभ्यासनीय आहे.

ज्योतिषाची हेटाळणी न करता त्याचा अभ्यास होणें जरूर आहे. मेयर किराड विशाल सह्याद्री.

याचा अभ्यास तपश्चर्यापूर्वक होऊन प्रतिष्ठा लाभावी म्हणून मी आज हजर आहे.

गृहमंत्री बाळासाहेब देसाई

प्रभात १५।४।६४

या शास्त्राला पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त व्हावयास पाहिजे.

लोकसत्ता

ज्योतिष शास्त्राने मानवी प्रयत्नांना प्रेरणा द्यावी.

ह. रा. महाजनी लोकसत्ता

ज्योतिष हे शास्त्र मार्गदर्शन करणारे असून कर्तृत्वाला उत्साह प्राप्त करून देणारे आहे.

उद्योगपति गोगटे–प्रभात

भविष्याचा उपयोग प्रयत्नवादाला मदत करण्याकरतां झाला पाहिजे.

ह. रा. महाजनी–सकाळ

दैव–दैव यांच्याप्रमाणे प्रयत्नवादावर भर हवा, तसेच ज्योतिषशास्त्राला वाहून घेणारी ही एक निरलस संस्था माझे मित्र श्री. जकातदार यांनी झीज सोसून चालविली आहे.

बाळासाहेब देसाई–प्रभात

शास्त्रशुद्धरित्या अभ्यास झाल्याशिवाय त्याविषयी गैरसमज पसरणार नाहीत.

–लोकसत्ता

ज्योतिषाचा व्यासंग अतूट राहावा.

–महाराष्ट्र टाईम्स

Mr. Desai praised the work of Mr. Shrikrishna Jakatdar working president of the mandal and said that poona was rich with Persons like Mr. Jakatdar, who

lcvoted their lives to a perticular subject.
The Indian Express 12 may 1965

ज्योतिषशास्त्राची सेवा करणारे हे मासिक अधिक प्रभावी मार्गक्रमण करावयास लागो !

विशाल सह्याद्रि १८।७।६५

श्री. जकातदारांचे कार्य पाहून समाधान वाटले.
शकुंतलादेवी १६ जून ६५

ज्यो. हे एक उपयुक्त शास्त्र आहे. ह्या शास्त्रास राजदरबारी मान मिळणे अगत्याचे आहे.

निर्मलाराजे भोसले विशाल सह्याद्रि दोन ऑगस्ट ६५

या शास्त्राबाबतचे गैरसमज नाहीसे करून योग्य मार्गदर्शन मिळण्यासाठी या शास्त्राचा सखोल अभ्यास होणे जरूर आहे. निर्मला राजेभोसले केसरी २।८।६५.

प्राचीन अनमोल समृध्द असणाचा ज्योतिष विद्येचा शास्त्रोक्त अभ्यास करणारे स्नातक व संस्था यांनी या शास्त्राबाबतचे गैरसमज दूर करून त्याची उपयुक्तता पटविली पाहिजे. निर्मलाराजे भोसले प्रभात २।८।६५

फल ज्यो. अभ्यास मंडळास राज्यपाल श्री. चेरीयन यांनी धावती भेट दिली. व श्री. जकातदारांनी केलेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले.

ज्योतिषाची आवड समाजात उत्पन्न करण्यासाठी श्री. जकातदार यांनी चालविलेला हा साहित्यिक उपक्रम खास अभिनंदनीय आहे.

देशभक्त २९ जुलै ६५

ज्योतिष विषय हे एक शास्त्र आहे. विद्यापीठामध्ये तो ठेवून त्याला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

पी. के. सावंत २१ फेब्रु. ६६

ऋषीमुनींचा हा वारसा आपण जतन करून त्यांत योग्य ती भर घातली पाहिजे.

केसरी २१ फेब्रु. ६६

भविष्यकथनांत चंद्रबळ हा महत्वाचा भाग आहे.

वि. सह्याद्रि २१ फेब्रु. ६६

जातक वर्तविणे हा व्यवसाय नसून तो संस्कार आहे. त्यात मांगल्याची भावना आहे. फलज्योतिषाचे ज्याने मूळ गणित बांधले ते बुद्धिगम्य आहे त्याचा उलगडा झाला तर या शास्त्रासंबंधी श्रद्धा निर्माण होईल.

ह. रा. महाजनी संपादक, लोकसत्ता

ज्योतिषशास्त्राचे सिद्धांत कायम स्वरुपाचे असावेत.
प्रभात, २१।२।६६

या शास्त्रात आपल्या पूर्वजांनी जी प्रगति केली आहे त्या पलिकडे सध्या आपण कांही भर घातलेली नाही. त्यादृष्टीने संशोधन करून संस्कृत ग्रंथ मराठीत आणून हे शास्त्र अधिक निर्दोष करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ना. भारदे, सभापति २१।२।६६

अधिकाअधिक संशोधन करून ज्योतिष शास्त्रात बदल करा.

ह. रा. महाजनी

ज्योतिष हे सत्य व खरे शास्त्र आहे. त्या शास्त्राची टवाळकी करणे योग्य नव्हे.


शंकरराव उरसळ, अध्यक्ष, जि. प. पुणे

ज्योतिष हे प्राचीन शास्त्र असल्याने त्याचा अधिक अभ्यास व्हावा. त्या दृष्टीने संस्थेचे प्रयत्न स्तुत्य आहेत.
बी. डी. किल्लेदार, माजी महापौर

फलज्योतिष अभ्यास मंडळाच्या ज्योतिष परीक्षांचे यशस्वी पदवीधर



सौ. कमल करंदीकर,
सोलापूर



मधुकर त्र्यंबक अभ्यंकर
पुणे



वाय. जी. नलावडे
सांगली




नीलकंठ व. जोशी,
लोणावळा



श्री. जी. दा. घोसपूरकर, वकील
नगर



सौ. विद्या खांडेकर



भिकाजी रामचंद्र मुळे,
कऱ्हाड



सय्यद अन्वर,
पुणे



कल्याणदास ह. देवी
ओगलेवाडी



बी. डी. कुलकर्णी



डी. एस. जोशी



शां. ग. कुलकर्णी




सौ.शकुंतला बिबीकर



गणपति रा. जोशी



सौ. नलिनी भालेराव



केशव. पु. जोशी



सौ.उज्वला कुलकर्णी



ल. श्री. देशपांडे




गो. के. जोशी




ता. द. आयाचित

ज्योतिष प्रवीण पदवीचे मानकरी



म. ता. कदम



पौ. वि. मांडवगणे




डॉ. आर. एन. पटेल




नागेश प्र. जोशी



भा. वि. देशपांडे



दि. ना. नांरविलकर




हे. वि. हाटकर

ज्योतिष प्रवीण पदवीचे मानकरी



पां. ना. सातोसकर



आर. पी. कदम



के. दी. संतार्णीकर



ह. बा. मोकाशी



श्री. गो. जहागिरदार



वि. ग. देवळालकर



डां. शि. जैन

फलज्योतिष अभ्यास मंडळ, संस्था

८८५, भांडारकर पथ, पुणें ४.

फलज्योतिषविषयक शास्त्रोक्त संशोधन कार्य करणारी महाराष्ट्रांतील अग्रगण्य संस्था



[श्री. अ. जकातदार

संस्थेतर्फे पुढील कार्यें अगत्यशील केली जातात.

- जन्मकुंडली पत्रिका-जन्मटिपण तयार करणें.
- ज्योतिषशास्त्राधारें आयुष्यांतील घडलेल्या व भावी कालांत घडणाऱ्या घटनांचे संशोधनात्मक विश्लेषण.
- आयुष्याचे संपूर्ण-त्रोटक लेखी भविष्य, मार्गदर्शन व कुलदैवतांच्या उपासना (भक्तिमार्गासह)
- हातांचे ठसे घेवून त्या आधारें संपूर्ण जीवनपटाची दिशा—मार्गदर्शन.
- विवाह केव्हां ! वर—वधू कोण ! याबाबत सल्ला निश्चित मार्गासह.
- मंत्र—तंत्र—गूढविद्या-अध्यात्म—बाबत तज्ज्ञ मंडळींचे अनुभव व भेटी घडवून आणणें.
- प्रश्नपत्रिका व कुंडली पहाणें, तयार करणें.

[**टीप :**—भेटीची व सर्व बाबतीत अत्यंत गुप्तता राखली जाते.]

ज्योतिष शिक्षण कोर्स

संस्थेतर्फे पोस्टल कोर्सेस द्वारां ज्योतिषाचे वर्ग सुरू आहेत.

—: परीक्षा व पदव्या :—

- ज्योतिष प्रवीण
- ज्योतिष प्राज्ञ
- ज्योतिष विशारद
- हस्तसामुद्रिकाचा कोर्स लवकरच सुरू होत आहे. आपली नांवे नोंदवा २५ पैसे पोस्टेज पाठवून माहिती पत्रकमागवा.

[अधिक माहितीसाठीं संस्थेचे परिपत्रक आजच मागवा. सोबत ५० न. पैसे पोस्टेज पाठवावे.

— संस्थापक —

ज्योतिर्मार्तंड—**श्रीकृष्ण अनंत जकातदार**

आगामी प्रकाशने

१. सामुद्रिकशास्त्राची ओळख
२. ज्योतिषशास्त्राचा ओनामा
३. संख्याशास्त्राचे गुपित
४. बृहत्‌जातकावरील टीका

संपादक — श्री. अ. जकातदार

फलज्योतिष अभ्यास मंडळ

स मा प्त